**ISSN: 2454 – 7905**

*SJIF Impact Factor:* 7 . 479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I ISSUE – L Year – 7 09 April 2022**

**Kisan Shikshan Prasarak Mandal, Udgir's**

## Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur

**NAAC Accredited with 'B' Grade**

**Dist. Latur State: Maharashtra (431515)**

## One Day International Seminar (Online)

**Organized by**

**Department of Sociology in collaboration with**

## Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.

## On

# Yugpurush Dr. Babasaheb Ambedkar

**:: Editor in Chief ::**

**Principal**

**Dr. Vasant Biradar**

**Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur.**

**:: Editor ::**

**Dr. Satish Sasane**

**Assit. Prof. & Head, Department of Sociology**

**Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur.**

**Address for Correspondence**

**Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded. (MH. India) n**Website: www.wiidrj.com**

House No.624 – Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India – Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com umbarkar.rajesh@yahoo.com

**Dr. Rajesh G. Umbarkar Mob. No:** +91-9623979067

# Worldwide International Inter Disciplinary Research

## (A Peer Reviewed Referred)

**Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed Referred)** is quarterly published journal for Research scholars, teachers, businessman and scientists to integrate disciplines in an attempt to understand the complexities in the current affairs.

We also believe that both researchers and practitioners can contribute their knowledge by translating understanding into action and by linking theory and practice. This would enhance the relevance and thought in various related fields.

This Journal expected to bring together specialists in the field of commerce, economics, management and industry from different part of the world to address important issues regarding commerce, management and economics. One of the objectives of the journal is to create dialogue between scholars of various disciplines.

The editor, editorial team and the publisher do not hold any responsibility for the views expressed in **Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed Referred)** or for any error or omission arising from it.

The journal will cover the following Faculties for All Subject:

| | |
|---|---|
| • Arts/ Humanities / Soc. Sci. / Sports | • Engineering |
| • Commerce | • Medical /Ayurveda |
| • Science | • Law |
| • Education | • Journalism |
| • Agriculture | • Mass Communication- **Library sci.** |
| • Pharmaceutical | • Social Work |
| • Management | • Any Other |

**Director : Mr. Tejas Rampurkar** (For International contact only +91-8857894082)

***Printed by***

Anupam Printers, Nanded.

© **Copy Right: Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur Dist. Latur**

© **Cost: Rs. 400/-**

**Editors of Worldwide International Peer Reviewed Journal are not responsible for opinions expressed in literature published by journal.**

**The views expressed in the journal are those of author(s) and not the publisher or the Editorial Board. The readers are informed, authors, editor or the publisher do not owe any responsibility for any damage or loss to any person for the result of any action taken on the basis of the work (c) The articles/papers published In the journal are subject to copyright of the publisher. No part of the publication can be copied or reproduced without the permission of the publisher.**

# Editorial Board

| | |
|---|---|
| **Dr. R. C. Jadhav**<br>Asst.Prof.and Head, Dept.of English<br>Shivaji College, Renapur | **Dr. Machindra H. Khandagale**<br>Asst. Prof, Dept. of English,<br>Dayanand College of Arts, Latur |
| **Dr. Ajit Mulajkar**<br>Asst. Prof. and Head, Dept.of English,<br>Maharashtra Mahavidyalaya, Nilanga | **Dr. S. T. Jadhav**<br>Asst. Prof & Head, Dept.of English,<br>Bhai Kishanrao Deshmukh Mahavidyalaya,<br>Chakur |
| **Dr. Prashant Shinde**<br>Asst. Prof. & Head, Dept.of English,<br>Shivneri Mahavidyalaya, Shirur Anantpal | **Asso. Prof. Mr. Balasaheb Kamble**<br>Asso.Prof. Dept. of English,<br>Tikaram Jagannath College Khadki, Pune |
| **Dr. Urmila Dharashive**<br>Asst.Prof. & Head, Dept. of English,<br>Ambedkar Mahavidyalaya, Latur | **Dr. Kalkasaheb Dhaygude**<br>Asst. Prof. Dept. of English<br>Sant Ramdas Arts Commercde & Science<br>College, Ghansangvi, Dist. Jalna |
| **Dr. Prabhakar Swami**<br>Asst.Prof. Dept. of English, Mahatma PhuleMahavidyalaya, Kingaon | |

# Peer-Review Committee

| | |
|---|---|
| **Dr. Anil Katte**<br>Professor and Head, Dept.of English,<br>Karmveer Mamasaheb Jagdale Mahavidyalaya,<br>Washi | **Dr. Umesh Jagdale**<br>Professor, Dept. of English<br>SN Arts, Malpani Commerce and BN Sarda<br>Science College (Autonomus)<br>Sangamner, Dist.-Ahmednagar |
| **Dr. P. D. Shitole**<br>Asso.Prof. Dept of English,<br>Smt. Sushiladevi Deshmukh Mahila<br>Mahavidyalaya, Latur | **Dr. M. D. Pathan**<br>Asso.Prof & Head,<br>Sanjeevani Mahavidyalaya, Chapoli |
| **Dr. Shardool Thakur**<br>Professor, Dept.of English,<br>Chintamanrao College of Commerce, Sangli | **Dr. Meena Kadam**<br>Asso.Prof. & Head Dept. of English<br>Sambhaji College Murud |

# Advisor Committee

| | |
|---|---|
| **Dr. D. D. Chaudhari**<br>Professor & Head Dept. of Economics,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur | **Dr. N. U. Muley**<br>Professor & Head Dept. of Hindi,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur |
| **Dr. P. D. Chilgar**<br>Asst.Prof.& Dept. of Hindi,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur | **Dr. A. V. Mundhe**<br>Professor & Dept. of Marathi,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur |
| **Dr. M. D. Kasab**<br>Asso.Prof. & Dept. of Marathi,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur | **Dr. P. B. Biradar**<br>Asst.Prof. & Head, Dept. of Sanskrit,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur |
| **Dr. P. P. Choukate**<br>Asst.Prof. & Head, Dept. of Pol.Science,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur | **Dr. S. G. Sasane**<br>Asst.Prof. & Head, Dept. of Sociology,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur |
| **Dr. B. K. More**<br>Asst.Prof. & Head, Dept. of History,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur | **Dr. D. N. Mane**<br>Asst.Prof. & Head, Dept. of Geography,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur |
| **Dr. S. H. Garje**<br>Asst.Prof. & Dept. of Geography,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur | **Dr. A. S. More**<br>Professor & Head, Dept. of Sports,<br>Mahatma Phule Mahvidyalaya, Ahmedpur |

**Worldwide International Inter Disciplinary Research Journal** (A Peer Reviewed Referred) **ISSN – 2454 - 7905**

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | EDITORIAL | Asst. Prof. Atish Akade | IX |
| 02. | PREFACE | Principal Dr. Vasant Biradar | X |
| 03. | DR. B. R. AMBEDKAR : ARCHITECTURE OF THE INDIAN CONSTITUTION | Dr. Sainath I. Waghmare | 01 |
| 04. | "DR BABASAHEB AMBEDKAR'S CONTRIBUTION IN AWAKENING CONSCIOUSNESS OF OPPRESSED PEOPLE" | Dr. R. G. Kumawat | 06 |
| 05. | BABASAHEB AMBEDKAR AND EMPOWERMENT OF WOMEN | Sadhana Sarmah | 09 |
| 06. | DR. BABASAHEB AMBEDKAR'S THOUGHTS ON ECONOMIC CONSIDERATIONS | R. N. Kadam | 13 |
| 07. | DR. BABASAHEB AMBEDKAR AND EMPOWERMENT OF WOMEN | Dr. Shubhangi Dongre | 17 |
| 08. | EDUCATIONAL THOUGHTS OF DR. BABASAHEB AMBEDKAR | Miss. Jondhale Dhanashri Dhondopant | 21 |
| 09. | DR. S. R. RANGANATHANS FIVE LAWS OF LIBRARY SCIENCE AND THEIR IMPLEMENTATIONS ON LIBRARY ACTIVITIES | Mr. Parmeshwar M. Ingle | 25 |
| 10. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आम्हाला काय दिले? | प्रा. एम. डी. रायभोळे | 28 |
| 11. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाजशास्त्रज्ञ | प्रा. आनेराव एम. एम. | 32 |
| 12. | डॉ बाबासाहेब आंबेडकराचे महिलासाठीचे योगदान | Dr. Manisha Ramrao Bodke | 36 |
| 13. | नवभारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. डॉ. दिलीप सावंत | 40 |
| 14. | युगप्रवर्तक युगपुरुष, प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. ज्ञानेश्वर गायकवाड | 43 |
| 15. | स्त्रीयांचे मुक्तीदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. शिंदे संतोष मारूती | 45 |
| 16. | डॉ बाबासाहेब आंबेडकर और लोकतांत्रिक मूल्य | डॉ. सुरेश. आर.पाटिल | 48 |
| 17. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | डॉ. डी. एम. तिड़के | 51 |
| 18. | प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे ग्रंथप्रेम | डॉ. तिलक डी. भांडारकर | 56 |
| 19. | युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य | डॉ. बब्रुवान मोरे | 59 |
| 20. | रुपयाच्या प्रश्नावर बोलणारा जगातील पहिला अर्थतज्ज्ञ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर | डॉ. राजेश गं. उंबरकर | 64 |

| | | | |
|---|---|---|---|
| 21. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार | डॉ. दीपक वेडे | 66 |
| 22. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजातील अस्पृश्यता व धर्माच्या संदर्भात समाजशास्त्रातील योगदान | डॉ. संजय गंगाराम सुरेवाड | 69 |
| 23. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मूलन विषयक कार्य | डॉ. विठ्ठल केदारी | 72 |
| 24. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | डॉ. विक्रम जाधव | 75 |
| 25. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार : एक अभ्यास | जामकर अल्का रानबा | 78 |
| 26. | आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय योगदान | डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार | 81 |
| 27. | डॉ. बी. आर. आंबेडकर : धर्मांतराची चळवळ, कारणे, परिणाम | प्रा. डॉ. सुनंदा भद्र शेटे | 85 |
| 28. | "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक चळवळी" | प्रा. डॉ. सिद्धेश्वर रामचंद्र शेटकर | 89 |
| 29. | 'युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर' | सविता भिवा धनवडे | 92 |
| 30. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य | प्रा. डॉ. फड एल.एच. | 95 |
| 31. | "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय विचार" | प्रा. डॉ. चव्हाण सुखदेव गोविंदराव | 100 |
| 32. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य | डॉ. गोविंद धोंडीराम उफाडे | 104 |
| 33. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाजशास्त्रज्ञ | प्रा. डॉ. सौ. माधुरी गोविंद गिरी | 108 |
| 34. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | प्रा. बालासाहेब शिवाजी पवार | 111 |
| 35. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा व देशप्रेम : एक आकलन | डॉ. भास्कर वि. नरवाडे | 115 |
| 36. | बहुजनांचे मुक्तीदाते डॉ.बाबासाहेब आंबेडकर | श्री. राहूल भागवत गायकवाड | 118 |
| 37. | डॉ. बाबासाहेब आबेडकर यांचे शैक्षणिक विचार - एक अभ्यास | प्रा. डॉ. इकबालखान गफारखान | 122 |
| 38. | बाबासाहेबांचे शिक्षणविषयक विचार व शिक्षणविषयक संविधानात्मक तरतूदी | प्रा. विनया केशव कांबळे | 125 |
| 39. | महिलाओं के मुक्तिदाता डॉ. बाबासाहब आम्बेडकर | डॉ. बालिका रामराव कांबले | 128 |

| | | | |
|---|---|---|---|
| 40. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार | डॉ. चंदन एम. बावलगावे | 132 |
| 41. | स्त्रियांचे मुक्तिदाते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर | श्रीमती लगडे वर्षा वसंतराव | 136 |
| 42. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री आणि मानवी हक्क याविषयी विचार | सौ. नागमणी विठ्ठलराव हाळे | 143 |
| 43. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषावार प्रांतरचनेवरील विचार | बारशे भाग्यश्री उत्तमराव | 145 |
| 44. | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधानातील भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार विषयक विचार' | प्रा. डॉ. रजनी अ. बोरोळे | 150 |
| 45. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलनीती विषयक विचार व कार्य | डॉ. शरद पुंडलिक कांबळे | 155 |
| 46. | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि बहुजनातील सामाजिक बदल' | प्रा. डॉ. एस. पी. घायाळ | 158 |
| 47. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अरक्षण | प्रा. डॉ. जे. टी. कांबळे | 163 |
| 48. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत :एक चिंतन | प्रो. डॉ. युवराज श्रीराम मानकर | 167 |
| 49. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांविषयक धोरण | प्रा. डॉ. दिवेकर रेश्मा रमेश | 171 |
| 50. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि सामाजिक बदल | प्रा. संदीप गोणारकर | 175 |
| 51. | युगपुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार | अजय श्रीराम मुरमुरे | 178 |
| 52. | कामगारांचे कैवारी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. विवेक चनमनवार | 182 |
| 53. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान | प्रा.डॉ. पिडगे अनंत किशनराव | 186 |
| 54. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री मुक्तीचे समर्थक आणि हिंदू कोडबिल | डॉ. गंगाधर ना. सरोदे | 188 |
| 55. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक धोरण | प्रा. अजित जयराम जाधव | 195 |
| 56. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान. | प्रा. शैलेश कुशेंद्र भालेराव | 197 |
| 57. | सर्व समाजघटकासाठी झिजलेले बाबासाहेब | डॉ. बाळासाहेब अंभोरे | 203 |
| 58. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाजशास्त्रज्ञ | डॉ. बिरादार प्रतिभा रंगराव | 208 |
| 59. | समाजशास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा. आकांक्षा कांबळे | 213 |

| | | | |
|---|---|---|---|
| 60. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती** | **प्रा. वर्षा भूषण कांबळे** | 218 |
| 61. | डॉ. आंबेडकराचा स्त्री विषयक दृष्टिकोन | प्रा. डॉ. अन्सारी एस. जी | 222 |
| 62. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साहित्यविषयक सौंदर्यदृष्टी** | प्रा. बालाजी गंगाराम गायकवाड | 224 |
| 63. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार** | **प्रा. डॉ. शिंदे शाम भागवत** | 226 |
| 64. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि सामाजिक बदल** | बापूसाहेब जवळेकर<br>डॉ. संभाजी पाटील | 232 |
| 65. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार** | **प्रा. कांबळे के. जे.** | 237 |
| 66. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर: एक भारतीय समाजशास्त्रज्ञ** | **प्रा. डॉ. अल्का बाबाराव सोमवंशी** | 240 |
| 67. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक भारतीय समाजशास्त्रज्ञ | पंदिलवाड ए. एम. | 245 |
| 68. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समन्यायी जलधोरण** | डॉ. सोनाली वाखरडे | 248 |
| 69. | भारतीय राज्यघटनेचे शिल्पकारः— डॉ.बाबासाहेब आंबेडकर | डॉ. संतोष पाटील | 252 |
| 70. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी व कामगार विषयक विचार | डॉ. रवीद्र म. कांबळे | 255 |
| 71. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व** | प्रा. डॉ. यादव सूर्यवंशी | 259 |
| 72. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही शासनपद्धती संबंधी विचार | प्रा. डॉ. गोरे बी. एम. | 264 |
| 73. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्ती व कार्य | डॉ. येरावार किरण किशनराव | 267 |
| 74. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | डॉ. सुनिता लिंबराज गुजर | 270 |
| 75. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार | अंगद श्रीपती भुरे | 272 |
| 76. | **'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कामगिरी'** | डॉ. शालिग्राम गोपालराव शिंदे | 276 |
| 77. | डॉ. **बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार** | प्रा. **राजकुमार मोरे** | 279 |
| 78. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान** | **प्रा. डॉ. भुसारे एस. आर.** | 283 |
| 79. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर : व्यक्तित्व आणि कर्तृत्व** | **प्रा. डॉ. नवीन केशवराव सोळंके** | 286 |
| 80. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मूलन विषयक विचार | प्रा. डॉ. नंदा पंढरीनाथ कंधारे | 289 |

| | | | |
|---|---|---|---|
| 81. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार | प्रा. डॉ. सुनिता जगन्नाथराव कुकडे | 294 |
| 82. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार | प्रा. डॉ. बळीराम पवार | 298 |
| 83. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | आदित्य देविदास ससाणे | 300 |
| 84. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | आशा राठी (भराडिया) | 304 |
| 85. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार | पल्लवी प्रकाश कांबळे<br>प्रकाश शितराम कांबळे | 306 |
| 86. | “युगपूरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर” | डॉ. सतीष गंगाराम ससाणे | 308 |
| 87. | स्त्री ओवीगीतांतून प्रकट झालेला आंबेडकरी विचार | कराड बाळासाहेब निवृत्ती | 312 |
| 88. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | प्रा. बालासाहेब शिवाजी पवार | 316 |
| 89. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरव दलित हक्क चळवळ | जोंधळे राजकुमार विष्णू | 319 |
| 90. | शिक्षण व शील – डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. डॉ. प्रशांत बाबुराव बिरादार | 322 |
| 91. | ग्रामीण अर्थव्यवस्था नाकारणारे डॉ बाबासाहेब | डॉ. विलास पाटील | 325 |
| 92. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जात निर्मूलनासंबंधी विचार आणि कार्य | डॉ. मारोती दशरथ कसाब | 329 |
| 93. | 21 वे शतक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विधि विषयक विचार | डॉ. टेंकाळे सुवर्णा उमाकांत | 333 |
| 94. | समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. दत्ता रामचंद्र कांबळे | 337 |
| 95. | धर्माची उत्पत्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धार्मिक विचार. | दत्ता दौलाजी कांबळे<br>डॉ. बी. डी. पवार | 339 |
| 96. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि सामाजिक बदल | डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर | 342 |
| 97. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धम्मचक्रप्रवर्तन | प्रा. शृंगारे विकास प्रभाकर | 346 |

# :: संपादकीय मनोगत ::

"युगपुरुष डॉ बाबासाहेब आंबेडकर" हा महत्त्वपूर्ण संदर्भ ग्रंथ आपल्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आमच्या महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विषयावर ऑनलाईन चर्चासत्र, कार्यशाळा, परिषद घेण्यात आल्या. त्यापैकी समाजशास्त्र विभागाच्या वतीने "युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर" या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र दि. ९ एप्रिल २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती दिनानिमित्ताचे औचित्य साधून घेण्यात आले. या चर्चासत्राला महाराष्ट्र, आसाम या बरोबरच देश- विदेशाच्या भागातून मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळाला. सदरील चर्चासत्राच्या निमित्ताने एक वैचारिक अमूल्यसंदर्भग्रंथ प्रकाशित करण्याचे जाहीर करुन त्या अनुषंगाने विवध उपविषय सुचवून शोधनिबंध पाठविण्याचे आम्ही आवाहन केले होते. आमच्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद देऊन नामांकित आणि नवोदित अशा विविध स्तरातील अभ्यासकांनी अतिशय अभ्यासपूर्ण असे आपले शोधनिबंध पाठविले. वेळेच्या आत आम्हाल फार मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे हा ग्रंथ एक वैचारिक मंथनाचा अमूल्य ठेवा बनला आहे. डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य हे राष्ट्र उद्धारासाठी समर्पित केले होते. त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्यायासाठी अनेक लढे लढले उदा. चवदार तळयाचा सत्याग्रह, काळाराम मंदिराचा सत्याग्रह असे सत्याग्रह करुन समाजामध्ये सामजिक समता प्रस्थापित केली. युगानु-युगापासुन गुलाम, अस्पृश्य, तुच्छ, शूद्र म्हणुन जीवन जगणाऱ्या लोकांना माणूस बनवुन स्वाभिमानाने, ताठ मानेने जीवन जगण्याचा मानवी हक्क प्राप्त करून दिला. भारतीय संविधानाची निर्मिती करुन सर्वांना समान नागरी हक्क प्रदान करुन दिले, म्हणून ते खऱ्या अर्थाने युगपुरुष ठरतात. त्यामुळे युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाशझोत टाकणारा वैचारिक मंथनाचा अमूल्य ग्रंथ निर्माण करताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. त्यामुळे सर्व अभ्यासपूर्ण शोधनिबंधलेखकांचे आम्ही मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

आमच्या किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, सचिव आणि सर्व पदाधिकारी विविध उपक्रम राबिण्यासाठी आम्हाला नेहमीच प्रोत्साहन देत असतात. म्हणून त्यांचे ही मनःपूर्वक आभार. या निमित्ताने "युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर" या ग्रंथाची वैचारिक मांडणी असणारी सुंदर प्रस्तावना लिहून आमचे मनोबल वाढवले या बद्दल आमचे प्रेरणास्रोत, मार्गदर्शक महाराष्ट्राचे ख्यातनाम लेखक, साहित्यिक आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. डी. चौधरी (नॅक समन्वयक), कार्यालयीन अधीक्षक प्रशांत डोंगळीकर यांचे ही मनःपूर्वक आभार.

हा ग्रंथ आकर्षक, सुंदर, डौलदार स्वरूपात प्रकाशित केल्याबद्दल प्रकाशक राजेश उंबरकर यांचे ही विशेष आभार. सदरील ग्रंथासाठी ज्यांनी, ज्यांनी आम्हाला मदत केली, आम्हाला प्रोत्साहित केले त्या सर्वांचे हार्दिक आभार मानून हा ग्रंथ वाचकांच्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे.....धन्यवाद...

**प्रा. डॉ. सतीश गंगाराम ससाणे**

**संपादक**

# :: प्रस्तावना ::

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध रूपांचा मूलगामी वेध घेणारा ऐतिहासिक ग्रंथ

जागतिकीकरणाच्या आजच्या काळात कधी नव्हे एवढ्या मोठ्या प्रमाणात मानवी जीवन धोक्यात आलेले आहे. भांडवलशाहीच्या या काळात मानवी मूल्यांचा प्रचंड ऱ्हास होतो आहे. 'शोषण' हाच आजचा धर्म बनू पाहात आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या महास्फोटाने संपूर्ण जग जवळ आणले आहे. त्याचे एका छोट्याशा खेडेगावात रुपांतर केले आहे. जगात जरा कुठे काही खुट्ट वाजले की त्याची खबर लगेच आपल्यापर्यंत पोहोचते. जग जवळ आले; मात्र माणसं ? माणसं .... परस्परांपासून कोसो दूर गेली..!

अशा काळात मानवजातीला फक्त एकच गोष्ट वाचवू शकते ती म्हणजे विचार. होय, विचारच..! माणुस हा मुळात विचार करणारा प्राणी आहे. मात्र या भांडवलवादी जगाने त्याची विचारशक्तीच गोठवून टाकली आहे. जिकडेतिकडे स्पर्धा, स्पर्धा आणि स्पर्धा..!

या धावपळीच्या आयुष्यात ना तो स्वतःशी बोलायला तयार आहे; ना इतरांशी. जागतिक भांडवल शाही ने फक्त नफा आणि नफा हेच मूल्य स्वीकारलेले आहे. म्हणून माणसाला या दृष्ट स्पर्धेतून बाजूला काढून शांतपणे विचार करायला लावणे हे अतिशय महत्त्वाचे झाले आहे आणि विचारांची प्रक्रिया ही फक्त आपल्या महामानवास पासूनच सुरु होऊ शकते आपल्या पूर्वजांनी आपल्यासाठी खूप काही करून ठेवले आहे लिहून ठेवले आहे त्याबरहुकूम वागण्याची आणि विचार करण्याची आज खरी गरज निर्माण झालेली आहे. म्हणूनच आम्ही आमच्या महात्मा फुले महाविद्यालयाच्या वतीने महामानवांच्या विचार कार्याचा जागर व्हावा म्हणून भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांचे आभासी माध्यमातून आयोजन केले असून, त्याचाच एक भाग म्हणजे युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील चर्चासत्र आणि त्याचे फलित म्हणजे हा संदर्भमूल्य असलेला दर्जेदार 'महाग्रंथ' होय.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याविषयी तसे पाहता भरपूर लेखन झालेले आहे. धनंजय कीर, चां. भ. खैरमोडे आदींनी त्यांचे अत्यंत अभ्यासपूर्ण जीवन चरित्र रेखाटलेले आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या जीवनकार्यावर अप्रतिम असा गौरव ग्रंथही प्रकाशित केलेला आहे. याशिवाय विविध व्यक्ती आणि संस्थांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर सातत्याने विविध ग्रंथ प्रकाशित होत आहेत. विविध प्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणांचा संग्रहही अनेक खंडांत प्रकाशित झालेला आहे.

या पार्श्वभूमीवर आम्ही प्रकाशित करीत असलेल्या 'युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथाचे वेगळेपण काय? असा प्रश्न सहाजिकच आपल्या मनाला पडला असेल. तर मित्रहो, आमच्या या ग्रंथाचे वैशिष्ट्य ग्रंथ वाचल्यानंतर तुमच्या लक्षात येईलच. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याविषयी या ग्रंथात लेख आहेतच; त्याच बरोबर त्यांच्या विचारांवर प्रकाशझोत टाकणारे, त्यांच्या विचारांची नव्याने माहिती देणारे आणि

संशोधनात्मक मांडणी करणारे नव संशोधकांचे, प्राध्यापक- अभ्यासकांचे आणि विद्यार्थ्यांचेही महत्त्वपूर्ण लेख या ग्रंथामध्ये आम्ही जाणीवपूर्वक समाविष्ट केले आहेत. या ग्रंथात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विविध रूपे आपणास पाहावयास मिळतील. शिक्षण घेण्यासाठी जीवाचे रान करणारे ज्ञानवंत विद्यार्थी, पाण्यासाठी, मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह करणारे लढवय्ये, बॅरिस्टर, प्राचार्य, अर्थतज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानव वंश शास्त्रज्ञ, धर्म शास्त्राची चिकित्सा करणारे महापंडित, मानस शास्त्राचे अभ्यासक, जगातील विविध राज्यघटनांचे अभ्यासक, जात- वर्गांताच्या चळवळींचे मार्गदर्शक, जागतिक पातळीवरील तत्त्वज्ञ, लेखक, संपादक, पत्रकार आणि निर्भिड वक्ते, नवभारताचे जाणते सामाजिक, राजकीय नेते, ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार इत्यादी नानाविध पैलूंचे दर्शन या ग्रंथांतून आपणास घडेल. सोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचार पद्धती, कार्यप्रणाली, त्यांनी अंगिकारलेली जीवन मूल्ये आणि ध्येयनिष्ठा यांचाही परिचय या ग्रंथाच्या माध्यमातून आपणास होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे विविध पैलू समजून घेण्यासाठी आणि त्यांच्या विचारांची आजच्या या जागतिकीकरणाच्या काळातील प्रासंगिकता लक्षात घेण्यासाठी हा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा ठरेल याचा मला विश्वास आहे.

या ग्रंथाच्या संपादनासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून अथक परिश्रम घेणारे आमच्या महात्मा फुले महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रमुख व प्रस्तुत ग्रंथाचे साक्षेपी संपादक डॉ. सतीश ससाणे यांचे मी या निमित्ताने मनःपूर्वक अभिनंदन करतो. तसेच या ग्रंथासाठी ज्यांनी ज्यांनी आपला अमूल्य वेळ काढून, अभ्यासपूर्ण मांडणी करून लेख पाठवले, त्या सर्व लेखकांचे, संशोधकांचे, अभ्यासकांचेही मी मनःपूर्वक अभिनंदन ! आणि वाचकांच्या हाती हा विविधांगी सौंदर्य मूल्य आणि संदर्भ मूल्य लाभलेला सुंदर ग्रंथ सुपूर्द करतो.

**धन्यवाद** !

प्राचार्य

**डॉ. वसंत बिरादार**

महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर जि. लातूर

# DR. B. R. AMBEDKAR : ARCHITECTURE OF THE INDIAN CONSTITUTION

**Dr. Sainath I. Waghmare**
Asst. Prof. , Dept. Of Political Science,
Sharadchandra Arts, Commerce & Science College, Naigaon (Bz.) Tq. Naigaon (Kh.) Dist.: Nanded.

**ABSTRACT :**

This dilapidated India is made possible by a comprehensive and development-oriented constitution, which is as diverse as India, with innumerable castes, religions, customs and traditions, a myriad of conflicting aspects of many different aspects. The tools of the alchemy constitution, which will soon join the ranks of the developed nations, are a seemingly insurmountable challenge. Dr. Babasaheb Ambedkar, with his unique erudition, created the world's largest, in fact, magnificent Indian state, which is many times more magnificent in terms of size and success, in just 3 years. It is safe to say that Dr. B.R. Ambedkar was not only the architect of the Indian Constitution but also the architect of a truly modern India.

**"However good a Constitution may be, it is sure**
**to turn out bad because those who are called**
**to work it, happens to be bad. However bad**
**a Constitution may be, it may turn out good if those**
**who are called to work it, happen to be a good lot."**

**-- Dr. B. R. Ambedkar**

**KEY WORDS:** Constitution, Drafting committee , Provisions, Constitution assemble, law-Making, Rights etc.

**INTRODUCTION**

In the world the great man first has to be born in the form of the great man and then he has to prove himself the great man by his enriched personality with virtues and by his great capability. According to such a rule of the world Dr. B. R. Ambedkar was born in the form of the great man, on 14th April 1891 at Mahu in Madhya Pradesh of India. Bhimrao Ramji Ambedkar, also known as Babasaheb, was an Indian nationalist, jurist, Dalit, political leader, activist, philosopher, thinker, anthropologist, historian, orator, profilic writer, economist, scholar, editor, revolutionary and the revivalist of Buddhism in India. He was also the chief architect of the Indian constitution. Born into a poor untouchable family, Ambedkar spent his whole life fighting against social discrimination, the system of Chaturvarna – the Hindu categorization of human society into four varnas – and the Indian Caste System.

The great man Dr. Bhimrao Ramji Ambedkar's active life, glorious personality and great capability. These characteristics forever are worthy of writing with the golden letters, in the useful history of the nation India of the entire world and of the universal mankind. **(1)**

**OBJECTIVES OF RESEARCH :**

1. A detailed study of the Indian Constitution.
2. An objective study of Dr. B. R Ambedkar's contribution to the Indian constitution.
3. To shed light on the controversy in the Constituent Assembly.

**HYPOTHESIS OF RESEARCH :**

1. The draft committee had seven members, but in all of them, Dr. B. R. Ambedkar's role and work was undoubtedly supreme.
2. Dr. B. R. Ambedkar Although is only the chairman of the drafting committee, his role in the whole Constitution making process has been excellent and central.

**THE SCOPE OF STUDY :**

The scope of the research presented is of a global nature as the researcher will have to consult the constitutions of other nations of the world while studying the Indian constitution making process.

**RESEARCH METHODOLOGY :**

Newspapers, online communities, reports, reference books, audio-visual evidence, etc. fall into the category of secondary data are to use it in this research

**REVIEW OF LITERATURE :**

The present research is based on various reference books, articles available on the internet regarding the subject, research papers, debates in the Constituent Assembly.

**CONTRIBUTION IN MAKING OF CONSTITUTION**

**THE FUNDAMENTAL RIGHTS :**

Ambedkar was a champion of fundamental rights and said: “I came into the constitution assembly with a greater aspiration than to safeguard the interest of the scheduled castes. I had not the remotest idea that I would be called upon to undertake more responsible function. I was, therefore, surprised when the assembly elected me to the Drafting Committee. I was more than surprised when the Drafting Committee elected me to be its chairman”. The Part III of the Indian Constitution guarantees the fundamental rights to the citizens against the state. Some of the fundamental rights contained in Articles 15(2), 17, 23, and 24 are also enforceable against individuals as they are very significant rights relating to the prohibition of discrimination on grounds of religion, race, caste, sex or place of birth etc. The text prepared by Ambedkar provided constitutional guarantees and protections for a wide range of civil liberties for individual citizens, including freedom of religion, the abolition of untouchability and outlawing all forms of discrimination. Ambedkar argued for extensive economic and social rights for women. Dr. Ambedkar was rather more instrumental in incorporating Article 17 which provides for the ‘Abolition of Untouchability’ whereby “Untouchability’’ is abolished and its practice in any form is forbidden. The enforcement of any disability arising out of “Untouchability’’ shall be an offence punishable in accordance with law. Based on this article, the Civil rights Protection Act 1965 and the Prevention of Atrocities (Scheduled castes Scheduled tribes) Act 1989 was enacted by the Parliament for the protection of Dalit rights. Even though, castebased discrimination and violence still remains a fact of life in Today’s India, there has been considerable progress for the historically disadvantaged sections of society.( **2)**

**PARLIAMENTARY DEMOCRACY :**

Ambedkar was a strong advocate of parliamentary form of government right from the inception of the Government of India Act of 1935. He firmly believed that the parliamentary system of government alone can usher in an egalitarian society through the application of principles of social democracy. Dr. Ambedkar social democracy comprises politicians, political parties with high standards of political morality, honesty and integrity and strong and highly responsible opposition parties or parties committed to the cause of downtrodden and depressed classes. The preamble of the Indian Constitution echoes the principles of parliamentary democracy. It reads:

"We the people of India, having solemnly resolved to constitute India into a Sovereign Socialist Secular Democratic Republic and to secure to all its citizens- justice Social, Economic and Political; Liberty of thought, expression belief, faith and worship, Equality of status and of opportunity and to promote among them all-Fraternity, assuring the dignity of Individual and the Unity of the Nation, in our Constituent Assembly this 26th day of November, 1949 do hereby adopt, enact and give to ourselves this constitution." Dr. Ambedkar was a strong advocate of federal structure of the union and states based on the principles of strong centre and independent states. Dr. Ambedkar also did great service to the nation by proposing the institution of unified judicial system and common All India Services with a view to strengthen the national unity and integrity.**(3)**

**PROTECTIVE DISCRIMINATION/RESERVATION :**

The real contribution of Ambedkar is reflected in the protective discrimination scheme or the reservation policy of the government envisaged under some provisions of Part III and many of Part IV dealing with the constitutional mandate to ameliorate the condition of the Scheduled Castes and Scheduled Tribes and the other backward classes. Provisions like Article 17 prohibiting untouchability, Article 30 dealing with the protection of minorities are some of the notable examples. The Articles 15(4) and 16(4) of Part III and Part XI, and Schedule V and VI dealing with the upliftment of Scheduled Caste and Scheduled Tribes speak clearly about the substantial and significant contribution of Ambedkar for the development of untouchables.5 Ambedkar made it his life mission to uplift the untouchables and the other downtrodden masses from the unequal position of inferiority to that of equal position of parity in socioeconomic status with other high caste Hindus. It was for achieving this goal the reservation policy or the scheme of protective discrimination was advocated and achieved by him for ten years at least to ameliorate the conditions of the various depressed and downtrodden sections of Hindu society. **(4)**

**DR. B. R. AMBEDKAR AND CONSTITUTIONAL RIGHTS TO WOMEN :**

Baba Sahib Dr. Ambedkar worked with dedication, zeal & conviction for the betterment of women on becoming Chairman Of ConstitutionDrafting Committee & First Law Minister ofIndependent India. He gave India a living& organicConstitution, enshrining in it all those conditionswhich are necessary to promote fraternity among allcitizens of free India, including women.Discrimination on the basis of caste, religion, sex,creed, place of birth was codified as illegal acts underthe Statute Book. The Indian Constitution providesfor Equality before Law (Art.14 ) , the State shall notdiscriminate any citizen on the grounds of , religion,caste, race, sex , place of birth or any of them (Art15), equal opportunities to all citizens in mattersrelating to employment or appointment under theState (Art16), equal pay to all for equal work for bothmen & women (Art.39d ) right to work , to educationand public assistance in certain cases (Art 41),Provision of just and human conditions of work andmaternity relief (Art 42) , Provision of uniform CivilCode to all the citizens throughout the IndianTerritory (Art 44). Dr. Ambedkar by his scholarly arguments in framing/ debating Indian Constitutionget put his sea of equality for women by getting them right of vote to equalise her position in running the **(5)**

**STATE SOCIALISM :**

State socialism is the ideology in which the government holds control over the industries and various other social service sectors. Dr. Ambedkar supported state socialism in the draft Constitution as he suggested state ownership in agriculture with modified means of cultivation. He believed that an economy with state-controlled industries would let the democratic government presuppose a democratic form of society as it would induce a sense of social conscience in the minds of citizens.

There is a famous statement of Ambedkar in this regard, "'Rights are protected not by law but by the social and moral conscience of society". But he faced opposition from the Assembly and thereby he could not incorporate state socialism under the part of fundamental rights in the Constitution.

Ambedkar felt that democracy is not merely a political aspect but forms the root of social relations among the people within the society. All the characteristic features of democracy such as equality, morality, freedom, etc. have to be adopted by society first, only then the adoption of the democratic system in the Constitution will be successful. To deny equality in social and economic life would adversely affect democratic notions. Therefore, he emphasised the need of having the people realise the rights and duties conferred on them by the State and not just establish the organs of the state because it will defeat the purpose of making India an independent democracy**. (6)**

**EMERGENCE OF CONSTITUTION :**

Fundamental rights have been used to abolish untouchability and this prohibits discrimination on the grounds of religion, race, caste, sex or place of birth. They also forbid trafficking of human beings and forced labour. They also protect cultural and educational rights of ethnic and religious minorities by allowing them to preserve their languages and also establish and administer their own education institutions. In 1919, the Rowlatt Act gave extensive powers to the British government and police which resulted in the indefinite arrest and detention of individuals. The public eventually opposed this act which led to mass campaigns of nonviolent civil disobedience throughout the country demanding guaranteed civil freedom. In 1928, the Nehru commission[The Nehru report of 10th August,1928 was a memorandum outlining a proposed new dominion status constitution of India.It was prepared by a committee of the all parties conference chaired by Motilal Nehru with his son Jawaharlal acting as secretary.There were nine other members in the committee,including two muslims.] Composing representatives of Indian political parties proposed constitutional reforms for India that apart from calling for dominion status for India and elections under universal suffrage, would guarantee rights deemed fundamental, representation for religious and ethnic minorities and limit the powers of the government. In 1931, the Indian National Congress(Indian Political Party) adopted resolutions committing itself to the defence of fundamental civil rights, as well as socio-economic rights. Committing themselves to socialism in 1936, the congress leaders took examples from the constitution of the Soviet Union, which inspired the fundamental duties of citizens. Task of developing a constitution for the nation was undertaken by the constituent Assembly of India, composed of elected representatives. The constituent Assembly first met on December 9, 1946 under the president Dr. Sachidanand later Dr. Rajindra Prasad was made its president. While members of congress party of diverse political backgrounds took responsibilities of developing the constitution and national laws. Dr Bhimrao Ramji Ambedkar became the chairperson of the drafting committee, while Jawaharlal Nehru and Sardar Vallabhbhai Patel became chairpersons of committees and subcommittees responsible for different subjects. The universal declaration of human rights on 10th December 1948 had a significant effect on the Indian Constitution which called upon the member states to adopt these rights in their respective constitutions. The fundamental rights were included in the first draft constitution(February 1948), the second draft constitution(17th October 1948) and final third draft constitution( 26th November 1949) prepared by the drafting committee. **(7)**

**CONCLUSION**

The total membership of the Constituent Assembly was 389 of which 292 were representatives of the provinces, 93 represented the princely states and four were from the chief

commissioner provinces of Delhi, Ajmer-Merwara, Coorg and British Baluchistan. It is natural for people to think that if there were 389 delegates in the Constituent Assembly, then Why is Dr. Babasaheb Ambedkar called the architect of the constitution? The objective answer to this question can be found only when you study the history of Indian constitution making without any prejudiced view. Why is Babasaheb Ambedkar called the architect of the Indian Constitution? This does not mean that other members of the Constituent Assembly did not play any role or that Dr. Apart from Ambedkar, the role of other members in the Indian Constitution is zero, so this answer is just as wrong. Because Dr. While Babasaheb Ambedkar was given the title of the architect of the Indian Constitution, many other intelligent members of the Constituent Assembly have also contributed to the drafting of the Indian Constitution on the strength of their intellectual skills.

**BIBLIOGRAPHY :**


1. http://www.legalservicesindia.com/article/1609/Dr.-B.R.-Ambedkar,-The-Father-of-Indian-Constitution
2. https://www.google.com/url?sa=t&source=web&rct=j&url=https://garph.co.uk/IJARMSS/Dec2016/16
3. https://www.worldwidejournals.com › ...PDF Research Paper Dr.BR Ambedkar As An Principal Architect of Indian …
4. https://www.worldwidejournals.com › ...PDF Research Paper Dr.BR Ambedkar As An Principal Architect of Indian …
5. https://www.academia.edu/22722366/The_Architect_of_Indian_Constitution_Dr_Ambedkar_A_Ray_of_Hope_towards_the_Empowerment_of_Indian_Women
6. https://www.google.com/amp/s/blog.ipleaders.in/all-you-need-know-about-father-indian-constitution
7. https://www.google.com/url?sa=t&source=web&rct=j&url=https://www.ijrar.org/papers/IJRAR19D1065.pdf

# "DR BABASAHEB AMBEDKAR'S CONTRIBUTION IN AWAKENING CONSCIOUSNESS OF OPPRESSED PEOPLE"

**Dr. R. G. Kumawat**

Head, Dept. of Sociology, Bahirji Smarak Mahavidyalaya, Basmath,Dist. Hingoli. 431512

**INTRODUCTION**:

"भाकरी पेक्षा इज्जत प्यारी" (respect is sweeter than bread) "गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या, म्हणजे तो आपोआप बंड करून उठेल" (let the slave know of slavery, so that he will automatically rebel) These two sentences of Dr Babasaheb Ambedkar are important in the building of self-consciousness in the mind of depressed people. In his time untouchable people, women, workers, farmers, were living their life seme as slavery. Among them untouchables did not have even a single right to keep their existence in the society. Upper caste people were exploiting them physically, economically, and psychologically also. Landlords were exporting the landless. Women were exploiting from men. Their lives were extremely encroached in the patriarchal system. This section was sharing the majority of the part in the total population.

These people were repressed for thousands of years by the traditional social system. Their status, rolls, positions were fix and determined. Generation to generation they had followed their positions in the society. They hadn't allowed themselves to move forward and uplift themselves. There was no mobility. In this situation they had lost their identity as humans. Dignity had been lost and the more important they had lost their self-consciousness.

Dr. Babasaheb Ambedkar one of the intellectual persons who identified the worst condition of the depressed classes. To abolish this kind of slavery he started to work against it. He had started several movements, and made amendments of several laws, made new drafts of laws and finally made arrangements in the constitution of equal opportunity to every individual.

In this search paper I tried to highlight the contribution of Dr Babasaheb Ambedkar regarding awakening of the self-consciousness of repressed people.

**OBJECTIVES:**

1. To understand the contribution of Dr Babasaheb Ambedkar regarding welfare of repressed classes.
2. To get the knowledge of the contribution of Dr Babasaheb Ambedkar in awakening the self-consciousness of oppressed classes.

**1. Support to industrialisation:**

Dr Babasaheb Ambedkar was in favour to support the industrialisation. There are several motives behind this approach. To him, industrialisation is only the way of destroying the traditional culture which is based on the caste system in rural areas. Industrialisation increased urbanization. It also helps to migrate towards urban areas. Industrialisation promotes education and especially technical education. Suppressed people can migrate to urban places and can avail the opportunity of education especially technical education. If they do so they will try to oppose caste-based occupation and can get better job opportunities in any small-scale industry. Eventually the weaker people will be able to develop their consciousness. In this regard Avinash Kumar wrote, " Secondly, his understanding was that the eventual liberation of the peasantry and landless agricultural workers

lay in rapid industrialisation, urbanisation, and education" (1)

Babasaheb Ambedkar's vision of industrialisation getting benefited even today. He has given lots of contribution in the development of the infrastructural facilities like, Power Grid, water storage Dams, Road for transportation. These efforts have benefitted in the development of industrialization and urbanization. Today we see a massive range of industrialisation and urbanisation. These two developing phenomena resulted in the overall emancipation of farmers, Dalits, landless labourers, and all such downtrodden and marginalized people. Since last 5 or 6 decades they have made able to develop their self-consciousness.

**2. Educate, Agitate, Organize...! The slogan.**

This slogan was used by Dr Babasaheb Ambedkar in 1942. It has its own deep meaning. " Babasaheb Ambedkar, the social reformer and India's first Justice Minister, used this slogan in a 1942 speech to All India Depressed Class Conference to drive home the point to that a mass move movement was needed to upend class oppression". (2)

Dhamma Kalyan have kept the original words of Dr Babasaheb Ambedkar, with the given reference as Bombay: Popular Prakashan, 3rd ed. 1971, p.351. The word is, " My final words of advice to you are Educate, Agitate and Organise; have faith in yourself. With justice on our side, I do not see how we can lose other battle. The battle to me is a matter of joy. The battle is in the fullest sense spiritual. There is nothing material social in it. For ours is a battle not for wealth or for power. It is a battle for freedom. It is a battle for the reclamation of the human personality." (3) With the use of this slogan Dr Babasaheb Ambedkar has given a beautiful message to the depressed people. It is benefited to uplift themselves or their emancipation or to get their reclamation, especially to awakening their self-consciousness. This message is not limited to only Indian oppressed people, it is for all those people who are oppressed by their oppressors in every corner of the world. Until the person is not educated, he cannot get a proper sense. He cannot get proper knowledge of the self, society and universe; and especially he can't understand the oppressor's ideology of oppression.

'Agitate' does not mean to agitate physically. It is a mental revolution. Every individual has to struggle for his overall upliftment in a peaceful way. Agitation of a person against social evils, or to progress himself is the spirit of self-consciousness.

For unit and work together there is necessary the term of organise. Fraternity, Unity and equity are the aspect of the organise term. Any saviour issue or problem can be resolved when people organize. Organizing makes the nation more strengthened and united. Any person can get self-consciousness only when he shares his thoughts with others.

**3.Hindu Code Bill:**

1951 Dr Babasaheb Ambedkar introduced the Hindu code bill. Unfortunately, it can't be implemented and pass. But letter on after 1st Lok Sabha election Pandit Jawaharlal Nehru has divided this bill into several acts; like Hindu Marriage Act 1955, Hindu succession Act 1956 and so on. Although it is implemented by Jawaharlal Nehru but it is the victory of the vision of developing the self-consciousness of women of Dr Baba Saheb Ambedkar.

This bill had great meaning in itself. It was the weapon that cut down the chain of the jail in which the Indian woman was confined for thousands of years.

The objectives of the Bill are as follows.

"1. Codify the law relating to rights of property of deceased Hindu without making a will (intestate) for both gender, son and daughter

2. Succession among the different heirs to the property of deceased (intestate)
3. law of maintenance, marriage, divorce, adoption, minority and guardianship" (4)

These Objectives are absolute with special meaning itself. These are not the words or rules only. This is the way and vision of awakening of consciousness of Indian women. However, the Hindu code bill could not pass but through which got the help in awakening of their self-consciousness. Indian women were able to get a dignified life.

**CONCLUSION:**

Dr. Babasaheb Ambedkar was completely successful in awakening the consciousness in the mind of depressed people. Now these people have much Awareness of themselves and their socio-cultural condition. Today these people are getting enough education and are fighting for their rights. Also, they are getting organized for their common goals. These people are contributing to India's development. Since Independence Indian women have also given their major share in the development of economic, political and educational institutions. It could happen only due to the development of their self-confidence. This phenomenon is the greatest aspect of Dr Babasaheb Ambedkar's social engineering.

**REFERENCES:**


1. Kumar, Awanish (2020), "B. R. Ambedkar on caste and Land Relations in India ", Review of Agrarian Studies, vol.10. no. 1, available at, http://ras.org.in/b_r_ambedkar_on_caste_and_land_relations_in_india , accessed on 3 April 2022 at 15:28
2. David Bush (2020) "The meaning of 'Educate, Agitate, Organize!", Spring a magazine of socialist ideas in action, available at https://r.search.yahoo.com/_ylt=AwrxzWqKolJiayMAZwO7HAx.;_ylu=Y29sbwNzZzMEcG9zAzEEdnRpZAMEc2VjA3Ny/RV=2/RE=1649611530/RO=10/RU=https%3a%2f%2fspringmag.ca%2fthe-meaning-of-educate-agitate-organize/RK=2/RS=Jqyb3h53qlPNOpYvLQOn6goRJ08- accessed on 2 April 2022, at 16:58)
3. Available at https://dhammkalyan.wordspress.com/2017/03/07 , accessed on 2 April 2022, at 17:30)
4. Transcript of full speech delivered by Mr. Elancheran of AKSC on 27th birthday commemoration of Babasaheb Dr Ambedkar at Stanford University, CA, organised by various organisations where Ambedkar King Study Circle is a co-sponsor, 'Dr Ambedkar's vision of equality through Hindu Code Bill' available at, https://akscusa.org/2018/04/24/dr-ambedkars-vision-of-equality-through-hindu-code-bill/

# BABASAHEB AMBEDKAR AND EMPOWERMENT OF WOMEN

**Sadhana Sarmah**

**Assistant Professor, Deptt. Of Sociology, N.L.B. City College, Dibrugarh, Assam**

**ABSTRACT**

Bhimrao Ramji Ambedkar was an Indian jurist, political leader, philosopher, thinker, writer, economist, editor, first law minister of independent India and the chief architect of the Constitution of India. Dr. Ambedkar fought for extensive economic and social rights for women. He avowed that women should be given all round development specially social and educational, well beings and also socio-cultural rights. He laid emphasis that each and every section of Indian women be given their due share and it is a must to maintain and protect dignity and modesty of women. Ambedkar advocated democracy in every field: social, economic and political. .In this paper I want to give some glimpses about Ambedkar's contribution towards Women Empowerments.

(Key Words- Dignity, Empowerment)

Women empowerment as a concept was put forward at Nairobi at the International women Conference in 1985, which defined it as redistribution of social power and control of resources in favor of women[1]. In modern sense the term 'women empowerment' has come to be associated with women's struggle for social justice and equality[2]. The United Nations Development Fund for Women (UNDFW) contains the following factors in its definition of women empowerment:

1. Acquiring knowledge and understanding of gender relations and the way in which these relations may be changed.
2. Developing a sense of self-worth, a belief in one's ability to secure desired changes and the right to control one's life[3].

The empowerment of the woman begins when she becomes aware of the socio-psycho-cultural injustice that is being done to her and also how gender inequality and social-cultural, economic and political forces are affecting her adversely in every sphere of life. It starts when she becomes fully aware of her positive self-image, self-esteem, positive rights and duties, her capabilities and potentialities. Thus to empower women in the real sense is to enable them to flower their talents, facilities, abilities and capacities, and to realize their full potentialities, and real identity as also freedom of thought, expression and action, and strength to handle in every situations. It is not only to make them aware of their capacities, but also to provide them with the opportunities, facilities, and external and internal environment to utilize their inherent qualities and to develop their self-confidence, self-esteem, self-dignity and the ability to raise a voice and fight against injustice, exploitation and violence done to her. Thus women empowerment refers to increasing the spiritual, political, social, educational, gender or economic strength of individuals and communities of women. Women's empowerment in India is heavily dependent on many different variables that include geographical location (urban/rural) educational status, social status (caste and class) and age. Empowerment of women is essentially the process to lift-up of economic, social and political status of women in the society.

During the early Vedic period, women of India enjoyed equal rights with men, participating in different spheres. Both husband and wife enjoyed the property rights and widow was allowed to

re-marry. Women enjoyed a high status before 300 BC but after this period, there was a sudden shift in their status. The great ancient philosopher Manu was of opinion that night and day, never let a woman be free. She should be kept under her control by relations, a father in childhood, a husband in youth and a son in old age, a woman is not fit to be independent. Our society has been affected by Manuwadi culture for centuries. This was the culmination of the humiliation and injustice done to women in the Manusmriti period. The status of women was not similar throughout Indian history. It went on changing in a positive way due to the efforts of reformist movements launched by Bhakti saints like Meera bai, Kabir and others, Sharana movement headed by Basaveshwara, social reformers like Raja Ram Mohan Roy, Mahatma Gandhi, Mahatma Jyotiba Phule, Dr. B. R. Ambedkar and others. The present study has thrown light on the philosophy of Dr. Ambedkar and his ideas on the struggle for women empowerment-social equality, democracy, humanism and overall betterment of women.

The advent of B.R. Ambedkar on the social and political scene of India did contribute a great deal to the cause of women's emancipation. He respected women's dignity without belittling their roles as mothers and wives. He propagated equality in family and dignity of women's personality in society. His organized the Bahishkrit Hitakarini Sabha, to promote education and socio-economic improvement, as well as the welfare of the "depressed classes". For the protection of rights he started many periodicals like Mook Nayak, Bahishkrit Bharat, and Equality Janta[4]. Right from Mook Nayak and Bahiskrit Bharat, oppression of women remained a major plank of Dr. Ambedkar's movement. The focus of Bahishkrit Hitakarini Sabha was social, cultural and economic advancement of the untouchables. He welcomed women in all the social struggles. In Mahad Satyagraha, women participated in large numbers. About 500 women marched at the head of that historical procession to assert the right of untouchables to drink water from the public tank.

Dr. Ambedkar aimed at two fold social reforms; one, the reform of the Hindu family and the other, the reorganization and reconstruction of the Hindu society. The problems of sati, widow remarriage, child marriage, etc., related to the social reform of the Hindu family. The abolition of caste system, abolition of unsociability, changes in the laws of marriage, adoption, and succession relate to the social reform in the larger sense of the reorganization and reconstruction of the Hindu society. Dr. Ambedkar criticized Manu for conferring inferior status upon woman. Woman has been meted out ill treatment in every walk of life. Dr. Babasaheb spent his life for the betterment of women even involved in bad practices and professionals like prostitutions. The greatest example of it was seen in Kamathipura. There was a person named David who was the mediator working in brothel. He left his profession persuaded by the thoughts and teachings of Dr. Babasaheb Ambedkar. He evoked the entire prostitute to give up their profession and lead the life of honour.

Dr. Ambedkar made an impassioned appeal to cast off evil practices and customs among certain sections of the depressed classes at a meeting at the Damodar Thackersey Hall, Bombay in 1936. The meeting was largely attended by men and women belonging to the Devadasi, Patraje, Bhute, Aradhi and Jagiti Communities and was held to accord support to the mass conversion move inaugurated at Yeola. Dr. Ambedkar made a fervent appeal, especially to the women. "Whether you change your religion along with us or not, it does not matter much to me. But, I insist that if you want to be with the rest of us, you must give up your disgraceful life. You must marry and settle down to a normal domestic life as women of other classes do. Don't continue to live under conditions, which inevitably drag you into prostitution"

Dr. Ambedkar believed in the strength of women's and their role in the process reform. The historic Mahad satyagrah witnessed participation of three hundred women with their male counterparts addressing another meeting of about 300 women. Dr. Ambedkar was nominated as member of the Bombay Legislative Council on 18th February, 1927. He regularly participated in the Legislative debates and delivered a number of speeches on the budget, education, Panchayat, local boards and industries. His arguments on the Maternity Benefit Bill and on Birth Control were quite relevant to recognize the dignity of women.

After independence in 1947, Babasaheb became the Chairman of the Drafting Committee of Constitution. Dr. Ambedkar attributed the low status of women in India to the gender discriminatory principles laid down by Manu and in order to improve this, he suggested a number of provisions in the constitution. The idea was to not deprive the women of their rightful due in the society. Articles 14,15,6,39(a), 39(d),39(e),41, 42 and 44 were basically directed at improving the social status of Indian women as can be placed below—

Article 14: Equality before Low to all citizens.

Article 15: The State shall not discriminate any citizen on grounds of religion, race, caste, sex, place of birth.

Article 16: Equality to get employment/appointment to any office under the State.

Article 39(a): Equal rights to have an adequate means of livelihood.

Article 39(d): Equal pay for equal work.

Article 39(e): Protection of health and strength of workers.

Article 41: The State shall guarantee with its economic limits to all the citizens the right to work, to education and public assistance in certain areas.

Article 42: The State makes provision for just and human conditions of work and maternity relief,

Article 43: Provision of uniformity in civil code to all the citizens.

In addition to the above rights, Babasaheb proposed the Hindu Code Bill in order to codify Hindu Law to the following aspects:

1. The right of property of a deceased Hindu, who has died intestate without making a will, both male and female.

2. The order of succession among the different heirs to the property of a deceased dying intestate. 3. The law of maintenance.

4. Marriage.

5. Divorce.

6. Adoption.

7. Minority and guardianship.

Ambedkar's defense for women as the Law Minister of free India appeared in the form of the Hindu Code Bill in Parliament on 11th April 1947. The Hindu Code Bill, the most formidable legislative measure of modem India, sought, among other reforms, to put an end to a variety of marriage systems prevailing in India and legalize only monogamous marriages. The Code also sought to confer on women the right to property and adoption, which were denied, to them by Manu. It put men and women on an equal footing in all legal matters, he insisted on self-reliance of women by postulating their economic independence. The Bill sought to abolish polygamy among the Hindu's it proposed the right to property and the right to divorce for women. The Bill tried to codify the Hindu Laws, which were in a scattered form. He proposed to reform these laws on seven different matters, viz., i) the right to property of a deceased Hindu dying intestate to both male and

female, ii) the order of succession among different heirs to the property of a deceased dying inestate, iii) the law of maintenance, iv) marriage, v) divorce, vi) adoption, and vii) minority guardianship. Despite the very moderate nature of Bill , Dr. Ambedkar could not get it passed due to is opposition by many conservative caste protest against the failure of the Bill, Dr. Ambedkar resigned his seat in the cabinet.. Later, the original Bill was split into four different Bills namely-The Hindu Marriage Act, 1955; The Hindu Succession Act, 1956; The Hindu Minority and Guardianship Act, 1956 and The Hindu Adoption and Maintenance Act, 1956 are the four enactments which incorporate the ideas and principles of Hindu Code Bill formulated by Dr Ambedkar with slight changes[6].

Ambedkar's success in overcoming the stiff resistance to the Bill was the first victory for women's struggle for equality gained in the long course of Indian history Through the Hindu Code Bill, Ambedkar became the pioneer of women's movement in India. Today, the position of women in the Indian society is much better as compared to what it was in earlier times. One can see women making their presence felt in almost all the important areas of specialization. One can find women holding high positions both in the Government and private sectors. Credit for all this goes to a considerable extent to the efforts made by Dr. B. R. Ambedkar in generating a new spirit among millions of women in the Indian subcontinent.

**REFERENCES -**

1. Suman Panucha and Ankita Khatik, **Empowerment of Rural Woman**, Social Action, Vol. 55, p. 349, 2005.
2. Batliwala, Srilatha, **Women's Empowerment in South Asia – Concepts and Practices**, Asian South Pacific Bureau of Adult Education (ASPBAE), New Delhi, p. 11, 1994.
3. V.S. Ganeswamurthy, **Empowerment of Women in India-Social Economics and Political**, New Century Publications, New Delhi, p. 4, 2008.
4. Benjamin, Joseph**, B. R. Ambedkar: An Indefatigable Defender of Human Rights**, Focus: Vol 56: Page 55.
5. **Dr. Baba Saheb Ambedkar writings and Speechs**. Vol.14, part -3, p.283
6. More, Vijay G, **B. R. Ambedkar's Contribution for Women's Rights**, Variorum, Multi-Disciplinary e-Research Journal, Vol.02, Issue I, August.p.351, 2011.
7. J. S. Narayana Rao and A. Somashekar**, B. R. Ambedkar's relevance today**. Gyan Publishing House, 1994, p- 26-27.

# DR. BABASAHEB AMBEDKAR'S THOUGHTS ON ECONOMIC CONSIDERATIONS

**R. N. Kadam**
M.A. Applied Economics

**INTRODUCTION**

This paper deals with the economic ideas which were proposed by the father of Indian constitution Dr.Babasaheb Ambedkar. Economic thoughts of Dr. Babasaheb did not gain so much of popularity in the mainstream economics. The reason behind that he is more popular as a father of Indian Constitution, Dalit Leader rather than an economist. But it doesn't mean that his economic thought is negligible. The significance of his economic thoughts can be judged by adoption of his thoughts at various level of economic development.

Dr. Ambedkar was the first person to pursue PhD in economics from abroad. He was the 1st South-Asian to have double doctorate degree in economics from London School of Economics & Columbia University.

The important contributions in Economics of Dr. Ambedkar in the form of thesis & papers are as follow -

--> The present problem in Indian Currency.

--> The problem of rupee: Its origin & its solution.

--> Ancient India Commerce.

--> The Evaluation of Provincial Finance in British India: A Study in the Provincial Decentralisation of Imperial Finance.

--> Administration and finance of the East India Company.

--> Small Holding in India and Their remedies.

**METHODOLOGY**

Researcher has used secondary data in which research papers, articles are used.

**OBJECTIVE**

To study the economic thoughts of Dr. B.R.Ambedkar.

**THE REMARKABLE ECONOMIC THOUGHTS OF DR. B.R.AMBEDKAR DISCUSSED BELOW:**

**1) Problem of Rupee: Gold Standard v/s Gold Exchange Standards:**

Dr. B.R.Ambedkar studied the inflationary pressure in the economy at the time of gold exchange standard adopted in period 1898 to 1916 & commented on whether the gold standard or gold exchange standard would be better for curb the inflation in a country like India.

In his doctoral thesis he has mentioned that excess importance was given to exchange rate stability will benefit only the trading class not the poor’s in the economy. Poor’s will be benefited only when there is an internal stability.

According to Babasaheb, currency should be stable in terms of commodities not in terms of gold. He was against the concept of linking money supply with the gold. He pointed out that Government under gold exchange standard tries to manipulate the currency to keep it par with the gold value which is not a good idea. Ambedkar was a strong believer of quantity theory of money. He did not like the idea that government should manage the flow of the currency. He was afraid that government will not be able to manage it properly. He was not in favour of giving the power to the

government to expand the money supply without expanding the production of goods & services; since it can lead to an unstable currency value. So he strongly opposed the managed currency system & supported gold standards with some modification.

His major arguments are that Currency should not be linked with gold. Rather a pure gold standard to be followed where gold coins should be circulated along with paper currency. This strongly went against the idea of John Maynard Keynes of introducing Gold exchange standard. He is in fact of the opinion that gold exchange standard increases the chances of mismanagement by the government because the issue of money ‘’is authorized and conducted by men who are never under any present responsibility for private loss in case of bad judgment or mismanagement’’. Ambedkar argued that the amount of Mercantile should be linked with the wheel of Nature and stated that the gold exchange standard does not have the stability, currency which is a major concern for developing countries like India. Instead of implementing the Gold standard, he drafted the recommendations and had submitted it to The Royal Commission on Currency and Finance (or Hilton Young Commission). The recommendations were as follows:

1. Stop the coinage of Rupees by absolutely closing the mints to the Government as they are to the public.
2. Open a gold mine for the coinage of a suitable coin.
3. Fix a ratio between gold coin and the rupee
4. Rupee not to be convertible to Gold and gold not to be convertible in Rupees, but both to circulate as unlimited legal tender at a ratio fixed by law.

The commission found this book and recommendations as an invaluable reference tool and thus the Central Legislative Assembly has passed these guidelines as the ***RBI ACT 1934.***

**2 Thoughts on Agricultural Economics:**

Dr. B.R. Ambedkar was in favour of consolidation of land holdings but according to him it should be under state proprietorship. State should acquire all the agricultural land from the private owners, tenants or mortgagers and pay them the right compensation after consolidating the acquired land & it should be allocate this land in a standard size to the original cultivators without any discrimination based on caste, religion etc.He pointed out that land is only one factor of production. To increase the farm productivity other factors of production like capital & labour should be rightly mix with the land.

According to him every factor is responsible for the low productivity of land. Because of insufficient capital, surplus labour, monsoon dependent farming there is low agricultural productivity in India. Ambedkar in his paper on***," Small Holdings in India & Their Remedies (1918)"*** has suggested State owned co-operative farming & industrialisation as the remedial measure on Indian agriculture condition.

According to him Co-operative farming is a consolidation of land holdings by the farmers who collectively are willing to cultivate the land, but it should be under the rule and regulation of the government. This kind of practice not only increases the productivity, it will also reduce the cost of production.

According to Ambedkar, industrialisation can be a remedial measure on the vast disguised unemployment in Indian agricultural sector. Surplus labourer of the primary sector can be transferred to the manufacturing sector. This will increase the production of agricultural sector as well as manufacturing sector. This will help in the reduction of poverty and inequality.

The dual economy model for which ***Prof. Arthur Lewis's*** got Noble of Economics in 1950's already explained by Dr. B.R.Ambedkar in India in the year 1918 .

**3 Abolition of Khoti system:**

Ambedkar presented a bill against Khoti system in 1937 which is popularly known as ***"The Khoti Abolition Act".*** British Government used to appoint some powerful persons known as khot's. They were middleman between tax collector (British Government) and tax payer (inferior land holders). Khot's were responsible to hand over the tax revenue collected for the entire empire to the British Government; for this they used to freely exploit and abuse the inferior land holders. This kind of system was more prominent in Ratnagiri, Kolaba and Thane district.

**4 Contribution in Public Finance:**

Another important work of Dr. Ambedkar was his PhD dissertation in 1925***," The Evolution of Provincial Finance In British India",*** which dealt with the financial relationship between the Centre and Province. The period which he has covered in this book is from 1833 to 1921. Babasaheb has talked about the problems with the centralisation of government finance in India from 1833 to 1871. This book summarises the history of the financial relation between the province and the Indian government. This book was referred as an important source by the Financial Commission of India.In this book Ambedkar stated that, the each administrative unit should be given powers to raise its own finances and plan its expenditures without being heavily dependent on another.

**5 Ambedkar's Canons of Public Expenditure.**

In 1945, while discussing about the functions of Comptroller and Auditor General of India, Ambedkar pointed out that Government should responsibly spend the public funds. The revenue collected from the public should be spend according to rules and regulations and with due respect should be given to faithfulness, wisdom and to economy. The principles of spending the public fund are known as Ambedkar's canons of Public Expenditure.According to Ambedkar it's the duty of the government to provide the basic amenities to the tax payers. Every Government should keep in mind that they should be committed to provide roads, medical facilities, law and order to its citizens.

Ambedkar pointed out that even though the intension of spending the public funds may be corrected but still if it used wisely then also the planning fails.

**6 Strategies to overall Economic Development:**

Dr. Ambedkar agreed with the Marx's views on exploitation of the masses and believed that the path for India's economic development should be through eradication of poverty & inequalities & an end of exploitation by rich.

However he did not endorse communism as an economic system. In his essay ***"Buddha & Karl Marx ",*** he pointed out that economic motive cannot be the sole reason for all human activity as formulated by Marx & therefore the resultant exploitation can also be religious or social, especially in India.Ambedkar was an ardent supporter of democracy & human rights & therefore did not accept the tendencies of dictatorship & anarchy in communism. He advocated reformation within the tenets of the constitution & therefore rejected Marx's idea of a stateless society. Ambedkar favoured states role in the economic development of the country as opposed to the totalitarian approach of Marx.

**7 Nationalisation of Industries:**

Dr. Ambedkar stated that the fast development of India is impossible without widespread industrialisation. According to him, industrialisation creates large-scale employment which in turn produces essential consumer goods that saves foreign exchange, utilises raw materials on a proper scale leading to an all-round development of the country. But the private sector industries are unable

to perform this task satisfactorily, even if they did that; they only create monopoly & centralisation of industries. Therefore the government should come forward to take up large scale industrial activities for the social & natural interest. The small & cottage industries should be kept in the private sector. The Insurance & Transport should be nationalised. The right to strike should be given to labourers.

**CONCLUSION:**

This paper has discussed the important contributions made by Ambedkar in the field of Economics. Babasaheb had pragmatic solutions to complex problems & always kept the welfare of people at the centre of his policies on one hand Babasaheb advocated for collective farming white on the other hand. He also pushed for rapid industrialisation.

While being supporter of urbanisation Ambedkar warned against the threats of capitalisation & advocated for key industries & agriculture to be state owned in order to save the masses from exploitation.

**REFERENCES:-**

1 Dr. Babasaheb Ambedkar writing & Speeches.
2 Prof. Raykhelkar& Dr. Damaji : History of Economic Thoughts.
3 Prof. KeshavMeshram& others: Dr. Babasaheb Ambedkar Gaurav granth (marathi)
4 Sunil kumar: Ambedkar's Economic Ideas & Contributions.
5 JadhavNarendra : Neglected Economic Thoughts of Babasaheb Ambedkar. (Article).

# DR. BABASAHEB AMBEDKAR AND EMPOWERMENT OF WOMEN

**Dr. Shubhangi Dongre**
Asst.Professor, P.P.College of Education, Gondia.

**ABSTRACT**

Women constitute nearly half of the total population of the Country. Development of society is impossible without the development of women. Many women in India are suffering due to exploitation, discrimination and harassment. Women's empowerment should should focus on various aspects like social, economical, religious and political empowerment, Women should come out of their homes and actively participate in reshaping the society. Women when empowered become more confidant in expressing her thoughts and is more productive in her actions. Women empowerment in all walks of life must bring the necessary balance required for the society. The degree of performance of the women empowered through constitution as well as economic measures. In the present paper attempt has been made to find the thoughts on Dr.Babasaheb Ambedkar regarding empowerment of womens

**KEY TERMS**:- Constitution, Women, Society, Economic growth, Empowerment.

**INTRODUCTION:-**

"Education is something that ought to be brought within the reach of everyone. The objective of primary education is to see that every child that enters the portals of a primary school does leave it only at a stage when it becomes literate and continues to be literate throughout the rest of his life."

– Dr.B.R. Ambedkar

Women Empowerment is basically the creation of an environment where women can make independent decisions on thqwe4546eir personal development as well as shine as equal in the society. Women empowerment in every field of life should brought necessary balance required in the society. It will help in promoting structures which are more inclusive ,progressive, creative, constructive and generative in nature.

Dr. Babasaheb Ambedkar was well convinced about the status of women, as the chairman of the drafting committee , he tried an adequate inclusion of Women's rights in the political vocabulary and constitution of India. Therefore, by considering women's equality both in formal and substantial senses he included special provisions for women while all other general provisions are applicable to them, as to men. Hence there are Articles like 15(3), 51(A) and so on. His remarkable work in the preparation of Indian constitution made it to be known as a new Chapter of Human Rights. Dr.Ambedkar looked upon law as the instrument of creating a social order in which the development of individual should be in harmony with the growth of society. He incorporated the values of liberty, equality and fraternity in the Indian Constitution.

As an educationalist, Dr.Babasaheb Ambedkar emphasized on education of not only for men but also for women. He said, " I measure the progress of the community by the degree of progress which women have achieved." He always emphasized on education of women because he know that women education is one of the major instrument of women empowerment.

Dr. Ambedkar had the highest academic credential for an Indian of his time, and his erudition and scholarship have been widely acknowledged. It is known to all Dr. B.R. Ambedkar is the father of the Indian Constitution. Dr. Ambedkar described how women were treated cruelly by the way of

sati, enforced widowhood and girl marriages just to maintain strict endogamy in a caste. The social evils regarding women in Hindu religion as well as in Muslim society were highlighted by him. His concern was not limited to Hindu women only. He observed that even the Muslim women were also not getting their due which was provided to them under the Islamic Shariah as they were influenced by the Indian environment. He also criticized the denial of rights to Muslim women for divorce. He lamented the sad plight of the Indian Muslim women and said: "No Muslim girl has the courage to repudiate her marriage, although it may be open to her on the ground that she was a child and that it was brought about by persons other than her parents. No Muslim wife will think it proper to have a clause entered into her marriage, contract reserving her right to divorce.

**CONSTITUTIONAL PROVISIONS FOR THE EMPOWERMENT OF WOMEN –**

Constitutional Rights and Women In Indian Constitution, there are few articles exist that help the women of Indian society to improve their position and to compete with their male counterparts-

1) Article14 – All are equal in the eyes of law and equally protected by the law. It means equal rights and opportunities in political, economic and social spheres.
2) Article 15 prohibits discrimination on the ground of sex. Article 15(3) enables positive discrimination in favour of women.
3) Article 16 mentions there shall be equality of opportunity for all citizens in matters relating to employment or appointment to any office without any discrimination on the basis of religion, caste, creed and sex.
4) Article 24 prohibits the employment of children below the age of 14 years in factories, mines or in any other hazardous employment.
5) Article 39 and 39(d) state Equal means of livelihood and equal pay for equal work.
6) Article 41 the state shall guarantee within its economic limits to all the citizens, the right to work, to education and public assistance in certain cases.
7) Article 42 the state makes provision for Human conditions of work and maternity relief.
8) Article 44, the state provides a uniform Civil Code to all the citizens throughout the territory of India.
9) Article 46 – The state to promote with special care, the educational and economic interests of weaker section of people and to protect them from social injustice and all forms of exploitation.
10) Article 47 – The state to raise the level of nutrition and standard of living of its people and the improvement of public health and so on.
11) Article 51 (A) (C) – Fundamental duties to renounce practices, derogatory to the dignity of women.
12) Article 243D (3), 243T (3) & 243R (4) provides for allocation of seats in the Panchayati Raj System.
13) Educational Rights given to Depressed Class and Women Dr. B.R. Ambedkar, as the Chairman of the Drafting Committee, tried an adequate inclusion of women’s and depressed classes’ rights in the constitution of India

The important Acts passed for the Upliftment of women are:

**The Hindu Marriage Act of 1955:** This Act provided equal rights to women to obtain divorce and also maintenance in certain cases.

**The Hindu Adoption and Maintenance Act of 1956**: By virtue of this Act a woman can adopt a boy or a girl as her son or daughter.

**The Hindu Minority and Guardianship Act of 1956**: This Act provides that a woman is entitled to act as the natural guardian of her minor children.

**The Hindu Succession Act of 1956**: As a result of this Act, woman has got equal rights in the inheritance of family property. This Act is a landmark in the history of Hindu law.

**The Hindu Women Right to Property Act of 1973**: This Act has given more facilities to women. According to this Act, the daughter, the widow, and the mother can inherit property of the deceased simultaneously. Now women will hold her property absolutely with full right to sell, mortgage, and dispose of as she desires. But according to the Hindu Succession Act, 1956, woman has only to enjoy her husband's share in coparcenaries property for her life time without any right to alienate property.

**The Dowry Prohibition Act of 1961:** According to this Act, taking or demanding dowry is an offence punishable by imprisonment and or fines.

**The Equal Remuneration Act of 1976:** This Act does not permit wage discrimination between male and female workers.

**LAWS FOR WOMEN EMPOWERMENT IN INDIA**

Here is the list of some specific laws which were enacted by the Parliament in order to fulfil Constitutional obligation of women empowerment:

1 The Equal Remuneration Act, 1976.

2 The Dowry Prohibition Act, 1961.

3 The Immoral Traffic (Prevention) Act, 1956.

4 The Maternity Benefit Act, 1961.

5 The Medical termination of Pregnancy Act, 1971.

6 The Commission of Sati (Prevention) Act, 1987.

7. The Prohibition of Child Marriage Act, 2006.

8 The Pre-Conception & Pre-Natal Diagnostic Techniques (Regulation and Prevention of Misuse) Act, 1994.

9 The Sexual Harassment of Women at Work Place (Prevention, Protection and) Act, 2013.

**GOVERNMENT SCHEMES FOR WOMEN EMPOWERMENT :-**

The Government programmes for women development began as early as 1954 in India but the actual participation began only in 1974. At present, the Government of India has over 34 schemes for women operated by different department and ministries. Considering various article in the constitution, many schemes for the empowerment have been launched by the part and current government. Like-Beti Bachao Beti Padhao Scheme, One Stop Centre Scheme, Women Helpline Scheme, UJJAWALA : A Comprehensive Scheme for Prevention of trafficking and Reuse, Rehabilitation and Re-integration of Victims of Trafficking and Commercial Sexual Exploitation, Working Women Hostel, Rajiv Gandhi National Creche Scheme For the Children of Working Mothers, Ministry approves new projects under Ujjawala Scheme and continues existing projects, SWADHAR Greh (A Scheme for Women in Difficult Circumstances), Revision under IGMSY in Accordance with National Food Security Act, 2013 in XIIth Plan, Support to Training and Employment Programme for Women (STEP), NARI SHAKTI PURASKAR, Awardees of Stree Shakti Puruskar, 2014 & Awardees of Nari Shakti Puruskar, Awardees of Rajya Mahila Samman & Zila Mahila Samman, Indira Gandhi Matritva Sahyog Yojana (IGMSY) - A Conditional Maternity Benefit Scheme, Mahila police Volunteers etc.

The efforts of government and its different agencies are ably supplemented by nongovernmental organizations that are playing an equally important role in facilitating women

empowerment. Despite concerted efforts of governments and NGOs there are certain gaps. Of course we have come a long way in empowering women yet the future journey is difficult and demanding.

In pursuance of the above Constitutional provisions, various legislative enactments have been framed to protect, safeguard and promote the interests of women. Many of these legislative enactments have been in the sphere of labour laws to ameliorate the working conditions of women labour.

**CONCLUSION :-**

It is not easy to eradicate deep-seated cultural value, or alter tradition that perpetuates discrimination. Babasaheb Dr. B.R. Ambedkar sacrificed his whole life for the betterment, rights and justice to underprivileged sections of society. He made such provisions and included such articles in the constitution of India which helped a common man to fight against injustice. Woman is treated as source of enjoyment and exploited by man in Hindu culture prevalence during and after vedic period because the society move according to *manusmriti* at that time. Due to Ambedkarite reforms and Ambedkarism, women got independence and learnt to live with honour and pride. With self confidence, women started getting education, employment and become a part of whole system like man. It is only due to the efforts and contribution of Babasaheb that women are self-dependent today and government has initiated many schemes and implemented many laws for the empowerment of women in Indian society. In the condolence message (on Dr. Ambedkar's death) in parliament, Prime Minister Jawaharlal Nehru said "Babasaheb Dr. Ambedkar was a symbol of revolt against all oppressive features of Hindu society". His dream of society, based on gender equality is yet to be realized and therefore his thoughts are important for the social reconstruction that favors women empowerment. Dr. Babasaheb expressed his views on the state of life of all women. He stated that women must be treated equally and given equal prestige. He insisted on Hindu Code bill suggesting the basic improvements and amendments in assembly. He also insisted and evoked all the parliamentary members to help to pass the bill in parliament. Eventually, he resigned for the same. The teachings and thoughts of Dr. Ambedkar are useful not only women but also all the Indian even today. His deep concern and feelings for all round development of women is expressed in maximum of his speeches. In his last speech in Indian Parliament we can know his feelings and respect showed towards women. He quoted the famous thoughts of an Irish Patriot Daniel O'Connal as, "No man can be grateful at the cost of his honour, no woman can be grateful at the cost of her chastity. And no nation can be grateful at the cost of his liberty." Towards all the women, irrespective of their religion, casts and class, Babasaheb had a particular humanitarianism view. He frequently raised his voice against all sorts of injustice towards women. In order to convert the dreams of Babasaheb into reality it is necessary to improve the Support System for working women.

**REFERENCES:-**

1) Gavali.T.A.,HirwaleSukharam(Edit.), Dr.Babasaheb Ambedkar GauravGranth, PracharPrakashan Kolhapur,1st Edition,(1991)
2) Ambedkar B.R., Dalitanche Shikshan,2nd Edi,(1997)
3) MeshramKeshav., Dr.Ambedkarchintan, Lokwangmay, 4thEdi,Feb 2006.
4) PantavaneGangadhar.,Muknayak, NirmalPrakashan, Nanded,4th Edi,(1998).
5) WaghmareLahu.,"Importance of Dr.Ambedkar's thoughts about higher Education". Conf. prociding.,Jan2013
6) Nagaraja, B. (2013). Empowerment of Women in India: A Critical Analysis. Journal of Humanities and Social Science (IOSR-JHSS), 9(2), pp. 45-52 [WWW page]. URL http: www.Iosrjournals.Org/empowerment.html
7) Deshpande, S., and Sethi, S., (2010). Role and Position of Women Empowerment in Indian Society. International Referred Research Journal, 1(17), pp. 10-12.

# EDUCATIONAL THOUGHTS OF DR. BABASAHEB AMBEDKAR

**Miss. Jondhale Dhanashri Dhondopant**
Research Scholar in English
School of Language and Literature, Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.

Dr. Babasaheb Ambedkar is the true sculpture of modern India, an advocate of **Feminism**, and Dalit rights. Born on 14th April 1891 in underprivileged family. His quote –***"Life should great, rather than longer"*** suits him a lot because he curved his life as the quote by his great work and achievement and so he has become larger than life figure in India's current political as well as historical discourse. One will be shocked by knowing the difficulties and barriers which he had crossed. And it will be more shocking if one don't know his struggle. By his talent he conquered the international academic world, the title of the great scholar in law, in economics and in political science. He is considered one of the most educated person not only among the Indians but throughout all over the world. In his life journey he battled against inequality, casteism, women's problems, untouchability and much more.

Dr. B R Ambedkar is well known and respected all over the world for his excellent speaking skill, meaningful writing, presence of knowledge and long eyesight. As one know his education and learning skills but the qualities which make him special always are his limitless knowledge of economics and law besides these he had known tremendously about the subjects like constitution, sociology, education, political science, philosophy and religion. In his life journey he influenced by the great people like Gautam Buddha, Chaatrapati Shivaji Mahaaraj, Mahatmaa Jyotiba Phule, Chatrapati Shahu Maharaaj, Prof. John Dewey, Elvin Seligman. Dr.B R Ambedkar who was influenced by the education and so, till the end of life he made his life busy to learn new things and by using his knowledge he changed narrow thinking of the society. In Constitution of India he brought all the Indians in one thinking which is – *We are the Indians Firstly and Lastly***.** It is very true to say about him that he is *The Father of Modern Economist.* His book **The Problem of the Rupee** is the life giving to the Indian Economy forever.

Dr. B R Ambedkar's thoughts and opinions, ideas towards education are very essential to understand the current situation and to set the future of education system of our society. We can explain his views about education as follow:

**Social Liberation :**

If one want to make the education powerful for that we have to take the efforts also. Education is the only weapon which can bring the great individual transformation in social, economic and political area but for this unity also important. He always said –

***"So long as you do not achieve social liberty, whatever freedom is provided by the law is of no avail to you."***

Dr. B R Ambedkar was the great opponent of social and women inequality, untouchability, casteism, social discrimination. He made his name in all over the world by overcoming all the mentioned barriers. Because of such barriers many people missed the chance to show their brilliance and the history is the proof, many time he was the victim of casteism. He understood only one thing that is only education can disappear all these problems. For him-

***"Education is not only the birth right of every human being but also weapon of social change."***

**Popularization of Education:**

Dr. B R Ambedkar is the great supporter of democracy hence he is the great admirer of John Dewey who believed always on democracy of education. In India in past so many people had been stayed away from education and the reasons were castism, untouchability, and inequqlity in society. Dr. B R Ambedkar had the opinion that education is the fundamental right of every Indians and no one have the right to stop anyone from having it. He had faith only education do the changes in society so, he always used to say-

***"Be educated, be organized and be agited."***

**Women Education :**

Dr. B R Ambedkar's speech on 20th July 1949 at Nagpur, he explained his opinion in which he said – "*An educated man without character and humanity is more dangerous than a beast. If his education is determined to the welfare of the poor, the educated man is a cause to society …. Character is more important than education.*" "*I measure the progress of a community by the degree of progress which women have achieved.*"

Dr. B R Ambedkar's **Hindu Code Bill** is the boon for all Indian women which he personally fight for the women rights which are – Women Property Act, in Parents Property Equal Act, Men-Women Equality Act, Women Labour Protection Act, Act to take Divorce, Remarriage Act, Inter caste Marriage Act etc. When this bill was not passed in the assembly he resigned from the post of Law Minister. In the Constitution he has given the rights for women to be a member of parliament, to be a speaker, minister, chief minister, prime minister, president, collector etc. She can be everything whatever she wants. The rights which are not given by the religion, those all are given by Dr. B R Ambedkar in the Constitution. He is truly mentor of women. After Mahatma Jyotiba Phule he was the reformer of women's lives even while writing constitution he made so many special rights for women. He was the strong supporter and the true well-wisher of women's education. He had the strong opinion that for the progress of society and for the development of country, it is very essential for women to be educated. For him education is not only for men but women has the equal right to have it.

**Education as a Weapon in Social Liberation :**

By the opinion of Dr. B R Ambedkar educated women play very important role in the change of society. She is the first teacher of her children. He is the thinker of-

**"***Unity is meaningless without the accompaniment of women and agitation of women. Education is fruitless without the strength of women.*"

She can understand the need of her child without language. In Dr. B R Ambedkar's opinion if we teach women she will help the society to create good people. An educated mother develop her child.

**Stress on Moral Education and Character Building :**

For Dr. B R Ambedkar education is useless if it is without moral values. There is no use of people whether they are educated but they don't have morality and manners, they don't be useful to society. On 12th February 1938, to addressing the Bombay Sector Depressed Classes Youth Conference, he said-

Education has importance if it is with morality. For being a good citizen one should have good character. Your character define you. You are the member of this society, your behavior can lead society towards the progress or it can decline towards the danger zone. Dr. B R Ambedkar is the

supporter of humanity for him untouchability and inequality cannot be disappear if the education system is biased on caste, religion, men-women differences. On october14,1956, along with his five lakh followers, Dr. BR Ambedkar went to the refuge of the Buddha, Dhamma and Sangha. The reason behind his acceptance of this religion is this religion has no place for caste, difference between men-women, superstition, casteism, untouchability. He was attracted to Buddhism's rational outlook mixed with morality and stressed by scientific values.

**Religion and Culture in Education :**

Dr. B R Ambedkar was the great admirer of Karl Marx and so he not only rejected religion and culture but totally agree Marx's opinion '*Religion as the People's Opium*.' He was the great opponent of social injustice and rituals in the name of religion but as he knew every religion and culture is essential to education but he just expects it shouldn't take away anyone to having their education because already he had much more bitter experience while having his education. He always used to say-

"*What's good in religion and culture should be accepted but don't have to keep place of hypocrisy in the same religion.*"

He was supporter of –

"*The religion that teaches liberty, equality and fraternity*."

He saw religion not as a medium to spiritual preservation of individual souls, but as a 'social doctrine' for establishing ethical or moral relations between man and man.

**Career Oriented and Skill-based Education :**

The aim of education is to be self- dependent. For him employment is very important and if it is with education then the person will earn the respects also. He believed the education should have the quality to achieve some skills which generate the ideas of employment. So, he always focused on technical education and also on the education which is employment oriented. He believed that education is a movement. If it doesn't complete its objectives then it is useless. True education is holder humanity, supplies sources of livelihood, generates wisdom, talent, and smartness. So it should be skill-based and career oriented. According to Ambedkar, the education system must be based on the teamwork among academic, industry and market. He was also against the communists and frequent labour strikes. He stressed on the Technical Education for addressing the Technical Scheme Advisory Committee in Calcutta on 24 August 1944, he remarks as the labour member of Executive Council of the Victory, Government of India-

"*No plan for the future development of the country can be deemed to be complete which does not provide for technical and scientific training. This is the age of the machine and it is only those countries in which technical and scientific training has risen to the highest pitch that will survive in the struggle that will commence when war is over, for maintaining decent standards of living for their people.*"

**Importance of Mother-tongue and Foreign Language :**

Language is the root of the education. It is the right of every child to get him/her education in mother tongue. The reason behind this is, it will create interest in children and will easy for understanding. Dr. B R Ambedkar advocated teaching in mother tongue but simultaneously he believed each student should know at least one foreign language. In his opinion knowing the foreign language means one is making bridge to connect with the world and one will know what's going on around the world.

He believed – "*Cultivation of mind should be the ultimate aim of human existence*."

We should know and very few people know that Dr. B R Ambedkar wanted to make Sanskrit as national language. He had put this point in the Constitution Assembly Meeting.

**Role of Teacher :**

According to Ambedkar for every development teacher is important. Teacher is the base of society who creates the generation. He was of the opinion if the teacher has good subject knowledge then he will create the good students and indirectly the society will develop. By the good subject knowledge he will easily get good employment. Hence the role of teacher is like an architecture who mould and shape the society and help indirectly in the development of country. Teacher is the one who is always positive in every situation in regarding in his students concern. He builds-up only positive traits which are necessary in every situation. Dr. B R Ambedkar believed that the selection of teachers should be good because they are the pillars of SOCIETY who create good citizens.\

**Conclusion:**

In conclusion, I would like to say that - Dr. B R Ambedkar is really far sighted personality. His every prediction is very true for now like – people have to buy water, young people have to show interest in business, educated people don't have to ignore the politics, understand the importance of your vote it can change your country's situation and much, more. He accepted the ancient education along this he supported and suggested to be with world and for that accept the modern education. He took great efforts in the education system. For him if we neglect the importance of education then we can't co-ordinate with the world. For him education should be qualitative and also technical so there will be balance in society and in economy in the progress of society. In short his views and opinions on education everlasting useful it depends upon the society how they look it and apply it.

**Works Cited**


1. Ambedkar, B R, *Constitution of India* Kindle Edition, 9 April 2020.
2. Ambedkar, B R, *The Problem of the Rupee: Its Origin and Its Solution* London, King P S and Son, 1923.
3. *Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol.14 (Part One)* Kindle Edition, 6 February 2018.
4. Mehandiratt, Kuldeep, *Educational Philosophy of Dr. Bhimrao Ramji Ambedkar, 14 April Birthday Special*, 13 April 2020.
5. freejournal.in/india/-famous-quotes-by-ambedkar-you-ought-to-know WWW.dictionary

# DR. S. R. RANGANATHANS FIVE LAWS OF LIBRARY SCIENCE AND THEIR IMPLEMENTATIONS ON LIBRARY ACTIVITIES

**Mr. Parmeshwar M. Ingle**
Librarian, Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur

**ABSTRACT**

This paper describes in detail the Five Laws of Library Science and their implications on library activities. These laws have provided a scientific approach to library science. They constitute the philosophical basis for work and services of all types of libraries. These also provide guidance in the practice of Library and Information Science. Every student and teacher of library Science and librarian must give a thought to the implications of these laws. In the changing environment of libraries in the emerging society has to fall within the purview of these laws. The new interpretations of these Laws shows that in today's international world of librarianship, Ranganathan's Five laws are much important and relevant what was before and even it is increasing.

**KEYWORDS**: Five law of Library science, Implication, Imperatives of five Laws etc.

**INTRODUCTION:**

S. R. Ranganathan formulated the **Five Laws of Library Science** in 1928 and published them in 1931 under the title "Five Laws of Library Science". These are applicable to any problem in the areas of library science, library service, and library practice. These laws have provided a scientific approach to the subject of library science. Even though S.R. Ranganathan proposed the **Five Laws of Library Science** before the advent of the digital age, they are still valid and equally relevant today.

**DR.S.R.RANGANATHANS FIVE LAWS ARE AS FOLLOWS:**

1. **Books are for use:**

First law of Library Science is 'Books are for use'. Historically, in the 15th and 16th century in Europe, books were chained to the selves. In those days, libraries were meant for storage rather than for use. At a later stage, books were made available to those people who paid a fee, but now the book lending is free for users. Modern libraries are attractive, comfortable and a number of special services are introduced to ensure optimum utilisation of books. A modern librarian is happy when the readers make their shelves constantly empty. He/she is worried and depressed on seeing those books which remain in the library only. Librarians take initiatives to make the library a centre of intellectual achievements by increasing the use of books. Implications In order to satisfy the first law of library science, libraries has to look into a number of factors. The most prominent are: Library Location the resources of the library need to be fully exploited. Library has to play its vital role among intellectual users. It must be at the centre of its user's community. If it is an academic library, it should be situated in the middle of the academic institution or at a distance of few minutes' walk from the teaching departments or hostels. A centrally located library will be helpful in increasing the use of books and, hence, will become the soul of the institution or city for its intellectual achievements. Fortunately, in countries where the law "books are for use" is implemented, it has changed people's mind and normally the libraries are kept open for 18 hours a day. In libraries, the opening hours of the library are according to the convenience of the library users. The first law has, thus, exercised tremendous influence on the library building and its furniture. Library Staff In the

olden days, the librarian as a caretaker was expected to protect the books from four enemies- fire, water, vermin and man. He was just a matriculate and his pay was low. The first law of library science directs that the libraries must have well-educated and qualified staff, so that they can provide better library services to their users. This law has changed the concept of librarianship as it was in the olden days.

**2. Every reader his / her books:**

The second law states that every user of the library should get the book he/she wants. This law also advocates the generalisation and democratisation of library services. In earlier days, the access to libraries and their books were only available to those few who belonged to the aristocracy and the upper classes. Now, the library services have become the basic right of all citizens, without any distinction or discrimination. 'Every Reader his/her Books' means, books for all. Books for all symbolize 'Education for All.' The second law supports the principal of equality of opportunity for books for all and provides a suitable environment for all to learn. Implications Requirements of the readers are varied for the implementation of the law 'Every Reader his/her books'. It is the obligation of the library to provide every reader his/her books. This law has placed obligations on the state, library authority, library staff and the readers of the library. The users should also have the basic knowledge of the scheme of classification used in the library and the art of using the library catalogue. They should know about reference works, bibliographies, catalogues and other library services.

**3. Every book its reader:**

This law advocates providing an appropriate reader for every book. The first law is developed to satisfy the interest of library documents, the second law is concerned with the task of finding an appropriate book for every reader and the third law expects that an appropriate reader should be found for every book. The most prominent system used by the libraries for satisfying the third law is 'Open Access System', while the other library activities related to this are shelf-arrangement, catalogue entries, reference work, publicity methods, book selection and extension work. Implication Open Access System provides an opportunity to see and examine the book collection with as much freedom as one has in one’s own library. In an open access library, the readers are permitted to enter the stack room and browse books to select the best book/books to satisfy their requirement. Reference Work The books cannot reach the hands of readers unless their content is interpreted by the reference staff. It is the duty of reference librarians to act like marriage matchmakers between books and readers. They should find a suitable reader for every book or vice versa. They should also identify all those books which are of less use or no use. This is a kind of service that the third law expects from the reference staff. Publicity is a powerful tool to attract the users of the library and thereby to increase the chances for every book to find its reader. The library should adopt all authorized methods to attract more library users. Books Selection The third law has an important role in the book selection process. For satisfying the third law and fulfilling the users' demand, it is essential to examine the users' requirements and the objectives of the library. To satisfy the demand of the third law, librarians celebrate local festivals and certain national days dedicated to national leaders or ideas, and participate in local festivals.

**4. Save the time of the reader:**

The main concern of the first three laws of library science is to facilitate access to books by their appropriate reader, and to optimize the usage of library collection. The fourth law focuses on the services for the readers to save the time of the reader as well as staff. The law expects the

reference staff to support readers from the very moment they enter the library, up to the moment they leave it, critically examining each and every process they involve themselves in, with a care to save their time. Implications Open Access System The fourth law strongly opposes the process of 'Close Access System' as the time is an important constraint. In a closed access system, there will be loss of time while going through the library catalogues. In larger libraries, if the closed access system is followed, the unit processing time for getting the required book may be longer in comparison to that in the Open Access System. As the user, after submitting the request, is bound to wait at the counter to get the required book and it may take a longer time if the asked book is not available on the shelf and the staffs is asked to give list of other related books. In the Open Access System, the user can go to the relevant shelf and browse several books and then finalise the best suited book. Shelf Arrangement The comfortable and useful method of shelf arrangement can save significant time of the user.

**5. Library is a growing organism:**

The fifth law handles the library as an institution which has all the qualities of a growing organism. A growing organism has the inherent feature of natural growth, deterioration, and change in size, development of new shapes and forms, etc. Implications Growth The library is a growing organism. Its growth depends on the number of readers, materials and staff. The main components of the library organism are the books, readers and staff. A modern library is a trinity of all these components. There must be a harmonious growth among these basic components. The quality of every library service is based on a well-chosen, selective and growing collection of information and documents. The library should purchase new books, journals, audio-visual materials and other informative documents to provide informational support for teaching and research activities of the parent institution and to fulfil the needs of the readers. The library building must have a self-sufficient system for adjusting books of fluctuating size. The reader is a part of trinity, where he/she is an important part of the library organisation. The reading room should be well planned, attractive and comfortable with seating arrangements for painless study. Issue Work: The increased number of readers leads to the increase in issue and return work.

**REFERENCES**


1. Ranganathan, S.R. (1957). The Five Laws of Library Science, Madras: Madras Library Association.
2. Kumar, P.S.G. (2003). Foundation of Library and Information Science, Delhi: B.R. Publishing Co.
3. Khanna, J.K. (1994). Library and Society, Delhi: Ess Ess Publications.
4. Kumar, Krishan (1997). Library Organisation, Delhi: Vikas Publishing House. 5. Vyas, S.D. (1993). Library and Society, Jaipur: Panchsheel Publications.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आम्हाला काय दिले?

**प्रा. एम. डी. रायभोळे**

समाजशास्त्र विभाग प्रमुख, जवाहरलाल नेहरु कला, वाणिज्य व विज्ञान, वरिष्ठ महाविद्यालय, परळी (वै.) जि. बीड

**प्रस्तावना -**

अस्पृश्याचे उद्धारक, अनाथाचे ज्ञाता, अपंगाचे आधारस्तंभ शतकानूशतके लाथाडलेल्या पतीताचे पालनहार, दीन, दुबळ्या दलिताचे कणवाळू, कैवारी, जुलमी आमि ढोंगी विषमतेविरद्ध जन्मभर प्राणपणाने झगडणारे झुंजार लढवय्ये, सामाजिक न्यायासाठी, माणूसकीच्या हक्कासाठी जन्मभर आकाशपाताळ एक करणारे, बंडखोर जुलमाविरदध वज्रमुठ उभारणारे, कणखर क्रंतीवीर, थोर स्वातंत्र्य वीर, भूमीपुत्र, धऩ्ममार्तंडाच्या वर्णवर्चस्वावर उगारलेले वाघनख, प्रस्थापीत सनातनी मनुवादी धर्ममार्तंडावर उगारलेले असूड, विश्वभूषण महामानव, आदर्श नागवंशीय शुरविर, ज्ञानी, अस्पृश्य, दलिती, शोषीत, पिडीत, शेतकरी, कामकरी, शेतमजूर यांच्यावर मायेची पाखर घालणारे थोर इतिहास तज्ञ, मानववंश शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, दृष्टे, आदर्श संविधानकार, थोर कायदेपंडित, पदमभूषण, भारतरत्न, बोधीसत्व, जागतिक किर्तीमान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी आम्हाला बहूजन, अस्पृश्य आमि सबंध भारतीयाना काय दिले?

**उद्दिष्ट :**

1. प्रस्तुत संशोधन पेपरमधून हजारो वर्षापासून बहूजन, अस्पृश्य आमि स्त्रियांचे शोषण, अन्याय अत्याचार मनुवादी विचारसरणीने कसा केला याचा शोध घेण्याचे उद्दिष्ट आहे
2. प्रस्तुत संशोधन पेपरमधून न्यायावर आधारीत समाजरचना निर्माण करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा शोध घेण्याचे उद्दिष्ट आहे.
3. प्रस्तुत पेपरमधून सबंध भारतीयाना बाबासाहेबानी काय दिले याचा शोध घेण्याचे उद्दिष्ट आहे.

**महत्व :**

1. स्वातंत्र्यपूर्व काळात समाजव्यवस्था कशी होती हे प्रस्तुत पेपमधून समजण्यास मदत होणार आहे.
2. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे स्वरुप समजून येणार आहे.
3. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला जे दिले त्याचा स्विकार आम्ही किती प्रमाणात स्विकार केला हे समाजण्यास मदत होणार आहे.

**विषय प्रवेश :**

सनातनी, वैदिक, मनुवादी धर्ममार्तंडानी अस्पृश्य बहूजन समाजाला कसे छळले काय दिले?

1. मान झुकवून जोहार मायबाप करायला भाग पाडले. भीती, देवधर्म भोळेपमा, अंधश्रद्धा, दु:ख, दैन्य, दारिद्र्य देवून हाजी हाजी करायला शिकवले.
2. भूती पुराणे वेगवेगळ्या भाकडकथा लिहून आमचा उज्वल इतिहास विसरायला लावले.
3. बहूजनाचे श्रम, वेळ व पैसा यावर उत्तम प्रकारे चरितार्थ पोषण चालवण्यासाठी बहूजनाना मातीत घालायची वृत्ती स्वत: जोपासली.
4. सर्व दृष्ट्या तिरस्कारणीय ठरणारी अशी मनुस्मृती दिली. देवदेवताचे देव्हारे व पोथीपुराणे रचली. विनासायास स्वत:स जगविण्याची तरतूद केली हजारो वर्षे त्याद्वारे स्वत:साठी चराड कुरण बनवली.

5. मनुस्मृती पोथी, पुराणाद्वारे सनातन वैदिक धर्माच्या मुळे गुलामी वेठबिगरी अस्पृश्यता त्यातून बहिष्काराचे हत्यार हजारो वर्षे अस्पृश्यावर चालवले. गुलामगिरीची खाल बहूजनावर लादली आणि जर त्याना गुलामगिरीची जाणीव झाली तर ते बंड करुन उठतील म्हणून त्याना जागृत केले नाही.
6. बलूतेदारी व मानहानीकारक जिने देणारी वृत्ती हजारो वर्षापासून जोपासली.
7. अस्पृश्याना सार्वजनिक ठिकाणी, हॉटेल, खाणावले, पाणवटे याठिकाणी त्याना मज्जाव केला मुक्त संचार करायला बंदी होती.
8. आत्मा, परमात्मा, स्वर्गलोक सध्याचा जन्म हा मागील जन्माच्या पाप-पुण्यामुळे मिळाला आहे. मागील जन्माच्या पापपुण्यामुळेच सध्याची स्थिती निर्माण झाली ाहे. काम करीत राहा फळाची अपेक्षा करु नका. पुढील जन्म तुम्हाला चांगला मिळेल. या दृष्टीकोनातून निराशवादी शिकवण दिली.
9. अस्पृश्याच्या गळयात थुंकण्यासाठी मडके, तो आत्म्याची जाणीव व्हावी म्हणून हातात घुंगराची काठी किंवा वाजवण्याची छोटी ह ालकी, पायाच्या पाउलखुणा नष्ट होण्यासाठी कमरेला खराट बांधण्याची त्यानी सक्ती केली होती. अस्पृश्याची सावली सवर्णावर पडू नये म्हणून भर उन्हात स्पृश्य व्यक्ती समोर आली तर अस्पृश्याना जमीनीवर आडवे पडावे लागत असे. या सर्वाचे कारण सवर्णाना विटाळ ञोत होता. असा कायदा मनुस्मृतीत तयार केला होता.
10. कोणत्याही वैदिकाने, मनुवाद्याने समाज सुधारण्याचे काम केले नाही. स्वत:च्या स्वार्थासाठी जीवनभर झटले. स्वत:च्या स्वार्थासाठी इतराना माती गाडण्याचे काम हजारो वर्षापासून चालू होते.
11. बहूजन अस्पृश्यावर अन्याय करण्यासाठीच त्यांचा जन्म झाला होता. त्या सर्वांनी अंधश्रद्धा आमि आध्यात्म शिकवला.प्रत्येक ठिकाणी अस्पृश्याचे खच्चीकरण करण्याचे काम केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी अस्पृश्य, बहूजन, सबंध स्त्रिया आणि भारतीयाना काय दिले ?**

1) ताठ मानेने जगायला शिकवले.
2) भीती, दैन्य, दारिद्र्य, दूर करण्याचा प्रयत्न केला. अंधश्रद्धा दूर करुन दूरदृष्टी विज्ञानवादी वृत्ती जोपासण्यासाठी बळ दिले. स्वाभिमानी जगण्याचा मंत्र दिला.
3) आमचा गाढलेला इतिहास, आपल्या ऐतिहासिक संशोधीत साहित्याद्वारे आम्हाला व सर्व जगाला दाखवून दिला. जो इतिहास विसरतो तो इतिहास घडवित नाही हा मंत्र त्यानी दिला.
4) आदर्श जगत असताना इतराना पण जगण्याची धडपड शिकवली.
5) जगातील एक आदर्श संविधान तयार केले. सर्वांना न्याय व हक्क मिळवून दिले.
6) संविधानाद्वारे आमची अस्पृश्यता गुलामगिरी, वेठबिगारी नष्ट केली. आमच्यावरील बहिष्काराचे हत्यार बोथट केले. बहूजनाना गुलामाना त्याच्या गुलामगिरीची जाणीव करुन दिली. त्यामुळे तो जागृत होत आहे.
7) बलुतेदारी, मानहानीकारक जिने अस्पृश्याना देणारी वृत्ती नष्ट केली.
8) सार्वजनिक ठिकाणी, हॉटेल, खानावळी, पाणवटे याठिकाणी होणाऱ्या अस्पृश्याच्या पिळवणूकीवर संविधान द्वारे आपल्या कृतीद्वारे अस्पृश्याना न्याय मिळवून दिला. निर्भीड बनवले.
9) कुटुंब मर्यादीत राखण्याचा सल्ला दिला.
10) आत्मा, परमात्मा, पूनर्जन्म, स्वर्गलोक, पापपुण्य हे सर्व खोटे असून सर्वजनाना मृत्यू आहे. जीवनाकडे डोळस आणि आशावादी दृष्टीने पाहायला शिकवले.
11) ग्रिक पुराणातील ेक गोष्ट निखाऱ्यावर भाजलेली मुले डिमेटेर देवता मानवरुप घेवून पृथ्वीवर आली. तिने एका राणीच्या घरी तिचे मुल सांभाळण्याची नौकरी पत्करली. राणीच्या त्या मुलाला अमर सर्वश्रेष्ठ तेजस्वी बनवण्यासाठी ती देवता त्या लहान मुलाला दररोज मध्यरात्री निखाऱ्यावर भाजून काढत असे. परंतु एका मध्यरात्री दुर्दैवाने त्या मुलाच्या राणी आईने पाहीले आमि डिमेटर देवतेला हाकलून लावले. अमर आणि

तेजस्वी बनण्यापासून तो मुलगा पारखा झाला. अशाच प्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्याना महान व आदर्श बनवण्यासाठी (डिमेटेर देवतेप्रमाणे) अहोरात्र धडपडत होते. परंतुत्यांच्या अकाली महापरिनिर्वाणामुळे ते कार्य अर्धवट राहिले.

12)अस्पृश्याना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात सर्व ठिकाणी प्रगती पथावर आणण्यासाठी, मुक्तीसाठी आणि त्याना सर्व ठिकाणी किंमत मिळवून देण्यासाठी डॉ.बाबासाहेबानी प्रस्थापीताशी, वैदिकाशी, सनातण्याशी मनुवाद्याशी निकराने लढ दिला. लोखंडी पिंजऱ्यात बंदिस्त गरुड आणि त्याच्याजवळ सोनेरी पिंजऱ्यात पोपट ठेवले होते. बंदिस्त गरुड आपल्या चोचीने लोखंडी गजाची कांब वाकवून आपली सुटका करुन घेण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्याची चोच रक्तबंबाळ होते. त्याचे लक्ष अन्नपाण्याकडे नसते. परंतु सोनेरी पिंजऱ्यातील पोपट उगीचच सोन्याची कांब वाकवण्याचा प्रयत्न करतो. पण स्वातंत्र्य मिळवण्याची आस असल्यामुळे जे रक्तबंबाळ होईपर्यंत तो बंदिस्त गरुड लोखंडी कांब मोडतो आणि उडून जातो. शेवटी गरुडाचे रक्त पाहून तो सोनेरी पिंजऱ्यातील पोपट सोनेरी कांब वाकवण्याचे सोडून देतो आणि गोड फळे खाण्यात दंग होतो. अशा प्रकारे पूर्वीचे महार हे गरुड आणि इतर अस्पृश्य हे सोनेरी पिंजऱ्यातील पोपट गरुडाप्रमाणे धडपण्याची प्रेरणा डॉ.बाबासाहेबानी आम्हास दिली.

13)डॉ.बाबासाहेबानी आपल्या कुटुंबाकडे, संसाराकडे दुर्लक्ष करुन अस्पश्य बहूजन भारतवासीयांचे भविष्य उज्वल बनवण्यासाठी आहोरात्र झटले.

14)डॉ. बाबासाहेबांनी आपले आयुष्य बहूजनाच्या हिताकरीता (कोणताही मोबदला न घेता) वेचले भारत हीच माझी मायभूमी हेच ध्येय त्यांनी अंगीकारले.

15)अस्पृश्याचे ऐक्य, सामंजस्य, सामर्थ्य कडवेपण लढाऊ वृत्ती जोपासण्यासाठी प्रयत्न केले.

16)वैदिकाच्या हेटाळणीस तोंड देऊन पादलीत, बहूजन यांच्यामध्ये स्वाभीमान चैतन्य याचा महासागर उभा केला. बाबासाहेबानी गर्जना केली की, वैदिकानो तुम्ही असेल नाठाळपणाचे धोरण चालू ठेवले तर तुमचा भविष्यकाळ काळाकुट्ट आहे. तुम्ही माझी विचारसरणी मान्य केली नाही तर तुमचा सत्यानाश ठरलेला आहे.

17)पददलिताना, अस्पृश्याना, बहूजनाना माणूसकीचे हक्क मिळावेत आणि ते विद्या, धन, राजकीय सत्ता आणि उच्च संस्कृती यानी समृद्ध व्हावेत स्पृश्य व अस्पृश्य यांच्यातील संघर्ष कायमचा मिटावा व भारत देश प्रभावी आणि शक्तीमान, बलशाली व्हावा म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर देशासाठी झटले. त्यांचा मुळचा पिंड विद्या व्यासंगाचा, पंडिताचा व तर्कशुद्ध विचारवंताचा, अखंड वाचन, संशोधन मनन, लेखन व भाषण ही त्यांच्या जीवनातील सौंदर्यस्थळे त्यांच्या आयुष्यातील 70% वेळ दीनदलित बहूजनाच्या हितरक्षणासाठी व्यतीत झाल्यामुळे त्याना आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि ऐतिहासिक प्रश्नावर जे लिहायचे होते ते त्याना लिहीता आले नाही. ही त्यांच्या वैयक्तिक जीवनातील हानी होय. तथापी त्यानी अतिउत्तम लहान-मोठे 30 ग्रंथ लिहीले. त्यानी जगातील विद्यापंडिताच्या विश्वात अढळ स्थान प्राप्त झाले आहे. असा महानायक पुन्हा होने नाही.

डॉ.बाबासाहेबाच्या बहूजन, अस्पृश्य जागृतीच्या कार्यामुळे चिडून जावून वैदिकानी, मनुवाद्यानी डॉ. बाबासाहेबाचा खुन करण्याची प्रतिज्ञा केली होती. ही योजना घेवून कुर्तकोटी शंकराचार्याकडे गेले. शंकराचार्यानी सल्ला दिला कि, आज तुम्ही एक आंबेडकर माराल परंतू त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून 10 आंबेडकर निर्माण होतील. त्याना आवरणे आपल्याला फार अवघड होईल. म्हणून त्यांनी ही प्रतिज्ञा रद्द केली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा खून करण्याचे धैर्य वैदिक मनुवाद्याना झाले नाही. वेदिकानी मनुवाद्यानी डॉ.बाबासाहेबाना कित्येक वेळा अपमानास्पद वागणूक दिली. त्याचे कार्य हाणून पाडण्याचे प्रयत्न केले. त्याना लोकसभेवर निवडून न देण्याचा त्यानी आटोकाट प्रयत्न केला. परंतु बंगालच्या नामशुद्र (नमोशुद्राय) यानी बाबासाहेबाना लोकसभेवर निवडून दिले. त्यामुळे त्यानी राज्यघटना तयार केली. डॉ.बाबासाहेबाना लोकसभेवर

निवडून दिल्याचा राग धरुन त्यानी नामशुद्राचा भाग/प्रदेश पूर्व पाकीस्तानला वाटून दिला आमि त्या नामशुद्रावर आतोनात अन्याय केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, मी इथपर्यंत समतेचा, शांतीचा, उन्नतीचा, प्रबोधनाचा हा काफीला इथपर्यंत आनला आहे तो तुम्हाला पुढे नेता न आल्यास त्याला आहे तिथेच राहू द्या.

**सारांश :**

**डॉ.बाबासाहेब** आंबेडकरानी आम्हाला मानवता, प्रगती, स्वाभीमान, मान-सन्मानाचे जीवन जगण्यास शिकवले हे सत्य कोणीही नाकारु शकत नाही.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाजशास्त्रज्ञ

प्रा. आनेराव एम. एम.

समाजशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड, ता. लोहा जि.नांदेड

आधुनिक भारताच्या उभारणीत व वाटचालीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका व योगदान अतिशय महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण आहे. विसाव्या शतकातील स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील इतिहासाचे आकलन व विवेचन डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा आणि चळवळीचा संदर्भ व परामर्श घेतल्याखेरीज पूर्ण होणार नाही. डॉ. आंबेडकर हे मूलतः एका क्रांतीप्रवाहाचे नेते होते. ते केवळ सामाजिक, राजकीय शास्त्रज्ञ नव्हते. त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक सिद्धांताची मूलतः स्वतंत्र अशी मांडणी केली नाही. परंतू क्रांतीच्या यशस्वीतेसाठी अशा सिद्धांतावर चिंतन केले, मंथन केले व भाष्यही केले. कृतीप्रणव क्रांती संदर्भातील त्यांच्या सैद्धांतिक चिंतन-मंथनाचे दर्शन त्यांनी केलेल्या अगणित भाषणात, विपुल लेखनात आपणाला घडते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले त्या काळात देशातील समाजात अस्पृश्यता, जातीयता, विषमता व अंधश्रद्धा यासारख्या अनिष्ठ प्रथा प्रचलित होत्या. समाजात ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व होते. समाजात असलेल्या अनेक जातीपैकी काही जाती अस्पृश्य म्हणून गणलेल्या होत्या. त्यांच्या स्पर्शामुळे उच्चवर्णीय लोकांना विटाळ होतो अशी पक्की समजूत रुढ असल्याने उच्चवर्गीय लोक अस्पृश्यतेच्या नावाखाली दलितांना अत्यंत अपमानास्पद वागणूक देत आसत. डॉ. आंबेडकराच्या मते जातीयता ही राष्ट्रनिर्मीतीच्या आड येणारा सर्वात मोठा अडथळा आहे. कारण जातीयतेमुळे भारतीय सहजीवनाला तडे पडत असून भारताची प्रगती व स्थैर्य धोक्यात आले आहे. प्रत्येकजण आपल्या जातीचेच हित पाहण्यात गुंतलेला आहे. अशा या हजारो वर्षापासून सामाजिक विषमतेच्या खोल डोहात भारतीय समाजाला समतेच्या प्रकाशाची वाट दाखवून नवभारताच्या निर्मितीसाठी डॉ. बाबासाहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख एक मोठे विचारवंत, विद्वान, उच्च विद्याविभुषित, कायदेपंडीत, भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार, अस्पृश्यांची सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी व त्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी जीवनभर संघर्ष करणारे नेते अशीच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजशास्त्रज्ञ होते ही गोष्ट भारतातील सर्वसामान्य लोकांना माहित नव्हती. ते भारतीय समाजव्यवस्थेचे गाढे अभ्यासक होते. त्यांच्या अध्ययनाला शास्त्रीय आधार होता. वैज्ञानिक बैठक होती. त्यामूळेच त्यांचे समाजशास्त्रीय योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडक एक समाजशास्त्रज्ञ म्हणून आढावा घेताना त्यांनी भारतीय समाजाचा दोन दृष्टीकोनातून अभ्यास केला. त्यामध्ये पहिला दृष्टिकोन 'दलितवादी दृष्टिकोन' होय. भारतीय समाजातील दलित समाजाचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यावर त्यांनी भर दिला आणि त्याच्या समाजशास्त्रीय अध्ययनाचा दुसरा दृष्टिकोन 'सामाजिक मानवतावादी दृष्टिकोन होता. यामध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व आणि सामाजिक न्याय यावर त्यांनी भर दिला भारतीय समाजाच्या जडण-घडणीसाठी भारतीय समाजशास्त्राच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'समाजशास्त्रज्ञ' रुपाने भारतीय समाजातील ज्या ज्या घटकांचा अभ्यास केला त्याचा परामर्श खालील मुद्यांच्या आधारे घेता येईल.

**जातीविषयक अध्ययन:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय जातीव्यवस्थेचे अत्यंत सूक्ष्मपणे शास्त्रीय अध्ययन केले. त्यांच्या विचारामध्ये वस्तूनिष्ठता, तर्कसंगतता, संशोधनात्मकता आढळते. पूर्वीच्या विचारवंताच्या सिद्धांताचे खंडण करणे, विषयांची स्वतंत्र व्याख्या करणे आणि स्वतंत्र सिद्धांत मांडणे हे त्याच्या संशोधनाची पद्धती होती. भारतीय जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेबद्दल डॉ. आंबेडकरांनी 'भारतातील जाती, तिथे पडण, उत्पत्ती आणि विकास' हा

शोधनिबंध अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील कॉलंबिया विद्यापीठात सादर केला व इतर ग्रंथ वृत्तपत्रे, अनेक व्याख्यानातून त्यांचे जातीविषयक विचार स्पष्ट होतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, भेद-भावनेचे व्यावहारिक पातळीवरील करुण वास्तव म्हणजे जातीव्यवस्था, जातीव्यवस्थेचा पायाच विषमता आहे. एकूण मानवी समाजाच्या कल्याणास विषमता बाधक आहे. जातीभेदाच्या तटबंदीमूळेच समाज सुधारण्याचे काम अशक्य बनलेले आहे. भारतीय जातीव्यवत्या रुढी, परंपरांनी बंदीस्त केलेली आहे. प्रत्येक जात आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करते व इतर जातीच्या कल्याणाकडे दुर्लक्ष करते. काही वेळा इतर जातीच्या हितसंबंधावर आक्रमणही करते. परिणामी समाजात संघर्षही उद्भवतो. डॉ. बाबासाहेब यापूढे असे म्हणतात की, जातीव्यवस्था ही गुलामी पोसणारी रचना आहे. हिंदू समाजामध्ये फक्त दलितांची गुलामगिरीच या व्यवस्थेने निर्माण केली नाही तर सर्वांचीच मने गुलाम करून टाकली आहेत. हिंदू धर्माची वाढ जातीव्यवस्थेमुळे खुंटली आहे. जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता इतर कोणत्याही धर्मात मान्यता नसताना केवळ हिंदू धर्मात धार्मिक मान्यता दिल्यामुळे हिंदू समाज रसातळाला गेला आहे. जातीव्यवस्थेतील गुलामगिरीने अस्पृश्यांच्या व स्पृश्यांच्या सुद्धा शेकडो जाती निर्माण झाल्या त्यामुळे माणसामाणसातील एकात्मतेची भावना व नवसमाज निर्मीतीची उर्मी नष्ट करणारी ही जातीव्यवस्था नष्ट होणे गरजेचे आहे यावर डॉ. बाबासाहेबांनी भर दिला. डॉ. बाबासाहेब केवळ जातीव्यवस्थेचे विश्लेषणकरुन यांबले नाहीत तर जात नसलेली समाजव्यवस्था कशी निर्माण होईल याबाबत ते म्हणतात, अशी समाजरचना, समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या तत्वनिष्ठतेवर आधारलेली असेल. समाजाच्या एका टोकास घडून येणारे परिवर्तन दुसऱ्या टोकापर्यंत पोहचण्यास या समाजात वाव राहील. वेगवेगळया गटांच्या सुख दुःखात प्रत्येक गट सहभागी होतील.

**अस्पृश्यासंबंधी अध्ययन:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या प्रश्नावर अत्यंत महत्त्वपूर्ण शूद्र पूर्वी कोण होते ? व 'अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले?' या ग्रंथात अस्पृश्यतेच्या प्रश्नावर आपले परखड मत मांडले. सदर ग्रंथामध्ये अस्पृश्य व अस्पृश्यता यांची उत्पत्ती कशी झाली याबद्दलचे भारतीय व परकिय पंडित यांनी मांडलेले सिद्धांत कसे चुकीचे आहेत याचे विश्लेषण केले आणि नंतर आपली भूमिका मांडत असताना प्रथम त्यांनी हिंदू संस्कृतीचा लहरीपणा दाखवून दिला आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, अस्पृश्यतेचा प्रश्न हा धर्म तत्याच्या मान्यतेचा प्रश्न आहे. हिंदू धर्मशास्त्राच्या संस्कारातून ही शोषणाची कुरूप परंपरा केवळ स्पृश्यांच्या लहारी स्वभावामुळे पोसली गेली आहे. स्पृश्याचे हितसंबंध सुरक्षित ठेवणारे कारस्थान म्हणजे अस्पृश्यता होय. हा कलंक धुवून काढण्याची जबाबदारी अस्पृश्यांनीच स्विकारली पाहीजे त्यासाठी आत्मबलिदानाची तयारी ठेवावी लागेल असे आव्हान डॉ. बाबासाहेब अस्पृश्यांना करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे असेही म्हणतात की. अस्पृश्यतेला शास्त्राचा आधार नाही. अस्पृश्यता केवळ मानवाने स्वार्थासाठी निर्माण केली आहे. उच्चनीच भेदभावनेचा ती परिणक असल्याने ती अशास्त्रीय निवारणाची चळवळ न्याय आहे. मुठभर लोकांच्या स्वार्थाला जोणासणाऱ्या अन्यायी अशा अस्पृश्य प्रथेविरुद्ध बाबासाहेबांनी आयुष्यभर आपल्या कृतीतून आणि लेखनीतून लढा दिला. समाजातील अस्पृश्यता कशी कमी होईल यासंबंधी उपायही सुचविले. त्यातील सर्वात प्रभावी उपाय म्हणजे आंतरजातीय विवाह होय. स्पृश्य आणि अस्पृश्य जातीत विवाह संबंध घडून आल्यास अस्पृश्यप्रथेचे निर्मूलन होईल असे डॉ. बाबासाहेबाचे मत होते.

**शिक्षणासंबंधी विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, व्यक्तीच्या जीवनाचा मूळ पाया म्हणजे शिक्षण होय. त्यांनी 'बहिष्कृत भारत', 'जनता' या पाक्षिकात व निरनिराळया व्याख्यानातून आपले शिक्षण विषयक विचार मांडले. डॉ. बाबासाहेबांच्या मतानुसार शिक्षणाचा उद्देश वस्तूपूर्ण माहिती पुरविणे आणि काही सिद्धांत मांडणे हा नसावा. त्याच्या मतानुसार शिक्षणाचा मूळ हेतू सामाजिक दर्जा उंचावणे हा होय. शिक्षणाचा महत्त्वाचा सामाजिक उद्देश म्हणजे संधीची समानता प्रस्थापित करणे हा होय. मनात निर्माण झालेल्या कोणत्याही विषयाची जिज्ञासा निर्माण करून त्याद्वारे सखोल अभ्यासाच्या प्रवृत्तीचा विकास करणे. एखाद्याने व्यक्त केलेले मत आणि वस्तुस्थिती यामधील

अंतर जाणून घेणे. प्रत्येक समस्येचे निदान व गुण अवगुणांचे विश्लेषण करण्याची क्षमता निर्माण होण हे शिक्षणाचे उद्देश होत. डॉ. आंबेडकरांच्या मते, शिक्षण सर्वांना उपलब्ध होणे आवश्यक आहे. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार हा राष्ट्रीय प्रगतीचा पाया आहे. प्राथमिक शिक्षणाची शक्ती केल्याशिवाय लोकांच्या उन्नतीचे स्वप्न कधीही साकार होणार नाही. म्हणून त्यांनी शिक्षणांच्या सार्वत्रिकरणावर भर दिला. त्यांनी भारतातील शैक्षणिक समस्येचा अभ्यास करताना शिक्षण, शिक्षणसंस्था, शिक्षण पद्धती, शासनाचे शिक्षणाबाबतची कर्तव्ये याबाबींवर प्रकाश टाकला.

**धर्मविषयक अध्ययन:**

डॉ. बाबासाहेबांनी आपले धर्मविषयक विचार अनेक सार्वजनिक व्याख्याने, मुक्ती कौण पथे ही पुस्तिका, १९५७ साली प्रकाशित झालेले 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथामध्ये त्यांनी धर्म, अधर्म, धम्म आणि सद्धम्म विषयक शास्त्रशुद्ध दृष्टिकोनातूनच धर्माची चिकित्सा केली. शेकडो वर्ष धर्माच्या नावाने दडपलेल्या तळागाळातील लोकांमध्ये स्वतःच्या हक्कांची जाणीव निर्माण करून ते मिळविण्यासाठी संघर्ष करण्यास त्यांनी प्रवृत्त केले. हिंदू धर्मातील विचार आणि आचार यामध्ये फार तफावत आहे. हिंदू धर्मने काही मानवाला पशुप्रमाणे वागवले त्यामुळे हा धर्म धर्मच होवू शकत नाही. धर्मासाठी व्यक्ती नसून धर्मच व्यक्तीसाठी आहे ही बाब हिंदू धर्मामध्ये जाणवत नाही. उच्चनिचतेमूळे हिंदू धर्माचा अपात झालेला आहे. हिंदू धर्मातील सुधारणेच्या संदर्भात त्यांच्या लक्षात आले की, हिंदू धर्मातील परंपरा, श्रद्धा, रुढी, बदलणे शक्य होणार नाही, त्यापेक्षा धर्मात्तर करुनच दलितांचे माणुसकीचे हक्क मिळवता येतील. या भावनेतूनच आपल्या हजारो अनुयायासह १९५६ मध्ये बौद्ध धर्माचा स्विकार केला. अर्थातच डॉ. बाबासाहेबांनी धर्म सुधारणात्मक दृष्टीकोनातून हिंदू धर्माचे अध्ययन व संशोधन केले.

**स्त्रीविषयक विचार :**

डॉ. बाबासाहेबांनी स्त्रियांना न्याय मिळावा म्हणून हिंदू कोड बिलाचा आग्रह धरला. ज्या चळमळतेने त्यांनी दलितांचा प्रश्न हाताळला त्याच तळमळतेने त्यांनी स्त्रीयांच्या प्रश्नांकडे पाहिले. त्यांच्यामते, दलित चळवळ आणि स्त्रीयांची चळवळ या दोन्ही निरनिराळया अवस्थेत असल्या तरी त्यांची बीजे उदारमतवादी विचार पंरपरेतच आहेत. स्त्रीयांच्या सामाजिक दर्जात सुधारणा व्हाव्यात यासाठी स्त्रीशिक्षणांचा मार्ग सांगितला.

**राष्ट्रवादासंबंधी विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रवादाविषयी स्वतंत्र असा ग्रंथ लिहिला नाही. तथापि त्यांनी केलेल्या विविध लिखानामधून त्यांचे राष्ट्रवादासंबंधी विचार स्पष्ट होतात. डॉ. बाबासाहेबांच्या मते, बंधुभावाच्या प्रखर भावनेने एकमेकांशी जोडलेला समुदाय म्हणजे राष्ट्र होय. जेव्हा आपण एक आहोत आणि एकत्वाच्या भावनेने बांधलेले राहू अशी प्रभावी प्रेरणा लोकांच्या मनात असते तेव्हा त्या समाजाचे राष्ट्र बनत असते. एकात्मतेच्या भावनेतूनच राष्ट्राची उत्पत्ती होत असते. ऐक्याची भावना सर्व मतभेदावर मात करते. त्याच्या मते, राष्ट्रवाद ही उदात व उच्च अशी नैतिक शक्ती आहे. राष्ट्रवाद निर्माण होण्यासाठी समान ध्येय, समान इतिहास, समान परंपरा, समान हितसंबंधसुद्धा असावे लागतात. लोकशाही राष्ट्रवादाचा आत्मा आहे. बुद्धीप्रामाण्यवाद आणि पुरोगामीपणा ही आंबेडकराच्या राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये होत.

**कामगार विषयक भूमिका :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मजुरमंत्री होण्यापूर्वी आणि मजूरमंत्री असताना कामगारांच्या ज्या चळवळी राबवल्या आहेत. या चळवळीचा स्वतंत्रपणे अभ्यास केला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कामगारांचे क्रियाशील पुढारी होते हे लक्षात येईल. बाबासाहेबांनी भारतीय कामगारांच्या हक्कासाठी आयुष्यभर लढा दिला. म्हणूनच त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला होता. स्वतंत्र मजूर पक्षाचे धोरण अत्यंत व्यापक स्वरुपाचे होते. आर्थिक धोरणात स्वतंत्र मजूर पक्षाने शेतकरी व कामगार यांच्या कल्याणाचा विचार केला होता. दलित, शेतमजूर असंघटित कामगार याविषयी पक्षाने निश्चित आणि खंबीर भूमिका घेतली होती. कामगारांना संपापासून वंचित करण्यासाठी इ.स. १९३८ मध्ये मुंबई विधीमंडळात मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी औद्योगिक कलहाविषयीचे विधेयक मांडले. या विधेयकावर डॉ. आंबेडकरांनी घणाघाती हल्ला चढवला. आपल्या न्याय मागण्या मान्य करण्यासाठी कामगारांना संप पुकारण्याचा पूर्ण अधिकार आहे. एखाद्याला त्यांच्या मनाविरुद्ध

नौकरी करावयास लावणे म्हणजे त्याला गुलाम बनवणे होय आणि है नितीतत्वाच्या विरुद्ध आहे. हे विधेयक प्रतिगामी, वाईट, पाशवी असून लोकशाहीची थट्टा करणारे आहे अशी टीका करून डॉ. आंबेडकरांनी कामगाराच्या न्याय हक्काला वाचा फोडण्याचे काम केले. म्हणूनच त्यांना भारतीय कामगार 'मसिहा' समजतात.

**शेतकरी व शेतमजूर विषयक भूमिका**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ कारखान्यात काम करणाऱ्या कामगारासाठीच लढा देत होते असे नव्हे, तर शेतकरी आणि शेतीवर काम करणारे शेतमजूर यांच्या न्याय हक्कासाठीही त्यांनी आवाज उठवला. यावेळी कोकणात अस्तित्वात असलेल्या 'खोत' पद्धतीला सर्वात प्रथम डॉ. बाबासाहेबांनी विरोध दर्शविला. खोत पद्धतीमुळे शेतकऱ्यावर करांचा बोजा वाढला. खोताकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होत होती म्हणून डॉ. बाबासाहेबांनी खोतविरुद्ध लढा दिला. खोतीपद्धती ही गुलामगिरी आहे. खोतामुळे शेतकरीवर्ग खोताचा ताबेदार झाला आहे. नैतिकदृष्ट्या खोतपद्धत घात आहे ती नाहीशी करावी अशी सरकारला आग्रहाची सुचना केली. या मागणीसाठी डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली १० जानेवारी १९३८ रोजी मुंबईत २० हजार शेतकऱ्यांचा मोर्चा विधानमंडळावर काढण्यात आला.

**निष्कर्ष :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृतीशील समाजसुधारक आणि सामाजिक विचारवंत होते. भारतीय समाजव्यवस्थेतील दोषाचे निमूर्लन करण्यासाठी आयुष्य खर्ची घातले. भारतातील जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता ही त्यांच्या आंदोलनाची प्रेरणा होती. विषमतेविरुद्ध संघर्ष हा त्यांच्या सामाजिक आंदोलनाचा मुख्य हेतू होता. सामाजिक न्याय हे त्यांच्या चळवळीचे उद्दीष्ट होते. दलित, अस्पृश्य जातीच्या कल्याणासाठी त्यांनी सामाजिक आणि राजकीय चळवळी उभारल्या. दलितांच्या राजकीय हक्कांसाठी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. तांत्रिक शिक्षणाचा प्रसार उद्योगधंदे काढणे, कामगारांना योग्य बैतन, शेतकऱ्यांचे जमीनदारांकडून होणारे शोषण, स्त्रीयांच्या कल्याणाबाबतची भूमिका इ. कार्यक्रम राबवण्यात आले. मजूरांच्या मेळाव्याला, शेतकऱ्यांच्या परिषदेला आणि दलितांच्या समेला ते उपस्थित राहून संघर्षाचे आव्हान करीत असत. यातून त्यांची समाजातील गरीब व असाध्य लोकांबद्दलची भावना व तळमळ लक्षात येते.

डॉ. बाबासाहेबांनी भारतीय समाजरचनेतील अनेक घटकांचा सूक्ष्मपणे अभ्यास करून आपले मत मांडले. भारतीय समाजाचा दलितवादी दृष्टीकोणातून आणि मानवतावादी दृष्टीकोणातून अभ्यास केला. डॉ. बाबासाहेबांचे समाजशास्त्रीय योगदान निर्विवाद असून ते एक थोर समाजशास्त्रज्ञ होते. भारतीय समाजाच्या सुदृढतेसाठी, भविष्याच्या उज्वलतेसाठी नवसमाज निर्मितीसाठी आंबेडकरांच्या विचारांशिवाय पयार्य नाही हे निर्विवाद सत्य आहे याविषयी दुमत नाही.

**संदर्भ सूची:**


१. बाबासाहेब आंबेडकर (अनु. चांगदेव म. खैरमोडे), 'शुद्ध पूर्वी कोण होते ?' मलयप्रकाशनग वर्धा २००९.
२. य. दि. फडके, आंबेडकरी चळवळ' श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २००७.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य आणि अस्पृश्यता' रघुवंशी प्रकाशन, पुणे.
४. बाबासाहेब आंबेडकर. 'अस्पृश्य मूळचे कोण आणि वे अस्पृश्य कसे बनले?", सुधीर प्रकाशन, वर्धा, २०१०.
५. बाबासाहेब आंबेडकर (अनु. घन:शाम तळवरकर) 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म सद्धम्मदित्य प्रकाशन, केळझर, वर्धा, २००६, ६. म. द. देशपांडे, डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, २००९.
७. अनिल कठारे, फुले-शाहू-आंबेडकर' पूनम प्रकाशन, कंधार, २०१०. ८. बाबासाहेब आंबेडकर (संपा. सुर्यकान्त भगत), 'जातिभेद निर्मूलन', सुधीर प्रकाशन, वर्धा, २००५.
९. बाबासाहेब आंबेडकर, क्रांती आणि प्रतिक्रांती', सुधीर प्रकाशन, वर्धा, २०१०.
१०. अनिल कठारे, महादेवा वाघमारे, गौतम पाटील, 'महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००९.
११. संपा. मीनाक्षी मून, 'फूले आंबेडकरी स्त्री चळवळ' समता प्रकाशन, नागपूर, २००२.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे महिलासाठीचे योगदान

**Dr Manisha Ramrao Bodke**
Assistant Professor
Department Of Political Science, Shri Sai Baba Sansthan Trust, Shridi, Tq Rahata Dist Ahmadnager.

"मै किसी समुदाय की प्रगती
महिलाओं ने जो प्रगती
हासिल की है
उसमे मानता हू." - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झालेली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजीत असतो म्हणूनच हा समुदाय पाहिल्यावर मला खात्री वाटते व आनंद होतो की ,आम्ही प्रगती केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 20 जुलै 1942 रोजी नागपूर येथे भरलेल्या ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस विमेंस कॉन्फरन्स मध्ये महिलांना उद्देशून केलेल्या भाषणातील या ओळी वाचल्या व ऐकल्या की या महामानवाच्या स्त्रियांच्या सर्वांगीण प्रगती विषयीचा व्यापक दृष्टिकोनाचा परिचय देतात .डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांचे शिक्षण, त्यांचे हक्क याबाबत आपल्या लेखणी व कार्यातून जगाला दाखवून दिले पण या सर्वांमध्ये प्रकर्षाने एक बाजू कायम दुर्लक्षित असल्यासारखे वाटते ती म्हणजे डॉ. आंबेडकरांनी भारतीय स्त्रीला मिळवून दिलेले कायदेशीर अधिकार.

ज्याने कधीही सूर्य पाहिलाच नाही अशा व्यक्तींना अंधाराची भीतीही वाटत नाही आणि अंधारात राहिल्याची खंतही जाणवत नाही. भारतीय स्त्रियांच्या नशिबी अशा अंधाराचं जाळं पसरलेलं असताना क्रांतीसूर्य महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीला घराबाहेर काढले. तिला शिक्षण दिले तसेच ती स्वावलंबी बनावी तिच्या स्वकर्तुत्वाने ती स्वतःच्या पायावर उभी राहून आत्मनिर्भर बनावी यासाठी प्रयत्न केले डॉ. बाबसाहेब आंबेडकर तुमच्या पावलावर पाऊल टाकून स्त्रीला स्त्री हक्काची व स्व अस्तित्वाचाची जाणीव होण्यासाठी डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी तिला तिचे कायदेशीर हक्क मिळवून दिले. स्त्रीयांचे हक्क जे एक माणूस म्हणून त्यांना दिले त्याची पायमल्ली होऊ नये . पितृसत्ताक समाजाकडून पुन्हा दडपशाही होऊ नये म्हणून त्यांना कायद्याच्या कक्षेत आणून त्यांची पायमल्ली करणाऱ्यांना कठोर शिक्षेची तरतूद करणे हे स्त्री-स्वातंत्र्य बाबतचे सगळयात महत्त्वाचे पाऊल होते आणि ते शिवधनुष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पेलले.

तात्कालीन भारतीय समाजात स्त्रीला धर्म संस्कृती आणि जाती संस्थांच्या रूढी परंपरेच्या विळख्यात अडकून ठेवले होते कुटुंबवत्सल या स्त्रीला पुरुषी मक्तेदारीने तिच्यावर वरचढपणा दाखवला होता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लेखणीतून या पुरुषी मक्तेदारीतून स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व मिळवून दिले. भारतीय प्राचीन संस्कृतीत स्त्रीला दुय्यम स्थान देऊन एका विशिष्ट परिघातच तिचे क्षेत्र मर्यादित केले, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिप्राचीन वैदिक युगातील स्त्री जीवनाचा आदर्श डोळयासमोर ठेवून स्त्रीशिक्षण, स्त्री हक्काची कास धरली.

1927 आली मुंबई विधानपरिषदेवर निवडून आल्यावर 1928 साली भारतातील महिला कामगारांसाठी मॅटर्निटी बेनिफिट बिल पहिल्यांदा सभेसमोर चर्चेसाठी आणणारे आणि स्त्रियांना बाळंतपणासाठी हक्काची वैद्यकीय रजा मिळाली पाहिजे म्हणून आग्रही असणारे हे पहिले सदस्य. त्यांच्या प्रयत्नांमुळे मॅटर्निटी बेनेफिट क्ट अस्तित्वात आला .भारतीय समाजातील स्त्रीयावर बालविवाह ,जठर विवाह ,केशवपन, परितक्त्या, सतीप्रथा, देवदासी प्रथा इत्यादी आणि कुप्रथा द्वारे स्त्रियावर अन्याय झालेला होता. स्त्रियांवरील हा अन्याय कमी झाला पाहिजे आणि यावर कायद्याद्वारे नियंत्रण प्रस्थापित झाले पाहिजे असा आग्रह धरणारे थोर भारतीय समाजसुधारक म्हणूनही त्यांचाच गौरव करावा लागेल.

1942 ते 1946 मध्ये कामगार मंत्री म्हणून काम करत असताना equal pay for equal work irrespective of sex ही क्रांतिकारी कल्पना राबवण्याचे श्रेयसुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते. याचे प्रतिबिंब आपल्या संविधानात राज्याची मार्गदर्शक तत्वे मधील कलम 39(3) मध्ये पाहायला मिळते त्यात राज्यातील स्त्री आणि पुरुष यांनी केलेल्या कामाला समान मोबदला दिला जाईल असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

भारतीय स्त्रियांना राजकीय स्वातंत्र्य व हक्क मिळावेत यासाठी भारतीय संविधानातील कलम 326 नुसार वयाची 18 वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला जो मतदानाचा हक्क स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या निवडणुकीत मिळाला याचेही श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच द्यावे लागेल. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय स्त्रीला मतदानाचा अधिकार नव्हता. मॉंटेग्यू चेम्सफर्ड कायद्यात मतदानाच्या अधिकाराची शिफारस करण्यात आली होती पण ती बिनशर्थ नव्हती. 1935 च्या government act नुसार सर्वच स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला नव्हता, पण कुठलीही शर्त न ठेवता भारतीय स्त्रियांना मतदानाचा अधिकार संविधानाने 1950 पासूनच दिलेला आहे. आज भारताच्या राजकीय व्यवस्थेत अंतर्गत पंचायत राज व्यवस्था, घटक राज्याचे विधिमंडळ, भारतीय संसद यामध्ये महिलांचे वाढते प्रतिनिधित्व हे डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचार आणि कार्याचे फलित म्हणावे लागेल

भारतीय स्त्री जी पिढ्यानपिढ्या शिक्षण आर्थिक स्वावलंबन, संपत्तीवर समान मालकी हक्क, विकास व निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य यापासून वंचित राहिली होती. भारतीय पुरुष प्रधान व्यवस्थेचे जोखंड फेकून देऊन तिला कायदेशीर रित्या समाजात अग्रेसर राहून सन्मानाने जगता यावे यासाठी डॉ. आंबेडकरांचे अतुलनीय योगदान दिले ते हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून. हिंदू कोड बिल हा देशातील कायदेमंडळात द्वारे घेतलेला सर्वात मोठा सामाजिक सुधारणेचा निर्णय होता ज्याद्वारे दिली विषमता आणि स्त्री-पुरुष विषमता नष्ट होणार होती.

"हिंदू कोड बिल हा देशातील विधान मंडळात द्वारे घेतलेला सर्वात मोठा सामाजिक सुधारणेचा निर्णय आहे. असा कायदा जो आधीही कधी झाला नाही आणि नजीकच्या भविष्यकाळात देखील कुठल्याही कायद्याची याची तुलना शक्य नाही. वर्गावर्गात असलेली विषमता आणि वर्गाअंतर्गत सुद्धा स्त्री-पुरुष असणारा लिंगभेद हाच हिंदू समाजाचा आत्मा राहिलेला आहे. हा भेद विषमता मिटवल्या शिवाय की नाही सुधारणेबाबत कायदे करणे म्हणजे शेणाच्या ढिगाऱ्यावर भारतीय संविधानाचा अवाढव्य महाल बांधण्याचा खोटा दिखावा करण्याइतका दांभिक प्रकार आहे."

- डॉ.बाबासाहेब आंबेडकर

या हिंदू कोड बिलाला द्वारे त्यांना पहिल्यांदा एक माणूस म्हणून जगण्याचा समान अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या कायद्याद्वारे देवू पहात होते . तसेच याद्वारे विधवा मुलीला संपत्तीचा अधिकार, भारतीय पुरुषाच्या एकापेक्षा अनेक विवाहावर बसलेला चाप, घटस्फोटित स्त्रिया साठी केलेली पोटगीची तरतूद, स्त्री यांच्या मृत्यूनंतर तिच्या संपत्तीचे कायद्याच्या कक्षेत आणले गेलेले वाटप अशा अनेक घटना संदर्भात महत्त्वपूर्ण तरतुदी होत्या पण तात्कालीन कॉंग्रेस सरकार मधील मातब्बर नेत्यांनी या हिंदू कोड बिलाला विरोध केला 1947 पासून सतत 4 वर्षे 1 महिना 26 दिवसात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बिल तयार केले आणि 24 फेब्रुवारी 1949 रोजी संसदेत मांडले. पण अनेक बाजूने होणाऱ्या विरोधामुळे 1951साली आलेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडावर जवाहरलाल नेहरू यांनी या हिंदू कोड बिलातील केवळ चार विषय मंजूर करून हे बिल फेटाळून लावले. यानंतर 27 सप्टेंबर 1951 रोजी डॉक्टर आंबेडकरांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा नेहरूकडे पाठवला.

“हिंदू कोड बिलाचा खून झाल्यामुळे मी राजीनामा देत आहे” असे त्यांनी नेहरूंना ठणकावून सांगितले. स्त्रियांना जे कायदे मंडळ अधिकार देत नाही त्या कायदे मंडळातील पद लाथाडून स्वतःच्या तत्त्वासाठी पदाचा

राजीनामा देण्याचा तत्वनिष्ठपणा दाखवणाऱ्या दुर्मिळ लोकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश करावा लागेल.भारतीय स्त्रीला कायदेशीरदृष्ट्या साक्षर आणि सक्षम बनवणारे बाबा म्हणून खरं तर आज प्रत्येक भारतीय स्त्रियासाठी ते पितृतुल्य आहेत श्री म्हणून आम्हा सर्व स्त्रियांना आमच्या हक्काची जाणीव करून देऊन स्त्री अस्तित्वाचा एक स्वतंत्र व्यक्तिमत्व बनवणाऱ्या व आमच्या हक्कांना कायदेशीर संरक्षण देणाऱ्या या महामानवास आमचा शतशः प्रणाम.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीला समाजाचा एक महत्वपूर्ण घटक मानला. त्यासाठी त्यांनी सामाजिक चळवळीत महिला सहभागाचा विचार मांडला भाषण व लेखणी चा वापर महिला विकासासाठी व जागृतीसाठी केला, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणाला महत्त्व दिले. त्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. स्त्री स्वातंत्र्य व स्त्री- पुरुष समता याद्वारे समाजातील सामाजिक विषमता व अन्याय दूर करता येईल स्त्री शिक्षणाने कुटुंबाचा विकास होईल पण पर्यायाने समाज व राष्ट्राचा ही विकास होईल असा दूरदृष्टीकोन डॉ. आंबेडकरांचा होता.

पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीत स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान होते स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू आहे अशी पारंपारिक प्रतिगामी विचार असणाऱ्या समाजाची मानसिकता होती. स्त्रियांना शिक्षण, सत्ता, संपत्ती चे सर्व अधिकार नाकारण्यात आले होते धार्मिक कर्मकांडांचा तसेच धर्मग्रंथाचा आधार घेऊन स्त्रियावर अधिकाधिक बंधने लादली गेली. सती प्रथा, हुंडा प्रथा, बालविवाह, केशवपन, देवदाशी यासारख्या अनेक अन्यायकारक चालीरीती व रुंढी प्रंथाने लाखो स्त्रियांचे आयुष्य उध्वस्त केले होते. ही प्रथा ब्रिटिश आगमनानंतर तशीच चालू होती. हे क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षण व स्त्री - पुरुष समानता या तत्त्वाचा पुरस्कार केला यालाच पुढे संविधानिक आधिष्ठान देण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना बनवताना आणि त्यानंतर हिंदू कोड बिल च्या माध्यमातून केला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक राजकीय आर्थिक धार्मिक क्षेत्रातील विचार व योगदान अनन्यसाधारण आहे त्यांच्या विचाराचा आधारच स्वातंत्र्य समता बंधुता व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा होता त्यांचा कोणत्याही जाती, धर्म, संप्रदायाला विरोध नसून विषमता व अन्यायाला विरोध होता

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्री उन्नती व अस्तित्वासाठी जे अनमोल असे योगदान दिले त्याचा थोडक्यात आशय पुढीलप्रमाणे-

स्त्री-पुरुष समतेचे महान पुरस्कर्ते

स्त्री शिक्षणाचा आग्रही प्रतिपादक

भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीला विरोध करून स्त्रीला धार्मिक कर्मकांड कुप्रंथाच्या जोखंडातून मुक्त करण्याचा कायदेशीर सर्वप्रथम प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला.

भारतीय महिलांचा राजकीय सहभाग व राजकीय व्यवस्थेतील प्रतिनिधित्व वाढावे यासाठी आग्रह धरणारे अग्रगण्य राजकीय विचारवंत होते

स्त्री स्वावलंबी व आत्मनिर्भर व्हावी यासाठी शिक्षण, व्यवसाय, व उदरनिर्वाहाचे साधन मिळवण्यासाठी रोजगाराची समान संधी व समान कामासाठी समान वेतन असे विचार मांडणारे अर्थतज्ञ होते

स्वतःच्या आरोग्याची काळजी घेता यावी तसेच स्त्रीला प्रसूती काळात तिला रजा मिळण्याची पहिली तरतूद डॉ. आंबेडकरांनी सर्वप्रथम केली होती. आज शासकीय महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती काळाजी रजा मिळते त्याचे संपूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते

स्त्रीला एक स्वतंत्र माणूस म्हणून जगता यावे ती एक स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे तिला स्वतःच्या कर्तुत्वावर स्वतःचा विकास करण्याचा अधिकार आहे हे स्वतःच्या लेखन व विचारातून प्रेरित करणारे महान समाज सुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते

छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यासारख्या कृतिशील समाजसुधारकाचा सामाजिक-धार्मिक सुधारणेच्या वारसा खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात किंवा कृतीत आणणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे महान समाज सुधारक व मानवतावादी नेते होते

एक स्त्री म्हणून आज माझ्या अस्तित्वाला व्यक्तिमत्वाला जे स्थान आहे त्याचे संपूर्ण श्रेय मी डॉ. आंबेडकर यांनाच देईल. ज्या बिकट परिस्थितीत त्यांनी स्वतःच्या लेखणी व कार्यातून दुसऱ्याला जे दिलं ते इतर कोणत्याही समाजसुधारक व राज्यकर्त्याला देता व करता आलेलं नाही आज मी डॉ. आंबेडकरांच्या विचाराला अनुभवते व इतरांनाही सांगते तेव्हा माझ्या अंतर्मनात एक वेगळीच स्फूर्ती निर्माण होते.विश्वरत्न, युगप्रवर्तक, प्रकांड कायदेतज्ञ, व्यासंगी व्यक्तिमत्व, भारतीय संविधानाचे शिल्पकार, शेतकरी. दलित, बहुजनाचे कैवारी, लोकशाहीचे पुरस्कर्ते स्वातंत्र्य समता बंधुता या माध्यमातून सामाजिक न्याय प्रस्थापित करणारे महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. त्यांच्या विचार व कार्याचा वारसा पुढे येणारे आम्ही अनुयायी याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

“मिळवून दिला आम्हास सन्मान
म्हणून करतो आम्ही आपला बहुमान”

# नवभारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. डॉ. दिलीप सावंत**

मराठी विभाग प्रमुख, श्री शिवाजी कॉलेज, कंधार जि. नांदेड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील जगातील सर्वश्रेष्ठ विद्वान, बुध्दीमान, प्रज्ञावंत, युगपुरूष आहेत. ज्ञानाच्या क्षेत्रातील, जगातील बहुसंख्य विद्वानापौकी तिसरे आहेत. त्यांच्या ज्ञानापुढे, प्रज्ञावंतासमोर नतमतस्तक होतात. ग्रंथाचं नाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अजोड आहे. वाचन हे त्यांना लागलेले नव्हे लावून घेतलेले व्यसन होते. त्यांनी पुस्तकांवर प्रचंड प्रेम केले. ग्रंथ आणि बाबासाहेब आंबेडकर वेगळे करता येत नाही. ग्रंथासाठी स्वतंत्र राजगृह बांधणारे जगात एकमेव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत.

पुस्तक हे बाबासाहेबांचे मस्तक होते.<br>
ते संपूर्ण मस्तक कुणाचे हस्तक नव्हते<br>
म्हणून त्यांच्या समोर ----<br>
जग सारे नतमस्तक होते ( बा.ह. कल्याणकर )

प्राचनी ज्ञारताच्या जडणघडण्चे शिपल्कार तथागत गौतम बुध्द आणि आधुनिक भारताच्या जडणघडणीचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत. बाबासाहेबांनी भारताचे वौचारिक दारिद्र घालविले. लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथ प्रचंड प्रमाणात वाचताहेत. त्यांच्या ग्रंथाला प्रचंड मागणी आहे, आता लोकांना कळून चुकले आहे की, बुध्द, फुले - शाहू - आंबेडकर वाचलेच पाहिजेत ते वाचले तर आपण वाचू, नव्हे तर वाचल्याशिवाय वाचणारच नाहीत बाबासाहेबबांनी शिका म्हटले, लाखो लोक खेडापाडातून शिकले, शहरात आले, ज्ञानीवंत व शहाणे झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाणीवपूर्व अस्पृश्यांचा, शोषितांचा उध्दार केला. भारतीयांच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेबांचे मोल, योगदान अधिक आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रत्येक क्षेत्रातील विचाराचे एक मॉडेल आहेत. यापुढे तरी या देशातील राज्यकत्र्यांनी, प्रस्थापितांनी ते स्वीकारले पाहिजेत. किमान मानवाच्या कल्याणासाठी, सुखासाठी तरी स्वीकारण्याचा शहाणपणा दाखविला तर भारताच्या विकासाला गती मिळेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पाणी, ऊर्जा, शेतीसंबंधी मांडलेले विचार या देशातील लोकांचे दारिद्र घालवू शकते. शेतीवर अवलंबून असणा· या 70% भारतीयांच्या अन्न-पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. इथल्या गरिबांचे जगणे सुखकारक होईल. भारत देश अधिक सधन, समृध्द होईल आर्थिक महासत्ता होईल. त्यांनी इथल्या गरीब माणसाच्या समस्याचे उच्चाटन करण्यात आयुष्य घालविले. गरिबांचे आणि राष्ट्राचे आर्थिक दुबळेपण संपविणे हेच राष्ट्र कार्य सर्वश्रेष्ठ मानून प्रत्येक क्षेत्रात आपल्या विचाराचे एक मॉडेल देत राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलधोरण - व्यवस्थापन देशाला समृध्द करणारे, औद्योगिक क्षेत्रात क्रांती घडवून क्रांती घडवून आणणारे, अन्न धान्याने देश स्वयंपूर्ण करणारे होते. जलनिती धोरण राबविले असते तर भीषण पाण्याचा दुष्काळ जाणवला नसता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपरोक्त जलनियोजन, नद्याजोड प्रकल्प अभ्यासक आणि शासनह लक्षात घेत नाही. एकंदर नद्या खोरे प्रकल्प, नद्या धरणे, तलाव, निर्माण करून येथील शेतीचे, उद्योगाचे उत्पन्न वाढवून

गरिबांची परिस्थिती सुधारण्यासाठी योग्य ती पाऊले उचलून त्यांना शिक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा, निवारा देवून दारिद्रातील लोकांचे जगणे उंचावणे, सन्मानाचे करणेसाठी हे जलधोरण नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय स्त्रियांच्या हक्काचा जाहिरनामा हिंदू कोडबिल मधून मांडला. हिंदू कोडबिल स्त्रियांच्या हक्काचे, संरक्षणाचे कवच आहे. भारतीय स्त्रियांचे खरे मुक्तीदाते म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. जगातील कोणत्याही स्त्री - पुरूषांना स्वतंत्रपणे जीवन जगण्याचा अधिकार आहे. नौसर्गिक व मानव निर्मित अधिकार सर्वांना मिळाला पाहिजे. स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते, देशाची प्रगती होते, स्त्रियांना फुले दांपत्याने शिक्षण देऊन शहाणे केले आणि त्यांचा हक्काचा जाहिरनामा हिंदू कोडबिल मधून बाबासाहेबांनी मांडून संरक्षण केले. हिंदू कोडबिल लिहिले, मांडले. तेव्हा फार मोठा गदारोळ झाला. ते मान्य करून घेण्यासाठी बाबासाहेबांना फार मोठा संघर्ष करावा लागला. हिंदू कोडबिल मान्य नाही झाले तेव्हा आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री उध्दाराचे कार्य दलित स्त्रियांपुरते मर्यादित नव्हते तर सबंध भारतीय स्त्रियांच्या उध्दारासाठी होते. त्या स्त्रियांना बाळंतपणाची चार महिणे रजा, कामाचे तास आठ तासावरून सहा तास केले. वारसा हक्काने पित्याच्या संपत्तीचा समान वाटा मिळाला पाहिजे. तसेच पुरूषाच्या अनेक जाचातून, बंधनातून, शोषणातून मुक्त केले. वौद्यव्य आल्यास पतीच्या संपत्तीत तिचा हक्क आहे. पतीपासून स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे. जाती बाहेर लग्न करण्याचा सुध्दा स्त्रीला अधिकार आहे. म्हणून स्त्रियांना मानवतेचे हक्क मिळवून दिले. तसेच समाजात माणूस म्हणून मानाचे सन्मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सबंध मानव जातीचे, स्त्री - पुरूषांचे होते. ज्याचे शोषण केले गेले. त्यांना प्रत्येक क्षेत्रातील अधिकार मिळवून देणारे शेषितांचे वाली ठरले आहेत.

आज सगळया स्त्रिया सुशिक्षित, जागृत, सुसंस्कृत झाल्या. प्रत्येक क्षेत्रात पुढे दिसताहेत. 1942 च्या दलित परिषदेत बाबासाहेब म्हणतात, "एखाद्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. देशात सर्वाधिक राज्य स्त्रियांनी केले. छ. शिवरायांना माँ जिजाऊने घडविले, अनेक महापुरूष घडण्यामध्ये स्त्रियांचाच सिंहाचा वाटा आहे. स्त्रियांचे शोषण हा मानव जातीवरचा कलंक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुसून काढला. स्त्रिया आज कायद्याने सक्षम, सुरक्षित आहेत. परंतु व्यवहारात कायदे अंमलात आणण्यासाठी पुरूषाची मानसिकता निर्माण होणे गरजेचे आहे. जगातील प्रत्येक क्षेत्राच्या प्रगतीपथावर स्त्रीयाही योगदान देत आहेत, त्याची सुरूवात म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली आहे. पुरूषांच्या बरोबरीने कार्य करित आहेत. सर्वोच्च उच्च पदावर स्त्रिया कार्य करीत आहेत. याचे सर्वस्वी श्रेय म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आहे.

जातीमुळे हिंदू समाज एकसंघ राहिला नाही. दु:भंगला गेला आहे. जातीने माणसाचे माणूसपण, जगणे हिरावून घेतले. जात हा भारतीय समाजाच्या देशाच्या विकसातील मोठा अडथळा आहे. भारतात माणसाला जातीवरून अपमानीत केले जात आहे, जातीमुळे माणूस श्रेष्ठ कनिष्ठ ठरविला जातो. जातीवरून दर्जा, मान, सन्मान दिले जातात. ही जातीयता प्रत्येक क्षेत्रात आज छुप्या पध्दतीने चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत. भारतीयांची स्वतंत्र ओळख हिंदू म्हणून नव्हे तर भारतीय म्हणून झाली पाहिजे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एका जातीचे, देशाचे नव्हे तर सर्वांचे आहेत. त्यांच्या विचाराचे मॉडेल प्रत्येक क्षेत्रात देशाला, समाजाला मार्गदर्शक ठरणारे असून भारत एक बलशाली राष्ट्र, समृध्द राष्ट्र म्हणून उभे करण्याचे बाबासाहेबांचे स्वप्न होते. म्हणून बुध्द,

फुले, आंबेडकर हे भारतात जन्माला आले. हे भारतीयाचे भाग्य आहे, जगाचे वौचारिक, आध्यात्मिक, वौज्ञानिक मार्गदर्शक ठरू शकते असे भव्य तत्त्वज्ञान बुध्द फुले - आंबेडकर यांचे अंगिकारलेच पाहिजे. भारतीय राज्यघटनेनुसार वागले तर जातीविनाश होऊ शकतो. भारतीय समाजाची उभारणी समानवारी भारतीय संविधानावर आधारित नव समाज उभा करता येईल.

डॉ. बाबासाहेबांनी जातीबाहेर जावून मित्र जोडले त्यांना संकटकाळी सहकार्य केले आणि स्वत:साठी नव्हे तर समाजकार्य साध्य करण्यासाठी त्यांचा उपयोग करून घेतला. बाबासाहेबांना लोकशाहीतील लोकांचे राज्य लोकांच्या सुखासाठी चालविणारी चळवळ हवी आहे, बाबासाहेबांची चळवळ ही वौयक्तिक हितापेक्षा देशहित, समाजहित प्राधान्य देणारी आहे. भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात प्रखर तेजाने तळपणारे, आपल्या ज्ञान गंगेने अस्पृश्यां प्रमाणेच स्पृश्यांनाही पावन करणारे, भारताचे भगिरथ म्हणजे भारतीयघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत, ते खरे देशभक्त आणि थोर राष्ट्रपुरूष आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन महासागरासारखे अथांग आहे. त्यांचे जीवन कार्य, कर्तृत्व, त्यांनी आयुष्यभर दिलेले लढे, संघर्ष, घेतलेले निर्णय, केलेल्या कृतीच्या मागे या देशाच्या व समाजाच्या विकासाचा ध्यास दिसतो. महापुरूषाचे, महामानवाचे जीवन पुढील पिढांना प्रेरणादायी, स्फुर्तिदायक मार्गदर्शक ठरत असते. त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन तरूणांना प्रेरणादायी ठरले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाणीवपूर्वक अस्पृश्यांचा शोषितांचा उध्दार केला. भारतीयांच्या जडणघडणीत त्यांचे मोल, योगदान महत्त्वाचे आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही.

**संदर्भ सूची :**

1) धनंजय कीर, चरित्र साधन प्रकाशन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
2) प्रा.गौतम गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य, वेदश्री प्रकाशन,रेणापूर नाका, लातूर.
3) नवयुग निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ( संपा.), कुलगुरू प्रोफेसर बी.ए.चोपडे - 14 एप्रिल 2016.
4) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच निवडक भाषणे (संपा.), विजय सुरवाडे.
5) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्ती आणि कार्य, प्रा. सुखाराम हिवराळे.
6) दलित समाजाचे पितामह डॉ. भीमराव आंबेडकर, डॉ. सुनिल जोशी.

# युगप्रवर्तक युगपुरुष, प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. ज्ञानेश्वर गायकवाड**
मराठी विभाग, श्री शिवाजी कालेज कंधार जि.नांदेड-४३१७१४

शिक्षणानंतर बाबासाहेबांनी शतकानुशतके गुलामगिरीच्या बंधनात ठेवलेल्यांविरुद्ध प्रचंड आवाज उठविला. अस्पृश्य लोकांना त्यांनी स्वाभिमाने जीवन जगण्यास शिकविले.हजार वर्षांपासून चालत आलेली ही गुलामगिरीची पध्दत त्यांनी कायमची नष्ट केली. आज 'जीवंत लोकशाहीचे राष्ट्र' म्हणून सारे जग भारताकडे पाहते. या प्रजासत्ताक भारत देशाला बाबासाहेब आंबेडकरांनीच राज्यघटना दिली म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' आहेत असे असे स्वाभिमानाने सांगावेसे वाटते. गेल्या हजारो वर्षात ज्यांना शिक्षणाचा कसलाही गंध माहीत नव्हता त्याच अस्पृश्य समाजातून एका अस्पृश्य कुटूंबातील मुलगा प्रथम श्रेणीत मॅट्रिक व्हावा ही भारतातीलच काय? जगातील एक आश्चर्यकारक अशी घटना होय.

बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील शिक्षणासाठी मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि ते १९१२ साली बी.ए.पास झाले. १९१३ साली बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक मदतीने ते अमेरिकेला गेले. १९१५ साली ते एम.ए.झाले.त्यांनी ही पदवी 'भारतातील प्राचीन व्यापार व भारतातील जाती' या विषयावर मिळविली. १९१७ साली 'दि नॅशनल डिव्हीडंड आफ इंडिया' या विषयावर प्रबंध लिहून शिक्षण क्षेत्रातील अतिउच्च अशी पीएच.डी.ही पदवी मिळवली.याच वेळी त्यांनी बडोदा संस्थानात लेफ्टनंट म्हणून नोकरी केली.१९१८ साली त्यांची मुंबईच्या सिडनहॅम कालेजात प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. १९२१ साली M.Sc.ही अर्थशास्त्रातील पदवी मिळविली.पुढे १९२२-२३ साली त्यांनी जर्मनीत 'बान' महाविद्यालयात अर्थशास्त्राचा अभ्यास केला. त्यानंतर १९२३ साली शाहू महाराजांच्या आर्थिक मदतीने 'The Problem Of Rupee' हा शोधप्रबंध लिहून अर्थशास्त्रातील D.Sc. ही पदवी मिळवली. या प्रबंधाला त्यांचे गुरु प्रा. मिस्टर कॅनन यांनी प्रस्तावना लिहिली आहे. त्यात ते म्हणतात की," या माझ्या स्वतंत्र बुद्धीच्या व विशेष तर्कशक्ती असलेल्या शिष्यापासून मलाही काहितरी शिकण्यासारखे आहे." याहून बाबाहेबांच्या बुध्दीमत्तेचा काय गौरव करावयास पाहिजे...?

बाबासाहेबांनी १९२३ पासून मुंबई हायकोर्टात बॅरिस्टरी सुरु केली.१९२४ साली 'बहिष्कृत हितकारणी" सभेची स्थापना केली. त्यांची लोकप्रियता पाहून इंग्रज सरकारने १९२६ साली मुंबई विधीमंडळावर त्यांची नियुक्ती केली.१९२५-२७ या काळात त्यांनी मागासवर्गीयांसाठी ठाणे, पुणे, पनवेल आदी ठिकाणी वसतीगृहे सुरु केली.१९२७ साली बाबासाहेबांनी महाडचि अव्दितीय असा सत्याग्रह केला आणि दलितांना कित्येक वर्षांपासून कोंडून ठेवलेल्या 'मनुस्मतीचे' दहन केले. १९२८ साली त्यांची मुंबईच्या सरकारी ला कालेजात प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. याचवर्षी सायमन कमिशनचे सदस्य म्हणूनही त्याची नियुक्ती झाली. १९३० साली ते गोलमेज परिषदेला विलायतेला गेले.

याचवर्षी त्यांनी नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह केला.१९३१ साली गोलमेज परिषदेला हजर राहून अस्पृश्यांचे प्रश्न मांडले. बाबासाहेबांनी यावेळी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली.राष्ट्रीय ऐक्यासाठी धोका

असल्यामुळे गांधीजींनी विरोध केला म्हणून बॅ.सप्रुंच्या मद्यस्थीने 'संयुक्त मतदार संघ' मान्य करून पुणे करारावर सही केली.हा ऐतिहासिक करार १९३५साली पुणे येथे झाला.याचवेळी नाशिक जिल्ह्यातील येवला येथे भरलेल्या परिषदेत त्यांनी एक घोषणा केली. "हिंदू म्हणून जन्मलो तरी हिंदू म्हणून मुळीच मरणार नाही".

१९३७ साली त्यांची मुंबई विधीमंडळावर सदस्य म्हणून निवड झाली.दुस-या महायुद्धाच्या काळात बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला आणि निवडणुका लढविल्या.तत्कालीन मुंबई प्रांतात या पक्षाचे पाच सदस्य निवडून आले. बाबासाहेबांनी पाच जागा मिळविल्या.१९४० साली बाबासाहेबांनी 'थाट्स आॅन पाकिस्तान' हा ग्रंथ लिहिला.१९४२ साली गव्हर्नर जनरल लिनलिथगो यांनी बाबासाहेबांना केंद्रीय मंत्रिमंडळात 'मजूरमंत्री' म्हणून घेतले. या पदावर ते १९४६ पर्यंत होते.यावेळी त्यांनी बिहारमधील खाणमजुरांची पगारवाढ, दामोदर नदीवरील प्रचंड धरण, दरवर्षी अस्पृश्य कुटूंबातील तीन मुले परदेशात पाठविण्याची सोय इ.महत्त्वपूर्ण कामे केली.

१९४५ साली बाबासाहेबांनी मुंबई येथे 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत १९४६ साली सिध्दार्थ कालेज तर १९५० साली औरंगाबाद येथे मिलिंद काॅलेजची स्थापना केली.१९४७ते ४९पर्यंत त्यांनी भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली. या अद्वितीय बुद्धिमत्तेबद्दल त्यांना 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' म्हणतात. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी ही राज्यघटना प्रत्यक्ष अंमलात आणली गेली.१९४८ साली बाबासाहेबांची नेहरू मंत्रीमंडळात 'कायदेमंत्री' म्हणून निवड झाली.याचवेळी त्यांनी डॉ.शारदा उर्फ सविता कबीर शर्मा यांच्याशी द्वितीय विवाह केला.१९५१ साली संसदेत 'हिंदू कोड बिल' मांडून हिंदू धर्म सुधारण्यासाठी प्रयत्न केले. पण या विधेयकाला खुद्द पंतप्रधान पं.नेहरु यांनी विरोध केला आणि बाबासाहेबांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

१९५२ साली बाबासाहेबांची संसदेचे वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेवर निवड झाली. याचवर्षी त्यांना अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाकडून एल.एल.डी.ही मानाची पदवी मिळाली. १९५३ साली अमेरिकेकडून 'बॅचलर आफ ला ज' ही पदवी तर १९५४ साली हैद्राबाद विद्यापीठाकडून 'लिटरेचर' ही पदवी मिळाली.१९५६ साली बाबासाहेबांनी दलित विद्यार्थ्यांना कायद्याचे शिक्षण घेता यावे म्हणून मुंबईत 'सिध्दार्थ ला कालेज' सुरु केले.१४ आॅक्टोंबर १९५६ रोजी नागपूर या ठिकाणी बौध्द धर्माचा स्विकार केला. नोव्हेंबर १९५६ ला नेपाळमधील काठमांडू येथील जागतिक बौद्ध धर्म परिषदेत सहभागी झाले. डा. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थतज्ज्ञ, धर्मतज्ज्ञ, कायदेपंडित, विधीमंत्री, बॅरिस्टर, घटनाकार, संशोधक,पत्रकार, संपादक, दलितांचे कैवारी,भारताचे पहिले कायदेमंत्री, संस्थापक, संचालक अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे ते प्रज्ञासूर्य, युगप्रवर्तक युगपुरुष होते.

# स्त्रीयांचे मुक्तीदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. शिंदे संतोष मारूती**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डेहणे ४१२४०२ ता.खेड,जि.पुणे

**प्रास्ताविक**

मानवजातीचा विकास झाल्यापासून या पृथ्वीवर स्त्री आणि पुरूष या प्रकृती अस्तित्वात आहेत मात्र या दोन्हीच्या शारीरिक भिन्नतेमुळे वेगवेगळया जबाबदाऱ्यांचे विभाजन झाले. शारीरिक क्षमतेने स्त्री पुरूषाच्या तुलनेने कमी असल्याने संगोपन ही जबाबदारी तिच्याकडे आली आणि अन्न व निवारा या जबाबदाऱ्या पुरूषाकडे आल्या. पृथ्वीतलावर आज अस्तित्वात असलेल्या प्राण्यांपेक्षा मानव हा वेगळा प्राणी आहे. हे त्याच्या वेगवेगळया अवस्थामधून स्पष्ट झाले आहे. भटकंतीच्या अवस्थेत एक व्यक्ती/सहकारी किंवा सहचारीनी यातूनच पुढे कुटुंब, समुह, गाव, देश हा विकास होत गेला. या विकासात मानवाची प्रतिभसंपन्न अशी पिढी निर्माण झाली. वेगवेगळे धर्म, शास्त्र, कला यांचाही विकास झाला.भारत देशाचा विचार करता इथले मुलनिवासी आणि परकिय किंवा बाहेरून आलेले यांच्यामध्ये संघर्ष झाला त्यामध्ये जे पराभूत झाले त्यांची संस्कृती काही प्रमाणात लयास गेली आणि बाहेरून आलेले म्हणजेच आर्य यांची संस्कृती अनार्य. यांच्या माथी मारली त्यामध्ये चार वर्ण आणि स्त्री या वर्गाविषयी वेगवेगळया जाचक अटी व बंधने लादली गेली.

**'पिता रक्षति कौमारेभर्ता रक्षति यौवने।**
**रक्षति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति।।**

मनुस्मृती अ.9 श्लोक 3

''स्त्रियांनी लहानपणी वडिलांच्या, तरूणपणी पतीच्या आज्ञेत वागावे पती मृत झाल्यास मुलाच्या संमतीने वागावे एकंदरीत स्त्रीने स्वतंत्रता स्वीकारू नये''[१]या सारखे नियम व जाचक अटी या ग्रंथामध्ये निर्माण केले. ''स्त्रियांना व शुद्रांना दुःखाच्या खाईत लोटणारी व त्यांच्या वाट्याला अपमान अवहेलना याशिवाय काही न देणारी 'मनुस्मृती' हा हिन्दू धर्मावरील मोठा कलंक आहे यात शंका नाही.''[२].म्हणजेच समाजामध्ये, कुटुंबामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले. 19 व्या शतकाच्या अखेर पर्यंत स्त्रियांना स्त्री एक उपभोगाची वस्तु आहे. उपभोग व कष्ट यांचे साधन म्हणजे 'स्त्री' असाच समज सर्वसाधारण रूढ होता. भरतात स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार या विरोधात राजा राममोहन रॉय, महर्षी कर्वे, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्वाचे कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण परदेशात झाले होते त्यांना भारताबरोबर इतर देशतील महिलांची स्थिती माहिती होती. तसेच ते स्वतः समाजशास्त्र, धर्मशास्त्र, मानवशास्त्र, अर्थशास्त्र, राजकारण याच बरोबर कायद्याचे जाणकार होते त्यामुळे त्यांनी स्त्री–पुरूष ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत त्यांचे स्थान हे समतुल्य आहे. त्यात श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव करणे योग्य नाही. तसेच वैज्ञानिक दृष्टिने 'स्त्री' या विश्वाची जननी आहे, माता आहे, आद्यगुरू आहे. प्रजनन हा महत्वाचा नैसर्गिक भाग 'स्त्री' शिवाय अपूणे आहे. नवनिर्मितीसाठी स्त्री आवष्यक आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांना दुय्यम स्थान देणाऱ्या किंवा स्त्रियांना उपेक्षित ठरविणाऱ्या ग्रंथावर हल्ला करतात. निषेध नोंदवतात. ''पुरूषाची वासना पुरी करण्यास स्त्री तयार नसेल तर भेट देऊन तिला राजी करण्याचा प्रयत्न करावा व त्यानेही जमले नाही तर हात व काठी यांचा मार देऊन तिला काबूत आणावे.''[३] (बृहदारण्यक उपनिषद 64.7) या सारखे विचार मांडणाऱ्या ग्रंथाना नाकारतात.

भारतीय समाजाची मानसिकता विचारात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांना सर्व ठिकाणी भेदभाव, शोषण, अपमान, अवहेलना यांना सामोरे जावे लागेल म्हणून स्त्रियांना सर्व ठिकाणी समान संधी भेटावी म्हणून 'हिंदू कोडबिल मांडतात' आर्थिक, सामाजिक, समानता प्रस्थापित व्हावी हा हेतू डोळ्यासमोर ठेवून ते या बिलाचा विचार करतात. मात्र हे बिल पास होत नाही तेव्हा मंत्रीपदाचा राजीनामा देतात. स्त्रियांच्या हक्क अधिकारासाठी राजीनामा देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील पहिले आणि शेवटचे मंत्री आसतील. ''नेहरू बिलाचे बाजूने असोत वा विरोधी असोत हे बिल संमत करून घेतल्याखेरील मी स्वस्थ बरणार नाही.बिल गेल्या चार

वर्षात केव्हाच पास झाले असते पण नंहरूंनी ते मारून टाकले.''[४] डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांच्या हितासाठी पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या विरोधाची पर्वा करत नाहीत व स्त्रियांना हक्क व अधिकार भेटलेच पाहिजेत हा विचार मांडतात.

तथागत भगवान गौतम बुध्द, संत कबीर, महात्मा फुले या थोर महापुरूषांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर गुरू मानत होते. त्यांनी केलेल्या प्रत्येक कार्यात त्यांच्या गुरूच्या विचारांचे प्रतिबिंब उमटताना दिसते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर फक्त वेगवेगळ्या ग्रंथावर टिका करत नाहीत तर त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून स्त्रियांच्या अत्कर्षासाठी कार्य केले. विविध सभा, परिषदा, भाषणे यांच्या माध्यमातून स्त्रियांचे प्रबोधन करण्याचे कार्य त्यांनी केले. दिनांक 20 जुलै 1942 रोजी नागपूर येथे आयोजित ऑल इंडिया डिप्रस्ड क्लासेस वुईमेन्स कॉन्फरन्स मध्ये महिलांना उद्देशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. ''स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजित असतो''[५] डॉ. बाबासाहेब आंबेडकरचे हे विधान अर्थपूर्ण आहे स्त्री म्हणजे माता, बहिण माता म्हणजे आद्यगुरू म्हणून लहान मुलांवर जे संस्कार होतात ते आईकडूनच म्हणून स्त्री सुसंस्कृत असेल तर तिचे पूर्ण कुटूंब हे सुसंस्कृत, सुशिक्षित होते. हा महत्वाचा विचार येथे अभिप्रत आहे. '' क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी खऱ्या अर्थाने भारतातील दीन—दलित आणि स्त्री मुक्तीचा लढा उभारला नंतरच्या कालखंडात अनेक सुधारकांनी यात आपले योगदान दिले. स्त्रियांच्या मानवी हक्कांसाठी लढणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरपर्यंत ही आदर्श परंपरा अखंडपणे चालू राहिली. या सुधारकांनी खऱ्या अर्थाने भारतीय स्त्रियांना आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिली.''[६] भारतीय स्त्रियांना शिक्षणाचा हक्क महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी प्राप्त करून दिला. या हक्काला संविधानाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने अमलात आणण्याचे महत्वाचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सर्व भर शिक्षणावर होता मनुष्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. पुरूषच नव्हे तर स्त्रियांनाही शिक्षणाची आवष्यकता आहे. म्हणून ते मुला—मुलींच्या लग्नाचे वय निश्चित करण्यापेक्षा त्यांना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे राहू द्या, स्वावलंबी होउ द्या हा विचार मांडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तत्कालिन सामाजिक, धार्मिक परिस्थितीची जाणीव होती.म्हणून त्यांनी आपण करत असलेल्या कार्यला भक्कम करण्यासाठी त्याला भरतीय संविधनाच्या आधारे संरक्षण देण्याचा विचार करतात व हिन्दूकोडबिल कादेमंडळात 12 ऑगस्ट 1948 मध्ये मांडतात. त्याच्या मध्ये त्यांनी स्त्रियांच्या बाजूने महत्वाचे मुद्द्ये मांडलेले दिसतात. जसे की,

1)स्त्रीला घटस्फोट देण्याचा अधिकार हवा.

2)नवऱ्याने घटस्फोट दिल्यास पोटगी मिळायला हवी.

3)व्यक्तीचा एकच विवाह कायदेशीर असल्याने दुसऱ्या विवाहास योगय कारण नसल्यास त्यावर बंदी घालावी ज्यामुळे स्त्रियांना स्थैर्य लाभेल.

4)स्त्रियांना दत्तक घेण्याचा अधिकार मिळावा.

5)मुलांप्रमाणे मुलींना दत्तक जाण्याचा अधिकार हवा.

6)स्त्रियांच्या स्वतःच्या मिळकतीवर अधिकार हवा.

7)मुलाप्रमाणे मुलीलाही वडिलांच्या मिळकतीतील समान हिस्सा मिळायला हवा.

8)मुलीला वारस होण्याचा अधिकार हवा.

9)आंतरजातीय विवाहास संमती हवी.

10)स्त्रीला स्वतःचा वारस निश्चित करण्याचा अधिकार हवा.[७]

या सर्वच अधिकाराचा विचार करता भारतात सर्वात प्रथम स्त्रियांविषयी असे महत्वाचे अधिकार व हक्क देण्याचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मांडतात. स्त्रीला घटस्फोटाचा हक्क मिळाला पाहिजे. लग्न केलेल्या स्त्रीला जर नवऱ्याकडून प्रेम, सुख, संरक्षण, सन्मान या पैकी काहिच भेटत नसेल आणि दुःख अपमान, अवहेलना हेच तिच्या वाट्याला येत असेल तर घटस्फोट देण्याचा अधिकार तिला भेटणे आवष्यक आहे. या सारख्या अनेक मुद्द्यांचा विचार बाबासाहेब करतात.

'स्त्रियांच्या आरोग्य विषयक प्रश्नांना वाचा फोडणारे डॉ.आंबेडकर हे पहिले सुधारक होते.1938 साली स्वतंत्र मजूर पक्षातर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वतीने पी.जे.रोहम यांनी मुंबई प्रांतविधिमंडळतात संतती नियमनाबाबदचे जे अशासकीय विधेयक मांडले'[८] पारंपारिक समाज मानसिकतेतून अल्पवयातील मुलीची लग्न केली जात होती.आणि अनेक मुलांना जन्माला घातले जात होते यातून कुपोषण,रोगराई या सारखा समस्या होत्या .तसेच अनेक मुलांना जन्म दिल्यामुळे स्त्रिया मृत्युमुखी पडतात.मुल नको असल्यास गर्भपात करताना. आरोग्य धोक्यात येते.अनेक मुले असल्याने त्यांचे संगोपन करता येत नाही.तसेच महत्वाचे म्हणजे लोकसंख्या वाढ आटोक्यात आणता येईल हा विचार त्यांनी मांडला.

स्त्रियांना चांगले आरोग्य मिळावे यासाठी त्यांनी जसे प्रयत्न केले तसेच त्यांनी स्त्री म्हणून कामाच्या ठिकाणी होणारे तिचे शोषन या संदर्भात त्यांनी नियम केले जसे की,स्त्री आणि पुरूषांना समान मजुरी हा महत्वाचा नियम त्यांच्यामुळेच झाला.तसेच प्रसूतीपूर्व काळात स्त्रियांना विश्रांती. याच बरोबर स्त्रियांना ज्या वेगवेगळया सवलती किंवा हक्क अधिकार मिळाले आहेत जसे की, कामाच्या ठिकाणी आठ तासाचा कालावधी तसेच दिवसपाळी मध्येच काम देणे, कामाच्या ठिकाणी वेगवेळया आरोग्य विषयक सुविधा, बाळंतपणासठी दिर्घ रजा या सारख्या अनेक गोष्टी आज महिलांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या ठरल्या आहेत.

समाजातील काही वाईट प्रथा परंपरांना बळी पडलेल्या स्त्रियांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपदेश करतात. यात देवदासी,मुरली, जोगनिणी यांच्या समुदायापुढे केलेल्या 13 जून 1936 मध्ये परळ येथे सभेला उद्द्येशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हाणतात. ''तुम्हाला समजले पाहिजे की स्त्रीजात समाजाचा अलंकार आहे प्रत्येक समाज स्त्री चारित्र्याला अधिकाधिक मान देतो म्हणून तुम्ही या मलिन आयुष्याचा त्याग करा. आपला आणि समाजाचा नावलौकिक व दर्जा वाढवा'[९].येथे डॉ. बाबासाहेब उपदेशाबरोबरच कायद्याच्या माध्यमातून या प्रथा परंपरांवर प्रतिबंध लावतात असे दिसते.

**सारांशः—**

प्राचिन कालखंडापासून स्त्रियांच्या विषयी अनेक जाचक बंधने अस्तित्वात होती अगदी अलंकार पोषाख इ. मात्र आज सर्वच बाबीमध्ये बदल झाला आहे. शिक्षण, नोकरी इ. क्षेत्रात महिला आघाडीवर दिसत आहेत. याचे कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द, कबीर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, लोकराजा राजर्षी शाहू महाराज या सर्व महामानवांच्या विचारांना संविधानाच्या माध्यमातून जीवंत केले व सर्व समाजाबरोबर महिलांचाही उत्कर्ष केला आहे. आज महिला प्रत्येक क्षेत्रात नेत्रदिपक यश मिळवत आहेत. विविध क्षेत्रातून समाजाची सेवा करत आहेत. देशाची प्रगती होत आहे. हे कवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेकडो वर्षापासून होणारी स्त्रीची विटंबना थांबवून त्यांच्यात स्वाभिमान, आत्मसन्मान जागृत केल्यामुळेच शक्य झाले आहे व देश महसत्ता होण्यासाठी स्त्रिांचे योगदान ही महत्वाचे ठरणार आहे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे देशावर असलेल्या उच्च कोटीच्या देशभक्ती मुळेच शक्य झाले आहे.

**संदर्भग्रंथ—**

1)बिवलकर राम, कांबळे झुंबरलाल,'महाडचा मुक्तिसंग्राम'—डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे. मार्च2015. पृष्ठ क.129
2)आठलेकर मंगला, 'महापुरषांच्या नजरेतून स्त्री', मेनका प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती 2009पृष्ठ क. 17—18.
3) आठलेकर मंगला —उनि. पृष्ठ क्र. 27.
4)मनू वसंत, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे' खंड—18 भाग — 3 . 14 एप्रिल 2016. पृष्ठ क्र. 288.
5) मनू वसंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'लेखन आणि भाषणे' खंड—18 भाग — 2, 14 एप्रिल 2016.पृष्ठ क्र. 426.
6)महाजन वंदना (डॉ) 'मराठी कादंबरीतील स्त्रीवाद' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती 07 नोव्हेंबर 2010. पृष्ठ क्र 8.
7) आठलेकर मंगला — तत्रैव पृष्ठ क्र. 250.
8)डांगे सरोज,(डॉ.)'परिवर्तनाचा अर्गदूत', 'असामान्य अद्धितीय प्रज्ञासूर्य', लोकराज्य एप्रिल 2018 पृष्ठ क्र.30
9) मनू वसंत,'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे' खंड—18भाग —1 . 14 एप्रिल 2016पृष्ठ क्र.549.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर और लोकतांत्रिक मूल्य

**डॉ. सुरेश. आर.पाटिल**

**सहायक प्राध्यापक, पूंजाभाई पटेल शिक्षण महाविद्यालय, गोंदिया. महाराष्ट्र**

**सारांश :**

**डॉ बाबासाहेब आंबेडकर जिन्होंने भारतीय सामाजिक पृष्ठभूमि को स्पष्ट रूप से देखा था |** उन्होंने वंचित, आदिवासी, किसान, सभी वर्ग के लिए काम किया |

भारत की सामाजिक रचना के बारे में, विषमता के संदर्भ में ,उन्हें कटु अनुभव आए थे| वे भारत का सामाजिक विकास, शैक्षिक विकास, आर्थिक विकास, राजनीतिक विकास करना चाहते थे| उन्होंने भारतीय संविधान बनाने में बहुमूल्य योगदान दिया था| भारतने आजादी प्राप्त करने के बाद, भारतीय संविधान -26 जनवरी 1950 लागू हुआ -विश्व में विशाल लिखित स्वरुप में भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ है |

**भारत का भविष्य** बनाने के लिए भारतीय सविधान सशक्त साधन के रूप में कार्य कर रहा है| भारतीय संविधान भारत में सभी वर्ग, सभी जाति, सभी धर्म, भाषा और सभी प्रदेशों के लिए जनतांत्रिक व्यवस्था से कार्य करता है| भारतीय संविधान में केंद्रीय विषय, राज्य के विषय, शिक्षा आदि अन्य विषयों पर ध्यान दिया गया है| भारतीय नागरिकों के अधिकार एवं कर्तव्य के बारे में भारतीय संविधान वंचितों का विकास, देश का विकास यही भारतीय संविधान का अंतिम लक्ष्य है| इसलिए भारत में जनतंत्र लोगो ने आत्मार्पित किया है| लोकतांत्रिक मूल्य, लोकतांत्रिक स्वतंत्रता, समानता, बंधुता, न्याय है| लोकतांत्रिक शासन द्वारा भारत का चौमुखी विकास भारतीयो का सपना है |

**कूट शब्द:**

जनतंत्र व्यवस्था

लोकतांत्रिक मूल्य

**पृष्ठभूमि :**

डॉ बाबासाहेब आंबेडकर का जन्म 14 अप्रैल 1891 महू, भारत में हुआ था और मृत्यु 6 दिसंबर 1956, नई दिल्ली में हुई थी| वे दलितों के महानायक के रूप में उभरे थे| अनुसूचित जाती, जमाती ओर ट्राइबल के लिए डॉ बाबासाहेब आंबेडकर ने अथक प्रयास किया था| वे कानून मंत्री के रूप में (1947 से 1951) थे|

डॉ बाबासाहेब आंबेडकरने भारत में प्रचंड काम किया है| उन्होंने उच्च शिक्षा सामाजिक वंचित घटकों (socially depressed class) को मिलने के लिए प्रचंड सामाजिक कार्य किया है | इसके लिए डॉ बाबासाहेब आंबेडकर को अनेक संकटों का सामना करना पड़ा था |

**सामाजिक विषमता :**

**भारतवर्ष में सामाजिक विषमता बड़ी मात्रा में है |** समाज को वर्ण और वर्ग के आधार पर विभाजित किया गया था| और वर्ण ओर वर्ग आधार पर सामाजिक कार्य का विभाजन कर स्ट्रेटिफिकेशन किया गया था| जिसके तहत भारत के वंचित लोग को शिक्षा, सम्मान, रोजगार, स्वतंत्रता नहीं मिलती थी| सामाजिक रूप से, आर्थिक तथा राजनीतिक रूप से वंचित घटकोपर बड़ा अन्याय हुआ था| डॉ बाबासाहेब अंबेडकर ने अपनी आंखों से सामाजिक भेदभाव देखा है| स्कूल में पढ़ते थे तब उनके साथ में भेदभाव होता था| उनको स्कूल में पानी पीने के

लिए अलग जगह दी जाती थी और बाकी उच्च वर्ण विद्यार्थियों से मिलने में मनाई होती| कुछ अध्यापक भी उनके साथ में सामाजिक विषमता का व्यवहार करते थे| उनके शिक्षक श्री केलुस्कर द्वारा स्नेह, और सहानुभूति कभी भोजन मिलता था| उन्हें तथागत गौतम बुद्ध की पुस्तक उन्होने दी थी| उस किताब का प्रभाव डॉ आंबेडकर पर हुआ था|

भारत में सामाजिक विषमता को देखते हुए और गरीब लोगों पर होते हुए अत्याचार को देखते हुए सामाजिक विषमता को दूर करने के लिए डॉक्टर बाबा अंबेडकर ने 1935 में घोषणा की थी कि मेरा हिंदू धर्म जन्म हुआ है मगर मैं हिन्दू धर्म में मरूंगा नहीं| डॉ बाबासाहेब अंबेडकर ने14 अक्टूबर 1956 में नागपुर में 5 लाख लोगो के साथ बौद्ध धर्म की दीक्षा ली थी|

डॉ बाबासाहब अंबेडकर उन्होंने नागपुर की सभा जनसमुदाय को संबोधित किया और कहा 'अगर लोकमान्य बाल गंगाधर तिलक अछूतजाति में जन्म लेते तो उनका नारा यह ना होता 'स्वतंत्रता मेरा जन्मसिद्ध अधिकार है।,इसे लेकर रहूँगा ''बल्कि समानता मेरा जन्मसिद्ध अधिकार है' ऐसा कहते '

डॉ अंबेडकर ''समानता'' के पक्षधर थे | हमें स्वतंत्रता हमें 15 अगस्त 1947 को मिल गई किंतु भारत में समानता का अभाव है| हमें समानता कहां मिली है ? हमारे सामाजिक जीवन में विषमता है| उच्च वर्ग और वर्ण के लोगों से लड़ना पड़ता है| हमें हमारे भारत में सामाजिक विषमता को मिटाना बहुत जरूरी है| हमारा लक्ष्य है, जाति विहीन समाज की स्थापना| समाज में भारत के सभी जाति के लोग समानता से रहेंगे| समाज का विकास करेंगे और हमारे प्रदेश का विकास और देश की तरक्की बदलेंगे| डॉ अंबेडकर ने 1956 में अपनी प्रसिद्ध पुस्तक लिखी 'बुद्ध अण्ड हिज धम्म '

**लोकतांत्रिक भारत :**

लोकतांत्रिक भारत एक राष्ट्र है, जो सभी भारतीयोंको जोड़ता है| भारत की जनतंत्रिय शासन व्यवस्था लोगों के कल्याणकारी योजनाओं को लागू करने के लिए समर्थ है|

लगभग 74 वर्ष हो चुके हैं, भारत का कल्याणकारी कार्यक्रम लागू करने के लिए जनतंत्र मूल्य के प्रमुख आधार है| भारतीय लोगों का विकास लोकतांत्रिक व्यवस्था के आधार पर होना चाहिए | जनतंत्र एक मजबूत आधार आर्थिक एवँ शैक्षिक विकास का है ..

**हमारे देश में 138 करोड़ (साल २०२०)से ज्यादा लोग रहते हैं** | पुरुषो की जनसंख्या 71. 67 एवं स्रियों की 67 . 12 करोड़ (साल २०२०) है| लोगों का भविष्य बनाने का दायित्व जनतंत्र पर है | भविष्य की आने वाली समस्याओं का समाधान लोकतंत्र शासन व्यवस्था से होगा|

डॉ अंबेडकर जिन्होंने भारत की समस्या पर विचार करते हुए लोकतांत्रिक व्यवस्था को सही माना है | हमारे भारत में अनेक भाषा के लोग रहते हैं | अनेक धर्म के लोग रहते हैं| अनेक प्रदेशों के लोग रहते हैं |भिन्न भिन्न समुदाय भारत में रहते हैं | उनकी अलग-अलग सांस्कृतिक पृष्ठभूमि है |

जनतंत्र शासन व्यवस्था में लोकतांत्रिक मूल्य (democratic values) के आधार पर भारत भविष्य के पद चिन्हों को अग्रेषित कर रहा है | सभी के शैक्षिक विकास के लिए बहु जनसंख्या वाले देश जनतंत्र शासन प्रणाली श्रेष्ट है | जनतंत्र एक मजबूत शासन है | आदिवासी ,पहाड़ी इलाकों में शिक्षा की व्यवस्था राष्ट्र हेतु ,शिक्षा की पुनर्रचना , जनतंत्र शासन व्यवस्था में प्रावधान किए जाते हैं |

**जनतंत्र :चार स्तंभ**

**जनतंत्र के मजबूत चार स्तंभों पर आधारित है |**

१) स्वतंत्रता (Freedom)

२) समानता (Equality)

३) बंधुता (fraternity)

4 ) न्याय (Justice)

**यह जनतंत्र के प्रमुख मूल्य है |** 26 जनवरी 1950 को भारतीय सविधान गणतंत्र रूपमे लागू हुआ है| भारत का संविधान सबके लिए श्रेष्ठ भविष्य है| संविधान में ,केंद्र और राज्यों के विषयो के अधिकारों का लिखित उल्लेख अनेक परिच्छेद (articles ) है| भारतीय नागरिक के अधिकार एवं कर्तव्य और राज्यों के अधिकार को स्पष्ट स्थान है |

**जनतंत्र किसे कहते हैं ?**

**जनतंत्र शासन** व्यवस्था सर्वश्रेष्ठ मानी जाती है | "जनतंत्र व्यवस्था वह होती है जहां जनता की संप्रभुता बड़ी है, अब्राहम लिंकन (अमेरिका के राष्ट्रपति )उन्होंने जनतंत्र की परिभाषा बताएं "जनतंत्र जनता का, जनता के लिए और जनता द्वारा चलाए जाने वाला शासन है" एक प्रामाणिक जनतंत्र शासन प्रणाली है | जनतंत्र में जनता की सत्ता होती है| अंतिम सत्ता जनता की होती है| मतदान का अधिकार जनता का होता है| जनता के प्रतिनिधि पार्लमेंट में जाकर जनता के लिए कार्य करते हैं और लोगों के कल्याण की कामना करते हैं | जनतंत्र का एकमात्र लक्ष्य होता है, "जनता का विकास"

जनतंत्र शब्द का अर्थ- मतलब-' डेमोक्रेसी' का साधारण अर्थ है | डेमोस (Demos) और क्रेटोस (Cratos) अर्थात इसे 'लोकतंत्र 'भी कहा जाता है | इसका शासन पर नियंत्रण, जनतंत्र एक प्रकार से सामाजिक,राजनैतिक संगठन है | इसका अर्थ भी विविध रूप में लिया जाता है |

**जनतंत्र की परिभाषा राजनीतिक अर्थ:**

जनतंत्र की परिभाषा राजनीतिक अर्थ ' लोकतंत्र का वह रूप है जिसमें - "जनता की, जनता द्वारा और जनता के लिए चलाई जाती है" नागरिको के अधिकार और कर्त्तव्य कार्य राजनैतिक हेतु |

**सामाजिक संगठन के रूप में जनतंत्र**

सामाजिक संगठन के रूप में जनतंत्र का अर्थ-- **सामाजिक दृष्टिकोण** से लोकतंत्र का अर्थ होता है, "जिसमें सभी वर्ग के लिए, जाति के लिए, भाषा एवं लैंगिक भेदभाव किए बिना समान अवसर सबको देना "

डॉक्टर वर्मा ने कहा -

**" लोकतंत्र सामूहिक रूप से राजनीतिक तथा सामाजिक प्रगति की एक प्रक्रिया है "** भाटिया ने कहा -

सामाजिक लोकतंत्र व संपत्ति आधारित नहीं होता है| इन समस्त भेदो का इसमें अभाव होता है | जनतंत्र की मूल विशेषता "स्वतंत्रता" | स्वतंत्रता "जनतंत्र की आत्मा" होती है | स्वतंत्रता के अभाव में जनतंत्र विकसित नहीं होता | प्रत्येक व्यक्ति के लिए जनतंत्र व्यवस्था महत्वपूर्ण होती है | जनतंत्र व्यवस्था में प्रत्येक व्यक्ति को अपने ढंग से सोचने का, विचार करने का, लिखने का भाषण देने का एवं वाद-विवाद करने का अधिकार होता है | ध्यान देने योग्य बात यह है-- स्वतंत्रता का अर्थ केवल अपने लिए नहीं स्वतंत्रता से मतलब है इस सभी के मतों का सम्मान रखा जाए | अपनी स्वतंत्रता जितनी प्यारी होती है उतनी ही सभी की स्वतंत्रता का सम्मान रखे |

**संदर्भ सूची:**

१) कीर , धनंजय, डॉक्टर बाबासाहेब अंबेडकर ,पापुलर प्रकाशन, मुंबई ,

२)कुंडले , म. बा. " शैक्षणिक तत्वज्ञान और शैक्षणिक समाजशास्त्र" श्री विद्या प्रकाशन, पुणे.

३)सामाजिक न्याय संदेश- अप्रैल ,2013.

४) सत्यशोधक मासिक पत्रिका -2016

५)भोळे , भा.ल. " भारतीय राष्ट्रीयव् पाश्चिमात्य विचारक विचार " पुणे.

६) यादव ,आनंद "ग्रामीण साहित्य स्वरूप समस्या" मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे।७)भारताचे संविधान, मिलिंद प्रकाशन ,वर्धा.

7)https://www.wikipedia.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

**डॉ. डी. एम. तिड़के**

सहा. प्राध्यापक पुंजाभाई पटेल शिक्षण महाद्यिालय, गोंदिया (महा.)

**प्रस्तावना :**

डॉ. बााबसाहेब आंबेडकर अतिशय बुध्दीमानी क्रांतिकारक महापुरूष, समाजसुधारक व थोर शिक्षणतज्ञ होते ते भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार होते. त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या ठिकाणी झाला त्यांचे बालपणाचे नांव भीमराव असे होते. त्यांचे वडिल रामजी सपकाळ हे लष्करामध्ये सुभेदारहोते लष्करातील नौकरी सोडल्यानंतरते कोकणातील दापोली येथे आले तेथून ते सातारा येथे स्थायिक झाले. शाळेत अस्पृश्य म्हणून इतर मुले डॉ. आंबेडकरांना स्वत:जवळ फिरकु देत नसत. अस्पृश्यांवर होणारा अन्याय, अत्याचार त्यांनी लहानपणा पासूनच सहन केला होता.

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे आधुनिक भारताच्या निर्मात्यांपैकी एक आहेत. गरीब आणि वंचित कुटूंबात जन्मलेल्या डॉ. आंबेडकरांनी मानवासाठी कठीण समजल्या जाणाऱ्या आयुष्यात अनेक उंची गाठल्या. आधुनिक भारतातील सर्वात सुशिक्षित त्यांची गणना होते. डॉ. आंबेडकरांनी प्रतिष्ठित कोलंबिया विद्यापीठ आणि प्रसिध्द लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून अर्थशास्त्रात पीएच.डी. प्राप्त केली. डॉ. आंबेडकर हे कुशल वक्ते, लेखक आणि ज्ञानी अभ्यासक म्हणून जगभर प्रसिध्द आहेत. त्यांचे अभ्यासाचे क्षेत्र केवळ अर्थशास्त्र आणि कायदा यापुरते मर्यादित नव्हते तर शिक्षण समाजशास्त्र, संविधान, राज्यशास्त्र, धर्म आणि तत्वज्ञान या विषयांवरही त्यांचा पूर्ण अधिकार होता. महात्मा बुध्द, ज्योतिबा फुले, साहूजी महाराज, प्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ प्रोफेसर जॉन ड्यूई, एल्विन सेलिग्मन आणि बुकर टी. वॉशिंग्टन यांचा डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर मोठा प्रभाव होता. शिक्षणाशी आयुष्यभर जोडलेले डॉ. आंबेडकर हे स्वत:च एक तत्वज्ञान आहे. आपल्या समाजातील शिक्षणाचे स्वरूप आणि प्रगती समजून घेण्यासाठी त्यांच्या शिक्षणाविषयीच्या विचारांचा अभ्यास अत्यंत आवश्यक आहे.

सामाजिक मुक्ती, शिक्षणाचा मुख्य उद्देश व्यक्तीचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तन घडवून आणणे आहे. डॉ. आंबेडकर हे जातिवाद, अस्पृश्यता, सामाजिक भेदभाव, सामाजिक विषमता आणि सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी आणि समता, बंधुता, सहअस्तित्व आणि परस्पर प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी शिक्षणाला खूप महत्व दिले. शिक्षण हा प्रत्येक माणसाचा केवळ जन्मसिध्द हक्क नसून ते समाज परिवर्तनाचे हत्यार आहे, अशी त्यांची धारणा होती.

- **शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण** : डॉ. आंबेडकर त्यांचे गुरू जॉन ड्यूई यांच्या शिक्षणाच्या लोकशाहीकरणाच्या दृष्टिकोणाचे प्रख्यात समर्थक होते. भारतातील प्रचलित सामाजिक विषमतेमुळे भारतातील लोकांचा एक मोठा वर्ग दीर्घकाळ शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित राहिला. शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिध्द हक्क आहे आणि हा अधिकार कोणालाही नाकारता येणार नाही, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्यामुळे लोकशाही देशाने कोणताही भेदभाव न करता आपल्या समाजातील सर्वांना शिक्षणाचा अधिकार दिला पाहिजे.
- **स्त्रीशिक्षण:** २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे व्याख्यान देतांना ते म्हणाले, मी समाजाच्या प्रगतीचे मोजमाप स्त्रियांच्या प्रगतीच्या प्रमाणावरून करतो.. देशाची निम्मी लोकसंख्या अशिक्षित राहिली, तर भारत, जगातील कोणताही देश प्रगती करू शकत नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते. खरे देशभक्त आणि समाजसुधारक म्हणून डॉ. आंबेडकर हे स्त्रीशिक्षणाचे खंबीर समर्थक होते. समाजाच्या प्रगतीसाठी आणि देशाच्या विकासासाठी

महिलांचे शिक्षण होणे अत्यंत गरजेचे आहे, हे त्यांना चांगलेच ठाऊक होते. त्यांनी असे निरीक्षण नोंदवले की, शिक्षण हे पुरूषांइतकेच स्त्रियांसाठीही आवश्यक आहे.

- **शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक मुक्तीमध्ये महिलांची भूमिका** : डॉ. आंबेडकरांनी सुशिक्षित महिलांना सामाजिक परिवर्तनात महत्वाची भूमिका बजावता येते असे मानले. आई असल्याने, ती कुटूंबातील मुलांच्या सर्वात जवळ असते आणि ती मुलाची पहिली शिक्षिका असते. ते त्यांच्या मुलांमध्ये सकारात्मक मूल्ये आणि सदगुण अंतर्भूत करू शकते. त्यामुळे त्यांनी महिलांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. ते म्हणाले, मी तुम्हाला काही गोष्टी सांगतो ज्या तुम्ही लक्षात घ्याव्यात असे मला वाटते. स्वच्छतेत राहायला शिका,सर्व दुर्गुणांपासून मुक्त रहा, आपल्या मुलांना शिक्षण द्या, त्यांच्यात महत्वाकांक्षा निर्माण करा. त्यांच्या मनावर बिंबवा की त्यांना महान व्हायचे आहे. त्यांच्यापासून सर्व न्यूनगंड काढून टाका.
- **नैतिक शिक्षण आणि चारित्र्य निर्मितीवर भर** : नैतिक मूल्यांशिवाय शिक्षणाला खऱ्या अर्थाने शिक्षण म्हणता येणार नाही, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. लोकशिक्षण करतांना नैतिक मूल्ये आणि चारित्र्य घडवणे याला महत्व दिले नाही, तर अशा शिक्षित व्यक्तीचा समाजाला काहीही उपयोग होणार नाही, असा त्यांचा ठाम विश्वास होता. १२ फेब्रुवारी १९३८ रोजी मुंबई प्रांतातील डिप्रेस्ड क्लासेस युथ कॉन्फरन्सला संबोधित करतांना ते म्हणाले की, चारित्र्य आणि नैतिकता नसलेला शिक्षित माणूस पशूपेक्षाही धोकादायक असतो. शिक्षणापेक्षा चारित्र्य महत्वाचे आहे.
- **रोजगारभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षण** : शिक्षणाचा एक महत्वाचा उद्देश म्हणजे एखाद्या व्यक्तीला उपजीविकेसाठी सक्षम बनवणे किंवा त्याला स्वावलंबी बनवणे. डॉ. आंबेडकरांनी मान्य केले की, माणसाच्या जीवनात रोजगार किंवा उपजीविका मिळवणे खूप महत्वाचे आहे. त्यांचा विश्वास होता की शिक्षण तेव्हाच पूर्ण मानले जाईल जेव्हा त्याच्याशी काही कौशल्य जोडले जाईल आणि अशा कौशल्यामुळे एखाद्या व्यक्तीसाठी काही रोजगार निर्माण होईल. त्यामुळे त्यांनी तंत्रशिक्षणावर भर दिला आणि समाजातील वंचित आणि मागासवर्गीयांच्या उदयासाठी ते आवश्यक मानले.
- **मातृभाषा आणि परदेशी भाषेचे महत्व** : भाषा हे शिक्षणाचे प्रमुख साधन आहे. शिक्षणाचे मूलभूमत तत्व असे आहे की, जर मुलाच्या मातृभाषेतून शिक्षण दिले गेले तर मुलाला ते समजणे सोपे जाते. डॉ. आंबेडकरांनी मातृभाषेतून शिक्षणाचा पुरस्कार केला, परंतु त्याच वेळी प्रत्येक विद्यार्थ्याला किमान एका परदेशी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. जेणे करून त्याला जागतिक स्तरावर त्याच्या विषयात होत असलेला विकास कळू शकेल आणि संपूर्ण जगात काय चालले आहे हे समजू शकेल. शिवाय, संविधान सभेच्या बैठकीत डॉ. आंबेडकरांनी संस्कृत भाषेला राष्ट्रभाषा किंवा राज्यभाषा बनवण्याचा प्रस्ताव मांडला हे अनेकांना माहित नाही.

अस्पृश्यता म्हणजे जीवन जगण्यास नकार एका माणसाने दुसऱ्या माणसास समाजात मुक्तपणे वावरण्यासदिलेला नकार प्राथमिक शिक्षणानंतर त्यांनी सरकारी हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला तेथील महारपण आडवे आले त्यांना तुच्छतेने वागणूक दिली जात असे, पण त्यांतूनही एकटेपणाचा त्यांना फार फायदा झाला त्यांनी पुस्तकांना आपले मित्र बनविले शाळेत आंबेडकर गुरूजी फार चांगले होते, त्यांनीच डॉ. आंबेडकरांचे सकपाळ हे आडनाव बदलून त्यांना स्वत:चे आंबेडकर हे आडनांव त्यांना लावले तशी कॅटलॉग मध्ये नोंद सुध्दा करून टाकली होती. त्यांचे हायस्कूलचे शिक्षण मुंबई येथे झाले एक महार मुलगा मॅट्रीक झाला, या बातमीने तर सर्वत्र खळबळ माजली.

इ.स. १९०८ मध्येभीमराव सतरा वर्षाचे असतांना त्यांचा विवाह भीकू धोत्रे यांची कन्या रमाबाई हिच्याशी झाला त्यावेळी रमाबाई नऊ वर्षाची होती. बी.ए. ची परीक्षा इ.स. १९१२ ला पास केली. उच्च शिक्षणासाठी बडोदा येथील सयाजीराव गायकवाड महाराज यांनी भिमरावांना शिष्यवृत्ती देउन उच्चशिक्षण घेण्यासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी पाठविले त्या विद्यापीठातून एम.ए. ची परीक्षा इ.स. १९१५ ला पास केली. तसेच १९१६ रोजी पी.एचडी. ही पदवी पास केली. इ.स. १९२० ला इंग्लंडला जाऊन इ.स. १९२१ मध्ये एम. एस.सी. आणि इ.स. १९२३ मध्ये डी.एस.सी. या पदव्या मिळविल्या तसेच बॅरिस्टरची बॉर–ॲट–लॉ ही पदवी सुध्दा यशस्वीरित्या पास केली कोलंबिया विद्यापिठाने इ.स. १९५२ ला त्यांना एल.एल.डी. ही सन्माननीय पदवी बहाल केली.

आयुष्यभर खडतर ज्ञानसाधना करून विधिशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र यात प्रभूत्व संपादन केले होते. दलित शोषित व पीडित यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. ते पत्रकार, शिक्षण संस्थापक अस्पृश्योद्धारक, ज्ञानपिपासू, ग्रंथवेडे, प्रज्ञासूर्य होते त्यांनी लोकशिक्षक या अर्थाने अनेक शैक्षणिक कार्य करूनआपले शिक्षणविषयक विचार मांडले न्याय स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार आधारभूत तत्वांचे ते पुरस्कर्ते होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार हे जनसमान्यांसाठी तसेच वंचितांसाठी होते. समाजाचे शिक्षणाद्वारे उत्थान व्हावे असे त्यांना वाटे. डॉ. आंबेडकरांच्या मते शिक्षण म्हणजे ज्ञान आणि प्रज्ञा यांचा सुरेख संगम. केवळ ज्ञान उपयोगाचे नाही तर जे उपयोगी येते तेच खरे ज्ञान, अशी त्यांची धारणा होती. शिक्षणाचा परिणाम शील आणि चारित्र्याची निर्मिती करणे होय. शिक्षण हे मोफत व सक्तीचे असावे असा त्यांचा आग्रह होता, ज्या प्रमाणे उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हतबल होउन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निबुध्द राहिल्यास जिवंतपणी तो दुसऱ्याचा गुलाम बनतो असे त्यांचे मत होते शिक्षण हे माणसाला घडवित असते. शिक्षणहे व्यक्तीला जाणीव करून देते. शिक्षणाद्वारे माणसास त्याच्या कर्तव्याची व अधिकारांची जाणीव होणे गरजेचे आहे. शिक्षणाने समाजाच्या व स्वत:च्या बऱ्यावाईट बाबींचा विचार करण्याची क्षमता निर्माण होते. म्हणून स्वत:चा उध्दार करावयाचा असेल तर शिक्षण घेणे गरजेचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विदयेला शस्त्राची उपमा दिली आहे. त्यांच्यामते, विद्या हे एक असे शस्त्र आहे की, ज्याच्याजवळ ते असेल तो शीलवान असेल तर त्यायोगे तो एखादयाचे संरक्षण करू शकेल, पण तोच मनुष्य शीलवान तसेच तर विदयेच्या शस्त्राने दुसऱ्याचा घात करेल, मात्र ते शस्त्र आहे, म्हणून कसेही वापरता येणार नाही, कारण ते तितकेच धारदार आहे. शिक्षणात नैतिकता असावी विषमता नष्ट करण्यास व सामाजिक लोकशाहीसाठी शिक्षण हवे. समाजात अनेक प्रकारच्या विषमता आहेत जाती, धर्म, पंथ इत्यादी क्षेत्रात विषमता असलेली दिसून येते. त्यामुळे जनसामान्यांची सतत पिळवणूक होतांना दिसते जाती प्रथेमुळे समाज परस्परापासून दूर जातांना दिसतो धर्मा–धर्मात विषमता पसरविली जाते ती नष्ट करण्यासाठी शिक्षणाची कास धरणे गरजेचे ठरते. हित संवर्धन करण्यासाठी शिक्षण घेणे आवश्यक ठरते.

शिक्षण हा शोषण मुक्तीचा मार्ग होय असे डॉ. बाबासाहेबांना वाटे भारतातील पददलित स्त्रिया हे दैन्यावस्था जीवन जगत आहेत त्यांचे दैनंदिन शोषण केले जाते. यापासून मुक्त व्हायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही अशी त्यांची धारणा होती त्यांच्या मते, शिक्षण हीच शोषणमुक्तीची पायवाट होती.

समाजात दिवसेंदिवस असमानता दिसत असल्याबद्दल डॉ. आंबेडकरांना खंत वाटत होती खालच्या पातळीच्या लोकांना शिक्षण घेण्यासाठी विशेष सवलती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत असे ते म्हणत डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला अन्न व शक्तीची उपमा दिलेली आहे. त्यांच्या मते, "ज्या प्रमाणे मनुष्य प्राण्याला अन्नाची जरूरी आहे, त्याप्रमाणे सर्वांना विद्येची जरूरी आहे" शिक्षण अभावी व्यक्ती पशुवत होईल. म्हणून व्यक्तीला शिक्षणाची आयुष्यभर गरज असते. शिस्त आणि विकासासाठी शिक्षणाची गरज आहे व्यक्तींच्याजीवनात शिस्तीला अतिशय महत्वाचे स्थान आहे. जीवनात शिस्त नसेल तर व्यक्तीचे भविष्य अंधकारमयबनू शकते. शिक्षणाने शिस्तबध्दता आणता येते. त्यामुळे सामाजिक प्रगती व विकास घडुन येण्यास मदत होते. व्यक्ती शिक्षित असल्यास त्याच्यामध्ये अनुशासनाता व सामाजिक प्रगतीचा विकास दिसून येतो. शिक्षणाने व्यक्ती शिक्षित होते पण तेसुशिक्षित होईलच असे मात्र म्हणता येणार नाही. शिक्षणाला चारित्र्याची जोड असावी. मानवी सभ्यता व संस्कृतीचा खरा पाया म्हणजे शिक्षणहोय त्यासाठी चारित्र्यआणि एकता यांची गरज भासते. चारित्र्य संवर्धनात प्रज्ञा, करूणा, शील, आणि मैत्रीया गुणांचा समावेश होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षणहे मूल्याधिष्ठित असावे शिक्षणाने त्याग, मानवता विनम्रता, दुसऱ्यांची जाणीव, नैतिकता यासारखी मूल्ये बालमनावर रूजविली पाहिजेत. यामुळे बालकांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होऊ शकेल जीवनाला मूल्यांची जोड असणे गरजेचे आहे. शिक्षण हे एक पवित्र कार्य होय, ते समाज परिपवर्तनाचे व क्रांतिचे पवित्र साधन आहे. सामाजिक क्रांति घडवून आणण्यासाठी शिक्षणाद्वारे त्याची बीजे बालकांच्या बालवयातच रूजविली जावीत. असे त्यांचे मत होते. बालवयात बालके वैचारिक संस्काराने प्रवृत्त झाली तर ते मोठेपणी खरी सामाजिक क्रांती व समाज परिवर्तन घडवून आणू शकतात, असे केल्याने शिक्षणामुळे नवा समाज निर्माण होऊ शकेल यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा गाढ विश्वास होता. यामुळे शिक्षण हे समाज परिवर्तनाचे व समाजक्रांतीचे एक प्रभावी साधन ठरू शकते. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण करावे असे त्यांचे मत होते स्त्रियांना शिक्षण देणे ही काळाची गरज आहे असे ते मानत होते.

अश्याप्रकारे बाबासाहेबांनी आपले शैक्षणिक विचार व कार्ये परखडपणे मांडलेली आहेत ते बहुआयामी व्यक्तीमत्व होते.

- मागावसर्गीयांच्या शिक्षणासंदर्भात बाबासाहेबांनी जे चिंतन केले तेही तितकेच मूलगामी स्वरूपाचे आहे. ज्ञानाअभावी व्यक्ती आणि समाजाचे नुकसान जसे होते, तसेच एखादी व्यक्ती वा समूहाला शिक्षण नाकारणे म्हणजे माणूस म्हणून त्याचे अस्तित्व नाकारून त्याच्या क्षमता मारून टाकणे होय, अशी बाबासाहेबांची शिक्षणविषयक धारणा होती.
- बाबासाहेबांना उच्चशिक्षणाद्वारे समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही मानवी मूल्ये स्वीकारलेला एक स्वाभिमानी आधुनिक समाज निर्माण करायचा होता. बाबासाहेबांच्या शैक्षणिक चळवळीचा हाच खरा मूलाधार होतात.
- सर्व सामाजिक दुखण्यावर उच्चशिक्षण हेच एकमेव औषध आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका सभेत म्हटले होते.
- बाबासाहेबांनी स्वातंत्र्यपूर्व भारत सरकारकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी तीन लाख रूपयांचा निधि मिळविला होता, परिणामी ब—याच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळू लागली होती.
- शिक्षक हा शालेय असो, महाविद्यालयीन असो की विद्यापीठीय असो त्याचे कर्तृत्व उत्तुंग आणि विद्यार्थ्यांना अनुकरणीय वाटले पाहिजे,असे ते शिक्षकांविषयी बोलत.
- बाबासाहेबांनी शिक्षणाची पायाभूत विचार करतांना ज्यांना शिक्षणाचे महत्व कळत नाही त्यांच्यासाठी सक्तीचा कायदा असावा असे म्हटले, शिवाय शिक्षण सरसकट सर्वांसाठी मोफत न करता जे फी देउ

शकतात त्यांच्याकडून ती घ्यावी म्हणजे न सक्तीच्या शिक्षणाचा खर्च भागविण्यास मदत होईल, असेही त्यांचे मत होते.

- शिक्षण हाच जीवनाच्या प्रगतीचा मार्ग आहे हे जाणून विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा आणि समाजाचे विश्वासू नेते बनावे, असे डॉ. आंबेडकर म्हणायचे.

त्यांच्या मते, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते प्राशन करणारा व्यक्ती अन्याया विरूध्द गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ** :


१) पवार दया, (१९९१), ***"डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ",***मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ.

२) कीर धनंजय, (१९८९), ***"डॉ. बाबासाहेब आंबेडकर",***मुंबई, पॉप्युलर प्रकाशन

३) धनराज डहाट, (२००३), ***"डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारखंड",***मुंबई, साकेत प्रकाशन

४) लोखंडे भाऊ, (२०१२), ***"डॉ. आंबेडकर प्रणाली आणि आपण",***कोल्हापूर, पारिजात प्रकाशन.

५) आगलावे प्रदिप, (२०१५), ***"भारतीय समाज प्रश्न आणि समस्या",***नागपुर, श्री साईनाथ प्रकाशन

६) कोचाळे, दा.धों., ***"भारतीय सामाजिक विचारवंत",***औरंगाबाद, कैलाश पब्लिकेशन

७) दुनाखे, डॉ. अरविंद आणि देशपांडे, डॉ. लीना, (२००७), ***"प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र",*** पुणे, नित्य नूतन प्रकाशन

८) घोरमाडे, के.यू. आणि घोरमाडे, कला कृष्णा, ***"शैक्षणिक विचारवंत (भारतीय आणि पाश्चिमात्य)",*** नागपूर, विद्या प्रकाशन

९) शेंडे, ना.रा., ***"डॉ. बाबासाहेब आंबेडकर",*** नागपूर, निलाजंली प्रकाशन

१०) सोहोनी, शं.कृ., (१९९३द्ध, ***"शैक्षणिक टीपाकोश"*** पुणे, विद्या प्रकाशन

११) करंदीकर, डॉ. सुरेश आणि मंगरूळकर, मीना (१००७), ***"उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण",*** कोल्हापूर प!डके प्रकाशन.

१२) कुंडले, म.बा., (२००३), ***"शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र",*** पुणे, श्री विद्या प्रकाशन

१३) भीमराव रामजी आंबेडकर – वीकीपीडीया

# प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे ग्रंथप्रेम

## डॉ. तिलक डी. भांडारकर

सहायक प्राध्यापक, पुंजाभाई पटेल शिक्षण महाविद्यालय, गोंदिया

**प्रस्तावना**

भारतीय समाजजीवनात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या समाजसुधारकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान महत्वपूर्ण आहे. त्यांच्या कार्यांचा ठसा तात्कालिन भारतीय समाजाच्या प्रत्येक लहान–मोठया घटकांवर पडणे साहजिकच होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि त्यांचे सामाजिक विचार त्यांना आलेल्या अनुभवातून निर्माण झालेला आहेत. भारतीय राज्यघटनेमध्ये शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताच्या नव्हे, तर आधुनिक जगाच्या इतिहासातील एक श्रेष्ठ युगपुरूष होय. त्यांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रांतील अनमोल अशा कार्याचा आढावा घेतल्यानंतर त्याची प्रचिती येते.

डॉ. आंबेडकरांनी लिहिलेली भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वोत्तम राज्य घटना मानली जाते. यावरून त्यांची विद्वत्ता, त्यांचे कार्य लक्षात येते. भारतीय दीनदुबळया, दलित, आदिवासी, महिला या सर्व बहूजनांसाठी त्यांनी फार मोठे कार्य केले आहेत. डॉ. आंबेडकरांनी सैध्दांतिक आणि व्यावहारिक आर्थिक प्रश्नांवर अत्यंत दर्जेदार अर्थशास्त्रीय मांडणी केली आहेत. तसेच देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, कायदा, शैक्षणिक, सांस्कृतिक, विद्युत, जल, कृषी, स्त्रीउध्दार, दलितोध्दार अशा अनेक क्षेत्रात अतुलनिय योगदानामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आधुनिक भारताचे जनक असेही संबोधिले जाते.प्रचंड कुशाग्र बुध्दीमत्ता, प्रगाढ विद्वत्ता, तल्लख स्मरणशक्ती असलेले बहूआयामी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ज्ञानक्षेत्रातील तब्बल ६४ विषयांवर प्रभुत्व असणारे जगाच्या इतिहासातील ते प्रथम व एकमेव व्यक्ती आहेत. तसेच इंग्लंडच्या केंब्रिज विद्यापीठाचे संशोधन असून त्यांना जगाच्या इतिहासातिल पहिला सर्वात बुध्दिमान व्यक्ती म्हणून सन्मानित केले गेलेले आहे.

इंग्लंडमध्ये असतांना डॉ. आंबेडकरांनी ब्रिटीश म्युझियम लायब्ररीमध्ये बसून जगातील अनेक धर्मांचे ग्रंथ व आर्थिक विचारवंतांचे ग्रंथ अभ्यासले. जगामध्ये डॉ. आंबेडकरांएवढे वाचन कोणत्याही व्यक्तीने केलेले नाही. कारण ब्रिटीश म्युझियम लायब्ररीमध्ये सर्वात जास्त तास अभ्यास करण्यासाठी फक्त बाबासाहेब बसत होते हे सत्य नाकारता येत नाही.

बाबासाहेब यांचे पुस्तकप्रेम अपार होतं. पुस्तकांची आवडही त्यांची कधीही न संपणारी तृष्णा झाली आणि त्यासोबतचे एक वेगळेच नाते निर्माण झाले. जणू त्यांच्यारोजच्या जीवनाचा भाग बनून त्यांच्याआयुष्यभर सोबती म्हणूनचराहिली. या गोष्टीमुळे त्यांची स्मरणशक्ती अफाट बनली होती.

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकदा म्हणाले होते, “तुमच्याकडे दोन रूपये असतील तर एक रूपयाची भाकरी घ्या आणि एक रूपयाचं पुस्तक. कारण भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल तर पुस्तक कसे जगायचे ते शिकवेल.”

ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र, निवारा, मानवाच्या मुलभूत गरजा आहेत त्याप्रमाणेच पुस्तके ही देखील मानवाची मूलभूत गरज आहे असे बाबासाहेबांच्या या विचारातून स्पष्टपणे सांगतात.

**डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथप्रेमां विषयी काही महत्वपूर्ण घटना –**

१) १९५१ च्या सप्टेंबर महिण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नेहरू मंत्रिमंडळातील आपल्या कायदेमंत्रिपदाचा राजीनामा दिला. आता एक मोठी अडचण त्यांच्यापुढे निर्माणझाली. मंत्रिपदाचाराजीनामा दिल्यामुळे मत्र्यांचे निवासस्थान सोडायला लागणार आणि दुसरे छोटे निवासस्थान राहण्यासाठी निवडावे लागणार. यात सर्वात मोठी अडचण एक होती, ती म्हणजे डॉ. बाबासाहेबांचा प्रचंड ग्रंथसंग्रह. हा दुसऱ्या खासगी जागेत राहणं शक्यच नव्हतं. अखेर त्यातला मोठा भाग त्यांनी रेल्वेने मुंबईस धाडला आणि आपल्या राजगृह या बंगल्यात त्या ग्रंथाची सोय केली.

२) मुंबईला राजगृह हे निवास्थान बाबासाहेबांनी बांधले, तेव्हाची गोष्टआपल्याग्रंथांची योग्य सोयलागावी म्हणून डॉ. बाबासाहेबांनी आपल्याबंगल्याच्याबांधकामात अनेक वेळा बदल केले. केव्हा केव्हा तर बांधलेला काही भाग पाडायलाही लावला. अखेर राजगृहबांधूनझाल्यावर डॉ. बाबासाहेब त्यात राहायला गेले, तेव्हा त्यांच्या सुसज्ज ग्रंथालयाचा हॉल हेच राजगृहातील महत्वाचेसभागृह ठरले. याआपल्याआवडत्या राजगृहात बसून साहेबांनाकेवढा आनंद होई !

३) बाबासाहेब एका परीक्षेत पास झाले होते तेव्हा त्यांचा गौरव व्हावा म्हणून त्यांच्या चाळीतील काही लोकांनी त्यांचा सत्कार कार्यक्रम करायचे ठरवले. त्या कार्यक्रमात बाबासाहेबांना गौतम बुध्द यांचे चरित्र भेट देण्यात आले. ते पुस्तक वाचल्यानंतर तथागत गौतम बुध्द यांच्या तत्वज्ञानाचा त्यांच्यावर मोठा प्रभाव पडला आणि बाबासाहेब यांनी बुध्द यांना आपले गुरू मानले. नंतर सामाजिक क्षेत्रात ते बौध्द धर्माकडे वळून धर्मांतराचा इतिहास घडला. एक छोटसं पुस्तक कोणाच्या जीवनात केव्हा परिवर्तन घडवेल हे सांगता येऊ शकत नाही. बाबासाहेब परदेशात शिकायला होते तेव्हा त्यांच्याकडे पुस्तके खरेदीसाठी पैसे नसत. तेव्हा ते ग्रंथालयात जाऊन ग्रंथालय जितका वेळ उघडं असेल तितका वेळ ते तिथे पुस्तके वाचत बसत.

४) एकदा पंडित मदनमोहन मालवीय यांनी डॉ. बाबासाहेबांचा ग्रंथसंग्रह पाहिला. इतका महत्वाचा, इतका प्रचंड ग्रंथसंग्रह बनारस हिंदू विद्यापीठात असावा, अशी इच्छा मालवीयांना उत्पन्न झाली. त्यांनी बाबासाहेबांना म्हटले देखील, बाबासाहेब, हा आपला ग्रंथसंग्रह बनारस हिंदु विद्यापीठाला द्या. तो हजारो विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल, आमच्या विद्यापीठात ते तुमचे स्मारक होईल. विद्यापीठ त्यासाठी आपणाला दोन लाख रूपये देईल.पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, माझे ग्रंथालय म्हणजे माझे जणू प्राण आहेत. मी त्यावाचून जगू शकणार नाही ! डॉ. बाबासाहेबांचे हे ग्रंथप्रेम पाहून पंडित मदनमोहन मालवीय चकित झाले. अखेर बाबासाहेबांनी आपला प्रचंड ग्रंथसंग्रह आपल्या आवडत्या सिध्दार्थ महाविद्यालयाला दिला.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लंडनहून आपले शिक्षण अपुरे सोडून भारतात परत यावे लागले. भारतात चार वर्षात तो प्रबंध पुर्ण करून धाडण्याची खास परवानगी त्यांना मिळाली. इंग्लंडमध्ये असतांना त्यांनी नव्या, जुन्या पुस्तकांच्या अनेक दुकानातुन फिरून मोठया प्रमाणात पुस्तके खरेदी केली. पुस्तके व आपले सामान यांची बांधाबांध करून त्यांनी बोटीने ते भारतात पाठवून दिले. पण त्या बोटीत त्यांना स्वत:ला मात्र जागा मिळाली नाही म्हणून ते मागच्या बोटीने निघाले. बाबासाहेब बोटीने भारतात परत येणार म्हणून मुंबईला त्यांच्या घरी आणि समाजात मोठे आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पसरले. इतक्यात इंग्लंडहून भारतात येणारी बोट भूमध्यसागरात बुडाली. ही बातमी समजताच एकच हलकल्लोळ उडाला. पण आश्चर्य असे, की मागच्याबोटीने बाबासाहेब सुखरूप मुंबई बंदरातयेऊन उतरले. बाबासाहेबांना पाहताच साऱ्यांच्या डोळयांत आनंदाने अश्रू आले. पण आपल्या आधीची बोट बुडाली, ही बातमी कळताच बाबासाहेबांना मात्र अतोनात

दु:ख झाले कारण त्यांनी मुद्दाम आवडीने खरेदी केलेल्या शेकडो दुर्मीळ पुस्तकांनाही त्या बोटी–बरोबरच जलसमाधी मिळाली होती.

६) बाबासाहेब लंडनमध्ये उच्च शिक्षणासाठी गेले होते, तेव्हाची गोष्ट खूप वाचन केल्यामुळे बाबासाहेबांच्या डोळयांवर ताण पडला. त्यांना वाचनाचा त्रास होऊ लागला, डोळे बिघडले म्हणून ते डोळयांच्या डॉक्टरकडे गेले. डॉक्टरांनी डोळे तपासले. औषध दिले आणि ते म्हणाले हे पहा, तूर्त काही दिवस वाचनाचे काम थोडे कमी करा. नाहीतर तुमच्या डोळयांना त्रास होईल. थोडे दिवस औषध घेतलेत की डोळे पूर्वीप्रमाणे होतील. डॉ. बाबासाहेब दवाखान्यातून आपल्या खोलीवर आले. पण त्यांच्या मनात सारखे येत होते, माझी दृष्टी पूर्वीसारखी होईल ना ? कारण दृष्टी कमी झाली तर सारे वाचन थांबेल आणि माझ्या आवडत्या पुस्तकांचे वाचन आणि अभ्यास मी करू शकलो नाही तर माझ्या जिवंत राहण्याचा तरी काय उपयोग ?पण औषधाने आणि डॉक्टरांनी दिलेल्या नवीन नंबरचा चष्मा घेतल्याने बाबासाहेबांचे वाचन नेहमीप्रमाणे सुरू झाले आणि त्यांच्या मनात आलेली दृष्ट शंका दूर झाली.

७) बाबासाहेब हे त्यांचा शेवटचा ग्रंथ 'भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म' लिहीत होते तेव्हा त्यांच्या सोबत त्यांचे स्वीय सहायक होते. ते गेल्यानंतरही बाबासाहेब लिहित बसले. सकाळी स्वीय सहायक परत घरी आले त्यावेळी त्यांना बाबासाहेब लिहीतच बसलेले दिसले.

८) आपल्या अभ्यासात बाबासाहेबांना व्यत्यय अजिबात आवडत नसे. जगातील अनेक देशांच्या घटनांचा अभ्यास करण्यासाठी बाबासाहेबांनी १४ दिवस खोलीला बाहेरून कुलूप लावून स्वत:ला कोंडून घेतले होते. त्यावेळी त्यांना एका लहान खिडकीतून चहा व जेवनाची व्यवस्था केली होती. या प्रसंगातून समजते त्यांच्या लेखन व वाचनाची एकाग्रता किती पराकोटीची होती. अर्थातच त्यांचीहीसर्व मेहनत मानवमुक्तीच्यालढयात न्याय व हक्कांसाठी सुरू होती.

**समारोप :**

बाबासाहेबांच्या या स्वत:च्या खासगी ग्रंथालयात तेराशे साहित्यावरची, तीन हजार राजकारणावरची, पाचहजार कायद्यावरची, अडीच हजार इतिहासावरची, दोन हजार धर्मावरची याशिवाय अर्थशास्त्र, युध्दशास्त्र, तत्वज्ञान वगैरे अनेक विषयांवरची अक्षरश: हजारो पुस्तके होती.

बाबासाहेबांनी जगातल्या महत्वपूर्ण ग्रंथाचा अभ्यास केला. लहानपणापासूनच वाचनाने ते प्रज्ञासूर्य होऊन जागतिक कीर्तीचे महापुरूष झाले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे ते सतत लोकांना सांगत. बाबासाहेबांनी आपल्या राजकीयआणिसामाजिक क्षेत्रात अनेक ग्रंथ, अग्रलेख लिहिले. जे आजच्याकाळातही देशाच्याजडणघडणीत दिशादर्शक आहेत. संविधान सभेतील त्यांची भाषणे अतिशय अभ्यासपूर्ण व बिडतोड ठरलेली आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ग्रंथसंग्रह जसा प्रचंड होता, तसे त्यांचे वाचनही अफाट होते. एकदा ते सभेत म्हणाले, भारतातील कम्युनिस्टांनी कम्युनिझमवरील जेवढी पुस्तके वाचली आहेत, त्यापेक्षा कम्युनिझमवरील अधिक पुस्तकांचा अभ्यासमी केला आहे ! आणि हे खरेच होते ! असे होते डॉ. बाबासाहेबांचे अफाट वाचन आणि अफाट ग्रंथप्रेम.

**संदर्भ :**

१) पवार दया, (१९९९), ***"डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ"***,मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ.

२) कीर धनंजय, (१९८९), ***"डॉ. बाबासाहेब आंबेडकर"***,मुंबई, पॉप्युलर प्रकाशन

३) धनराज डहाट, (२००३), ***"डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारखंड"***,मुंबई, साकेत प्रकाशन

४) लोखंडे भाऊ,(२०१२), ***"डॉ. आंबेडकर प्रणाली आणि आपण"***,कोल्हापूर, पारिजात प्रकाशन.

५) आगलावे प्रदिप, (२०१५), ***"भारतीय समाज प्रश्न आणि समस्या"***,नागपुर, श्री साईनाथ प्रकाशन

६) भीमराव रामजी आंबेडकर – वीकीपीडीया

# युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य

डॉ. बब्रुवान मोरे

इतिहास विभाग प्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

**प्रस्तावना:**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे स्वतः आदर्श विद्यार्थी होते. त्यांनी भारतातच नाही तर अमेरिका व इंग्लंड सारख्या देशात जाऊन उच्च पदव्या प्राप्त केलेल्या होत्या. समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र म्हणजे शिक्षण शिक्षणामुळेच प्रत्येक व्यक्ती आपला सर्वांगीण विकास घडवू शकते. मात्र आपल्या देशात प्राचीन काळी शिक्षणक्षेत्रात विशिष्ट वर्गाचीच मक्तेदारी असल्याने सर्वसामान्य बहुजनांसाठी शिक्षणाची कवाडे बंद करण्यात आली होती. त्यामुळे बहुजन समाजातीलमाणसे मानसिकदृष्ट्या गुलाम, सांस्कृतिकदृष्ट्या पंगू, आर्थिकदृष्ट्या दरिद्री व सामाजिकदृष्ट्या मागासले पणाचे जीवन जगत होती. बहुजन समाजातीलनिरक्षर जनतेला अज्ञानाच्या अंधकारातून मुक्त करून त्यांना ज्ञानाचा प्रकाश दाखविण्यासाठी या देशात अनेक समाजसुधारकांनी क्रांतिकारी चळवळी उभारल्या, हा सारा इतिहास आपणास माहीतआहे. संपूर्ण महाराष्ट्रात तळागाळातल्या माणसांपर्यंत शिक्षण पोहचविण्याचे महान कार्य करणारी एक कृतिशील चळवळ म्हणून फुले, शाहू व आंबेडकरी चळवळीचा आदराने उल्लेख केला जातो. भारतातील अस्पृश्यता व जातीभेद संपवित बहुजनांच्या शिक्षणासाठी झटणारे थोर समाजसुधारक म्हणजे म. फुले, सावित्रीबाई फुले व राजर्षी शाहू महाराज होत. त्यांच्या कार्याची पताका मिरवत देशविकासात महत्त्वाचे योगदान देणारा थोर शिक्षण महर्षीमहापुरुष म्हणजे डॉ. भीमराव रामजी आंबेडकर.

डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण घेतल्यानंतर गोरगरिबांच्या शिक्षणासाठी म्हणून चिंतन केले. बुद्धिमत्तेची प्रचंड शक्ती लाभलेल्या या महामानवाने आयुष्यभर ज्ञानसाधना करून सवर्च क्षेत्रांविषयी मूलगामी चिंतन केले. त्यांच्या या ज्ञानसाधनेचा लाभ साऱ्या देशाला झाला. तळागाळातीललोकांच्या उद्धारासाठी त्यांनी करुणेने आपल्या ज्ञानाचा उपयोग केला. ज्ञान हाच प्रकाश आणि शक्ती समजून निरक्षर जनतेला गाढ झोपेतून जागे करण्याचे अवघड कार्य डॉ. बाबासाहेबआंबेडकरांनीकेले. शिक्षण हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणि कार्यकर्तृत्वातील अनेक पैलूंपैकी सर्वात महत्त्वाचा पैलू होता. शिक्षणाकडे बघण्याची त्यांची दृष्टी व्यापक समाजहिताची व देशहिताची होती. शिक्षणासंबंधी बाबासाहेबांनी प्रकट केलेले विचार त्यांची दूरदृष्टी व प्रगल्भता सिद्ध करणारे आहेत. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात युगपुरुष डॉबाबासाहेब आंबेडकरांच्याशैक्षणिक कार्याचासखोल आढावा घेतलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार अभ्यासणे.
2) डॉ. आंबेडकरांच्या मते शिक्षक कसा असावा याची माहिती घेणे.
3) डॉक्टर आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके:**

1) डॉ.बाबासाहेबआंबेडकरहेस्वतः आदर्श विद्यार्थी होते.
2) डॉ.आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार आजही अनुकरणीय आहेत.
3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य प्रशंसनीय स्वरूपाचे आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक प्रमुख विचार:**

गोरगरीब जनतेची व दलितांची प्रगतीशिक्षणाशिवाय होऊ शकणार नाही, यावर डॉ. बाबासाहेबांची निष्ठा होती. शिक्षण म्हणजे परिवर्तन हे त्यांच्या शैक्षणिक विचाराचे मुख्य सूत्र होते. शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन आहे, म्हणून प्रत्येकाने शिक्षण घ्यायलाच पाहिजे असे तेम्हणत असत. शिक्षणाअभावी मनुष्य दुसऱ्याचा गुलाम कसा होतो, याविषयी बाबासाहेब माहिती देत असत.शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो. अर्थात प्रत्येक व्यक्तीला त्याच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने शिक्षणाचे महत्त्व

काय आहे याची जाणीव करून देणे म्हणजे खरे शिक्षण हा डॉ. बाबासाहेबांच्या दृष्टीने निश्चितचमहत्त्वपूर्ण मुद्दाआहे. आजच्या सर्व सामाजिक समस्यावरशिक्षण हीच उपाययोजना आहे, असे त्यांचे मत होते. म्हणूनच बहुजन समाजाच्याशिक्षणासाठी विलक्षण असे कार्य करण्याचे स्वप्न बाळगले होते. आपल्या कार्याद्वारे त्यांनी ते साकार करण्याचा प्रयत्न केला, या कार्यात त्याना महात्मागौतम बुद्ध, महात्माज्योतिबाफुले यांचे शिक्षणविषयक विचार आदर्शभूत होते. माणसाच्या सर्व प्रश्नांची मुळे त्यांच्या अज्ञानात आहेत' असे परखडपणे सांगणारा बुद्ध त्यांचा आदर्श होता. विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीती विना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले, असा काव्यात्मक विचार सांगणारे महात्मा फुले हे त्यांचे आदर्श होते. शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हटते पहा' हा सावित्रीबाई फुले यांचा विचारही डॉ बाबासाहेबांना आदर्शवत वाटला. अज्ञानाला संपुष्टात आणण्यासाठी प्रत्येक व्यक्तीमध्ये स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोद्धार निर्माण करण्याची क्षमता शिक्षणात असायला पाहिजे. व्यक्तिमत्वाचा शोध घ्यायला लावणारे बीज शिक्षणात असावे अशी डॉ. बाबासाहेबांची अपेक्षा होती. म्हणूनचत्यांना आदर्शवत वाटणाऱ्या विचारांची त्यांनी पूजा केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, शिक्षणाच्या माध्यमातून माणसाला घडविता येते. जे माणूस घडविते तेच खरे शिक्षण होय अशी बाबासाहेबांची धारणा होती. शिक्षणामध्ये ज्ञान आणि प्रज्ञा यांचा सुरेख संगम असतो. केवळ ज्ञान उपयोगाचे नाही तर जे उपयोगी येते तेच खरे ज्ञान, अशी त्यांची धारणा होती. शिक्षण हे मूल्याधिष्ठित म्हणजेच उच्चतम नैतिक आचरण निर्माण करणारे असावे, ग्रंथ हे त्या शक्तीचे साधन आहे असे त्यांचे स्वतःचे आदर्श मत होते. डॉ. बाबासाहेब म्हणत, लोकशाही यशस्वी करायची असेत तर समाज नैतिक मूल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे संस्कारित असावा लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षित नैतिक मूल्याधिष्ठित समाजाची लोकशाही ही सर्वाधिक यशस्वी ठरू शकेल. अर्थात मूल्याधिष्ठित समाजाची लोकशाही प्रस्थापित करायची असेल तर नैतिक शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. याबाबत त्यांनी जो आपल्या पत्नी आणि अपत्यापेक्षाही शिक्षणावर प्रेम करतो तो खरा शिक्षण प्रेमी अशी डॉ. आंबेडकर यांची धारणा होती

**शील संवर्धनासाठी मौलिक शिक्षण:**

शिकलेला माणूस विद्वान होतो परंतुविद्येला शील आणि करुणा यांची जोड मिळणे आवश्यक आहे. एखाद्या शिकलेल्या माणसाचे शील चांगले असेल तर आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी करील. परंतु त्याचे शील चांगले नसेल तर तो ज्ञानाचा उपयोग लोकांचे अकल्याण करण्यासाठी खर्ची घालेल. म्हणून शिक्षणाबरोबरच माणसाचे शीलही सुधारले पाहिजे, यावर डॉ. बाबासाहेबांचा प्रचंडविश्वास होता.

**गुलामगिरी मुक्तीसाठी शिक्षणाची आवश्यकता:**

शिक्षणाची संधी देशातील सर्व समाजघटकांना प्राप्त व्हावी यासाठी डॉ. बाबासाहेबांनी रात्रंदिवस प्रयत्न केले. दीन दलितांचे दैन्य संपविणाराएकमेव मार्ग म्हणजे त्यांचे शिक्षण होय. या देशात धर्माच्या नावाखाली सामाजिक गुलामगिरी लादली गेली. त्यातून मुक्त होण्यासाठी शिक्षणाशिवायतरणोपाय नाही, असे मत व्यक्त करताना डॉ. आंबेडकरम्हणतात, शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास करून आणणारे सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळवण्याचे एकमेव महत्त्वपूर्ण शस्त्र आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य:**

डॉ. बाबासाहेबआंबेडकरांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी शैक्षणिक क्षेत्रात अनेक प्रकारचे क्रांतिकारी कार्य केलेले आहे. बाबासाहेबांच्या शैक्षणिक कार्यामुळे शिक्षणाची गंगा दलितांच्या आणि गरिबांच्या घरात वाहत आली.

**डॉ. आंबेडकरांनी प्राध्यापक म्हणून केलेले कार्य:**

परदेशात उच्च शिक्षण घेऊन डॉ. आंबेडकर भारतात परत आले. त्यांची लष्करी चिटणीस म्हणून बडोद्यात नेमणूक झाली होती. संपूर्णहिंदूंनीअस्पृश्यतेचीवाईटवागणूककेल्यामुळेतेनोकरीसोडूनमुंबईसपरत आले व त्यांनी जीवनाला नवीन वळण दिले. डॉ. आंबेडकरांनी नोव्हेंबर 1918 मध्ये मुंबईत सिडनहॅम महाविद्यालयात प्राध्यापकाची जागा स्वीकारली, कारण लंडनला पुन्हा जाऊन आपला कायदा व अर्थशास्त्र यांचा अपुरा राहिलेला

अभ्यास पूर्ण करण्यासाठी लागणारा पैसा आपणास या नोकरीमुळे लाभेल, हा महत्त्वाचा उद्देशमनाशी बाळगून त्यांनी ही नोकरी पत्करली. सिडनहॅम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ह्या नवागत प्राध्यापकाकडे पहिल्यादा फारसे लक्ष दिले नाही. महार प्राध्यापक आपणास काय शिकविणार, असे त्या स्पृश्य नि पुढारलेल्या समाजातील तरुणांना वाटे. परंतु त्यांनी आपल्या विद्वतेने विचारप्रवर्तक विचारांनी व आकर्षक व्यक्तिमत्त्वाने अल्पावधीतच सर्व विद्यार्थ्यांवर प्रचंडप्रभाव पाडला. ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक बनले त्या वेळी प्राध्यापक डॉ. आंबेडकरांनी आपल्या व्याख्यानासाठी टिपणांचा जो अवाढव्य संग्रह केला होता, त्यातून अर्थशास्त्रावर एक प्रचंड ग्रंथ निर्माण झाला ते यशस्वी प्राध्यापक झाले, तरी पण त्यांचा अपमानसतत सुरूच होता. त्यांना प्राध्यापक कक्षातीलभांड्यानेपाणी पिण्यास मनाई होती. पदोपदी व साथी ठायी होणाल्या मानखंडनेमुळे अस्पृश्यतेचा मूलभूत प्रश्न हाती घ्यावा, अशी त्यांच्या मनाला जाणीव झालीहोती. त्या उद्देशाने अस्पृश्य समाजाच्या जीवनात चैतन्य ओतून त्यांच्यातील स्वाभिमान जागृत केला.

डॉ. आंबेडकरांनी नोव्हेंबर 1918 से मार्च 1920 पर्यंत सिडनहॅम महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य केले होते. लंडनहून परत आल्यावर डॉ. आंबेडकरांनी वकिलीव समाजकार्य सुरू ठेवले होते. त्यांनी मोफत शिक्षणाच्या योजनेचे विशेषत्वाने समर्थन केले होते. शिक्षणाच्या बाबतीत ते कुणाचीही ढवळाढवळ पसंत करीत नसत. मुंबईच्या पोयबावाडी येथील सरकारी चाळीतील डॉ. आंबेडकरांच्या खोलीबाहेरील आवारात एकदा नगरपालिकेने सक्तीच्या मोफत शिक्षणाच्या योजनेचे उद्घाटन करण्यासंबंधी सभा चालली होती. त्या वेळी मुस्लिमांचे पुढारी शौकत अली हे डॉ. आंबेडकरांना अचानक भेटावयास आले. डॉ. आंबेडकरांनी शौकत अली यांना सभा संपेपर्यंत तेथेच त्यांच्यासोबत मोफत शिक्षणासंबंधी चर्चा केली व शिक्षणाचे महत्त्व पटविले.

**लॉ कॉलेजचे प्राचार्य म्हणून डॉ. बाबासाहेबांनी केलेले कार्य :**

मुंबई सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सरकारी विधी महाविद्यालयाचे प्राचार्य पदावर जून 1935 पासून नियुक्त केले. शिवाय न्यायशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यांनी हे पद त्यांची पत्नी रमाबाई यांच्या मृत्यूपूर्वी स्वीकारले होते. आता त्यांना प्रशासकीय कार्याकडे लक्ष द्यावे लागले. विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर असणे म्हणजे उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीचे पद मिळाल्यासारखेहमखास स्थान होते. अशा महत्त्वपूर्ण पदावर स्थानापन्न झाल्यानंतर थोड्या दिवसांतच डॉ. आंबेडकरांनी विधी महाविद्यालयाच्या कार्यात व शिक्षणपद्धतीत सुधारणा करण्याकरिता काही मोलाच्या सूचना सरकारी अधिकाऱ्यांकडे पाठविल्या व सुधारणा करण्याची विनंती केली.

डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या कार्यात व योजनात उत्साहाने भाग घेत होते. त्यांच्याविषयी विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये प्रचंड प्रमाणात आदर होता. डॉ. आंबेडकरांसंबंधी विधी महाविद्यालयाच्या मासिकात जानेवारी 1936 च्या अंकातील संपादकीय लेखात म्हणतात, डॉ. आंबेडकर हे नामांकित वकील असून अर्थशास्त्रावरील जिव्हाळयाचे अभ्यास करणारे व्यासंगी आहेत. ते घटनाशास्त्रातील एक अधिकारी व्यक्ती आहेत, अशी त्यांची हिंदुस्थानात व इतरत्र ख्याती आहे. अशा प्रकारचा गुणगौरव बाबासाहेबांचा करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पददलित बांधवांच्या सेवेसाठी भरपूर वेळ मिळावा म्हणून अध्यापनाचा व्यवसाय सोडला. त्यांनी सरकारी विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाचा मे 1938 मध्ये राजीनामा दिला. डॉ. आंबेडकर लॉ कॉलेजचे प्राचार्य म्हणून तीन वर्षे त्या पदावर राहिले. या अवधीत लॉ कॉलेजच्या कारभारात ज्या अनेक सुधारणा घडवून आणल्या, त्यापैकी डोळयात भरण्यासारख्या दोन सुधारणा प्रमुख आहेत. एक लॉ कॉलेजचे ग्रंथालय तितके व्यवस्थित नव्हते. ते ग्रंथालय प्रथम त्यांनी आपल्या अधिकाराखाली व्यवस्थित केले व नंतर त्यात कायद्यावरील शेकडो ग्रंथांची भर हळूहळू टाकली. लॉ कॉलेज तेव्हा फुल टाईम कॉलेज व्हावे, त्याला स्वतंत्र इमारत हवी आणि स्वतंत्र रजिस्ट्रार हवा अशी सरकारकडे त्यांनी मागणी करून ती यशस्वी केली. या कॉलेजचे वर्ग पूर्वी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये सकाळी व सायंकाळी भरत असत. या कॉलेजची इमारत मुंबईच्या चर्चगेटजवळ बांधण्यात आल्यानंतर ते महाविद्यालय फुल टाईम म्हणून सुरू झाले. अशाप्रकारे बाबासाहेबांनी प्रचंड मेहनत घेतली.

**प्राथमिक शिक्षणातील कार्य :**

डॉ. बाबासाहेबांना प्राथमिक शिक्षणाविषयी विशेष ओढ होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणावर विशेष भर दिला. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. सध्याच्या युगात ज्या देशामधील बहुजन समाज निरक्षर आहे, अशा देशाचा जीवनाच्या कठीण प्रसंगातटिकाव लागावयाचा नाही. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या इच्छेवर हा प्रश्न सोडविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कित्येक शतके लागतील म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करणे आवश्यक आहे. जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करूनच लोकांची निरक्षरता हद्दपार केली, असे आपणास दिसून येते. जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात, त्यांच्यावर शिक्षणासाठी अर्थातच सक्ती करावी लागत नाही. ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही व ते ज्या बाबतीत उदासीन असतात, त्यांच्याकरिताच सक्तीच्या कायद्याची आवश्यकता असते. म्हणून या देशात शिक्षणामध्ये मागासलेले जे वर्ग आहेत, त्यांच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे. म्हणूनच डॉ. आंबेडकर यांनी सर्वसामान्य जनतेच्या प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले

**गरीब व दलित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांना शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती होणार नाही, याची प्रामुख्याने जाणीव होती. म्हणूनच दलितांच्या आणि गोरगरीब सामान्य जनतेच्या शिक्षणा साठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.

**पीपल्स एज्युकेशन सोसायटीची ध्येय व उद्दिष्टे :**

1.महाविद्यालयीन, माध्यमिक, तांत्रिक व भौतिक इत्यादी शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याची तजवीज करणे.

2.शैक्षणिक इन्स्टिट्यूट सुरू करणे, विद्यालये, महाविद्यालये, वसतिगृहे, ग्रंथालय, खेळ, मैदाने इत्यादी मुंबई राज्यातील योग्य ठिकाणी, त्याच प्रमाणे भारतात कोणत्याही ठिकाणी असणाऱ्या इन्स्टिट्यूटला मदत करणे.

3.गरीब लोकांसाठी शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे.

4.अनुसूचित जाती जमातीला शिक्षणासंबंधी आवड निर्माण करणे व त्याकरिता उत्तेजन देणे. विशेषत्वाने भारतातील व परदेशातील उच्च शिक्षणासाठी खास सोयी सवलती, शिष्यवृत्त्या, शुल्क सवलती उपलब्ध करून देणे.

5.विज्ञान, साहित्य व ललित कला यांचे महत्त्व वाढविणे व उपयोगी ज्ञान दान करणे.

**पीपल्स एज्युकेशन सोसायटीद्वारे विविध संस्थाव विद्यापीठ संलग्न महाविद्यालये:**

मुंबईयेथे गोरगरीब लोकांना व दलितांना शिक्षण मिळत नव्हते, यासाठी डॉक्टर आंबेडकरांनी मुंबई येथे खालीलमहाविद्यालये सुरू करून शिक्षणाची सोय केली.

1.सिद्धार्थ कला व विज्ञान महाविद्यालय (स्थापना 1946)

2. सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, (स्थापना 1955)

3.सिद्धार्थ विधी महाविद्यालय (स्थापना 1956)

4.डॉ. आंबेडकर वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, वडाळा (स्थापना 1972)

5.डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, वडाळा

**औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली शैक्षणिक महाविद्यालये:**

1. मिलिंद विज्ञान महाविद्यालय, (स्थापना 1950)

2. मिलिंद कला महाविद्यालय स्थापना (1960)

3.डॉ. आंबेडकरवाणिज्य महाविद्यालय (स्थापना 1960)

4.डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय (स्थापना 1968)

अशाप्रकारे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या शिक्षणासाठी प्रचंड कार्य केले. आज बाबासाहेबांच्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा प्रचंड मोठा वटवृक्ष झालेला आहे. शिक्षण क्षेत्रातील एक नामवंत संस्था म्हणून पीपल्स एज्युकेशन सोसायटीने आपले नाव अजरामर केलेले आहे.

**निष्कर्ष:**

शिक्षण हा विषयडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साठी जीव कि प्राण होता.शिक्षणामुळे माणसाची आणि पर्यायाने समाजाची सर्वांगीण प्रगती होते यावर त्यांचा विश्वास होता. डॉ. आंबेडकरांनी शिक्षण व विद्या यांशिवाय आपला उद्धार होणार नाही याच साठीशिक्षण क्षेत्रात मोठी कामगिरी केली. मुळात शिक्षणाची प्रचंड आवड असल्यामुळेसुरुवातीला प्राध्यापक, प्राचार्य पद स्वीकारल्यामुळे त्यांना शिक्षणाची जाणीव होती. अस्पृश्य तळागाळातील लोकांना शिक्षणाची दारे खुली करण्यासाठी तात्कालिक राजकीय व्यवस्थेशी संघर्ष केला. विद्यापीठाची रचना व कार्य कशा पद्धतीने असायला पाहिजे, यासंदर्भात महत्त्वाचे कार्य बाबासाहेबांनी केले. वृत्तपत्रातून सामाजिक शिक्षणव लोकशिक्षण प्रसाराचे मोठे कार्य केले. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून एक आदर्श महाराष्ट्रातील शैक्षणिक केंद्र मुंबई व औरंगाबाद येथे निर्माण केले. डॉ. आंबेडकरांनी मागासवर्गीयांकरिता संविधानात शैक्षणिक तरतुदी केल्यामुळे दलितांना राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात सामील केले. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर असल्यामुळे त्यांनी दलितांनाव वंचितांना योग्य तो न्याय संविधानाच्या माध्यमातून दिलेला आहे. शिक्षण क्षेत्रात बाबासाहेबांनी केलेले कार्य अजरामर स्वरूपाचे असून, त्यांचे शिक्षणावर किती प्रेम होते हे प्रकर्षाने दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:**

1.डॉ.बाबासाहेबआंबेडकर:'लेखन आणि भाषणे खंड 18, भाग 1', डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन (2002).

2.कीरधनंजय 'डॉ. बाबासाहेबआंबेडकर', पॉप्युलरप्रकाशन, मुंबई, चौथीआवृत्ती (1984).

3.मनोहरयशवंत: 'डॉ. आंबेडकर एक शक्तिवेध', संघमित्रा प्रकाशन, नागपूर (1991).

4.डॉ. आंबेडकर बी. आर., देविदास घोडेस्वार (अनुवाद) : 'दलितांचे शिक्षण', समता प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती (1989).

5.शास्त्रीसोहनलाल : 'डॉ. आंबेडकर के संपर्क में २५ वर्ष', बुद्धिष्ट सोसायटी ऑफ इंडिया, दिल्ली (1991).

6.जाधव, नरेंद्र (संपा.), बोल महामानवाचे, खंड 2, मुंबई, ग्रंथाली प्रकाशन, 2013

7. उहाके, वसंत आबाजी (संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई, लोकवाइ मय गृह, 2008

8. पवार, दया (सपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, 1993.

9. खरात, शंकरराव (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, पुणे, इंद्राणी साहित्य, 1990.

10.पानतावणे, गंगाधर (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, पुणे, प्रतिमा प्रकाशन, 1998.

11.डाहट, धनराज (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व भाषणे, खंड 2.

# रुपयाच्या प्रश्नावर बोलणारा जगातील पहिला अर्थतज्ज्ञ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. राजेश गं. उंबरकर**
**ने.सु.बो. महा. नांदेड.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर (Dr. Babasaheb Ambedkar) यांना आपण संविधान निर्माते (Constitution of India)म्हणून जाणतो. दलितांसाठी आणि मागासलेल्या समाजासाठी त्यांनी केलेल्या महान कार्याबद्दल नेहमीच बोलले जाते. परंतु दुर्दैवाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रातील योगदानाबद्दल (Contribution in Economics) फारसे बोलले जात नाही, लिहिले जात नाही. सोमवार ६ डिसेंबर २०२१ रोजी ६५वा महापरिनिर्वाण दिन (Dr. Babasaheb Ambedkar Mahaparinirvan 2021) आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ (World class distinguished Economist)होते ही गोष्ट अनेकांच्या विस्मरणातच गेली आहे. आज जेव्हा आपण सातत्याने रुपया (Rupee) आणि डॉलर (Dollar) यांच्या मूल्याबद्दल बोलतो. आयात निर्यात, व्यापारी तूट यावर बोलतो. डॉलरच्या तुलनेत घसरणाऱ्या रुपयाच्या मूल्यावर चर्चा केली जाते. तेव्हा डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय काम हे अत्यंत समकालीन होऊन बसते. त्यांच्या कामाचे आणि ज्ञानाचे महत्त्व आजही तितकेच महत्त्वाचे ठरते. एक अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी रुपयाच्या प्रश्नावर केलेले विश्लेषण आणि हा प्रश्न, त्यावरील उत्तराची मांडणी त्यांच्यातील जबरदस्त अर्थतज्ज्ञाची जाणीव करून देतो. (Dr. Babasaheb Ambedkar, The Forgotten Economist who analyzed the problem of rupee a century ago)

**युरोप आणि अमेरिकेनेदेखील घेतली होती दखल**

डॉ. बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू आहेत. कायदेतज्ज्ञ, समाज सुधारक, पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत इत्यादी. मात्र त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एका पैलूकडे त्यांच्या ज्ञानाच्या एका मोठ्या क्षेत्राकडे नेहमीच दुर्लक्ष होते ते म्हणजे अर्थशास्त्र. ते एक महान अर्थतज्ज्ञ होते हे आपण विसरून जातो. किंबहुना या दृष्टीने डॉ. आंबेडकरांचे विश्लेषण फारच कमी वेळा होते. त्यांच्या अर्थशास्त्रीय ज्ञानाबद्दल, त्यांनी मांडलेल्या विविध सिद्धांताबद्दल, त्यांच्या अर्थशास्त्रीय शोद निबंधांबद्दल क्वचितच चर्चा केली जाते. महत्त्वाची बाब म्हणजे त्या अर्थशास्त्रीय सिद्धांताची गरज आज जास्त आहे. ते आज अधिक लागू पडतात. डॉ. आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय ज्ञानाची दखल त्यावेळी युरोप आणि अमेरिकेने घेतली होती. दुर्दैवाने त्यांचा हा पैलू भारतात मात्र उपेक्षितच राहिला आहे.

**जागतिक दर्जाचा अर्थतज्ज्ञ**

अर्थशास्त्र या विषयात रितसर विद्यापीठीय शिक्षण घेऊन पदवी मिळणवणाऱ्या सुरूवातीच्या मोजक्या भारतीयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश आहे. किंबहुना त्या काळातील पहिला आंतरराष्ट्रीय ख्यातीचा अर्थतज्ज्ञ म्हणजे डॉ. आंबेडकर यांचेच नाव पुढे येते. त्यांनी १९१७ मध्ये कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात पीएचडी मिळवली. त्यानंतर १९२१ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेतून अर्थशास्त्रात डीएससी मिळवली. या दोन्ही संस्था जागतिक कीर्तीच्या संस्था होत्या आणि आहेत. त्या काळातील

भारतासमोरील आर्थिक प्रश्न, चलनाचा प्रश्न, रुपयासमोरील आव्हाने, ब्रिटिशांनी लागू केलेल्या चलन व्यवस्थेमुळे भारताला तोंड द्यावी लागत असलेली संकटे यांची मांडणी करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आपल्या अर्थशास्त्रीय ज्ञानाचा पुरेपूर वापर केला. डॉ. आंबेडकरांनी पतधोरण, सार्वजनिक वित्तपुरवठा, शेतीचे अर्थशास्त्र, समाजातील आर्थिक व्यवस्था, देशाची अर्थव्यवस्था इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर विपुल चिंतन आणि लेखन केले आहे.

**रुपयाचा प्रश्न आणि त्याची उत्तरे मांडली**

आज आपण सातत्याने जागतिक अर्थव्यवस्था, तिचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम, आयात-निर्यात धोरण, पतधोरण, रिझर्व्ह बँकेचे धोरण, रुपयाचे डॉलरच्या तुलनेत असलेले मूल्य याबद्दल बोलतो. या विषयांबद्दल नेहमी चिंता व्यक्त होते. विशेषत: रुपया या भारतीय चलनाचे जगातील स्थान आणि त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम हा विषय नेहमीच चर्चिला जातो. मात्र रुपयाच्या प्रश्नावर बोलणारा जगातील पहिला अर्थतज्ज्ञ कोण असेल तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. या विषयावरील त्यांचे पुस्तक आजही या विषयावरील जागतिक कीर्तीचे पुस्तक असून त्यातील चिंतन, त्यांनी सुचवलेले उपाय आजही लागू पडतात. या पुस्तकाचे नाव आहे द प्रॉब्लेम ऑफ रुपी: इट्स ओरिजिन आणि इट्स सोल्यूशन (The Problem of Rupee: Its Origin and Its Solution)

**आंतरराष्ट्रीय पातळीवर केली मांडणी**

रुपयाच्या प्रश्नावर विवेचन करताना सोने हे प्रमाण मानून त्या आधारावर केलेली चलनाची रचना. सोने हे प्रमाण आणि सोन्याच्या विनियोगाचे प्रमाण या मुद्द्यावर त्यांनी अतिशय गंभीर मुद्दे मांडले. त्यांचे हे मुद्दे त्यांनी हिल्टन यंग कमिशनसमोर मांडले होते. या मुद्द्यांची आणि विश्लेषणाची दखल रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना करतानादेखील घेण्यात आली होती. आपल्या मुद्द्यांची शास्त्रशुद्धपणे मांडणी करताना आणि विश्लेषण करताना डॉ. आंबेडकरांनी त्यावेळेचे जागतिक कीर्तीचे ख्यातनाम अर्थतज्ज्ञ जॉन केन्स यांच्या सिध्दांतांनाही विरोध केला होता आणि तो सप्रमाण मांडून दाखवला होता. ब्रिटिशांच्या अर्थनितीमुळे रुपयासमोर आणि पर्यायाने भारतासमोर निर्माण झालेल्या आर्थिक संकटांची मांडणी डॉ. आंबेडकरांनी आपल्या या महान ग्रंथात केली होती. आजही ते विश्लेषण रुपयासमोरील प्रश्नांना तितकेच लागू पडते यातच या द्रष्ट्या अर्थतज्ज्ञाची महानता दडलेली आहे.

**द प्रॉब्लम् ऑफ द रूपी : इट्स ओरिजिन □न्ड इट्स सोल्युशन** (*रुपयाची समस्या*) हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शोध प्रबंध आहे. तो त्यांनी ऑक्टोबर १९२२ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डॉक्टर आफ सायन्स (डी.एस.सी.) च्या पदवीसाठी प्रस्तुत केला होता. हा प्रबंध डिसेंबर, १९२३ मध्ये पुस्तकरूपात प्रकाशित झाला. या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे की, मुद्रा समस्याच्या अंतिम निर्णयात, कशा प्रकारे ब्रिटिश शासकांनी भारतीय रुपयाच्या किमतीला पाऊंडसोबत जोडून आपला जास्तीत-जास्त फायदा होण्याचा मार्ग निवडला. त्यांच्या या हेराफेरीनेच भारतीय नागरिकांना गंभीर आर्थिक समस्येत लोटले गेले. ब्रिटिश शासकांच्या या निर्णयामुळे, भारतीय धन ब्रिटिश खजिन्याच्या दिशेने निरंतर वळवले गेले. या व अशा अनेक प्रकारे भारतातली संपत्ती ब्रिटिश सरकारच्या व ब्रिटिश जनतेच्या फायद्यात जात राहिली.

**संदर्भ ग्रंथ:**

१. Ambedkar, Bhimrao Ramji (1923). *The Problem of the Rupee: Its Origin and Its Solution* (इंग्रजी भाषेत). P. S. King & son, Limited.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार

**डॉ. दीपक वेडे**

**सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, सरस्वती मंदिर नाईट कॉलेज, पुणे**

**गोषवारा:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाच्या सर्वच क्षेत्रांचा अभ्यास केला. परंतु शिक्षणाच्या बाबतीत ते जास्तच आग्रही होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जसे शिक्षणाच्या बाबतीत विचार व्यक्त केले तसे ठिकठिकाणी महाविद्यालयेउभीकरून सर्वसामान्यांना शिक्षणाची दारे खुली करून दिली. त्यांनी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षणाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीवाघिणीचे दूध संबोधले आहे. कारण शिक्षण घेतलेला माणूस अन्याय सहन करणार नाही तो संघटित होईल व अन्यायाविरुद्ध संघर्ष केल्याशिवाय राहत नाही, असे त्यांचे मत होते. त्याचबरोबर शिकलेला माणूस हा शीलवान असला पाहिजे नाहीतर त्याच्या शिक्षणाला काहीच अर्थ नाही असेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेबांचे शिक्षणविषयक चिंतन ही त्यांच्या जीवनात सातत्याने चाललेली प्रक्रिया होती. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा जो प्रगतीचा मूलमंत्र त्यांनी समाजाला दिला, त्यात शिक्षणाला अग्रक्रम दिला आहे.त्यांचे शिक्षणविषयक चिंतन सुसंघटित स्वरुपात वा प्रबंधरुपात उपलब्ध नाही. ते अनेक ठिकाणी विखुरले आहे. सभा, संमेलने व परिषदांतून केलेली भाषणे, पत्रवाङ्मय, नियतकालिके, शिक्षण संस्थांना दिलेल्या अटी यातील मनोगतातून ते व्यक्त झाले आहे. या सर्व चिंतनात शिक्षणाचे तत्त्वज्ञान व ध्येयवाद, शिक्षणाचा सामाजिक आशय, अभ्यासक्रमाचे स्वरूप व उद्दिष्टे, विद्यार्थ्यांचे दायित्व, शिक्षकांची गुणवत्ता, शाळा व शिक्षणसंस्थांची जबाबदारी, शिक्षण क्षेत्रातील आरक्षणाची कारणमीमांसा यांसारख्या शिक्षणाच्या विविध पैलूंवर त्यांनी वेळोवेळी भाष्य केले आहे. प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, विद्यापींठाचा कारभार, साक्षरता प्रसार, सार्वत्रिक व सक्तीचे शिक्षण याचाही त्यांनी ऊहापोह केला आहे. या चिंतनात त्यांनी सैद्धांतिक मांडणी इतकाच व्यावहारिकतेवर भर दिला आहे.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी यासाठी आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात विशद केले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो माणूसतेप्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही, असे ते समाज बांधवांना सांगत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यासंदर्भात ते म्हणतात की, सर्व शिक्षणाचा पाया म्हणजे प्राथमिक शिक्षण होय. या शिक्षणाचा दर्जा अतिशय उत्तम असायला हवा. एकदा विद्यार्थी शाळेत दाखल झाला की, तो पुर्णपणे सुशिक्षित, गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावा. यासाठी सरकारने प्राथमिक शिक्षणाकडे खास लक्ष द्यायला हवे. यातूनच शिक्षण समाजाच्या सर्व थरापर्यंत जाईल. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्यासशक्त होते. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. शिक्षण महत्त्वाचे नसून विद्यार्थ्यांच्या अंगी प्रज्ञा, शील आणिकरुणा ही मूल्ये रुजली पाहिजे. ही मूल्ये जर शिकलेल्या तरुणांच्या अंगी नसतील तर त्यांचेशिक्षण कामाचे नाही, असे ते म्हणतात. डॉ.बाबासाहेब पुढे म्हणतात,"शिक्षणाच्या माध्यमातून मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तापूर्ण बनली पाहिजेत. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक बांधीलकीची कर्तव्ये बजावावीत. शाळा म्हणजे विद्यार्थ्यांना उत्तम व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत,याचे भान या प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांनी ध्यानी घ्यावे". पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना१९४६ साली करुन त्यांनी मुंबईला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलिंद महाविद्यालय सुरू केले. शिक्षण हे तेव्हाच खरे ठरते जेव्हा शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रहित व समाजहिताची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजते.

**शैक्षणिक विचार :**

फक्त वही पेन म्हणजे शिक्षण नव्हे, तर बुद्धीला सत्याकडे, भावनेला माणुसकीकडे, शरीराला श्रमाकडे नेण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण होय. जसे जेवल्यावर होणारे समाधान हे तात्पुरते असते. या उलट शिक्षणातून मिळणारी ज्ञानाची शिदोरी आयुष्यभर पुरते. पोटाची भूक भागवावीच, पण एक पाऊल पुढे टाकून शिक्षण घेऊन माणसाने बुद्धीची ही भूक भागवावी. जसा माणूस उपासमारीने अशक्त होऊन अल्पायुषी होतो,तसा तो शिक्षणाअभावी जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो.

शिक्षण आणि समाज यांचे अतूट असे नाते असते. कारण, शिक्षणहाच समाजाच्या सांस्कृतिक उत्थानाचा आधार असतो, असे बाबासाहेबांचे मत होते. बाबासाहेब म्हणतात, 'सामाजिक समता आणि स्वातंत्र्य यांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक असणारी शक्ती म्हणजे शिक्षण.'ते पुढे असेही म्हणतात की, 'व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी आणि त्यांच्या रक्षणासाठी लागणारी शक्ती ही शिक्षणातूनच मिळू शकते.' यातून त्यांचा शिक्षणविषयक व्यापक दृष्टिकोन स्पष्ट होतो.समाजपरिवर्तन ही एक नित्य चालणारी प्रक्रिया असून शिक्षणातून हा समाजपरिवर्तनाचा मार्ग प्रशस्त होतो, अशी भूमिका डॉ. बाबासाहेबांनी वारंवार मांडली आहे.शिक्षण या संकल्पनेत 'शिका आणि शिकवा' या प्रक्रिया अभिप्रेत आहेत. त्यातूनच समाजाची प्रगती होऊ शकते, हे स्पष्ट करुन बाबासाहेब म्हणतात, 'शिक्षणाशिवाय कोणत्याही समाजात संवेदनशिलता, जाणीव वा जागृती उत्पन्न होणार नाही'.शिक्षणाचा अधिकार प्रामुख्याने ऐहिक असावा आणि त्यामार्फत समाजातील सर्व प्रकारच्या विषमता दूर व्हाव्यात' अशी व्यावहारिक अपेक्षा ते करतात.

डॉ.बाबासाहेबांना अभिप्रेत असणारी ज्ञानाची संकल्पना, आशयव्यापक व आदर्श अशी आहे. ते म्हणतात, "विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या पंचतत्त्वानुसार प्रत्येकाने आपले कार्य घडवावे".आपला मुद्दा स्पष्ट करताना ते म्हणतात, 'विद्येबरोबर आपल्यात शील पाहिजे'. शीलाशिवाय विद्या फुकाची आहे. विद्याही तलवारीसारखी आहे, परंतु तिचे महत्त्व तिला धारण करणाऱ्यावर अवलंबून आहे. 'ज्ञान म्हणजे प्रकाश' ही महात्मा गौतम बुद्धांनी केलेली शिक्षणाची संकल्पना डॉ. बाबासाहेबांना मान्य आहे, मात्र हा प्रकाश सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रांतीचा आधार झाला पाहिजे, असे 'प्रकाश' या संकल्पनेचे त्यांचे विश्लेषण आहे. शिक्षणाला सामाजिक संदर्भ असले पाहिजेत, असेही ते म्हणतात. 'शिक्षण हा शोषणमुक्तीचा महामार्ग आहे.' समाजातील शोषित, पीडित, वंचित समाजघटक व स्त्रिया यांच्या दैन्यावस्थेवर रामबाण उपाय म्हणजे, 'शिक्षण' अशी त्यांची मांडणी आहे.'शिक्षण म्हणजे, समाजातीलपददलित समाजासाठी स्वावलंबनाची व आत्मसन्मानाची चळवळ' असेही प्रतिपादन त्यांनी एके ठिकाणी केले आहे.'समताधिष्ठित, मूल्याधिष्ठित व नीतिमान समाज ही यशस्वी लोकशाहीची पूर्वअट असून ते संस्कार फक्त शिक्षणातूनच मिळू शकतात,' हे त्यांचे प्रतिपादन चिंतनीय आहे.समाजातील निरक्षरतेच्या प्रमाणाविषयी चिंता व्यक्त करुन बाबासाहेब म्हणतात, 'या निरक्षरतेने जनतेला मानसिकदृष्ट्या गुलाम, आर्थिकदृष्ट्या दरिद्री, सांस्कृतिकदृष्ट्या लुळेपांगळे व सामाजिकदृष्ट्या मागासलेले केले आहे. त्यामुळे परकीय आक्रमणांविरुद्ध संघर्ष करण्याची समाजाची शक्ती हरवली आहे.' या त्यांच्या अभिप्रायांचा भावार्थ समजून घेणे आवश्यक आहे.

**दारूबंदीपेक्षा शिक्षणाचा प्रश्न अधिक महत्त्वाचा :**

**१९३९ साली मुंबई प्रांतिक असेंब्लीच्या अंदाजपत्रकावरील चर्चेच्या वेळी सरकारने मोठी रक्कम जेव्हा दारूबंदीसाठी राखीव ठेवली त्यावेळी, त्यासाठी अमेरिकेतील उदाहरण सरकारने समोर ठेवले होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अमेरिकेतील परिस्थिती वेगळी असून तिचा संबंध येथील परिस्थितीशी लावता येणार**

**नाही. त्यामुळे दारूबंदीवरील खर्चापेक्षा तोच खर्च शिक्षणावर केला तर संपूर्ण इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत मिळेल. हे आकडेवारीसह सिद्ध करून दाखविले. मग सरकार दारूबंदी ऐवजी शिक्षणावर ही रक्कम का खर्च करीत नाही असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.**

**बाबासाहेबांचे शैक्षणिक कार्य :**

उच्चशिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात इंग्लंडहून १९१६ साली भारतात परत आल्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी दोन वर्षे मुंबईच्या सिडनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून शिक्षणदानाचे कार्य केले. पुढे एका खाजगी संस्थेत ते 'प्रोफेसर ऑफ मर्कंटाईल लॉ' या पदावर कार्यरत होते. १९२६ साली शासकीय विधी महाविद्यालयात १९३५ साली प्राचार्य पदावर त्यांची नियुक्ती झाली. या सर्व काळात एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक आणि शिस्तप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी लौकिक प्राप्त केला. इंग्रजी भाषेवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. आपल्याला विद्यार्थी, विषय आणि क्रमिक पुस्तकेहे शिकवायचे आहे, याचे जसे त्यांना भान होते, तसेच आपल्याला विद्यार्थ्यांचे जीवन घडवायचे आहे, त्याला दिशा द्यायची आहे, याचीही सम्यक जाणीव त्यांना होती. महाविद्यालयाचे प्राचार्य या नात्याने मुंबई विद्यापीठाच्या कारभारावरही त्यांनी आपला ठसा उमटविला होता.

डॉ. बाबासाहेबांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करुन औरंगाबाद मुंबई व पुणे येथे प्रामुख्याने दलित समाजातील विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षणासाठी महाविद्यालयांची स्थापना केली.जे शिक्षणविषयक चिंतन त्यांनी विकसित केले, त्याचे व्यवहारात रुपांतर करण्याचे कार्य त्यांनी या संस्थाद्वारे केले. ही महाविद्यालये वंचित समाजातील विद्यार्थ्यांना ज्ञानाची दारे खुली व्हावी, म्हणून जरी त्यांनी उभी केली असली तरी या संस्थांचे संचालन करताना त्यांनी दूरदृष्टी असलेल्या तत्वनिष्ठ व पारदर्शक व्यवहारावर त्यांनी भर दिला होता. शिस्त व सचोटी यावर त्यांचा कटाक्ष होता. 'सार्वजनिक पैशाचा हिशोब व्यवस्थित ठेवून तो वेळोवेळी जनतेला दाखविणे, यासारखे दुसरे पवित्र कर्तव्य नाही आणि सार्वजनिक पैशाचा अपहार करणे यासारखे दुसरे नीच कृत्य नाही' अशी त्यांची कठोर भूमिका होती. या शिक्षण संस्थांत शिक्षकांची नेमणूक करताना त्यांनी जातीला नव्हे, तर विद्वत्तेला आणिगुणवत्तेला प्राधान्य दिले. तत्त्वनिष्ठ व्यवहार व उत्कृष्ट विचार समाजाला देऊन ते थांबले नाहीत, तर आदर्श शिक्षणकेंद्रे कशी असावीत यांची उदाहरणे त्यांनी प्रत्यक्ष शिक्षण क्षेत्रातील कार्यातून त्यांनी समाजासमोर ठेवली.

**सारांश :**

महात्मा जोतिबा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन बहूजन समाजाला व स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडी करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीसमाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना शिक्षणामुळे माणूस संस्कारित होतो. त्याला आपल्यावरील अन्यायाची व आपल्या हक्काची जाणीव होते. जेव्हा त्याला आपल्या हक्काची जाणीव होईल त्यावेळी आपले हक्क मिळविल्याशिवाय तो राहणार नाही. डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत. त्यामध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक, संस्थाचालक व शासन यांचा समावेश आहे. आज त्यांच्या या मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब केला तर शिक्षण क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल झाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ :**

१. मून वसंत, नरके हरी (संपादक), (२००२),डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लेखन आणि भाषणे खंड १८ भाग २,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र राज्य, मुंबई, प्रथम आवृत्ती.
२. नरकेहरी (संपादक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लेखन आणि भाषणे खंड १९,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिति, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. कीर धनंजय,(२०१३), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,आवृत्ती सहावी.
४. खरात शंकरराव(संपादक), (२०१३), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी साहित्य प्रकाशन,पुणे, आवृत्ती चौथी.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजातील अस्पृश्यता व धर्माच्या संदर्भात समाजशास्त्रातील योगदान

**डॉ. संजय गंगाराम सुरेवाड**

सहाय्यक प्राध्यापक, विभागप्रमुख समाजशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, **अंबाजोगाई जिल्हा - बीड** 431517

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वातील एक महान ज्ञानपिपासू, तत्त्वचिंतक आणि संशोधक होते. तसेच त्यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. समाजशास्त्र अर्थशास्त्र, इतिहास, धर्म, तत्वज्ञान, कायदा इत्यादी विविध ज्ञानशाखातील ज्ञान अतिशय परिश्रम करून संपादन केले होते, म्हणूनच सामाजिक, विज्ञान, कायदा या विज्ञान शाखातील ज्ञानाबरोबरच त्यांनी या ज्ञान शाखात मौलिक संशोधनपर ग्रंथ लेखन त्यांनी केले. परंतु दुर्दैवाने अनेक संशोधकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येते. डॉ. रॉबिन्सन, डॉ. एलिनार इत्यादी विदेशी संशोधकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महत्त्व पटू लागले. म्हणूनच समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, विविध घटनांत आद्यपत्रकार, राजकीय नेता, कामगार नेते, क्रांतिकारी कुशल संघटक आणि त्यांनी विविध अंगे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची असलेली दिसून येतात. सामाजिक विज्ञानातील विविध ज्ञानशाखा चे अध्ययन आणि संशोधन त्यांनी केल्यामुळे ते समाजशास्त्रज्ञ आहेत हे निर्वावाद आहे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धारणा ही नैतिक समुदायाची ओळख देते. संशोधनाचा प्रमुख उद्देश हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय समाजशास्त्रातील योगदान अभ्यासणे त्याचा समाजशास्त्रीय सिद्धांत याचा आढावा घेणे हा असून यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित लिखाण, संदर्भग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट, इत्यादी उगमस्थान याचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारतीय जातीव्यवस्था आणि समाजव्यवस्था:**

भारतीय समाजशास्त्राची सुरुवात होण्यापूर्वीच अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात 9 मे 1916 भरलेल्या डॉ. ए गोल्डनवायझर मानववंशशास्त्रीय (The Anthoropology Seminat of Dr. Aa, GalDenwizer) विषयक परिषदेत भारतातील एका पंचवीस वर्षाचा तरुण समाजशास्त्रज्ञांने Cast in India: Their Mechanism, Genesis and Development "भारतातील जाती: घडण, उत्पत्ती आणि विकास" हा शोधनिबंध में 1917 च्या इंडियन ऑन्टीक्युरी खंड 41 मध्ये प्रसिद्ध झाला. हे तरुण भारतीय संशोधक म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या संशोधनपर निबंध यामधील स्पष्टपणे नमूद करतात, "आंतरजातीय विवाहाचा निषेध किंवा असे विवाह आढळणे हेच जातिव्यवस्थेचे मूळ आहे. बहिर्विवाहावर अंतर्विवाहाचे वर्चस्व हेच खरे तत्व जातीच्या निर्मितीस कारणीभूत होते." असा निष्कर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर मांडतात. या संशोधनात डॉ. आंबेडकरांनी वर्ग आणि जात तसे मानयचे झाले, तर निकटवर्ती होत. कालांतराने ते अलग होतात. बंदिस्त केलेली, गोठवलेला वर्ग म्ळणजे जात होय. तसेच 'जात हा बंदीस्त वर्ग आहे' अशी व्याख्या करतात. डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या शोधनिबंधातातून जातीव्यवस्थे संदर्भात त्यांनी मांडलेला 'जात उत्पत्ती सिद्धांत' आजही समाजशास्त्रज्ञ त्याचा अभ्यास व संशोधन करण्याचा प्रयत्न करतात. जातिसंस्था मनूने निर्माण केली हे डॉ आंबेडकरांना मान्य नव्हते. आंबेडकंराच्या मतानुसार, मनूने जातीचा कायदा सांगितला नाही. तो ते करु शकत नव्हता. मनूपूर्वी कित्येक वर्षे जातिसंस्था अस्तित्वात होत्या. मनूने अस्तित्वात असलेल्या कायदयांची संहिता बनवूनल, त्याला तात्विक आणि धार्मिक अधिष्ठान प्राप्त करुन दिले.

**अस्पृश्य आणि अस्पृश्यतेसंबंधी सिध्दांत :**

भारतीय समाज व्यवस्थेची अस्पृश्यता ही एक अमानवी समस्या आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, "हिंदूतील अस्पृश्यता ही एक विचित्र आणि जगाच्या पाठीवर इतर कोणत्याही भागातील मानवतेला अपरिचित गोष्ट आहे. जातीव्यवस्थेप्रमाणेच अस्पृश्यतेचा प्रश्नासंबंधीचे समाजशास्त्रीय विश्लेषण डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांनी आपल्या अध्ययनातून केले. भारतातील जाती, जातीचे उच्चाटन, अस्पृश्य पूर्वी कोण होते, आणि ते अस्पृश्य का झाले शूद्र, अस्पृश्य पूर्वी कोण होते, हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान, हिंदू धर्मातील कोंडी, अस्पृश्य आणि अस्पृश्यतेवरील इतर निर्बंध, सामाजिक निर्बंध इत्यादी संशोधनात्मक ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले या ग्रंथामुळे भारतातील समाजशास्त्रीय संशोधनाला मौलिक असे योगदान मिळाले आहे.

अस्पृश्यतेच्या प्रश्नासंदर्भात आपले विचार मांडाण्यापूर्वी डॉ. आंबेडकरांनी आफ्रिका, अमेरिकेतील निग्रो समाज, रोमन साम्राज्यातील गुलाम समाज किंवा तत्कालीन समाज असो प्रत्येक समाजव्यवस्थेचा अत्यंत बारकाईने अभ्यास केला होता. विशेष म्हणजे अध्ययन करत असताना आपण संशोधक आहोत ही जाणीव त्यांनी ठेवली होती. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधित वस्तुनिष्ठ विचार मांडू शकले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्व बाजूंनी विचार करून या प्रश्नाविषयी सविस्तर विचार मांडलेत. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे अध्ययन करून अस्पृश्यतेच्या रुपाने भारतीय समाजात एक फार मोठी अमाननीय समस्या अस्तित्वात असल्याचे प्रतिपादन केले.

भारतीय वर्गलढयाला आणि जातीअंताच्या लढयाला आकार आणि दिशा देण्याचे भरीव काम डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केले जागतिक पातळीवर शोषण मुक्ती आणि समतेसाठीच्या लढयासंमध्येही डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रेरणादायी ठरले आहेत. जगाच्या इतिहासात असे योगदान करणाया अत्युच्च पातळीवरच्या निवडक व्यक्तीमध्यें डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान आहे

**धर्माच्या तत्वज्ञानाच्या मूल्यांकनाचा सिद्धांत:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिम, सिख, आदी सर्वच धर्माचे अध्ययन केले होते. त्यांनी धर्माच्या संदर्भात भरपूर लिखाण केले आहे. त्यांचे धर्मविषयक विचारांचा अभ्यास करीत असताना असे आढळून येते की हिंदू धर्माची त्यांनी सविस्तर कशी चिकिस्ता केली आहे 'Philosophy of Hinduism', 'Riddles in Hinduism' हे ग्रंथ त्यांच्या चिकित्सक अध्ययनाची साक्ष देतात. आपल्या या ग्रंथात हिंदू धर्माच्या तत्वज्ञानाचे चिकित्सक अध्ययन करण्यासाठी धर्माच्या तत्वज्ञानाचे मूल्यमापन करणाऱ्या कसोटयांचे प्रतिपादन केली आहे. धर्माच्या तत्वज्ञानाचे मूल्यमापन करण्यापूर्वी त्यांनी धर्माचे तत्त्वज्ञान या शब्दाचा अर्थ सुरुवातीला स्पष्ट केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाच्या सामाजिक ऐतिहासिक घटना आणि नैतिक आधारावरील आकलनात धर्माच्या अधिक तत्वज्ञानावर अधिक भर दिला आहे. त्यांनी हिंदूं धर्मांमध्ये सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली. जात ही शास्त्रसंमत काही धार्मिक विश्वासाचा एक स्वाभाविक परिणाम आहे. जातीची पवित्रता आणि अपवित्रता समाप्त करण्यासाठी धर्मशास्त्र आणि वेदाच्या अधिकाराला नष्ट केले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी हिंदू धर्म हा भारतीय इतिहासाची निर्मिती वा अन्वयार्थामध्ये महत्वपूर्ण वर्ग त्यांनी भारतीय समाजाच्या आकलनात मार्क्सवाद पद्धतीला उधार घेतले. ब्राह्मणवाद्याच्या विरोधामध्ये क्रांतिकारी स्वरुपाचा बोध्दधर्माला स्वीकारले. या व्यतिरिक्त त्यांनी नेतृत्व ब्राम्हणवादी वर्गाचे कथाकथन वा सरकारी दस्तऐवज प्रभूत्वाच्या कोणत्याही ऐतिहासिक पुराव्याच्या मागमूस मिळत नसल्याचे सांगितले. अशाप्रकारे त्यांनी भारतीय समाजातील शोषितांच्या इतिहास दृष्टिकोना साठी एक व्यवस्थित प्रयत्न केला. त्यांनी वैश्विक दृष्टिकोनातून संस्कृती व धर्मामध्ये घटक प्रभावीपणे इतर घटकांना प्रवेश करणारे आहेत असे म्हटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मार्क्सवादी प्रति उदार होती मात्र आर्थिक संकीर्ण दृष्टिकोनाच्या विरोधी होते. त्यांनी जाती मुद्द्याबाबतच्या आकलण्यासाठी मार्क्सवादाला आव्हान दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पद्धतीत हिंदुत्व धार्मिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठातून उच्च शिक्षण घेताना समानतेच्या वर्तनाचा अनुभव घेतला. ते आपल्या अमेरिकी प्रवासादरम्यान एक तेथिल वंशभेद धोरण विरोधी चौदाव्या दुरूस्तीने अधिक प्रभावित झाले. त्यातून त्यांनी दलितांच्या उद्धारासाठी संघर्ष करण्यास प्रेरणा मिळाली. त्यांना अमेरिका व इंग्लंडमधून पाश्चात्य शिक्षण मिळाले. ते उदारमतवादी होते. मानवी जीवन निरर्थक नसून त्या अर्थपूर्ण आहे. प्रत्येक समाजात व्यावहारिक नैतिकता व सामाजिक धर्मात असायलाच पाहिजे. कोणताही धर्म कसा असावयास पाहिजे.

1. जो धर्म तिथे त्याने तिच्या रूपात मानव समाजाचा आधार असला पाहिजे.

2. धर्म विज्ञान वा बौद्धिक तत्वावर आधारित असला पाहिजे.
3. धर्माला केवळ नैतिक संहिता नसून समानता व बंधुत्व असावी
4. धर्माने निर्धनतर स्थितीचे परिक्षण करू नये.
5. धर्माचे शुद्ध रूप धर्मनिरपेक्ष व मानवतावादी आहे बुद्ध धम्म सञ्चा धर्म आहे.

या दृष्टीने हिंदू धर्माचे स्वरूप न्यायावर आधारित नाही ज्यांच्यात अमुलाग्र परिवर्तन केले. सार्वजनिक जीवनात पदार्पण केल्यानंतर पहिली पहिली दहा वर्षे समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माच्या चौकटीत राहूनच हिंदू समाजात सुधारण घडवून आणण्याचा प्रयत्न केला. पा सुवर्ण हिंदूचा दृष्टीकोण बदलणे अशक्य आहे. याची खात्री त्यांना झाली, तसेच हिंदू धर्मात राहून अस्पृश्यांची अर्थिक स्थिती व सामाजिक दर्जा सुधारणार नाही, याची जाणीव झाल्यांनतर आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी असा विचार मांडला की, जसे स्वांतत्र हे भारतासाठी आवश्यक आहे तसेच धर्म बदलणे हे अस्पृश्यासाठी आवश्यक आहे. मानवी मूल्ये जोपसणारा बौध्द धर्म उभ्या जगात पसरला होता. भूतलावरील प्रत्येक कानाकोप-यात बौध्द धर्माची मोठी ख्याती होती. आशिया खंडातील बहुसख्य देशानी बौध्द धम्म स्वीकारलेला आहे. ईश्वराला महत्व न देणारा व समस्त मानव जातीला स्वातंत्र, समता व बंधुता शिकविणारा बौध्द धर्माचा स्वीकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केला.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1.आगलावे प्रदीप, (2009) 'समाजशास्त्रज्ञ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर', सुगावा प्रकाशन पुणे.

2.डॉ. राजेंद्र फकीरा बगाटे, (2020) "डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान" मराठी समाजशास्त्र परिषद.

3.धनंजय कीर, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' पाप्युलर प्रकाशन मुंबई.

4. भारताचे संविधान (मराठी) 'महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाने अनुवादित' महाराष्ट्र शासन 1988.

5.डॉ अनिल कठारे (2017), महाराष्ट्राचा समग्र इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड.

6. लोखंडे भाउ (2012), डॉ आंबेडकरी हितशत्रुचा जाणीव, परिजात प्रकाशन, कोल्हापूर.

7. गायकवाड 'राजवंश' डॉ ज्ञानराज काशिनाथ (2016) महामानव डॉ.भीमराव आंबेडकर रिया प्रकाशन कोल्हापूर.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मूलन विषयक कार्य

**डॉ. विठ्ठल केदारी**

सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, **किल्ले धारूर, जिल्हा - बीड.**

भारतीय समाजव्यवस्थेला जातीयतेचा कलंक लागलेला आहे. समाजामध्ये जातीच्या आधारावर व्यक्तीची प्रतिष्ठा होती. जातीच्या आधारावर व्यक्तीचे कर्म निश्चित केले होते ते कार्य प्रत्येक व्यक्ती निष्ठेने पूर्ण करीत होता. गावाची सेवा चाकरी करणे आणि दिलेल्या मोबदल्यात आपली व कुटुंबाची उदरनिर्वाहाची गरज भागवणे. यावरच व्यक्तीची उपजीविका होती. भारतीय समाज व्यवस्थेतील आजही अठरापगड जातींची जीवन जगण्याची पद्धती फारशी बदललेली नाही. अस्पृश्य म्हणून समाजव्यवस्थेमध्ये त्यांना हिणवले जाते. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार, शोषण व पिळवणूक होताना दिसून येते. काबाड कष्टाची कामे त्यांना करावी लागतात. या मोबदल्यात पैशाच्या वा अन्नधान्याच्या स्वरूपामध्ये मोबदला दिला जातो. यावर या कुटुंबाचे उदरनिर्वाह चाले. आज समाजामध्ये जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला संविधानाने हक्क व अधिकार बहाल केले आहेत. यामुळे आज समाजातील प्रत्येक व्यक्ती घटनात्मक हक्क मागताना दिसत आहे. संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्क व अधिकारांच्या जोरावर अस्पृश्य म्हणून हीनवला गेलेला माणूस स्वतःचे अस्तित्व शोधत आहे. अस्मिता शोधताना आपल्यावर आजवर झालेल्या अन्याय-अत्याचाराची जाणीव झाली. ही जाणीव संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृती व विचारातून प्राप्त झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाज व्यवस्थेतील दलित माणसाला हक्क व अधिकार प्राप्त करून दिले. माणूस म्हणून त्याला समाजामध्ये सन्मानाने जगता यावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध पातळयांवर संघर्ष केला. महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह, चवदार तळयाचा सत्याग्रह व मनुस्मृतीचे दहन या कार्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित माणसाला मानवमुक्तीचा मार्ग दाखवून दिला. डॉ. बाबासाहेबांनी केवळ दलित माणसालाच अधिकार व हक्क प्राप्त करून दिले नाहीत. तर भारतीय समाज व्यवस्थेमध्ये महिलांना कायम दुय्यमत्त्वाची वागणूक होती. समाजव्यवस्थेतील सवर्ण अथवा अस्पृश्य समाजातील महिला प्रस्थापित समाजव्यवस्थेमध्ये मुख्य प्रवाहामध्ये कुठेही नव्हती. महिला म्हणून दुय्यम स्थान व दलित समाजातील तिचे दलित असणे या दोन पातळयांवर दलित स्त्रीचे शोषण होत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या उद्धारासाठी घटनात्मक कायदे करून सवर्ण अथवा दलित महिलांना मानाचे-सन्मानाचे जीवन जगता यावे अशी घटनात्मक तरतूद केली. आज भारतीय महिला जागतिक पातळीवर उंच भरारी घेताना दिसून येतात. "हिंदू समाजरचना ही वर्णाधिष्टीत आहे. इथे माणसाला माणूस म्हणून महत्व नाही तर त्याचे मूल्य जात किंवा वर्ण यावर अवलंबून होते. या वर्णव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा प्रमुख चार गटात विभागणी केली आहे. या क्रमानुसार त्यांचा सामाजिक आणि सांस्कृतिक स्तर दर्जा कमी कमी होत गेला आहे. शूद्र समाजात पुन्हा दलित माणसाचे जीवन खूपच कष्टप्रद आणि लाचार होते. त्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्कच या समाजव्यवस्थेने नाकारला होता. हजारो पिढ्यांपासून हा दलित समाज केवळ पशुवत जीवन जगत होता. या अन्याय अत्याचाराविरुद्ध पहिले बंड पुकारले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या क्रांतीप्रवण महामानवाने हजारो वर्षांच्या परंपरेत अडकून पडलेल्या गावकुसाबाहेर जीवन जगणाऱ्यांना जात, रूढी, प्रथा व परंपरेच्या बेडीत अडकलेल्या दलिताला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथमतः अन्यायाविरूद्ध लढण्याची आणि आत्मोद्धाराच्या सामर्थ्याची युगप्रवर्तक चेतना दिली. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुत्वाची दीक्षा दिली. त्यांच्या परिवर्तनवादी प्रेरणेतूनच दलित साहित्याचा जन्म झाला. दलित साहित्यात कथा, कादंबरी, कविता आणि आत्मकथन या लेखन प्रकारातून दलित लेखक सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेला नकार देत आहे."[1] भारतीय समाजव्यवस्थेत जातीयतेचे चटके डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुभवले होते. दलित समाजात जन्म आणि दारिद्र अशा प्रतिकूल परिस्थितीत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडले होते. या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव डॉ.

बाबासाहेबांनी घेतला होता. यामुळेच त्यांनी पुढे '􀀀नहिलेशन ऑफ कास्ट' सारखा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्यांनी भारतीय समाजातील जात व्यवस्थेची सूत्रबद्ध पद्धतीने मांडणी केली आहे. "लाहोर येथील जात पात- तोडक मंडळाने या संस्थेने 1936 सालच्या आपल्या वार्षिक संमेलनासाठी डॉ. आंबेडकरांनी अध्यक्षपद स्वीकारावे म्हणून आग्रह धरला होता. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रस्तावित अध्यक्ष भाषणाचा मसुदा पाहिल्यानंतर त्यातले जहाल विचार स्वीकारणे त्यांना शक्य झाले नाही. डॉ. आंबेडकरांनी अर्थातच आपल्या भाषणात कोणताही बदल करण्याचे नाकारले. शेवटी ते संमेलन रद्द करण्यात आले आणि डॉ. आंबेडकर यांनी आपले ते लिखित भाषण 1936 साली पुस्तकाच्या रुपाने प्रसिद्ध केले."[2] भारतामध्ये सामाजिक सुधारणांचा मार्ग जातीय रचनेमुळे अडथळयांचा झाला आहे हे डॉ. बाबासाहेबांनी हेरले होते. याकरिता भारतामध्ये "आधी सामाजिक समता प्राप्त झाल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रात आपण शाश्वत स्वरूपाची प्रगती करू शकत नाही हा विचार एकेकाळी मान्यता पावला होता. दुष्ट रूढी यांनी केलेल्या उपायांमुळे हिंदू समाज कार्यक्षम नाही, म्हणून या दुष्ट रूढीचा नायनाट करण्यासाठी अविश्रांत-परिश्रम केले पाहिजेत हे सर्वमान्य झाले होते. त्यामुळेच राष्ट्रीय काँग्रेसच्या जन्माबरोबरच सामाजिक परिषदेचा पाया घातला गेला. ज्या वेळी काँग्रेस देशाच्या राजकीय संघटनेतील कच्च्या दुव्यांचा शोध घेण्यात गुंतली होती, त्याच वेळी हिंदू समाजातील कच्चा दुव्यांचा सामना करण्यात सामाजिक परिषद मग्न होती. काही काळ काँग्रेस आणि सामाजिक परिषद यांनी एकाच कार्याच्या दोन बाजूंनी काम करावे त्याप्रमाणे कार्य केले; आणि त्यांनी आपली वार्षिक संमेलने ही एकाच मंडपात भरवली. परंतु लवकरच या दोन्ही बाजूंचे रूपांतर दोन स्वतंत्र पक्षांत झाले, एक राजकीय आणि दुसरा समाजसुधारकांचा पक्ष. या दोन गटांत तीव्र स्वरूपाचा वादही पेटला. राजकीय सुधारणावाद्यांच्या गटाने काँग्रेसला उत्तेजन दिले तर समाजसुधारकांनी सामाजिक परिषदेचे समर्थन केले अशा रीतीने हे दोन गट परस्परांचे शत्रू झाले. राजकीय सुधारणांच्या आधी सामाजिक सुधारणा अनिवार्य आहेत काय, हा त्यांच्यासमोर वादाचा विषय होता. दहा वर्षापर्यंत दोन्ही गटांचे वजन तुल्यबळ होते आणि हे वाक्युद्ध कोणत्याही बाजूचा विजय न होता चालू होते. तथापि नंतरच्या काळात सामाजिक परिषदेचे नशिबाला जलद ओहोटी लागण्याची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागली होती. बहुसंख्य सुशिक्षित हिंदू राजकीय प्रगतीच्या पक्षाचे समर्थन करतात आणि समाज-सुधारणेविषयी उदासीन आहेत, असे मोठ्या दुःखाने सामाजिक परिषदेचे अध्यक्ष पद भूषवणारे सदगृहस्थ आपल्या भाषणांतून हेच सांगत होते. काँग्रेसच्या वार्षिक संमेलनाला उपस्थित राहणाऱ्यांची संख्या फार मोठी होती आणि काँग्रेसबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्यांची संख्या तर त्याहूनही मोठी होती. सामाजिक परिषदेच्या वार्षिक संमेलनाला उपस्थित राहणाऱ्यांची संख्या त्या मानाने अतिशय कमी होत. ही उदासीनता आणि सभासदांची रोडावलेली संख्या त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून त्यानंतर लवकरच राजकारणी लोकांकडून उघडपणे शत्रुत्वाची कृत्य करण्यास सुरुवात झाली."[3] तत्कालीन भारतीय समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक सुधारणा आणि राजकीय सुधारणा याबाबतीत दोन वेगवेगळे विचार प्रवाह होते. समाजाची प्रगती व्हायची असेल तर जात निर्मूलन होणे महत्त्वाचे आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजामध्ये प्रथमतः सामाजिक सुधारणा घडून आल्या पाहिजेत यासाठी सामाजिक सुधारणांना प्राधान्याने स्थान दिले. सामाजिक प्रगती झाल्याशिवाय माणसाची उन्नती होणार नाही. याकरिता समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, जातीयता स्पृश्य-अस्पृश्य, भेदभाव या गोष्टी समूळ नष्ट झाल्या पाहिजेत हा आग्रह धरणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या विचारातून व कृतीतून सामाजिक सुधारणा घडवण्यासाठी प्रयत्नशील राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक सुधारणा समाजाला सोबत घेऊन घडवून आणायला सुरुवात केली. यावेळी त्यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेचा रोष पत्करला व होणाऱ्या कोणत्याही परिणामाची तमा बाळगली नाही. भारतातील सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय आपण राजकीय सुधारणांसाठी पूर्णपणे अपात्र आहोत असे डॉ. बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते. मध्य भारतात 'बालाई' नावाची एक अस्पृश्य जात आहे. या जमातीवर हिंदूंकडून त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची बातमी तत्कालीन दैनिक 'टाइम्स ऑफ इंडिया' (04.01.1928) प्रसिद्ध केली होती. या वर्तमानपत्राने नमूद केल्याप्रमाणे सवर्ण हिंदूंनी इंदोर राज्यातील कनारिया,

बिचोली-हाफशी बिचोली हापशी बिचोली-मर्दाना आणि इतर पंधरा खेड्यांतील बालाई लोकांना गावात राहावयाचे असेल तर बाल आई लोकांनी रंगीत किनारीची किंवा सुंदर किनारीची धोत्रे वापरू नयेत. बालाई स्त्रियांनी सोन्या-चांदीचे अलंकार वापरू नयेत. त्यांनी सौंदर्यपूर्ण झगे किंवा पोलके घालू नयेत. हिंदू स्त्रियांच्या सर्व बाळंतपणात बालाई महिलांनी त्यांची सेवा करावी. बालाई लोकांनी मोबदला न मागता हिंदूंची सेवा करावी आणि स्वखुशीने हिंदू जे काही देतील त्याचा त्यांनी स्वीकार करावा. या नियमांचे बंधन पाळणे असं जर बालाई लोक कबुल नसतील तर त्यांनी गाव सोडून चालते व्हावे. असा आदेश बालाईना देण्यात आला. बालाई लोकांनी ही बंधने अमान्य केली. म्हणून हिंदुनी त्यांच्याविरुद्ध कारवाई सुरू केली. बालाई लोकांना गावातील विहिरीवर पाणी भरण्यास मनाई केली. रानात जनावरे चरावयास बंदी केली. हिंदूंच्या मालकीच्या शेतातून लोकांचे जाणे-येणे बंद केले. त्यामुळे बालाई माणसाच्या शेताभोवती हिंदूंची शेती असल्यास त्याला स्वतःच्या शेतात जाण्यास रस्ता बंद झाला. याशिवाय हिंदूंनी आपली गुरे या लोकांच्या शेतात मोकाट सोडली. अत्याचाराविरुद्ध दाद मागण्यासाठी बालाई लोकांनी दरबारात अर्ज दाखल केले. परंतु त्यांना तत्परतेने मदत मिळाली नाही आणि त्यांच्यावर अत्याचार सुरूच राहिला. त्यामुळे शेकडो लोकांना आपल्या बायका-मुलांसह बापजाद्यानपासून पिढ्यानपिढ्या चालत आलेले वस्तीस्थान सोडून शेजारच्या राज्यातील खेड्यांत स्थलांतरित व्हावे लागले. अशा पद्धतीने भारतातील दलित समाजातील माणसावर अन्याय अत्याचारांची मालिका दररोज सुरू असलेली पाहायला मिळत होती. गुजरातमध्ये कविठा या गावात अस्पृश्य समाजाविषयी असाच हुकुम हिंदूंनी काढला होता. गुजरातमध्ये झानू या गावात 1935 मध्ये अस्पृश्यांनी धातूच्या भांड्यातून पाणी आणले म्हणून हिंदूंनी अस्पृश्यांवर हल्ला केला. जयपुर राज्यातील 'चकवारा' या गावी एक अस्पृश्य तीर्थयात्रा करून परत आल्यानंतर त्याने धर्मकृत्य म्हणून आपल्या अस्पृश्य बांधवांना जेवण देण्याची व्यवस्था केली म्हणून अस्पृश्य पंक्तीत बसून जेवण करताना शेकडो हिंदू काठ्या लाठ्या घेऊन पंक्तीत शिरले व अन्नाची नासधूस केली त्यांना झोडपून काढले. या रीतीने भारतीय समाजात दररोज अन्याय अत्याचार घडत होते. हे अन्याय-अत्याचार घटनात्मक तरतुदी च्या माध्यमातून कायमचे संपुष्टात आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात तरतूद केली व कायद्याने अन्याय, अत्याचार, शोषण व पिळवणूक बंद करण्यासाठी प्रयत्न केले. आज सुद्धा जातीभेदाला समर्थक लाभलेले पाहायला मिळतात. जातिव्यवस्था म्हणजे केवळ श्रम विभाजनाचे दुसरे नाव असे त्यांना वाटते. वंश आणि रक्ताच्या शुद्धतेसाठी जातीय संरक्षण करणे हेतू काही समूह सांगतात. मात्र शुद्ध वंशाचे लोक जगाच्या पाठीवर कोठेही अस्तित्वात नाहीत. जगाच्या सर्व भागातून मिश्र वंशाचे लोक आहेत असे वंश शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे. अशा विविध प्रकारचे तर्कवितर्क निर्माण करून धर्म, जात, वंश यासंबंधीचे पावित्र्य, श्रेष्ठत्व यादृष्टीने लोकांच्या मनामध्ये जातीभेदाचे वातावरण निर्माण केले जाते. जात,धर्म व वंश यासंबंधी लोकांच्या मनातील अज्ञान दूर झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. तसेच व्यक्तीच्या मनातील श्रेष्ठत्वसंबंधीचा अहंभाव दूर होणे आवश्यक आहे. यासाठी भारतीय समाजव्यवस्थेतील सर्व जाती-धर्मांनी आपापसातील धर्मश्रेष्ठत्व बाजूला ठेवून एकत्र येणे आवश्यक आहे. त्याशिवाय समाजाची प्रगती सर्वांगीन दृष्टिकोनातून घडू शकणार नाही असे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर भारतीय समाजव्यवस्थेतील जाती निर्मूलनासाठी प्रयत्न केले. भारतातील जातींचे उच्चाटन होणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. जाती-जातींमध्ये अडकलेला भारतीय समाज भेदभावातून बाहेर आल्याशिवाय समाजाचा विकास होणार नाही. समाजातील एकमेकांविषयीची तुच्छतेची भावना संपणार नाही. यासाठी भारतीय समाजामध्ये आंतरजातीय विवाह घडून आले पाहिजेत. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न केले. एकूणच आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जाती निर्मूलनसंबंधी कार्य करत राहिले. त्यांच्या विचारातून व कृतीतून समाजामध्ये बदल घडवण्यासाठी प्रयत्न केले. संविधानामध्ये जात निर्मूलन विषयक कलमांचा समावेश करून जातीव्यवस्था घटनात्मक दृष्टिकोनातून संपुष्टात आणण्याचा प्रयत्नही केला.

**संदर्भग्रंथ सूची**


1. दलित नाटक आणि दत्ता भगत यांचे नाट्यविश्व - प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ.
2. 'प्रज्ञा महामानवाची' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखन कार्य (खंड दोन)-संपादक, डॉ. नरेंद्र जाधव
3. तत्रैव, संपादक डॉ. नरेंद्र जाधव

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

**डॉ. विक्रम जाधव**
मराठी विभाग प्रमुख, सरस्वती मंदिर नाईट कॉलेज, ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड आर्टस्, पुणे 411002

''षिक्षण हे वाघिणीचे दुध आहे ते जो प्राषन करेल तो गुरगुरल्याषिवाय राहणार नाही.'' या उक्तीप्रमाणे षिक्षण हे माणसाचे समाजाचे परिवर्तन करीत असते. हे परिवर्तन योग्य झाले पाहिजे त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विषेष प्रयत्न केले आहेत जो समाज षिक्षणाच्या प्रवाहात नाही तो समाज षिक्षणाअभावी आपले वर्चस्व हक्क गमावून बसतो. षिक्षण आपल्याला आपल्याच हक्काची कर्तव्याची जाणीव निर्माण करून देते. आज राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिस्थिती खूप वेगाने बदलाचे नवेरूप धारण करते आहे. देषा देषात जातीयवादी, फुटीर आंतकवादी चंगळवादी शक्ती डोके वर काढीत आहेत. त्यामुळे अषा स्थितीमध्ये अर्थव्यवस्था कोलमडून जावून भाववाढ बेकारी या समस्यानी सामान्य जनतेची होरपळ मोठयाप्रमाणत होत आहे. अषा बिकट परिस्थितीतून मार्गक्रमन करण्यासाठी महात्मा फुले, राजर्षीषाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारधन समजावून घेवून शैक्षणिक सामाजिक, आर्थिक समतेचा विचार समजून घेवून तो तळागाळापर्यत पोहोचविणे अत्यंत आवष्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुरूवाती पासूनच षिक्षणाच्या बाबतीत जागृत होते. विविध देषात जावून तेथील उत्तम प्राध्यापकांचे मार्गदर्षन, नवी संस्कृती, नवेज्ञान, अषा अनेक गोष्टींचा प्रत्यक्ष दर्षनी संबंध आला. त्यामुळे माणसा–माणसातील संबंधाची समज जाण त्यांना आली त्यांनी आपली परिस्थिती आणि इतर देषातीलपरिस्थिती तुलना करून नवा विचार मांडला भेदभाव मुक्त समजा असला पाहिजे याभूमीकेतून प्रयत्न केले. भारतात सामाजिक समता निर्माण करण्यासाठी विषेष प्रयत्न केले षिक्षणाषिवाय तरणोपाय नाही याची खात्री बाबासाहेबाना पटली होती. त्यांना अनेक भाषा ज्ञात होत्या उदा. जर्मन, फ्रेंच, संस्कृत, पार्षी इत्यादी भाषेत उत्तम ज्ञान त्यांच्याकडे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, प्राथमिक षिक्षणाचा प्रसार हो मोठया प्रमाणात झाला पाहिजे. त्यासाठी षिक्षण हे सार्वत्रिक करणे आवष्यक आहे. षिक्षण हे राष्ट्रीय प्रगती करण्यासाठी महत्वाचा पाया आहे. केवळ अक्षर ओळख अथवा बाराखडी षिकविणे म्हणजे षिक्षण नव्हे, तर मुलांना संसंस्कृत करणारे दर्जेदार असणारे षिक्षण दिले पाहिजे. इतका सुक्ष्म आणि बारीक विचार डॉ. बाबासाहेब करताना दिसतात. केवळ लोकांना खुष करण्यासाठी हा प्रष्न सार्वत्रिक प्रसार करण्याचे काम कित्येक शतके होत आहे. म्हणून आज प्राथमिक षिक्षण शक्तीचे करावे याबाबत कायदा करावा लागतो आहे. जगातील इतर देषांनी आपआपल्या देषात शक्तीचे षिक्षण करून निरक्षता हद्पार केली. प्राथमिक षिक्षणाबरोबर उच्चषिक्षण हे सुध्दा महत्वाचे आहे. उच्च षिक्षणापासून अनेक लोक दूर आहेत. काहीवेळा आर्थिक परिस्थिती योग्य नसते. घरगुती अडचणी, षिक्षणाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन अषा अनेकविध कारणांने षिक्षणाचा लाभ घेता येत नाही. अषा समाज्यासाठी उच्च षिक्षणाच्या सुविधा पुरविण्यासाठी विद्यापीठासारखी संस्था मजबूत करून यंत्रणा अधिक सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आपल्याकडील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र निवा–याची सोय करून पुर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करण्यासा भाग पाडणे नव्हे. खालच्या वर्गाची प्रगती मारून त्यांना दुस–याचे गुलाम व्हावे लागत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण होणारा न्युनगंड नाहीसा करणे, हे खरे षिक्षणाचे ध्येय आहे. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च षिक्षण हेच एकमेव औषध आहे. याचा अर्थ असा की षिक्षण हे किती आवष्यक आहे. हेच सुचित होते षिक्षणाषिवाय माणसाच्या जीवनात परिवर्तन नाही हेच सिध्द होते.

प्राथमिक षिक्षण, उच्च षिक्षण याबरोबर विज्ञान आणि तंत्रज्ञान याविषयी डॉ. बाबासाहेबांनी अतिषय महत्वाची भूमिका मांडली आहे त्यांनी बहूजन समाजातील लोक हे अत्यंत गरीब असून आर्थिक परिस्थिती बिकट आहे त्यामुळे त्यांना हे षिक्षण परवडणारे नाही त्यासाठी काही राखीव जागा दिल्या पाहिजेत सोबत या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारकडून उच्च षिक्षणाकरिता षिष्यवृत्ती जाहीर केली पाहिजे अष्या महत्वाच्या गोष्टी त्यांनी केल्या आहेत. त्याचबरोबर वर्तमान विद्यापीठ षिक्षण यंत्रणेतील उणीवा, जाती–जमाती मधील विविधता, सांस्कृतिक विचाराचे आदान–प्रदान इत्यादी संबंधी विद्यापीठाची भूमिका महत्वाची ठरते यासंदर्भात बाबासाहेब सांगतात की, ''प्राध्यापकांनी अध्यापन आणि अध्ययनात स्वतःला इतके गुंतवून घ्यावे की, आपल्या घराकडेही बघण्याची सवड त्यांना मिळ नये. ते काम त्यांनी त्यांच्या पत्नीकडे सोपवावे संषोधन करावे. त्याचप्रमाणे प्राध्यापक नुसता विद्वान असून चालत नाही तर तो बहुश्रुत, उत्साही असला पाहिजे आपला विषय अधिकाधिक माहितीपूर्ण व मनोरंजक करू शकेल अषी धमक त्याच्याकडे असली पाहिजे याचा अर्थ असा की बाबासाहेब प्राध्यापकांनी आपली वाटचाल कषी करावी ती किती महत्वाची आहे हेच आपल्या विचारातून स्पष्ट करतात. त्याना प्राध्यापक हा अतिषय महत्वाचा घटक वाटतो बदल घडविण्यासाठी षिक्षण षिक्षक यांची महत्वाची भूमिका दिसते.

उच्च षिक्षणाचे मानवी आयुष्यात अत्यंत महत्व आहे. हे आपल्या मिलिंद महाविद्यालयाच्या उद्‌घाटनप्रसंगी केलेल्या भाषणातून अधोरेखित करतात. डॉ. बाबासाहेब हिंदू समाजाच्या अगदी खालच्या म्हणजेच तळाच्या थरातून आल्यामुळे षिक्षणाचे महत्व ओळखून आहेत. तळातील समाजाची प्रगती करण्याचा प्रष्न हा आर्थिक असल्याचे दिसून येते. पण तो त्यांना चुकीचा वाटतो. संपूर्ण देषातील बहूजन समाजाची प्रगती करणे म्हणजे अन्न,वस्त्र, निवारा पुरविणे नाही. त्यांना षिक्षणाच्या प्रवाहात सामील करून घेणे तसेच उत्तम षिक्षण देणे ही जाणीव त्यांच्या ठिकाणी होती त्याषिवाय समाजाची प्रगती होणार नाही म्हणून उच्च षिक्षणाला ते महत्व देतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री षिक्षणाच्या संदर्भात म्हणतात, मुलाला षिक्षण दिल्याने एकच व्यक्ती षिक्षित होते परंतू मुलीला षिक्षण दिल्याने संपूर्ण कुटूंब षिक्षित होते. असा महत्वपूर्ण विचार स्त्री षिक्षणाच्या संदर्भात करतात भारतीय संविधानाच्या कलम 16 अ नुसार स्त्री पुरूष समानता दर्षविली आहे. त्यानुसार मुला मुलीच्या सहषिक्षणाची कार्यप्रणाली त्यांनी अपेक्षित होती. स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे असा महत्वाचा संदेष विचारात दिसून येतो. मुला–मुलींना षिक्षण द्यावे त्यांना जुन्या परंपरागत व्यवसायात गुंतवू नका तुम्ही जे काम करता त्या कामात त्यांना समावून घेवू नका त्यांना षिक्षणाची उर्जा दयावी. मुला–मुलींना षिक्षण देण्यात कमी पडू नका. तुमची मुले षिक्षण घेवून मोठमोठया पदावर गेली पाहिजेत अषी तुम्ही इच्छा धरणे संयुक्तीक ठरेल. हे सुत्र आपण स्वीकारले पाहिजे. आपण आपल्या मुलांना षिक्षण द्या त्यांना खूप खूप षिकवा, त्यांचे षिक्षण पूर्ण होईपर्यत लग्न करू नका, तुमची प्रगती फक्त षिक्षणच करू शकते. षिक्षामुळेच आपले आचार विचार व्यक्तीमत्व यात बदल होवू शकतो त्याचे कारण असे की षिक्षणातच ती शक्ती आहे त्यामुळे षिक्षण हा एकमेव सुधारण्याचा पाया आहे.

आज समाजास अत्यंत निकडीचे असे कोणते कार्य असेल तर ते षिक्षण आणि त्याचा प्रसार करणे होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीने, प्रत्येक संस्थेने षिक्षणाच्या बाबतीत आपल्या तरूण पिढीचे पाउल कसे योग्य पडेल त्याकडे लक्ष दिली पाहिजे प्रवाहाबाहेरील विद्यार्थ्यांना प्रवाहात सामील केले पाहिजे त्यादृष्टिने अधिक प्रभावी काम करणे गरजेचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली शैक्षणिक क्रांतीची लाट या देषात अजून आलीच नाही ती यावी असे वाटते परंतू गरज आहे ती शैक्षणिक धोरण राबविण–या शासनाच्या मनोवृत्तीत बदल करण्याची आहे आजच्या युगात ज्ञान हे विकासाची गुरूकिल्ली असताना एखाद्या समुहाला त्यापासून दूर

ठेवणे म्हणजे एक प्रकारची गुलामगिरीचे लादणे आहे वरील सर्व विचारातून आंबेडकरांच्या षिक्षणाविषयक दृष्टिकोन किती प्रगल्भ , विषाल होता हे लक्षात येते त्यांनी घरातील स्त्री षिकली तर संपूर्ण कुंटूंब हे सुषिक्षित होते. हा विचार सांगून प्रत्यक्ष आपल्या कार्यात रूजविला आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या षिक्षणविषयक विचारांच्या विष्लेषणावरून त्यांच्या मानवी जीवनाच्या सफल व प्रतिष्ठापूर्ण जीवन जगण्यासाठी षिक्षण हा अविभाज्य घटक असल्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

**संदर्भ टीपा**

1. फडके भालचंद्र 'फुले आंबेडकर शोध आणि शोध' आनंद प्रकाषन औरंगाबाद प्र. अ. 1995
2. खरात शंकरराव, 'दलितांचे षिक्षण ' इंद्रायणी साहित्य प्रकाषन पुणे 2010
3. पवार दया '' डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ'' महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई – 1993
4. कीर धनंजय 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर '' पॉप्युलर प्रकाषन मुंबई – 1981

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार : एक अभ्यास

संशोधक

**जामकर अल्का रानबा**

रा.सिद्धार्थ नगर, निडेबन वेस, उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हटल्याबरोबर लक्षात येतो दलितांचा कैवारी, क्रांतीसूर्य, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांचे उद्धारकर्ते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे इतिहासकार, अर्थतज्ज्ञ, राजकीय मुत्सद्दी, घटनाकार, सांस्कृतिक क्रांतिकारक होते. त्यांनी त्यांच्या कुशाग्र बुद्धी, कर्तृत्व, विद्वत्तेचा स्वतःसाठी काही उपयोग केला नाही. शोषित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले विचार मांडले.

भारतात कौटिल्य, दादाभाई नौरोजी, रमेशचंद्र मानवेंद्रनाथ राय, ज्योतीबा फुले, धनंजय गाडगीळ, महात्मा गाधीं, यशवंतराव चव्हाण हे विचारवंत होऊन गेले आहेत. या भारतीय विचारवंतांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले आर्थिक विचार समता प्रस्थापित करणारे आहेत. त्यांचे आर्थिक विचार दिपस्तंभाप्रमाणे भविष्यासाठी दिशा देणारे ठरत आहेत. त्यांचे प्रेरणादायी विचार सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातील परिवर्तनाला चालना देणारे ठरले आहेत. आंबेडकरांना अपेक्षित असणारी सामाजिक लोकशाही, सामाजिक न्याय, आर्थिक लोकशाही, आर्थिक न्याय प्रस्थापित होण्यासाठी त्यांच्या विचारांची गरज आहे. डॉ.आंबेडकरांचे भाकित 2020 साली भारत महासत्ता बनेल हे सत्य झालेले आपणास दिसत आहे. त्यासाठी आंबेडकरांचे विचार हे शेवटच्या घटकापर्यंत रूजले पाहिजेत तरच देशाचा, समाजाचा सर्वसमावेशक विकास होईल, यातून त्यांच्या विचारांची मौलिकता, प्रगल्भता दिसते.

डॉ. भीमराव रामजी आंबेडकरांचा जन्म 14 एप्रिल 1891 मध्ये मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. त्यांनी 1915–ईस्ट इंडिया कंपनी प्रशासन आणि अर्थनीती, 1925–ब्रिटिश भारतातील वित्ताची उत्क्रांती, 1932–रूपयाचा प्रश्न हे ग्रंथ लिहिले. त्यांच्या विचारांवर सेलीग्म्न वे कॅनन यांचा प्रभाव होता. त्या काळातील विविध पैलूंनी रंगलेले मुत्सद्दी व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ.आंबेडकर होते. त्यांचे आर्थिक विचार थोडक्यात मांडणे अवघड आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार अभ्यासणे.
2) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची प्रगल्भता समजावून घेणे.
3) डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारांचा शोषित समाजाला न्याय देण्यासाठी कसा वापर झाला याचा अभ्यास करणे.
4) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अथांग बुद्धिमत्तेचा, कर्तृत्वाचा, विद्वत्तेचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

देशाच्या आर्थिक विकासासाठी डॉ.आंबेडकरांनी फार मोलाचे कार्य केले आहे. त्यांनी समाजामध्ये आर्थिक समानता, आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचे विचार मांडले. मागास समाजाचा विकास करण्यासाठी शेती क्षेत्राचा विकास महत्त्वाचा मानून शेती उत्पादकतेवर भर देण्याचे विचार मांडले. म्हणजेच आंबेडकरांनी तुकडीकरणापेक्षा सामूहिक शेती करणे महत्त्वाचे मानले. तेव्हा अशा माहितीचा अभ्यास हा द्वितीय, दुय्यम सामुग्रीद्वारे घेण्यात आलेला आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार**

**1) मिश्र अर्थव्यवस्था :**

स्वातंत्र्यानंतर समाजवादी किंवा भांडवलशाही अर्थव्यवस्था स्वीकारावी. देशाचा आर्थिक विकास जलद गतीने होईल. हा प्रश्न देशापुढे होता. डॉ.आंबेडकरांनी या दोन्हींचा अभ्यास करून समाजवादी अर्थव्यवस्थेचा काही अंश व भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा काही अंश अशी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. त्यामुळे काही उद्योगांचे राष्ट्रीयकरण करता येईल असे त्यांचे मत होते. आर्थिक विषमता कमी करणे तसेच बँक व विमा कंपन्यांचे राष्ट्रीयकरण झाले तर आर्थिक प्रश्न, नियोजन व्यवस्थित करता येतील.

**2) रूपयाचा प्रश्न :**

डॉ.आंबेडकरांनी लंडनमध्ये असताना डॉ.कॅनन यांच्या मार्गदर्शनाखाली 'रूपयाचा प्रश्न' हा संशोधनात्मक प्रबंध लिहिला. या ग्रेथात त्यांनी आपल्या रूपयाच्या उक्रांतीचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. त्यांनी या ग्रंथात भारतीय रूपयाची जडणघडण सुवर्ण परिमाण असावी की सुवर्ण विनिमय परिमाणात असावी याबाबत वाद निर्माण झाला असताना म्ळणजेच सुवर्ण नाणी का कागदी चलन असा वाद निर्माण झाला तेव्हा आंबेडकरांनी सुवर्ण विनिमय परिमाणाचा विचार केला. कारण त्यामुळे पैशाचे मूल्य घटणार नाही. लवचिकता अधिक नसल्याने भाववाढ होणार असा प्रश्न आंबेडकरांनी मांडला. रूपयाचे स्थान अस्थिर असल्याने सुवर्ण विनिमय पद्धतीपेक्षा सुवर्ण विनिमय परिमाण पद्धत उपयुक्त ठरेल असे विचार मांडले.

**3) शेतीविषयक विचार :**

सन 1918 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'धारणक्षेत्रे आणि त्यावरील उपाय' हा शोधनिबंध लिहिला. यात भारतातील शेतीविषयक प्रश्नांची व उपायांची चर्चा केली आहे. त्यांच्या मते, शेती हा मुख्य व्यवसाय आहे. प्राथमिक व्यवसायात इतरांच्या तुलनेत शेतीचे महत्त्व जास्त आहे. पण उत्पादकता अनेक कारणांमुळे कमी आहे. त्यासाठी सामूहिक शेतीला प्रोत्साहन देण्याचे विचार आंबेडकरांनी मांडले.

**4) आंतरराष्ट्रीय व्यापार :**

देशामध्ये अनियंत्रित बाजारपेठा ह्या ब्रिटिशांच्या हाती आहेत ते ही व्यापार पद्धती नियंत्रित झाली तर देशातील दारिद्र्य नष्ट होण्यास मदत होईल. ज्या मालाची उपलब्धता नाही तो माल आयात व विदेशी मालाच्या तुलनेत आपल्या मालाचा दर्जा कमी व किंमत कमी जास्त असल्याने स्पर्धेत टिकत नाही. स्वदेशी मालास प्रोत्साहन देऊन महागाई विचारात घेता परदेशातून आयात करणे योग्य असे म्हणणाऱ्यांपैकी आंबेडकर होत.

**5) औद्योगीकरण :**

देशात औद्योगीकरणाचा वेग कमी राहिल्याने शेती क्षेत्र अतिरिक्त लोकसंख्या अवलंबून आहे. म्हणून शेतीमध्ये छुप्या बेकारीचे प्रमाणे दिवसेंदिवस वाढत चालले आहे. प्रच्छन्न बेकारी कमी करण्यासाठी देशात औद्योगीकरणाचा झपाट्याने विकास झाला पाहिजे. औद्योगिकीकरणाने देशात रोजगारांच्या संधी मोठ्या संख्येने वाढल्याने जनतेची सामाजिक व आर्थिक पिळवणूक थांबण्यास मदत होईल. देशातील मूलभूत उद्योग हे सरकारच्या मालकीने सरकारनेच चालवावेत. इतर खाजगी असावेत. डॉ.आंबेडकरांच्या विचारांचा अवलंब 1956 च्या औद्योगिक धोरणात दिसतो.

**6) प्रबंधातील आर्थिक विचार :**

स्न 1915 मध्ये त्यांनी 'ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्त' हा शोधनिबंध लिहिला. निबंधाच्या अंतिम भागात त्यांनी ब्रिटिश राजवटीचे भारतातील योगदान व शोषण याचा उल्लेख केला आहे. भारतातील कार्याबद्दल इंग्रजांना समाधान वाटण्यास थोडीफार जागा नक्कीच आहे. त्यांनी भारतीयांना

दिलेली महत्त्वपूर्ण शांती पाश्चिमात्त्य शिक्षणाची सुरूवात करून त्यांनी एका पुरातन सुसंस्कृत राष्ट्राला आधुनिक संस्था व जीवनाच्या संपर्कात आणले, त्यांनी दिलेले प्रशासन हे उपयुक्त आहे.

**7) करविषयक विचार :**

डॉ. आंबेडकरांनी मजूर पक्षाच्या इ.स.1936 मध्ये कर विषयक विचार मांडले. त्यांच्या मते उत्पन्नापेक्षा कर पात्रतेवर कर आकारण्यात यावा. उत्पन्नाच्या काही मर्यादेपर्यंत कर आकारण्यात यावा. उत्पन्नाच्या व काही मर्यादेपर्यंत आकारू नये. करामुळे राहणीमानावर फार परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी.

**मूल्यमापन :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन परिस्थितीचे सखोल अभ्यास करून आर्थिक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यांनी आपल्या आर्थिक विचारांमध्ये शेती, कर, औद्योगिकीकरण, आयात–निर्यात, व्यापार, रूपयांचा प्रश्न अशा अनेक घडामोडींचा अभ्यास केला. ते केवळ आर्थिक विचारच नव्हेत तर समाजकारण, राजकारणाचेही गाढे पंडित होते. म्हणूनच आंबेडकरांनी शेती विकासासाठी राष्ट्रीयकरणाचा मार्ग सुचवून उत्पादकता कशी वाढवता येईल यावर लक्ष केंद्रीत केले.

**संदर्भ सूची**

1) डॉ.भालचंद्र मुणगेकर–भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित – एक आंबेडकरी दृष्टिकोन, सुगावा प्रकाशन, पुणे–30
2) कवीमंडन विजय–आर्थिक विचारांचा इतिहास
3) देसाई यु. आणि भालेराव, आर्थिक विचारांचा इतिहास
4) डॉ.बी.आर. आंबेडकर गौरवग्रंथ
5) प्रा.ए.आर.रायखेलकर–आर्थिक विचारांचा इतिहास

# आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय योगदान

## डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार

रा.वसमत जि. हिंगोली

**प्रस्तावना**

उद्धरली कोटी, फुले, भीमा तुझ्या जन्मामुळे
जखडबंद पायातील साखळदंड
तटातट तुटले तु बोलताच दंड
झाले गुलाम मोकळे, भीमा तुझ्या जन्मामुळे

राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्वव्यापी आहेत त्यांच्या विचारांना एका चौकटीत बसवू नये... लोकशाही रुजविण्यापासुन ते जातिअंतापर्यंत सर्वांगीण शिक्षणापासुन ते समानतेच्या विचारापर्यंत प्रत्येक विचारात डॉ. बाबासाहेबांचे आंबेडकर यांचे प्रतिबींबउमटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्व मानव जातीसाठी गरजेचे आहे. तो शिक्षणाचा असो वा जातीअंताचा त्यांच्या विचारांनीच आज देश बदलला आहे त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना ही विशिष्ट वर्गापुरती मर्यादित नाही, तर ती सर्वव्यापी आणि परिपुर्ण आहे. त्यांनी निर्माण केलेली भारतीय राज्यघटना जगातील इतर देशही अनुकरण करत आहेत त्यांचे प्रमुख कारण त्यांची सर्वसमावेशक भुमिकेतुन त्यांनी राज्यघटनेचा विचार केला एक मुल्य, एक मत आणि एक व्यक्ति हा त्यांचा समानतेचा विचार त्यांनी दिला आणि आयुष्यभर जोपासलही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीच विचार म्हणजे, स्वराज्य, राष्ट्रवाद लोकशाही, मुलभुत हक्क, अल्पसंख्यकांचे हितरक्षण, समाजवाद, साम्यवाद, बौद्धधर्म इत्यादी विचार होते. ज्या लोकांमध्ये आपला जन्म झाला त्या लोकांचा उद्धार करणे हे आपले कर्तुव्य ही जाणीव ज्यांना आहेत ते धन्य होत. यांच उदेशाने त्यांनी राजकीय विचार आपल्या कृतीतुन भारतीय समाज घडविला.

**विषय निवडणेचा हेतु :**

१) प्रस्तुत विषय निवडणेचा हेतू म्हणजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित हक्कांच्या राजकीय तरतुदीचा अभ्यास करणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भारतीच राजकीय विचारांचा हा अभ्यास करणे.

**गृहितके :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांचा वेध घेणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचार प्रणाली समाताधिष्ठित समाजरचनेवर आधारलेली आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत विषयांच्या संशोधनाकरिता, चरित्रात्मक विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यत येणार आहे. त्याकरिता प्राथमिक व द्रितीय व इतर सहकारी ग्रंथ, मासिके, साप्ताहिक, विविध वृतमानपत्रातील लेख, इंटरनेटचा आधार घेऊन प्रस्तुत शोधनिबंध मांडली केली जाणार आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय योगदान**

**१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रवाद**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादाच्या संकल्पनेत सामाजिक नीतीला विवेकनिष्ठेला महत्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय समाजव्यवस्थेच्या विषमतोलांची आणि गुण मर्यादांची प्रगल्भ जाण होती.

त्याच्या मते, केवळ भौगोलिक आकार म्हणजे राष्ट्र नव्हे तर राष्ट्र ही समुह भावना आहे. 'एक व्यक्ति एक मुल्य'या सिद्धांताचा स्विकार करुन ते कृतीत आणावे या मताचा त्यांनी विचार केला. '२५ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समिती समोर भाषण करतांना भारताचे स्वतंत्र कायम स्वरुपी टिकुन रहावे अखंडित राहावे यावर भर दिला.'[१]'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इ. स. १९२० मध्ये बहिष्कृत हितकारणी सभेचीस्थापना केल्यापासुन ६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण होईपर्यंत जातिव्यवस्था व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी ३६ वर्ष अविरत, प्रखर, एकाकीपणे सर्व पातव्यांवर जो संघर्ष केला त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. ते त्यांचे ऐतिहासिक व अलौकिक कार्य आहे ते करताना एक प्रखर राष्ट्रभक्त म्हणुन केले.'[२]'आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या अन्यायावर उपाय योजना सुचविण्यास तसेच त्याची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरुपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भुमिच नाही.'[३]अस्पृश्य लोकांमध्ये राष्ट्रवादांची जाणीव करुन देण्यात कार्य आपल्या विविध वृतमान पत्रातुन व प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी केले.

**२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही**

लोकशाहीचे दुसरे नाव बंधुत्व किंवा बंधुभाव आहे. लोकशाही हा शासनाचा प्रकार नसुन प्राथमिक दृष्टीने एकत्रित जीवनाची ही पद्धती आहे. त्यांनी लोकशाहीचे बदलते स्वरुप यांवर सुध्दा विचार मांडला. तत्वप्रणाली पेक्षा देश श्रेष्ठ, घटनात्मक मार्गाचा अवलंब, विभुजीपुजा निषिद, अल्पसंख्यकांची सुरक्षितता प्रभावी विरोधी पक्ष, अशा अनेक घटकापासुन मजबुत लोकशाही घटनात्मक मागणी चालणारे देशाचे म्हणजे लोकशाही.'पुणे जिल्हा कायदा ग्रंथालयातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाचा कार्यक्रम २२ डिसेंबर १९५२ ला झाला होता. या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'लोकशाही यशस्वी होण्याकारिता पुर्वाविश्यक अटी' या भाषणात त्यांनी लोकशाहीची स्वत:ची व्याख्या दिली 'लोकशाही हा शासनाचा प्रकार आणि पद्धती आहे की त्याद्वारे लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात रक्ताचा एक थेंबही न सांडता क्रांतिकारक बदल घटवुन आणला जातो.'[४]'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीची परिभाषा करतांना म्हणतात, 'रक्ताचा एकही थेंब न सांडता केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात होणाऱ्या पुरोगामी परिवर्तनाने जी शासन संस्था आस्तित्वात येने ती म्हणजे लोकशाही होय.'[५]

**३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समाजवाद**

'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्रपणे राज्य समाजवादाचा सिद्धांत प्रतिपादन केला या सिद्धांतात त्यांनी लोकशाही आणि समाजवाद याचा सुवर्णमध्ये साधला आणि राज्य समाजवादाचा नवीन सिद्धांत उद्घोषित केला याचा अर्थ त्यांनी मार्क्स प्रणित राज्य समाजवाद मान्य केला असा होत नाही.'[६]'स्वतंत्र मजर पक्ष यांचा जाहीरनामा गरीब आणि दलित वर्ग यांच्या उत्कर्षाच्या नि उद्धाराच्या ध्येयाने प्रेरित झालेला होता. इतका ध्येयपुर्ण नि:सदिग्ध व जनहिताबद्दल दक्षता दर्शविणारा जाहीरनामा तत्कालीन राजकीय पक्षांत क्वचित सापडेल.'[७]हा स्वतंत्र मजुर पक्ष हा जातीयवादी पक्षाच्या संघटना नव्हती तर अस्पृश्य वर्ग आणि इतर वर्ग याच्यात राजकीय सहकार्यास वाव असावा हा हेतु होता. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या आर्थिक तत्वज्ञानाचा मुलमंत्र, 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय'आहे. डॉ. बाबासाहेब यांच्या आर्थिक तत्वज्ञानाला सामाजिक, धार्मिक आणि नैतिक अधिष्ठांना आहे. शोषित आणि पिडीत समाज त्यांच्या तत्वज्ञानाची केंद्रबिंदु आहे.'[८]

**४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वराज्य**

'ग्रामराज्यांसंबंधीज्या सुचना केल्या गेल्या त्या संबंधी आपले विचार स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, खेडे म्हणजे त्या भागातील एक स्थानिक वादाचे कोंडळे, अज्ञानाची, कोटया मनाची आणि जातीयवादाची गृहा म्हणुन राज्यघटनेने खेडे हे घटक न मानता व्यक्ती ही घटक मानली या बदल मला आनंद होत

आहे.'९आपला देश हा बहुतांश खेड्याचा आहे, ८०% लोक खेड्यात राहतात त्यांच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्रात मागासलेपणा फार मोठ्या प्रमाणात असल्याची जाणीव डॉ. बाबासाहेबांना होती. त्यामुळे ग्रामीण जीवनाचा सर्वतोपरी विकास झाला पाहिजे असे वाटत होते. '२ मार्च १९३० या दिवशी आंबेडकरांनी दलित हिंदुच्या सामाजिक स्वातंत्र्यासाठी नाशिक येथे मंदिर प्रवेशाचा लढा सुरु केला.'१०अस्पृश्य लोकांना स्वराज्याचा हक्क मिळून देण्याचे त्यांचे कार्य हे बहुजनाचे स्वराज्य हक्क देण्याचे कार्य होते.

**५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साम्यवाद**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साम्यवाद हा खुप चर्चेचा विषय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यशास्त्राचे व्यासंगी होते ते अर्थशास्त्राज्ञ होते. कार्ल मार्क्सचा साम्यवाद आणि बौद्ध धर्म यांच्या अभ्यासात त्यांनी खुप केला. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय कम्युनिष्ट चळवळ तिच्या उदयापासुन अस्पृश्यतेच्या प्रश्नावर उदासिन होती हा डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा समज होता. हा समज अगदी चुक होता असे तत्कालीन इतिहास पाहता म्हणता येणार नाही. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या हालचालीपुढे शहरात गिरण्या सुरु झाल्या होत्या आणि कामगारवर्गही निर्माण होण्याची प्रक्रिया सुरु झाली. 'डॉ. आंबेडकर यांनी अनेक अडचणींना तोंड देऊन सुद्धा शेतकऱ्यांच्या चळवळीत संघटित करीत होते. १७ सप्टेंबर १९३७ रोजी त्यांनी खोती विरोधी विधेयकही मुंबई विधीमंडपाला सादर केले परंतु ते स्वत:ला कम्युनिस्टांचा कट्टर वैरी समजत होते.'११

नेपाळमध्ये काटमांडुच्या जागतिक धम्म परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध की मार्क्स या प्रश्नावर जाहीरपणे मार्क्स नाही तर बुद्धच आपला मार्गदाता असल्याचे घोषित केले मार्क्सवादी विचाराचा सखोल चिकित्सा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लेखणात केलेली आहे.

**६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध धर्म**

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो समाज बांधवासह नागपुर येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. दीक्षा घेण्यापुर्वी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवले ये. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मातरांची घोषणा केली.'१२'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माच स्विकार केला ते म्हणतात, बौद्ध धम्म हा इतर धर्मापेक्षा वेगळा आहे, इतर धर्माचा पाया व त्याची इमारत ईश्वर, आत्मा, स्वर्ग, पुर्वसंचितानुसार जाती, गरीब, श्रीमंत, पाप पुण्यनुसार, कर्मकांड, अंधश्रद्धा या तत्वावर आहे बौद्ध धर्माने या सर्व गोष्टी नाकारल्या आहे. कल्पनावादी सिद्धांत नाकारुन वास्वत जीवनातील सामाजिक परिस्थितीचे आकलण करणारी बुध्दी सामाजिक जाणिव, प्रज्ञा, शील, करुणा, या मुल्य तत्वावर समाज उभा करण्याचा प्रयत्न बुध्द धर्माने प्रथम केला.'१३

हिंदु धर्माचा त्याग करण्याची घोषणा केल्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी सर्व धर्माचा तौलनिक अभ्यास केला आणि शेवटी बौद्ध धर्माचा स्विकार केला.

**निष्कर्ष:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजात मुलभुत परिवर्तन घडवुन आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्न विचारांचा आणि कृतीचा भारतीय समाजाला नवी दृष्टी दिली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक विचार हा त्याच्या भारतीय समाजाला नवी दृष्टी देण्याचा आधार आहे. एकुण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा धार्मिक व समाज विषयक दृष्टीकोन हा लोकशाहीवादी, विज्ञानवादी, भौतिकवादी परिवर्तन निष्ठ आहे. वैदिक साहित्याने बहुजनांच्या जीवनाला व उच्च प्रतिच्या सांस्कृतीक कार्यात मनाच्या विकासात अडथळे निर्माण केले त्याच्या राजकीय विचाराचा समता, न्याय, स्वातंत्र्य अशा समाज निर्मितीचे स्वप्न मांडले.

**संदर्भ:**

१) राजेंद्र शत्रुघ्न काटकर (२००९) एकविसाव्या शतकातील आंबेडकरवाद, सुधीर प्रकाशन, प्रथम आवृती, वर्धा, पु. १६३

२) दै ऑनलाइन लोकमत, १४ एप्रिल २०२०

३) साप्ताहिक साधना, १२ एप्रिल २००८, अंक ३४, पु. ३

४) मासिक लोकराज्य,डिसेंबर २०१८,अंक ४, पु. १२

५) राजेंद्र शत्रुघ्न काटकर (२००९) २१ शतकातिल आंबेडकरवाद, सुधीर प्रकाशन,प्रथम आवृती, वर्धा, पु. १३२

६) धनराज डाहाट (१९९९) डॉ.आंबेडकरांचे समाजवादी चिंतन, संकेत प्रकाशन, प्रथम आवृती, नागपुर, पु. ७६

७) धनंजय कीर (२०२०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पु. ३१७

८) मासिक लोकराज्य,एप्रिल २०१६, अंक १०,पु. १६

९) धनंजय कीर (२०२०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पु. ४५४

१०) कित्ता पु. १५९

११) रावसाहेब कसबे (२०२१) आंबेडकर आणि मार्क्स, पुस्तक मार्कट, पुणे पु. २८२

१२) राजेंद्र शत्रुघ्न काटकर (२००९) एकविसाव्या शतकातील आंबेडकरवाद, सुधीर प्रकाशन, प्रथम आवृती, वर्धा, पु. ७७

१३) मानवलोक रिसर्च बुलेटन जानेवारी-मार्च २०१६, अंक १३, ISSN२३४९-३९८४, पु. २११

# डॉ. बी. आर. आंबेडकर : धर्मांतराची चळवळ, कारणे, परिणाम

**प्रा. डॉ. सुनंदा भद्र शेटे**

समाजशास्त्र विभाग, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर ता.उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

'धर्मांतर' या शब्दाचा अर्थ पूर्वश्रमीचा धर्माचा त्याग करून दुसऱ्या धर्माचा स्वीकार करणे असा साधा, सरळ सोपा अर्थ सांगता येतो. धर्मांतराच्या प्रक्रियेत व्यक्ती किंवा समूह आपल्या मूळ धर्मातील तत्त्वज्ञानाचा त्याग करून नवीन धर्मातील तत्त्वज्ञानाचा अंगिकार करतात. तसेच दोन्ही धर्मातील काही सोयीस्कर तत्त्वांचा अवलंब करतात.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

1)धर्मांतर संकल्पना स्पष्ट करणे.

2)धर्मांतराची पार्श्वभूमी स्पष्ट करणे.

3)धर्मांतराची कारणे स्पष्ट करणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मांतराची संकल्पना स्पष्ट होती ती अशी की, हिंदू धर्मात अस्पृश्यांना सहानुभूतीची वागणूक मिळत नाही. ज्या धर्मात जातीचा पुरस्कार करून माणसामाणसात भेद करतो. ज्या धर्मात स्वातंत्र्य, समता, बंधुता नाही, त्या धर्मात राहून अस्पृश्यांचा उद्धार होणार नाही म्हणून त्यांनी धर्मांतर केले पाहिजे. बाबासाहेबांनी हिंदू धर्म व समाजव्यवस्थेला असा प्रश्न केला की, जो धर्म अस्पृश्यांना देवळात जाण्यास प्रतिबंध करतो, प्यायला पाणी मिळू देत नाही, अस्पृश्यांच्या सावलीचा विटाळ मानतो. त्या हिंदू धर्मात अस्पृश्यांनी कशासाठी राहायचे? म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मत्यागाची घोषणा 13 ऑक्टोबर 1935 रोजी येवला येथे करताच त्याचे तीव्र पडसाद देशभर उमटले. बाबासाहेबांनी इस्लाम धर्म स्वीकारला तर अस्पृश्यांच्या हितासाठी पाच कोटी रूपयांची तरतूद करण्याची घोषणा हैदराबादच्या निजामाने केली होती. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीही बाबासाहेबांना ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचे आवाहन केले होते. पण बाबासाहेबांनी इस्लाम व ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचा विचार कधीच केला नाही. 1935 च्या पूर्वी हिंदू पुढाऱ्यांशी झालेल्या भेटीगाठीत हिंदू संस्कृतीचे नुकसान होईल असा धर्म मी स्वीकारणार नाही अशी ग्वाही दिली.

30 मे 1936 रोजी पातपात मोडक मंडळाकरिता केलेल्या भाषणात अस्पृश्यांना बुद्धवचन लक्षात घेतल्यास त्यांना मुक्तीचा मार्ग सापडेल असे प्रतिपादन म्हणजेच बुद्ध धर्म स्वीकारण्याचा विचार 1936 पूर्वीच निश्चित झाला असल्याचे दिसून येते. 2 मे 1950 रोजी दिल्लीच्या बुद्ध विहारात वैशाखी पौर्णिमेनिमित्त भाषण करताना व पत्रकारांशी बोलताना त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचा आपला विचार आहे असे सूचित केले होते. 1950 च्या महाबोधीमध्ये "बुद्ध आणि त्यांच्या धर्माचे भवितव्य' या लेखात डॉ.बाबासाहेब म्हणाले, 'जग जर कोणता धर्म स्वीकारू शकेल तर तो बौद्ध धर्म होय.' 1951 मध्ये डॉ.बाबासाहेबांनी बुद्धीस्ट सोसायटीची स्थापना केली. बालपणापासूनचे बौद्ध धर्माची पुस्तके ते वाचत असत.

जातीभेद, अस्पृश्यता नष्ट करायची असेल तर धर्मांतराशिवाय मार्ग नाही. धर्मांतराचा मार्ग शहाणपणाचा मार्ग आहे. माणसाला जशी स्वातंत्र्याची आवश्यकता आहे तशी धर्मांतराची आवश्यकता आहे. धर्मांतर राजकीय

हक्कांचे संरक्षण करण्याचा मार्ग आहे. धर्मांतराविषयी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपले ठाम मत विविध अंगांनी बनविले. ते म्हणतात की, "माणूस धर्माकरिता नाही, धर्म माणसाकरिता आहे. माणूसकी प्राप्त करून घ्यायची असेल तर धर्मांतर करा. संघटन करायचे असेल तर धर्मांतर करा. जो धर्म अशिक्षितांना अशिक्षित रहा, निर्धनांना निर्धन रहा अशी शिकवण देतो तो धर्म नसून ती शिक्षा आहे."

नागपूर येथे 14 ऑक्टोबर 1956 रोजी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतर 15 ऑक्टोबर 1956 रोजीच्या ऐतिहासिक भाषणात नागपूर हे ठिकाण निवडण्याचे कारण सांगितले. धर्मांतराच्या इतिहासातील पहिले पर्व म्हणजे मुसलमान धर्माच्या स्वीकाराचे, दुसरे वर्ष हे भारतात ब्रिटिश राजवट प्रस्थापित झाली. त्यावेळी ख्रिश्चन मिशन यांच्यामार्फत झालेले धर्मांतर, बाराव्या शतकात बहुजन हिंदूंचे कर्नाटकात लिंगायत धर्मात झालेले परिवर्तन यानंतर डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्यांचे भारतात झालेले धर्मांतरण अशी अनेक धर्मांतरे भारतात आतापर्यंत झालेली आहेत. कधी ही धर्मांतरे स्वच्छेने तर कधी जबरदस्तीने झालेली आहेत.

**धर्मांतराची कारणे**

**दारिद्रय :**

इतिहासात जी धर्मांतरे झाली त्याचे प्रमुख कारण म्हणजे दारिद्रय हे सांगता येते. याला महार जातही अपवाद नाही. आतापर्यंत श्रीमंत व्यक्तींनी धर्मांतर केल्याचे उदाहरण अत्यल्प आहे. प्रथम हिंदूंनी, मुस्लिम व ख्रिश्चनांनी धर्मांतर केले. दुष्काळ, भौगोलिक परिस्थिती, त्या-त्या भागातील दारिद्रय, गरिबी व ख्रिश्चन मिशनऱ्यांना मिळालेला ब्रिटिश सरकारचा राजाश्रय, धर्मांतरितांना नोकरीची संधी मिळू लागली त्यामुळे दारिद्रय दूर झाले.

**अस्पृश्यता :**

अस्पृश्य मानलेला दलित वर्गीय समाज हा हिंदू धर्माचा व हिंदू समाजाचा एक भाग समजला जात असला तरी या समाजाला अस्पृश्य लेखून त्यांना सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक या क्षेत्रांतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या सोयी सवलतीपासून वंचित करण्यात आले होते. या समाजाला शतकानुशतकांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याकरिता बाबासाहेबांना वेगवेगळया प्रकारच्या चळवळी कराव्या लागल्या.

**सामाजिक प्रतिष्ठेसाठी :**

डॉ. बाबासाहेबांना याची जाणीव झाली की, महारांना गावात इज्जत नाही, मानमरातब नाही. त्यांचा स्वाभिमान नष्ट झाला आहे. शिळया व उष्ट्या तुकड्यासाठी माणूसकी विकणे ही मोठ्या लाजेची गोष्ट आहे. जुने ते सोने मानले तर समाजात सुधारणा होणार नाहीत. स्वावलंबन शिकावे, स्वाभिमान धरावा, स्वत्वाची जाणीव ठेवली पाहिजे. तरच उद्धार होईल असे बाबासाहेबांना वाटले. तसेच महाराजांनी वतनाचा लाभ सोडून शेतकरी करावी आणि जंगलातल्या जमिनी मिळवाव्या.

**विषमता :**

हिंदू धर्मात असलेली सामाजिक विषमता ही सुद्धा धर्मांतराचे कारण होय. प्रत्येकाचा जातीनुसार दर्जा ठरलेला आहे. त्यामुळे सामाजिक समता हिंदू धर्मात राहून कधीच मिळणार नाही याची जाणीव बाबासाहेबांना पदोपदी झाली होती. म्हणून सामाजिक विषमता ही धर्मांतराचे कारण म्हणून सांगता येते.

**अस्पृश्यतेची जाणीव निर्माण करणे :**

प्रथमत: अस्पृश्यता ही काय आहे, तिचे स्वरूप काय, याचा पुरता समज करून घेणे आवश्यक आहे. सर्व प्रकारची बंदी अस्पृश्यांवर लादून त्यांना जेरीस आणले होते. परंतु याची जाणीव त्यांना नव्हती. या सर्व प्रकारच्या जाणीव निर्माण करून देणे हे धर्मांतराचे कारण होय.

**वर्ग कलह :**

अस्पृश्यतेचा प्रश्न हा वर्ग कलहाचा प्रश्न आहे. एका माणसावर होत असलेल्या अन्यायाचा प्रश्न नव्हे, तर एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर चालविलेल्या अन्यायाचा प्रश्न आहे. हा वर्ग कलक सामाजिक दर्जा संबंधीचा कलह आहे. एका वर्गाने दुसऱ्या वर्गाशी वागताना आपले वर्तन कसे ठेवावे यासंबंधीचा कलक आहे. समानतेच्या वागणुकीचा आग्रह धरला की कलह निर्माण होतो.

**सामर्थ्य मिळविणे :**

मनुष्याला तीन प्रकारचे सामर्थ्य अवगत असते. आत्मविश्वास, उत्साह व महत्त्वकांक्षा यांचा बिमोड झाला आहे. निराशेचे व नामर्दुमकीचे वातावरण सर्वत्र पसरले आहे. त्यामुळे आत्मविश्वास, उत्साह व महत्त्वकांक्षा या तीन गुणांद्वारे सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी डॉ.आंबेडकरांना धर्मांतराची आवश्यकता वाटते.

**अध्यात्मिकता :**

मानवी जीवनात ज्याप्रमाणे ऐहिक बाबींची गरज आहे त्याचप्रमाणे अध्यात्मिकतेची गरज आहे. परंतु हिंदू धर्मात व्यक्तीला स्थान नाही. फक्त व्यक्तींनी इतरांशी कशा प्रकारे वर्तन करावे याचे मार्गदर्शन केले जाते. व्यक्तीला प्राधान्य नसल्यामुळे डॉ.आंबेडकरांना हिंदू धर्म हा धर्म, धर्म म्हणून मान्य नाही.

**व्यक्तीविकास :**

व्यक्तीच्या विकासाला तीन गोष्टींची आवश्यकता असते. सहानुभूती, समता आणि स्वातंत्र्य. हिंदू धर्मात अस्पृश्यांकरिता या तीन गोष्टी नाहीत. कासरण या धर्मात एका वर्गाने विद्या शिकावी, दुसऱ्या वर्गाने शस्त्र धरावे, तिसऱ्याने व्यापार करावा व चौथ्याने नुसती सेवा करावी असे आहे, डॉ.आंबेडकरांना हे मान्य नव्हते. यामुळे त्या व्यक्तीविकासाला अडथळा निर्माण करणाऱ्या आहेत.

**स्वातंत्र्यासाठी धर्मांतर :**

हिंदू धर्मात अस्पृश्यांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नाही तर त्यांच्या प्रत्येक कृतीवर धर्माच्या माध्यमातून बंधने लादली आहेत. त्यामुळे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी धर्मांतराची आवश्यकता डॉ.आंबेडकरांना वाटली.

**पूर्वाश्रमीची ओळख मिटविण्यासाठी :**

ज्या लोकांनी मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध अगर शीख म्हणून घेणे हे धर्मांतर आहे परंतु ते नामांतर देखील आहे. यांना हिंदू म्हणून कोणी ओळखत नाही. त्यांची पूर्वाश्रमीची ओळख मिटून गेली आहे. परंतु महार अशी ओळख सांगितल्यानंतर कोणीही अस्पृश्यांना जवळ करत नाही. अशा मधल्या अवस्थेत घोटाळत राहण्यापेक्षा धर्मांतरण करून कायमचे नामांतर करून घेणे डॉ.आंबेडकरांना योग्य वाटते.

**आर्थिक उन्नतीसाठी :**

जोपर्यंत अस्पृश्यतेचा कलंक अस्पृश्यांवर आहे तोपर्यंत त्यांची आर्थिक उन्नती होणार नाही. जितकी स्वराज्याची आवश्यकता हिंदुस्थानला आहे तितकीच धर्मांतराची आवश्यकता अस्पृश्यांना आहे. आर्थिक उन्नतीसाठी धर्मांतर गरजेचे आहे असे मत डॉ.आंबेडकर नोंदवितात.

**मानवतेच्या प्राप्तीसाठी :**

डॉ. आंबेडकरांच्या मते, माणूस धर्माकरिता नाही तर धर्म माणसाकरिता आहे. माणूसकी प्राप्त करून घ्यायची असेल तर धर्मांतर करणे आवश्यक आहे. संघटना, समता, स्वातंत्र्य, संसार सुखाचा करायचा असेल तर धर्मांतर करा अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची कारणे विशद केली.

**सारांश :**

धर्मांतराच्या घोषणेनंतर ठिकठिकाणी हिंदू धर्मग्रंथांची होळी, पोथ्या पुराण्यांची, देवदेवतांच्या मूर्त्या, फोटोंची होळी होऊ लागली. धर्मांतराच्या अधिकृत घोषणेमुळे आपण हिंदू नाही ही भावना अस्पृश्यांच्या अंत:करणात दृढ झाली. या एकाच कृतीने ते अहिंदू बनले. दलित नेते हिंदू धर्मग्रंथांवर, देवदेवतांवर सडकून टीका करू लागले व धर्मांतराला अनुकूल अशी मनोवृत्ती अस्पृश्यांत निर्माण होऊ लागली. 1936 ते 1956 या कालावधीत डॉ.आंबेडकरांनी विविध धर्माचा अभ्यास केला आणि 1956 रोजी आपल्या पाच लाख अनुयायांसोबत नागपूर येथील दिक्षाभूमीवर सामूहिकरित्या बौद्ध धर्मात प्रवेश केला. बौद्ध धर्मात प्रवेश हा मानसिक गुलामगिरी संपविण्यासाठी देखील होता.

**संदर्भ:**

1)फडके भालचंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर 1985

2)गायकवाड ज्ञानराज काशीनाथ, महामानव डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, रिया प्रकाशन, कोल्हापूर, ऑक्टोबर 2013

3)शहा घनश्याम, भारतातील सामाजिक चळवळी, अनुवाद : प्राची चिकटे, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2008

4)सिंगारे अनिल, धुले विठ्ठल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातूर, 2009

5)सिंह व्ही.एम., जनमेजय सिंह, भारत में सामाजिक आंदोलन, रावत पब्लिकेशन, जयपूर, 2005

6)भद्रशेटे सुनदा, शेख बी.बी., भालेराव बी.पी., भारतातील सामाजिक आंदोलने, अरूणा प्रकाशन, लातूर, 2010

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक चळवळी"

**प्रा. डॉ. सिद्धेश्वर रामचंद्र शेटकर**

सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, संजीवनी महाविद्यालय चापोली. ता. चाकूर जि.लातूर

**प्रस्तावना :-**

सामाजिक चळवळ ही प्रामुख्याने समाजातील बहुसंख्य लोकांकडून समाजांच्या काही महत्त्वाच्या घटकांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न असतो आणि त्या प्रयत्नांना विरोध करण्याचा संघटितपणे समाज सुधारकाकडून प्रयत्न केला जातो ही संकल्पना सर्वप्रथम सेट सायमन या फ्रेंच विचारवंतांनी अमलात आणली.

भारतामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्यानंतर समता प्रस्थापित करणारी चळवळ /आंदोलन पुढे नेण्याचे काम त्यांचे नेतृत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून करण्यात आले. सर्वसाधारणपणे त्यांनी 1920 पासून ही चळवळ सुरुवात केली. इ. स. 1920 ते 1956 हा काळ सामाजिक चळवळीच्या संदर्भात सुवर्णकार म्हणून ओळखला जातो. कारण याच वेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभेपासून त्यांना सुरुवात केली. डॉ.आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून त्यावेळेस चळवळींचा उच्चांक गाठला. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक ,आर्थिक ,राजकीय आणि धार्मिक अशी व्यापक स्वरूपात ही सामाजिक चळवळ सुरुवात केली. जसे की 1927 मध्ये झालेला महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह असतो. 1930 मध्ये असलेला काळाराम मंदिराचा सत्याग्रह, अमरावती येथील अंबादेवी मंदिर सत्याग्रह ,पुण्याचा पार्वती सत्याग्रह असा वेगवेगळया माध्यमातून सर्व समाजांना जातीभेद विसरून एकत्र येण्यासाठी त्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य निश्चितच महत्त्वपूर्ण कार्य म्हणून ओळखले जाते अशा या महान समाजशास्त्रज्ञ / समाज सुधारक यांनी केलेल्या सामाजिक चळवळीचा आढावा आपणास पाहता येईल.

**महाड चवदार तळयाचा सत्याग्रह :-**

मुंबईतील सिताराम केशवराव बेले यांनी 4 ऑगस्ट 1923 मध्ये सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता ना उपभोग घेऊ द्यावा असा ठराव मांडून तो मंजूर देखील करण्यात आला. परंतु त्यांची अंमलबजावणी न झाल्यामुळे बहिष्कृत हितकारणी सभे मार्फत महाड येथे 19 आणि 20 मार्च 1927 रोजी कुलाबा जिल्ह्यात बहिष्कृत परिषद आणि त्यांचे अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. या परिषदेमध्ये प्रामुख्याने महाड च्या तळयाचे पाणी सर्व जमलेल्या लोकांनी प्राशन करावे. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सहकारी आनंद विनायक चित्रे यांनी सुचवले आणि त्याप्रमाणे अध्यक्षांच्या म्हणण्यानुसार चवदार तळयावर जाऊन पाणी सर्वांनी घेतले. त्यावेळेस त्या ठिकाणी असणाऱ्या सुवर्ण हिंदू लोकांना राग आला आणि त्यांनी त्या वेळेस या परिषदेच्या लोकावर हल्ला केला. त्यावेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतामध्ये असणाऱ्या सार्वजनिक ठिकाणी असणारे तळी व विहिरी सर्व अस्पृश्यता साठी खुले करण्याचे आव्हान केले.

**अंबादेवी मंदिर सत्याग्रह :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या पाणी प्रश्नावर जसया पद्धतींचा सत्याग्रह केला त्याच पद्धतीने दलितांना हिंदू मंदिरामध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी आणि सार्वजनिक ठिकाणी त्यांना एकत्रित येण्यासाठी देखील

सत्याग्रह करणे आवश्यक वाटले. मंदिर प्रवेशामुळे दलितांचे प्रश्न सुटणार नाही यांची कल्पना त्यांना होती परंतु दलितांना या समाज व्यवस्थित मानाचे स्थान मिळाले पाहिजे. हक्काने त्यांना राहता आले पाहिजे. त्यामुळेच मंदिर प्रवेशाची चळवळ त्यांनी हाती घेतली. तेव्हाच त्यांनी अमरावती येथील अंबादेवीचे प्राचीन मंदिर प्रवेशांसाठी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह सुरुवात केला आणि त्यावेळी अस्पृश्यांना देवस्थान आणि मंदिरात प्रवेशासाठी देवस्थान कमिटी कडे दोन वेळा अर्ज केला बऱ्याच कालावधीनंतर तेथील विश्वस्त दादासाहेब खापर्डे यांनी मंदिर प्रवेश अस्पृश्यांना खुला करण्याचे आश्वासन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना दिले.

**काळाराम मंदिर सत्याग्रह :-**

नाशिक येथील पंचवटी परिसरामधील काळाराम मंदिर हे भव्य हिंदूचे श्रद्धास्थान आहे. या मंदिरात प्रवेशासाठी अस्पृश्यांना मज्जाव होता. त्यामुळेच तीन मार्च 1930 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अमृतराव रणखांबे भाऊसाहेब गायकवाड, केशव नारायण देवरे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन उभे करण्यात आले आणि त्यावेळी नाशिकचे जिल्हाधिकारी गार्डन यांनी 2 मार्च 1930 रोजी मंदिर बंद ठेवण्याचा आदेश दिला. तरीपण स्पर्श लोक त्या मंदिरामध्ये प्रवेश करून मंदिरामध्ये जात होती. त्यावेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना विरोध दर्शवला आणि 145 लोक एकत्र येऊन सत्याग्रहाला प्रारंभ केला.3 एप्रिल रोजी बापूसाहेब राजभाऊ यांच्यासह बारा जणांना व नंतर दोन दिवसात 68 सत्याग्रहींना अटक करण्यात आले .7 एप्रिलला 200 सत्याग्रही सह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिराकडे मिरवणूक काढली आणि त्यावेळी अस्पृश्य लोकांना मंदिरात प्रवेश करून दिला.

**चिरनेर जंगल सत्याग्रह :-**

चिरनेर हे गाव पनवेल जवळ आहे या ठिकाणी 25 सप्टेंबर 1930 रोजी जंगल सत्याग्रह सुरुवात झाला आणि त्यावेळी पनवेलचे तहसीलदार आणि सत्याग्रही यांच्यामध्ये बाचाबाची झाली. त्यातून गोंधळ सुरुवात झाला .पोलीस अधिकाऱ्याने अचानक गोळीबार सुरुवात केला आणि त्या मध्येच एक गोळी तहसीलदारास लागली आणि ती तात्काळ ठार झाले. त्यावेळेस ब्रिटिश सरकारने चिरनेर सत्याग्रह विरुद्ध अनेक वेगवेगळी कलमे लावून बंदिस्त केले आणि त्यांना शिक्षा ठोठावली. पुढे त्यांच्यावर खटले भरण्यात आले. यानंतर चिरनेर सत्याग्रहाच्या खटला हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्भीड पद्धती युक्तिवाद केला. आणि सर्वसामान्य जनता विरुद्ध सरकार असा संघर्ष खटला त्याठिकाणी सुरुवात झाला. जंगल सत्याग्रह खटला अभ्यासपूर्ण मांडणी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडल्यामुळे त्या वेळेस राष्ट्रवादी नेता म्हणून त्यांची खाती निर्माण झाली आणि त्यामधूनच परिषदेच्या दुसऱ्या सत्रात त्यांना संघराज्य विषयक उपसमितीची सभासद म्हणून निमंत्रित करण्यात आले.

**लखनऊ सत्याग्रह :-**

लखनऊ येथे 25 मार्च 1947 रोजी असेंब्ली हॉल वर मोर्चा घेऊन सत्याग्रह सुरुवात झाला. त्या सत्याग्रहात एन राजभवन यांना तीन महिन्यांची शिक्षा पण झाली. या सत्याग्रहा बाबत शंभर सत्याग्रहींना अटक झाली.

**सारांश :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शीलवंत होते, कीर्तिवंत होते, विचारवंत होते गेल्या अडीच हजार वर्षांच्या इतिहासात त्यांनी अस्पृश्यां बद्दल केलेले कार्य निश्चितच महत्त्वपूर्ण आहे .त्यामुळेच भारतात सर्वप्रथम दलित समाजाच्या उद्धारासाठी जी कोणी कार्य केले आहे त्यामध्ये सर्वात अगोदर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले

कार्य महत्त्वपूर्ण आहे.प्रामुख्याने त्यांनी त्यांच्या अनेक सत्याग्रहामधुन केलेले कार्य जनतेसाठी उपयुक्त आहे तरीपण आपण काही निवडक असेच त्यांच्या सत्याग्रहाचा आढावा घेतल्यानंतर आपणास असे लक्षात येते की, महाड ,नाशिक ,मुखेड ,अंबादेवी ,पार्वती व लखनऊसत्याग्रह ,मनुस्मृतीचे दहन, राखीव जागांचा आग्रह आणि शेवटी बौद्ध धर्माची दीक्षा अशा वेगवेगळया टप्प्यातून ही चळवळ पुढे नेण्याचे काम अस्पृश्यांना निश्चितच जनजागृती घडवून आणणारे आहे. असेच आपणास दिसून येते.

**संदर्भसूची :-**

1 मनोहर यशवंत - डॉ. बाबासाहेब आंबेडकर.संघमित्रा प्रकाशन ,नागपूर.

2 गायकवाड सुनिता - डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,सुविधा प्रकाशन ,सोलापूर.

3 प्रा.गायकवाड यादव - भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन व कार्य, कैलास पब्लिकेशन औरंगपुरा औरंगाबाद.

4 लोखंडे भाऊसाहेब -डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याग्रही. सुधीर प्रकाशन वर्धा.

5 कीर धनंजय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर पापुलर प्रकाशन पुणे.

6 डॉ.आर. एस .कोंडेकर ,डॉ. एन.जी. बद्रे -आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास. चिन्मय प्रकाशन .औरंगाबाद.

7 फडके य.दि. -डॉ.आंबेडकर .पद्मगंधा प्रकाशन पुणे.

# 'युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर'


## सविता भिवा धनवडे

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.


भारताच्या पावन भूमीवर अनेक थोरामोठ्यांनी जन्म घेऊन ही भूमी पावन, मंगलमय केली आहे. देशासाठी, समाजासाठी अहोरात्र कष्ट करून आपली सामाजिक बांधिलकी जोपासली आहे स्वतःचे घर, संसार यामध्ये गुंतून न राहता समाजासाठी आपल्या देशासाठी आयुष्य घालविले आहे. त्यांच्या या देशसेवेचा वारसा आज ही भारतीयांसाठी एक आदर्श आहे आणि तो आदर्श कायमच राहील अशा अनेक नेत्यांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत. त्यांची ओळख स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्र, अर्थशास्त्रज्ञ, राजनीती तज्ञ, तत्त्वज्ञ व समाजसुधारक, पत्रकार, वकील, दलित, बौद्ध चळवळीचे प्रेरणास्थान आणि भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन महामानव, भारतरत्न इत्यादी अनेक पदवीने सारा देश परदेश ओळखतो. त्यांचा जन्म महू या गावी १८९१ साली माता भिमाई व रामजी सुभेदार यांच्या पोटी झाला. माता रमाई ह्या त्यांच्या पत्नी होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले सर्व ज्ञान आणि बळ पणाला लावून रंजल्या गांजल्या जनतेच्या, शेतकरी, मजूर वर्गाच्या तसेच स्त्री वर्गाच्या उद्धारासाठी अहोरात्र कष्ट केले. सगळयांच्या हितासाठी आपल्या संसाराकडे ही दुर्लक्ष केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमाप कर्तुत्वाने व कुशल नेतृत्वाने प्रत्येकाच्या मनात समाजक्रांतीचे बीज पेरण्याचे काम बाबासाहेबांनी केले. भीमराव रामजी तथा बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक युगपुरुष होय. बुद्ध- फुले यांना आदर्श मानून त्यांच्या विचारांचा विस्तार करणारे तत्वज्ञानी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. भारतीय समाजाची दुःखस्थिती ओळखणारे मनोवैज्ञानिक म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. अशा अनेक अतुलनीय कामगिरी करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आपण केवळ दलितांचे कैवारी आणि घटनेचे शिल्पकार म्हणून गौरव करतोच, पण जगातील सर्व जनतेला एक मार्गदर्शक, दिशादर्शक ठरलेले असे भारदस्त व्यक्तिमत्व म्हणून ही गौरविण्यात आलेले आहे. अशा या युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची ओळख प्रस्तुत शोध निबंधातून घेता येईल.

**उद्दिष्टे:**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचा आढावा घेणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचे स्वरूप तपासणे.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय कार्याची ओळख करून घेणे.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार अभ्यासणे.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनातील वैचारिकता समजून घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनात 'युगपुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकर' असा अभ्यास असल्याने डॉ. बाबासाहेबांच्या साहित्याचे, त्यांच्या कार्याचे, माहितीचे संकलन करून त्याचे वर्गीकरण करणे तसेच विश्लेषणात्मक साहित्य सर्वेक्षण या अभ्यास पद्धतीने संशोधन केले जाईल किंवा अभ्यास पद्धती वापरल्या जातील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी डॉक्टर राजेंद्र मोहन भटनागर म्हणतात की ,"महात्मा बुद्धानंतर जर कोणत्या योगी पुरुषाने धर्म, समाज ,राजकारण आणि अर्थाच्या दृष्टीने या पृथ्वीतलावर क्रांतीचा अविष्कार, संपूर्ण सत्यनिष्ठा, सद्सद्विवेक बुद्धी व धर्माचरण करण्याचा प्रयत्न केला असेल तर ते होते डॉ. भीमराव आंबेडकर.

त्यांचे ते तेजस्वी चरित्र सूर्यासारखे होते. चंद्रासारखी त्यांची वागणूक आकर्षक होती. त्यांचे चारित्र्य सूर्याप्रमाणे गहन गंभीर होते. संता सारखी त्यांना ज्ञान - विज्ञानाची जाण होती. आणि त्यांचा स्वभाव ही संतां सारखा शांत होता. त्यांच्या काळातील ते असे व्यक्तिमत्त्व होते जे नेहमीच उपेक्षित, दलित ,शोषित आणि निर्बल समाजाला प्रेरणा बल, आधार आणि प्रकाशरुपी आशा देत राहील. डॉक्टर भटनागर हे हिंदी साहित्यातील लेखक आहेत. पण त्यांच्या या साहित्यकृतीचा अनुवाद मात्र सचिन रायलवार यांनी केले आहे .बाबासाहेबांचे कादंबरी रूपाने व्यक्तिमत्व साकारण्याचे काम भटनागर यांनी केले आहे.,'युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यामध्ये त्यांनी बाबासाहेबांना बुद्धानंतर च्या एक महत्त्वाचा युगप्रवर्तक म्हटले आहे. कारण डॉ. बाबासाहेबांनी आपले सारे आयुष्य समाज परिवर्तनासाठी, समाज क्रांतीसाठी, समाज उन्नतीसाठी देश घडविण्यासाठी वेचले आहे.

डॉक्टर बाबासाहेबांच्या मते व्यक्ती सुशिक्षित असेल तरच आपल्या अधिकाऱ्यांना चांगल्या प्रकारे समजू शकेल, अन्यथा राजकारणी लोक अशिक्षित आणि निर्धन व्यक्तींना फसवितात. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करतात. त्यामुळे लोकांना शिक्षण, व्यवसायाचे स्वातंत्र्य, समान अधिकार द्यायला हवा असा दृष्टिकोन बाबासाहेबांनी बाळगला.त्यांचा 'राज्य समाजवाद' हा गरीब, शोषित व दुर्बल लोकांच्या हितासाठी आहे. संपूर्ण समाजाचे कल्याण करावयाचे असेल तर दुर्बलांना अधिक सोयी देणे हीच खरी समानता आहे. असे मत बाबासाहेबांनी मांडले.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, बंधुता, स्वातंत्र्य या तत्त्वांचा अंगीकार हा प्रेम, सहकाराची भूमिका यातून वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला. डॉ.बाबासाहेब हे केवळ भारताचे घटनाकार नाही तर ते आदर्श अशा विश्व समाजाचे शिल्पकार आहेत. संपूर्ण विश्वाचे मार्गदर्शक आहेत. माणसाने माणसाप्रमाणे वागले पाहिजे या विचारांचे विचारवंत आहेत.

**विषय मांडणी:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहुश्रुत असे व्यक्तिमत्व असणारे महापुरुष होते. त्यांच्या अनेक गुण कौशल्य सर्व अंगांनी विकसित झालेले होते.त्यांच्या अनेक पैलूंचा परिचय सर्व जगाला आहेच. त्यांच्या लेखनातून, भाषणातून, भारतीय संविधानातून तसेच त्यांच्या सामाजिक ,राजकीय, शैक्षणिक वैचारिक लेखनातून आदर्शवत दिशादर्शक व्यक्तिमत्व संपन्न झालेले दिसून येते. त्यांच्या वैचारिक लेखनातून समाज परिवर्तन हा उद्देश दिसून येतो. स्वातंत्र्य ,समता, बंधुता, करुणा इत्यादी गुणांचे दर्शन त्यांच्या लेखनातून दिसून येते अनेक शतके दलित समाज रुढी - परंपरेत, समाजव्यवस्थेत रुतून पडला होता. त्याला आपल्या दुःखाची जाणीव ही नव्हती. इतके वर्ष झोपी गेलेला समाज पाहून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची झोप उडाली होती. या समाजाला जागे करण्यासाठी आपली लेखणी हे शस्त्र मानून त्यांनी क्रांतिकारी चळवळ उभी केली. त्यांनी विविध ग्रंथांतून वैचारिक लेखन केले आहे .त्यातून त्यांनी आपले स्वतःचे तत्वज्ञान मांडले आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेला हा सोशल मुक्तीचा मार्ग जणू समाजवादी तत्वज्ञानाचे नवे रूप आहे असे म्हणावे लागेल. 'शिका ,संघटित व्हा !आणि संघर्ष करा.' या तीन तत्वात त्यांचे शैक्षणिक विचार दिसून येतात. दीन- दलितांचे दुःख, छळ, अन्याय संपवण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण होय. अशी खात्री बाबासाहेबांनी बाळगली आणि कदाचित त्यामुळेच त्यांनी चळवळीच्या माध्यमातून जनतेला "तुमचा उद्धार तुम्हीच करावयास हवा" आणि हा एकच मार्ग आहे, तो म्हणजे राजकारण, राजकारण, कायदा करण्याची शक्ती आज तुम्हाला अन्न वस्त्र निवारा आणि शिक्षण देणे हे या देशातील कायदे करणाऱ्या जनतेचे कार्य आहे, यासाठी शोषित वर्गाचे शिक्षण झाले पाहिजे .असा आग्रह बाबासाहेबांनी धरला. अन्याय, रूढी, परंपरा ,अंधश्रद्धा, प्रथा, परंपरा, गैरसमजुती आणि दीर्घकालीन गुलामगिरीतून खालच्या अस्पृश्य समाजाला मुक्त करावयाचे असेल तर प्रथम त्यांना शिक्षणाची गरज आहे. त्यामुळे सन १९२७ मध्ये शिक्षणाच्या व्यापक विस्तारासाठी प्रगतीसाठी पाऊल उचलले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आजोबा म्हणजे आईचे वडील, व वडिलांचे वडील हे वतनी, महारकी,

गावकी सोडून स्वाभिमानाची मिलिटरीची नोकरी करीत होते. आणि हीच घटना बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण होण्यास कारणीभूत ठरली. त्यामुळेच समाज उद्धार ही होऊ शकला. स्पृश्य-अस्पृश्य हे गुलामगिरीच्या विळख्यात कसा सापडला आहे. याची जाणीव बाबासाहेबांना होऊ लागली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लहानपणी 'भिवा' या नावाने ओळखले जात होते. मोठेपणी मात्र त्यांना म्हणजे 1933 ला त्यांना 'बाबासाहेब' या आदरार्थी नावाने ओळखण्यात आले व पुढे हेच नाव रूढ ही झाले. फार खडतर प्रवास बाबासाहेबांनी केला. लहानपणापासूनच त्यांचे व्यक्तिमत्व दुःख, व्यथा, वेदना यांनी तावून सुलाखून निघाले होते.१८९६ ते १९०४ पर्यंत बाबासाहेब यांचे वडील सातार्‍यातील लष्कर भागात राहिले. तेव्हा त्यांना अनेक प्रश्न या भागात राहायला येताच पडले. तसेच जातीयतेचे चटके ही त्यांना बसू लागले. शाळेच्या वर्गाबाहेर बसून शाळा शिकावे लागले. याचा खोलवर परिणाम होऊन पुढे दलित उद्धारासाठी चळवळ बाबासाहेबांनी उभी केली. समाजावर होणारा हा अन्याय, अत्याचार किती भयानक आहे याचे चटके त्यांना बालपणापासूनच बसल्याने त्यांनी दलितांसाठी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. आणि सर्व मानव जातीचा अधिकार हा पाणी असल्याने सर्वांना पाणी पिण्याचा अधिकार आहे. पाणी ही नैसर्गिक देणगी आहे. ती सर्वांना सारखीच मिळावी असा विचार करून बाबासाहेबांनी महात्मा फुले यांच्या विचारांवर आपले पाऊल टाकत समाज क्रांती घडवली. बाबासाहेब यांचे महात्मा फुले हे प्रेरणास्थान होते. महात्मा फुले यांच्या क्रांतिकारी चळवळ, साहित्याची लेखनी यामुळे बाबासाहेब प्रभावित झाले होते. बाबासाहेबांचेआणि महात्मा फुले यांचे विचार सूत्र एकच असल्याचे दिसून येते. तसेच २४/०९/१९७३ रोजी स्थापन झालेल्या सत्यशोधक समाजाचे "सर्व साक्षी, जगत्पती! त्याला नकोच मध्यस्ती" हे ब्रीदवाक्य होते या सत्यशोधक समाजाच्या विचाराने बाबासाहेबभारावून गेले होते. महात्मा फुलेंनी ब्राह्मणी धर्म ग्रंथ विरोधी विचार मांडले तसेच वर्णव्यवस्थे विरोधी ही कार्य केले. त्यामुळे बाबासाहेब महात्मा फुले यांच्या बाबत म्हणतात की "कोई कही ,भी ,कही पर भी जाये, लेकिन हम तो ज्योतिबा के मार्ग पर ही चलेंगे" थोडक्यात बाबासाहेबांच्या जडणघडणीमध्ये आजोबा ,आई- वडील, महात्मा फुले ,शाहू महाराज, माता रमाई यांच्या प्रेरणा महत्त्वाच्या ठरल्या आहेत. आणि महत्त्वाचे म्हणजे बुद्धांच्या विचाराने विश्वभूषण असे व्यक्तिमत्व बाबासाहेबांचे घडलेले आहे हे लक्षात येते.

**निष्कर्ष:**

१. प्रस्तुत शोधनिबंधातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतला आहे.
२. प्रस्तुत शोधनिबंधातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे आहे हे लक्षात येते.
३. प्रस्तुत शोधनिबंधातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजकार्य व देश कार्य करीत असताना आदर्शवत महापुरुषांचा आदर्श या तत्वाचा परामर्श घेतला आहे.
४. प्रस्तुत शोधनिबंधातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक लेखन समाजासाठी, देशासाठी एकूणच विश्वासाठी कसे मार्गदर्शक आहे याचा शोध घेतला.

**संदर्भ साहित्य:**

१. भालबा विभूते, 'तीन शिक्षण तज्ञ'( फुले-शाहू-आंबेडकर) प्रियदर्शी प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९९४ पृष्ठ क्रमांक १२
२. भगत रा.तु शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन कोल्हापुर, पृष्ठ क्रमांक २२०-२१.
३. भटनागर राजेंद्र मोहन (अनुवाद - सचिन रायलवार) 'युगपुरुष आंबेडकर', रिया पब्लिकेशन, कोल्हापूर.२०१६ पृष्ठ क्रमांक -६.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य

**प्रा. डॉ. फड एल.एच.**

शा.शि. संचालक, कै.सौ. शेषाबाई सी. मुंढे , कला महाविद्यालय, गंगाखेड.

**प्रस्तावना :**

हिन्दु समाजातील जातीव्यवस्थेमुळे सामाजिक विषमता शिगेस पोहचली होती. या विषमतेचे उच्चाटन करुन सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे कार्य अनेक समाजसुधारकांनी केले. त्यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील पददलित समाजाचे सर्वश्रेष्ठ पुढारी होते. अलौकिक बुद्धीमत्ता लाभलेला व विद्याभ्यासात सतत रममाण होणारा विद्वान, अस्पृश्य समाजाचा स्वाभिमान जागृत करुन त्यास अन्यायाविरुद्ध लढण्यास सज्ज करणारा नेता, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प्रख्यात कायदेपंडीत अशा विविध नात्यांनी ते भारतीय जनतेला परिचीत आहेत.

आधूनिक भारताच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मोठा वाटा आहे. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक प्रकांड पंडित व व्यासंगी अभ्यासक होते. भारतरत्न, महामानव, युगपुरुष, क्रांतीसूर्य, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, आंतरराष्ट्रीय किर्तीचे कायदेतज्ञ, शिक्षणतज्ञ, अर्थतज्ञ, लोकशाहीचे पुरस्कर्ते, सामाजिक चळवळीचे प्रणेते, मानवी स्वातंत्र्याचे कैवारी, दलितांचा मसिहा, गौतम बुद्धाचे दया, करुणा, प्रज्ञा व शिल ही तत्वे प्रत्यक्ष जीवनात आणणारे गोरगरीबांचे कैवारी डॉ. बाबासाहेबांना अशा वेगवेगळया उपाधीने ओळखले जाते. ते आधुनिक भारताच्या इतिहासातील एक युग प्रवर्तक नेते म्हणून ओळखले जातात. सामाजिक समतेच्या न्यायहक्कासाठी अस्पृश्यांना जागृत करुन संघटीत करणे व अहिंसक मार्गाने संघर्ष करण्याचा त्यांनी मार्ग स्वीकारला. त्यासाठी त्यांनी सर्व बाजूंनी चळवळ सुरु केली. त्यांच्या रुपाने दलितांना झुंजार व खंबीर नेतृत्व मिळाले ते दलित चळवळीचे क्रांतीयुग होते.

**जीवन परिचय :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर असे होते. त्यांचा जन्म मध्यप्रदेशातील 'महू' या गावी १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. त्यांचे मूळ गाव महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यातील 'आंबावडे' हे होय. त्यांच्या आईचे नाव भीमाबाई तर वडीलांचे नाव रामजी असे होते. त्यांचे वडील लष्करात सुभेदार होते. पुढे ते सातारा येथे स्थायीक झाले. त्यामुळे त्यांचे बालपण सातारा येथेच गेले. त्यानंतर सुभेदार रामजी यांनी मुलांच्या शिक्षणासाठी मुंबईस स्थलांतर केले. लहान असतानाच त्यांना अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले. त्यामुळे ही सामाजिक परिस्थिती बदलल्याशिवाय समाज बांधवांना न्याय मिळणार नाही याची जाणीव त्यांना झाली. त्यामुळे लहानपणीच वास्तवावर आधारित ज्यांची विचारसरणी होती असे ज्योतीबा फुले यांना त्यांनी गुरु मानले व त्यांचे विचार आत्मसात केले.

**शिक्षण :-**

त्यांचे प्राथमिक शिक्षण सन १९०० पर्यंत सातारा येथे झाले. त्यानंतर ते मुंबई येथे एल्फीस्टन हायस्कूलमध्ये दाखल झाले व तेथेच ते मॅट्रिक झाले. एल्फीस्टन हायस्कूल मध्ये असतांनाच त्यांना बडोदा संस्थानाचे

राजा सयाजीवराव यांनी शिष्यवृत्ती दिली. यानंतर सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना कोलंबिया विद्यापीठ अमेरिका येथे पाठविले. तेथे त्यांनी 'भारतातील व्यापार' या विषयावर प्रबंध लिहून एम.ए. ची पदवी प्राप्त केली. १९१६ मध्ये त्यांनी 'ब्रिटीश भारतातील प्रांतीक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती' या विषयावर पीएच.डी. पदवी प्राप्त केल्यानंतर १९१६ मध्येच त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स मधून एम.एस.सी. पदवी प्राप्त केली. १९१७ मध्येच त्यांनी सयाजीवराव गायकवाडांच्या बडोदा संस्थानमध्ये नोकरी केली. त्यांना तेथे कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून अतिशय हिनतेची वागणूक मिळाली त्यामुळे १९१७ मध्ये ते मुंबईला आले. तेथे सिडनहॅम कॉलेजमध्ये त्यांनी अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. यानंतर १९२० मध्ये ते पुन्हा लंडनला गेले.

"रुपयांचा प्रश्न, त्याची उत्पत्ती" या विषयावरील प्रबंधाला डी.लिट. ही सर्वोच्च पदवी मिळाली. ह्याच वर्षी त्यांनी बॅरिस्टर ही पदवी मिळवली. येथून पुढे "अस्पृश्यता निवारण" हे आपले जिवीत कार्य मानले. न्याय, सामाजिक व आर्थिक समतेच्या हक्कासाठी अहिंसक मार्गाने संघटीत लढा देणे त्यांनी पुढील काळातील आपले प्रमुख कार्य म्हणून स्वीकारले.

**अभ्यास विषयाची निवड :-**

वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, मोबाईलचा अतिवापर, व्यसनाधिनता, मादक व उत्तेजक औषधाचे सेवन, विभक्त कुटुंब व्यवस्था, अशा अनेक समस्येमुळे आजचा तरुण वर्ग भरकटत चाललेला आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व कार्य समाजापुढे ठेऊन एक आदर्श जीवन जगता येऊ शकते म्हणून अभ्यासासाठी हा विषय घेण्यात आलेला आहे.

**संशोधन लेखाचे महत्त्व :-**

सुशिक्षीत व्यक्ती समाजाचा आधारस्तंभ असतो, आणि त्यावर राष्ट्राचा , देशाचा विकास आधारीत असतो. शिक्षण ही व्यक्तीला व समाजाला मिळालेली सर्वात मोठी ताकद आहे, ज्यावर व्यक्तीचे दैनंदिन कार्ये, त्यांच्या गरजा, समस्या निराकरणाची क्षमता वैयक्तिक आणि सामाजिक, ह्या सर्वांसाठी शिक्षण फार महत्वाचा घटक आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिकुल परिस्थितीतून स्वत:चे जीवन व कार्य कशा पद्धतीने घडवता येते याचा एक समाजापुढे आदर्श ठेऊन, समाजासाठी याचा उपयोग व्हावा या दृष्टीने हा लेख खूप महत्वाचा आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य :-**

**सामाजिक कार्य :-**

भारतात परत आल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी सार्वजनिक कार्यात भाग घेण्यास सुरुवात केली. दलितांचा उद्धार करणे हे कार्य त्यांनी प्रथम हाती घेतले. अस्पृश्य संघटन व संघर्षाच्या कार्याला लोकजागृतीद्वारे गती आणण्यासाठी वर्तमानपत्र हे बाबासाहेबांना उपयुक्त साधन वाटत होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी दिलेल्या आर्थिक सहाय्याच्या मदतीने डॉ. बाबासाहेबांनी ३१ जानेवारी १९२० रोजी त्यांनी 'मुकनायक' हे पाक्षीक सुरु केले.

**१) बहिष्कृत हितकारीणी सभेची स्थापना :-**

अस्पृश्यामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ रोजी या संस्थेची स्थापना केली.

**२) अस्पृश्यांच्या हक्कासाठी संघर्ष :-**

त्यांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अन्यायाचा प्रतिकार करण्यास आणि न्याय हक्कासाठी संघर्ष करण्यास शिकविले.

**३) महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व त्यांच्या अनुयायांनी २० मार्च १९२७ रोजी महाड येथील तळयाचे पाणी प्राशन केले, आणि अन्यायकारक समाज व्यवस्थेविरुद्ध हा बंडाचा झेंडा होता ही कृती प्रतिमात्मक होती.

**४) मनुस्मृतीचे दहन :-**

सामाजिक विषमता व उच्च-नीच भेदभाव यांचे समर्थन करणाऱ्या ग्रंथाचा प्रतिकात्मक निषेध म्हणून ती जाळली.

**५) मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह :-**

अस्पृश्यता निवारण्याचा योग्य मार्ग म्हणजे आहेत त्या सार्वजनिक व्यवस्था सर्वांना खुल्या करणे हा होय.

**६) धर्मांतराचा निर्णय :-**

नागपूर येथील ऐतिहासिक समारंभात आपल्या असंख्य अनुयायासह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

**शैक्षणिककार्य :-**

अस्पृश्यांना शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांची उन्नती होऊ शकणार नाही. त्यांना आपल्या हक्काची जाणीव होणार नाही हे ओळखून त्यांनी आपल्या बांधवांना शिक्षण देण्यासाठी प्रोत्साहित केले.

**१) बहिष्कृत हितकारणी सभा :-**

अस्पृश्य समाजात जागृती करण्यासाठी शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ रोजी या संस्थेची स्थापना केली.

**२) अस्पृशांना सवलती देण्यासाठी प्रयत्न :-**

**३) पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना :-**

१९४६ मध्ये मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली.

**राजकीयकार्य :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकीय क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी बहुमोल कार्य केले आहे. भारतीय घटनेचा आराखडा ठरविताना त्यांनी अस्पृश्यांच्या हक्काविषयी असलेली वचनबद्धता कधीही सोडली नाही.

**१) अस्पृश्यांना राजकीय हक्कासाठी संघर्ष :-**

अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय व त्यावर समान खर्च करण्याची तरतूद सैन्य व पोलिस दलात अस्पृश्यांची भरती, अस्पृश्यांना नोकरीत अग्रहक्क देण्याची मागणी केली.

**२) गोलमेज परिषद :-**

१९३० मध्ये लंडन येथे भरलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी म्हणून बाबासाहेबांना बोलावण्यात आले होते.

**३) पुणे करार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व म. गांधी यांच्यात २४-२५ सप्टेंबर १९३२ रोजी एक करार झाला. यालाच पुणे करार या नावाने ओळखले जाते.

**४) राजकीय पक्ष व संघटना :-**

१९३५ च्या कायद्यानुसार भारतात निवडणुका घेण्यात आल्या होत्या. या संधीचा फायदा घेऊन अस्पृश्यांचा लढा अधिक गतिमान करण्यासाठी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी व त्यांच्यात जागृती करण्यासाठी त्याचप्रमाणे आपल्या सामाजिक कार्याला गती यावी, राजकीय पाठबळ मिळावे म्हणून डॉ. आंबेडकर यांनी राजकीय पक्ष स्थापन केले.

**१) स्वतंत्र मजूर पक्ष :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३५ मध्ये या पक्षाची स्थापना केली.

**२) पक्षाच्या वतीने विविध प्रश्नावर आवाज उठविला.**

**३) अखिल भारतीय शेड्यूल कास्ट्स फेडरेशनची स्थापना :-**

अस्पृश्यांचा सर्वांगिण उद्धार करण्याच्या हेतूने समाजाची राजकीय चळवळ चालविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एप्रिल १९४२ मध्ये या फेडरेशनची स्थापना केली.

**४) रिपब्लिकन पक्षाची स्थापना :-**

बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ मध्ये रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचे जाहीर केले होते, परंतु तत्पूर्वीच त्यांचे महापरिनिर्वाण झाले, परंतु त्यांच्या समर्थकांनी ३ ऑक्टोबर १९५७ रोजी या पक्षाची रितसर स्थापना केली.

**संशोधन लेखाचे उद्दिष्ट्ये :-**

१) आदर्श नागरिक तयार करणे.

२) व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास करणे.

३) मानसिक, शारीरिक, सामाजिक व नैतिक गुणांचा विकास करणे.

४) चारित्र्यसंपन्न नागरिक तयार करणे.

५) राष्ट्राच्या विकासात सुधारलेल्या समाजाचा मोठा वाटा असतो.

६) राष्ट्रीय एकात्मतेत समाजाची भूमिका अभ्यासणे.

**संशोधन लेखाचे गृहितके :-**

१) मानवी विकासाचे मूळ उदारमतवादी विचार व सुधारणा परंपरेत दडले आहे.

२) मानवी विकासाबाबत आपली वाटचाल कायदानिर्मितीत पुढे व अंमलबजावणीत मागे आहे.

३) रोजगाराभिमुख शिक्षण, कौटुंबिक पाठबळ आणि राजकीय दबावमुक्त प्रशासकीय वातावरण अनिवार्य आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्याची भूमिका :-**

**१) भारतीय घटनेचे शिल्पकार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या घटना समितीचे सभासद होते. पुढे त्यांची घटना मसुदा समितीच्या अध्यक्षपदीही निवड झाली होती. त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक भारतीय घटनेचा मसुदा तयार केला. म्हणून त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हटले जाते.

**२) केंद्रीय कायदेमंत्री म्हणून कार्य :-**

१५ ऑगस्ट १९४७ नंतर पंडित नेहरुचे मंत्रीमंडळ अधिकाररुढ झाले, पंडित नेहरुंनी त्यांना मंत्रीमंडळात घेऊन कायदा खात्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली.

**३) वृत्तपत्र क्षेत्रातील कार्य :-**

वर्तमानपत्रे समाजाच्या विचाराला चालना देण्याचे कार्य करतात. अस्पृश्यांच्या मुक्ततेसाठी त्यांच्या हालअपेष्टा सर्वांना कळाव्यात यासाठी वर्तमानपत्राची नितांत गरज होती. अस्पृश्य संघटन व संघर्षाच्या कार्याला लोकजागृतीद्वारे गती आणण्यासाठी वृत्तपत्र हे उपयुक्त साधन आहे.

**४) ग्रंथाची निर्मिती :-**

वृत्तपत्राप्रमाणेच त्यांनी आपल्या ग्रंथाद्वारे समाज प्रबोधनाचे कार्य केले. त्यांनी ग्रंथांनाच आपले गुरु मानले.

**५) भारतरत्न सर्वोच्च सन्मान प्रदान :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात दलित समाजाच्या उद्धारासाठी जे कार्य केले त्यास इतिहासात तोड नाही. आपल्या अस्पृश्य बांधवांना संघटीत करुन त्यांना अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यास व न्याय हक्कासाठी झगडण्यास त्यांनी तयार केले. दलितांना मुख्य राष्ट्रीय प्रवाहाशी जोडून आणि भारताची राज्यघटना तयार करुन त्यांनी या देशाची फार मोठी सेवा केली. त्यांच्या या महान राष्ट्रसेवेप्रती कृतज्ञता म्हणून त्यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाच्या प्रारंभाचा योग साधून १४ एप्रिल १९९० रोजी त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

**६) महानिर्वाण :-**

अस्पृश्यांच्या उद्धारासाठी आयुष्यभर झटणारा नेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे महानिर्वाण झाले.

**निष्कर्ष :-**

वर्षानुवर्षे परावलंबी, असहाय्य जीवन जगणाऱ्या अस्पृश्यांना माणूस म्हणून स्वतंत्र जीवन जगण्याचा हक्क डॉ. बाबासाहेबांनी मिळवून दिला. त्यांच्या कार्यासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. अस्पृश्यांचा आत्मविश्वास वाढविला. अस्पृश्यांना ताठ मानेने जगण्यास शिकविले. अस्पृश्य समाज स्वत:च्या पायावर उभा राहावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले. अखेरिस घटनेच्या आधारे आपले स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. आज अस्पृश्य समाजात जी स्वत्वाची भावना निर्माण झालेली आहे. त्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच द्यावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) गजानन भिडे- महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास.
२) धनंजय कीर- डॉ. बाबासाहेब आंबेडकर.
३) शंकरराव चव्हाण- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात.
४) डॉ. विकास कदम, डॉ. एस. शिंदे, आर. कांबळे- महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास- अरुणा प्रकाशन, लातूर.
५) डॉ. शुभांगी राठी- भारतीय राजकीय विचारवंत- कैलास प्रकाशन, औरंगाबाद.
६) डॉ. सुधाकर जोशी- भारतीय शासन व राजकारण- विद्या प्रकाशन औरंगाबाद.
७) डॉ. रमेश ढोबळे- 'आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत'.
८) के. सागर- महाराष्ट्रातील समाजसुधारक.

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय विचार"

**प्रा. डॉ. चव्हाण सुखदेव गोविंदराव**

समाजशास्त्र विभाग तथा सदस्य समाजशास्त्र अभ्यास मंडळ, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड माधवराव पाटील महाविद्यालय, पालम.

**प्रस्तावना :**

अलिकडली काळातील एक थोर सामाजिक, आर्थिक, राजकिय विचारवंत म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख करण्यात येतो.राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वांना परिचित आहेत. १४ एप्रिल, १८९१ च्या दिवशी बाबासाहेबांचा जन्म झाला.अतिशय कठीण अशा सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीतून शिक्षण पूर्ण १९१७ या वर्षी त्यांनी मुंबईला एका महाविद्यालयात प्राध्यापकाची नौकरी केली.नंतर ते कायद्याच्या अभ्यासाकडे वळले.लंडनला त्यांनी कायद्याचा अभ्यास केला.आणि नंतर दलिताच्या उद्धाराचे कार्य केले.अर्थशास्त्र आणि कायदा या विषयीच्या संदर्भात त्यांनी महत्वपूर्ण लिखाण केले.त्याचबरोबर अस्पृयता यासारख्या भयानक सामाजिक परंपरेचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात संघर्ष केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धार्मिक, सामाजिक, आर्थिक बाजू या बाबत विचार मांडत असताना त्यांनी राजकिय विचार मांडलेले आहेत. राजकिय विचाराचा मागोवा घेताना डॉ.आंबेडकरांना अपेक्षित असणारी लोकशाहीची व समाजवादाची बाजू महत्वाची आहे.आंबेडकरांना त्यांच्या सामाजिक विचारांना पोषक अशी राजकिय बाजू असावी असे वाटत होते. विशेषत: लोकशाही शासनपद्धती भारता सारख्या देशात महत्वाची आहे असे त्यांना वाटत होते. राज्य आणि समाज या दोन्हीचा संबंध लोकशाही शासन प्रणालीत देशाचे परराष्ट्रीय धोरण यासारख्या विविध स्वरुपाचे राजकिय विचार त्यांनी मांडले आहेत.

**प्रस्तूत शोध निबंधाचे उद्देश :**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकिय विचारांची उपयुक्तता स्पष्ट करणे.

२) राज्य आणि समाज परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकिय विचारांची गरज जाणून घेणे.

३) आंबेडकरांच्या राजकिय विचारांची प्रस्तूतता स्पष्ट करणे.

**प्रस्तूत शोध निबंधाचे गृहितके :**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय विचार राज्य परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून उपयुक्त आहेत.

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकिय विचारामुळे आजच्या राजकिय व्यवस्थेला दिशा देण्यासाठी मदत होईल.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत शोध निबंधासाठी दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित संसाधनांचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ आणि विविध मासिकातील तज्ञांचे लेख, त्याचबरोबर शोध निबंधाचा आधार घेण्यात आला आहे.

**प्रस्तूत शोध निबंध सारांशरुपाने खालीलप्रमाणे आहे :**

आंबेडकरांनी राजकिय विचार या अनुषंगाने पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे.

**१) राज्य आणि समाज यामधील संबंध :**

राज्य आणि समाज या दोन्हीचा अत्यंत जवळचा संबंध असतो.डॉ.आंबेडकरांच्या मते राज्य ही एक संस्था असते.प्रामुख्याने समाजातील सर्व लोकांच्या हिताचे संरक्षण करणे हे राज्यसंस्थेचे कर्तव्य असते.म्हणूनच राज्यसंस्था आणि जनता हित या दोन्हीचा नजीकचा संबंध असतो.कोणत्याही व्यक्तीच्या विकासासाठी राज्यसंस्थेने स्वातंत्र्य दिले पाहिजे.राज्यसंस्थेने स्वातंत्र्य दिले नाही तर व्यक्तीचा विकास होऊ शकरणार नाही.समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विकास हा त्या व्यक्तीला दिल्या जाणाऱ्या भाषण आणि धार्मिक स्वातंत्र्यावर अवलंबून असतो.डॉ. आंबेडकरांनी केवळ राजकिय स्वातंत्र्याचाच पुरस्कार केला असे नाही तर त्यांनी सामाजिक, आर्थिक या सारख्या विविध स्वरुपाच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. समाजाच्या हितासाठी राज्यसंस्था निर्माण झालेली असते.म्हणून प्रत्येक व्यक्तीने राज्याचा आदर केला पाहिजे.व्यक्तीने जर राज्याच्या कायद्याचे पालन केले नाही तर त्यामुळे समाजात विक्सळीतपणा येऊ शकतो.खऱ्या अर्थाने समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करावयाची असेल तर व्यक्तीने राज्याच्या कायद्याचे पालन केले पाहिजे.समाजाचे कल्याण साधने हेच राज्यसंस्थेचे उद्देश असते.अशा प्रकारे राज्य व समाज यांच्यातील संबंध मानणाऱ्या आंबेडकरांनी राज्याचे स्वरुप कल्याणकारी असावे असे प्रतिपादन केले.

**२) लोकशाही :**

लोकशाही या शासनव्यवथेच्या बाबतीत आंबेडकरांनी अनुकुल अशी भूमिका मांडली.आंबेडकर हे लोकशाहीचे पुरस्कर्ते होते.वेगवेगळया प्रकारच्या शासन पद्धतीपैकी लोकशाही ही शासन पद्धती योग्य आहे असे त्यांचे मत होते.भारतात संसदीय लोकशाही चांगल्या प्रकारे रुजू शकली नाही.याची त्यांना जाणवी होती.देशातील जनतेचे कल्याण व स्वातंत्र्य, समता यासारख्या बाबी प्राप्त होण्यासाठी संसदीय लोकशाहीस उशीर लागतो.संसदीय लोकशाहीचे भवितव्य हे अनेक गोष्टीवर अवलंबून असते.आर्थिक आणि समाजिक समता निर्माण झाल्याशिवाय संससदीय लोकशाहीला कोणताही अर्थ उरत नाही.समाजातील सर्व घटकांना सामाजिक न्याय आणि आर्थिक न्याय मिळण्यासाठी कांही घटकांची गरज असते.भारतात संसदीय स्वरुपाची लोकशाही स्वीकारताना काही अटी आंबेडकरांना अपेक्षित होत्या.अशा प्रकारे काही अटीवरच संसदीय लोकशाही यशस्वी होऊ अशी त्यांना खात्री होती.आंबेडकरांनी त्या अटी खालीलप्रमाणे सांगितलेल्या होत्या.१) अल्पसंख्याकांचे प्रतिनिधी सरकारात असले पाहिजे.२) कार्यकारी मंडळ हे विधीमंडळाच्या नियंत्रणापासून वेगळे असावे.३) कार्यकारी मंडळ हे मुक्त असेल तर त्याचा योग्य उपयोग होऊ शकतो.४) अल्पसंख्याकांच्या विश्वासास पात्र असणाऱ्या व्यक्तींनाच अल्पसंख्याकांचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी द्यावी.

भारतात लोकशाहीचे यश हे ज्या अनेक घटकावर अवलंबून आहे.त्यापैकी द्विपक्षीय पद्धती हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे.डॉ.आंबेडकरांनी म्हणून द्विपक्षीय पद्धतीचा पुरस्कार केला.अशा पद्धतीमुळे सत्तारुढ पक्ष हुकूमशाही पद्धतीने वागू शकरणार नाहीत. एकपक्षीय पद्धती ही अनेक दृष्टीने घातक असते.कारण एकच पक्षाचे सरकार सत्तेवर आले तर त्यातून हुकूमशाहीची प्रवृत्ती निर्माण होते.म्हणून द्विपक्षीय पद्धत आवश्यक असते.विरोधी पक्षाचे सत्तारुढ सरकारवर काही प्रमाणात का होईना नियंत्रण असते. विरोधी पक्षाने स्वत:ची भूमिका योग्य प्रकारे ठरविली पाहिजे. कोणत्याही प्रकारची अतिरेकी भूमिका विरोधी पक्षाने घेऊ नये.असे आंबेडकरांना वाटते.

भारतातील लोकशाही शासन व्यवस्थेत न्यायव्यवस्था खूपच महत्वाची आहे.असे त्यांना वाटत होते.न्यायसंस्था जर अस्तित्वात असेल तर त्यामुळे कार्यकारी मंडळ व विधीमंडळ यावर योग्य नियंत्रण राहू शकते.घटनेने दिलेल्या नागरिकांच्या मुलभूत हक्कांचे संरक्षण होते किंवा नाही हे पाहणे न्यायव्यवस्थेचे कार्य आहे.अशा प्रकारे लोकशाही शासनव्यवस्थेत न्यायसंस्थेला अतिशय महत्वाची भूमिका बजवावी लागते.असे डॉ.आंबेडकरांचे मत आहे.

**३) भारताचे परराष्ट्रीय धोरण :**

भारताने तटस्थतेच्या धोरणाचा स्वीकार करु नये असे आंबेडकरांना वाटत होते.कारण तटस्थतेच्या धोरणामुळे भारताला एकही राष्ट्र मित्र म्हणून राहणार नाही.भारताचे धोरण साम्यवादी राष्ट्राबाबत विरोधी असावे.परंतु अमेरिका आणि ब्रिटन यासारख्या राष्ट्राच्या बाबतीत ते धोरण अनुकुल असावे असे त्यांचे मत आहे.अशा प्रकारे परराष्ट्रीय धोरणाबाबत तटस्थतेच्या भूमिकेबाबत विरोधी अशी बाजू आंबेडकरांनी व्यक्त केली.भारताने ज्या धोरणामुळे स्वताचे हित साध्य होते अशा प्रकारचे धोरण स्वीकारावे अशी आंबेडकरांची इच्छा होती.

**४) राष्ट्रभाषा व भाषिक राज्याची कल्पना :**

आंबेडकरांनी भाषिक राज्याच्या कल्पनेचे समर्थन केले त्यांच्या मते, भाषिक राज्यामुळे सरकार हे जनताभिमुख होऊ शकते आणि त्यामुळे जनतेचेही हित होऊ शकते.भाषिक तत्वाच्या आधारावर जर छोटे छोटे राज्य अस्तित्वात आली तर त्यावर केंद्र सरकारचे योग्य नियंत्रण राहू शकते.अशा प्रकारे राज्यांची निर्मिती करण्यात आली नाही तर त्यामुळे काही राज्य केंद्र सरकारला अडचणीत आणू शकतात. हिन्दी ही राष्ट्रभाषा असावी असे त्यांचे मत होते.

**५) पाकिस्तानच्या निर्मितीचे समर्थन :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाकिस्तानच्या निर्मितीच्या बाजुने अनुकुल मत दर्शविले होते.अर्थात आंबेडकरांच्या अशा भूमिकेमागे वैचारिक बैठक होती.मुस्लीम नेते आणि समाज धर्माच्या नावाखाली संघटीत हित असल्यामुळे हिंदु समाजाला विरोध करु शकणारा एक प्रबळ पक्ष निर्माण होईल असे त्यांना वाटत होते.हिंदु आणि मुसलमान असे दोन पक्ष धर्माच्या आधारावर अस्तित्वात आले तर त्याचे विपरित परिणाम राजकिय व सामाजिक बाजुवर होऊ शकतील असे आंबेडकरांना वाटत होते.म्हणून त्यांनी पाकिस्तानच्या निर्मितीस पाठींबा दर्शविला.दोन धर्मातील तणावामुळे समाजकारणत आणि राजकारणात कोणतेही अडथळे निर्माण होऊ नयेत म्हणूनच त्यांनी पाकिस्तानच्या फाळणीस अनुकुलता दर्शविली.अर्थात नंतरच्या कालावधीत आंबेडकरांनी भारत आणि पाकिस्तानच्या फाळणीस विरोध दर्शविला.

**निष्कर्ष :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले राजकिय विचार मांडत असताना त्यांनी कांही महत्वाचे विचार किंवा मत व्यक्त केलेले आहेत. लोकशाही शासन पद्धतीत न्यायसंस्थेचे श्रेष्ठत्व त्यांना मान्य होते. स्वातंत्र्य आणि समता या विचारावर भिस्त ठेवणाऱ्या आंबेडकरांना सामाजिक लोकशाही अपेक्षित होती.त्याचबरोबर राजकिय क्षेत्रात सत्तेचे परिवर्तन हा मुद्दा त्यांनी महत्वाचा मांडला.नागरिकांच्या अधिकाराविषयी व्यापक भूमिका असणारे आंबेडकर नियंत्रीत लोकशाहीचाही पुरस्कार करतात. सामाजिक लोकशाही ही अत्यंत महत्वाची आहे.असे मत मांडण्याचा आंबेडकरांनी प्रयत्न केला.तसेच आंबेडकरांनी राजकिय लोकशाहीचेही समर्थन केले.राजकिय लोकशाहीचे भवितव्य

हे सामाजिक लोकशाहीच्या संबंधित असते.असा मुलभूत विचार आंबेडकरांनी मांडला.सामाजिक समतेचा आग्रह धरणाऱ्या आंबेडकरांनी समाजात सुधारणेसाठी व्यापक चळवळही हाती घेतलेली होती.समाजातील अस्पृश्यांना आशेचा नवा किरण आंबेडकरांमुळे दिसू लागला.सामाजिक परिवर्तनासाठी आणि सामाजिक न्यायासाठी घटनेचा आधार त्यांना महत्वाचा वाटला.कारण सामाजिक समतेसाठी कायदेशीर बाजू अत्यावश्यक आहे.असे डॉ.बाबासाहेबांना वाटत होते.थोडक्यात म्हणजे लोकशाही सामाजिक समता, सामाजिक न्याय या त्यांच्या राजकिय विचारांच्या प्रबळ बाजू होत्या.त्यामुळे आजच्या काळातही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय विचार आजच्या राजकिय व्यवस्थेला दिशादर्शक ठरतात. यावरुन आंबेडकरांचे राजकिय विचार किती मौल्यवान आहेत हे दिसून येते.

**संदर्भ सूची :**

१) डॉ.ज.रा.शिंदे- भारतीय राजकिय विचारवंत, कौलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९.

२) प्रा.बी.बी.पाटील- भारतीय राजकिय विचारवंत, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.

३) डोळे ना.य.- राजकिय विचारवंत, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

४) डॉ.प्रदीप आगलावे- संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

५) भारतीय संविधान- (मराठी आवृत्ती) महाराष्ट्र शासन मुंबई. २००३.

६) प्रदीप त्रीपाठी- मानव अधिकार और भारतीय संविधान- राधा पब्लिकेशन, नई दिल्ली.

७) चतुर्वेदी संतोष- मानव अधिकार और संयुक्त राष्ट्रसंघ- पोईन्टर पब्लिशर्स, जयपूर.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य

डॉ. गोविंद धोंडीराम उफाडे

मराठी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत्त, लातूर.४१३५१२

प्रस्ताविक

दलित साहित्याच्या निर्मितीच्या मुळाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार कार्य आणि तत्त्वज्ञान आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जे विविध लढे दिले, ज्यात काळाराम मंदिर, सत्याग्रह महाडचा सत्याग्रह, धर्मांतराची घोषणा व प्रत्यक्ष धर्मांतर, मूकनायक ,बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत, जनता, राज्यघटनेचे लेखन, गोलमेज परिषदेतील सहभाग इत्यादी मुळे दलित समाजामध्ये एकप्रकारे आत्मभान, नवचैतन्य निर्माण झालेला दिसून येते. दलित आणि दलितेतर हे एकाच समाजाचे जरी घटक असले, तरी त्यांची जगे मूलतः भिन्नच आहेत. १९५६ साली हे गृहीत धरूनच डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराचे पाऊल उचलले. दलितेतरांच्या वैचारिक गुलामगिरीवर हा प्रत्यक्ष प्रहार होता पण लवकरच डॉ. आंबेडकरांचे महानिर्वाण झाल्याने दलित समाजावरही मोठाच आघात झाला. अशा दुहेरी आघात प्रक्रियेतून दलित साहित्य उसळी घेऊन उभे राहिले.अस्पृश्यांच्या जीवनविषयक जाणिवा बदललेल्या गेल्या. ते आपल्या हक्क प्रती जागृत झाले. आपल्या वर हजारो वर्ष होत असलेल्या अन्यायाची त्यांना जाणीव झाली. स्वाभाविकपणे संताप त्यांच्यात निर्माण होऊ लागला. यापूर्वी प्रस्तापित व्यवस्थेमुळे ते व्यक्त करणे त्यांना शक्य नव्हते आता मात्र ते प्रत्यक्ष जगण्यातून व साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्त करू लागले म्हणून तर दलित साहित्यात वेदना, विद्रोह आणि नकार इत्यादी तीव्र जाणीवा दिसून येतात. जेकी इतर साहित्या आढळून येत नाहीत.

दिलीप साहित्य हे समाजातील सर्व प्रकारच्या अन्याय, शोषण, विषमता याविरुद्ध बंड पुकारते हे लोकशाही स्वातंत्र्य समता, बंधुता, मानवतावाद अशा मानवी मूल्यांचा आग्रह धरते हे मूल्य जर पायदळी तुडविले जात असतील त्या ठिकाणी ते विरोधही करते. बाबुराव बागूल यांनी एके ठिकाणी असे म्हटले आहे की," जो या समाजा विरुद्ध लढणारा दृष्टीकोण घेऊन साहित्याची निर्मिती करील आणि चुकल्या समाजाला वाटेवर आणील तो दलित साहित्यातील असेल." १ त्या मुळे दलित साहित्य हे आक्रमक स्वरूपाचे असून ते माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या परंपरांना, रुढींना दलित साहित्य नाकारते. दलित साहित्यात हे समाजाची व श्रेष्ठ अशा मानवी मूल्यांची बांधिलकी मानणारे आहे असे लक्षात येते.

**बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य**

दलित साहित्याच्या संदर्भातविचार करीत असताना असे लक्षात येते की, जन्माने दलित असलेल्या लेखाकांने लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य किंवा दलितांचे जीवन त्यांची दुःखे याविषयी ही कोणत्याही लेखकाने लिहिलेले साहित्य म्हणजेच दलित साहित्य अशा दोन परस्पर भिन्न भूमिका मांडल्या जातात. दलित साहित्य हे आशावादी दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी चे अतूट नाते, आत्मभान, आत्मशोध, नकार, वेदना, विद्रोह, परिवर्तन, जातीव्यवस्थेला कडाडून विरोध तआदी. महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. थोडक्यात सामान्यांचे प्रश्न मांडणारे, समकालीन समस्यांना वाचा फोडणारे, श्रमजीवी समाजाचे प्रश्न समाजांसमोर आणणारे साहित्य, तसेच दलित जाणिवेतून लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य असेही म्हणता येईल.

हिंदी ते ज्येष्ठ अलोचककार रघुवीर चौधरी म्हणतात, "दलित साहित्य अर्थात् सच कहनेवाला साहित्य"२ बाबुराव बागूल यांनी दलित साहित्याच्या संदर्भात जो विचार मांडला ते अत्यंत महत्त्वपूर्ण असा आहे. ते म्हणतात की,दलित साहित्य माणसाला केंद्रबिंदू बनवते,माणसाच्या सुख-दुःखाची समरस होते व माणसाला समक क्रांतीकडे

घेऊन जाते;माणसाच्या समूहाला म्हणजेच समाजाला समतेची शिकवण देते. माणसाला महान मानते. दलित साहित्य हे माणसा माणसात वैरभाव न पसरविता ते माणसामाणसात प्रेम पसरविते ३ या बागुलांच्या विचाराप्रमाणे डॉ. सदा कऱ्हाडे सुद्धा याच अनुषंगाने दलित साहित्य बद्दल आपले मत अभिव्यक्त केले ते म्हणतात की,"आर्थिक दृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या मिळून एक सर्वसमावेशक गणित वर्ग मानता येईल त्यात कामगार शेतमजूर उपजीविकेसाठी रमणारे आणि अस्पृश्यता ही येते ज्यांची पिळवणूक होते ते दलित" ४ इत्यादी अनेक विचारवंत अभ्यासक आणि दलित साहित्याच्या संदर्भामध्ये आपले विचार चिंतन मांडलेले आहेत. त्यावरून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हेच दलित साहित्याच्या मुळाशी आहेत असे म्हणता येते.एकूणच भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या उदयाने व त्यांच्या विचारसरणीमुळे , शिकवणुकीमुळे भारतातील समग्र दलित समाजात जागृती निर्माण होऊ लागली. त्यामुळे दलित साहित्याचे स्वरूप पाहणे महत्त्वाचे ठरेल.

**दलित साहित्याचे स्वरूप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार कार्य या मुळे समस्त शूद्र -अतिशूद्र वर्गाला आत्मभान आले. यातून तो स्वतः विषयीचा शोध घेऊ लागला. यामधूनच जी संस्कृती, परंपरा, तत्वज्ञान, समाज व्यवस्था, धर्म व्यवस्था इत्यादी ने दलितांना हीन वागणूक दिली इतकेच नाही तर त्यांनी त्यांचे

माणूसपणच या व्यवस्थेने नाकारले. त्यामुळेच डॉ.भालचंद्र फडके म्हणतात ५ त्याप्रमाणे वेदना व विद्रोह या मुळेच दलित साहित्यात तो अवतरला. या सर्वांचे चित्र दलित साहित्याच्या विविध साहित्य प्रकारांमधून प्रतिबिंबित झालेले आहे हे लक्षात येईल.उदा.कवितेत

त्र्यंबक सपकाळे एका ठिकाणी म्हणतात-

'आम्ही गोड मेकर
देतो नोटीस तुझ्यावर
निघाली जन्स ऑफ ड्युटीची
"युवर सर्विसेस आर नॉट रिक्वायर्ड"

तर दया पवार म्हणतात,

" हे महाकवे
तुला महाकवी तरी कसे म्हणावे?
हा न्याय अत्याचार वेशीवर टांकणारा
करणारा एक जरी श्लोक तू रचला असतास..
तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते."

-दया पवार,कोंडवाडा

तर नामदेव ढसाळ या व्यवस्थेबद्दल चीड,संताप व्यक्त करताना म्हणतात -

“अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा..
नरकाच्या कोंडवाड्यात किती दिवस राहणार आम्ही?
.. .अगतिक किड्या सारखे आज पर्यंत
लक्तरात गुंडाळलेली आमची अब्रू गोलपिठा वर नाचविणाऱ्यांनो
....तुमच्या पापाचे छीनाल घट फोडण्यासाठी
शब्द म्हणाले ...अंधारात सूर्य पाहिला तेव्हा"

- नामदेव ढसाळ. गोलपीठा, पृ.५५

या कवितेत नकार व विद्रोहाची जाणीव दिसते. डॉ.आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वासमोर आणि **कर्तृत्वा**समोर कृतज्ञ होत ज.वि.पवार म्हणतात-

'तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविलास नवा इतिहास
तो झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत"

-ज.वि.पवार,नाकेबंदी पृ.१८-१९

बाबासाहेबा बद्दलची अपार श्रद्धा ज.वि पवार यांनी या कवितेतून व्यक्त केली आहे.

त्याचप्रमाणे श्री. म .माटे सारख्या कथाकारांच्या कथेमधूनसुद्धा अस्पृश्य समाज जीवनाच्या जीवन जाणिवेचे चित्रण कथेमधून फारसे दिसत नाही. यासंदर्भात भालचंद्र फडके यांचे विचार महत्वाचे वाटतात. ते म्हणतात की, "उपेक्षित सरांना जय पशु पातळीवरचे जीवन जगावे लागते त्याला भरणा दिसतील समाज जबाबदार आहे जातिनिष्ठ रचना जबाबदार आहे आहे ही जाणीव मराठ्यांची कथा निर्माण करू शकली नाही." ६ त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होऊन दलित कथाकारांच्या नायक परंपरेच्या विरोधात बंड करून उठलेले दिसून येतो. उदा. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मशानातील सोनं या कथेतील 'भीमा', शंकरराव खरात यांच्या 'तडीपार' या कथेतील 'मलू' तसेच विचारप्रवण करणाऱ्या विद्रोहाचा लाव्हा श्री. बाबुराव बागूल यांच्या कथा लेखनातून उसळते. त्यांच्या जेव्हा मी जात चोरली होती या कथेतील नायक 'काशिनाथ' म्हणतो की, 'कामगार म्हणून मी मरणार नाही' त्याच बरोबर बर या कधी येते मास्तरांचे उदगार ऐकतात वाचकाचे मन हेलावून जाते ते म्हणतात, "तुमचा मार मी कुठे खाल्ला? म्हणूनेच मला मारले" सामाजिक विषमतेचे बीज पेरणारा मनु असल्यामुळेच बाबूराव बागूलांच्या कथेतील नायक विद्रोहाची मशाल हाती घेत असल्याचे लक्षात येते. मरण स्वस्त होत आहे (१९६९) आणि सूड (१९७०)त्याच प्रमाणे नाट्यप्रकारामध्येही अस्पृश्य समाजाचे हिणकस जीवन , प्रस्थापितांना कडून झालेली उपेक्षा , अत्याचार , छळ अंधश्रद्धा यांचे दर्शन घडते .

प्रस्थापित समाजव्यवस्थेविषयी चीड म्हणजे विद्रोहाची प्रवृत्ती हे दलित नाट्य वाङ्.मयचे खास वैशिष्ट्य म्हणता येईल. ह्या दलित नाटकांचे स्वरूप प्राधान्याने प्रतिक्रियात्मक, संतप्तता, त्वेषपूर्णता, झालेल्या अन्यायाचा तीव्र निषेध इत्यादीचे दर्शन घडते. दलित नाटके सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक बांधिलकीची केंद्रबिंदू आहेत. उदाहरणार्थ मन्वंतर, न्याय , युगयात्रा इत्यादी समाजातील वस्तुस्थिती आणि मानवी जीवनातील वास्तवता दलित नाटक नाकारू शकत नाही. म्हणूनच परिवर्तनाचा विचार देणारे सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीचे एक प्रभावी हत्यार मानले गेले आहे.या चळवळीने दलित साहित्यालाच नव्हे तर मराठी साहित्याला समृद्ध केलेले आहे. दलित आत्मकथनांमुळे तर मराठी साहित्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचलेले आहे. बलुतं- दया पवार, आठवणींचे पक्षी- प्र.ई. सोनकांबळे, उपरा- लक्ष्मण माने, मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे- माधव कोंडविलकर, जिणं आमुचं- बेबी कांबळे, मला उद्ध्वस्त व्हायचंय- मल्लिका अमरशेख, माझ्या जल्माची चित्तरकथा-शांताबाई कांबळे, उचल्या- लक्ष्मण गायकवाड, कोल्हाट्याचं पोर- किशोर शांताबाई काळे, अक्करमाशी- शरणकुमार लिंबाळे, बेरड- भिमराव गस्ती, काट्यावरची पोटं- उत्तम बंडू तुपे, आमचा बाप आन आम्ही- नरेंद्र जाधव, अंतःस्फोट- कुमुद पावडे, तराळ अंतराळ - शंकरराव खरात, ढोर - भगवान इंगळे आदी. आत्मचरित्राने प्रखर जाणिवा दिल्या

अशाप्रकारे ललित साहित्याच्या केंद्रस्थानी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची आणि कार्याची प्रेरणा होती असे म्हणता येईल.

समारोप

दलित साहित्याने मराठी एकूण भारतीय साहित्यामध्ये वास्तववादी साहित्याचा एक जोरकस असा प्रवाह निर्माण केला हजारो वर्षापासून त्यांचे शोषण होता होते अशा समाजातून पुढे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन अनेक लेखक कवी कथाकार यांनी आपल्या साहित्याच्या द्वारे अस्पृश्य समाजाला जागे केले.

दलित साहित्यिकाने आपल्या साहित्यातून दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार शोषण विषमता इत्यादी विरुद्ध आवाज उठविला स्वातंत्र्य समता बंधुता मानवतावाद इत्यादी मूल्यांची बांधिलकी या साहित्यामधून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दलित साहित्य जी प्रखरता आली आहे त्यात बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे आणि कार्यांचे आहे मोठे योगदान आहे हे मान्य करावेच लागते.

**संदर्भ ग्रंथ**


१) बाबुराव बागूल, दलित साहित्य: आजचे क्रांती विज्ञान, दिशा प्रकाशन नाशिक प्रआ १९८१, पृष्ठ ०६

२) हनुमंत पाटील दलित साहित्य और वैश्विकता, समता प्रकाशन, रमाबाई नगर. प्रआ २०११ पृष्ठ १५.

३) बाबुराव बागूल उनि.पृष्ठ२६

४) सदा कऱ्हाडे दलित साहित्य चिकित्सा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. पृष्ठ ४५.

५) रा.ग जाधव, निळी पहाट, साधना प्रकाशन, दुआ पुणे.पृष्ठ ५

६) भालचंद्र फडके, दलित साहित्य वेदना व विद्रोह, श्री विद्या प्रकाशन, पुणे दुआ १९८९.पृष्ठ१७९.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाजशास्त्रज्ञ

**प्रा. डॉ. सौ. माधुरी गोविंद गिरी**
महात्मा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, अहमदपूर

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाज व्यवस्थेचे समाजशास्त्रीय अध्ययन करून भारतातील समाजशास्त्रीय अध्ययनाला चालना दिली. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक समाजशास्त्रज्ञ होते ही गोष्ट सर्वसामान्य लोकांना आतापर्यंत माहित नव्हती. कारण आंबेडकरांच्या समाजशास्त्रीय संशोधनाची दखल येथील समाज शास्त्रज्ञांनी घेतली नव्हती. जाती व्यवस्थेच्या संदर्भात अत्यंत सूक्ष्मपणे वैज्ञानिक अध्ययन करण्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान भारतीय समाजाच्या दृष्टीकोनातून बहुमुखी स्वरूपाचे असल्याचे आढळते. त्यांच्या अध्यायनामुळे, संशोधनामुळे आणि समाजसुधारक कार्यामुळे ते संबंध जगाला परिचीत आहेत. त्याचबरोबर डॉ. आंबेडकरांनी ज्या शास्त्राचा अभ्यास केला. त्यात अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, तत्वज्ञान, मानवशास्त्र व धर्मशास्त्र इ. विषयामध्ये ते पारंगत होतेच त्यांच्या कायद्याच्या अध्ययनाला तोड नव्हती. या सर्व बाबीबरोबर ते भारतीय समाजव्यवस्थेचे मोठे अभ्यासक होते. त्यांच्या अध्ययनाला शास्त्रीय आधार होता. वैज्ञानिक बैठक होती त्यामुळेच ते निश्चितच एक भारतीय 'समाजशास्त्रज्ञ' ठरतात.

भारतातील विद्यापीठात समाजशास्त्राचा स्वतंत्र विभाग सुरु होण्यापूर्वीच अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात ९ मे १९१६ ला भरलेल्या 'डॉ. ए.ए. गोल्डनवायझर मानवविज्ञान परिषदेत २५ वर्षाच्या एका तरुण भारतीय समाजशास्त्रज्ञाने भाग घेतला होता. या तरुण भारतीय समाजशास्त्रज्ञाने त्या परिषदेत भारतातील जातीची, उत्पत्ती आणि विकास हा संशोधनपेपर सादर केला होता. हा पेपर १९१७ च्या इंडियन □न्टीक्वेरी मध्ये प्रसिद्ध झाला होता. हा तरुण भारतीय संशोधक म्हणजेच डॉ. बी.आर. आंबेडकर होय, या संशोधन पेपर मध्ये जाती कशा निर्माण झाल्या? त्या का टिकून राहिल्यात? या संबधीचे मानवशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय विश्लेषण डॉ. आंबेडकरांनी केले.

समाजशास्त्रज्ञ रूपानेडॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आढावा घेताना त्यांनी भारतीय समाजाचा दोन दृष्टीकोनातून अभ्यास केला. त्यामध्ये पहिला दृष्टीकोन दलितवादी दृष्टीकोन होय. भारतीय समाजातील दलित समाजाचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यावर भर दिला. त्यांच्या समाजशास्त्रीय अध्ययनाचा दुसरा दृष्टीकोन सामाजिक मानवतावादी दृष्टीकोन होता. यामध्ये स्वातंत्र्य, समता,आणि बंधुत्व आणि सामाजिक न्याय यावर त्यांनी भर दिला. डॉ. बाबासाहेबांनी आर्थिक घटकावर त्याचप्रमाणे राजकीय सामजिक दृष्टीकोनातून महत्वपूर्ण विचार मांडले आहे. तसेच त्यांनी समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून संशोधनात्मक अभ्यास केला आहे. त्यांचे संशोधनाचे कार्य लक्षात घेता ते भारतीय समाजशास्त्राचे जनक सुद्धा ठरू शकतात. कारण भारतात समाज शास्त्राची सुरुवात होण्याअगोदर आंबेडकरांनी भारतातील जातीय व्यवस्थेवर संशोधनात्मक लेखन केले.

**उद्दिष्ट्ये:**

१) डॉ. बाबासाहेबआंबेडकरांचा 'समाजशास्त्रज्ञ' या रूपाने आढावा घेणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ' समाजशास्त्रज्ञ' रूपाने भारतीय समाजातील ज्या ज्या घटकाचा अभ्यास केला त्याचा आढावा घेणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजशास्त्रीय विचारांचे चिंतन करणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'समाजशास्त्रज्ञ' रूपाने भारतीय समाजातील ज्या ज्या घटकांचा अभ्यास केला त्या विषयांचे सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे:

**१) जातीविषयक अध्ययन :**

जातीव्यवस्थेच्या संदर्भात अत्यंत सूक्ष्मपणे वैज्ञानिक अध्ययन करण्याचे श्रेय डॉ. आंबेडकरांचे आहे. तरी देखील समाजशास्त्रज्ञांनी त्यांच्या अध्ययनाच्या संदर्भात एक अक्षर लिहिले नाही. त्यामुळे त्यांच्या जातीव्यवस्थे संबधीच्या समाजशास्त्रीय अध्ययनाची माहिती इतरांना होवू शकली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील जातीव्यवस्थेचा सखोल अभ्यास केला. १९१६ मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठामध्ये शिकत

असताना मानवशास्त्र विभागात ‘ भारतीय समाजातील जाती’ या विषयाचा शोधनिबंध सादर करून जातीव्यवस्थेचे विस्तृत, विदारक चित्र जागतिक पातळीवर मांडण्याचे काम त्यांनी केले.

**२) शिक्षणासंबंधी अध्ययन:**

शिक्षणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षणासंबाधी मौलिक असे विचार मांडले सामाजिक दुखण्यावर शिक्षण हेच औषध आहे असा त्यांचा दृष्टीकोन होता. भारतातील शैक्षणिक समस्येचा अभ्यास करताना शिक्षण, शिक्षणसंस्था, शिक्षण पद्धती, शासनाचे शिक्षणाबाबतचे कर्तव्य याबाबीवर प्रकाश टाकला.

**३) स्त्रीसंबंधी अध्ययन:**

डॉ. आंबेडकरांनी भारतीय समाजातील स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचे सखोल अध्ययन केले. स्त्रियांच्या सामाजिक दर्जात सुधारणेसाठी स्त्रीशिक्षणाचा मार्ग सांगितला. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळावे यासाठी त्यांनी संसद सभागृहात हिंदू कोड बिल मांडले. बाबासाहेबांनी स्त्रियांच्या राहणीमानावर, शिक्षणावर भर देवून भाषणे, लिखाण करून त्यांचा सामाजिक दर्जा सुधारण्यावर भर दिला. त्यावरून त्यांच्या स्त्रीहक्कामागचा त्याग दिसून येतो.

**४) अस्पृश्यतेसंबंधी अध्ययन:**

जातीव्यवस्थेचे कडू फळ म्हणजे भारतीय समाजातील अस्पृश्यता होय. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेचे सखोल अध्ययन केले. डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्म ग्रंथाचा सखोल अभ्यास केला व वर्णव्यवस्था अस्पृश्यतेस कशी जबाबदार ठरली याचे स्पष्टीकरण दिले. अस्पृश्य मुळचे कोण किंवा वाताहत झालेल्या लोकांचा सिद्धांत यामध्ये डॉ. आंबेडकरांनी ऐतिहासिक घटनांचा आधार घेतला आहे.

**५) धर्मासंबधी अध्ययन:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध धर्माचा अभ्यास केला आणि बरेच लिखाण केले. त्यांनी प्रामुख्याने हिंदू धर्म व बौद्ध धर्माचा अभ्यास केला. भारतातील धर्मचिकीत्सेच्या परंपरेत डॉ. आंबेडकरांची भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे. हिंदू धर्मातील जाचक रीतीरिवाज, बंधनावर टिका केल्या. रिडर्ल्स इन हिंदुझम यासारख्या ग्रंथातून हिंदूधर्मातील दोष दाखवले. मनुस्मृतीचे खंडण आणि दहन केले. धर्मांतर केले. विविध धर्माचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून तौलनिक पद्धतीने अभ्यास केला शेवटी बौद्ध धर्माच्या तत्वाशी ते सुसंगत झाले. त्यावर ‘The Buddha And His Dhamma’1957या मौलिक ग्रंथाचे प्रकाशन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरीनिर्वाणानंतरझाले.

**६) भारताचे राजकीय सामाजिक अध्ययन :**

विविधतेने नटलेल्या भारतीय समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व सामाजिक न्याय यावर आधारलेली संसदीय शासनप्रणाली तारू शकते. असे विचार त्यांनी मांडले भारतासाठी आवश्यक अशी शासनप्रणाली म्हणून ‘लोकशाही’ शासनप्रणालीचा त्यांनी उल्लेख केला. त्यांनी राज्यसमाजवादाचाही स्विकार केला. भारतासाठी ‘एक व्यक्ती आणि एक मूल्य’ चा स्विकार त्यांनी केला. देशाच्या, समाजाच्या विकासासाठी ‘संघराज्य’ शासन व्यवस्था आवश्यक असल्याचे त्यांनी व्यक्त केले.

**निष्कर्ष:**

डॉ. आंबेडकर हे संशोधनवृत्तीचे विचारवंत होते. त्यामुळे भारतातील जातीव्यवस्था या प्राचीन व्यवस्थेसंबंधीचे विश्लेषण अत्यंत मुद्देसुदपणे आणि पुराव्याचा आधार घेवून त्यांनी केले. जाती सारख्या अत्यंत क्लिष्ट अशा व्यवस्थेचे समाजशास्त्रीय दृस्ठीकोनातून विश्लेषण त्यांनी केले. या सिद्धांतामुळे भारतीय समाजशास्त्रास विशेष योगदान लाभले आहे. डॉ. आंबेडकरांनी ऐतहासिक घटनांच्या आधारावर आपला अस्पृश्यतेसंबधीचा सिद्धांत मांडला असला, तरी त्यांनी वस्तुनिष्ठ दृष्टीकोन ठेवून अस्पृश्य हे मुळचे कोण आहेत याचा शोध घेतला.

एकंदरीत भारतीय समाजाचा दलितवादी दृष्टिकोनातून, मानवतावादी दृष्टीकोनातून डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास केला. भारतीय समाजातील जातीव्यवस्था, अस्पृश्यता, धर्म, स्त्री-जीवन, शिक्षणप्रणाली, आर्थिक जीवन, राजकीय व्यवस्था इ. घटकांचे सखोल अध्ययन केले. त्याचबरोबर

समाजसुधारणेचे कार्य केले. या अध्ययनाला, संशोधनाला, विचारला शास्त्रीय आधार होता असे आपणास सांगत येईल.

**सारांश :**

भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनाला सुरुवात होण्याच्या अगोदर डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्थेच्या संदर्भामध्ये महत्वपूर्ण संशोधन केले. एवढेच न्हवे तर समाजव्यवस्थेच्या अभ्यासाला पाया घालण्याचे काम त्यांनी केले असे म्हटले तरीही अतिश्योक्ती ठरणार नाही. या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजशास्त्रज्ञ ठरतात.

**संदर्भग्रंथ सूची:**

१) अभिजात समाजशास्त्रीय विचार – डॉ. प्रदीप आगलावे

२) समाजशास्त्रीय विचारवंत – दूरशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय कीर

४) समाजशास्त्रीय विचारवंत – प्रा. डी.एम. तंगलवाड

५) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर – डॉ. ज्ञानराज काशिनाथ गायकवाड

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**प्रा. बालासाहेब शिवाजी पवार**
वाणिज्य विभाग, माधवराव पाटील महाविद्यालय पालम.

**प्रास्ताविक:-**

अलीकडच्या काळातील एक थोर आर्थिक, राजकीय व सामाजिक विचारवंत म्हणूनडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख करण्यात येतो. घटनातज्ञ, गाढे अभ्यासक, कायदा पंडित, दलितांचे कैवारी, राजकारणी, शिक्षणतज्ञ तसेच समाजसुधारक अशा अनेक बाबींद्वारे त्यांची ओळख स्पष्ट करता येते. तसेच या कार्या व्यतिरिक्तडॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मुख्य कार्य ही एक अर्थतज्ञ म्हणून देखील आहे. 14 एप्रिल 1891 रोजीयामहा मानवाचा जन्म झाला. अतिशय कठीण अशा आर्थिक परिस्थितीतून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थतज्ञ म्हणून उल्लेख करताना त्यांच्या शिक्षणामधील बराचसा भाग हा अर्थशास्त्र या विषयात असल्याचे दिसून येते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्र विषयामध्ये नवीन सिद्धांताची मांडणी केलेली नाही. परंतु त्यांच्या काळात भारतामध्ये उद्भवलेल्या अनेक आर्थिक प्रश्नांशी निगडित बाबींचा अभ्यास करून त्यावरील प्रश्नावर उपाययोजना सुचविल्या आहेत. त्यांनी केलेल्या अभ्यासातून पुढे आलेल्या बाबी कोणत्या होत्या त्या बाबीचा उल्लेख सदरील शोधनिबंधामध्ये करण्यात आलेला आहे.त्याबाबींचा वेध घेऊन त्यांनी आपले आर्थिक विचार मांडलेआहेत.

**शोधनिबंधांची उद्दिष्टे:**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेणे.
2) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थतज्ञ म्हणून आसलेल्या भूमिकेचे अध्ययन करणे.
3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या सामाजिक कार्यामुळे त्यांच्या दुर्लक्षित झालेल्या पण महत्त्वाच्या आर्थिक विचारांची वर्तमानकाळातील प्रासंगिकतापाहणे.
4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उद्योग,कृषी,श्रम, कामगार विषयक विचारांवर प्रकाश टाकणे.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी माहितीचे संकलन करण्यासाठी प्रामुख्याने द्वितीयसाधनसामुग्रीचा वापर केलेला आहे. यामध्ये संबंधित विषयाची विविध पुस्तके, विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रांमधील माहिती तसेच इंटरनेट वरील वेबसाईटचाही उपयोग करण्यात आलेला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार हे त्यांच्या काळातील भाषणातून, वर्तमानपत्रातून जे लिखाण केले त्यामधून तसेच स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा मांडला आणि अर्थशास्त्रावरील जे पुस्तक लिहिले आहेत त्यामध्ये त्यांचे आर्थिक विचार दिसून येतात. काही महत्वपूर्ण आर्थिक विचार पुढील प्रमाणे आहेत.

**1)अर्थशास्त्राचे स्वरूप:**

अर्थशास्त्रामध्ये आर्थिक व्यवहारांचा व संपत्तीच्या बाबींचा विचार होतो पण या बाबी बरोबर समाज कल्याणाचा विचार अर्थशास्त्रात व्हावे असे स्पष्ट मत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे होते. १संपत्तीचे समान वाटप व्हावे असे त्यांचे मत होते. जातिव्यवस्थेचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतात.त्यामुळे दारिद्र्य, आर्थिक पिळवणूक, असमानता निर्माण होते. इ.स.1936 मध्येत्यांनी मजूर पक्ष स्थापन केला त्यांच्या जाहीरनाम्यात आर्थिक धोरणाबाबत विचार मांडले आहेत.

**2)नियोजितअर्थव्यवस्था:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीनियोजित अर्थव्यवस्थेच्या संदर्भात म्हटले होते की, “भारतीय समाजव्यवस्थेत जन्माने जात ठरते, जातीने व्यवसाय निश्चित होतो. त्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होते. त्यातून संपत्तीचे केंद्रीकरण घडून येते. उत्पादनात वाढ करणे व राष्ट्रीय संपत्तीचे समान वाटप करण्यासाठी तरतूद करणे या निकषावर आधारित समाजाच्या आर्थिक जीवनाचे नियोजन करण्याची जबाबदारी शासनाची असते.” असेविचार नियोजित अर्थव्यवस्थेच्या संदर्भात बाबासाहेबांनी मांडले आहेत.२

**3) आर्थिक विषमता:-**

आरक्षित धोरणाचा त्यांनी शास्त्रशुद्ध अभ्यास केला. आर्थिक निकष व गुणवत्ता हे निकषठरविल्यास न्याय व सामाजिक समता यांचा लोपहोईल. त्यांना न्याय व सामाजिक समता प्रस्थापित व्हावी असे वाटत होते. बाबासाहेबांनी आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात उद्योग धंदे करावेत भूमिहीनांना जमीन द्याव्यात जमिनीचे राष्ट्रीयीकरण करावे असे सांगितले.

**4)राज्य समाजवाद:-**

बाबासाहेबांच्या राज्य समाजवादी तत्वज्ञानात व्यक्तीस्वातंत्र्य अपेक्षित होते. त्यांना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाविषयी तळमळ होती. आर्थिक व सामाजिक परिवर्तन व्हावे यासाठी राज्य समाजवाद स्वीकारावा असे बाबासाहेबांचे मत होते. त्यांनी मांडलेल्या राज्य समाज वादाबाबत सामाजिक आर्थिक बाबींचे शासनाकडून नियंत्रण अपेक्षित होते.३

**5)चलन विषयक विचार:-**

इ.स.1922 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी डी. एस. सी.च्या पदवीसाठी “लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स” **रुपयाचा प्रश्न** हा प्रबंध लिहिला होता.४ या प्रबंधामध्ये त्याने भारताच्या रुपयाच्या उत्क्रांतीचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. त्यावेळीअर्थशास्त्रज्ञामध्ये रुपयाची जडण-घडण ही सुवर्ण परिमाणात असावी की सुवर्ण विनिमय परिमाणातयाबाबत वादहोते. सुवर्ण विनिमय परिमाण लवचिक आहे भविष्यकालीन अर्थव्यवस्थेला उपयुक्त आहे म्हणून प्रोफेसर केन्सयांनी सुवर्ण विनिमय परीमानाचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेबांनी या विचाराला विरोध केला.त्यांच्यामते, सुवर्ण विनिमय परिमाणात स्थैर्य राहत नाही,त्यात लवचिकता आहे पण चलन निर्मितीवर त्यात मर्यादा राहणार नाही.अवश्यकतेपेक्षा जास्त चलन निर्मितीमुळे भाववाढ होईल त्यामुळे रुपयाची किंमत घसरते व विनिमयाचे साधन म्हणून रुपयाचे स्थान स्थिर होईल.हिल्टन यंग कमिशनपुढे अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हे मत मांडले.

**6) सार्वजनिकआय-व्यय आणि केंद्र-राज्य संबंध:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीकोलंबिया विद्यापीठात शिकत असताना M.A. पद्वीसाठी 'ऍडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी'हा 15 मे 1915 रोजीआशा शीर्षकाचा42 पृष्ठाचां एक शोधनिबंध सादर केला. प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. बाबासाहेबांनी1792ते 1858 या कालखंडातील ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थव्यवस्था या संदर्भातील धोरणात कशाप्रकारे बदल होत गेले याविषयीचा महत्वपूर्ण ऐतिहासिक आढावा घेतला आहे. ईस्ट इंडिया कंपनीची ही अर्थनीती कशाप्रकारे भारतीय जनतेच्या हालाखीच्या परिस्थितीत कारणीभूत ठरली यासंबंधीचे विदारक सत्य मांडले आहे.1925 मध्ये Ph.D.पदवीसाठी**The evolution of provisional finance in British India** हा प्रबंध लिहिला.५ केंद्रव राज्य सरकारच्या आर्थिक बाबींची माहिती यांचा आढावा वरील प्रबंधात घेतला.

**7) उद्योगविषयक विचार:-**

भारताचा आर्थिक विकास करण्यासाठी औद्योगीकरण महत्वाचे आहे. देशाचा समतोल विकास व्हावा यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शासनाने प्रत्यक्ष लक्ष घालून समतोल औद्योगिक विकास साध्य करावा असे त्यांना वाटत होते. उद्योगधंद्यांमुळे निर्मिती होते, वस्तूचे उत्पादन होते, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, जनतेच्या गरजा पूर्ण करण्याकरिता उद्योग व्यवसाय आवश्यक आहे असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले.

**8)शेतीविषयकआर्थिक विचार:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1818 मध्ये The journal of Indian Economics societyया अंकामध्ये small holdings in India and their remedies हा लेख लिहिला. या लेखांमध्ये असे सांगितले की शेती हा भारताचा एक सर्वात मोठा राष्ट्रीय उद्योग आहे. सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्त्व अधिक आहे. शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा जर कोणता घटक असेल तर तो घटक म्हणजे शेत जमिनीचा आकार होय. भारतीय शेतीचा आकार तुकडी करणामुळे लहान झाला आहे. असे लहान लहान तुकडे सगळीकडे विखुरलेली आहेत, भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे. म्हणून आंबेडकरांनी असे विचार मांडले आहे की,विखुरलेल्याजमिनीचे एकत्रीकरण करून त्यांचा आकार वाढवून ती किफायतशीर करणे आवश्यक आहे. म्हणूनच शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणाआहेअसे मानलेजाते.

**9)कामगारा विषयी विचार:-**

बाबासाहेबांनी कामगारांच्या कल्याणासाठी मजूर मंत्री असताना विशेष प्रयत्न केले. असेंब्लीत संपा विरोधी काळया कायद्याच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण खूपच गाजले. ते म्हणतात संपाचा हक्क म्हणजे कामगारांच्या स्वातंत्र्याचा हक्क होय. नागरिकांचा स्वातंत्र्य हक्क जेवढा पवित्र तेवढाच कामगारांचा हक्क पवित्र आहे. औद्योगिक कामगारांना जास्त सवलती मिळतात जे फायदे मिळताततेचफायदे मुजरानां देखील मिळाले पाहिजेत. जसे औद्योगिक कामगारांना भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा, अपघात विमा, नुकसान भरपाई इत्यादी स्वरूपाच्यासोई सवलती मिळतात त्याच शेत मुजराला मिळाल्या पाहिजेत.

**10) इतर आर्थिक विचार:**

इतर आर्थिक विचारांमध्ये कर विषयक तत्वे, राष्ट्रीयीकरण, शेती उद्योगासंबंधी विचारशेत मुजरा संबंधी विचार, आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक विचार इ. विचार आढळतात.

**सारांश:**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक कार्य भरीव स्वरूपाचे होते. खऱ्या अर्थाने ते अर्थशास्त्रज्ञ होते.त्यांचे आर्थिक विचार भविष्यातील परिस्थितीनुरूप होते हे अनेक उदाहरणाद्वारे सिद्ध करता येते. उदा. रॅगलर नर्क्सनीज्याप्रच्छन्न बेकारीची कल्पना मांडली त्यांच्या अगोदर किती वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निष्क्रिय रोजगाराची संकल्पना मांडली होती. बाबासाहेबांनी मजुरी संबंधित जे विचार मांडले ते डम स्मिथच्या विचारा सारखेच आहेत.

**निष्कर्ष:-**

प्रस्तुत माहितीच्या आधारे काही महत्वपूर्ण आर्थिक निष्कर्ष काढण्यात आलेले आहे ते पुढील प्रमाणे आहेत.

1)डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चलन विषयक विचार आजच्या परिस्थितीतही अनुकरणीय आहेत.

2) शेतीक्षेत्रातील मूलभूतसंरचनेला औद्योगीकरणाची जोड देण्यावर भर दिला.

**3)** डॉ.बाबासाहेब आंबेडकरानींश्रमिक कामगार वर्गासाठी दिलेला लढा महत्वपूर्ण होता.

4) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार सर्वसामान्यांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

उपरोक्त बाबी वरून बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रातील योगदान स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ सुचली:-**


1) कुलकर्णी बि.डी., ढमढेरे एस.व्ही. "आर्थिक विचार व विचारवंत",(2008) डायमंड पब्लिकेशन्स,पुणे.
2) इंगळे बी.डी.," आर्थिक विचारांचा इतिहास" (2011),अरुणा प्रकाशन,लातूर.
3) डॉ. एम.एम.खंदारे,- जागतिक आर्थिक विचारांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
4) डॉ. प्रल्हाद लुलेकर-दलिततेत्तरांसाठीडॉ. बाबासाहेब आंबेडकर अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा,(2012)सायन प्रकाशन, प्रा.लि.पुणे.
5) प्रा.रायखेलकर.ए.आर.-आर्थिकविचारांचा इतिहास(2005) शोभा भारती प्रकाशन,लातूर.
6) म.ना.कांबळे.-डॉ.बाबासाहेबांचेंआर्थिक विचार आणि भारतीय समाज (2002).क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी.
7) डॉ.बी.आर.आंबेडकर, द प्रॉब्लेम ऑफ रुपी, 1923-24.
8) त्रैमासिकअर्थसंवाद. एप्रिल -जून 2016, खंड 40.अंक.1.
9) https:// www.mahamtb.com- 3 Aug 2021

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा व देशप्रेम : एक आकलन

डॉ. भास्कर वि. नरवाडे

मराठी विभाग, महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर

विश्वरत्न, युगपुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जसे थोर अर्थशास्त्रज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, समाजसुधारक, शेती व जलतज्ज्ञ होते. त्याचप्रमाणे ते थोर राष्ट्रभक्त, राष्ट्रनिर्माते व राष्ट्रीय एकात्मतेचे उपासकही होते. डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या विविध चळवळी. आंदोलने सत्याग्रह हे कोणत्याही एका वर्गाविरुद्ध किंवा व्यक्तीसमुहा विरुद्ध नव्हते तर त्यामागे एका मानवतावादी राष्ट्राची निर्मिती ही प्रबळ प्रेरणा होती. घटना मसुदा समितीचे काम पूर्ण होताच ०१ जानेवारी १९५० रोजी मुंबईत त्यांचा नागरी सत्कार झाला. त्याप्रसंगी देशाच्या एकसंघ व सुरक्षितेविषयीचे आपले विचार व्यक्त करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. "आजपर्यंत आपण अस्पृश्य समाजाच्या कल्याणासाठी झटलो आणि झटत राहू, परंतु याबरोबरच आपला देश सुरक्षित कसा राहील याचाही विचार करण्याची आता आवश्यकता आहे."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रधारणा राज्यघटनेच्या अनेक कलमांमधून उजागर होते. भारतीय राज्यघटना ही केवळ नियम आणि कायदे यांच्या चौकटीची नसावी, तर स्वतंत्र भारतीय समाजाच्या जडणघडणीचा आशय त्यामध्ये असावा ही त्यांची भूमिका होती. भारतात विविध जाती-धर्माचे भिन्न-भिन्न संस्कृतीचे लोक आहेत. परंतु राष्ट्रातील लोकांमध्ये धर्माभिमान निर्माण होण्याऐवजी त्यांच्यात राष्ट्रभिमान निर्माण होणे आवश्यक आहे. जात, धर्म, वंश इत्यादीच्या आधारावर लोकांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेद असू नये. संकुचित धार्मिक भावनेपेक्षा व्यापक राष्ट्रीय भावनेला महत्व दिले पाहिजे. हे अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेच्या कार्यक्रमात १९२० साली आपल्या अनुयायांना सांगताना डॉ.बाबासाहेब म्हणतात, "आम्ही सर्व हिंदी आहोत; बंधू आहोत, हिंदू राष्ट्रजन कोणत्याही वर्गाचे असोत, कोणत्याही धर्माचे असोत ते सर्व हिंदी आहेत. व्यक्तिच्या दृष्टीने धर्माची बाब महत्वाची असेल पण राष्ट्रीय बाबतीत ती केंव्हाही आड येता कामा नये. यापुरती धर्म ही बाब फारच कमी महत्वाची आहे, असे मला वाटते." यावरुन डॉ. बाबासाहेबांच्या विचारांप्रमाणे सर्व भारतीयांनी आपल्या मनातील जाती-धर्माची बंधने तोडली पाहिजेत. धर्मरुपी विविध काटेरी बोरी-बाभळी तोडून एक बलसंपन्न विशाल देश बनवला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ओळख भारतीयांना अस्पृश्यांचे उद्धारक, घटनेचे शिल्पकार, समाजसुधारक यांसारख्या विविध नात्याने आहे. पण याबरोबरच ते थोर राष्ट्रनिष्ठ देशभक्त होते. याची जाणीव बऱ्याच जणांना दिसत नाही. त्यांची प्रखर राष्ट्रनिष्ठा पुढील मनोगतातून सहज लक्षात येते. ते म्हणतात, "मी प्रथम भारतीय आहे. सत्ताधारी व उच्चवर्णीय लोकांशी माझे अनेक खटके उडाले, राजकीय संघर्ष झाला. पण आमचे हे कौटुंबिक भांडण आहे. म्हणून मी परदेशात भारताबद्दल कडवट बोलणार नाही. देशहित प्रथम, मी माझ्या देशाशी कधीही द्रोह करणार नाही." ही त्यांची जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा विषमतावादी उच्चवर्णीय भारतीयांनी कधी समजून घेतली नाही. अगदी विद्यार्थी जीवनापासून ते शेवटच्या श्वासापर्यंत ते प्रखर राष्ट्रभक्त म्हणूनच जगले. याचे उत्तम उदाहण म्हणजे त्यांनी केलेले धर्मांतर होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी येवला येथे १९३५ साली धर्मांतराची घोषणा केली. व १९५६ साली प्रत्यक्ष धर्मांतर केले, या दरम्यान त्यांनी जगातल्या सर्वच धर्मांचा चिकित्सकपणे सूक्ष्मपणे अभ्यास केला. पण शेवटी भारतात जन्मलेला व वाढलेला बुद्धाचा धम्म स्वीकारला. पण खेदाची बाब ही आहे की, त्यांच्या प्रखर राष्ट्रनिष्ठेला मोकळ्या मनाने प्रस्थापितांनी मान्यता दिलेली नाही. यासंदर्भात आंबेडकरी विचारांचे अभ्यासक डॉ.भूषणकुमार जोरगुलवार म्हणतात. "राष्ट्रावर असणारी जाज्वल्य निष्ठा हा डॉ.बाबासाहेबांच्या मनाचा सवर्ण हिंदूनी न ओळखलेलाच नव्हे तर फारसा विचारात न घेतलेला असा एक धागा होता. राष्ट्रनिष्ठेचा हा धागा त्यांच्या विद्यार्थी

दशेपासून ते त्यांच्या जीवनाच्या अंतापर्यंत अखंडपणे चालत आलेला आहे. मात्र दुःखाची बाब अशी की, त्यांच्या या प्रखर राष्ट्रनिष्ठेला फारशा मोकळया मनाने मान्यता कुणीच दिलेली नाही. त्यांचे नेतृत्व मान्य करणाऱ्या त्यांच्या अनुयायांना देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रनिष्ठेचा हा धागा घट्टपणे पकडता आला नाही." जोरगुलवारांचे हे कथन अगदी सत्य आहे असेच म्हणावे लागेल.

भारताच्या आधुनिक इतिहासात अगोदर राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक सुधारणा हा वाद निर्माण झाला. पण नवभारताची निर्मिती होत असताना ती समतेच्या पायावर झाली पाहिजे हा बाबासाहेबांचा कटाक्ष होता. ज्या वंचित समाजाचे त्यांनी नेतृत्व केले तो समाज या राष्ट्र उभारणीच्या कार्यातील महत्वाचा घटक ठरावा अशीच त्यांची भूमिका होती. सामाजिक, आर्थिक भेदाभेद नष्ट करुन स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मानवतावादी तत्वांवर अधिष्ठित असे नवराष्ट्र निर्माण करण्याचे डॉ.बाबासाहेबांचे ध्येय होते. भारतीय समाजात जोपर्यंत भेदाभेद व अनेक प्रकारची विषमता अस्तित्वात असेल तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मता निर्माण होणे शक्य नाही. याचे विवेचन करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "हजारो जातीमध्ये विभागलेले हे राष्ट्र लोकराष्ट्र कसे बनणार? सामाजिक व मानसशास्त्रीय अर्थाने आपण अद्याप राष्ट्र बनलेलो नाही. याची जेवढ्या लवकर आपणाला जाणीव होईल तेवढे चांगले." डॉ. आंबेडकरांचे हे निरीक्षण अगदी योग्य असल्याची प्रचिती आज आपणास होत आहे. कारण विविध प्रकारचे वाद स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ७५ वर्षांनी कायम आहेत. भाषावाद, प्रांतवाद, जातीवाद यांसारख्या वादामुळे भारत आजही एकसंघ राष्ट्र होणे बाकी आहे. असेच म्हणावे लागते. या विषमतामुळे दररोज भारतात धार्मिक, जातीय प्रांतवाद, भाषावाद जाळपोळ, दंगली, रक्तपात यांसारख्या घटनांमध्ये भारतातला गरीब व सर्वसामान्य जनता भरडली जात आहे. तोडफोड, जाळपोळ व हिंसाचार या घटना नित्याच्याच झाल्या आहेत.

१९२८ साली भारतातील राजकीय परिस्थितीचे निरीक्षण करण्यासाठी सायमन कमिशन भारतात आले. आणि या कमिशनला डॉ.आंबेडकरांनी सहकार्य केले. त्यामुळे ते ब्रिटीशांचे हस्तक, देशद्रोही व विश्वासघातकी आहेत असे बिनबुडाचे आरोप त्यांच्यावर करण्यात आले. परंतु या समितीचे मुख्य मुद्यावरच मतभेद निर्माण झाले. परिणामी या कमिशन समोर विविध राजकीय पक्षांनी व संघटनांनी आपल्या योजना सादर केले. त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा आपले निवेदन या कमिशनला सादर केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर आरोप करणाऱ्यांनी निवेदनात काय आहे. डॉ. आंबेडकरांची भूमिका देशहीताची कशी आहे. हे न पाहता पूर्वग्रहदूषित भावनेने हे आरोप केले आहेत. कारण या निवेदनात डॉ. आंबेडकर म्हणतात, "आज जर राष्ट्राला कोणत्या गोष्टीची गरज असेल तर ती म्हणजे जनतेच्या मनात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे होय. आपण प्रथम भारतीय व नंतरही भारतीयच आहोत अशी भावना निर्माण केली पाहिजे. हा आदर्श डोळयासमोर ठेवायचा असेल तर ज्यामुळे ही संकुचित प्रांताभिमानाची व पक्षाभिमानाची वाढ होईल अशा गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत." या भूमिकेवरुन डॉ. आंबेडकर ब्रिटीशांचे हस्तक किंवा भारतविरोधी होते अशी टीका करणे अनाकलनीय आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रनिष्ठेला सामाजिक आशय आहे. परकीय वर्चस्वाप्रमाणे हजारो वर्षे अंतर्गत छळाच्याविरुद्ध देखील त्यांनी आवाज उठविला. देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे पण त्याचबरोबरच येथील जनतेला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची संधी प्राप्त झाली पाहीजे. अर्थात सामाजिक दास्यात खितपत पडलेल्या लोकांना राजकीय स्वातंत्र्य किती आवश्यक आहे हे त्यांनी सांगितले. याबरोबरच डॉ.आंबेडकर खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष होते. त्यांच्या राष्ट्रवादाला धर्मनिरपेक्षतेची मजबुत किनार आहे. ते विज्ञानवादी व बुद्धीवादी तत्वज्ञ होते. राष्ट्रवादाच्या नावाखाली आंधळेपणाने सांस्कृतिक पुनरुजीवन करण्यास त्यांचा प्रखर विरोध होता. कारण असहिष्णू राष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हता. भारतात भाषावार प्रांतरचना असल्यामुळे भविष्यकाळात भाषावाद निर्माण होईल हे ओळखून संपूर्ण देशात ऐक्याची भावना दृढ करण्यासाठी 'हिंदी' हीच राष्ट्रभाषा असावी असे त्यांचे मत होते. बाबासाहेबांना भाषाभिमानाचे अवडंबर नको होते. भाषाभिमानाने प्रांतिक मतभेद आणि संघर्ष धगधगता राहील अशी त्यांना भीती वाटत होती. त्यामुळे त्यांनी घटना समितीत भाषा आणि राज्य यासंबंधी काही सूचना केल्या होत्या. जर राष्ट्र एकसंघ ठेवायचे असेल तर राज्याच्या सीमा पेटू नये यासाठी काही तडजोड ते करु इच्छित होते. कारण भाषाभिमानाचे दुष्परिणाम राष्ट्राला खिळखिळे

करतील याची जाणीव त्यांना होती. पण बाबासाहेबांचे हे प्रयत्न घटना समितीने फेटाळले ‘भाषावार प्रांतरचना’ या पुस्तिकेत डॉ.आंबेडकरांनी आपली ही भूमिका स्वतंत्रपणे मांडली आहे.

एकूणच ‘ज्ञानाचे प्रतिक’ असणाऱ्या, जागतिक किर्तीचे प्रकांड पंडित असणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपले विचार व कृती करताना अगोदर राष्ट्राचा विचार केला व त्यानंतर आपल्या समाज बांधवांचा मग तो प्रसंग स्वातंत्र्यलढ्याचा असो किंवा राज्यघटनेच्या निर्मितीचा ‘मी प्रथमतः भारतीय आहे. व अंतिमतः भारतीयच आहे’ ही त्यांची देशभक्ती संकुचित स्वरुपाची नव्हती. कारण त्यांनी आपल्या हयातीत कधीही भारताला दुर्बल बनवण्याचे कार्य स्वतः किंवा आपल्या अनुयायांना करु दिले नाही. त्यांनी राष्ट्र व राष्ट्रवादाचा विचार कृतिशील पद्धतीने व्यक्त केला आहे. त्यामुळे आधुनिक भारताच्या एकसंघ जडणघडणीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान वादातीत स्वरुपाचे आहे.

**निष्कर्षः-**

- “मी परदेशात भारताबद्दल कडवट बोलणार नाही. देशहित प्रथम, मी माझ्या देशाशी कधीही द्रोह करणार नाही.” ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा इथल्या विषमतावादी प्रस्थापितांनी कधी ओळखली नाही व विचारातही घेतलेली दिसत नाही.
- एकसंघ राष्ट्र निर्मितीसाठी समर्पित भावना प्रत्येकाच्या मनात असली पाहिजे अशी भूमिका डॉ.आंबेडकरांची होती.
- भारतीयांची धर्मश्रद्धाळू मानसिकता आणि राष्ट्रनिष्ठा यातील व्दंव्दाचे अचूक आकलन डॉ.बाबासाहेबांनी केले होते. त्यामुळे भारताचे स्वातंत्र्य व लोकशाही यांच्या भवितव्याचा प्रश्न त्यांना चिंताजनक वाटत होता. ही चिंता लोकशाही व स्वातंत्र्याच्या बाबतीत जशी होती. तशीच राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रभिमानाच्या दृष्टीनेही होती हे लक्षात घेतले पाहिजे.
- भारतातील आर्थिक, सामाजिक चातुर्वर्ण्यधिष्ठित भेदा-भेद नष्ट करुन स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्वत्रयीवर अधिष्ठित नवराष्ट्र निर्माण करण्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येय होते. कारण हे सर्व भेदा-भेद व विषमता नष्ट झाल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता निर्माण होणार नाही याची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना होती.

**संदर्भ ग्रंथः-**

१) संपा. काळे खंडेरावजीः-डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विविध दृष्टीकोन, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद.

२) संपा. गायकवाड प्रदीपः- अग्रलेखः बहिष्कृत भारत व मूकनायक क्षितिज पब्लिकेशन, नागपूर.

३) संपा. डॉ. डाहाट धनराजः-डॉ.बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार संकेत प्रकाशन, नागपूर.

४) संपा. गवळी टी. ए. व इतरः- डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ प्रकाशक, सौ.नंदिनी तु.गवळी.

# बहुजनांचे मुक्तीदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

संशोधन विद्यार्थी
**श्री.राहूल भागवत गायकवाड**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ,पुणे

**प्रास्ताविक:—**

डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांनी शतकानुशतके उपेक्षित शोषित राहिलेल्या व दलित समाजाला त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून देऊन 'शिका संघटित व्हा संघर्ष करा' हा मूलमंत्र देऊन अन्याय अत्याचारा विरोधात लढण्यासाठी बहुजनांना बळ देण्याचे काम केले.अस्पृश्यांचा प्रश्न हा एक जागतिक प्रश्न होता जनावरांपेक्षाही बत्तर वागणूक देणाऱ्या उच्चवर्णीयांच्या विरोधात बंड करण्यासाठी संविधानांचे शस्त्र हाती दिले आणि बहुजनांच्या उध्दारासाठी त्यांनी आपले संबंध आयुष्य वेचले. चार कोटी अस्पृश्य समाजाला उच्चवर्णीयांच्या जातीबंधनाच्या जोखडातून मुक्त करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. तसेच बाबासाहेबांनी सामाजिक,धार्मिक आणि राजकीय अशा तीन बाजूनी लढ्याला सुरूवात महाडच्या सत्याग्रहापासून केली.बहुजनांना सार्वजनिक ठिकाणी वावरण्यास बंदी होती म्हणजे सार्वजनिक पाणवठयांवर बंदी,मंदिरात प्रवेश बंदी होती.गावात बंदी या सर्वांविरोधात टप्याटप्याने संघर्ष उभा करून समस्त बहुजन समाजाला वर्णव्यवस्थेच्या अन्यायी,जुलमी राजवटीतून मुक्त करण्याचे काम डॉ.बाबासाहेबांनी केले म्हणून त्यांना बहुजनांचे मुक्तीदाते,उध्दारकर्ते म्हटले जाते.जाती—जातींमधील किंवा पोटजातींमधील दरी कमी करायची असेल आणि हिंदू धर्माचे संवर्धन करायचे असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

''हिंदू समाजाची दोन तत्त्वांवर पुनर्रचना व्हायला हवी:समता व जातिविहीन रचना'' पृष्ठ २८

वरील बाबासाहेबांच्या मताचा विचार केला तर खरच हिंदू धर्मात समता व जातिविहीन रचना असती तर, एवढ्या पोटजाती राहिल्या नसत्या आणि आपण हिंदूधर्मापासून वेगळे आहोत अशी मानसिकता बहुजनांची राहिली नसती आणि उरला असता तो मानवधर्म.डॉ.बाबासाहेब समस्त मानवाचे कल्याण व्हावे सर्वांना स्वातंत्र्य प्राप्त व्हावे आणि सर्वांना समतेची वागणूक मिळावी हेच ध्येय उरी बाळगूण बहुजनांच्या हक्कांसाठी त्यांना लढावे लागले. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत समाजासाठी आणि बहुजनांसाठी संघर्ष दिला.

**१)दलितांचे मुक्तीदाते :—**

डॉ.बाबासाहेब आंबडेकर हे स्वत:दलित समाजातील 'महार' जातीत जन्मले असल्याने त्यांना अस्पृश्यता काय असते आणि दलितांना समाजात काय स्थान होते याची जाणीव होती.त्यांनी जातीयतेचे अनेक चटके सहन केले होते अपमान, अवहेलना हे दलितांच्या जन्मालाच पुंजलेले होते.हे त्यांना माहित होते .एक जात दुसऱ्या जातीच्या मानगुंटीवर बसलेली आहे. रूढी परंपरेने जे नियम लादलेले आहेत त्या नियमांचे पालन दलित जातींनी केलेच पाहिजे अन्यथा त्या जातींवर अन्याय अत्याचार केले जात असत व त्यांना समाजातून बहिष्कृत केले जात होते. हे सर्व डॉ.बाबासाहेबांनी पाहिलेले होते आणि अनुभवलेले होते.सवर्णांच्या अशा अन्यायी, जुलमी राजवटीच्या जोखडाखाली दलित समाज निद्रिस्त झाला होता.त्या समाजाला अन्याय अत्याचाराविरोधात लढण्यासाठी खदाखदा हलवून जागे केले. अनेक पिढ्यांपिढ्या अज्ञानाच्या व गुलामागिरीच्या खोल विहिरीत जे खितपत पडले होते त्यांना ओढून बाहेर काढले व दलितांच्या मनातील सवर्णांविषयीचा धाक, भिती काढून टाकली आणि दलित समाजाच्या प्रगती आड येणाऱ्या जुन्या खुळचट कल्पनांना मुठमाती देऊन स्वत:च्या पायावर उभे राहायला शिकवले.म्हणून डॉ. बाबासाहेब हे दलितांचे नव्हेतर सर्व बहुजनांचेच मुक्तीदाते ठरतात.

दलित समाज अनेक पिढ्यांपिढयापासून खितपत पडला होता परंपरेने अनेक हक्क नाकारले होते.ते सार्वजनिक पाणवठ्यांवर पाणी भरू शकत नव्हते. त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता,गावात फिरण्यास बंदी होती,त्यांना चांगले खाण्यास बंदी होती,चांगले वस्त्र घालण्यास मज्जाव होता.भरदुपारी गावात वाहाणे घालून फिरण्यास बंदी होती. तसेच शेती, मालमत्ता शिक्षण अशा गरजांवरही उच्चवर्णीयांनी बंधने घातली होती भारतीय समाज व्यवस्थेवर

मनूवादाचा फारच मोठा पगडा होता.मनूच्या नियमांचे कठोरपणे पालन करणे हे आमचे आद्यकर्तव्यच आहे असे सवर्णांना वाटे म्हणून दलितांचे, बहुजनाचे खच्चीकरण होत गेले. त्यामुळेच हा बहुजनवर्ग रसातळाला गेला हे स्पष्ट होते.

'शुद्रादी हीन जातीचा पुरूष ब्राम्हणादी उच्चवर्णीया बरोबर एकासनावर बसल्यास त्यांच्या कंबरेला डाग देऊन त्यास देशातून बाहेर घालवावे अथवा तो न मरेल अशा बेताने त्याच्या ढुंगणाची कातडी कापून घ्यावी'.पृष्ठ. २९

वरील मनूच्या श्लोकाचा विचार केला तर अस्पृश्याविषयी किती जाचक नियम व अटी मनूस्मृतीत होत्या हे लक्षात येते आणि उच्चवर्णीयांनी त्या नियमांचे पालन काटेकोरपणे करण्यात धन्यता मानली .एका मनुष्यप्राण्याने दुसऱ्या मनुष्यप्राण्यास मरणयातना देण्यातच सवर्णांना आनंद होता हेच वरील श्लोकातून निष्पन्न होते.

'शुद्राचे द्रव्य ब्राम्हण मालकाने खुशाल ग्रहण करावे.कारण त्यास स्वत:चे धन बिलकूल असू शकत नाही. जर असलेच तर, मालकाने ते आपलेच समजावे.'पृष्ठ. १२९

वरील मनूच्या श्लोकाचा विचार करता शुद्रांना म्हणजे दलितांना स्वत:चा द्रव्य संचय करण्यास अधिकारही नव्हता म्हणजे एकाने कष्टाने, घामाने कमविलेल्या संपत्तीवर दुसऱ्याने डल्ला मारायचा तेही अधिकाराने यातून मनूची विचार सरणी किती घाणेरडी होती आणि मनूने ठरवून दिलेल्या मार्गाने चालणारे सवर्ण मनूपेक्षा निच मानसिकतेचे होते. हेच यातून स्पष्ट होते.

स्वातंत्र्याला आज ७५ वर्ष पुर्ण झाली जग आज आधुनिकतेच्या दिशेने वाटचाल करीत आहे. जागतिकीकरण झपाट्याने होत आहे.तरीही भारतीयांच्या मनावरील मनूवादाचा पगडा कमी झालेला दिसत नाही. शहरांमधली दलितांची सामाजिक स्थिती सुधारलेली दिसते पण खेडयांमधील दलितांची सामाजिक स्थिती फार वाईट आहे.मराठवाडयातील अनेक खेडयांमध्ये दलितांवर सामुहिक हल्ले होताना वृत्तमानपत्रातून पाहावयास मिळते. आजही अहमदपूर तालुक्यातील किनी,बेलुर, तिर्थ, सिंदगी, हाटकयाळ अशा अनेक गावांमध्ये दलितांना मंदिरात देवदर्शनासाठी बंदी आहे. सवर्णांच्या पाणवठयावर पाणी भरण्यास बंदी आहे.हे सत्य नाकारून जमणार नाही तर हया सवर्ण भारतीयांच्या मानसिकतेत बदल होणे गरजेचे आहे.जरी दलितांना कायदयाने संरक्षण दिले असले तरी त्यांना मर्यादा येतात.म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नुसत्या बोलण्यातुन नाहितर कृतीमधून दलितांना न्याय हक्क मिळवून दिले.महाड चवदार तळयाचा सत्याग्रह केला.नाशिकला काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून आंदोलन केले. मनुस्मृतीचे दहन केले आणि शेवटी हिंदू धर्माचा त्याग करून बौध्द धर्म स्वीकारला. अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी दलितांना त्यांच्या मोक्षाचा मार्ग त्यांच्या मुक्तीचा खरा मार्ग दाखवला आणि दलितांना स्वाभिमानाने जगण्याचा मंत्र देऊन उध्दार केला.

२)**स्त्रीयांचे मुक्तीदाते:–**

स्त्रीयांना दुर्गा, भवानी, झाशी, सरस्वती,लक्ष्मी,महाकाली इत्यादी विशेषणे लावली जातात पण प्रत्यक्षात मात्र तीला घरात सांदीचे खापर बनवून टाकले आहे. भारतातील सर्वच धर्मांनी स्त्री पुरूष असा भेद करत,स्त्रीचा जेवढा वापर करता येईल तेवढा केला आणि पायातील वहाणं पायातच राहिली पाहिजे असे म्हणत सर्व धर्मांनी स्त्रियांवर जेवढी बंधन लादता येतील तेवढी लादली गेली स्त्री विधवा झाल्यानंतर आयुष्यभर तीने अभागीपणाचे दु:ख भोगायचे पण पुरूष विधुर झाल्यावर लगेच महिना दोन महिन्यात लग्न करतो.हा कसला न्याय म्हणावा लागेल तसेच एखादया स्त्रीचा पती मेल्यानंतर त्याच्या चितेवर स्त्रीने सती जाण्याची प्रथा होती पण एखादी स्त्री मेल्यानंतर पुरूष कधी सती गेल्याचे उदाहरण इतिहासात सापडत नाही.मानव जातीच्या उत्पन्नाची मुळ जननी म्हणजे स्त्री असून तरीही पुरूष जातीने स्त्रीचे जगणे अत्यंत कष्टमय करून सोडले आहे.आजही पुरूषी अहंकारपुढे स्त्रीयांचे काहीच चालत नाही त्यांच्यावर अन्याय अत्याचार केले जातात.बलात्कार केले जातात,जीवंत जाळले जाते,हुंडयासाठी कौटुंबिक अत्याचार केले जातात, स्त्रीभ्रुण हत्या केली जाते अशा सर्व घटना भारतीय समाजात सर्रासपणे घडतात आणि याकडे समाज, सरकार,विचारवंत डोळेझाक करतात म्हणजेच अशा सर्व गोष्टींना समाज मुकसंमती देत आल्याचे स्पष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांबरोबरच स्त्रीयांनाही त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली आणि सर्व समाजाच्या उध्दारासाठी स्त्रीला तिच्या शक्तीचं भान आणून देऊन स्त्रीयांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. स्त्रीयांनी शिक्षण घेऊन स्वत:चा आणि समाजाचा उध्दार करावा असे मत डॉ.बाबासाहेबांचे होते.स्त्रीयांचे हक्क,त्यांची उन्नती, विकास यांसाठी अनेक महापुरूषांनी, संतानी विचार मांडले पण त्या विचारांचा समाजावर काहीच परिणाम झाल्याचे दिसत नाही पण डॉ.बाबासाहेब आंबेडरांनी प्रत्यक्ष कृती करण्याचे ठरवून कायदामंत्री असताना स्त्रीयांच्या उध्दारासाठी कायदा करण्याचे ठरविले'हिदू कोडबील' तयार केलं व १२ ऑगस्ट १९४८ ला कायदेमंडळापुढे मांडले स्त्रीयांचे प्रश्न राष्ट्रीय पातळीवर प्रथमच कुणीतरी मांडले आणि स्त्रीयांना कायदयाने पाठींबा मिळणार अशी आशा होती स्त्री जातीचा मोठा कायापालट होणार होता. 'हिंदू कोडबील' म्हणजेस्त्रीच्या सर्वांगीण विकासाचा खलिताच होता त्यात पुढील प्रमाणे महत्वाचे मुद्दे होते. घटस्फोटाचा अधिकार ,पोटगीचा अधिकार, दुसऱ्या विवाहाचा अधिकार,दत्तक घेण्याचा व दत्तक जाण्याचा अधिकार,मिळकतीचा अधिकार, वडिलांची मिळकत, वारस होण्यास अधिकार ,आंतरजातीय विवाह संमती असे अनेक स्त्रीयांच्या उध्दारासाठी महत्वाचे मुद्दे यात होते.हे बील कायदे मंडळापुढे येताच याला हिंदू धर्मातील अनेक विचारवंतानी प्रखर विरोध केला.इथे पुरूषातील अहंकार जागृत झाला होता म्हणून 'हिंदु कोड बील' नामंजूर करण्यात आले. म्हणून तात्काळ आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा देणारे. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव नेते म्हणावे लागतील.

''तुम्हाला मूल होत नाही हा जर तुमचा दोष असेल तर मूल होत नाही या सबबीवर दुसरा नवरा करण्याचा विचार तुमच्या बायकोने मनात आणला तर ते तुम्हाला चालेल का? तुम्हाला मूल हवे तशी त्याची गरज तिलाही आहेच. स्त्रीयांनाही मुलाबाळाची ओढ असतेच कि'' पृष्ठ २५५

वरील बाबासाहेबांच्या मताचा विचार केला तर पुरूषांच्या मुळप्रवृत्तीवर घाव घालण्याचा प्रयत्न केला आहे. पुरूष कसा ढोंगी आहे तो स्त्रीचा सोयीनुसार कसा उपयोग करून घेतो हे स्पष्टपणे डॉ.बाबासाहेबांनी मांडले आहे. वरील सर्व विवेचनातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीयांविषयीचे धोरण हे उदारमतवादी होते त्यांच्या हया कार्याला कुठेच तोड नाही हे वास्तव आहे.

हिंदू धर्मात अतिशय प्रमाण मानल्या जाणाऱ्या मनूस्मृतीत अतिशय कडवटपणे स्त्रीयांची निंदा,नालस्ती आणि निर्भत्सना केल्याचे आढळते.गुलामागिरीच्या चिखलात अस्पृश्यांना खोलवर बुडवणाऱ्या या मनूच्या तावडीतून सवर्ण जातीतील स्त्रियाही सुटलेल्या नाहीत.स्त्रीयांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नाही,स्वातंत्र्याचा अधिकारच नाही असे मनूचे मत होते. तो म्हणतो.

'स्त्रियांनी लहानपणी वडिलांच्या, तरूपणी पतीच्या आज्ञेत वागावे.पती मृत झाल्यास मुलाच्या संमतीने वागावे .एंकदरीत स्त्रीने स्वतंत्रता स्वीकारू नये'. पृष्ठ १२९

'पतीशीलरहित,गुणरहित व स्वेच्छाचारी असला तरी साध्वी स्त्रीने देवाप्रमाणे त्याची सुश्रूषा करावी'. पृष्ठ १२९ मनूस्मृती याअन्यायी, अत्याचारी ग्रंथाची डॉ.बाबासाहेबांनी जाळून होळी केली.मनूने लिहिणे आणि ते समाजाने मान्य करणे हे देशाच्या प्रगतीला किती अहितकारक आहे हे पटकन लक्षात येते अशा धर्मग्रंथाचा आधार घेतला तर भारत देश कधीच महासत्ता होणार नाही हे शंभर टक्के खरे आहे. धर्ममार्तंड आजही म्हणत आहेत की, अस्पृश्यांना ठिकाणावर आणायचे असेल तर संविधानाच्या जागी मनूस्मृती चे नियम अंमलात आणावे लागतील म्हणजेच यातून असे स्पष्ट होते की,मनूवादी लोकांना दलितांचा,स्त्रीयांचा उध्दार आणि विकास मान्यच नाही.त्यांनी पुर्वीप्रमाणेच आज्ञेत राहावे आणि वागावे.हिदुं धर्मात मोजक्या वर्गाने सर्व सुख उपभोगायचे आणि बहुजन समाजाने निस्वार्थपणे त्यांची चाकरी करायची हे कितपत योग्य आहे.मनूवादाने खरेच देशाचा विकास होईल का ? असा प्रश्न प्रत्येक भारतीयांनी स्वत:ला केला पाहिजे.

वरील मनूच्या श्लोकांचा किंवा नियमांचा विचार केला तर पती कसाही असला तरी देवाप्रमाणे त्याची सेवा करावी.असाच स्त्रीयांच्या बाबतीत विचार केला तर किती पुरूषांना हे पटेल आणि रूचेल म्हणून डॉ.बाबासाहेबांनी ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन स्त्रीया आणि दलितांच्या उध्दारासाठी संविधानात अनेक कायदयांची तरतूद करून

स्त्रीयांना व दलितांना प्रभावी आणि भक्कम सरंक्षण दिले आहे. म्हणून डॉ.बाबासाहेबांना बहुजनाचे मुक्तीदाते म्हटले जाते.

**सारांश :–**

सर्व पोथ्या, पुराणांमध्ये ब्राम्हण सर्वश्रेष्ठ आहेत त्यांना देवाप्रमाणे समजावे असेच पुरावे देत ब्राम्हणांनी बहुजनांची दिशाभुल करून देवाची व धर्माची भीती दाखवत बहुजनांच्या मेंदुवर ताबा मिळविला आणि जन्मानुसार चातुर्वर्ण्य व्यवस्था निर्माण केली, मनूवादाचा पगडा असणाऱ्या ब्राम्हणांनी शिवछत्रपतींचा राज्यभिषेक करण्यास नकार दिला एवढया मोठया महाराजांचा अवमान केला.महाराजांना राज्यभिषेक करण्यासाठी महाराष्ट्रातील ब्राम्हणांनी असहकार दर्शविला तेंव्हा काशी वरून 'गागाभट्ट'ला आणावे लागले.राजांनाजर एवढा त्रास सहन करावा लागला असेल तर, बहुजनांना आजपर्यंत धर्माच्या चौकटीत अडकवून मनूवादयांनी मानसिक गुलामगिरी निर्माण करून जातीं–जातीमध्ये तेढ निर्माण केले त्याचे चटके आजही बसत आहेत.

म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व्यवस्थाच मान्य नव्हती मुनष्याला जन्माने श्रेष्ठत्त्व न प्राप्त होता कर्माच्या आधारावर श्रेष्ठत्त्व मिळावे असे त्याचे मत होते. भारतीय समाजात ब्राम्हण सर्वश्रेष्ठ बाकीसर्व कनिष्ठ ही कल्पनाच मुळी चुकीची आहे हे पुराव्यानिशी फुले, शाहु,आंबेडकर यांनी सिध्द करून दाखविले आणि जन्माला आलेला प्रत्येक मानव समान आहे. कोणीही उच्च नाही निच्च नाही सर्वांना समानतेची वागणूक मिळावी म्हणून स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रयींचा स्वीकार संविधानात करून बहुजनांना कायदयाचे संरक्षण दिले. कुत्र्या मांजरा सारखी वागणूक मिळणाऱ्या दलित समाजाला स्वाभिमानाने जगण्याचे बळ दिले ''शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा'' असा मूलमंत्र देऊन बहुजनांना मुक्ती मार्ग दाखविला आणि उध्दार केला. बहुजन समाज आणि स्त्रीया जेव्हा शिक्षण घेऊन प्रगत होतील तेव्हाच या देशात खरे स्वातंत्र्य आले आहे असे म्हणावे लागेल. देशाची प्रगती ही स्त्रीयांच्या प्रगतीवरूनच मोजली जावी असा आग्रह सर्व भारतीयांनी धरला पाहिजे तरच भारत देश महासत्ता होईल.

**संदर्भग्रंथ–**

१. मूनवसंत, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर', नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, तिसरी आवृत्ती २००२. पृष्ठ २८
२. बिवलकर राम ,कांबळे झुंबरलाल,'महाडचा मुक्तिसंग्राम', डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्राशिक्षण संस्था,पुणे, मार्च २०१५. पृष्ठ १२९
३. तत्रैव – पृष्ठ १२९
४. आठलेकर मंगला ,'महापुरूषांच्या नजरेतून स्त्री',मेनका प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २००९पृष्ठ २५५
५. बिवलकर राम, कांबळेझुंबरलाल, 'महाडचा मुक्तिसंग्राम' ,डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, मार्च २०१५,पृष्ठ १२९
६. तत्रैव – १२९
७. कसबे रावसाहेब, 'डॉ.आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना',सुगावा प्रकाशन पुणे,पाचवी आवृत्ती जून २०१४
८. जोशी प्रभाकर,'भीमायनम्',दलित पॅंथर ऑफ इंडिया', पुणे ,प्रथम आवृत्ती एप्रिल २०११
९. गायकवाड किशोर, 'घटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर', श्रीगंधर्व वेद प्रकाशन पुणे २०१०
१०. भोळे भास्कर, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुभव व आठवणी',साकेत प्रकाशन औरंगाबाद, तिसरी अवृत्ती २०१५.

# डॉ. बाबासाहेब आबेडकर यांचे शैक्षणिक विचार - एक अभ्यास

प्रा. डॉ. इकबालखान गफारखान

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,माहूर,जि.नांदेड.

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षण हे अस्पृश्य, दलित यासारख्या मागासलेल्या जनतेच्या उत्थानाचे उत्तम साधन आहे. मानवी जीवनातील जडणघडण शिक्षणामुळेच होत असते. सामाजिक समता आणि स्वातंत्र्याचे रक्षण करणारी शक्ती म्हणजे शिक्षण होय. शिक्षणामुळे केवळ व्यक्तीच्या कार्यक्षमतेत व कौशल्य यातच वाढ होत नाही तर व्यक्तीच्या दृष्टिकोनाचा प्रसार व प्रचार होतो. शिक्षणामुळे राष्ट्र प्रगतीपथावर जातो . शिक्षणामुळे नवनवीन संशोधन करण्याची संधी प्राप्त होते शिक्षण ही शोषणमुक्त तिच्या पायावर समाजातील मानव निर्मित विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाचा आपले गुरु मानत असे त्यांच्या राजगृहात बावीस हजार ग्रंथ होते. तसेच तसेच त्यांचेआयुष्यात तीन गुरूंनी घडवले त्यात महात्मा गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज यांना आपले गुरू मानत असे. बाबासाहेब म्हणतात जर तुमच्याकडे दोन नाणी असतीलतर एका नाण्याचे पुस्तक घ्या आणि एका नाण्याचे भाकर घ्या. यावरून असे स्पष्ट होते की बाबासाहेबांनी शिक्षणाला खूप महत्त्व दिले शिक्षणामुळे मानवाला मानव म्हणून जगण्याची संधी प्राप्त होते. खऱ्या अर्थाने शिक्षणामुळे अर्थ प्राप्त होऊन गुलामगिरी संपुष्टात येते.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. त्याचा उपयोग योग्य रित्या झाला पाहिजे जो समाज अशिक्षित असतो तो शिक्षणाअभावी सर्वस्व गमावलेला असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.

**संशोधनाचीउद्दिष्ट**

संशोधन लेखनासाठी खालील प्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.

२) भारतीय राज्यघटनेतील शिक्षण हक्कांचा अभ्यास करणे.

३) सध्या स्थितीतील शिक्षणाची माहिती अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके**

संशोधन लेखनासाठी खालील प्रमाणे ग्रहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१) शिक्षणामुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांची उन्नती होते.

२) शिक्षण हासामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्रांतीचा मूलाधार आहे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षणा बद्दल चे विचार उदार स्वरूपाचे होतं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

**१) प्राथमिक शिक्षण विषयी विचार:-**

प्राथमिकशिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे. खऱ्या अर्थाने अर्थाने शिक्षणाचे बीजारोपण प्राथमिक शिक्षण आतच आहे. प्राथमिक शिक्षणात मुलांचे मने सुसंस्कृत करणारे व दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शाळा पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा राष्ट्रीय दृष्टी अत्यंत महत्त्वाचा आहे. मुलांनी शाळेत प्रवेश घेतल्यानंतर त्यांना पूर्णपणे सुशिक्षित व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावे. शिक्षण हे समाजातील सर्व थरापर्यंत गेले असावे. शाळा ही उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याचा आग्रह धरला तसेच प्राथमिक शिक्षणामुळे अंधश्रद्धा व गुलामगिरी यापासून सुटका मिळते. जो वर्ग आधीपासूनच शिक्षणाचा लाभ घेतात त्या वर्गावर शिक्षणासाठी सक्ती करावी लागत नाही तर ज्या वर्गांना शिक्षणाचे महत्त्व कळाले नाही तसेच जो वर्ग शिक्षणाबाबत उदासीन आहे त्यांच्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची आवश्यकता आहे करण्याची आवश्यकता आहे.

२) **माध्यमिक** शिक्षण:-

समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन या जगात नाही. कारण शिक्षणामुळे मागासवर्गीयशोषणमुक्त होते. माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी समाजावर असली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणाबाबत चा दृष्टिकोन व्यापक स्वरूपाचा होता. माध्यमिक शिक्षण मुलं व मुली साठी आवश्यक आहे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक शिक्षणाचा ही प्रसारावर खूप भर दिले.

३) **उच्च** शिक्षण:-

उच्च शिक्षण हे मानवी जीवनात खूप महत्वाचे व आवश्यक आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षण किती महत्त्वाचे आहे त्यांनी आपल्या विचारातून वारंवार मांडलेले आहे. ज्या समुदायाची बौद्धिक क्षमता असून सुद्धा त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे असे कारण त्यांची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसल्यामुळेमागासवर्गीय वर्गांना उच्च शिक्षणाचा लाभापासून वंचित राहावे लागत आहे. असे बाबासाहेब आंबेडकर यांना वाटते.उच्च शिक्षण हे समाजव्यवस्थेतील सर्व घटकापर्यंत पोहोचले पाहिजे.शिक्षणाचे महत्व ओळखणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 20 जून 1946 मध्ये मुंबई

येथे सिद्धार्थ महाविद्यालय तर 19 जून 1950 मध्ये औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हे एकमेव औषध आहे. उच्च शिक्षण हे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत असावे. मागास प्रवर्गातील लोकांना उ.च्च शिक्षणासाठी शासनाने अर्थसहाय्य साठी पुढे यावे व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्या**स्त्रियांना**वी.थोडक्यात असेम्हणता येईल की उच्च शिक्षण ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करण्याचे मुख्य सामर्थ्यशाली साधना होय. उच्च शिक्षणात नवनवीन संशोधन , नवीन शिक्षण व आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार दर्जेदार शिक्षण असावे शिक्षण असावे.

४) **स्त्री शिक्षण:-**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी पुरुषांबरोबरच स्त्री शिक्षणाचा पुरस्कारकेला. जर शिक्षणापासून वंचित ठेवले तर देशाची अर्धी शक्ती वाया जाईल. म्हणून त्यांनासुद्धा पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण मिळाले पाहिजे. मुली शिकल्या वरच भारताची भावी पिढी चांगले निर्माण होईल स्त्रियांना मोफत व सक्तीचे शिक्षण असावे असा दृष्टीकोण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा होता. भारतीय समाज व्यवस्थेतील मागास प्रवर्गातील स्त्रियांना शिक्षणाची खूप आवश्यकता आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री शिक्षणा बद्दल चे विचार उदार स्वरूपाचे होते.

महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाज व्यवस्थेचा विरोध पत्करून पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली व मुलींना शिक्षण देण्यासाठी सर्वप्रथम सावित्रीबाई फुलेंना शिकविले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य केवळ उपेक्षित ,वंचित घटकातील स्त्रिया पुरतीच मर्यादित नव्हते तर भारतीय समाजातील सर्व स्त्री यासाठी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, की तुम्ही तुमच्या मुलं मुलींना शिक्षण द्या. त्यांना खूप खूप शिकवा त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत बाल विवाह करू नका. कारण शिक्षणात प्रगती करू शकते. कारण शिक्षणातच ती शक्ती आहे, शिक्षण हाच सर्व सुधारण्याचा पाया आहे शिक्षणातच ती शक्ती आहे शिक्षण हाच सर्व सुधारण्याचा पाया आहे

निष्कर्ष

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे शिक्षणाचा एक महामेरू होय. त्यांनी शिक्षण विषयक विचार आपले व्यापक विचार मांडले आहेत.

२) शिक्षणातूनस्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्त्वांचा पुरस्कार केलेला आहे.

३) प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया आहे.

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार मोठ्या हिरीराने केलेला दिसून येतो.

५) मानव निर्मित विषमतेचे पासून मानवाला मुक्त करण्याचे शिक्षण हे एकमेव मार्ग आहे.

**सारांश:-**

वरील विवेचना वरुन असे स्पष्ट दिसून येते कीडॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयी विचार किती प्रगल्भ होते. घरातील स्त्री शिकली तर कुटुंब हे सुशिक्षित होते. हा त्यांचा विचार आज किती उपयुक्त ठरला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण जातीधर्मातील स्त्रियांकरिता शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य केले. सामाजिक समता आणि स्वातंत्र्य यांचे रक्षण करणारी शक्ती म्हणजे शिक्षण होय. शिक्षण हे शोषण मुक्तीचा पाय वाट आहे शेवटी असे म्हणता येईल की,सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे. शिक्षणामुळे मानव हा स्वाभिमानी व स्वावलंबी होतो.

संदर्भ सूची:

१) प्राचार्य राजू भगत, शिक्षण क्षेत्रातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन कोल्हापुर.

२) डॉ. डोळे नाय आधुनिक भारतीय राजकीय विचार, मनोहर पिंपळापुरे नागपूर.

३) स्वामी व्ही. एन., भारतीय समाजसुधारक विचारवंत, विद्या प्रकाशन लातूर.

४) डॉ घोर मोडे के.यु, सौ घोनमोडे कला उदयन्मुख भारतीय समाजातील शिक्षण विद्या प्रकाशन नागपूर.

५) शेषराव मोरे डॉ .आंबेडकरांचे सामाजिक धोरण एक अभ्यास, राजहंस प्रकाशन पुणे.

# बाबासाहेबांचे शिक्षणविषयक विचार व शिक्षणविषयक संविधानात्मक तरतूदी

**प्रा. विनया केशव कांबळे**
**तु. कृ. कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय नेसरी**

शिक्षण म्हणजे सर्वसामान्यांचे प्रबोधन, संघटन म्हणजे जनसामान्यांचे संघटन आणि संघर्ष म्हणजे सर्वसामान्य माणसाने प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध पुकारायचे बंड होईल. व्यक्तीला अन्यायाविरुद्ध उठाव करण्याचे सामर्थ्य आणि जाणीव केवळ शिक्षणामुळेच होते असा बाबासाहेबांचा विश्वास होता. त्यामुळे घटनेच्या 45 व्या क्रमांकावर वयाची 18 वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी शासन व्यवस्थेचे असल्याची तरतूद त्यांनी केली. शिक्षण हा धार्मिक प्राबल्य निर्माण होऊ नये. क्रमांक 45 मध्ये संविधान लागू झाल्यापासून 14 वर्षे सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यात येईल क्रमांक 46 मध्ये अनुसूचित जाती व जमाती व इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध संवर्धन करण्यास प्रयत्नशील राहील. क्रमांक 47 मध्ये आपल्या जनतेचे शोषण, मान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे प्राथमिक कर्तव्य राहील.राज्य धोरणांच्या निर्देशक तत्वामध्ये या संविधानात्मक तरतुदि करून विषमता निर्मूलनाचा भक्कम पाया बाबासाहेबांनी दिलेला आहे. सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी विशेष तरतूद केली जाईल. कलम 16 नुसार-16 (1) राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवा योजना अथवा नियुक्ती करताना यासंबंधी सर्वांना समान संधी असेल.16 (4)नुसार यांच्याशी सेवांमध्ये पर्याप्त प्रतिनिधित्व नाही.अशा मागासवर्गीयांसाठी नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यास कोणतीही तरतूद करण्यात राज्यात प्रतिबंध नसेल.बाबासाहेब म्हणतात,शिक्षण व्यक्तीच्या शरीरात भिनले पाहिजे. त्यामुळे त्याचे मन व शरीर सुदृढ राहील. शिक्षणाशिवाय व्यक्ती पशुवत होईल म्हणून व्यक्तीला शिक्षणाची गरज आयुष्यभर राहते. स्वतः बाबासाहेबांनी अतिउच्च शिक्षण घेऊन संपूर्ण जगासमोर आदर्श निर्माण केला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते शिक्षण मूल्याधिष्ठित असावे. बालकांच्या मनावर शिक्षणाचा प्रभाव योग्य प्रकारे झाला पाहिजे. शिक्षणाने त्याग, मानवता, विनम्रता, दुसऱ्याची जाणीव ही मानवी मुल्ये विद्यार्थी मनावर रुजवली पाहिजे.उत्तम चरित्र असणारी व्यक्ती लोकशाहीचे खरे रक्षक ठरतात शिक्षणाने वैचारिक समतेचा व्यक्तीमत्त्वाचा विकास व्हावा शिक्षणामुळे व्यक्तीची वैचारिक क्षमता वृद्धिंगत होणे गरजेचे ठरते. शिक्षणामुळे बौद्धिक मानसिक क्षमतेच्या अनुभवकक्षेचा विकास व्हावा. शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्वाला चालना मिळून व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला पाहिजे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे आणि क्रांतीचे प्रभावी साधन. बाबासाहेबांनी सामाजिक परिवर्तन सामाजिक क्रांती करण्यासाठी शिक्षणाचा प्रभावी साधन याप्रमाणे वापर केला. महिला कल्याण व स्वातंत्र्य याला शिक्षणाने गती मिळते.शिक्षण आणि स्त्री स्वातंत्र्याचा मार्ग प्रशस्त होईल यावर बाबासाहेबांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे त्यांनी स्त्री शिक्षण अधिकार, स्त्री संरक्षण यांना कायदेशीर चौकट निर्माण केली व स्त्री मुक्तीचा मार्ग प्रशस्त केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की, प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे. म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार आणि गुणवत्तेचे असावे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्टा सशक्त होतो. तिला चांगला आणि वाईट यातला फरक समजू लागतो. इतकेच नव्हे तर शिक्षण घेतल्यामुळे प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण अंगी बांधतात. लहान वयात मनावर होणारे चांगले संस्कार आयुष्यभर उपयोगी पडतात. समाजाला शिक्षित करण्यासाठी झटणाऱ्या बाबासाहेबांनी 1947 आली पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली .त्या अंतर्गत त्यांनी मुंबईला सिद्धार्थ कॉलेज आणि औरंगाबादला मिलिंद महाविद्यालय सुरू केले त्यामुळे अनेक तरुनांना शिक्षणाचा लाभ झाला.पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे धोरण हे केवळ शिक्षण प्रसार करण्याचे नसून भारतात बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक लोकशाहीचा ज्याद्वारे विकास होईल अशी मनोवृत्ती घडवून आणण्याचे कार्य तिला

शिक्षणाच्या माध्यमातून करावयाचे आहे. मुंबईत उभारलेल्या महाविद्यालयाचे नाव सिद्धार्थ ठेवलं कारण शिक्षण प्रक्रियेतून बुद्धाचे तत्वज्ञान अंगिकारलेल्या विद्यार्थ्यांच्या पिढ्यांना समाजकार्यस्त घडवायच्या.

**प्राथमिक शिक्षण**

प्राथमिक शिक्षणाविषयी विचार केवळ बाराखड्या शिकवणे म्हणजे शिक्षण नव्हे. तर मुलांची मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षण शाळांनी दिले पाहिजेत काहा सूक्ष्म विचार बाबासाहेबांनी प्राथमिक शिक्षणाबाबत केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते ,प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा राष्ट्रीयदृष्टीनं अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सार्वात्रीकीकरानासाठी सक्तीचा कायदा केला पाहिजे.

**उच्च शिक्षणाविषयी विचार**

जे व्यक्तीसमूह बौद्धिकदृष्ट्या उच्च शिक्षणाचा महत्तम लाभ घेण्यास समर्थ आहेत पण आर्थिक स्थिती योग्य नाही म्हणून किंवा अडचणी आहेत म्हणून असे वर्ग या शिक्षणाच्या लाभापासून वंचित आहेत. त्यांना उच्च शिक्षणाच्या सुविधा पुरविण्यासाठी विद्यापीठ ही प्राथमिक स्वरूपाची यंत्रणा होत असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर ते केवळ लिहिण्या-वाचण्याची ज्ञान पुरेसे वाटणार नाही. तर शिक्षणाच्या उच्च टोकापर्यंत पोहोचले पाहिजेत. म्हणजे त्यांच्याबरोबर वाटचाल करुन संपूर्ण समाजाचा दर्जा उंचावेल. मिलिंद महाविद्यालयाच्या शिलान्यास प्रकरणे बोलताना बाबासाहेब म्हणतात, हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नति करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते. पण हे चूक आहे, कारण हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न,वस्त्र, निवारा यांची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करण्यास भाग पाडणे नव्हे. खालच्या वर्गाची प्रगती मारून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण होणारा न्यूनगंड नाहीसा करणे हे खरे शिक्षणाचे ध्येय. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच एकमेव औषध आहे

**स्त्री शिक्षण**

स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे. स्त्रियांनी स्वच्छ राहण्यास शिकावे. तुमच्या मुलांना शिक्षण द्या. हळूहळू त्यांच्या मनात महत्त्वाकांक्षा जागृत करा. ते थोर पुरुष होणार आहेत असे त्यांच्या मनावर बिंबवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्ती विषयक कार्य हे केवळ उपेक्षित वंचित घटकातील स्त्रीयापुरतेच मर्यादित नव्हते. तर देशातील सर्व स्त्री वर्गाच्या उद्धाराचे कार्यत्यांनी घेतले होते. जाति, वर्ग विरहित स्त्री वर्गाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांनी वेळोवेळी आपल्या लिखाणातून भाषणातून व चळवळीतून विचार मांडलेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या आयुष्यात विद्यार्थिदशेपासून स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. कोलंबिया विद्यापीठातून उच्च शिक्षण घेत असताना आपल्या वडिलांचे स्नेही सुभेदार शिवनाथ जमीदार यांना ४ ऑगस्ट 1913 रोजी पाठविलेल्या पत्रात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्री स्वातंत्र्य व स्त्री शिक्षणा बद्दल असा उदात्त दृष्टिकोन स्पष्ट होतो या पत्रात ते लिहितातwe must how entirely give up the idea that parents give Janma to the child and not Karma they can mould the Destiny of their children and if we but follow this principle be sure that we shall soon see batter day and our progress will be greathly accelerated if mail is education is perceived side by side with female education the fruit of which you can very well see verified your own daughter.अर्थात आई बाबा आपल्या मुलाला जन्म देतात कर्म देत नाही असे त्यांचे म्हणणे ठीक नाही. आईबाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात. ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर घेऊन जर आपण मुलांच्या शिक्षणा बरोबरच मुलींच्या शिक्षणासाठी धडपड केली तर आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल. पुढे त्यांनी म्हटलं होतं.त्यांनी या पत्रात सेक्स पावरच्या नाटकातील खालील वचने उद्धृत केले होते. प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यात जेव्हा संधी ची लाट येते. तेव्हा तिचा योग्य प्रकारे उपयोग केला तर त्या मनुष्याचा वैभव प्राप्त होते. डॉ. आंबेडकर यांनी सांगितलेला हा शोषण मुक्तीचा मार्ग जणू समाजवादी तत्त्वज्ञान आणि ज्ञानाचे नवे रूप आहे यातून मुलांच्या बरोबरीने मुलींनी शिकावे असा त्यांचा प्रयास होता किंवा दिसतो

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या संविधानात केलेल्या शैक्षणिक तरतुदी**

28-1 नुसार राज्याच्या पैशातून चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही विवक्षित शैक्षणिक संस्थान धार्मिक शिक्षणात व धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य आहे.

29-2 राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीतून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म,वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही. तिचे धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापनेच्या व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल तीच दोन सेक्शन एक संस्थांना साहाय्य देताना राज्य एखादी शैक्षणिक संस्था आहे धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या एखाद्या वर्गाच्या व्यवस्थापनाखाली आहे या निकषावर तिला प्रतिकूल होइल अशा प्रकारे भेदभाव करणार नाही.

21 राज्य हे सहा वर्षापासून ते 14 वर्षांपर्यंतच्या मुलांना कायद्याने ठरविल्यानुसार शिक्षण देणे 41 राज्य हे आपली आर्थिक समता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा शिक्षणाचा हक्क आणि बेकारी वार्धक्य आजार व विकलांगता यांनी पीडित अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाट्याला आले आहे अशा अन्य व्यक्तींच्या बाबतीत लोकसाहित्याचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करेल

45 राज्य हे बालकांचे वय सहा वर्षाचे होईपर्यंत त्यांचे संगोपन करण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी तरतूद करेल 46 राज्य जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषता अनुसूचित जाती अनुसूचित जनजाति यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे रक्षण करेल 51 जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने आपल्या पद्धत वापरल्यास त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते 14 वर्ष पर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे

350-प्रत्येक राज्य आणि राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकारी भाषिक अल्पसंख्यांक समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर भाषेत मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील आणि अशा सोयी पुरवणे शक्य व्हावे यासाठी राष्ट्रपती असताना आवश्यक किंवा योग्य वाटतील असे निर्देश कोणत्याही राज्याला देऊ शकेल.

**निष्कर्ष**

शिक्षण हेच खऱ्या अर्थाने जीवनाच्या प्रगतीकरिता महत्वाची बाब आहे. स्त्री-पुरुष समानता हे गुण डॉ. बाबासाहेबांचे शैक्षणिक विचारातून प्रकर्षाने जाणवतात. शैक्षणिक विकास करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य,हक्क आहे. हे या विचारातून दिसून येत असे. शिक्षणातील विषमता आर्थिक विषमता या विचारातून कमी होऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फक्त एका जातीतील स्त्रीचा विचार केला नाही तर संपूर्ण जातीधर्मातील स्त्रिया करता. यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य केले. डॉ. आंबेडकरांची भारताच्या भवितव्यावर प्रखर निष्ठा होती. परिस्थिती अनुकूल असेल तर या जगातील कोणतीही शक्ती भारताला एकात्म होण्यापासून प्रतिपादित करू शकणार नाही. असा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दृढ विश्वास होता. यामध्ये डॉ. बाबासाहेबांचे शैक्षणिक विचार दिसून येतात.

**संदर्भ**

१. शिक्षणप्रेमी बाबासाहेब http:// maharastratimes.com
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर-विकीपिडियाhttp://mr.n.wikipedia.org
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन http://ijcrt.org
४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षण व्यवस्थेबाबत नवा दृष्टीकोनhttp://chitrakshare.com
५. डॉ.बाबासाहेबांचे शिक्षणातील योगदानhttp://www.mahamtb.com
६. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच शिक्षण आणि शाहू महाराजhttp://www.maxmharashtra.com

# महिलाओं के मुक्तिदाता डॉ. बाबासाहब आम्बेडकर

**डॉ. बालिका रामराव कांबले**
अधिव्याख्याता
श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा, जि. लातूर

14 अप्रैल पूरे देश में ही नहीं बल्कि पूरी दुनिया में बड़े ही उत्साह व जुनून से मनाया जाता है। दक्षिण भारत से लेकर उत्तर भारत तक और पश्चिम भारत से पूर्वी भारत में डॉ. अंबेडकर जयंती की रौनक देखते ही बनती है। डॉ. अम्बेडकर के कार्यों व चिंतन के बारे में बात करें तो अक्सर बात दलित वर्गों तक आकर, यहाँ तक की बात आरक्षण पर आ कर रुक जाती है। आज़ाद भारत में डॉ. अम्बेडकर को दलितों का मसीहा कहा जाता है। जबकि डॉ. अम्बेडकर के समस्त कार्यो का मूल्यांकन करे तो हम पाएंगे कि वे एक कुशल अर्थशास्त्री, समाजवैज्ञानिक, कानून विशेषज्ञ, मजदूर नेता थे, पत्रकारिता में प्रखर विद्वान् और महिलाओ के अधिकार के चैम्पियन थे। उनके पहले महिलाओं से संबन्धित उन तमाम अधिकार उन्हें प्राप्त नहीं थे जो आज कानून के दम पर मिल रहा है। इसका श्रेय उन्हीं को जाता है। बाबासाहेब ने सविंधान के द्वारा महिलाओं को सारे अधिकार दिए है जो मनुस्मृति ने नकारे थे। हिन्दू धर्मशास्त्रों में महिलाओं का स्थान और नियम-कानून महिलाओं के हक में नहीं हैं। धार्मिक मान्यताओं के अनुसार स्त्री धन, विद्या और शक्ति की देवी हैं। लेकिन बाबा साहब ने इसे गलत सिद्ध करते हुए महिला विषयक कानून बनाए।

बाबासाहब आम्बेडकर संविधान निर्माता के साथ साथ पूरे भारत तथा नारी समाज के मुक्तिदाता थे। बाबासाहब आम्बेडकरजी ने अपने जीवन का लक्ष्य समाज के अंतिम व्यक्ति के कल्याण को माना और ये करते हुए देश कैसे मज़बूत हो इस दिशा में काम किया। अगर हम आम्बेडकर के भारत राष्ट्र के लिए उनके योगदान को देखें तो वो बहुत ज़्यादा और बहुपक्षिय भी है।

हमारा समाज सदियों से मनुवादी संस्कृति से ग्रसित रहा है. मनुस्मृति काल में नारियों के अपमान और उनके साथ अन्याय की पराकाष्ठा थी। ऋग्वेद में बेटी के जन्म को दुखों की खान और पुत्र को आकाश की ज्योति माना गया है। ऋग्वेद में ही नारी के मनोरंजनकारी भोग्या रूप का वर्णन है। नियोग प्रथा को पवित्र कर्म माना गया है। अथर्ववेद में कहा गया है कि दुनिया की सब महिलाएं शूद्र हैं।मनु स्मृति में स्त्रियों को जड़, मूर्ख और कपटी स्वभाव का माना गया है और शूद्रों की भांति उन्हें अध्ययन से वंचित रखा गया। मनु ने कहा कि पत्नी, पुत्र और दास को संपत्ति अर्जन का अधिकार नहीं है। अगर ये संपत्ति अर्जित करें तो संपत्ति उसकी हो जाएगी, जिसके वे पत्नी, पुत्र या दास होंगे। बाबासाहेब ने संविधान के जरिए महिलाओं को वे अधिकार दिए जो मनुस्मृति ने नकारे थे। उन्होंने राजनीति और संविधान के जरिए भारतीय समाज में स्त्री-पुरुष के बीच असमानता की गहरी खाई पाटने का सार्थक प्रयास किया। जाति- लिंग और धर्मनिरपेक्ष संविधान में उन्होंने सामाजिक न्याय की कल्पना की है।

महिला सशक्तिकरण को लेकर अंबेडकर की जुनूनी लड़ाई की शुरूआत साल 1942 में शोषित वर्ग की महिलाओं के एक सम्मेलन में देखने को मिली थी, जब उन्होंने कहा था, 'किसी समुदाय की प्रगति महिलाओं की

प्रगति से आंकी जाती है।' उनके यही शब्द उन्हें नारीवाद का एक बड़ा नेता मानते है, जिसने जाति समस्या और महिला के अधिकारों को एक करके देखा।

उनका मानना था कि महिलाओं की स्थिति इसलिए बदहाल है क्योंकि वे सब जाति-प्रथा के जाल में फंसी हुई है। आजादी मिल जाने के बाद भी चिंता इस बात की थी कि आधी आबादी का क्या होगा। देश में जहां संविधान को बनाने में तीन साल से ज्यादा का समय लग गया था, वही महिला अधिकारों के लिए लड़ाई अभी भी बाकी थी| भारत सामाजिक व्यवस्था के तौर पर पितृसत्तात्मक है। महिला का स्थान पुरूष से नीचे हैं। बेटियों को हीन नज़र से देखा जाता है। हिन्दू धार्मिक ग्रंथों में स्त्रियों को हीन नजर से देखा और प्रस्तुत किया गया है। मनुस्मृति जैसी किताबों में महिलाओं को नीचे दर्जे का दिखाया गया है व सभी अधिकारों से वंचित किया गया।

आम्बेडकर ने महिला सशक्तिकरण के रूप में प्राचीन 'मनुस्मृति' का दहन किया। 5 फरवरी 1951 को डॉ. भीमराव आम्बेडकर ने संसद में 'हिंदू कोड बिल' पेश किया। इसका मकसद हिंदू महिलाओं को सामाजिक शोषण से आजाद कराना और पुरुषों के बराबर अधिकार दिलाना था। महिला सशक्तीकरण की दिशा में इस ऐतिहासिक कदम से आज शायद बहुत कम लड़कियां परिचित होंगी. इसी बिल में महिला सशक्तीकरण की असली व्याख्या है। वह केवल उपदेश देने में विश्वास नहीं रखते थे बल्कि उन्होंने हिंदू कोड बिल लाकर बेजोड़ मिसाल कायम की, जब यह बिल संसद में पेश किया गया तब इसे लेकर संसद के अंदर और बाहर विद्रोह मच गया| सनातनी धर्मावलम्बी से लेकर आर्य समाजी तक आम्बेडकर के विरोधी हो गए। संसद में जहां जनसंघ समेत कांग्रेस के हिंदूवादी इसका विरोध कर रहे थे तो वहीं संसद के बाहर हरिहरानन्द सरस्वती उर्फ करपात्री महाराज के नेतृत्व में बड़ा प्रदर्शन चल रहा था।

'हिंदू कोड बिल' के जरिए उन्होंने संवैधानिक स्तर से महिला हितों की रक्षा का प्रयास किया। हिंदू समाज में क्रांतिकारी सुधार लाने के लिए देश के पहले कानून मंत्री के रूप में आंबेडकर ने हिंदू कोड बिल लोकसभा में पेश किया। डॉ. अम्बेडकर एक प्रबुद्ध भारत का सपना देखते थे, अतः उन्होंने सविधान के पहले पन्ने पर यानी कि प्रस्तावना में सभी जातियों के स्त्री पुरुषों को बराबरी दी। स्त्री-पुरुष असमानता व छुआछूत की समाप्ति करके समानता की गारंटी दी। गरीब-अमीर, मजदूर-मालिक के बीच सामाजिक समानता का सूत्रपात किया। वर्ण, वर्ग, जाति, लिंग भेद रहित सभी को वोट देने का अधिकार दिया।

**इस बिल के मुख्यतया 4 अंग थे-**

- हिंदुओं में बहू विवाह की प्रथा को समाप्त करके केवल एक विवाह का प्रावधान, जो विधिसम्मत हो।
- महिलाओं को संपत्ति में अधिकार देना और गोद लेने का अधिकार देना।
- पुरुषों के समान नारियों को भी तलाक का अधिकार देना, हिंदू समाज में पहले पुरुष ही तलाक दे सकते थे।
- आधुनिक और प्रगतिशील विचारधारा के अनुरूप हिंदू समाज को एकीकृत करके उसे मजबूत करना।

यह बिल हिंदू स्त्रियों की उन्नति के लिए प्रस्तुत किया गया था। हिंदू विवाह अधिनियम, हिंदू उत्तराधिकार अधिनियम, हिंदू अल्पसंख्यक और संरक्षकता अधिनियम, और हिंदू दत्तक और रखरखाव अधिनियम 1952 और 1956 के बीच पारित किए गए थे।

बाबासाहब के इस्तीफा के बाद देश भर में हिंदू कोड बिल के पक्ष में बड़ी प्रतिक्रिया हुई। खास तौर से महिला संगठनों द्वारा. विदेशों में भी इसकी प्रतिक्रिया हुई। कुछ साल बाद 1955-56 हिंदू कोड बिल के अधिकांश प्राविधानों को निम्न भागों में संसद ने पारित किया। इसका श्रेय डॉ. आंबेडकर को ही जाता है।

इस बिल में स्त्रियों को तलाक लेने का अधिकार मिला क्योंकि हिंदू ग्रन्थों के अनुसार ऐसी मान्यता थी कि अगर महिला अपने घर से डोली पर निकलती है तो वापस उसकी अर्थी उठती है और विवाहित स्त्रियों का अपने पिता के घर वापस आना पाप माना जाता था। उनकी इस पहल से महिलाएं अब कानूनी रूप से मजबूत हो गई थी। एक पत्नी के होते हुए दूसरी शादी न करने का प्रावधान भी किया गया था। पुरूष चाहे तो कितनी ही शादी कर सकता था और ऐसी अवस्था में उसकी पहली पत्नी को प्रताड़ित किया जाता था। लेकिन इस कानून से स्त्रियों की दशा में सुधार हुआ।

महिलाओं को बच्चा गोद लेने का अधिकार  मिला और बाप-दादा की संपत्ति में भी हिस्से का अधिकार प्राप्त हुआ। इसके अलावा कई महत्वपूर्ण अधिकार जैसे – स्त्रियों को अपनी कमाई पर अधिकार और बेटी को उत्तराधिकार होने का। इसके अलावा अंतरजातीय विवाह करने का व अपना उत्तराधिकारी निश्चित करने की स्वतंत्रता भी दी गई।

आज के परिवेश में जहाँ महिला सुरक्षा के नामपर केवल खर्चे जाते है वहां बाबा साहब ने मेरे जैसी हर महिलाओं को सुरक्षा का अधिकार दिया, मैं शायद तब तक उन्हें दलितो का मसीहा या संविधान-निर्माता  मानती थी जब तक मैने उनके बारे मे पढ़ा नहीं था या यूँ कहें जब तक हिंदू कोड बिल के लिए उनकी लड़ाई व संघर्ष को नहीं पढ़ा था। यह सब पढ़ने से ही वो मेरे लिए नारिवादी हो गए जो महिलाओं के अधिकारों पर केवल लिखते या बोलते नहीं थे बल्कि इसके लिए उन्होनें लंबी लड़ाई भी लड़ी।

ये 'संविधान शिल्पी' के प्रयासों का परिणाम है कि भारतीय समाज में महिलाओं को अवसर प्राप्त हुए। वैसे अब भी कुछ सामाजिक रूढ़ियां महिलाओं के रास्ते की रुकावटें हैं। फिर भी मुझे और मेरे जैसी महिलाओं को अपने विचारों की अभिव्यक्ति की आजादी है तो सिर्फ बाबासाहब की वजह से ही मुमकिन हो पाई।

बाबा साहब ने दलित महिलाओं की प्रशंसा करते हुए कहा, 'महिलाओं में जागृति का अटूट विश्वास है। सामाजिक कुरीतियां नष्ट करने में महिलाओं का बड़ा योगदान हो सकता है। मैं अपने अनुभव से यह बता रहा हूं कि जब मैने दलित समाज का काम अपने हाथों में लिया था तभी मैने यह निश्चय किया था कि पुरूषों के साथ महिलाओं को भी आगे ले जाना चाहिए। महिला समाज ने जितनी मात्रा में प्रगति की है इसे मैं दलित समाज की प्रगति में गिनती करता हूँ'। डॉ. अम्बेडकर ने दलित महिलाओं से अपनी बच्चियों की शादी कम उम्र में ना करने की अपील करते हुए उनको शिक्षित कर अपने पैरों पर खड़ा होने पर बल दिया तथा कम बच्चे पैदा करने व साफ सफाई से रहने का सन्देश देते हुए महिलाओं का परिवारों में समानता का स्तर हो इस पर भी बात की। डॉ. अम्बेडकर चाहते थे कि भारतीय स्त्री खासकर, हिन्दू स्त्री जिसमें सवर्ण तथा दलित दोनों की समाजिक, आर्थिक, और राजनैतिक स्थिति में क्रांतिकारी परिवर्तन हो।

डॉ. अम्बेडकर की जयंती को दलित महिलाएं एक तरफ महिला के रूप में डॉ अम्बेडकर के महिलाओं के प्रति योगदान को याद करती हैं, वहीं दूसरा खेमा, जिसमें सवर्ण महिलाएं शामिल हैं, उनकी जयंती को नजरंदाज करती हैं। दलित महिलाएं डॉ. अम्बेडकर की जीवनी पढ़ कर उनके संघर्षो के साथ स्वयम् को जुड़ा देखती हैं। और

दलित स्वयम् को एक इंसान के रूप में अपने मानवीय हकों को पाने व भोगने के लिए डॉ. अम्बेडकर के योगदान को नहीं भूलते।

महिलाओं के अधिकारों के चैम्पियन डॉ.अम्बेडकर को याद न करने वाली महिलाओ के बारे में क्या कहा जाये? उनके शोध.. विमर्श और लेखन में डॉ. अम्बेडकर और उनकी विचारधारा कहीं दूर तक नहीं आते तभी तो नयी पीढ़ियां अब सवाल करने लगी हैं कि महिला आन्दोलन डॉ. आंबेडकर को क्यों नहीं जानता?

आज की युवा महिला वर्ग बाबा साहब को न के बराबर जानती हैं। जानती भी हैं तो सिर्फ साधारण महापुरुष की तरह। दलितों, पिछड़ों, महिलाओं के मुक्तिदाता के रूप में या संविधान निर्माता के रूप में नहीं। इन पक्षों के पीछे साजिश भी है और समर्थन भी है।

आजादी के इतने वर्ष बीत जाने के बाद राजनीति की दिशा और दशा दोनों एक निर्धारित परिपाटी पर चलने लगी हैं। धीरे-धीरे स्थितियाँ बदल रहीं हैं। भारत के राष्ट्रपिता कहे जाने वाले गांधी जी को लोग छोड़कर लोग बाबा साहब की तरफ भाग रहे हैं। सभी राजनीतिक पार्टियां बाबा साहब को साथ लेकर चलने को उत्सुक दिख रही हैं। वामपंथ व अन्य सभी दल इनकी ओर झुक रहे हैं। अक्सर कहा जाता था कि 21वीं सदी बाबा साहब की होगी। धीरे- धीरे वह सच होता दिखाई दे रहा है।

खैर चाहे जो भी सभी वर्ग की महिलाओं को बाबा साहब के कार्यों को न चाहते हुए भी उन्हें अपनाना पड़ेगा। समग्र महिला समाज बाबा साहब के अहसानों तले हमेशा दबा रहेगा। हमेशा उनके कार्यों का ऋणी रहेगा। अब समय है कि महिलाएं उनके कार्यों को आगे बढ़ाने का कार्य करें।

संदर्भ :-

(1) भीमराव आंबेडकर, 'हिन्दू नारीकाउत्थान और पतन',गौतम बुक सेंटर, दिल्ली - 2009

(2) मंजू सुमन, 'दलित महिलाएँ',सम्यक प्रकाशन, दिल्ली - 2004

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार

**डॉ. चंदन एम. बावलगावे**

इतिहास विभाग प्रमुख, संजीवनी महाविद्यालय, चापोली. ता. चाकूर जि. लातूर.

**प्रस्तावना**

शिक्षणाचे महत्त्व ज्याप्रमाणे महात्मा ज्योतिराव फुले यांनी जाणले होते तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ओळखले होते. शिक्षण घेत असताना त्यांना स्वतः जे अनुभव आले होते ते अतिशय वाईट होते. तसेच या गोष्टी पुढे घडू नयेत असे त्यांना वाटत असे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उच्च विद्याविभूषित असून ही अस्पृश्य वर्गातील आहेत म्हणून त्यांना शिक्षण घेत असताना व समाजामध्ये वावरत असताना पावलो पावली अपमान सहन करावा लागला होता. म्हणुनच पुढे त्यांनी शिक्षणाविषयी जागृती करण्यासाठी स्वतःला वाहून घेतलेले दिसते. त्यांच्या मते शिक्षण हे जागतिक परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्तीची विचार करण्याची प्रवृत्ती प्रगल्भ होते. व्यक्ती आपल्या हिताच्या दृष्टीने विचार करू लागतो. समाजाची सर्वात महत्त्वाची गरज म्हणजे शिक्षण होय असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना वाटत असे. व्यक्ती विकासाचे समाज विकासाचे आणि राष्ट्र विकासाचे एक प्रभावशाली साधन म्हणजे शिक्षण. म्हणूनच जीवनात सर्वात महत्त्वाचे स्थान त्यांनी शिक्षणाला दिल्याचे दिसून येते. मानवाला मानव म्हणून जगण्यास समर्थ बनवणारी गोष्ट कुठली असेल तर ते शिक्षण होय. शिक्षण हे व्यक्तीचा मानसिक, बौद्धिक विकास घडवून आणते व मनुष्याची सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करते. शिक्षणातून व्यक्तीचा आर्थिक विकास होतो व राजकीय स्वातंत्र्य मिळण्याचे शिक्षण हे एक शस्त्र आहे असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो पीईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही अशा शब्दात आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितलेले दिसते. हेच शिक्षण सर्वसामान्य लोकांपर्यंत, अस्पृश्यांपर्यंत, महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सिद्धार्थ कॉलेज सुरू केले. औरंगाबाद मध्ये मिलिंद महाविद्यालयाची सुरुवात केली. डॉक्टर आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा महाविद्यालय वस्तीग्रह सुरू करून त्यांच्यामध्ये शैक्षणिक जागृती करण्यासाठी अतिशय महत्त्वाचे कार्य केल्याचे दिसून येते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्राथमिक शिक्षण विषयक विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणाचे महत्व स्पष्टपणे मांडलेले होते. त्यांच्या मते काही ठराविक वयाच्या मर्यादेपर्यंत निदान वयाच्या बारा वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. लोकांच्या मर्जीनुसार हा प्रश्न सोडवायचा म्हटल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास अनेक शतके लागतील. शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करणे आवश्यक आहे. जगातील विकसित देशांनी सक्तीचा कायदा करून लोकांची निरक्षरता हद्दपार केली असे आपणास दिसून येत आहे. जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात त्यांच्यावर शिक्षणाची अर्थातच सक्ती करावी लागत नाही. ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही व जे त्या बाबतीत उदासीन असतात त्यांच्या करताच कायद्याची आवश्यकता असते.

प्राथमिक शिक्षणासाठी सक्तीचा कायदा करावा. स्कूल बोर्डाच्या हातातून शिक्षण खाते काढून घ्यावे.

आश्रमशाळांमध्ये शिक्षण प्रसार करण्यासाठी शिष्यवृत्ती देणे, विद्यार्थी वस्तीग्रह चालू ठेवणे, सरकारी नोकरीत अस्पृश्यांची भरपूर प्रमाणात भरती करणे असा विचार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. त्यांच्या मते ज्या लोकांना देण्याचे सामर्थ्य आहे त्यांच्याकडून सरकारने फी घ्यावी व जे आर्थिक दृष्ट्या मागासलेले आहेत त्यांना फी माफीची आवश्यकता आहे. यातून सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यास मदत होणार आहे. त्यांच्या विशिष्ट रचनेमुळे शैक्षणिक प्रसार होण्यास मदत होईल. प्रचार व शिक्षण हे लोकल बोर्ड व त्यांच्याकडे देऊ नये कुणीही शहाणा माणूस हल्लीच्या परिस्थितीवरून म्हणणार नाही की प्राथमिक शिक्षणाच्या कार्याला कौन्सिल पेक्षा लोकल बोर्ड व मनुष्य जास्त लायक आहेत. कारण त्यातील सभासद अधिच अडाणी असतात, त्यांना शिक्षणाचे महत्त्व व दृष्टी नसते, तसेच हे लोकल बोर्ड म्हणजे वर्णाश्रम वाद्यांचे अड्डे आहेत कारण त्यांच्यात भरणा होणार तो ब्राह्मण ग्रस्त जनतेचा होणार. असे लोक अस्पृश्य जनतेची, शिक्षणाची काळजी घेतील हे कशावरून सांगता येईल. असा प्रश्न आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी उपस्थित केलेला दिसतो. यावरून शिक्षण व्यवस्था सरकारने केली पाहिजे. सरकारने स्वतःची जबाबदारी इतर संस्थावर देऊ नये असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना वाटत असे.

**दलित व अस्पृश्यांच्या शिक्षणाविषयीचे विचार**

वेगवेगळया सुधारकांनी वेगवेगळया पद्धतीने व वेगवेगळया दृष्टीकोनातून शिक्षणाविषयी विचार मांडलेले दिसतात. परंतु सर्वांचा उद्देश एकच असलेला दिसून येतो तो म्हणजे मनुष्यप्राण्यात जगण्यासाठी जितकी अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजांची आवश्यकता असते तितकीच महत्त्वाची गरज म्हणजे शिक्षणाची. अस्पृश्यांची अवस्था अत्यंत बिकट होती. त्यांना या देशात बिकट वाटणाऱ्या परिस्थितीतून बाहेर काढण्याचे एकच साधन आहे आणि ते म्हणजे शिक्षण होय. दलित व अस्पृश्य समाजामध्ये अत्यंत निकडीची गरज जर कोणती असेल तर ते म्हणजे शिक्षण होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीने किंवा संस्थांनीही शिक्षणाच्या बाबतीत आपल्या तरुण पिढीचे पाऊल पुढे कसे पडेल या प्रश्नाकडे आपले लक्ष पुरविले पाहिजे व त्या अनुरोधाने आपल्या कार्याची दिशा ठरवली पाहिजे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे सामुदायिक शिक्षणाच्या आग्रही होते. त्यांना एकाच विचाराने प्रेरित झालेल्या लोकांचा समूह अपेक्षित होता. अशीच माणसे शिक्षणातून ध्येयाकडे यशस्वीरित्या वाटचाल करू शकतील. त्यासाठी माणसाचा समुदाय आवश्यक आहे. जर प्रत्येकासमोर अनेक अडचणी असतील तर तो समुदाय कधीच यशस्वी होऊ शकत नाही असे त्यांचे मत होते. प्राचीन काळी पारंपारिक धर्म तत्वज्ञान प्रेरित हिंदू समाजात शिक्षणव्यवस्थेत वर्ण परत्वे शिक्षण घेतले जात असे. परंतु तेथे अस्पृश्य वर्गाला मात्र शिक्षण घेण्यास बंदी होती. हीच प्रथा पुढे कायम राहिली. तत्कालीन वेदांचे अथवा अन्य प्रकारचे शिक्षण घेण्यास त्यांना मनाई होती. त्यांना प्रचंड शिक्षा दिल्या जात. म्हणूनच हा फार मोठा अन्याय घडला असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. पारंपरिक हिंदू तत्त्वप्रणालीने सर्व अस्पृश्यांवर गुलामगिरीची हजारो वर्षे लादली आहेत. वेदांचे गुलाम त्यांना केले आहे. बुद्धीला, विचाराला, अर्थ स्वातंत्र्याला, मानसिक स्वातंत्र्याला, समग्र स्वातंत्र्याला विरोध केला आहे. समता, बंधुता प्रज्ञा, करूणा आणि समान न्याय नाकारला आहे. त्यामुळेच ब्राम्हणेतरांना व अस्पृश्यांना शैक्षणिक गोडी नाही. ती वाटावी म्हणून ब्रिटिश सरकारने प्राथमिक शिक्षणाचा प्रचार, प्रसार बहुजनात जोरात करावा असा आग्रह डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी धरलेला होता. भारतासारख्या लोकशाही देशात कुणीही कुणाचे गुलाम नाही किंवा नोकर नाही. बहुजन समाजाने स्वतःचा स्वतः उद्धार करून घ्यावयास हवा. हे शिक्षणानेच साध्य होऊ शकते. गुलामाला गुलामीची जाणीव करून दिल्यास तो अन्यायाविरुद्ध पेटून उठल्याशिवाय राहणार नाही. सर्व प्रकारच्या

विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग आहे असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणत असत. सर्व दुःखाचे व समस्यांचे कारण अज्ञान आहे. यावर एकमेव प्रभावी औषध शिक्षण होऊ शकते. म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता की जाती प्रतिशा तटबंदीवर उघड उघड हल्ला करण्यासाठी अस्पृश्यांनी शिक्षण घेतलेच पाहिजे डुकरासारखे आपले पोट भरण्यासाठी जगू नका परंतु संस्कृतीत विकासासाठी मानवी प्राणी म्हणून जगा.

**स्त्री शिक्षण विषयक विचार**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या शिक्षणाविषयी आग्रह धरलेला होता. त्यांनी अनेक सभा संमेलनांमधून, आपल्या लिखाणातून त्याचबरोबर हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्री पुरुष समानता आणि स्त्रीयांच्या शिक्षणावर भर दिलेला दिसून येतो. स्त्रीया कुटुंबाचा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणूनच पुरुषापेक्षा स्त्री शिक्षण कुटुंब शिक्षित करण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. याविषयी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मते ज्या घरातील स्त्री सुशिक्षित आहे ते घर सुशिक्षित होते. मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देत असतानाच मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नका. परंतु तत्कालीन परिस्थिती मात्र याउलट होती. खेड्यातील समाज मुलासोबत मुलीस शाळेत पाठविण्यास तयार नव्हता. सुरुवातीला स्त्रीशिक्षणाची सुरुवात जोमाने करण्यासाठी मुलींच्या शाळा खेड्याचा असल्या पाहिजे असे आंबेडकरांचे मत होते. शहरांमधून थोड्याफार प्रमाणात मुलींच्या शिक्षणाला विरोध होत होता पण खेड्यातील ब्राह्मण समाज सनातनी हिंदू धर्मास चिकटून राहिलेला असल्यामुळे शिवाशिव त्यांना मुळीच जमतच नाही. अशा लोकांची सावली जरी त्यांच्यावर पडली तर विटाळ झाला असे समजून ते स्नान करून शुद्ध होत. अशा परिस्थितीत ते खेड्यातील मुलींना शिकू देणार नाहीत. यासाठीच त्यांच्या स्वतंत्र शाळेची आवश्यकता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केले होती.

भारतातील कुटुंब पद्धती मध्ये कुटुंबाची आर्थिक जबाबदारी जरी पुरुष पार पडत असला तरी इतर सर्व जबाबदारी ही प्रमुख्याने स्त्रीची असते. स्त्रियांच्या वर्तणुकीवर राजकारणावरच घराचा दर्जा ठरत असतो. कुटुंबाची जबाबदारी एकंदरीत व्यवस्थित पार पाडण्यात स्त्रीची भूमिका महत्त्वपूर्ण असते. मुलांची पहिली शिक्षिका आई असते. त्यासाठी मुलांबरोबरच मुलींचे शिक्षण अतिशय महत्त्वपूर्ण आहे मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कोणत्याही समाजातील स्त्रीचा दर्जा हा त्या समाजाच्या सुधारण्याचा मापदंड असतो असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. आपली मुले आपल्यापेक्षा चांगल्या परिस्थितीत राहण्यासाठी मुलींचे शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांचे काम फक्त चूल आणि मूल यापुरतेच मर्यादित राहू नये. त्यांनी शिक्षण घेऊन सामाजिक कार्यात ही भाग घेतला पाहिजे. समाज प्रगतीत त्यांचा वाटा महत्त्वाचा आहे. घर सोडून बाहेर निघण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला मिळाले पाहिजे. समाजाचा एक घटक म्हणून स्त्रीसाठी समाजाने काही देणे लागते. म्हणूनच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, स्त्री शिक्षणाची समाज उन्नती करिता आवश्यकता आहे. स्त्रियांनी पुरुषाबरोबर सार्वजनिक आयुष्यात उतरले पाहिजे केवळ पुरुष वर्ग पुढे जाऊन स्त्रिया मागे राहिल्या तर कुठल्याही समाजाची प्रगती होणार नाही.

**उच्च शिक्षणाची आवश्यकता**

भारतातील अस्पृश्य वर्गाच्या अन्न वस्त्र व निवारा यांची सोय करून पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे म्हणजे दलित किंवा अस्पृश्य समाजाची उन्नती करणे होय असे नाही. अस्पृश्य वर्गाची प्रगति का

खुंटली, त्यांना का गुलाम व्हावे लागले याचा विचार होऊन त्यांच्यातील न्यूनगंड नाहीसा करणे गरजेचे आहे. तत्कालीन समाज पद्धतीमुळे त्यांच्या जीवन पद्धतीवर घाला घालण्यात आलेला आहे. त्याचबरोबर या वर्गाच्या व राष्ट्राच्या दृष्टीने आणि त्यांच्या स्वतःच्या दृष्टीने काय महत्त्व आहे याचीही त्यांना जाणीव करून देणे हाच मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. आणि याचे एकमेव उत्तर म्हणजे त्यांच्यातील उच्च शिक्षणाची गरज होय. दलित आणि अस्पृश्य वर्गामध्ये उच्चशिक्षण याचा प्रसार करणे गरजेचे आहे. उच्च शिक्षणाचा प्रसाराखेरीज दुसऱ्या कुठल्याच गोष्टीने हे साध्य होणार नाही. कारण सर्व सामाजिक दुखण्यावर उच्चशिक्षण हेच औषध आहे असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

**निष्कर्ष**

भारतात अनेक समाज सुधारक आणि विचारवंतांनी शिक्षण विषयक जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी कृतिशील कार्यक्रम ही आखलेला आपण पाहतो. तशाच पद्धतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी देखील शिक्षणाचे महत्व ओळखून सर्वसामान्य गरीब, दलित, अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणासाठी खूप प्रयत्न केलेले दिसून येतात. शिक्षणामुळे केवळ ज्ञानातच भर पडते असे नाही तर मानवाच्या व्यक्तिमत्व विकासासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. व्यक्ती विकासाचे, समाज विकासाचे आणि राष्ट्र विकासाचे एक प्रभावशाली साधन म्हणजे शिक्षण. म्हणूनच जीवनात सर्वात महत्त्वाचे स्थान त्यांनी शिक्षणाला दिल्याचे दिसून येते. मानवाला मानव म्हणून जगण्यास समर्थ बनवणारी गोष्ट कुठली असेल तर ते शिक्षण होय. शिक्षण हे व्यक्तीचा मानसिक, बौद्धिक विकास घडवून आणते व मनुष्याची सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करते. हे ओळखूनच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षण तसेच स्त्री शिक्षणावर मोठा भर दिलेला दिसून येतो. त्याचबरोबर समाजातील जो दलित आणि अस्पृश्य वर्ग आहे या वर्गाला जोपर्यंत शिक्षण मिळणार नाही. तोपर्यंत हा वर्ग पुढे येणार नाही आणि जोपर्यंत हा वर्ग समाजामध्ये मागे राहील तोपर्यंत समाजाची प्रगती होणे हे शक्य नाही असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते म्हणूनच त्यांनी सर्व समाजाच्या सर्वांगीण शिक्षणाचा विचार मांडलेला दिसून येतो.

**संदर्भ**


१) डॉ. कठारे अनिल, महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

२) हनवते प्रकाश उत्तम, डॉ. खडसे यशवंत, संपादक, इतिहासकार डॉक्टर बी. आर. आंबेडकर, अरुणा प्रकाशन, लातूर.

३) कांबळे जे. टी., डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान एक चिकित्सक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.

४) डॉ जाधव एस. जी., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती पुस्तकालय, नांदेड.

५) डॉ. सिंगारे अनिल डॉ. घुले विठ्ठल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातूर.

६) डॉ. गायकवाड विलास आबा, आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाजसुधारकांचे योगदान, दयाधन पब्लिशर्स ग्रुप, अकोला.

७) डॉ. कठारे अनिल, भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

# स्त्रियांचे मुक्तिदाते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर

श्रीमती लगडे वर्षा वसंतराव
यशवंत विद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

स्त्रियांना शिक्षित करणे, त्यांना जागृत करणे व माणुसकीचे जीवन प्रदान करणे हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे ध्येय होते. ज्या हक्कापासून स्त्री वंचित होती ते सर्व अधिकार स्त्रियांना मिळावे ह्या ध्येयाने त्यांनी अथक प्रयत्न केले. स्त्रियांना मूलभूत हक्क प्रदान करून, त्यांच्या उन्नतीचे सर्व मार्ग त्यांनी मोकळे केले. डॉक्टर आंबेडकर यांनी केवळ अस्पृश्य स्त्रियांमध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला असे नाही, तर भारतातील समस्त स्त्रियांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला. डॉक्टर आंबेडकर यांनी शेकडो वर्षांपासून होणारी स्त्रीची विटंबना थांबवून त्यांच्यात स्वाभिमान व विश्वास जागृत केला, समाजात ताठ मानेने जगण्याचे सामर्थ्य बहाल केले. माणुसकीला पारख्या झालेल्या स्त्रीवर्गाला माणूस म्हणून जगण्याची संधी मिळवून दिली. प्राचीन काळापासून ज्या स्त्री वर्गाच्या उत्थानाचा साधा विचारही कुणाला शिवला नाही ते कार्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

बाबासाहेबांनी भारताला संविधान दिले, भारताची लोकशाही सुदृढ आणि सक्षम केली. समाजातील दुर्बल घटक, महिला, अल्पसंख्याक यांना न्याय दिला, त्यांना प्रगती व विकासाच्या समान संधी उपलब्ध करून दिल्या. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे बहुआयामी व्यक्तिमत्व आहेत. ते ज्ञानमार्गी अर्थतज्ञ, समाजसुधारक, अर्थप्रकाशक, शिक्षणतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, राजकीय मुत्सद्दी, कायदामंत्री, संविधानाचे प्रमुख शिल्पकार, भाषावार प्रांतरचनेचे विश्लेषक तसेच बौद्ध धम्मचक्र प्रवर्तक आहेत. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेवरच हा देश पुढे जाईल हे प्रत्येक नागरिकाच्या मनात बिंबवणे गरजेचे आहे. संविधानाच्या माध्यमाने धर्मभेद, वंशभेद, लिंगभेद, जातीभेद, भाषाभेद या भेदाभेदांच्या चक्रव्यूहातून आपण सारे बाहेर पडू शकतो. त्यामुळेच समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय यावर आधारित हे गणराज्य घडवणे शक्य होईल.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणाचे धोरण महिलांच्या सर्वांगीण विकासाकरिता अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांनी महिलांना समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे व त्या सक्षम व समर्थ व्हाव्यात याकरिता कृती कार्यक्रमाची रचना केली. भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांनी स्त्री मुक्तीचा मार्ग अधोरेखित केला.

मनुस्मृती मध्ये स्त्रियां विषयीचे एक सुभाषित आहे,

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।**
**यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः।।**

म्हणजेच, जेथे नारीची पूजा केली जाते तेथे देवता रममान होतात आणि जेथे तिची पूजा केली जात नाही तेथील सर्व क्रिया निष्फळ ठरतात.

तर दुसरीकडे असे म्हटले आहे,

**पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने।**
**रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति।।**

अर्थात, पिता स्त्रीचे लहानपणी रक्षण करतात, भाऊ तिचे तारूण्यात रक्षण करतो, म्हातारपणी मुले रक्षण करतात, स्त्री स्वातंत्र्य प्राप्त करू शकत नाही. एकेठिकाणी असेही म्हटले आहे,

**अस्वतन्त्राः स्त्रियः कार्याः पुरुषैः स्वैर्दिवानिशम् ।**
**विषयेषु न सज्जन्त्यः संस्थाप्या आत्मनो वशे।।**

स्त्रियांच्या कुठल्याही निर्णयाचा अधिकार पुरुषांनाच दिलेला असतो. स्त्रियांना भोगाची वस्तू, रक्षण करण्याची वस्तू, स्त्री म्हणजे दुसऱ्यांनी जबाबदारी घेऊन जतन करण्यास पात्र आहे, अशाच प्रकारची स्त्रीविषयक धारणा शतकानुशतके चालत आलेली आहे.

आजही आपण पाहतो महिला दिन साजरा करत असताना स्त्रियांचे त्या दिवशीच उदात्तीकरण केले जाते. म्हणजेच भारतीय समाजात स्त्रियांच्या सामाजिक दर्जा संबंधात कमालीचा विरोधाभास आढळतो. एका बाजूला स्त्रियांचे धर्माधिष्ठित गौरवीकरण (जे काल्पनिक आहे) ते करायचे, तर दुसऱ्या बाजूला समाजात प्रत्यक्षात टोकाचे दुय्यम स्थान, शोषण.एका बाजूला स्त्री-प्रतिष्ठा हा समाजाच्या श्रेष्ठत्वाचा पुस्तकी निकष तर दुसऱ्या बाजूस सामाजिक स्तरीकरणात शेवटचे स्थान!

भारतीय समाज मुख्यतः पुरुषप्रधान राहिला आहे अर्थात केरळमधील नायर, मंगरूळ मधील शेट्टी बंगाली समाज व काही भटक्या जमाती मध्ये स्त्रीप्रधानतेचे प्रमाण दिसते परंतु सर्वसामान्यपणे विचार करताना भारतीय समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान असल्याचे प्रकर्षाने जाणवते. त्याचप्रमाणे अनेक रूढी, परंपरा यामुळे स्त्रियांवर अन्याय, शोषण, सामाजिक विभक्तीकरण झाल्याचे दिसते. स्त्रियांना सार्वजनिक जीवनातील सहभाग नाकारण्यात आला. या पार्श्वभूमीवर भारतात स्त्रियांची भूमिका, त्यांचे शोषण, न्याय्य अधिकार यावर आधारित चळवळी व संघटना उभ्या राहिल्या. भारतातील स्त्री चळवळीचे तीन टप्पे करता येतील पहिला टप्पा (1830 ते 1915), दुसरा टप्पा (1915 ते 1947), तिसरा टप्पा (1947 पासून पुढे).

यापैकी पहिल्या टप्प्यात महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी मोठ्या प्रमाणावर स्त्री व दलित उद्धाराचे कार्य केले. फुले दांपत्याने सर्वच स्त्रियांच्या मुक्तीची दारे खुली करण्याचे काम केले. एखादी गोष्ट करू नये किंवा चुकीची आहे असे म्हणताना त्यांनी त्याबाबत पर्याय देखील उपलब्ध करून दिले. अनेक प्रकारच्या अनिष्ट रूढींचा नायनाट करण्याचे आजीवन प्रयत्न या दाम्पत्याने केलेले दिसतात. तसेच इतरही समाजसुधारकांनी स्त्री विषयक कार्य केलेले दिसते त्यात ईश्वरचंद्र विद्यासागर, वीरेशलिंगम पंतुलु, पंडिता रमाबाई, राजा राममोहन रॉय, धोंडो केशव कर्वे,सुब्बलक्ष्मी इत्यादी होत. मात्र ते फुले दांपत्याइतके तळागाळातील लोकांच्या जीवनाशी समरस होऊ शकले नाहीत.

दुसऱ्या टप्प्यात भारत महिला परिषद, भारत स्त्री महामंडळ, विमेन्स इंडियन असोसिएशन(WIA), नॅशनल कौन्सिल ऑफ विमेन फॉर इंडिया, ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स(AIWC)या संघटनांचा उदय झाला. या संघटित चळवळीद्वारे स्त्रियांना मतदानाचा अधिकार, बालविवाह प्रतिबंधक कायदा,स्त्रियांना मर्यादित प्रमाणात मालमत्तेचा हक्क यासारखे विषय छेडले गेले व समाजात महत्त्वपूर्ण बदल झाले.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळीचे पुन्हा तीन टप्पे करता येतील 1947 ते 1970 च्या दशकापर्यंत राष्ट्रबांधणीच्या कार्याला प्राधान्य दिले गेले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात अंतर्भूत केलेले मूलभूत हक्क व राज्याची मार्गदर्शक तत्वे यामध्ये स्त्रियांचे हक्क व अधिकार यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला, पण या तरतुदींतील अंमलबजावणीच्या अपयशामुळे 1970च्या दशकात स्त्री-चळवळीचा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दुसरा टप्पा सुरू झाला. या टप्प्यात असमान वेतन, स्त्रियांचे 'अकुशल' कामगारांत वर्गीकरण, विनामोबदला श्रम, सामाजिक संस्थांमधील(जात, धर्म, वर्ग, कुटुंब इत्यादी) सत्तेच्या संरचनेतील पुरुषी वर्चस्व या समस्यांवर भर होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील 21 व्या शतकातील टप्प्यामध्ये स्त्री चळवळ स्त्री-पुरुष समानतेच्या पलीकडे जाऊन स्त्रियांची वैयक्तिक जीवन ठरविण्याची सत्ता व त्यांचे सक्षमीकरण यासारख्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला गेला. भारतात स्त्री चळवळीचा एक प्रवाह वरील आढाव्यावरुन स्पष्ट होतो. आजही अनेक गंभीर स्त्री-समस्या भारतीय समाजासमोर उभ्या आहेत. रुढी-परंपरांचा पगडा, प्रत्येक धर्मातील खाजगी जीवन नियंत्रित करणारे धार्मिक कायदे (धर्मशास्त्र, शरिया इत्यादी) विपरीत स्त्री-पुरुष प्रमाण (933:1000), समान नागरी कायद्याचा अभाव,कौटुंबिक

हिंसा, हुंडाबळी, बलात्काराच्या घटना, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न यासारख्या समस्यांना स्त्री समाजाला आजही तोंड द्यावे लागते. वेगवेगळया वर्गातील, जाती-जमातीमधील, प्रदेशातील स्त्री-समस्यांचे स्वरूप वेगवेगळे आहे. शहरी स्त्रियांच्या समस्या, ग्रामीण व शेतमजूर असणाऱ्या स्त्रियांच्या समस्या, भटक्या व आदिवासी समाजातील स्त्रियांच्या समस्या अशा कितीतरी स्त्रीविषयक समस्या आजच्या काळात ही दिसून येतात.

भारतातील जातिभेद आणि स्त्रियांचे प्रश्न ह्या वेगवेगळया सामाजिक समस्या आहेत असं सर्वसाधारणपणे मानलं जातं. बहुतेक सवर्ण समाजसुधारकांनी विचारवंतांनी या विषयांची स्वतंत्रपणे मांडणी केली आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र या समस्यांचा एकत्रितपणे विचार केला आहे. भारतातील स्त्रियांच्या समस्या जातीव्यवस्थेशीही संबंधित आहेत. स्त्री-समस्या संपूर्ण जगात आहे पण जात प्रथा संपूर्ण जगात नाही हे भारतीय परिस्थितीचे वेगळेपण आहे.

भारतीय समाज व्यवस्था पुरुषप्रधान आहे. म्हणूनच अशा समाजात पुरुषाचे प्राबल्य असते स्त्रीचे स्थान त्याच्याखाली आहे. मुलीकडे कनिष्ठतेने पाहिले जाते. हिंदू धार्मिक ग्रंथ, कथा, म्हणी आणि वाक्प्रचार यामध्येही मुलींचे वर्णन एक ओझे म्हणून केले गेले. मुलगी म्हणजे परक्याचे धन आणि स्त्री म्हणजे नरकाचे द्वार अशी समजूत कशी निर्माण झाली असेल? असं नक्कीच म्हणता येईल की हे सगळं स्त्रियांचे शोषण करण्यासाठीच निर्माण करण्यात आलं. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जातीपाती आणि स्त्रियांच्या समस्या यांचा पहिल्यांदाच एकत्रितपणे अभ्यास करून जगापुढे मांडला. त्यांनी कोलंबिया विद्यापीठात 1916 मध्ये 'भारतातील जाती-संरचना मूळ आणि विकास' या शीर्षकाचा एक शोधनिबंध सादर केला यामध्ये त्यांनी दाखवून दिले की जातीचे मूळ वैशिष्ट्य म्हणजे स्वतःच्या जातीमध्ये लग्न करणे 'सजातीय विवाह'. येथे कोणीही स्वतःच्या मर्जीने लग्न करू शकत नाही. त्याला समाजमान्यताही नाही. म्हणून सनातन परंपरेनुसार प्रेमावरही बंदी आहे. या शोधनिबंधात बाबासाहेब पुढे लिहितात की, ऐतिहासिकदृष्ट्या आणि परंपरेत भारताचा 'अनुलोम संबंध' समाजमान्य आहेतच. म्हणजेच तथाकथित उच्च जातीचा पुरुष खालच्या जातीच्या स्त्रीशी विवाहबाह्य शारीरिक संबंध ठेवत आला आहे.ही समाजमान्य प्रथा आहे पण, प्रतिलोम संबंधांना परवानगी नाही, म्हणजे उच्च जातीच्या स्त्रीला स्वतः पेक्षा कमी जातीच्या पुरुषाशी शारीरिक संबंध ठेवता येत नाही. तसे करणे पाप आहे.

भारतातील स्त्रियांच्या समस्या जसे की सतीप्रथा, बालविवाह, विधवाविवाहावर बंदी, ऑनर किलिंग, दुय्यम वागणूक इत्यादी सर्व कुप्रथा यामधून निर्माण झाल्या. यापैकी अनेक कुप्रथा अजूनही भारतीय हिंदू समाजात चालू आहेत.

बाबासाहेबांचे स्पष्टीकरण आहे की कोणत्याही समाजात निसर्गतः स्त्री-पुरुष गुणोत्तर जवळजवळ समान असते. जर गुणोत्तर समान नसेल आणि पुरुष किंवा महिला अतिरिक्त असतील तर त्यापैकी काहींचे लग्न होऊ शकणार नाही आणि गुणोत्तर बिघडले तर सजातीय विवाहांची व्यवस्थाच कोलमडून पडेल, हे टाळण्यासाठी धर्ममार्तंडांनी दोन क्रूर युक्त्या केल्या. सतीप्रथा व विधवाविवाहावर बंदी. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुढे लिहितात, "वाचकांना कदाचित हे फार बटबटीत वाटेल, हिंदू धर्मावर केलेली निराधार टीका आणि काल्पनिक हेतुपुरस्सर आरोप वाटतील. अशा लोकांनी सती प्रथा आणि विधवाविवाहावर बंदी या प्रथांचं यापेक्षा वेगळं तार्किक स्पष्टीकरण सापडलं तर नक्की द्यावं. सनातन धर्माच्या नावाखाली वर्णवर्चस्ववादी लोकांनी सती सारख्या अमानुष प्रथा निर्माण केल्या. सती म्हणजे महान पतिव्रता पुण्यवान, स्वर्गाचीच नव्हे तर मोक्षाची हमी. या समजुती समाजात आहेत जागोजागी असलेल्या सती मातेच्या मंदिरातील गर्दी याचा पुरावा आहे. जे लोक मनातल्या मनात सती प्रथेचे समर्थन करतात त्यांनी एकदा स्वतःच्या तळहातावर धुमसणारी अगरबत्ती फक्त एक मिनीटभर टेकवून बघावी."

सती प्रथेमध्ये स्त्रीला मृत पतीच्या चितेवर जिवंत जाळलं जायचं किंवा विधवा म्हणून तिला आयुष्यभर नरकयातना ने भरलेलं दुय्यम जीवन जगावं लागायचं. सध्या सतीची प्रथा अस्तित्वात नाही.मुघल काळातही या नीच या प्रथेवर बंदी घातली गेली होती. राजा राममोहन रॉय आणि ब्रिटिश गव्हर्नर विल्यम बेंटिक यांच्यामुळे

1829 मध्ये सती प्रथेवर कायद्याने बंदी घातली गेली, परंतु विधवा स्त्रीकडे मात्र अजूनही आदराने पाहिले जात नाही. तिला धार्मिक कार्यक्रमात सहभागी होता येत नाही. हळदीकुंकू, पूजा, मंगळागौर अशा सामाजिक प्रसंगी बोलावले जात नाही.जात मोडू नये यासाठी बालविवाहाची प्रथा आजही आहे. नकळत्या वयातच लहान मुलीचे लग्न लावण्यात येते, जेणेकरून ती कोणाच्याही प्रेमात पडू नये. जेव्हा ती प्रेम म्हणजे काय हे समजण्याच्या वयात येईल तेव्हा तिने कोणावर प्रेम करावे हे तिला स्पष्टपणे माहीत असले पाहिजे. इथेच जात आणि स्त्रियांच्या समस्या एकमेकांशी जोडल्या जातात. समाजात जात टिकवायची असेल तर पितृसत्ता टिकवावी लागेल. जातीव्यवस्था प्रेम विरोधी आहे. स्त्री जन्माला आली, त्या जातीमध्ये तिने लग्न केले पाहिजे यावर समाज आजही आग्रही आहे, पण यामुळेच जाती व्यवस्था टिकून आहे.

भारतात देवदासी व्यवस्था बऱ्याच काळापासून चालू आहे.देवदासी पद्धतीमध्ये एका तथाकथित निम्न जातीच्या मुलीचे लग्न मंदिरातील मूर्तीशी केले जाते. मूर्तीच्या नावाने पुजारी, उच्चवर्णीय तिचे शोषण करतात. त्या मुलीला जन्मलेल्या संततीला देवाचे अथवा माता देवीचे मुल म्हणतात. कोणतीही उच्चवर्णीय स्त्री देवदासी बनत नाही म्हणून त्यांना या भयंकर प्रथेचा अनुभव येऊ शकत नाही. समाजातील उच्च जातीच्या स्त्रियांची स्थिती आणि दलित महिलांची स्थिती यातील फरक यावर संयुक्त राष्ट्राचा एक अहवाल आहे त्यानुसार दलित महिलेचे आयुर्मान सरासरीपेक्षा 14 वर्ष कमी आहे म्हणजे एक दलित स्त्री उच्च जातीच्या स्त्रीच्या 14 वर्षे आधीच मरण पावते.

भारतातील महिलांच्या शिक्षणाची पहिली चळवळ सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांनी सुरू केली. ज्योतिबा फुले यांनी शाळा उघडली होती, ज्यात सावित्रीबाई फुले व फातिमा शेख मुलींना सगळे त्रास अत्याचार आणि अवहेलना सोसून मोफत शिक्षण देत असत.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले यांना आपले गुरू मानले होते. त्यांनी भारतातील स्त्रीदास्याची समस्या मांडताना ज्योतिबा फुले यांची भूमिका स्वीकारली आहे. अस्पृश्यतेचा आणि जाती व्यवस्थेचा प्रश्न समजून घेण्यासाठी बाबासाहेबांनी मनुस्मृती सकट सर्व धार्मिक ग्रंथांची कठोर चिकित्सा केली आहे. रामायण महाभारत व सर्व हिंदू पुराणांची मानवीय दृष्टिकोनातून झाडाझडती घेताना त्यांच्या लक्षात आले की वर्णवाद, जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेची मुळे याच धार्मिक ग्रंथांमध्ये आहेत, एवढेच नव्हे तर हिंदू धर्मातील सतीप्रथा, बालविवाह विधवा पुनर्विवाह बंदी या स्त्रियांच्या गुलामगिरीच्या प्रथांचा संबंध जातिव्यवस्थेशी कसा आहे ते त्यांनी आपल्या काही ग्रंथांमधून सप्रमाण सिद्ध केले आहे.

भारतातील स्त्रियांच्या गुलामगिरीस लोकमानसात रुजलेल्या अंधश्रध्दा कारणीभूत असल्याचे बाबासाहेबांच्या लक्षात आले होते. माणसामाणसांत आणि स्त्री-पुरुषातील समानतेमध्ये विषमतेच्या भिंती धार्मिक पुराणे आणि मनुस्मृतीसारख्या ग्रंथांनी निर्माण केल्या असल्यामुळे त्या ग्रंथांबद्दल लोकांच्या मनात असलेली अंधश्रद्धा नष्ट करणे आवश्यक होते, म्हणून प्रथम त्यांनी मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला. मनुस्मृतीमध्ये असे काय लिहिले होते? मनुस्मृति म्हणते पती-पत्नीला सोडू शकतो, गहाण ठेवू शकतो किंवा विकू शकतो पण पत्नी स्वतःहून पतीला कोणत्याही स्थितीत सोडू शकत नाही. स्त्रीला स्वतःची संपत्ती बाळगण्याचा अधिकार नाही, कारण ती स्वतःचा पिता, पती किंवा पुत्राची संपत्ती असते. जनावर, वेडा, शूद्र आणि नारी हे सर्व छळ करण्यास योग्य आहेत. स्त्रियाही अपवित्र आहेत म्हणून त्या शिक्षण घेण्यास पात्र नाहीत. या अशा धर्माज्ञां चा तुलसीदासासारख्या कवींवरही प्रभाव होता आणि त्या कविंच्या कवनांचा प्रसार समाजात झालेला होता. थोडक्यात 'मनुस्मृती' ही भारतातील विषमतावादी, कर्मकांडवादी, वर्ण व जातीयवादी विचारांची प्रतीक होती. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी 25 डिसेंबर 1927 रोजी महाड येथे मनुस्मृतीचे जाहीर दहन केले.

या प्रतीकात्मक कृतीमुळे दलित,बहुजन व स्त्रियांना सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याचे बळ मिळाले. हे बाबासाहेबांचे भारताच्या स्त्री मुक्ती आंदोलनाच्या संदर्भातील ऐतिहासिक कार्य होय. स्त्रियांच्या

संदर्भातील सुधारणांची चळवळ पुढे झाली. 1975 नंतर स्त्रीमुक्तीचे लोण सर्व देशभर पसरले. स्त्रीवाद म्हणून संपूर्ण जगात एका नव्या वैचारिक प्रवाहाचे मंथन सुरू झाले.

डॉक्टर आंबेडकरांनी स्त्रीमुक्तीसाठी प्रत्येक सभेत अत्यंत प्रभावी व हृदयाला भिडणारी मर्मदर्शी भाषणे केली. त्यांच्या या भाषणातून त्यांची स्त्री उद्धाराची तळमळ स्पष्ट होते. एखाद्या पित्याने आपल्या मुलीची काळजी व तिचे भविष्य उज्वल कसे होईल याचा ध्यास घ्यावा तसा ध्यास बाबासाहेबांना दलित स्त्रीयांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी लागला होता. त्यासाठी त्यांची जिद्द होती. हजारो वर्षांपासून समाजातील स्त्रियांची विटंबना होत होती, ती थांबावी व स्त्रियांनीही इतर वर्गाप्रमाणे मानसन्मानाने व प्रतिष्ठेने वागावे अशी त्यांची इच्छा होती.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांमुळेच मोठ्या प्रमाणावर स्त्रिया चळवळीत सक्रिय झाल्या. 1927 च्या महाडच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहात स्त्रियांच्या सहभागाला फार मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली. 1930च्या काळाराम मंदिर सत्याग्रहात पहिली अटक होणारी तुकडी स्त्रियांचीच होती. 1942 च्या नागपूर येथे आयोजित केलेल्या अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेत हा सहभाग इतका वाढला की महिलांचे स्वतंत्र अधिवेशन घेण्यात आले.'चलेजाव' चळवळीच्या तोडीचा हा स्त्री सहभाग होता. सार्वजनिक क्षेत्र आज देखील पुरुषप्रधान आहे. मग तेव्हा ते किती असेल? अशा परिस्थितीत गावखेड्यातील सर्वसामान्य बाईला, दलित शोषित वर्गातील स्त्रीला घराचा उंबरठा ओलांडावयास लावून प्रत्यक्ष लढ्यात सक्रिय करणे ही गोष्ट अभूतपूर्व होती. आजही अनेक स्त्री संघटनांना त्यांच्या मोर्चातील किंवा धरणे आंदोलनातील स्त्रियांच्या अल्प उपस्थितीचा प्रश्न डोकेदुखी निर्माण करतो. म्हणून डॉक्टर बाबासाहेबांच्या चळवळीतील स्त्रियांचे हे संख्याबळ लक्षणीय ठरते.

हिंदू समाजातील सर्व प्रकारच्या विषमतांपैकी एक म्हणजे स्त्री- पुरुष विषमता.त्यामुळे स्त्रियांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी वापरलेले महत्त्वाचे अस्त्र म्हणजे कायदा. स्वतःचे सारे पाण्डित्य त्यांनी हिंदू कोड बिलासाठी पणाला लावले. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी जुन्या कायद्यांची संहिता आधी बदलली पाहिजे व स्त्रीकेंद्री बनविली पाहिजे हा त्यामागील हेतू होता.

**महिलांसाठी सुरक्षा कवच हिंदू कोड बिल**

हिंदू कोड बिलात महत्त्वपूर्ण अशा प्रस्तावित तरतुदींत बाबासाहेबांनी सर्वप्रथम वारशाचा प्रश्न घेतला. त्या संबंधात विधेयकातील महत्त्वाचा बदल म्हणजे मृत व्यक्तीची विधवा, त्याची मुलगी व पूर्वी मृत झालेल्या त्याच्या मुलाची विधवा यांना वारशाच्या बाबतीत मुलाच्या बरोबरीची श्रेणी देण्यात आली. त्याच्या जोडीला मुलीलाही वडिलांच्या मालमत्तेत मुलाच्या अर्धा हिस्सा देण्यात आला. या विधेयकात मान्यता देण्यात आलेल्या स्त्री वारसदारांची संख्या मित्ताक्षरा किंवा दायभागाखालील संख्येपेक्षा कितीतरी जास्त होती. तिसरा बदल म्हणजे जुन्या कायद्यात स्त्री-वारसदारांमध्येच त्यांची आर्थिक परिस्थिती, वैवाहिक दर्जा, सापत्यव्य, विनापत्यव्य अशा कारणांवरून भेदभाव केला जात असे. स्त्रिया- स्त्रियांमध्येच भेदभाव करणारे वरील सर्व मुद्दे नव्या विधेयकात काढून टाकण्यात आले. ती स्त्री एकदा वारसदार म्हणून घोषित झाली आहे, याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही गोष्टी विचारात घेण्याची गरज नाही, असे बाबासाहेब म्हणतात. आणि चौथा बदल म्हणजे दायभाग पद्धतीत आईच्या तुलनेत वडील आधी उत्तराधिकारी ठरत. बाबासाहेबांनी आईला वडिलांच्या आधी उत्तराधिकारी बनवले या विधेयकाने स्त्री धनाचे अनेक प्रकार काढून टाकून सर्व स्त्रीधन एकच आहे व त्याला वारशाचा नियमही एकच लागतो अशी तरतूद केली. स्त्री धनाच्या बाबतीत मुलीच्या हिश्श्याच्या अर्धा हिस्सा वारशाने मुलालाही मिळावा ही तरतूद करून बाबासाहेबांनी वडिलांच्या मालमत्तेत जसा मुलीला मुलाच्या अर्धा हिस्सा मिळतो तसा आईच्या मालमत्तेत मुलाला ही मुलीच्या अर्धा वाटा दिला. हे विधेयक मुलगा व मुलगी यांच्या सामाजिक दर्जा मधील समानता राखण्याचा प्रयत्न करते, तसेच धार्मिक संस्कार युक्त विवाह, विवाह नोंदणी, घटस्फोट, दत्तक विधान या संबंधात स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून बाबासाहेबांनी नव्या तरतुदी केल्या. हुंड्याच्या बाबतीत विवाहित मुलीने माहेराहून हुंड्याच्या रूपात आणलेली संपत्ती न्यास मालमत्ता मानली जाईल, तिचा उपयोग त्या स्त्रीच्या कामी येईल आणि 18 वर्षानंतर त्या मालमत्तेवरील हक्कास ती पात्र होईल.ती संपत्तीतिच्या पतीला किंवा त्याच्या नातेवाईकांना उडविता येणार नाही, अशी तरतूद केली. आणखी एक महत्त्वाचा बदल बाबासाहेबांनी केला, तो म्हणजे स्त्रियांच्या मर्यादित

इस्टेटीचे अबाधित इस्टेटीत रूपांतर, याशिवाय विवाह व दत्तक विधानातून जातीचे उच्चाटन, एकपत्नीकत्व तत्व आणि विवाहातून बाहेर पडण्यासाठी घटस्फोटाचे तत्व यांची तरतूद विधेयकात करून स्त्रियांना फार मोठा दिलासा दिला. 1947 पासून सतत 4 वर्षे 1 महिना 26 दिवस अथक परिश्रम घेऊन बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल तयार केले. त्यांचे अंतिम उद्दिष्ट स्त्रियांना कायद्याचे हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त व्हावी हे होते, परंतु एवढ्या कष्टाने तयार केलेले स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा असलेले हे विधेयक संविधान सभेत मंजूर होऊ शकले नाही. त्यातील घटस्फोट, द्विभार्या प्रतिबंध यासारखी कलमे विरोधकांकडून विवाद्य बनविण्यात आली. हिंदू कोड बिलाच्या विरोधकांना बाबासाहेबांनी 20 सप्टेंबर 1951 रोजी अत्यंत मार्मिक उत्तर दिले,"आज सुधारणेच्या युगात स्त्रियांना समान हक्क द्यायला तुम्ही विरोध का करता? स्त्रियांना इस्टेटीत वाटा देण्यास मनुनेही नकार दिला नाही, मग तुम्ही का देता?" बाबासाहेब लढत राहिले, पण सत्र संपले तेव्हा हिंदू कोड बिलाची फक्त चार कलमे मंजूर झाली. त्यामुळे अत्यंत दुःखी व निराश होऊन डॉक्टर बाबासाहेबांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा 27 सप्टेंबर 1951 रोजी राजीनामा दिला. केवढा प्रचंड त्याग बाबासाहेबांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी केला! पुढे 1952 तर केंद्र सरकारने बाबासाहेबांच्याच मसूद्यातून चार स्वतंत्र कायदे बनविले ते म्हणजे, (1)दि हिंदू मॅरेज एक्ट -1955 ,(2) हिंदू सक्सेशन ॲक्ट -1956 (जून),(3) हिंदू मायनॉरिटी अँड गार्डियनशिप ॲक्ट -1956 (ऑगस्ट),(4)दि हिंदू ॲडॉप्शन अँड मेन्टेनन्स ॲक्ट-1956 (डिसेंबर).

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकसभेत मांडलेले 'हिंदू कोड बिल' ही भारताच्या इतिहासातील एक फार मोठी ऐतिहासिक घटना मानली जाते. केवळ दलित व बहुजन नव्हे तर भारतातील संपूर्ण स्त्री वर्गाच्या स्वातंत्र्याचा मार्ग बाबासाहेबांच्या हिंदू कोड बिलामुळे मोकळा झाला. मनुस्मृती सारख्या ग्रंथांनी स्त्रियांचे सर्व प्रकारचे हक्क नाकारले होते. ती समाजात पुरुषप्रधान समाज व्यवस्थेच्या दावणीला बांधलेल्या जनावरासारखी गुलाम होती. तिला कौटुंबिक-सामाजिक सन्मान नव्हता. कोणत्याही प्रकारचे आर्थिक अधिकार नव्हते. परंपरेने स्त्रियांच्या वाट्याला केवळ दुःख आणि अन्याय दिला होता. तो अन्याय दूर करण्यासाठी मानवतावादी व करून हृदयाच्या बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल तयार केले. अंशतः का होईना पण स्त्री स्वातंत्र्याचे बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण झाले. या कायद्यामुळे भारतीय स्त्रीला पुरुषांबरोबर चा दर्जा मिळाला. ती व्यक्ती म्हणून समाजात स्वाभिमानाने जगण्यास पुढे येऊ शकली. या अर्थाने भारताच्या शतकानुशतकांच्या इतिहासाला हिंदू कोड बिलामुळे ऐतिहासिक वळण मिळाले. महात्मा फुले यांनी रुजवलेले स्त्रीमुक्तीचे बीज आपल्या प्रज्ञेने व कर्तृत्वाने प्रचंड संघर्ष करीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी वाढवले. हे त्यांचे मौलिक कार्य केवळ भारतीय स्त्रियांच्या संदर्भातच नव्हे तर एकूण मानवजातीच्या दृष्टीने ऐतिहासिक आहे.

भारतात महिलांचे उद्धारक अनेक झाले, परंतु कैवारी मात्र एकच झाला. बोधिसत्व परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर. मातोश्री रमाईंना पाठविलेल्या एका पत्रात त्यांनी' स्त्रियांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी एक योद्धा आहे' असे म्हटले ते सर्वार्थाने खरे आहे. दोन्ही हाती शस्त्र घेऊन स्त्रियांच्या हक्कासाठी लढणारा असा वीर योद्धा पुन्हा होणे नाही. एका हाती कायद्याचे शस्त्र तर दुसऱ्या हाती चळवळीचे. सर्व भारतीय स्त्रियांनी या कारणासाठी त्यांना प्रातःस्मरणीय मानले पाहिजे. आपल्या 65 वर्षांच्या आयुष्यात या योध्याने सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक अशी चारही क्षेत्रे पादाक्रांत केली, परंतु या पराक्रमाला जोड होती करूणेची. स्त्रिया व शूद्रादी प्रजेवर जाती व्यवस्थेने केलेल्या पराकोटीच्या अन्याय अत्याचाराची चीड व त्या शोषणाला बळी पडलेल्यां विषयी करूणा यातून बाबासाहेबांनी या देशात सामाजिक क्रांती केली. युद्धानंतरची ही दुसरी क्रांती होय. अशा या महामानवाला माझा कोटी कोटी प्रणाम!

**संदर्भग्रंथ**

1. लोकराज्य, क्रांतिसूर्य ( एप्रिल, 2017), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.
2. खैरमोडे, चांगदेव भगवान (जुलै 2003). डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड, पुणे: सुगावा प्रकाशन.
3. कीर, धनंजय (1966). डॉ. बाबासाहेब आंबेडकर. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.

4. ऑमवेट, डॉ. गेल, आंबेडकर : प्रबुद्ध भारत की ओर (2005).
5. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब (2014). माझी आत्मकथा. औरंगाबाद: कौशल्य प्रकाशन.
6. गाठाळ, डॉ. एस.एस. (2019). आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास. औरंगाबाद: कौशल्य प्रकाशन.
7. Jaffrelot, Christophe (2005). Dr Ambedkar and Untouchability: Analysing and Fighting Caste. London: C. Hurst & Co. Publishers.
8. गायकवाड 'राजवंश', डॉ. ज्ञानराज काशिनाथ (2016). महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर. कोल्हापूर: रिया प्रकाशन.
9. लोकराज्य, असामान्य: अद्वितीय प्रज्ञासूर्य( एप्रिल, 2016), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री आणि मानवी हक्क याविषयी विचार

**सौ. नागमणी विठ्ठलराव हाळे**

सहशिक्षिका, यशवंत माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालय, अहमदपूर, ता.अहमदपूरú जि. लातूर

**प्रस्तावना :**

भारत हा विविध परंपरा व चालीरिती मानणारा देश आहे. भारतीय समाजामध्ये वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. नंतर तिचे रुपांतर जातीव्यवस्थेमध्ये झाले. यामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान होते. तिच्याकडे निकृष्ट दृष्टिकोनातून बघितले जात होते. कौटुंबिक स्तरापासूनच तिची अवहेलना केली जात असल्याने सामाजिक स्तरावर त्या अवहेलनेने भव्य रुप धारण केले आहे. स्त्रियांना मुलाच्या तुलनेत वेगळया भावाची वागणूक मिळते. कुटुंबात मुलाला जो सन्मान दिला जातो, तो स्त्रिला मिळत नाही. शाळेत शिक्षण दिले जात नाही. मुलींच्या शिक्षणावरील खर्च सर्व व्यर्थ समजला जातो. लग्नाचे वय होण्या अगोदरच तिचा विवाह करुन दिला जातो. बालविवाह, सती जाणे, केशवपन, देवदासी इत्यादी अनेक प्रकारांना तिचा बळी दिला जातो. या सर्व गोष्टी मानवतेला काळीमा फासणाऱ्या आहेत. अशा प्रकारच्या स्त्री विषयांचा दृष्टिकोन देशाच्या, समाजाच्या, संस्कृतीच्या विकासास हानिकारक आहे. या दृष्टिकोनातून विचार करणारे अनेक समाजसुधारक पुढे आलेत. यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक होते. म्हणून आपणाला या शोधनिबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री आणि मानवी हक्क याविषयी एक विचारांचा अभ्यास यामध्ये केला आहे.

**उद्देश :**

1) स्त्री आणि मानवी हक्क याचा अभ्यास करणे.
2) आजची भारतीय स्त्री खरोखरच स्वातंत्र्य झाले आहे काय याचे अध्ययन करणे.
3) स्त्रियांच्या अधोगतीला कोण जबाबदार आहे यावर प्रकाश टाकणे.
4) हिंदू समाज व्यवस्थेतील पुरुषप्रधान संस्कृतीचे विचारांचा अभ्यास करणे.

**विषय विवेचन :**

भारतामध्ये स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांच्या अस्तित्ववादी जे समाजसुधारक पुढे आले त्यात सर्वप्रथम भगवान गौतम बुद्धांनी स्त्रियांना आपल्या भिक्खु संघात समाविष्ट केले. भगवान बुद्ध हेच स्त्री स्वातंत्र्याचे आद्य पूरस्कर्ते आहेत. त्यात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, पंडित रमाबाई, राजर्षी शाहू महाराज, गो. गं. आगरकर इत्यादींने प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणावर अधिक भर दिला. स्त्री शिक्षणाने कुटुंबास नैतिक वळण लागते म्हणून त्याने स्त्रियांमध्ये जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यानंतर डॉ. आंबेडकरांचे कार्य अतिशय मोलाचे आहे. हिंदू समाज व्यवस्थेत पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांच्या हक्कांचे दहन केले आहे. म्हणून मानवी हक्क व स्त्री यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

मानवी हक्क म्हणजे काय तर भारतीय समाज व्यवस्थेत चातूरवर्णिय व्यवस्थेतून जाती-धर्म निर्माण झाला. त्याच प्रमामे त्यात पुरुषप्रधान संस्कृतीमुळे लिंगभेद निर्माण झाला. लिंगभेदाच्या भावनेतून विषमता निर्माण झाली आहे. या विषमतेतून मानवी हक्काचे उल्लंघन केले जाते. तेंव्हा हे विषमता जाऊन समानता निर्माण होणे म्हणजे मानवी हक्क होय. प्रत्येक व्यक्तीला निर्भयपणे सन्मानाने जगता यायला हवे. कोणीही कोणावर अत्याचार करणार

नाही हे म्हणजे मानवी हक्क." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा मानवी हक्क भारतीय संविधानात दिलेला असल्याने स्त्रियांच्या मानवी हक्काचे संरक्षण करण्यासाठी संविधानातच याची तरतुद करण्यात आली आहे. मानवी हक्क हे नैसर्गिकरित्या प्राप्त होत असला तरी हक्काच्या पूर्तीसाठी संघर्ष करावा लागतो. स्त्रिया जागरुक होवून आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवताना दिसत आहेत.

डॉ. बाबासाहेबांच्या मते, "हक्क म्हणजे सर्व माणशे जम्मत: समान दर्जाचे आहेत मरेपर्यंत समान दर्जाचेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रिय लेखनातून स्त्रियांना त्यांच्या मानवी हक्काची जाणीव करुन देण्याचा सतत प्रयत्न केला आहे. स्त्री मुक्त व्हावी म्हणून त्यांनी हिंदू कोडबील 21 ऑगस्ट 1948 ला मांडले. संविधानत स्त्रियांना हक्क दिले. प्रसंगी त्यासाठी त्यांना मंत्रीपदाचा त्याग करावा लागला. स्वातंत्र्य समता, बंधूता, न्याय याच बरोबर त्यांनी स्त्री तत्वालाही उचलून धरले. प्रज्ञा व करुणा यावर आधारलेले तत्वज्ञान मांडताना त्यांनी स्त्री शक्तीला गृहीत धरले. स्त्रीला दास्यमुक्त करुन स्वावलंबी बनविले. तिला स्वावलंबनाची जाणी निर्ाम करुन दिली. म्हणून ते स्त्री जागृतीचे जनक ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत स्त्रियांना समानता मिळण्यासाठी कायदे केले असले तरी त्याचे स्त्री सक्षमीकरण होणे गरजेचे आहे. "सक्षमीकरण सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक दृष्टिने स्त्रियांना स्वत: विकास करणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण" डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील मुलभूत हक्कांच्या परिच्छेदात स्त्री-पुरुष लिंगभाव, असमानता व्यक्त करण्यात आलेले नसून व्यक्ती, माणूस असे निर्देशित केले आहे. स्त्रियांना कायद्यानुसार मानवी हक्क प्रदान करण्यातला तरी शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण स्त्री अन्याय, अत्याचार सहशील असलेली दिसून येते. स्त्री शिक्षित झाल्यामुळे व मानवी हक्कामुळे अनेक कार्यक्षेत्रातील उच्च पदावर कार्यरत आहे. त्यामुळे तिने पुरुषाप्रमाणे देशाच्या प्रथम नागरिकाचा म्हणजे राष्ट्रपती पद भूषविले आहे. अनेक स्त्रिया अनेक राज्याच्या मुख्यमंत्रीपद सांभाळताना दिसत आहेत. आज स्त्री कोणत्याही क्षेत्रात मागे नाही. असे असतानाही आज 21 व्या शतकातही स्त्रियांना दिली जाणारी वागणूक ही दुय्यमतेची असते. एकीकडे स्त्रिला देवी मानले जाते. मुलीचा जन्म होताच तिची भ्रूणहत्या केली जाते. पूर्वापार चालत आलेल्या रुढी, परंपरेनुसार पुरुषाप्रमाणे स्त्रीसुद्धा स्त्रीचा छळ करताना दिसते. गर्भात असतानाच स्त्रिला मारायची ही कसली मानवता म्हमून मुलापेक्षा मुलीचा जन्मदर घटताना दिसत आहे, आणि ही गंभीर बाब आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीवर सतत अन्याय करीत आलेली असल्याने आज तिच्या संरक्षणासाठी संविधानातच कायदे करुन तिला मानवी हक्क मिळवून दिला आहे.

**सारांश :**

मानवी हक्क हे नैसर्गिकरित्या व्यक्तीस प्राप्त होत असला तरी हक्काच्या पूर्तीसाठी संघर्ष करावा लागतो. स्त्रिया जागरुक होवन आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारा विरोधात आवाज उठवताना दिसत आहेत. अनेक संघटनासुद्धा निर्माण केले आहेत. स्त्रियांच्या मानवी हक्काचे संरक्षण झाले तरच देश हा सामाजिक, आर्थिक व राजनितिक दृष्टिने सुदृढ होणार आहे. निसर्गाने स्त्रिला माणूस म्हणून जन्म दिला आहे. स्त्री ही निसर्गाची सर्वोच्च देणगी आहे. स्त्री ही माणूस आहे. तिला बुद्धी आहे, भावना आहेत, विचार आहे. धैर्य, करुणा, स्नेह, माया, ममता इत्यादी गुम तिच्यात आहेत. मुख्य म्हणजे तिच्यात प्रजनन क्षमता असल्याने पुरुषी मनोवृततीला स्त्री आजही तोंड देत आहे. म्हणूनच म्हणतात, एक स्त्री पाहिजेच घराला स्वर्ग बनवण्यासाठी.

**संदर्भग्रंथ :**


1) स्त्रियांचे अधिकार व मानवी हक्क, प्रा. घोडेस्वार प्रविण.
2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री जागृतीचे कार्य- रंगोले प्रतिभा.
3) वुमेन आर्कीटेक्टस ऑफ द इंडिया रिपब्लिक-प्रियदर्शनी रविचंद्रन.
4) भारतीय स्त्री आणि हिंदू कोडबीर-डॉ. सुर्या अनिला - सुगावा प्रकाशन, पुमे,
5) हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती - प्रकाशन, प्रदीप रोळगे, 2008.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषावार प्रांतरचनेवरील विचार

**बारशे भाग्यश्री उत्तमराव**
संशोधक विद्यार्थी समाजशास्त्र
सामाजिक शास्त्रे विद्यासंकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

**प्रस्तावना:—**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतासमोर सर्वात जटील समस्या होती ती प्रांताच्या पुर्नरचनेची. भाषावार प्रांतरचना करण्यासाठी त्यावेळी मोठया प्रमाणात नेत्याकडून सरकारवर दबाव यायला लागला. भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा राज्यघटना सभेपुढे आला होता. भाषावार प्रांतरचना करणे कितपत योग्य आहे, याची शहानिशा करण्यासाठी सभेने १९४८ मध्ये एस. के. दार कमिशन नेमले. दार कमिशनने तुर्तास भाषावार प्रांतरचना करणे शक्य नाही. असे झाल्यास मोठया असंतोषाला सामोरे जावे लागेल. त्यानंतर जे.व्ही.पी. कमिटी नेमली त्यांनी भाषावार प्रांतरचना तुर्तास शक्य नसल्याचे स्पष्ट केले. यानंतर १९५३ मध्ये न्या. फाजलअली यांच्या अध्यक्षतेखाली भाषावार राज्य पुर्नरचना कमिशन नियुक्त केले. आयोगाने १९५५ मध्ये अहवाल सादर केला. यानुसार भाषावार राज्य पुर्नरचना विधेयक—१९५६ मंजूर करण्यात आले. यानुसार १४ घटकराज्ये व ६ केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजारी असल्यामुळे ते भाषावार प्रांतरचना विधेयकांवर संसदेत चर्चा चालू असताना सभागृहात चर्चेत भाग घेऊ शकले नाही व त्यावेळी चालू असलेल्या भाषिक प्रांताच्या चळवळीमध्ये सहभागी होऊ शकले नाही. त्यामुळे बाबासाहेबांवर सर्व स्तरातून मोठया प्रमाणात दोषारोप झाल्याने त्यांनी आपले विचार Thoughts of Linguistic States-१९५५ या पुस्तकातून व्यक्त केले.

**२. उद्देश:—**

भाषावार प्रांतरचनेमुळे प्रादेशिक अस्मिता वाढत जावून प्रादेशिकवादाची समस्या निर्माण होवून राष्ट्रीय एकता व अखंडता धोक्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषावार प्रांतरचनेविषयी आपले जे विचार मांडले. या विचारांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने या विषयाची निवड केली आहे.

**३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषावार प्रांतरचनेवरील विचार :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषावार राज्य पुर्नरचनेवर आपले मत व्यक्त करताना त्यांच्या सुरूवातीच्या विचारात व आत्ताच्या विचारात तफावत जाणवेल असे म्हटले, सुरूवातीचा त्यांचा दृष्टीकोन हा मोठया राज्यांचे समर्थनाचा होता मात्र नंतरच्या काळात त्यांनी लहान राज्यांचे समर्थन केले व आपले विचार मांडले ते पुढीलप्रमाणे—

**१. केवळ भाषावाद अन्य काही नव्हे :—**

घटनेच्या तिसऱ्या कलमान्वये संसदेला नवीन राज्ये निर्माण करण्याचा अधिकार प्रदान केलेला आहे. कारण सर्वांकडून भाषावार राज्य पुर्नरचना झाली पाहिजे अशा मागणीचा जोरदार पाठपुरावा होत होता. परंतु भाषावार राज्यरचना करून त्यांना मंजूरी देण्याकरिता घटना अंमलात येते वेळी सरकारजवळ पुरेसा अवधी नव्हता. या तीव्रतर मागणीच्या अनुषंगानेच भाषावार राज्य पुर्नरचनेच्या प्रश्नाचा समग्र अभ्यास करून त्या दृष्टीने केंद्र सरकारला शिफारसी करण्यासाठी राज्यपुर्नरचना आयोगाची नेमणूक करण्यात आली. आयोगाने शिफारस केली त्यात अनेक बदल करून सरकारने ते विधेयक मांडले. आयोगाने १६ राज्याची शिफारस केली होती. मात्र हैद्राबाद राज्य आंध्रप्रदेश मध्ये व महाविदर्भचा समावेश मुंबई राज्यात करून १४ राज्याची निर्मीती करण्यात आली.

आता या राज्याच्या आकारांचे तौलनिक अवलोकन करणे अत्यंत महत्वाचे ठरेल. त्यानुसार लोकसंख्या हे प्रमाणभूत माप घेऊन निकष लावले तर खालीलप्रमाणे अनुमान मिळतील की त्यांच्यापैकी—

१. आठ राज्यांची लोकसंख्या १ ते २ कोटींच्या दरम्यान आहे.
२. चार राज्यांची लोकसंख्या २ ते ४ कोटींच्या दरम्यान आहे.
३. एक राज्य ४ कोटीहून अधिक तर
४. एक राज्य ६ कोटीहून अधिक लोकसंख्येचे आहे.

थोडक्यात एका वाक्यात हा अनुमान काढावयाचा झाल्यास, ही राज्य पुर्नरचना विलक्षण स्वरूपाची झालेली आहे.

**२. भाषावाद हा मेरूदंड आहे का?**

राज्यपुर्नरचना आयोगाने सदोष शिफारशींनी निरनिराळया राज्यांची क्षेत्रीयदृष्टया विजोड निर्मिती सुचविली. इतकेच

काय परंतु आयोगाच्या शिफारशींत आणखी एक दडून बसलेली चूक आहे; आणि ही वस्तुस्थिती अव्हेरण्यासारखी नाही. उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्यामधील संबंधाचे संतुलन न राखल्यामुळे ही चूक घडली, आयोगाने राज्याची निर्मिती करताना उत्तर भारतातील पाच राज्यांची लोकसंख्या १५ कोटी तर दक्षिण भारतातील पाच राज्यांची लोकसंख्या ९ कोटी यातील सर्वात जास्त लोकसंख्या ही उत्तरप्रदेश राज्याची ६ कोटी पेक्षा जास्त होती. भाषावार राज्यपुर्नरचनेच्या बुरख्याखाली भारताचे तुकडे करण्याची योजना नजरेआड करून चालणे योग्य नव्हे. आयोगाला या विभाजनात काही अनर्थ ओढवेल असे वाटत नाही. परंतु ही गोष्ट आयोगाला वाटते तेवढी सोपी नाही.

भारतीय संघराज्याचे स्वरूप ही आजही कविकल्पनाच आहे. ही कल्पना साकार होण्याची चिन्हे दिसत नाहीत. भारताची आज तरी मानसिक व नैतिकदृष्टया पात्रता नाही की त्याने 'भारताची संयुक्त—राज्ये' असे त्याला म्हणावे, असे म्हणवून घेण्यास भारताला बरीच प्रगतीची वाटचाल करावी लागेल. 'भारतीय संघ—राज्य' (The Union of Indïa) आणि 'भारताची संयुक्त—राज्ये'(United states of India) या दोहोत महदंतर आहे. परंतु उत्तरीय राज्यांचे एकत्रीकरण करणे व दक्षिणी राज्यांचे विलगीकरण करणे, हाही ध्येयाप्रत नेणारा नाही!

**३. भाषावार राज्यरचनेपासून फायदे व तोटे:—**

'एक राज्य, एक भाषा' हा सर्व राष्ट्रांनी अवलंबिलेला जागतिक सिध्दांत होय. जर्मनी, फ्रान्स, इटली या देशांच्या घटना तपासून पाहा. एवढेच काय तर इंग्लंड—अमेरिकेसारख्या प्रभावी देशांच्या राज्य घटनांचे अवलोकन करा. या सर्व घटनांमध्ये एकच तत्व आपणास पहावयास मिळेल. ते हे की,'एका राष्ट्राच्या निर्मितीकरिता एकच भाषा'अवलंबिलेली आहे.

जेथे 'एक राज्य, एक भाषा' हे तत्व अव्हेरले गेले, तेथे ते राष्ट्र धोक्यात आल्याशिवाय राहिले नाही. ऑस्ट्रिया आणि तुर्कस्थान ही प्रभावशाली साम्राज्ये केवळ बहुभाषिक असल्यामुळे मोडकळीस आली व ऱ्हास पावली, हे राज्ये बहुभाषिक असल्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचे एक उत्तम उदाहरण होय. भारतीय प्रांतिक राज्य कारभारात जर अशाच बहुभाषिकतत्वाचा प्रयोग करू लागलो तर भारताचीही उपरोक्त साम्राज्यांप्रमाणे गत झाल्याशिवाय राहणार नाही.

'एक भाषा, एक राज्य' अस्तित्वात आल्यानंतर ते का टिकते व बहुभाषिकतेवर राज्य स्थापन केल्याने ते अस्थिर का राहते याची कारणमिमांसा अगदी स्पष्ट आहे. राज्याची स्थापना एक दुसऱ्याच्या सहानुभूतीच्या भावनेवर अधिष्ठित असते. ही सहानुभूतीची भावना म्हणजे काय? थोडक्यात सांगायचे झाल्यास या भावनेने आपण भावनिक—वैचारिक दृष्टया एकत्र येतो व एक दुसऱ्याला जणू रक्तमासांच्या आप्तेष्टांसारखेच समजू लागतो. ही तलवारीसारखी दुधारी भावना आहे. या भावनेच्या एका बाजूने आपण आपल्या लोकांना फक्त आत्मियतेने पाहतो. त्यामुळे आपली विविधतेतही एकता निर्माण होऊ शकते. आपल्यात आर्थिक व सामाजिकदृष्या विषमता असली तरी आपण ज्या बंधनाने बांधल्या जातो ते बंधन फार मजबूत असते. भावनेची दुसरी बाजू आपल्यात सामील न होणाऱ्यास ते आपल्यापैकी नाहीत असे गृहीत धरून त्यांना दूर सारते; त्यांच्याशी संघर्ष निर्माण करते. दुसऱ्या समूह जीवनात मिसळू न देणारी ही दुर्धर अभिलाषा आहे.

**४. बहुभाषिक राज्यात अपयश:—**

याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे विद्यमान मुंबई राज्य हे होय. बहुभाषिक राज्याचा कारभार कसा चालतो, याची अनुभूती घेण्यासाठी मुंबई द्वि भाषिक राज्य ठेवावे याची राज्यपुर्नरचना आयोगाने शिफारस केली, ती पाहून तर मला विस्मयाचा धक्काच बसला. गेल्या वीस वर्षाच्या कारकीर्दीत मुंबई राज्य राज्यकारभाराने काय काय साधले? महाराष्ट्रियांचा व गुजरात्यांचा अभिजात कलह निर्माण झाला व कोणत्या विकोपास गेला हे सर्वश्रुत आहे. बहुभाषिक राज्यात लोकशाहीची कशी गत होते याचे आणखी उदाहरण म्हणजे मद्रास राज्य! अखंड भारताचे एक सांघिक राज्य करण्याचा विचाराने राज्यकारभार चालविताना हेच अपयश पदरात घ्यावे लागेल. किंवा अखंड हिंदुस्थानची भारत व पाकिस्तान अशी शक्ती फाळणी करून, ती लोकशाही राजवट म्हणून चालविणे हे बहुभाषिक राज्यात अशक्यप्रायच आहे. दुसरे एक कारण म्हणजे, एक राज्य एक भाषा ह्यानुसार राज्यरचना झालीच तर जातीय वैमनस्य व सांस्कृतिक संघर्ष यासारखे राष्ट्रीय एकात्मतेला तडा देणारे वाद निर्माण होणार नाहीत.

भाषावार राज्यरचना करण्याची दोन कारणे आहेत. १. लोकशाहीचे कार्य सुगम रितीने चालू राहिल व २. कोणत्याही तऱ्हेचा जातीय व सांस्कृतिक झगडा निर्माण न होता, तंग वातावरण निवळेल.

इतर राष्ट्राप्रमाणेच भाषावार राज्यनिर्मितीचा मार्गच भारताला प्रगतीची वाट दाखवू शकतो. भारताच्या बाबतीत मात्र ही वाटचाल मागे वळून सुरू करावी लागणार आहे. परंतु ही वाट अचूक व चांगली रूळलेली आहे. भाषावार राज्यरचनेची जशी फायद्याची बाजू आहे. तसेच धोकेही आहेत. प्रादेशिक भाषेचा उपयोग भाषिक राज्यात सरकार चालविण्याकरिता करण्यात येईल व साहजिकच त्यामुळे जनतेत राष्ट्रीयत्वाची भावना रूजू लागेल. स्वतंत्र राष्ट्रीयत्वाच्या भावनेचे उद्‌भेदन

झाले की विलग राज्य ही कल्पना उदयास आलीच. स्वतंत्र राष्ट्रीयत्व व स्वतंत्र राज्य ही दुभागणारी वाट अगदीच अरूंद आहे. जर भारतात असे घडू लागले तर अखंड भारत नष्टप्राय होईल आणि मध्ययुगीन संस्थानाप्रमाणे ही विलग विलग राज्ये एकमेकांशी शत्रुत्वाने वागून स्पर्धा सुरू करतील आपपसात लढाया सुरू करतील. भाषावार राज्य रचनेमध्ये हा संभाव्य धोका आहे. हा भाषावार राज्यरचनेचा धोका टाळण्यासाठी एक मार्ग आहे. त्याकरिता प्रादेशिक भाषा ही राज्याची संपर्क भाषा मुळीच होऊ नये अशी आपल्या घटनेतच तरतूद करावी राष्ट्राची राष्ट्रभाषा एकच हिंदी असावी. जोपर्यंत हिंदीचा कार्यात परिपूर्ण वापर करण्यास राज्ये सक्षम होणार नाहीत तोपर्यंत इंग्रजी चालूच ठेवावी. एक भाषा एकमेकांना आकर्षित करू शकते तर दोन भाषा एकमेकांना प्रतिसारतात. हा अटळीत असा विधिनियम आहे. संस्कृतीचे रक्षण भाषा करते. सर्व भारतीयांना एकत्र आणून एकच संस्कृतीचा वारसा पुढे चालवायचा असेल तर त्यांनी कर्तव्य परायणता लक्षात घेवून हिंदीचाच राष्ट्रभाषा म्हणून वापर करावा. ही भाषा आत्मसात करावी.

**५. एका भाषेचे एक राज्य हवे काय?**

भाषावार राज्य म्हणजे तरी काय?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामते, ह्याचे दोन अर्थ संभवतात. पैकी एक अर्थ असा की एक विवक्षित भाषिकांचा एक गट करून त्यांना एका राज्याच्या हुकुमतीखाली आणणे; आणि दुसरा म्हणजे एकच भाषा बोलणाऱ्यांची वर्गवारी करून दोन किंवा अधिक राज्यांच्या हुकुमतीखाली सोपविणे. अर्थात या सर्वांची बोलीभाषा एकच असावयास पाहिजे. भाषावार राज्य पुर्नरचना आयोगाने यापैकी पहिल्या अर्थाचे समर्थन केले. ते म्हणजे. एकच भाषा बोलणाऱ्यांना एकाच राज्यात सामील करून त्यांच्यावर एकाच राज्याची अधिसत्ता असावी. आयोगाच्या या रचनेवर दृष्टीक्षेप टाकल्यास उत्तरेकडील राज्ये व दक्षिणेकडील राज्ये यांच्यात मोठी तफावत मोठमोठया राज्यांचे भार पेलणे अशक्य होईल. ही विषमता किती धोकादायक आहे हिचे स्वरूप आयोगाला ओळखता आले नाही. माझ्या विचाराप्रमाणे संघराज्याचा कार्यभाग यशस्वीरित्या चालण्यासाठी त्यांचे समतोल घटक राज्ये निर्माण करावे हे मी महत्वाचे समजतो. पुर्नरचनेत अवास्तव विषमता निर्माण झाली तर त्यामुळे संशयाला जागा मिळून लोकांच्या मनात द्वेष उफाळेल व संघराज्याची चौकट विस्कळीत होईल.

**६. उत्तर भारत विरूध्द दक्षिण भारत :—**

राज्यपुर्नरचना आयोगाने काय साधले? उत्तर प्रदेश व बिहार राज्य जैसे थे ठेवून एक मोठी विषमतेची खाईच निर्माण केली. एवढेच करून थांबले नाही तर त्यांनी नव्या विशाल मध्यप्रदेशाची व राजस्तानची सांगड घालून उत्तर विरूध्द दक्षिण भारत ही नवीच समस्या निर्माण केली.

उत्तर भारत प्रामुख्याने हिंदी भाषिकांचे आहे. उलट अंशी अहिंदी भाषा दक्षिणेत बोलल्या जातात. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ४८ टक्के हिंदी भाषिकांची संख्या आहे. या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधल्यास निश्चित लक्षात येईल की, राज्यपुर्नरचना आयोगाने एवढे परिश्रम घेवूनही उत्तर भारताचे एकत्रीकरण केले तर दक्षिण भारतात लहान लहान राज्ये निर्माण करून त्यांचे विलगीकरण केले. उत्तर भारत आणि दक्षिण यांच्यामध्ये कमालीचे अंतर आहे. उत्तर हा प्रतिगामी, पुराणमतवादी, शैक्षणिकदृष्टया पिछाडीवर असून उत्तर भारताची संस्कृती प्राचीनतम आहे. तर दक्षिण भारत पुरोगामी, बुध्दीप्रामाण्यवादी, शैक्षणिकदृष्टया आघाडीवर असून दक्षिण भारताची संस्कृती अद्यावत आहे.

हिंदी भाषेला राष्ट्रभाषा म्हणून स्वीकृत करावी काय यावर सविस्तर चर्चा सुरू होती. घटनेत ११५ वे कलम राष्ट्रभाषेसंबंधी आहे. इतर कुठल्याही कलमापेक्षा या कलमावर विशेष वादग्रस्त व गरमागरम चर्चा झाली व या कलमावर जितका विरोध झाला तितका कोणत्याही कलमावर झाला नाही. यावरून दक्षिण लोकांचा उत्तर भारतीयांविरूध्द किती कडवा विरोध होता हेच स्पष्ट होते. भाषावार राज्यरचनेमुळे उत्तर भारतीयांचे वर्चस्व भारतीय राजकारणावर निर्माण होईल. उत्तरप्रदेशचा प्रभाव राजकारणावर पडत असल्याबाबत दक्षिण भारत, पंजाब, बंगाल व इतर राज्यानीही मतप्रदर्शन व्यक्त केले आहे. या भावना अशाच उफाळू दिल्या व त्यांच्यावर वेळीच पायबंध घातला गेला नाही तर ही भावना राष्ट्रीय ऐक्याला मारक ठरेल. हे कटुसत्य नाकारून चालणार नाही.

वरिलप्रमाणे समस्या ही भाषावार प्रांतरचनेमुळे निर्माण झाली. आता या समस्येतून बाहेर पडण्याचा मार्ग पाहू या.

**३. उपाययोजना:—**

**१. उत्तरेकडच्या मोठया राज्याचे विभाजन:—**

प्रत्येक राज्याचा आकार कसा असावा,ह्याचे परिणाम मिळाल्यानंतर मार्ग काढण्यास फारसा वेळ लागणार नाही, हे ओघानेच आले. परंतु असे क्षेत्रमापण शोधून काढणे वाटते तेवढे सोपे नाही. जर एका राज्याची लोकसंख्या २ कोटी असावी हे मापण घेतले तर दक्षिणेकडील राज्ये बहुभाषिक होतील. म्हणून भारतीय प्रांतापैकी उत्तरप्रदेश, बिहार व

मध्यप्रदेश यांचे विभाजन करणे हाच एकमेव उपाय आहे.

**२. उत्तर प्रदेशचे विभाजनः—**

उत्तर प्रदेशाचे— १. पश्चिम उत्तर प्रदेश—मीरत २. मध्य उत्तर प्रदेश— कानपूर ३. पूर्व उत्तर प्रदेश— अलाहाबाद ही तीन राज्ये व त्यांची राजधानी करावी. या प्रत्येक राज्याची लोकसंख्या दोन कोटी असावी. अधिक कार्यक्षम प्रशासनाकरिता हीच संख्या प्रमाणभूत धरावी.

**३. बिहारचे विभाजनः—**

बिहारचे १. उत्तर बिहार— पटना २. दक्षिण बिहार— रांची अशी दोन राज्ये करावित. या दोन्ही राज्याची लोकसंख्या दिड कोटीपेक्षा अधिक होईल. सरकारला प्रशासन करण्याकरिता ही संख्या काही कमी पडणार नाही.

**४. मध्यप्रदेशाचे विभाजन :—**

मध्यप्रदेश राज्याचे विभाजन करताना १. उत्तर मध्यप्रदेश २. दक्षिण मध्यप्रदेश अशी दोन राज्ये बनवावी. उत्तर मध्यप्रदेशात इंदूर संस्थान २ कोटी व महाकोशलचे १४ जिल्हे १.३० कोटी लोकसंख्या एवढी लोकसंख्या मिळून एक राज्य करावे. व बाकी भागाचे दक्षिण मध्यप्रदेश राज्य करावे. वास्तविकत: एक राज्य एक भाषा असाच नियम असावयास पाहिजे होता. त्यामुळेच एक भाषिकांचे, एकापेक्षा अधिक सोयींच्या राज्यांत विभागणी करता आली असती.

**५. बहुभाषिक मुंबई राज्यः—**

मुंबई आधीच बहुभाषिक राज्य आहे. या बहुभाषिक राज्यात राहून महाराष्ट्रीयांना कटू अनुभव आला. मुंबई विधानसभेत गुजराती सभासद १०६ व मराठी सभासद १४९ आहे. असे असून देखील मंत्रीपदे समसमान प्रमाणात आहे. या बहुभाषिक मुंबई प्रांताचे विभाजन करून गुजरात राज्य स्वतंत्र करावे. मुंबईसह महाराष्ट्र राज्य करावे. मात्र एकंदर स्थिती पाहता महाराष्ट्राचे चार राज्यात विभाजन करावे.

१. महाराष्ट्र नगर २. पश्चिम महाराष्ट्र ३. मध्य महाराष्ट्र ४. पूर्व महाराष्ट्र, महाराष्ट्राचे तीन विभाग पुरातन काळापासून 'त्रयी महाराष्ट्रीका' म्हणून सर्वश्रूत होतेच, मुंबई त्यावेळी अस्तित्वात नव्हती, नाही तर तिचे सुध्दा एक चौथे महाराष्ट्र झाले असते.

**४. निष्कर्ष :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषावार प्रांतरचनेवरिल जे विचार मांडले आहेत. त्याला आज ६० वर्षाहून अधिक कालावधी झालेला आहे. त्यांनी त्या काळात भाषावार प्रांतरचना संबंधी जे जे विचार व्यक्त केले त्या विचारांचा जर सरकारने अभ्यास करून वेळीच सुधारणा केली असती तर आज प्रादेशिकवादाची समस्या निर्माण झाली नसती. बाबासाहेबांनी आपल्या विचारात एक भाषा एक राज्य याऐवजी एक राज्य एक भाषा या तत्वानुसार प्रांताची पुर्नरचना करण्याचे सांगितले होते. जर तसे झाले असते तर भाषिक वादातून कोणतीच समस्या निर्माण झाली नसती. भारतासारख्या बहुभाषिक देशात भाषिकवादाचा प्रश्न ज्वलंत आणि गंभीर होवून बसला आहे. आजही भारतात मोठया प्रमाणात स्वतंत्र राज्याच्या मागणीने जोर धरला आहे व त्यामुळे भारताची राष्ट्रीय एकता व अखंडता धोक्यात आली आहे. आजच्या परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषावार प्रांतरचनेवरिल विचाराचा अभ्यास केल्यास खालीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतील.

१. भारतासारख्या विशाल खंडप्राय, बहुभाषिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक,जातीय विविधता असणाऱ्या देशात केवळ भाषिक आधारावर राज्यांची केलेली निर्मिती ही अयोग्य वाटते.
२. एक भाषा एक राज्य या तत्वानुसार एक भाषिकांचे एक राज्य निर्माण करण्याऐवजी एक राज्य एक भाषा या तत्वानुसार एक भाषिकांचे प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने विचार करून अनेक राज्य निर्माण केले असते तर आज स्वतंत्र राज्याच्या मागणीचे प्रश्नच निर्माण झाले नसते.
३. भाषिक आधारावर राज्याची निर्मिती करून १४ घटकराज्ये निर्माण करण्यात आली मात्र ६० वर्षाच्या काळातच या १४ वरून भारतातील घटकराज्यांची संख्या २९ झाली आहे. म्हणजेच केवळ भाषिक आधारावर राज्याची झालेली निर्मितीमुळे एक भाषिकांचे एक राज्य बनले. मात्र राज्याचा सर्वागीण विकास न झाल्याने सर्व विभागात स्वयंपूर्णता आली नाही, तो विभाग मागासच राहिला. त्यातच एका विशिष्ट जातींचे वर्चस्व राजकारणात निर्माण झाल्याने इतर अल्प जातींच्या विकासाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होऊ लागल्यामुळे यातून त्या विभागात स्वतंत्र राज्यांच्या मागणीने जोर धरून विलग राज्याची मागणी मोठया प्रमाणात व्हायला लागली. त्यासाठी हिंसक आंदोलन, जाळपोळ, बंद याचा

आधार घेऊन स्वतंत्र राज्याची मागणी होवू लागली. याचे ज्वलंत उदा. म्हणजे २९ वे घटक राज्य बनलेले तेलंगाणाचे देता येईल. जवळजवळ ५८ वर्षाच्या प्रदिर्घ लढयानंतर तेलंगाणा २०१४ मध्ये स्वतंत्र राज्य बनले.

४. भाषावार प्रांतरचनेमुळे उत्तर भारताचे एकत्रीकरण झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितल्याप्रमाणे उत्तर भारताचे विभाजन करण्यास केंद्र सरकारला ४४ वर्षाचा काळ जावा लागला. सन २००० मध्ये उत्तरप्रदेश—उत्तराखंड, मध्यप्रदेश—छत्तीसगड, आणि बिहारमधून झारखंड ही तीन राज्ये निर्माण करण्यात आली. या तीन राज्यांचे विभाजन होवून नव्याने निर्माण झालेल्या तीन राज्यानी प्रगतीच्या बाबतीत पूर्वीच्या तीन राज्यांना विकासाच्या बाबतीत मागे टाकलेले आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की विकासाच्या व प्रगतीच्या दृष्टीने छोटी छोटी राज्ये करण्याचे समर्थन योग्यच असल्याचे दिसून येते.

५. भाषावार प्रांतरचनेत मुंबई प्रांत बहुभाषिक ठेवण्यात आला होता. मात्र या बहुभाषिकतेत एक भाषी दुसऱ्या भाषिकावर वर्चस्व गाजवण्याची स्पर्धा सुरू ठेवून संघर्ष वाढताना महाराष्ट्राच्या प्रश्नावरून दिसते. राज्यकारभार व प्रशासनाच्या दृष्टीने ही राज्ये अयोग्य ठरतात.

६. भाषावार राज्यरचनेचा परिणाम प्रादेशिक भाषेचा वापर मोठया प्रमाणात केला जातो. यातून राष्ट्रीयत्वाची भावना कमी होवून प्रादेशिक अस्मिता जागृत होते व विलग राज्याच्या मागणीचा धोका वाढतो. यावर उपाय म्हणून डॉ. बाबासाहेबांनी देशाची एकच राष्ट्रभाषा हिंदी असावी. त्याकरिता प्रादेशिक भाषा राज्याची संपर्क भाषा मुळीच असू नये असे मत मांडले होते ते आजच्या स्थितीत योग्यच असल्याचे दिसते. आज राष्ट्रीय भावनेपेक्षा प्रादेशिक भावना अधिक जागृत होताना दिसत आहेत. जर अखंड भारताचे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर भारताची एकच राष्ट्रभाषा हिंदी करावी लागेल. यातून एकच भारतीय संस्कृती निर्माण होईल.

७. उत्तर भारतातील उत्तर प्रदेश, बिहार, व मध्यप्रदेश यांचे एकत्रीकरण झाल्याने भारतीय राजकारणात याच प्रांताचा कायम असलेले दिसते. जर वेळीच या राज्याचे विभाजन झाले असते तर संघराज्यात सर्व राज्याना समानतेची जाणीव निर्माण झाली असती. दक्षिण भारतीयांचा विरोध कमी होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागली असती.

भारतासारख्या बहुभाषिक देशात भाषिकवादाचा प्रश्न ज्वलंत आणि गंभीर होवून बसला आहे. आजही भारतात मोठया प्रमाणात स्वतंत्र राज्याच्या मागणीने जोर धरला आहे व त्यामुळे भारताची राष्ट्रीय एकता व अखंडता धोक्यात आली आहे. एकंदरित काय तर एक भाषा एक राज्य या तत्वाऐवजी एक राज्य एक भाषा हे तत्व अवलंबून प्रांताची रचना केली असती तर आज भारत एक विकसित राष्ट्र बनले असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दूरदृष्टी व अखंड भारत राहण्यासाठी त्यांची जी धडपड होती ती त्यांच्या विचारातून दिसून येते.

**५. संदर्भ :**

१. Dr. B.R.Ambedkar (1955), Thoughts on Linguistic States, Online Print.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (२०१०),भारताचे संविधान, डॉ. आंबेडकर साहित्य प्रचार मंडळ, नागपूर.
३. डॉ. मुनेष कुमार (२०१०),भारतीय राष्ट्रीय सुरक्षा, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस प्राइवेट लिमिटेड, नई दिल्ली.
४. डॉ. विजय जाधव (२०११),भारताची राष्ट्रीय सुरक्षा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
५. डॉ. सुधाकर कुलकर्णी (२००३),भारतीय शासन आणि राजकारण, अभिजीत पब्लिकेशन, लातूर.
६. डॉ. बिपिन चंद्र (२०००),इंडिया अफ्टर इंडिपेंडन्स, केसागर पब्लिकेशन, पुणे.

# 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधानातील भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार विषयक विचार'

**प्रा. डॉ. रजनी अ. बोरोळे**

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभागप्रमुख, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**प्रस्तावना -**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना देशाच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या महत्त्वाच्या सुधारकापैकी भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. कायदेपंडित, अर्थतज्ज्ञ, राजकीय विचारवंत, समाजसुधारक असलेल्या आंबेडकरांचे योगदान इतर नेत्यांच्या तुलनेत अधिक आहे कारण ते देशातील बहुजनांचे नेते होते. वर्षानुवर्ष अज्ञान अंधकारात खितपत पडलेल्या दलित, पद दलितांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे राहिले आहेत. स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री असलेल्या डॉ. बाबासाहेबांनी संविधानाच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले आहे. बहुजनांना मूलभूत हक्क बहाल करण्यात त्यांचे योगदान मोलाचे होते. भारतीय संविधानाच्या भाग तीन मध्ये मूलभूत अधिकाराबाबत चर्चा केली आहे. ज्यात समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणाविरुद्ध अधिकार, धर्म स्वातंत्र्याचा अधिकार, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार दिले गेले आहेत. प्रस्तुत लेखात नागरिकांना भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान समजून घेण्याचा प्रयत्न करू.

**गृहितके -**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा उल्लेख केला आहे.
2. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा प्रत्येक नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे.
3. भारतीय समाज व्यवस्थेचा विचार करता येथील बहुजनांना बोलण्याचा हक्क नव्हता.
4. स्वातंत्र्यानंतर सर्व भारतीयांना एका समान रेषेत आणण्यासाठी मूलभूत अधिकार बहाल करणे आवश्यक होते.

**उद्दिष्टे -**

1. भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांचा अभ्यास करणे.
2. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे स्वरूप समजून घेणे.
3. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत संविधानातील तरतूद विचारात घेणे.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण स्वातंत्र्य बहाल करण्यातील योगदान अभ्यासणे.

**तथ्य संकलन -**

प्रस्तुत शोध निबंध लेखनासाठी आवश्यक दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला जाईल. गरजेनुसार इंटरनेट वरील

माहितीचा आधार घेतला जाईल.

**प्रमुख संज्ञा -**

भारतीय संविधान, मूलभूत अधिकार, भाषण स्वातंत्र्याची तरतूद, मूक समाजास अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मूलभूत अधिकाराचे संरक्षण, भाषण स्वातंत्र्याची उपयुक्तता.

**विषय प्रवेश -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने लोक नेते होते. बहुजनांच्या न्याय हक्काचे रक्षण करताना त्यांनी इतर जनतेच्या स्वातंत्र्याची पायमल्ली होणार नाही याची काळजी घेतली. 'आंबेडकरांचा जन्म महू नामक ग्रामी 14 एप्रिल 1891 रोजी झाला. त्यांचे वडील सैन्यात होते. समाज सुधारणेची व दलितोन्नतीची प्रेरणा भीमरावांना त्यांच्या वडिलांकडून मिळाली.'[1] महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानून त्यांनी समाज सुधारणेचे कार्य हाती घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म दलित समाजात झालेला असल्यामुळे त्यांना अस्पृश्यतेचे दाहक चटके माहीत होते. 'बाबासाहेब आंबेडकरांवर मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून भारतीय संविधानाच्या निर्मितीची जबाबदारी सोपवली गेली होती. याशिवाय संविधान सभेच्या मूलभूत अधिकार समिती, अल्पसंख्यांक उपसमिती, सल्लागार समिती, ध्वज समिती, संघराज्य अधिकार समिती, संघराज्य घटना समिती व प्रांतिक घटना समिती अशा अनेक समित्यांवर सदस्य म्हणूनही आंबेडकरांनी काम केले. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत मोठा सहभाग असल्यामुळे आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार किंवा भारतीय संविधानाचे निर्माते म्हटले जाते.'[2] परिणामी दलितांना त्यांचे नैसर्गिक मूलभूत हक्क मिळावेत यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य खर्ची घातले आहे, हे नाकारता येत नाही.

**भारतीय संविधानातील मूलभूत अधिकाराची तरतूद -**

भारतीय संविधान निर्मितीचे कार्य जवळपास दोन वर्ष चालले हे सर्वज्ञात आहे. संविधान निर्मितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून बाबासाहेबांनी मोलाचे कार्य केले आहे. आधी मसुदा, नंतर चर्चा आणि त्याचे कायद्यात रूपांतर असे साधारण स्वरूप होते. नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या देशाला मार्गदर्शक ठरेल, लोकशाही प्रधान शासन प्रणाली टिकेल यासाठी संविधानात सर्वतोपरी तरतुदी केल्या गेल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे नागरिकांचे मूलभूत अधिकार होत. राज्य घटनेच्या तिसऱ्या भागात त्याबाबत चर्चा करून कायदे तयार केले गेले आहेत. 'अनुच्छेद 19 मध्ये दिल्या गेलेल्या मूलभूत अधिकारात स्वातंत्र्याचा अधिकार दिला असून त्यात भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा समावेश केला आहे. ज्यात भाषण स्वातंत्र्य आणि शांततेने विना शस्त्र एकत्र जमणे, अधिसंघ व संघ बनविणे, भारताच्या राज्य क्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करणे, भारताच्या राज्यक्षेत्रात कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा अधिकार असणे तसेच कोणताही पेशा अथवा व्यवसाय, उदिम किंवा धंदा करण्याचा अधिकार असणे या अधिकारांचा समावेश केला गेला आहे.'[3] वरील मूलभूत अधिकार म्हणजे भारतीय समाजातील पिचलेल्या, दबलेल्या, शोषित बहुजनांच्या मुक्तीच्या जाहीरनामा आहे. संविधान केवळ मूलभूत अधिकार बहाल करत नाही तर त्याचे रक्षण करण्याची हमी देते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची तरतूद -**

भारतीय संविधानातील तिसऱ्या भागात दिलेल्या मूलभूत अधिकारातील अनुच्छेद 19 मध्ये दिल्या गेलेल्या मूलभूत अधिकारात खंड 1 मधील (क) उपखंडामध्ये भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य याबाबत मार्गदर्शक तत्वे

सांगितली गेली आहेत.[4] भाषण स्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या कोणत्याही कृतीस प्रतिबंध करून कायद्याने त्याचे संरक्षण करण्याची ग्वाही संविधानाने दिली आहे.

अनेक पिढ्यांपासून कोणत्याही प्रकारचे हक्क नसलेल्या बहुजन समाजास बोलण्याचा ही हक्क नव्हता. केवळ निमूटपणे सहन करणे, नशीब समजून अन्याय सहन करणाऱ्या समाजास आपले मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य संविधानाने दिले. याबाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष आग्रही होते. लोकशाही शासन प्रणाली बळकट करण्यासाठी येथील सर्वसामान्य जनतेचे सहभाग वाढणे नितांत आवश्यक होते. येथील मूक समाजास अभिव्यक्त होण्याची नितांत गरज होती. हीच गरज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याच्या चौकटीत राहून पूर्ण केली आहे, हे मान्य करावे लागते.

'डॉ. आंबेडकर हे व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे समूहाचे आदेश तंतोतंत पाळण्यास व्यक्तीस भाग पाडणे अन्यथा तिला बहिष्कृत करणे अशा अयोग्य गोष्टी नष्ट होऊन सर्वांचे स्वातंत्र्य व हक्क जपले जावेत अशी त्यांची अपेक्षा होती.'[5] डॉ. शुभांगी राठी यांचे वरील मत विचारात घेतल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्य आणि हक्काच्या बाबतीत किती सजग होते याची साक्ष पटते. केवळ कायद्याने स्वातंत्र्य दिले असे न करता प्रत्यक्ष समाज जीवनात ते वापले जावेत अशी तरतूदही केली आहे. येथील सर्व सामान्य माणूस राजकीय दृष्ट्या स्वतंत्र असला तरी तो मानसिक, भावनिक, धार्मिक दृष्ट्या गुलाम होता. जोवर त्याला स्वतःचे मत असणार नाही तोवर त्याचा विकास होणार नाही, हे मर्म ओळखून भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अंतर्भाव संविधानाच्या मूलभूत अधिकारात करण्यात आला आहे.

**भाषण स्वातंत्र्याची उपयुक्तता -**

'आंबेडकरांच्या राजकीय चिंतनातील लोकशाही विचार हा केवळ आदर्शच्या स्वप्न रंजना तून उपजलेला नव्हता तर भोवतालच्या सामाजिक राजकीय वास्तवाच्या मुशीतून तो तावून सुलाखून निघाला होता.'[6] डॉ. भा. ल. भोळे यांचे वरील मत अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकशाही शासन प्रणाली क्रियांवित करणे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हेतू होता. लोकशाही याचा लोकाकडून लोकांसाठी चालविलेले राज्य असा ढोबळ अर्थ घेतला तर लोकशाहीचा कणा येथील सर्व सामान्य लोक ठरतात. जोवर त्यांचा आत्मविश्वास वाढत नाही तोवर लोकशाही शासन प्रणाली अस्तित्वात येणे आणि टिकणे शक्य झाले नसते. परिणामी जे विविध मूलभूत अधिकार दिले गेले त्यात भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकारात विशेष महत्त्व प्राप्त झाले. बहुजनांना जोवर स्वतच्या इच्छा, आंकाक्षा उघडपणे बोलता येणार नाहीत तोपर्यंत ये प्रगतीच्या मार्गावर येणार नाहीत. केवळ कायदे करून समानता प्रस्थापित होणे कदापि शक्य होणार नाही हे ओळखूनच संविधानकर्त्यांनी मूलभूत अधिकार सर्वांना बहाल केले आहेत.

'नवा विचार कोणतीही क्रांती मग ती राजकीय स्वरूपाची असो वा आर्थिक, शैक्षणिक वा सामाजिक असो, शांततेच्या व अहिंसेच्या मार्गाने घडविण्यात आली पाहिजे, तरच खरी लोकशाही होईल'[7] वरील मत विचारात घेतल्यास जिथे शस्त्र चालवायचे नसेल तिथे शब्द उपयोगी पडतात. अहिंसेचे, शांततेचे तत्व आ अवलांबण्याचे प्रभावी माध्यम संभाषण आहे. नवा विचार समाजात रुजविणे सोपे नसते. त्यातही आदिम काळापासून सामाजिक विषमता अनुभवलेल्या समाजास स्वत:च्या नैसर्गिक अधिकाराची जाणीव निर्माण करणारा विचार रुजविणे नक्कीच आव्हानात्मक होते. सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक कार्यात काहीही बोलण्याची मुभा नसलेल्या

समाजास मुक्तपणे बोलण्याचे स्वातंत्र्य देणेही प्रचंड आव्हानात्मक, अवघड काम होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ते बहुजनांना देऊन त्यांच्या मनातील युगायुगाचा अंधकार मिटवून स्वातंत्र्य झाल्याची भावना निर्माण केली आहे. जगात वर्णव्यवस्था, जातीयता, अस्पृश्यतेचे दाहक चटके भोगणारा समाज अस्तित्वात आहे. जन्माने येणारी श्रेष्ठ, कनिष्ठता जगातील अन्य देशांतही आहे. भारतात मूलभूत अधिकारास प्राधान्य देणारी लोकशाही आहे. परिणामी लोकशाही बळकट होण्यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्य अनन्य महत्त्वाचे ठरते हे नाकारता येत नाही.

**निष्कर्ष -**

'डॉ. आंबेडकर हे समाज सुधारक होते, राजकीय नेतेही होते. ते सच्चे राष्ट्रवादी आणि अखिल मानवांचे कल्याण चिंतनारे प्रतिभावंत लेखक होते. ते कायदा व न्याय शास्त्राचे पंडित होते, घटनाकार होते, धर्मप्रवर्तक होते. ते राष्ट्र पुरुष होते, ते युगपुरुष होते. डॉ. आंबेडकरांना जन्मतः च अलौकिक बुद्धीमत्तेची देणगी लाभली होती. त्याचा स्वभाव सतत विद्याभ्यासात रममाण होणारा होता. ते स्वतंत्र व प्रगल्भ प्रज्ञा असणारे विचारवंत होते. त्यांनी अन्य कोणाच्याही कार्याचे किंवा विचारांचे अनुकरण केले नाही. त्यांच्या समाज चिंतनात दूरदृष्टी होती, कार्यात अत्यंतिक तळमळ होती. हे सर्व विशेष त्यांच्या विचारांमध्ये प्रतिबिंबित झाले आहेत.'[८] वरील मत विचारात घेतल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या एकूण कार्य आणि विचारांची दिशा स्पष्ट करणारे आहे. ते जगातील विविध देशात जावून शिकलेले असल्यामुळे जगभरात मानव मुक्तीसाठी सुरू असलेले प्रयत्न त्यांनी जवळून अनुभवले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म एका दलित कुटुंबात झालेला असल्यामुळे त्यांनी दलितांच्या एकूण स्थितीची जाणिव होती. त्यांचा स्वतःचा शिक्षणाचा कालखंड अतिशय अपमानजनक होता. विदेशात उच्च शिक्षण घेऊनही त्यांना भारतात दुय्यम वागणूक मिळत असे, अस्पृश्यतेचे हे दाहक चटके सहन केल्यामुळे त्यांनी बहुजन, दलित, पीडित, स्त्री, शुद्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचे ठरविले. भारतीय संविधान निर्मितीच्या माध्यमातून त्यांनी येथील दलित, पीडित, बहुजनांसाठी प्रगतीचे मार्ग खुले करून दिले आहे. भाषण आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य बहाल करून त्यांनी मूक समाजाला वाचा दिली आहे. पुढीलप्रमाणे काही निष्कर्ष सांगता येतील.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत.
2. संविधानाच्या तिसऱ्या भागात अनुच्छेद 19 मध्ये मूलभूत अधिकारांची चर्चा केली आहे.
3. भाषण स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे मूलभूत अधिकारांमधील पहिला मूलभूत अधिकार आहे.
4. संचार स्वातंत्र्य, व्यापार स्वातंत्र्य, राज्याच्या कोणत्याही भागात स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य हे अन्य महत्त्वाचे मूलभूत स्वातंत्र्य भारतीय संविधानाने भारतीय नागरिकास दिले आहेत.
5. परंपरे पासून दबलेल्या, पिचलेल्या, बहुजन समाजास वाचा देण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे.
6. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ स्वतंत्र बहाल केले नाहीत तर त्याचे संरक्षण करण्याची तरतूदही भारतीय संविधानात केली आहे.
7. स्वत:च्या इच्छा, आकांक्षा, अपेक्षा, प्रसंगी नकार देण्याचे स्वातंत्र्य देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांना एक माणूस म्हणून मोठेपण बहाल केले आहे.
8. भारतीय लोकशाही मजबूत करण्यासाठी सर्व सामान्य जनतेचा सहभाग वाढणे नितांत आवश्यक होते. परिणामी मूलभूत स्वातंत्र्य देऊन सर्व सामान्य जनतेच्या मनात लोकशाही बद्दल आस्था निर्माण केली आहे.

9. भारतीय संविधान केवळ भारतीय जनतेस प्रेरणादायी नसून जगातील कोणत्याही लोकशाही प्रधान देशासाठी मार्गदर्शक आहे.
10. जन्माधिष्टित श्रेष्ठ कनिष्ठतेस मूठमाती देऊन समता प्रस्थापित करणारी शासनप्रणाली हे भारतीय संविधानाचे फलित आहे.
11. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य देऊन भारतीय समाजास सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राजकारणातील महत्त्वाचे नेते आहेत. नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताला केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळून उपयोगाचे नसून सामाजिक, धार्मिक, मानसिक, आर्थिक स्वातंत्र्य मिळणे आवश्यक होते, याची जाणीव त्यांना होती. परिणामी लोकशाही शासन प्रणालीत लोक हे महत्त्वाचे असतात म्हणून त्यांनी येथील सर्व सामान्य जनतेस सर्वार्थाने सक्षम बनविण्यासाठी त्यांना मूलभूत अधिकार दिले आहेत. एकूण मूलभूत अधिकारापैकी भाषण स्वातंत्र्याचा अधिकार हा पहिला अधिकार आहे. यावरूनही भाषण स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित होते.

**संदर्भ सूची -**


1. डॉ. भोळे भा. ल. - आधुनिक भारतातील राजकीय विचार - पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपूर - दु. आ. जून 2003 - पृ. 824.
2. https://mr.m.wikipedia.org
3. भारताचे संविधान - शासकीय प्रत - 1979 - पृ. 7.
4. तत्रैव - पृ. 7.
5. डॉ. राठी शुभांगी - भारतीय राजकीय विचारवंत - कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद - प्र. आ. 1 ऑगस्ट 2016 - पृ. 264.
6. उनी - आधुनिक भारतातील राजकीय विचार - पृ. 830.
7. सौ. जोशी शारदा - डॉ. बाबासाहेब आंबेडकर: संक्षिप्त चरित्र व विचारधन - विद्याभारती प्रकाशन, लातूर - पृ. 19.
8. तत्रैव - पृ. 3.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलनीती विषयक विचार व कार्य

संशोधक

**डॉ. शरद पुंडलिक कांबळे**

लोकप्रशासन विभाग प्रमुख, रामदास आठवले वरिष्ठ महाविद्यालय, निलंगा जि.लातूर

**प्रस्तावना**

भारत आज स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात वाटचाल करीत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनेकविध क्षेत्रात केलेले कार्य त्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, कायदेविषयक इत्यादी विषयांसह जलव्यवस्थापनाचे नियोजन, व्यवस्थापनासंबंधीची कार्ये आजही अद्वितीय स्वरूपाची आहेत. देशातील अनेक राज्य सरकारने जलनियोजन व व्यवस्थापनावर कार्य करताना दिसून येतात. प्रामुख्याने महाराष्ट्राचा विचार केला तर जलयुक्त शिवार योजना, पाणी आडवा पाणी जिरवा योजना, बंधाऱ्यांची निर्मिती अशी अनेक जलविषयक कार्ये महाराष्ट्रासह देशातील सर्वच राज्यात अधिकाधिक प्रमाणात होताना दिसून येतात. कारण भविष्यात येणाऱ्या संकटाला सामोरे जाण्याचे सामर्थ्य निर्माण व्हावे म्हणून केंद्र व राज्य सरकारने वेगवेगळ्या माध्यमातून कार्य करून जलव्यवस्थापन करीत असलेली दिसून येतात. देशात तर प्रत्येक पंचवार्षिक जलव्यवस्थापनावर अधिक आर्थिक तरतूद असलेली दिसून येते. '''पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून 54 वर्षांत निर्मित सिंचन क्षमतेत लक्षणीय वाढ होवून जून 2005 अखेर निर्माण सिंचन क्षमता 40.03 लाख हेक्टरपर्यंत पोहोचलेली आहे. त्यासाठी योजना काळात कार्यान्वित न झालेले व दृष्टिक्षेपातील प्रकल्प मार्च 2006 अखेरपर्यंत एकूण 33000 कोटींची गुंतवणूक करण्यात आली. आर्थिक वर्ष 2005–06 मध्ये 3970 कोटी रूपये गुंतवणूक झाली. त्यानुसार सुमारे 2 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती अपेक्षित होती. प्रगतीपथावरील 55 मोठ्या, 48 उपसा योजना, 121 मध्यम प्रकल्प आणि 852 लघू पाटबंधारे अशा एकूण 1076 प्रकल्पांची 1 एप्रिल 2006 रोजीची उर्वरित किंमत रूप्ये 36850 कोटी इतकी आहे. हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यावर सुमारे 35 लाख हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होणार आहे आणि अंतिम स्थानिक स्तर इतर प्रकल्पांसह भूपृष्ठावरील पाण्यातून सुमारे 55 लाख हेक्टर क्षेत्र हे सिंचनाखाली आणण्याचे लक्ष गाठण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे.''[1] भविष्यात उद्‌भवणाऱ्या दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनेत जलव्यवस्थापन व जलनियोजनावर अधिक प्रमाणावर भर देण्यात येतो.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

1)डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जलनीतीचा अभ्यास करणे.

2)डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जलनीती धोरण अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके**

1)डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जलनीती धोरण आजही उपयोगी आहे.

2)दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी बाबासाहेबांच्या जलनीती विचाराचे अनुकरण होत आहे.

3)बाबासाहेबांच्या जलनीती धोरणामुळेच देशाचा सर्वांगीण विकास शक्य आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यात विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, शोधनिबंध, वर्तमानपत्रे इत्यादींचा वापर करून माहिती संकलीत करण्यात आली आहे.

स्वातंन्त्र्यापूर्वी भारतात भरीव अशा स्वरूपाची जलसिंचन व्यवस्था करण्यात आली नव्हती. 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात पडलेल्या दुष्काळाला भारताला सामोरे जावे लागले. तेव्हा भारताने जलसिंचन आयोगाची स्थापना केली आणि या आयोगाच्या शिफारशीनुसार जलव्यवस्थापनाची पाहणी सुरूवात झाली आणि येथूनच देशातील जलव्यवस्थापनाची सुरूवात झालेली दिसून येते. यापूर्वी 1937 पर्यंतचा भारतातील जलव्यवस्थापनाचा व जलवापराचा अधिकार हा ब्रिटिश सरकारकडेच होता. म्हणजे भारतीयांना पाणी वापरावरही बंदी होती. पुढे 1942 ते 1946 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे ब्रिटिश सरकारमध्ये खनिज, सार्वजनिक बांधकाम, ऊर्जा, जलनियोजन या विभागाचे मंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. देशातील नद्या, उपनद्या, विद्युत प्रकल्प यावर तत्कालीन ब्रिटिश केंद्र सरकारचे नियंत्रण नसल्यामुळे कॅनॉल सारख्या व्यवस्थेमार्फत जलसिंचनाच्या सुविधा केल्या जात होत्या. देशात जलविद्युत विकास धोरण, पाणी व विद्युत विकसीत करण्यासाठी प्रशासकीय आराखडा निर्माण करणे, हिराकुड, दामोदर प्रकल्प या सर्व बाबींचा अभ्यास बाबासाहेबांनी केला. कारण या प्रकल्प व खात्याचे कार्य त्यांच्याकडेच होते. ब्रिटिश व्यवस्थेच्या जलव्यवस्थापनाच्या संदर्भात बाबासाहेब म्हणतात, एखाद्या प्रांतात विजेची गरज असते त्यासाठी तो प्रांत जलसामुग्रीचा वापर करू इच्छितो. पण तो तसे करू शकत नाही. कारण धरण बांधून जेथे पाणी अडवायचे ते दुसऱ्या राज्यात असते व त्या राज्यास काही देणे घेणे नसते. यावर उपाय सुचविताना ते म्हणतात, ''यासाठी घटनात्मक तरतुदींची गरज आहे. तरच जलमार्ग व लोहमार्ग याबाबतीत समानतेचा विचार करणे शक्य होईल. स्वायत्त प्राधिकरणाचा उपाय योग्य ठरेल. वीज प्रकल्पाच्या बाबतीत प्रादेशिक विकासासाठी नदी खोरे बहुउद्येशीय प्रकल्प हाच एकमेव मार्ग असू शकतो.''[2]

अलीकडेच 2002 ला केंद्र शासनाच्या जलसंपत्ती मंत्रालय विभागाने राष्ट्राचे जलनीतीविषयक धोरण ;छंजपवदंस ॅंजमत च्वसपबल.2002द्ध हा दस्तऐवज प्रकाशित केला आहे. या धोरणात ''कार्यक्षम व किफायतशीर जलसंसाधनाच्या व्यवस्थापनाकरिता त्यातील ज्ञानशाखांचे संशोधन वेगवेगळ्या दिशांनी गतिमान व्हायला हवे असे धोरण स्पष्ट केले आहे. त्या विषयात पाणी विषयक हवामानशास्त्र, बर्फ आणि सरोवराचे बाष्पीभवन, जमिनीवरील आणि भूगर्भातील जलसाठा, नद्यांतील वनस्पती व प्राणीविषयक शास्त्र, जलसंसाधनाचे मूल्यमापन, जलसाठा व भूगर्भातील जलविषयक पाण्याची गुणवत्ता व संवर्धन, बाष्पीभवन व गळती, पिके व पीकप्रणाली, मृदा तथा संसाधनाचे संशोधन, भूकंपविषयक अभ्यास, पाणीविषयक संरचनाची सुरक्षा व टिकावूपणा, जलसंसाधनाचे प्रकल्पाचे किफायतशीर आराखडे, रिमोट सेन्सिंग तंत्राचा विकास व व्यवस्थापन, जलाशयातील सेडिमेटेशन, समुद्र संसाधनाचा वापर, वातावरणाखालील प्रभाव, प्रांतिक समानता अशा अनेक बाबींचा अभ्यास राष्ट्राच्या जलनीतीविषयक धोरण 2002 मध्ये करण्यात आलेला आहे.''[3]

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जलनीती धोरण व अंमलबजावणी**

- नदी खोरे प्राधिकरण
- भारताचे स्वतंत्र जलधोरण
- पूरनियंत्रण जलसिंचन आंतराज्य पूरनियंत्रण
- जलमार्गाचा विकास

उपरोक्त सर्व बाबींचा अभ्यास व प्रत्यक्ष या विभागाची जबाबदारी पार पाडून अनुभवली होती. पुढे या सर्व महत्त्वपूर्ण मुद्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात समाविष्ट केले. केंद्र सरकारने 1956 ला आंतरराज्य जलविवाद कायदा, नदी मंडळ कायदा व आंतरराज्य नद्या व खोरे यांच्यातील पाणी तंट्याबाबत लवाद यांचीही तरतूद भारतीय संविधानात करण्यात आल्याचे दिसून येते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जलनीती संदर्भातील नियोजन व व्यवस्थापनामुळे जलतज्ज्ञ म्हणूनही त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. स्थानिक लोकांना विद्युत तंत्रज्ञान, वीज केंद्राची उभारणी, देखभाल दुरूस्ती, यंत्रसामुग्रीची माहिती यासाठी एक वीज संशोधन ब्यूरोची कल्पना बाबासाहेबांनी मांडली आणि विभागामार्फत काही निवडक अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण व उच्चशिक्षणासाठी बाहेर देशात पाठवले. या मागचा बाबासाहेबांचा उद्देश होता की, जर भारतात औद्योगिकीकरण झपाट्याने झाले तर देशातील गरिबी, दारिद्र्य, बेरोजगारी संपुष्टात येऊन प्रत्येकाच्यो हाताला काम मिळेल यासाठी जलनियोजनासह विद्युत निर्मितीसाठीही बाबासाहेबांचे विचार व कार्य उल्लेखनीय वाटतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडे जलनियोजनाचे खाते असताना त्यांनी प्रामुख्याने हिराकुड, दामोदर, सोन प्रकल्प यांना चालना देवून दामोदर नदीवर धरण बांधण्यासाठी सर्वेक्षण करून बिहार व बंगाल या प्रमुख राज्यांच्या विशेष सहकार्याने हा प्रकल्प लवकरच उभारण्यात आला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा प्रमुख विचार याठिकाणी महत्त्वाचा वाटतो तो म्हणजे रेल्वेमार्गाला जशा प्रांतीय सीमा नाहीत तशाच जलमार्गालाही प्रांतीय सीमा नसाव्यात. पुढे 1944 ला सोन नदीखाऱ्याचा प्रकल्प हाती घेवून वीजपुरवठा, जलसिंचन, वीजनिर्मिती, पूरनियंत्रण अशा स्वरूपाची उद्दिष्ट्ये समोर ठेवून त्यांनी सोन नदीवरील धरणाचीही प्रक्रिया पूर्ण केली. पुढे 1946 ला हिराकुड धरणाच्या पायाभरणीचा आढावा घेताना नद्यांच्या विकासाकरिता बहुउद्देशीय योजनांची अंमलबजावणी केली. त्यात जलाशय बांधणे, नद्यांचे सर्वेक्षण करणे, पाण्याचा वापर जपून करणे अशा अनेक स्वरूपाच्या सूचना त्यांनी तत्कालीन ओरिसा सरकारला सुचवून 15 मार्च 1946 ला हिराकुड धरणाची पायाभरणी केली.

बाबासाहेबांच्या जलनीतिविषयक विचार व कार्यामुळे त्यांना 'जलतज्ज्ञ' म्हणूनही ओळखले जाते. त्यांनी तत्कालीन वेळ केलेल्या जलनियोजनाचा प्रभाव म्हणजे आज अस्तित्वात असलेले उत्तम जलव्यवस्थापन होय. त्यांचे कार्य हे एका विशिष्ट चौकटीतील नसून विशाल व महाकाय अशा सर्वच क्षेत्रात असलेले दिसून येते. त्यांनी तत्कालीन परिस्थितीत केलेले भाकीत आज प्रत्ययास येताना दिसून येते.

स्वतंत्र भारताची अमृत महोत्सवाकडे होत असलेली वाटचाल व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 131 वी जयंती निर्मित्त त्यांच्या जलव्यवस्थापन व धोरणावर आजही देश पूर्णतः अवलंबून असल्याचे दिसून येते. याचाच परिपाक म्हणजे देशात आजही बहुतांश राज्यात पाण्याचा तुटवडा किंवा देशात दुष्काळ पडलेला नाही. बाबासाहेबांनी सांगितलेल्या नदीजोड प्रकल्पासारखे अनेक विषयाकडे शासनाने लक्ष दिले तर देश आणखी 'सुजलाम् सुफलाम्' म्हणजेच विकसनशीलतेकडून विकसीततेकडे प्रयाण करण्यास वेळ जागणार नाही.

## निष्कर्ष

1) केंद्र सरकार आपल्या नियोजन व्यवस्थापनात आजही जलव्यवस्थापनाला अग्रस्थानी ठेवते.
2) दुष्काळ व पूर परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बाबासाहेबांनी मांडलेल्या जलव्यवस्थापना संबंधीच्या विचारांची अंमलबजावणी आजही होते.
3) नदीजोड प्रकल्प, बंधारे, धरण, पाझर तलाव यांची निर्मिती अत्यंत महत्त्वाची आहे.

## संदर्भ सूची

१. सिंचन स्थितीदर्शक अहवाल, महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग 2005–06, पृ.क्र.25

२. प्रा.डॉ.सुधीर गव्हाणे, 'प्रशासक डॉ.बाबासाहेब आंबेडकर', प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद, 2006, पृ.क्र.39

३. डॉ.दत्तात्रय तुकाराम गायकवाड, 'जलतज्ज्ञ डॉ.बाबासाहेबे आंबेडकर', प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद, 2016, पृ.क्र.144

# 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि बहुजनातील सामाजिक बदल'

**प्रा. डॉ. एस. पी. घायाळ**

प्राध्यापक, समाजशास्त्र विभागप्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद ता. अहमदपूर जि. लातूर.

आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. 15 ऑगस्ट 1947 रोजी इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झालेला आपला देश संविधानाच्या मूलभूत तत्वांच्या आधीन राहून एक लोकशाही प्रधान देश म्हणून जगात नावारूपास आला तो 26 जानेवारी 1950 नंतर. एकूण स्वातंत्र्य ही केवळ राजकीय बाब नसून सामाजिक, भावनिक, मानसिक ही आहे. भारतीय जनतेला सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करून मोकळा श्वास घेऊ देण्यात ज्या महान सुधारक, क्रांतिकारकांनी आपल्या सबंध आयुष्याचे बलिदान दिले त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अग्रणी आहेत. त्याचे योगदान केवळ भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार इतकेच मर्यादित नसून वर्षानुवर्षे गुलामीत खितपत पडलेल्या शुद्रतिशुद्र, स्त्रियांना त्यांनी वाचा दिली. बहुजनांना उभे करण्याचे प्रभावी मध्यम म्हणून त्यांनी वृत्तपत्रे सुरू केली. 31 जानेवारी 1920 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. आज या ऐतिहासिक घटनेला शंभर वर्ष उलटून गेली आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे निर्माते, कायदेपंडित, अर्थतज्ञ अशा अनेक अंगांनी जगाला परिचित आहेत. याच्या जोडीला एक निर्भीड, सत्यशोधक पत्रकार म्हणूनही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. महात्मा जोतिबा फुले यांच्या विचार व कार्याला गुरुस्थानी ठेवून त्यांनी बहुजन समाजसुधारणेच्या कार्याला सुरुवात केली. जन्माला येणारी प्रत्येक व्यक्ती ही सारखीच असते, हे साधे सरळ सूत्र सत्यशोधकी सुधारक, विचारवंतांनी स्वीकारले होते. भारतीय समाजात प्रचलित असलेली जातीयता, अस्पृश्यता, गुलामगिरी ही निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित असून त्याच्या मुळाशी मूठभरांचे आर्थिक हितसंबंध होते, हे नाकारता येत नाही. कालांतराने बहुजनांच्या मनीमानसी रुतून बसलेली सर्वप्रकारची गुलामगिरी नष्ट करणे हे मोठे आव्हान होते. यासाठी सुधारकी विचारांच्या प्रसार आणि प्रचाराचे प्रभावी माध्यम असलेली वृत्तपत्रे बहुजनांच्या हाती असणे आवश्यक होते. ही तत्कालीन गरज ओळखून समकालीन प्रस्थापित वृत्तपत्र आणि पत्रकारांशी तितक्याच ताकदीने स्पर्धा करणारी बहुजनांची स्वतंत्र वृत्तपत्रे सत्यशोधक सुधारकांनी सुरू केली. वास्तविक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही काही पोटभरू किंवा प्रचारकी पत्रकारिता नव्हती, तर तिला समाजोद्धाराचे पर्यायाने राष्ट्रोद्धाराचे मूलभूत अधिष्ठान लाभलेले होते. अज्ञान, दारिद्र्य तसेच मानसिक, भावनिक, शारीरिक गुलामगिरीत दबलेल्या पिचलेल्या बहुजनांना स्वतःचा आवाज 'मूकनायक'च्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. मूकनायक, जनता, बहिष्कृत भारत, समता, प्रबुद्ध भारत अशी पाच वृत्तपत्रे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर आहेत. प्रस्तुत लेखात म्हणून मूक बहुजनांच्या वेदनांना वाचा फोडण्याच्या कामी प्रभावी माध्यम ठरलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारिता आणि बहुजनांतील सामाजिक बदलाचा संक्षेपाने विचार करू.

**उद्दिष्टे -**

1. आधुनिक काळातील बहुजन पत्रकारितेचे स्वरूप अभ्यासणे.

2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेमागील भूमिका अभ्यासणे.
3. एकूण मराठी वृत्तपत्र क्षेत्रातील बहुजन वृत्तपत्रांचे योगदान अभ्यासणे.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक निर्भीड पत्रकार समजून घेणे.

**गृहितके -**

1. मराठी वृत्तपत्रसृष्टीत असलेल्या बहुजन पत्रकारितेच्या प्रदीर्घ परंपरेचा विचार होणे आवश्यक आहे.
2. दुःखी, पीडित, स्त्री शूद्रांना हक्काचे विचारपीठ मिळाले.
3. लोकजागृती, बहुजनांचे सर्वांगीण हीत हा बहुजन पत्रकारितेचा मुख्य हेतू होता.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांची पत्रकारिता सुरू करून प्रस्थापित वृत्तपत्रास समर्थ पर्याय दिला आहे.
5. पत्रकारिता ही केवळ बातम्या प्रकाशित करण्याचे, मनोरंजनाचे, जाहिराती छापण्याचे माध्यम न राहता परिवर्तनवादी विचार प्रचार आणि प्रसाराचे महत्वाचे माध्यम ठरू शकतात हे सिध्द झाले आहे.

**प्रमुख संज्ञा -**

मूकनायक, बहुजन पत्रकारिता, मानव मुक्तीचा जाहीरनामा, मूक वेदनांना वाचा फोडणारी पत्रकारिता.

**तथ्य संकलन -**

प्रस्तुत लेख लिहिण्यासाठी द्वितीयक साधनांचा आधार घेतला जाणार आहे. गरजेनुसार इतर आधुनिक तंत्रांचा आधार घेतला जाईल. इंटरनेट वरील महत्त्वाच्या माहितीचा आधार घेऊन लेख अधिक अद्यावत करण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषय प्रवेश -**

वरील गृहितके आणि उद्दिष्टे निश्चित करून पुढील प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचे मूल्य समजून घेऊ. एकीकडे भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि दुसरीकडे बाबासाहेबांनी मानवमुक्तीसाठी सुरू केलेल्या वृत्तपत्रास 100 वर्ष पूर्ण होत आहेत हा योगायोग निश्चितच प्रेरणादायी ठरणारा आहे. 1920 हे साल अनेक अर्थांनी महत्त्वाचे आहे. याच वर्षी टिळक युगाचा अस्त होऊन गांधियुगाला सुरुवात झाली. "1920 नंतर बाबासाहेबांच्या चळवळीचा आगडोंब उसळला होता. या चळवळीने समाजाला मूल्ययुद्धच्या रणांगणावर नेले."[1] त्याच्या जोडीला 31 जानेवारी 1920 रोजी 'मूकनायक' नावाचे पाक्षिक सुरू करून मूक बहुजनांच्या वेदनेला वाचा फोडण्याचे कार्य केले. सामाजिक न्याय, समता, बंधुता, कायदा, मूलभूत हक्काची जपणूक करणारे वृत्तपत्रीय लेखन बाबासाहेबांनी केले. पुढे त्यांच्या मुल्याधारीत पत्रकारितेचा विचार करू.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बहुजनांच्या वेदनेस वाचा फोडणारी पत्रकारिता -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक निर्भीड, सत्यावर निष्ठा असलेले पत्रकार आहेत याचे महत्त्वाचे कारण असे की, त्यांनी पत्रकारिता बहुजनांच्या न्याय हक्काच्या प्राप्तीचे महत्त्वाचे साधन म्हणून वापरली. एकीकडे प्रस्थापितांच्या एकाधिकारशाहीचा निषेध करणे आणि दुसरीकडे बहुजनांना उन्नतीसाठी प्रेरित करणे हा दुहेरी हेतू त्यामागे होता. भारत पाटणकर यांनी म्हटल्याप्रमाणे, "सत्यशोधक नाव हे केवळ संघटनेचे नाव म्हणून स्वीकारले नव्हते तर सत्यशोधन ही जीवनरीत म्हणून स्वीकारण्याचा दृष्टिकोन त्यामागे होता...एक सामाजिक आणि व्यक्तिगत आचरणाचे मूल्य म्हणून जोतिबांनी सत्याची मांडणी केली आहे."[2] वरीलप्रमाणे डॉ. बाबसाहेब आंबेडकर

यांच्या जगण्याचे ध्येयही सत्यशोधन हेच होते. त्यांच्या लेखन, भाषणातून हीच भूमिका प्रामुख्याने व्यक्त होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने मास लीडर होते. आपल्या ज्ञानाचा वापर सर्वसामान्य बहुजनांना व्हावा यासाठी सर्वसामान्य जनतेच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. सामान्य जनतेतून समविचारी कार्यकर्ते जमवून परिवर्तनासाठी बहुजनांना प्रेरित करण्यास सुरुवात केली. याच कार्याचा एक भाग म्हणून त्यांनी वृत्तपत्रांची सुरुवात केली होती, असे म्हणता येईल. "अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करण्याकरिता त्यांनी अस्पृश्य वर्गातील कार्यकर्त्यांची संघटना उभारण्यास सुरुवात केली; मुंबई येथे 31 जानेवारी 1920 रोजी 'मूकनायक' नावाचे पाक्षिक काढले,"[3] बहुजनांचे प्रश्न, समस्या, मागण्या कितीही रास्त असल्या तरी प्रस्थापित पत्रे ती त्यांच्या वृत्तपत्रात छापणार नाहीत याची त्यांना खात्री होती. केवळ याच कारणासाठी त्यांनी प्रसंगी पदरमोड करून ही वृत्तपत्रे चालविली होती, हे मान्य करावे लागते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ 'मूकनायक' या एकाच पत्रावर थांबले नाहीत. पुढीलकाळात त्यांनी इतर चार पत्रे काढल्याची नोंद आहे.

1. 3/4/1927 रोजी बहिष्कृत भारत नावाचे वृत्तपत्र सुरू केले.
2. 29/9/1928 रोजी समता नावाचे पाक्षिक सुरू केले.
3. 24/11/1930 रोजी जनता नावाचे वृत्तपत्र सुरू केले.
4. 4/2/1956 रोजी प्रबुद्ध भारत नावाचे वर्तमानपत्र सुरू केले.[4]

वरील वृत्तपत्रापैकी जनता आणि प्रबुद्ध भारत ही त्यांच्या चळवळीची मुखपत्रे होती. चळवळ जनमानसात रुजविण्यासाठी सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या मनात आत्मीयता निर्माण होणे आवश्यक असते, ही व्यवहार्यता लक्षात घेऊन त्यांनी वरील पत्रांचे संपादन स्वत: न करता सहकाऱ्यांकडून करून घेतले.

बहुजन हीत हा हेतू असल्यामुळे बाबासाहेबांचे वृत्तपत्रातील प्रत्येक मजकुरावर बारीक लक्ष असे. मुळात वृत्तपत्रात लेखन करणारे व पत्र चालविण्यासाठी मदत करू शकणारे बहुजन लेखक, संपादक मिळणे सहज शक्य नसल्यामुळे लेखन, संपादन, व्यवस्थापन याची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावरच असे. थोडक्यात, बाबासाहेबांची पत्रकारिता सखोल जाणून घेण्यासाठी 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' ही पत्रे त्यासाठी आधारभूत आहेत. या पत्रांमधून डॉ. आंबेडकरांच्या पत्रकारितेचे समग्र दर्शन घडते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेमागील मानवीय दृष्टिकोन –**

मानवीय हेतूने प्रेरित असलेली एक कृती हजार व्याख्यानाच्या तुलनेत अधिक प्रभावी असते. बाबासाहेब केवळ बोलके सुधारक नव्हते तर ते प्रत्यक्ष बहुजनांच्या हिताला प्राधान्य देऊन कृती करणारे सुधारक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता सुरू करण्यामागची भूमिका अगदी स्पष्ट होती. बहुजनांच्या न्याय हक्कांसाठी हक्काचे साधन असावे ही त्यामागची भूमिका होती. तत्कालीन देशाचे स्वातंत्र्य आणि समाजसुधारणा याच्या जोडीला मानव मुक्तीचे संदेश देणारी पत्रकारिता हे बाबासाहेबांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

**"काय करू आता धरूनिया भीड। नि:शंक हे तोंड वाजविले।।**
**नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण। सार्थक लाजून नव्हे हित।।"[5]**

वरीलप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मूकनायक'च्या सुरवातीलाच आपली पत्र कढण्यामागची भूमिका स्पष्ट केली होती. मूक समाजाच्या व्यथा, वेदनांना वाचा फोडणे, तत्कालीन समाजातील भुके कंगाल

अस्पृश्य, बहुजनांना त्यांचे नैसर्गिक हक्क मिळावेत, त्यांना त्यांच्यातील माणूसपणाची जाणीव व्हावा हा यामागे मुख्य हेतू होता. तत्कालीन राज्य व राष्ट्रीय स्तरावरील नेते स्वातंत्र्यासाठी जितक्या हिरीरीने, त्वेषाने बोलत होते तितक्याच पुढाकाराने समाजातील विषमता नष्ट होण्यासाठी प्रयत्न करताना दिसत नव्हते. एकप्रकारे त्यांना परंपरेपासून चालत आलेली गुलामगिरी मान्य होती. डॉ. बाबासाहेबांना तत्कालीन राजकीय नेत्यांचा हा दुटप्पीपणा मान्य नव्हता. एकीकडे देशाच्या स्वातंत्र्यासाठी आवाज उठवताना त्यांनी मानवमुक्तीचे झेंडाही आपल्या खांद्यावर घेतला होता, हे मान्य करावे लागते.

तत्कालीन भारतीय तसेच जगभरातील सर्वार्थाने मुक्या असलेल्या समाजाला विविध पत्रे काढून त्यांनी खऱ्या अर्थाने आवाज दिला आहे. व्यवस्थेने हजारो वर्षांपासून आवाज दाबून टाकलेल्या समाजाला मूकनायकच्या रूपाने नवा आवाज त्यांनी दिला. त्यांच्या या विचार आणि कार्याची प्रासंगिकता अजून संपलेली नाही.

मानवमुक्तीच्या आड येणाऱ्या कोणत्याही प्रतिगामी मूल्यांचा निषेध करणे, समतेच्या प्रस्थपनेसाठी जनमत जागृत करणे, बहुजनांचा आत्मविश्वास वाढविणे, तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेला शह देणारी व्यवस्था निर्माण करणे हे त्यांच्या लेखन व कार्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्यांचा वृत्तपत्रांचा हेतू केवळ राजकीय विकासास प्राधान्य देणारा नव्हता. तर अनंत काळाची गुलामगिरी संपुष्टात आणण्यासाठी आवश्यक जनमत निर्माण करण्याच्या हेतूने प्रेरित झालेली त्यांची पत्रकारिता खऱ्या अर्थाने मानव मुक्तीचाच जाहीरनामा आहे, असे म्हटल्यास वावगे ठरत नाही.

आज आधुनिक काळात जगातील कोणत्याही देशात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक दृष्टीने पत्रकारिता महत्त्वाचे अंग राहिली आहे. खास करून भारतात पत्रकारिता ही लोकशाहीचे चौथे स्तंभ ठरली आहे. वृत्तपत्रे समाजाचे कान आणि डोळे आहेत. भविष्यात देशाची राजकीय, सामाजिक दिशा कशी असावी हे ठरविण्याचे सामर्थ्य पत्रकारितेमध्ये आहे. दलित, आंबेडकरी चळवळ आणि साहित्याला दिशा देण्याच्या कामी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता मोलाची ठरल्याचे नकारता येत नाही. आजची पत्रकारितेतील अनावश्यक स्पर्धा पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचा वसा आणि वारसा घेऊन आजच्या पत्रकारितेने पुढील काळात वाटचाल करणे गरजेचे आहे. थोडक्यात विचाराभिव्यक्तीतील समतोलपणा, संयम, सामाजिक भान पत्रकारितेच्या मुळाशी असणे हे समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उपकारक आहे, हे मान्य करावे लागते.

**निष्कर्ष -**

वरीलप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचा संक्षेपाने विचार करता येईल. त्यांचा मूळ पिंड राजकीय विचारवंत, कायदेतज्ज्ञ असा असला तरी शुद्रातीशूद्र बहुजन समाजाचे हीत सर्वार्थाने व्हावे या एकाच ध्येयाने ते प्रेरित झाले होते. सत्यशोधकी विचार परंपरेचे ते पाईक होते. त्यांनी गुरुस्थानी मानलेल्या महात्मा फुले यांनी हाती घेतलेले कार्य नेटाने पुढे चालू ठेवले होते. प्रचंड कामाचा व्याप सांभाळून त्यांनी पत्रकारितेचा प्रपंच मांडला होता.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकूण पाच वृत्तपत्रे चालविली.
2. बहुजन हीत नजरे समोर ठेऊन त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक निर्भीड पत्रकार होते.
4. साधारण शंभर वर्षापूर्वी प्रस्थापितांनी एकाधिकारशाही मोडीत काढून त्यांनी मूक समाजाला आवाज दिला आहे.

5. वृत्तपत्र क्षेत्रातील कोणत्याही संस्काराशिवाय त्यांनी वृत्तपत्रे सुरू केली.
6. सत्यशोधक पत्रकारितेच्या प्रदीर्घ परंपरेच्या प्रेरणेतून त्यांची पत्रकारिता आकारास आली आले.
7. सत्यशोधन हे त्यांच्या पत्रकारितेचे महत्त्वाचे विशेष आहे.
8. त्यांची पत्रकारिता बहुजन जागृतीचे महत्त्वाचे माध्यम होती.
9. पत्रकारिता म्हणजे केवळ बातम्या प्रकाशित करण्याचे, मनोरंजनाचे, जाहिराती छापण्याचे माध्यम नसून परिवर्तनवादी विचार प्रसाराचे प्रभावी माध्यम ठरू शकते हे त्यांनी सिद्ध केले आले.
10. त्यांनी सुरू केलेल्या पत्रांनी तत्कालीन समाज मन जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे.
11. डॉ. बाबासाहेबांनी एक निर्भीड पत्रकार म्हणूनही आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे.
12. आंबेडकरी चळवळ, परिवर्तनवादी तसेच विद्रोही साहित्य निर्मितीला बळ देण्याच्या कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्राचे योगदान मोलाचे राहिले आहे.

वरीलप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि बहुजनातील सामाजिक बदल या संबंधाने संक्षेपाने विचार करता येईल.

**संदर्भ सूची:**


1. डॉ. राजकुमार मस्के व इतर - अण्णा भाऊ साठे: व्यक्ती, साहित्य आणि समीक्षा - युगप्रवर्तक प्रकाशन, बाभळगाव - प्र. आ. 14 एप्रिल 2019 - पृ. 13
2. पाटणकर भारत - महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष - लोकवाङ्मय गृह, मुंबई - चौ. आ. नोव्हेंबर 2003 - पृ. 51.
3. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - (संपा.) - मराठी विश्वकोश खंड 1 - महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई - 1976 - पृ. 878.
4. मून जी. एम. - बहुजनांची वृत्तपत्र चळवळ - युगसाक्षी प्रकाशन, नागपूर - प्र. आ. 24 ऑक्टोबर 2012 - पृ. 16.
5. Lhttps://marathi.webduniya.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अरक्षण

**प्रा. डॉ. जे. टी. कांबळे**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर जि. लातूर

**प्रस्तावना -**

भारताच्या इतिहासात सात ते आठ हजार वर्षापूर्वी सिंधू संस्कृतीमध्ये भारतातील बहूजन नागवंशियाचे राज्य होते. तेंव्हा मातृसत्ताक कुटुंब पद्धती होती. समता आधारीत राज्यव्यवस्था होती. परंतु चार हजार वर्षापूर्वी आर्याचे भारतावर आक्रमन झाले त्यानी वेदामध्ये पुरुष सत्ताद्वारे प्रथम वर्ण व्यवस्था व जाती व्यवस्था निर्माण केली. अस्पृश्यता केली. त्यानंतर मनुस्मृतीद्वारे भारतात पुरुषसत्ताक कुटुंब पद्धती निर्माण केली. सर्व समाजाच्या महिला, ओबीसी, एस.टी. भटके व अल्पसंख्यांक याना सामाजिक, धार्मिक, मानसीक, आर्थिक गुलाम बनविले. मनुस्मृती कायद्याप्रमाणे महिलाना व बहूजन, अस्पृश्याना शिक्षण बंदी, रोटी, बेटी बंदी, शस्त्रबंदी करण्यात आली. महिलाना स्वातंत्र्य नव्हते. वेद मंत्र म्हणण्याचे, पूजा करण्याचा, शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. संपत्तीत अधिकार नव्हता. ओबीसीना अनुसूचीत जाती जमातीना कोणतेच अधिकार नव्हते. ब्राह्मणाना सर्वच अधिकार होते. वेद, शिक्षण घेण्याचा अधिकार होते. उच्चवर्णीय म्हणणाऱ्या ब्राह्मनानी शिक्षण व संपत्तीत सर्वप्रथम अरक्षण स्वत:साठी घेतले. अशा प्रकारे अरक्षण त्यानी सर्वप्रथम स्वत:साठी सुरु केले. हजारो वर्षे महिला व बहूजन, अस्पृश्य गुलाम राहिला, अज्ञानी राहिला.

सुमारे अडिच हजार वर्षापूर्वी तगात भगवान बुद्धानी शोषणाविरुद्ध सामाजिक, क्रांती केली. सर्वाना स्वातंत्र्य व अधिकार दिले. त्यांच्यामुळे सम्राट चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक राजे बनले. सुमारे बाराशे वर्षे बुद्धधम्मामुळे सर्व भारताची प्रगती झाली. नंतर पुढे इ.पूर्व १८५ मध्ये सम्राट अशोकाचे पंतू बुद्धस्थाची हत्या पंडीत सेनापती पुष्यमित्र शुंग याने केली. पुन्हा वैदिक शासन सुरु झाले. मनुस्मृती हा काळा कायदा तयार करण्यात आला. सर्वत्र गुलामी सुरु करण्यात आली. त्यानंतर सुमारे बाराशे वर्षे बुद्ध धम्माचा प्रकाश नाहीसा झाला व सर्वत्र अज्ञानाचा अंधार पसरला.

भारतात सुमारे सातशे वर्षे सत्ता होती. मात्र वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था कायम होती. त्यांच्या राज्यात उच्चवर्णिय पंडीत बारम्हण होतेच. इ.स. १६३० ला छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. त्यांचे समतावादी राज्य होते. पुढे संभाजी राजेंची जातीयवादी लोकानी केली. छत्रपती शिवाजी महाराजाचे राज्य पेशव्यानी ताब्यात घेतले. पेशवा राशेबाच्या काळात खुप अत्याचार झाले. पुढे १ जानेवारी १८ ला भीमा कोरेगाव रणसंग्रामात सिधनाक महार व त्याच्या नेतृत्वाखालील ५०० महार सैनिकानी पेशवाई नष्ट केली.

महात्मा जोतिराव फुले व माता सावित्रीबाई फुले यानी सर्वांसाठी १८४८ साली शाळा काढून सर्वांसाठी शिक्षण खुले केले. त्यांच्या कार्यामुळे महिला व बहूजन वर्ग शिक्षण घेवू लागला. इ.स. १७५७ ला ब्रिटिश शासन सुरु झाले व १८५७ ला पक्के झाले. इंग्रजानी समतेचे कायदे केले. छत्रपती शाहू महाराजांच्या राज्यात प्रशासनात पूर्ण उच्चवर्णिय होते. त्यामुळे त्यांनी १९०२ ला ५०% आरक्षणाचा कायदा केला. सर्वप्रथम म. फुले यानी आपल्या तृतीय रत्न या नाटकात आरक्षणाची मागणी केली.

सुरुवातीलाला उच्चवर्णियाना शिक्षणाचा अधिकार असल्याने तेच शिकले. इंग्रजाच्या काळात भारतीयाना मोठ्या नौकरीच्या पदावर घेत नव्हते. त्या काळात राष्ट्रीय पुढाऱ्यानी इंग्रजाना सांगीतले की,

भारतीयाना प्रशासनात घेण्यात यावे. सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या अनुसूचीत जाती-जमातीना वर्गात प्रवेश नव्हता. स्वत: बाबासाहेबाना वर्गाच्या बाहेर बसून शिकावे लागले. त्याना पिण्यासाठी पाणी मिळत नव्हते. त्याना स्पृश्य-अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले. सुरुवातीला इंग्रज सैन्यात गेलेल्याना शिक्षण मिळत होते. त्यांच्या घरातील व्यक्तीना पण शिक्षण मिळत होते. पण बहूजन मागासवर्गीय व महिला हे सर्वजण हजारो वर्षापासून सामाजिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या मागासलेले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी सर्वाना शिक्षण, नौकऱ्या, समान अधिकार मिळावा म्हणून आंदोलन केले. १९२७ ला मनुस्मृती जाळली. ग्रंथप्ेमी असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी हजारो पुस्तके वाचली, जमा केली. मात्र अन्यायी, जुलमी कायदे असलेली मनुस्मृती मात्र जाळली. डॉ.बाबासाहेबाना रामजीबाबानी शिकवले.

राजे सयाजीराव गायकवाडानी संधी देवून अमेरिकेला पाठवले. ते एम.ए. पीएच.डी. झाले. इंग्लंडला स्वखर्चाने बॅरिस्टर झाले. पुढे सायमन कमिशन १९२८ ला भारतात आले. तेंव्हा भारतीय कांही नेत्यानी बहिष्कार टाकला. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी इंग्रज सायमन कमिशनला निवेदन देवून मागासलेल्या लोकासाठी सर्वप्रथम आरक्षणाची मागणी केली. कारण त्यावेळी पोलीस, लष्कर व नागरी सेवत मागासवर्गीयाना जातीयवादामुळे प्रवेश नव्हता. म्हणून इंग्रजानी इ.स. १९२८ ला साडे आठ टक्के आरक्षण अनुसूचीत जाती-जमातीना दिले. जेंव्हा छत्रपती शाहू महाराजानी ५०% आरक्षण सुरु केले. तेंव्हा जातियवाद्यानी विरोध केला.

१९३०-३१ ला लंडन येथे गोलमेज परिषद झाली. त्यावेळेस मुस्लिम, शिख याना स्वतंत्र मतदार संघ दिले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी अनुसूचीत जाती-जमातीना स्वतंत्र मतदार संघ मागीतला व तो इंग्रजानी दिला. मात्र गांधीजीना अनुसूचीत जाती-जमातीच्या स्वतंत्र मतदार संघास विरोद दर्शवीला. गांधी त्या विरोधात येरवाडा तुरुंगात उपोषणास ब सले. नाईलाजास्तव डॉ.बाबासाहेब आंबेडकराना पूणे करारावर स्वाक्षरी करावी लागली आणि गांधीस वावले.

गांधीमुळे बाबासाहेबानी स्वतंत्र मतदार संघाची मागणी माग घ्यावी लागली. त्यावेळेस अनुसूचित जाती जमातीला राजकीय आरक्षण म्हणजे कायदेमंडळात सदस्यत्व देण्यात आले होते. अनुसूचीत जाती जमातीना नोकऱ्यात आरक्षण देण्यात आले होते. पूण कराराच्या तरतुदी १९३५ च्या भारत सरकार कायद्यात ठेवण्यात आल्या.

डॉ.बाबासाहेबानी एकट्याने अहोरात्र मेहनत करुन भारतीय राज्यघटना लिहीली. संविधानात अनुसूचीत जाती जमातीना राजकीय अरक्षण खासदार, आमदार व शैक्षणीक आरक्षण नौकरी आरक्षण देण्यात आले. आरक्षणाचा आधार हा संविधानामध्ये सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा आधार मानून आरक्षण देण्यात आले. अनुसूचीत जाती हा शब्द १९३५ बाबासाहेबानी सर्वप्रथम वापरला. कास्ट हा शब्द भारतीय नाही. कास्ट हा शब्द पोर्तूगीज भाषेतील केस्टा या शब्दापासून बनल ेला आहे. त्याचा अर्थ वंश, वर्ग असा होतो. भारतातील जाती वर्णव्यवस्थेतून तयार झालेल्या आहेत. आरक्षणाचा आधार हजारो वर्षे समाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या जाती हा आहे. आर्थिक आधार संविधानात कोठेही नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्र या विषयात पीएच.डी. होते डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी आर्थिक आधारावर आरक्षण दिले नाही. सामाजिक न्यायासाठी आरक्षण आहे. आर्थिक परिस्थिती बदलू शकते मात्र जाती बदलत नाही.

१९४२ व्हाईसराय च्या मंत्रीमंडळात मजूर मंत्री असताना साडे आठ टक्के आरक्षण दिले. भारतीय संविधानात अनुसूचीत जाती १५% आरक्षण देण्यात आले. अनुसूचीत जमातीला साडे सात टक्के आरक्षण देण्यात आले आहे. भारतीय संविधानातील कलम ३४० नुसार ओ.बी.सी. साठी आरक्षण देण्यात आले. भारतीय संविधानामध्ये सर्व भारतीयासाठी स्वातंत्र्य, समता, बंधूत्व व अनुसूचीत जाती-जमातीना शासकीय सेवामद्ये योग्य प्रतिनिधत्व देण्यासाठी अरक्षणाची तरतूद केली आहे. कलम ३३०, ३३२ मध्ये अनुसूचीत जाती जमातीच्या खासदार, आमदारासाठी तरतुद करण्यात आली आहे. शिक्षण आणि नौकरीसाठी कुटलीही कालमर्यादा नाही. मात्र राजकीय अरक्षणासाठी १० वर्षाची मदत देण्यात आली आहे. हा फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. क लम ३३५ मध्ये अनुसूचीत जाती-जमातीसाठी शासकीय नौकर्‍यात आरक्षण ठेवण्याची व्यवस्था आहे. आरक्षण गरिबी हटवण्याची व्यवस्था नसून हजारो वर्षापासून चालत आलेल्या अन्याय व शोषण झालेल्या लोकना शासनामध्ये योग्य ते प्रतिनिधीत्व देण्याचा मुख्य उद्दश होता. भारतातील ८५% लोकाना आरक्षण मिळणे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने इंदीरा साहानीच्या केसमध्ये ५०% आरक्षण असावे असे म्हटले आहे. परंतू घटा दुरुस्त करुन संसदेला आमि राज्याला आरक्षण वाढवण्याचा अधिकार आहे.बहुजन मागासवर्गीयामध्ये गुणवत्ता आहे. अमेरिकेमध्ये सुद्धा काळ्या रंगामुळे गोर्‍यानी काळ्यावर सामाजिक अन्याय केला. आज अमेरिकेत सुदधा काळ्याना समान संधी दिली आहे.

मागासलेला हा शब्द इ.स. १९१८ साली सर्वप्रथम म्हैसूर राज्यामध्ये मुख्य न्यायाधिश लेस्ली मिल्लर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. त्यानी दिलेल्या अहवालामध्ये असे म्हटले की, ब्राम्हण सोडून सर्वाना मागासलेले समजण्यात यावे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी ओ.बी.सी. साठी स्वतंत्र आयोग नेमण्याची मागणी केली. त्याच बरोबर महिलंसाठी हिंदू कोडबील मांडले. मात्र हिंदू कोडबील मंजूर न झाल्याने आपल्या कायदेमंत्री पदाचा राजनामा दिला.

भारतामध्ये अनुसूचीत जाती-जमाती, ओबीसी साठी शासकीय नोकर्‍यातील जागा नियमानुसार भरल्या गेल्या नाहीत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर एवढे विद्वान असूनही त्याना मंदिर प्रवेश नाकारला. भारतामध्ये मंदिरातील पुजारी जातीच्या आधारावर नेमला जातो. आजही विवाह प्रसंगी जात पाहीली जाते. आर्थिक अधारावर जात पाहीली जात नाही. आज समाजामध्ये मनुवाद, जातीयवाद पसरत चालला आहे. जातीच्या अधारावर मतदार संघात उमेदवार उभे केले जातात. अर्थिक आधार पाहीला जात नाही. १९७८ ला मंडल आयोग स्थापन झाले होते. ५२% ओबीसी ना २७% आरक्षण मिळते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ब्राम्हणाच्या घरी मुलाचा जन्म झाला की त्या मुलाची आई म्हणते कोणत्या न्यायालयात न्यायाधिशाची जागा खुली आहे आणि मागासवर्गीयाच्या घरी मुलाचा जन्म झाला की आई म्हणते कोणत्या नगरपालिकेत सफाई कामगाराची जागा माझ्या मुलास मिळेल का? अशी विचारसरणी असते. याचे कारण दोघीच्या विचारसरणीमुळे सामाजिक कारणे आहेत. संधी मिळाली तर सर्वना प्रगती करता येते. मद्रास प्रांतामध्ये मद्रास प्रांतात जातवार नोकर्‍यामध्ये आरक्षण ठेवण्यात आले होते. त्यावेळेस हे प्रकरण न्यायालयात नेण्यात आले. जातवार राखीव जागा समानतेच्या तत्वा विरोधात आहे असे म्हटले गेले. तेंव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी कायदेमंत्री या नात्याने १९५१ ला सर्वात पहिली घटना दुरस्ती कली आणि सांगीतले की, समान परिस्थितीत समान संधी मिळत असते. मात्र भारतात हजारो वर्षापासून

सामाजिक विषमता आहे. त्यामुळे सर्व मागासलेल्या समाजाला व अल्पसंख्यांकाना आरक्षण मिळणे आवश्यक आहे. तसेच खाजगी क्षेत्रातही आरक्षण मिळणे आवश्यक आहे. आरक्षण अधिकार नसून ती जबाबदारी आहे.

जातीवर आधारीत आरक्षणामुळे देशात जातीवाद वाढत नाही तर जातीवाद भारतातील वेदामध्ये व धर्मशास्त्रामध्ये सांगीतला आहे. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, पेरीयर रामस्वामी नायकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राम मनोहर लोहया हे आरक्षणाचे समर्थक होते. स्वामी विवेकानंद यांनी असे म्हटले आहे की, युगायुगापर्यंत या देशातील शुद्रानी मशीनसारखे काम केले आहे आणि देशाच्या संपत्तीचे उत्पादन केले आहे. उच्चवर्णीय लोक त्याना दाबून ठेवू शकत नाहीत. उच्चवरणीयाची बुद्धीमत्ता यात आहे की, शुद्रवर्गाचे अधिकार त्याना दिले पाहीजे. आचार्य रजनीश यांनी असे म्हटले आहे की, आरक्षण कमीत कमी २०० वर्षे ठेवले पाहीजे. पाच हजार वर्षापर्यंत शुद्राना एवढ सतावले आहे की, त्याना सत्ता आणि सन्मान दिला पाहीजे.

१९८१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कृष्णा अय्यर साहेब यांनी एक निर्णय दिला होता की, अरक्षणामुळे दक्षता कमी होत नाही, १९७५ साली मा. सर्वोच्च न्यायालयानी दिलेलया निर्णयामध्ये गरिबाला मागासलेपणाचा आधार मानलेला नाही. समाजामध्ये आंतरजातीय विवाह होणे हे समतावादी समाज निर्मितसाठी आवश्यक आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी अनाहिलशन ऑफ कास्ट या ग्रंथात म्हटले आहे. भारताची लोकशाही प्रतिनिधीक स्वरुपाची आहे. प्रशासनात सर्व समाजाला प्रतिनिधीत्व मिळणे आवश्यक आहे. बॅ. जिनानी केला पलिस्तान मागीला. राजे लोकानी सुद्धा नरेशस्थान मागीतले होते. तसेच शरदचंद्र बोस यानी व बंगाली मुस्लिम नेत्यानी बंगालस्तानची मागणी केली होती. हैद्राबादच्या निजामाला स्वतंत्र राज्य पाहिजे होते. खलीस्तानाची सुद्धा मागणी होती. मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रखर देशभक्त होते. त्यांनी वेगळ्या राज्याची मागणी केली नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील सर्व मागासवर्गीयासाठी आरक्षणाची मागणी केली.

**सारांश** :

**डॉ.बाबासाहेब** आंबेडकर घटना समितीतून आपल्या अत्यंत महत्वाच्या भाषणात म्हणतात की, आम्ही लोकशाहीचे आरक्षणाची मागणी केली आहे परंतु सामाजिक व आर्थिक लोकशाही मागणी आहे. सामाजिक व आर्थिक लोकशाीचा डोलारा लोक उलटून टाकल्याशिवाय राहाणार नाहीत. हा इशारा सार्वजनिक घ्यावा.

**संदर्भ ग्रंथ** :

१) आरक्षण-डॉ. विजयकुमार त्रिरारणा.

२) अरक्षण किसीका आणि सन्मान दिला पाहीजे आरक्षण किसीका और क्यँ? (डॉ. ११२श्रामनाथन) .

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत :एक चिंतन

**प्रो. डॉ. युवराज श्रीराम मानकर**
संशोधन मार्गदर्शक मराठी विभाग, भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगा व, जि.यवतमाळ-४४५१०१

**प्रस्तावना:-**

विश्वात सर्वात सुंदर कोण असेल तर तो मानव आहे. तो या सृष्टीतील सर्वात महत्त्वाचा घटक आहे .स्वप्न पाहणे ही मानवाला मिळालेली एक फार मोठी अद्भूत, अचाट अशी देणगी आहे. या नैसर्गिक देणगीने मानव या दुनियेला कोणते रंग, रूप द्यावे आणि कसे सुंदर करावे याचे तो स्वप्न पाहत आला आहे आणि ते स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न करत आला आहे. मानवाला रात्रीला झोपेत पडणारी स्वप्ने ही त्याला छान झोप येणारी नसावी तर त्याची झोप उडविणारी असावी. स्वस्थता हा स्वप्नाचा गुणधर्म नसतो. स्वप्ने त्यालाच म्हणतात की जी झोपेत पडत नाही. ती उघड्या डोळ्यांनी पाहिली जातात आणि ती रात्रीची झोप उडवतात. तीच स्वप्न ठरतात. स्वप्न ही मानवाला धावायला लावतात. ती अपूर्णतेला पूर्णतेत रुपांतरीत करण्यासाठी अथक प्रयत्न करायला लावतात. अशा स्वप्नाला ध्येय आणि दिशा असतात. मानव अशी ध्येय आणि दिशा डोक्यात घेऊन स्वप्नपूर्तीचे नियोजन करून त्याचा आराखडा तयार करतात. हा तयार केलेला आराखडा स्वप्नपूर्तीच्या थांब्याजवळ मानवाला घेऊन जातो आणि स्वप्नसिद्धीवर विराजमान होतो. तो या स्वप्नाच्या तळाशी नको असलेले जीवन नाकारून हव्या असलेल्या जीवनाची उभारणी करित असतो अशा आदर्श युटोपियाची रचना आजवर सर्वच मानव करत आला. त्याला त्याच्या कल्पनेतील जग प्रत्यक्षात उभे व्हावे असे वाटण्यातूनच युटोपिया निर्माण झाला. सर्वच मानवाला स्वप्न पाहता येतात पण सर्वांच्याच दृष्टीतील स्वप्ने ही युटोपिया होत नाही आणि या युटोपियाच्या स्मारकात त्यांचा हातभार लागेल अशी चिन्हे दिसत नाही. प्रत्येक मानवाचा, समाजाचा, देशाचा हितसंबंधाचा युटोपिया हा भिन्न भिन्न असतो . त्यांच्या त्यांच्या हितसंबंधावर त्यांचे त्यांचे भिन्न युटोपिया उभे असतात .युटोपिया हा देशातील मानवी जगण्याची एक आदर्श कल्पना असते. या आदर्श कल्पनेवर देश आणि देशातील मानवी जीवन उभे राहावे असे कोणत्याही विचारकाला वाटणे स्वाभाविक आहे. पण सर्वच मानवाचे स्वप्न आणि त्याच्या आदर्श कल्पनेच्या तळाशी सर्वकल्याणकारक,सर्वहितकारकता असतेच असे नाही तसेच कल्पनेला वेळेवर साकार करण्यासाठी जो मदत करतो तोच खरे तर भारतीय मदतगार असतो अन्यथा ते स्वप्नच ठरतात. स्वप्नाचा संबंध हा स्वप्न प्रत्यक्षात अस्तित्वात आणण्याशी आहे . अन्यथा प्रत्यक्ष अस्तित्वाभावी स्वप्न हे अपूर्णच किंवा केवळ कल्पनाच असतात .त्यामुळे अनेकांची आदर्शवत कल्पना ही सर्वांना सर्वमान्य होईल असे नाही. यासाठी पायाजवळचा विचार करून चालत नाही तर वैश्विक विचार करावा लागतो आणि असा वैश्विक विचार करणारे दुनियेत फार अपवादात्मक व्यक्तिमत्व असतात . अशी व्यक्तिमत्त्व हे महामानवच असतात. ते विश्वभूषण, विश्ववंदनीयच आणि युगावर स्वार होणारे युगपुरुषच असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यापैकी एक आहेत.

युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या भारत भूमीत जन्माला आलेले या भूमीवर , या भूमीवरील मानवी जीवनावर, त्यांच्या जगण्यावर अस्सिम निष्ठा ठेवणारे त्यांच्या जगण्यात आपल्या कृतीउक्तीने क्रांतिकारी बदल घडविणारे आहेत. त्यांच्या क्रांतिकारी कार्यकर्तृत्वामुळे त्यांना हा देश आधुनिक भारताचे , संविधानाचे शिल्पकार, सामाजिक पुनर्रचनाकार, प्रज्ञासूर्य मुक्तीदाते, उद्धारकर्ते, बोधीसत्व, महामानव, धम्मक्रांतिकारक, तत्त्वज्ञ अशा अनेक कार्यदर्शक विशेषणाने त्यांना संबोधतात तर जग त्यांना ज्ञानाचे प्रतिक म्हणून मानतात. त्यांच्या विविध क्षेत्रातील आणि शास्त्रातील अशा विराट कार्यकर्तृत्वामुळे त्यांना युगपुरुष म्हटले जाते. असा युगपुरुष आपल्या स्वप्नातील भारत कसा असावा यासंबंधीचे स्वप्न पाहतो आणि ते प्रत्यक्षात अस्तित्वात यावे अशी अपेक्षा करतो .डॉ .बाबासाहेब आंबेडकर या युगपुरुषाचे स्वप्न हे हा देश संविधानमय व्हावा एव्हढेच नव्हते. त्यांच्या स्वप्नांची लांबी रूंदी ही जगव्यापक अशी होती. त्यांच्या स्वप्नांच्या केंद्रभागी समग्र मानवी जीवन होते. या जीवनाची अर्थात या जगाची पुनर्रचना करणे हे त्यांचे स्वप्न होते . हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी तत्त्वांवर स्वप्न उभे केले. त्यांनी स्वप्नांचीतत्त्वे सांगितली. ही तत्वे स्वप्नालाही सुंदर करणारी आणि या तत्वांवर उद्याच्या उभ्या होणाऱ्या दुनियेतील समाजजीवनाच्या पुनर्रचनेलाही सुंदर करणारी अशी आदर्शवतच होती. ही आदर्शवता म्हणजे परमोच्च सुंदरता, मानवी जीवन जगण्याची सर्वोत्तम व्यवस्था या व्यवस्थेपेक्षा दुसरी कोणतीही उत्तम अशी व्यवस्था असूच शकत

नाही त्याला आदर्शवतच असे म्हणतात. हे आदर्शवत्ता म्हणजे तत्त्वज्ञान ! आणि हे तत्त्वज्ञान म्हणजे स्वप्नतत्त्वे ! असेच म्हणता येईल. या आदर्श भारताच्या निर्माणाचे स्वप्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पाहतात. ते यासाठी आपले आयुष्य साबनासारखे झिजवतात. ते स्वतः तील क्षमतेला नव्या भारतासाठी जाळतात आणि जळवतात. त्यांच्या या धगधगत्या जळण्याच्या प्रकाशात भारताच्या स्वप्नाची स्वप्नतत्त्वे जन्म घेतात .या देशातील जात, धर्म, पंथ, वर्ण, वर्ग, स्त्रीदास्य, लिंग भेद, शोषण, विषमता, चांगली आहे का? ती सर्वाच्या भल्याची आहे काय? ती सर्वोपकारक आहे काय? यासंबंधीचे मनन, चिंतन, लेखन आणि कृती करतात. यातून त्यांना जात ही जातीसाठी ,धर्म हा धर्मासाठी, पंथ हा पंथासाठी, वर्ण हा वर्णासाठी एकवेळ चांगला उपयोगी पडेल असे वाटत असले तरी त्याला विशिष्ट मर्यादांचे बांध आहेत . या विवक्षित मर्यादा चांगल्या वाटत असल्या तरी त्या चांगलेपणाचा अर्थ गमावून बसलेल्या असतात. या चांगलेपणाच्या अर्थाला कोणत्याही मर्यादा नसतात. चांगलेपण हे नेहमी अमर्याद अशाच चांगल्या अर्थाचे असते. चांगलेपणाला कोणतीही मर्यादा असूच शकत नाही आणि चांगलेपण हे कोणत्याही मर्यादेच्या चौकटीत मावत देखील नाही. ते कक्षाविहिन, चौकटविहिन असेच असते. ते सर्वन्यायी, सर्वमान्य आणि सार्वभौम देखील असते. ते सर्वाचे आणि सर्वांच्या हिताचे सर्वकल्याणकारक असेच उजेडाचे रूप धारण केलेल्या स्वभावाचे असते. असा उजेडच स्वप्नतत्त्वाच्या बुडाशी स्वप्नांवर पाहरा ठेवण्यासाठी आणि त्याचा बंदोबस्त करण्यासाठी दबा धरून बसलेला असतो .

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्वप्नातील भारताविषयीच्या स्वप्नांचे कशासाठी चिंतन करावयाचे? हा गंभीर प्रश्न आहे. या गंभीर प्रश्नाचे उत्तर समकालीन वास्तवात आपल्याला सापडते. जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर राजकीय सत्ता आणि धर्मसत्ता प्रभाव गाजवित आहे. धर्म आणि राजकीयसत्ता या हातात हात घालून काम करत आहेत. त्यामुळे जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर या दोन्ही सत्तेचे नियंत्रण असलेले दिसत आहे. या दोन्ही सत्तेद्वारा जीवनातील सर्व क्षेत्राचे संचालन केले जात आहे. धर्म आणि राजकीय सत्तेने सत्तेला अभिप्रेत असलेल्या जीवनाच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात टोकाच्या अस्मिता निर्माण केल्या आहेत. आज या वास्तवात त्याचीच दहशत निर्माण झाली आहे. या देशातील लोक हे जात झाले ते धर्म झाले ते बिजेपी शिवसेनेसारख्या कट्टर हिंदूतत्त्ववादी पक्षांचे हिंदूतत्त्ववादी झाले पण ते भारतीय झालेले नाही. हिंदूराष्ट्र बनविण्याची आणि या राष्ट्रावर धर्माधारित मनुवादी संविधानाचे राज पुनर्रस्थापित करण्याचे षडयंत्र सुरू असलेले दिसत आहे. धर्माचा राजकारणासाठी तर राजकारणाचा धर्मासाठी वापर केला जात आहे. हिंदू- मुस्लिम यांच्यात तेढ निर्माण करून देश पेटवून यावर पोळी भाजण्याचे काम केले जात आहे. धर्म आणि राजकारण यांची क्षेत्रे स्वतंत्र आहेत. त्यांच्यात फारकत करणे आवश्यक आहे. पण तसे केले तर हिंदूतत्त्ववाद्यांचा पाया ठिसूळ होईल. याची भीती राजकीय पक्षांना आहे. निवडणूकात ते आर्थिक दहशतीचे सत्ताकारण खेळतात आणि ते अर्थ सत्तेच्या व धर्म सत्तेच्या बळावर निवडून येतात. धर्माच्या आणि आर्थिक सत्तेच्या दहशतीखाली भारतीय लोकांचा जीव गुदमरतो आहे या देशाच्या संविधानाचा अपमान केला जातो त्याला जाळण्याचा प्रयत्न केला जातो .अशी कृत्ये करणारी माणसे संविधाननिष्ठ असू शकतात काय? या देशाला भारत न म्हणता हिंदूस्थान म्हणणारी माणसे ही भारतीय असू शकतात काय? सामाजिक आणि आर्थिक जीवनात समता नाही. विषमतेचे अराजक निर्माण झाले आहे. शोषणाचे नवे संदर्भबंध निर्माण झाले आहे. भ्रष्टाचाराने वरपासून खालपर्यंत आपले पाय मजबूत केले आहे. अन्याय- अत्याचार याला सीमा नाही. बेकारीची कदर आणि त्याचा आदर होत नाही. नैतिकतेचा अर्थ आणि त्याची व्याप्ती अनैतिकतेने घेतली आहे. सत्याची चिकित्सा, प्रश्न विचारण्याचे धाडस करणारा देशद्रोही ठरविला जात आहे .विज्ञानाचा वापर करून वैज्ञानिक दृष्टिकोन जीवनातून वजा करणारी स्थिती सर्वत्र उत्पन्न झाली आहे. शिक्षणाचे बाजारीकरण, शिक्षकांचे कंत्राटीकरण झाले आहे. शिक्षणात धर्म आणि धर्माधिष्ठीत राष्ट्राभिमानाचा व्हायरस घुसविला जात आहे. नव्या शैक्षणिक धोरणाने या देशात जात आधारित पारंपरिक व्यवसाय कौशल्या नुसार काम करणारे आणि दुसरे प्रशासन करणारे असे वर्ग निर्माण होणार आहे त्याचा परिणाम या देशातील जे लोक जातीमुळे गरीब झालेले आहे त्यांना पुन्हा त्यांच्या पारंपरिक व्यवसाय कौशल्यावर आधारित कामे करावी लागतील कारण उच्च शिक्षण हे कारपोरेट भांडवलदारांच्या ताब्यात जाणार आहे आणि प्रचंड शूल्क आकारल्या जाणार आहे अशा शुल्काचा भरणा जातीने आजवर गरीब ठेवल्या गेलेल्या लोकांची मुले करू शकणार नाही त्यामुळे त्यांना परत जाती आधारित कौशल्याचे शिक्षण घेऊन उच्चस्थांची सेवाच करावी लागणार आहे. त्यामुळे अगोदरच पराधीन असलेले लोक हे अधिक पराधीन होतील आणि ईश्वरांच्या, धर्माच्या, अंधश्रध्देच्या फाशात परत अडकतील आणि मुठभर

अभिजन उच्चशिक्षित हे बहुजनांवर राज करतील. खरे तर हा काळ विचार, बॉम्ब, खुन याच्या धमकीचा काळ आहे. हेच या दुनियेचे ग्लोबलपण आहे .या विश्वात दहशतवाद अमेरिकेपासून ते थेट म्यानमार पर्यंत लोकशाहीची हत्या करत आहे. ईश्वर, राम, रहिम, पैंगबर,हिटलर यांनी विद्यापीठे काबीज केली आहे. भारतातही फॅसिस्टवादाचा सेन्सेक्स वाढला आहे. या सनातनी ब्रोकर्सनी नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, कलबुर्गी, कृष्णा किरवले यांना जीवनाच्या रंगागंणातून कायमचे मूक्त केले आहे. ही सत्याची हत्या आहे. अशी हत्या करून पारंपरिक विचारांचे लोक असत्याचे अम्बेसिडर बनले आहे. हे नवनिर्माणकारक वास्तव नाही. हे स्वप्नांची पूर्तता करणार वास्तव नाही .हे वास्तव आदर्श समाजनिर्माण करणारे नाही. ते बुद्धिवादाला आणि लोकहितकारकतेला सर्वोच्च मानणारे नाही .ते प्रतिक्रांतीचे पुनरूज्जिवन करणारे आहे. ते जात घट्ट करणारे, माणसाला धर्मांध करणारे, अंधश्रद्ध आणि देव-दैववादी बनविणारे आहे. ते मानवाचा सन्मान करणारे, त्याचे मूल्य अबाधित राखणारे नाही. समता, बंधूता आणि सामाजिक न्यायाची प्रस्थापना करणारे नाही. ते भौतिक आणि नैतिकदृष्टया माणसाला गुलाम करणारे आहे. त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेणारे आहे. अशा या वास्तवाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नाचे चिंतन करावयाला लावले आहे .

डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे भारताविषयीचे स्वप्न कोणते आणि कसे होते. त्यांना अभिप्रेत असलेला त्यांच्या स्वप्नातील भारत कसा आहे. यासंबंधी चिंतन करतांना भारत हा देश कधीच एकसंध नव्हता. तो विविध जात, धर्म, पंथ वर्ण, वर्ग, भाषा, भूप्रदेश इत्यादी घटकांमुळे विभागलेला होता . त्यामुळे एकाच देशात अशा अनेक विविधता नांदत होत्या. त्यात परस्पर विरोधी हितसंबंध होते.हे हितसंबंध आपल्या टोकाच्या अस्मितेने पछाडले होते. अशा टोकाच्या अस्मिता निरंतर टिकविण्यासाठी परस्परात संघर्ष होत होता .शोषण होत होते .परस्परांत द्वेषाचे, ताणतणावाचे असे वातावरण होते. प्रत्येक जात आणि धर्माचे संविधान हे जातीधर्माच्या आधारावर उभे होते. त्यानुसार त्याचा विचार नि आचार अस्तित्वात होता. अशा अर्थाने एकाच देशात अनेक देश आणि त्यांचे त्यांचे संविधान अस्तित्वात होते. या विविधरंगी देशाला आपला देश कसे मानता येईल? ज्या देशातून एकसंधता हद्दपार केली असेल तो अंतर्गत दृष्ट्या अनेक अर्थाने फाटला असेल अशा देशाला समानतेच्या पायावर एकसंध करणे, हे अत्यंत अवघड कार्य होते. हे कार्य डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या द्वारे केले. या संविधानाची उद्देशिका, मानवाचे मुलभूत अधिकार, त्याचे कर्तव्य, त्याच्या जबाबदाऱ्या इत्यादीतून त्यांचे भारता विषयीचे कसे स्वप्न होते हे स्पष्ट होते. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारता बद्दलच्या आशा आणि अपेक्षा स्पष्ट झालेल्या आहेत. "आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकतंत्रात्मक गणराज्य घडविण्यास, तसेच त्याच्या समस्त नागरिकांना:सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ति, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वतंत्र; दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणेप्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता परिवर्धित करनेचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

आपल्या या संविधान सभेत आज दिनांक नोव्हेंबर २६, १९४९ ला एतद्द्वारे या संविधान ला अंगीकृत, अधिनियमीत आणि आत्मार्पित करीत आहोत."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील लोकांना भारतीय 'लोक' म्हणून एकसंध केलेत. या देशातील अस्मिता लोक या शब्दसंहितेने पार विरघळून गेल्यात, अशा छोट्या छोट्या अस्मिता देशाला घातक असतात म्हणून लोक ही संज्ञा उपयोगात आणली. अशा घातक अस्मितांचा अस्त करणे आणि सर्वांना एकसंध करणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न होते ते त्यांनी लोक या संज्ञेतून अधोरेखित केले आणि देशाला एकसंध केले. त्यांनी " एक व्यक्ती: एक मूल्य' या तत्वावर माणसाला महत्त्व प्राप्त करून दिले. त्यामुळे या देशातील विषमतेच्या, शोषणाच्या कचाट्यात सापडलेल्या माणसाला केवळ राजकीय क्षेत्रातच मूल्य प्राप्त झाले आहे असे नाही तर सामाजिक जीवनात देखील त्याचे व्यक्ती म्हणून असलेले मानवी मूल्य त्याला प्राप्त झाल्याने या देशातील प्रत्येक माणूस शोषण व्यवस्थेच्या अपमानाच्या कचाट्यातून बाहेर पडला. त्याने माणूस म्हणून जीवनाच्या सर्व क्षेत्रात सन्मानाने जगावे हे स्वप्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहिले. भारत हा देश समाजवादी असावा तो सेक्युलर असावा हे बाबासाहेबांचे स्वप्न होते. सामाजिक आणि आर्थिक संपत्तीच्या नियंत्रणाचा अधिकार समाजाकडे असल्यास समाजात आर्थिक समता निर्माण होईल आणि संपतीसाठी कोणताही वादविवाद न होता प्रत्येकांना आपल्या गरजा पूर्ण करता येईल. गरिब आणि श्रीमंत असे वर्ग न राहता समतेचे राज्य निर्माण होईल. कोणतीही

सापेक्षता ही वाईटच असते. निरपेक्षता ही तर्कनिष्ठ, विवेकवादी आणि बुद्धीवादी असते. म्हणून डॉ. आंबेडकरोत्तर काळात जरी धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व उद्देशिकेत समाविष्ठ केले असले तरी डॉ. आंबेडकराच्या संपूर्ण चिंतनाचा गांभीर्याने विचार केला तर त्यांनाही धर्मनिरपेक्ष भारतीय समाज अभिप्रेत होता. हे त्यांचेही स्वप्नच होते. त्यांनी अनेक धर्माचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी धम्माचा स्वीकार केला. धर्मपरिवर्तन नव्हे तर धम्मचक्र प्रवर्तन केले. त्यांना या देशात लोकशाही असावी असे त्यांचे स्वप्न होते. लोकशाहीतील मूल्य माणसाला, त्याच्यातील कार्यकर्तृत्वाच्या क्षमतेला मूक्त करतात, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय आधारित भारतीय समाज उभा व्हावा असे त्यांना वाटत होते. राजेशाही, हुकूमशाही या व्यवस्थेत माणूस गुलाम राहतो त्यात माणसाचा विकास होत नाही. म्हणून दुनियेत लोकशाही सारखी मानवी उन्नयनाची दुसरी कोणतीही सुंदर व्यवस्था नाही असे त्यांना वाटत होते त्यांनी बुद्धीवादाचे स्वप्न पाहिले, त्यासाठी त्यांनी देशबांधवांना शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा अशा मानवी उन्नयनाच्या दिशेचे स्वप्न सांगितले त्या स्वप्नपूर्तीचा मार्गही सांगितला. सर्वाना श्रध्देचे, उपासनेचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मिळावे, सर्वाना समान दर्जा, समान संधी, सर्व व्यक्ती ह्या सारख्या आहेत त्या सर्वांना प्रतिष्ठा मिळावी, त्यांच्यात बंधुभाव प्रवर्धित व्हावा हे स्वप्न पाहिले. डॉ. आंबेडकरांनी बहुजनाने शासनकर्ती जमात बनावे, आत्मसन्मानाने जगावे,जातीअंत विरहित भारत असावा, स्त्रीयांना मानव म्हणून वागवावे, त्यांना घटनात्मक अधिकार आहे. त्यांची सर्व प्रकारच्या जाचक बंधनातून मुक्ती व्हावी. रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याचे स्वप्न पाहिले, हा देश बौद्धमय व्हावा असे त्यांचे स्वप्न होते. याच त्यांच्या उद्याच्या भारताकडून आशा आणि अपेक्षा होत्या.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत कसा होता, त्यांच्या उद्याच्या भारताकडून कोणत्या आशा आणि अपेक्षा होत्या यासंबंधीचे चिंतन केले आहे. परंतु त्यांच्या स्वप्नातील भारताची धज्जा उडविण्याचे षडयंत्र या समकालीन काळाने हाती घेतले आहे. येथे आंबेडकरांऐवजी सावरकर अभ्यासक्रमात आणण्याचे मनसुबे व्यक्त होऊ लागले आहेत. मनुवाद्यांच्या हाती सत्ताकेंद्र गेल्याने मनुवादी संविधानाचे पुनर्रज्विवन होऊ लागले आहे. साडेतीन टक्के अभिजनाच्या तालावर या देशातील बहुजन समाज डॉ. आंबेडकरांना डोक्यात न घेता नाचू लागला आहे. ही वेळ डॉ. आंबेडकर डोक्यावर नव्हे तर डोक्यात घेण्याचा निर्देश करून संपूर्ण बहुजनानी संघटीत होऊन या देशाचे अनेक देशात रुंपातर होण्याच्या प्रक्रियेपासून देशाला वाचविणे ही या काळाची गरजही आहे आणि ती मागणी देखील आहे. या देशाला डॉ. आंबेडकराशिवाय दुसरे कोणतेही आदर्श आणि उत्तमोत्तम असे औषध नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण कटीबद्ध असणे आणि तशी प्रतिज्ञा घेऊन स्वप्नपूर्ती करणे हेच खरे तर त्यांच्या जयंती दिना निमित्त त्यांना अभिवादन ठरेल.

**संदर्भ:-**

१) जाधव मा मा .( संपा.),संपादकलोकशाहीपुढील आव्हाने व भारतीय संविधान विशेषांक , अक्षरगाथा , वर्ष: नववे, अंक: चौथा, १० जाने२०१९

२) मनोहर यशवंत, भारताचे क्रांतिसंविधान , हर्मिस प्रकाशन, पुणे, प्रधमावृत्ती- डिसें.२०१८

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांविषयक धोरण

प्रा. डॉ. दिवेकर रेश्मा रमेश

डॉ. बाबासाहेब आंबेडक महाविद्याल औंध-पुणे-६७

प्रस्तावना:-

भारतीय समाजामध्ये आजही महिलांना दुय्यम स्थान दिला जाते. महिला कितीही शिकली मोठ्या पदावर पोचली तरी सुद्धा कुठे ना कुठे असुरक्षितता जाणवत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीयांना कमी लेखणाऱ्या 'मनुस्मृती' या ग्रंथाचे दहन करून महिलांना रूढी परंपरेच्या कचाट्यातून मुक्त केले. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने आपली प्रगती करता यावी, शिक्षण घेता यावे, त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहून स्वयंरोजगाराच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हाव्यात, यासाठी भारतीय घटनेमध्ये 'हिंदू कोड बिल' मांडून महिलांना न्याय मिळवून दिला. या आणि यासारख्या इतर हक्कांची जाणीव महिलांना करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महिला विषयक धोरणाचा विचारया लेखात करणार आहोत.

उद्दिष्ट्ये :-

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक द्रष्टे समाजसुधारक होते हे समजावे.
२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरयांच्या महिला विषयक कार्याचा परिचय व्हावा.
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरहे कृतीशील कार्यकर्ते होते हे लक्षात यावे.
४) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाचा किती सूक्ष्मपणे आणि सखोल अभ्यास केला होता याची जाणीव व्हावी.

महिलांविषयक धोरण:-आपल्या भारताला पर्यायाने महाराष्ट्राला सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी लाभलेली आहे. राजमाता जिजाऊ, ताराराणी, राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले यांसारख्या तेजस्वी महिलांची परंपरा या देशाला लाभली आहे. राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा गांधी, इत्यादी असंख्य विभूतींनी महाराष्ट्र बरोबर भारताची प्रगती साधण्यासाठी अत्यंत कष्ट घेतले आहेत.

भारतीय समाज हा पितृसत्ताक असल्याने मुलगा आणि मुलगी असा भेदभाव हा प्राचीन काळापासून चालत आला होता. मुलीसाठी आणि मुलांसाठी वेगळी मूल्ये होती. आजही काही समाजांमध्ये ती अजूनही दिसून येतात. मुलगा हा वंशाचा दिवा हा समज समाजात घट्ट रुतून बसला होता. त्यामुळे मुलीच्या जन्माचे स्वागत होत नव्हते. मुलगी हे परक्याचे धन हा विचार बदलण्याचा प्रयत्न अनेक समाजसुधारकांनी केले. पण नुसते प्रयत्न करून चालणार नाही हे बाबासाहेबांनी जाणले होते. म्हणून त्यांनी कायद्याने हे सर्व अधिकार महिलांना प्रदान केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी प्रेरक असे विचार मांडले आहेत.ते समाजसुधारक होते. स्त्रीमुक्ती धोरणामध्ये त्यांचे योगदान फार महत्त्वाचे होते. आधुनिक काळात महिलांना सक्षम होता यावे, यासाठी बाबासाहेबांचे विचार प्रेरक व पोषक ठरले आहेत. पूर्वी स्त्रियांना 'मनुस्मृतीने' सगळे हक्क नाकारले, पण बाबासाहेबांनी समस्त स्त्रियांना यातून मुक्त केले व त्यांना स्वातंत्र्याचा अधिकार मिळवून दिला. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सगळे हक्क मिळावेतयासाठी ते प्रयत्नरत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चळवळीत स्त्रियांच्या प्रश्नांना, समस्यांना महत्त्वाचे स्थान दिले. स्त्रियांसंबंधिचा पारंपरिक दृष्टिकोन संपावा आणि स्त्रियांना समान दर्जा मिळावा यासाठी सतत स्पष्ट व परखड भूमिका त्यांनी मांडली. आपल्या सर्व राजकीय, सामाजिक चळवळीत स्त्रियांना मोठ्या प्रमाणात त्यांनी सहभागी करून घेतले स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा मूलाधार आर्थिक स्वातंत्र्य आहे. आणि त्यासाठी स्त्रियांचे आर्थिक परावलंबित्व संपले पाहिजे ही त्यांची भूमिका होती. स्त्रियांना सर्व मानवी हक्क मिळाले पाहिजेत. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्षात्मक भूमिका घेतली.स्त्रियांच्या शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची अपरिहार्यता त्यांनी प्रतिपादन करून अधिक प्रगत विचार मांडले. विविध क्षेत्रातीलस्त्रियांचा सहभाग वाढवा यासाठी ते अखंड विचार करत. नुसता विचार करून ते गप्प बसतनसत तर त्याला कृतीची जोड देत. स्त्रीस्वातंत्र्याचा आणि समानतेचा पुरस्कारही त्यानी केला. त्यांना सर्व हक्क मिळावेत आणि स्त्रियांना आत्मभान यावे म्हणून डॉ. आंबेडकर सतत संघर्षात्मक भूमिका घेत

राहिले. 'स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मोजली जाते.' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत.

'लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य करावे. मात्र गुलामासारखे वागण्यास खंबीरपणे तिने नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा.' असा उपदेश ते सर्व मुलींना करत. स्त्रियांना केलेला हा उपदेश दलित स्त्रियांपुरता मर्यादित नाही तर सर्व समाजातील स्त्रियांसाठी हाउपदेशआहे. स्त्रीला माणूस म्हणून मानसन्मान मिळाला पाहिजे. अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. त्यामुळे बहुपत्नीत्वाचा पद्धतीला त्यांचा विरोध होता.भारतीय स्त्रीचे दास्य आणि या दास्याला जबाबदार असणारी जातीपितृसत्ता या गोष्टींची जाणीव बाबासाहेबांना होती. म्हणून ते आपल्या 'भारतातील जाती' या लघुनिबंधात त्या विषयी चर्चा करतात. 'स्त्रिया या जातीव्यवस्थेचे प्रवेशद्वार आहेत.' असे ते म्हणत. समाजात जातीव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी स्त्रियांवर घालण्यात आलेले निर्बंध प्रमुख भूमिका बजावतात. हे त्यांना माहित होते. लैंगिकतेवर नियंत्रण आणि अधिकारहीनता यामागचा उद्देश जातीपितृसात्तेला सुरक्षितता बहाल करणे. या सर्व गोष्टींना धर्माच्या चोकटीत बसवण्यात आले होते. स्त्रियांना या दास्यातून मुक्त करणे, जातीपितृसात्तेचा अंताच्या दृष्टीने विचार करून त्यावर कृती कार्यक्रम आखणे. या गोष्टींची असणारी गरज बाबासाहेबांनी ओळखली होती.म्हणूनच त्यांनी त्यांनी ११ एप्रिल १९४७ रोजी संविधान सभेत 'हिंदू कोड बिल' मांडले.२७ सप्टेंबर १९५१ पर्यंत ते 'हिंदू कोड बिल' मान्य न झाल्यामुळे आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. कायदेमंत्री पदाचा राजीनामा देण्याची जी कारणे डॉ. आंबेडकरांनी दिली, त्यातील दोन महत्त्वाची कारणे आहेत-

१) 'हिंदू कोड बिल' मान्य न करणे.

२) इतर मागास जाती साठी आयोग नेमणे.

स्त्रियांच्या उन्नतीसाठी 'हिंदू कोड बिल' आणण्याची आवश्यकता होती. मात्र सरकारने या बिलाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले.११ एप्रिल १९४७ रोजी मांडलेले 'हिंदू कोड बिल'९ एप्रिल १९४८ पर्यंत मागे पडले. त्यानंतर हे बिल 'सिलेक्ट कमिटीकडे' पाठवून देण्यात आले.१९४९ मध्ये ते पुन्हा चर्चेला घेण्यात आले. फेब्रुवारी १९४९ मध्ये चार, दिवस मार्च १९४९ मध्ये एक दिवस आणि एप्रिल १९४९ मध्ये दोन दिवस या बिलावर चर्चा झाली. परंतु ही चर्चा कोणताही निर्णय न होताच संपुष्टात आली. यासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,"१७ सप्टेंबर १९५१ रोजी हे बिल पुन्हा चर्चेत आले असता पंतप्रधान नेहरू यांनी त्यात कपात सुचवली. ही कपात इतकी भयंकर होती की मूळ बिलाचे रूपच बदलून गेले." त्यामुळे डॉ. आंबेडकरांचा संताप अनावर झाला. देशातील सर्व स्त्रियांच्या हक्काचे हे बिल होते. तेच भिजत ठेवले. या बिलावर त्यांनी आपली भूमिका विस्ताराने २४ फेब्रुवारी १९४९ ला विधानसभेत मांडली होती. ते म्हणतात,"मला एवढेच सांगायचे आहे की, जर तुम्हाला हिंदू पद्धत, हिंदू संस्कृती, हिंदू समाज टिकवायचा असेल तर तुम्ही आवश्यक असेल तेथे दुरुस्ती करण्याची कुचराई करू नका. हिंदू पद्धतीचे जे भाग जवळजवळ मोडकळीस आले आहेत त्याची दुरुस्ती करण्या पलीकडे सदर बिल अधिक काहीही करीत नाही". कोणत्याही देशाच्या विकासाचे, समतोल विकासाचे मापदंड स्त्रियांच्या विकासावर अवलंबून असतात. म्हणून या देशातील कुमारी, विवाहित, परित्यक्ता, विधवा, घटस्फोटित स्त्रियांच्या संरक्षणाचा हक्क आणि विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवून 'हिंदू कोड बिलाचा' आग्रह डॉ. आंबेडकर यांनी धरला होता. या बिलाचे महत्त्व प्रतिपादन करताना ते म्हणतात,"की पार्लमेंट पुढे 'हिंदू कोड बिल' एक महत्त्वपूर्ण घटना होती. ती या देशातील कोणत्याही अधिवेशनात विचारात घेतली नव्हती. एवढेच नव्हे तर पार्लमेंटमध्ये यापूर्वी व यापुढेही येणाऱ्या कोणत्याही कायद्याची बरोबरी "हिंदू कोड बिला'बरोबर करता येणार नाही". इतके त्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.'हिंदू समाजातील उच्च नीच व लिंगभेद तसेच कायम ठेवून केलेले कोणतेही आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे कायदे म्हणजे धान्य न काढता त्यावरच उभारलेले पत्त्यांचे बंगले होते. ही त्या घटनेची थट्टा आहे" असे ते म्हणतात. २५ डिसेंबर १९५२ रोजी कोल्हापूर येथे केलेल्या भाषणात ते म्हणतात, "आजच्या जगात संपत्तीच स्वातंत्र्याचा आधारस्तंभ आहे. जोवर स्त्रियांना संपत्तीत वारसा मिळत नाही, तोवर त्यांची गुलामगिरी संपणार नाही.त्यादृष्टीने हिंदू कोड बिलात मी तरतूदही केली होती, पण ते बिल मंजूर होऊ शकले नाही. यापुढे येणारे बिल आता कोणत्या स्वरुपात येते व त्यात स्त्रियांच्या स्वातंत्र्याची, हक्काची काय तरतूद आहे याकडे महिलावर्गाने फार बारकाईने पाहिले पाहिजे. इतकेच नव्हे, तर आपल्या हक्कासाठी झगडण्यात त्यांनी आपले मनोदौर्बल्य टाकून कंबर कसली पाहिजे,

तरच त्यांची सुधारणा व प्रगती होईल". अखेर सरकारला 'हिंदू कोड बिला' मान्य करावे लागले. त्यातील तरतुदी खालील प्रमाणे होत्या

१) वैवाहिक हक्काची भरपाई म्हणून पतीच्या संपत्तीमध्ये पत्नीचा हक्क, मिळालेल्या स्त्री धनावर पत्नीचा हक्क, विधवा झाल्यावर संपत्तीत वारसा हक्क.

२) स्त्रीला पतीपासून घटस्फोट मागण्याचा हक्क, नवऱ्याने घटस्फोट दिल्यास पोटगीची तरतूद.

३) स्त्रीला दत्तक निवडण्याचा- घेण्याचा हक्क, पारंपरिक दत्तक विधान पद्धती रद्द आणि कायदेशीर तरतुदीनुसार दत्तक घेण्याची पद्धत निश्चित, आपला मुलगा दत्तक देण्याचा मातेस अधिकार देण्याची तरतूद.

४) अल्पवयीन मुलाचे पालकत्व वडील हयात नसल्यास आईकडे जाण्याची तरतूद,निसर्गदत्त पालकाने धर्म त्याग केल्यास अगर संसार त्याग केल्यास त्याचे पालकत्व निसर्गदत्त पालकाकडे राहिल.

५) दत्तकास संपत्तीचा अर्धा हिस्सा आणि आईला संपत्तीचा अर्धा हिस्सा मिळेल. संपत्तीचा अर्धा हिस्सा तिच्या ताब्यात राहून ती उपभोग घेईल. दत्तक आपल्या मातेस संपत्तीच्या हक्कापासून वंचित करणार नाही.

६) द्विभार्या प्रतिबंधक म्हणजे एक पत्नीत्वाची तरतूद. स्त्री जीवनाला स्थैर्य.

७) वडिलांच्या मिळकतीत मुलीला हिस्सा.

८) ज्यांना पारंपरिक पद्धतीने विवाह करायचा आहे; त्यांना मोकळीक, मात्र वर्ण, जात, पोटजात या बाहेरील व्यक्तीशी विवाह केला तर तो कायदेशीर विवाह म्हणून मान्यता देणारी तरतूद.

९) स्त्रीला स्वतःचा वारसा ठरवण्याचा अधिकार.

या तरतुदीमुळे स्त्रियांना संपत्तीमध्ये हक्क मिळाला आणि तिचे परावलंबित्व संपण्यास मदत झाली. द्विभार्या प्रतिबंधक, वारसा हक्क, दत्तक विधान हक्क, घटस्फोटाचा हक्क यासारख्या गोष्टींमुळे स्त्रीला गुलाम म्हणून अथवा दुय्यम दर्जाची वागणूक मिळणार नाही. उलट स्वतंत्र माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार केला. कुटुंब, कुटुंबातील मुलांचा विकास, स्त्रीशिक्षण, नीतिमत्ता, स्त्रियांचे आरोग्य, कुटुंब नियोजनातील स्त्रियांची जबाबदारी, संपत्तीमध्ये स्त्रियांना वारसाहक्क, स्त्रियांची शारीरिक, मानसिक, लैंगिक छळापासून मुक्तता, द्विभार्या प्रतिबंध करून स्त्री समानतेचा पुरस्कार, पडदा पद्धतीला विरोध यासारखे आपले विचार आणि कार्य याद्वारे डॉ. आंबेडकरांनी जणू रणसंग्राम मांडला. संघटित स्त्रीशक्तीच देशातील गरिबीला हद्दपार करू शकते आणि यातूनच देशाच्या आर्थिक उन्नतीचा, सामाजिक उन्नतीचा मार्ग निघू शकेल. असा विश्वास त्यांनी सतत व्यक्त केला.

नोकरीधंदा, शिक्षण या सर्वांमध्ये महिलांचा पुढाकार दिसू लागला. स्त्री-पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करू लागली. कामाच्या ठिकाणी तिची सुरक्षितता, तिचे ज्ञान यांना वाव मिळू लागला. कोणत्याही समाजातील स्त्री असू दे तिचे शिक्षण झालेच पाहिजे. त्याशिवाय त्या समाजाची प्रगती होऊ शकत नाही. असे विचार बाबासाहेबांनी संविधानात मांडले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९४१ रोजी नागपूर येथे 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस विमेंस कॉन्फरन्स' मध्ये महिलांना उद्देशून केलेल्या भाषणात म्हणाले की,"स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून त्या समाजाची प्रगती मी मोजत असतो" या वाक्यावरून असे लक्षात येते की महिलांच्या प्रगतीसाठी बाबासाहेबांचा दृष्टिकोन कसा होता. मनुस्मृतीने महिलांना रुढी परंपरेत अडकवले, त्यांना चूल आणि मूल या गोष्टी सांभाळणारे यंत्र असे मानले. एवढीच प्रतिष्ठा दिली. स्त्रीला पुरुष संस्कृतीने दुःख वेदना या शिवाय काहीच दिले नाही. त्यामुळे स्त्री ही दुःखाची - वेदनेची खाणच असे म्हणणे वावगे ठरणार नाही. भारतीय संस्कृतीने स्त्रियांना नेहमीच 'मातृदेवता' म्हटले असले तरी कायमच दुय्यम स्थान दिले आहे. कुठेतरी शिकल्या सवरलेल्या महिलांना आपल्या हक्काची जाणीव झाली की त्या आपले हक्क मागतील या हेतूने पुरुष संस्कृतीने तिला एका विशिष्ट परिघामध्ये ठेवले. शिकूनही तिला काही मर्यादा घातल्या. अतिप्राचीन काळामध्ये महिलांना मातृसत्ताक अधिकार होता. सर्व वेदांमध्ये तर महिलांना उपनयन विधी करण्याचा अधिकार होता. वेदांचे अध्ययन ही महिला करीत होत्या. पतंजलीच्या महाभारतानुसार स्त्रिया शिक्षिका होत्या. धर्म, अध्यात्म आणि तत्वज्ञान या सर्वात कठीण विषयांवर स्त्रियांचे प्रभूत्व होते. शंकराचार्य आणि विद्यार्थी यांच्यातील सार्वजनिक वादाच्या

घटनावरून मनूच्या आधी स्त्रियांना, विवाहित स्त्रियांना शिक्षण मिळत होते. त्यामुळे प्राप्त ज्ञानाच्या आधारे त्या उच्चशिखरावर पोचल्या होत्या. म्हणूनच महिलांना सर्व अधिकार नाकारून घराच्या चौकटीत का बंदिस्त केले गेले. याचा विचार डॉ. आंबेडकर यांनी केला. म्हणूनच त्यांनी प्रत्येक भाषणामध्ये स्त्रियांच्या प्रगतीवर भर दिला आहे.'हिंदू कोड बिल' यामध्ये तर महिलांना घटस्फोट देणे व घेणे, वडिलांच्या संपत्तीमध्ये मुलीचा वाटा, नोकरीच्या ठिकाणी बाळंतपणाची भरपगारी रजा, या आणि अशा कितीतरी तरतुदी बाबासाहेबांनी महिलांना प्रदान केलेल्या आहेत. स्त्रियांच्या हक्कासाठी बाबासाहेब अविरत कष्ट करीत राहिले. स्त्रियांच्या प्रगतीचा सारासार विचार बाबासाहेबांच्या कृतीतून व लिखाणातून ही पाहावयास मिळतो. ते फक्त पुस्तकी पंडित नव्हते तर कृतीतून, आपल्या आचार-विचारातून त्यांनी तत्त्वज्ञानाची जोड कृतीला दिली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही दिनदुबळया जनतेसाठी तसेच समस्त महिला वर्गासाठी आपले ज्ञानपणाला लावून संविधानाच्या माध्यमातून त्यांना अधिकार प्राप्त करून दिले. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने शिक्षण हे घेतलेच पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचे शिक्षण झाले पाहिजे. शिक्षणामुळे आपल्या हक्काची, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होते. यामुळे बाबासाहेब म्हणतात की,"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो पीईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही" असा विचार बाबासाहेबांनी सत्यात उतरवण्यासाठी अतोनात कष्ट घेतले. मुलगा-मुलगी समान कायदा आणला. आणि या दोघांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले गेले पाहिजे याकडे लक्ष पुरविले. बाबासाहेब म्हणतात की,"मुलामुलींना शाळेत फक्त बाराखडी शिकवू नये तर त्यांची मने सुसंस्कृत व गुणवत्तापूर्ण बनावीत यासाठी प्रयत्न करावेत." डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समान हक्क मिळावेत यासाठी पुष्कळ चळवळी केल्या. स्त्रियांची गुलामगिरी डॉ. बाबासाहेबांनी दूर केली.१९२७ ते १९५६ पर्यंतच्या काळात स्त्रीचा स्वतंत्र क्षेत्रात सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा वाढावा म्हणून सतत प्रयत्न केले. मुलीला दत्तक घेण्याचा, आई-वडिलांच्या संपत्तीमध्ये मुलीला अधिकार दिला. स्त्रियांची आत्मप्रतिष्ठा वाढवण्यासाठी तिचा पेहराव, तिचे वागणे, तिचे बोलणे या सर्वांमध्ये बदल घडवण्यासाठी बाबासाहेबांनी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे बाबासाहेबांच्या चळवळीमध्ये स्त्रियां सहभागी होऊ लागल्या..

निष्कर्ष

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आपल्या कृती व उक्तीतून महिलांच्या सक्षमी करणाचाच विचार केला.

२) स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला.

३) स्त्रियांना सक्षम बनवण्यासाठी कायद्यात तरतूद केली.

४) महिलांना त्यांचे हक्क मिळवून देण्यास मदत केली.

संदर्भ ग्रंथ

१) तीन शिक्षण तज्ज्ञ (फुले/शाहू/आंबेडकर )-भालबा विभूते, प्रियदर्शनी प्रकाशन, कोल्हापूर

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीविषयक लेखन- महेंद्र गायकवाड,संघर्ष प्रकाशन, नागपूर

३) सर्वदर्शी डॉ.बाबासाहेब आंबेडकर- संपा. डॉ.पी.विठ्ठल, डॉ.नागेराव कुंभार, डायमंड पब्लिकेशन, पुणे

४) बोल महामानवाचे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ५०० मर्मभेदी भाषणे (खंड-१) आत्मनिवेदन आणि मार्गदर्शन – अनुवाद आणि संपादन डॉ. नरेंद्र जाधव, ग्रंथाली प्रकाशन, माटुंगा – मुंबई

५) असा मी जगलो – संपा.ज.गो.सन्त, सुगावा प्रकाशन,पुणे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि सामाजिक बदल

प्रा. संदीप गोणारकर

प्रभारी प्राचार्य, सिद्धार्थ महाविद्यालय आणि शिक्षण प्रबोधिनी, सिडको,नांदेड.

प्रस्तावना:-

मानवी उत्क्रांतीच्या कालखंडात नवनवीन गरजा निर्माण होत होत्या. त्यानुसार नवनवीन शोध लागत होते. मानवाचा विकास टप्प्या टप्प्याने होत गेला. त्याचाच भाग म्हणजे औद्योगिक क्रांती झाली. औद्योगिक क्रांतीतून वसाहत वादाचा उदय झाला. या वसाहतवादामुळे जनसंवादाला चालना मिळाली आणि जनसंपर्काच्या साधनांची निर्मिती झाली. जनसंपर्काच्या साधनात मुद्रित प्रकारात वर्तमान पत्राने आपल अस्तित्व सिद्ध केलं आणि मुद्रित माध्यमाच महत्व वाढीस लागलं.

इंग्रजांनी 1857 नंतर भारतात पूर्णपणे स्वतःच अस्तित्व निर्माण केलं आणि त्यांना हव्या त्या सुविधा इथ निर्माण करू लागले. त्यात मुद्रनकलेचा सुद्धा समावेश होता. भारतातील मुद्रण कलेची सुरुवात ही पोर्तुगीजांनी 1556 साली गोवा येथे सुरू केले. त्यात अद्ययावत त्या साधनांचा वापर करून ख्रिश्चन मिशनऱ्यांमार्फत जास्तीत जास्त वापर करण्यात येऊ लागला. त्यांना धर्मप्रसारासाठी आवश्यक ती माहिती ते प्रकाशित करू लागले. त्यामुळं भारतीयांना सुद्धा त्यांचे महत्व कळू लागले. पारतंत्र्यातील भारतीय सुद्धा आपल्या देशावर इंग्रज कसे गुलामी लादत आहेत. भारतीयांचा कसा छळ करत आहेत. भारतातील उच्चवर्णीयांनी अधिकारावर कशी गदा आणत आहेत. अशा विविध विषयावर जागृती करून भारताला इंग्रजाच्या तावडीतून सोडवण्यासाठी प्रयत्न करत होते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा विचार करता राजाराम मोहनराय,लोकमान्य टिळक, गो. ग. आगरकर, जी सुब्रमण्यम अय्यर, करुणाकरन, मेनन, नटराजन, महात्मा गांधी आदींसह अन्य प्रादेशिक स्तरावर संपादकांनी वृत्तपत्रांची सुरुवात केली.

स्वातंत्र्याची चळवळ जोर धरत असतानाच देशातील उपेक्षित घटक समजल्या गेलेल्या अस्पृश्यांमध्ये जागृती होत होती. ज्यांची सावली सुद्धा इतर जातीयांच्या व्यक्तीवर पडू नये म्हणून अस्पृश्यानी घराबाहेर निघण्याच्या वेळासुद्धा मर्यादित होत्या. अश्या अस्पृश्यांसाठी इंग्रज हे विकासाची पर्वणी ठरले. अस्पृश्यांना इंग्रजांच्या सैन्यात संधी मिळाली, शिक्षण घेण्यास संधी मिळाली, त्यातून अस्पृश्यांना आपल्या अस्तित्वाची जाणीव होऊ लागली. त्यातूनच बाबासाहेब आंबेडकरांसारखे देशासाठीचे उत्तम असे नेतृत्व तयार झाले. आणि त्यांनी देशाच्या प्रत्येक घटकासाठी योगदान दिले. त्यातील बाबासाहेबांनी दिलेले पत्रकारितेतील योगदान हे अस्पृश्यां सोबतच इतर उपेक्षित घटकांसाठी सुद्धा प्रेरणादायी ठरते.

बाबासाहेबांच्या पत्रकारितेचा उद्देश:

चळवळ चालवायची असेल ती जिवंत ठेवायचे असेल आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवायची असेल तर विचारांच्या प्रसाराची गरज आहे. त्या विचारांचा प्रचार आणि प्रसार जास्तीत जास्त लोकांपर्यंत व्हायचा असेल तर त्यासाठी प्रसार माध्यम म्हणून वर्तमानपत्राची गरज असते. त्या वर्तमानपत्राचे महत्त्व विशद करताना बाबासाहेब म्हणतात की, "कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी वर्तमानपत्राची गरज असते,ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते त्या चळवळीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे असते." यावरून बाबासाहेबांच्या पत्रकारितेचा उद्देश लक्षात येतो.

मूक असलेल्या समाजाचा नायक : मूकनायक

31 जानेवारी 1920 रोजी मनोगताच्या स्वरूपात समाजावरील अन्याय ची स्थिती मांडून त्यातून परिवर्तनाची गरज त्यासाठी वर्तमानपत्राची भूमिका आणि त्याला जिवंत ठेवण्यासाठी करावयाचे प्रयत्न याबद्दल भूमिका मांडून समाजात जागृत करण्यास सुरुवात केली.त्यानंतरच्या पहिल्याच अग्रलेखात स्वराज्य आणि सुराज्य या संदर्भाने मत मांडून, स्वराज्य जरी मिळाले तरी ते सुराज्य होऊ शकेल का ? याबद्दल शंका उपस्थित करून राज्यकर्त्यांच्या भूमिकेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करून स्वराज्याची भूमिका विषद केली.

त्यानंतर हे स्वराज्य नव्हे हे तर आमच्यावर राज्य स्वराज्यातील आमच्या रोहन राष्ट्रांतील पक्ष नागपूरच्या बहिष्कृत परिषदेतील भाषणे गर्जना स्नेह प्रतिबिंब आदी अग्रलेखात मधून बहिष्कृत त्यांची स्थिती त्यांच्याशी

राजकीय व्यवहार त्यांना देण्यात येत असलेल्या दुय्यम वागणूक अशा बाबीवर परखड मत मांडून त्यांनी समाजाला जागृत करण्याचे काम केलं.

अग्रलेखा सोबतच सामाजिक स्थितीतील विविध विषयावर मूकनायक च्या माध्यमातून लिखाण केले. जसे की शंकराचार्याबद्दल शंकराचार्य का शर्कराचार्य ? असा प्रश्न उपस्थित करून तो धर्माच्या नावावर जनतेशी कसा व्यवहार करत आहेत याबद्दल परखड मत व्यक्त केले.  यांचा ब्राह्मण वर्ग असावा खास, टोनगे पाणवतील काय? मूळ शोधा मग वाद मिटेल, केसरीचा हुंदका, रिकामा नावी कुडाला तुंबड्या लावी, पेशवाई, पातळ नियंत्रण, जाती वर्चस्वाचं डोहाळे, अपेक्षा आईच दूध श्रेष्ठ पेशवाईच, पुनरावृत्ती या विविध शीर्षकांतर्गत समाजवास्तव त्यांचे परिणाम विषयावरील लेखन करून समाजाला याविरोधात जागृत करण्याचं काम त्यांनी केलं. पण यासाठी हवा तसा आर्थिक सहभाग मिळत नव्हता त्यामुळे कमी कालावधीतच हे वर्तमान पत्र बंद पडले.

वर्तमानपत्राचे स्वातंत्र्य चळवळीतील प्रभाव आणि विविध मतप्रवाह लक्षात घेता, त्या मतप्रवाह प्रत्युत्तर देणे त्याच्याबद्दल सत्यता समाजापर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन परंपरावादी लेखक जे अर्धसत्य मांडत आहेत त्यातील पूर्ण सत्यता मांडणे गरजेचे आहे याची जाणीव होत होती. परंतु आर्थिक स्थितीमुळे मूकनायक हे पाक्षिक बंद पडले होते. त्याची उणीव भरून करण्यासाठी तीन एप्रिल 1927 रोजी बहिष्कृत भारत ची सुरुवात केली. हे वर्तमानपत्र सुरुवात करत असताना सुद्धा उद्देशात तिळमात्र बदल केला. वर्तमानपत्र मूळ काही आर्थिक फायदा व्हावा हा उद्देश त्यांच्या डोक्यात नव्हताच देशातील सद्यस्थितीअस्पृष्यांवर होत असलेले अन्याय अत्याचार यांची माहिती शासनास व्हावी.स्थानिक नागरिकांना स्वातंत्र्यापेक्षा स्वतःची अधिकार किती महत्त्वाचे आहे याची जाणीव व्हावी, हाच प्रश्न यावर होत असलेल्या अन्याय अत्याचारास पूर्वजनमावर कारणीभूत नाही तर इथली परंपरावादी व्यवस्था कारणीभूत आहे. याची जाणीव व्हावी दुय्यम समाजव्यवस्था नाहीशी होऊन समता आधारित व्यवस्था निर्माण करण्यास इंग्रजाच्या सहकाऱ्यांनी मदत. या सर्व उद्देशाने या वर्तमानपत्राची सुरुवात करण्यात आली.

देशातील अस्पृश्यांच्या प्रश्नाची सरकार दरबारी नोंद व्हावी राजकीय सुधारणांची भारतातील प्रत्येक जाती धर्माचे प्रतिनिधित्व मिळावे दलितांच्या प्रश्नाबाबत जागृती घडवणे लोकांमध्ये शिक्षणाबद्दल जागृती निर्माण करणे अशा विविध उत्तम हेतूने चालू असलेल्या वृत्तपत्राची जाहिरात आगाऊ शुल्क देऊन सुद्धा छापले नसल्यामुळे केसरीचे संपादक मंडळाला लिखाणातून धारेवर धरले होते.

बहिष्कृत भारतातील लेखाच्या विषयाचा विचार करता त्यातील लेख शिक्षण शिक्षणाचे महत्त्व त्याचे विकेंद्रीकरण समाजातील विषमता आदी बाबींवर राजकारण स्वतंत्र चळवळीतील अस्पृश्यांची भूमिका आदी विषयांच्या संदर्भाने लिखाण करून समाजात शैक्षणिक राजकीय आणि सामाजिक पातळीवर बदल घडावा या उद्देशाने हा प्रवास चालू होता.

समता:-

बहिष्कृत भारताच्या नंतर अल्पावधीतच म्हणजे 29 जून 28 ला हे पाक्षिक सुरु केले हे समता संघाचे मुखपत्र म्हणून सुरू करण्यात आले होते. समता हे महिन्याच्या पहिल्या तर बहिष्कृत भारत हे दुसऱ्या शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात येत असत. यातील लेखांबद्दल किंवा आपल्या लेखाबद्दल लिहीत असताना बाबासाहेब म्हणायचे माझे लिखाण हे कडवट वाटत असेल, आपणास गोड गोड वाचून सवय झालेली असल्यामुळे हे कडवट वाटेल, पण जेव्हा या लिखाणाचे सकारात्मक परिणाम पाहाल तेव्हा तुम्हाला गोड वाटल्याशिवाय राहणार नाही 1927 आणि 1928 साली सुरू केलेले दोन्ही पाक्षिक आर्थिक अडचणीमुळे अल्पावधीतच म्हणजे 1929 साली बंद पडले.

जनता:

मूकनायक बहिष्कृत भारत बंद पडले होते दरम्यानच्या काळात स्वातंत्र्य चळवळ सुद्धा जोर धरत होती इंग्रज राजकारणात भारतीयांना प्रतिनिधी उत्तर देण्यास तयार झाले होते. गोलमेज परिषदेच्या माध्यमातून हे सर्व प्रकार घडत होते अशावेळी आपल्या वर्तमानपत्र असावा अशी मानसिकता जोर धरत होती. श्री देवराई नाईक यांच्या संपादनाखाली आणि श्री भास्करराव यांच्याकडे प्रकाशन व्यवस्थेचा भाग देऊन जनता हे पाक्षिक 24 नोव्हेंबर 1930 रोजी सुरु करण्यात आले.

ब्राह्मण आणि भांडवलदारांच्या हाती सत्ता गेली तर उपेक्षित समाजाचे पुन्हा त्याच स्थितीत जाईल त्यामुळे अस्पृश्यांची सत्ता येणे गरजेचे आहे तसेच जर घडले तर देशाचा विकास होण्यास मदत होईल त्यामुळे माझं सर्वस्व ही अस्पृश्याना सत्तेत समाविष्ट करण्यासाठी खर्च करणे गोलमेज परिषदेतील त्यांची भूमिका त्यांचे राजकीय सामान्यांपर्यंत पोहोचावेत यासाठी जनता पक्ष यांची मदत होत गेली या कालखंडातच अस्पृश्यांना राजकारणात प्रतिनिधित्व मिळाले भारत स्वतंत्र झाला लोकशाही राज्यव्यवस्थेत द्वारे सर्वांना समान अधिकार प्राप्त झाले बाबासाहेबांनी आपल्या समुदायात सह बुद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि जनता चे प्रबुद्ध भारत असे नामांतर केले.

वृत्तपत्रांचा सामाजिक जीवनावरील परिणाम :

शैक्षणिक क्षेत्र:

पारंपरिक व्यवस्थेने अस्पृश्यांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता शिक्षणाचे फायदे शिकण्यास तुम्हाला कोणताही देऊ नका करू शकत नाही. इतर माणसांप्रमाणे तुम्हीसुद्धा माणसे आहोत याची जाणीव होणे गरजेचे आहे त्यासाठी शिक्षण घ्यावं अशी मानसिकता तयार करण्याचे काम बाबासाहेबांच्या पत्रकारितेतून झाले. शिक्षणाचे महत्त्व विशद करताना बाबासाहेब म्हणतात की “शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे , जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.” या वाक्याच्या आणि बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाचा परिणाम असा झाला की उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढलं ज्याला दलित आणि अस्पृश्य समजल्या गेलेहोते तो समाज आता प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी घेत आहे.सेवक, तहसीलदार, कलेक्टर , मुख्य सचिव, प्रधानमंत्री कार्यालयातील सचिव आदी पदांपर्यंत हा समुदाय पोहोचला आहे.

राजकीय :-

स्वबळावर सत्ता स्थापण्यासाठी उत्तरप्रदेशात बहुजन समाज पार्टी यांनी केलेले प्रयत्न देशभर विविध राज्यांच्या माध्यमातून विविध उपेक्षित जातींचा असलेला सहभाग ही बाग हा बाबासाहेबांनी दिलेल्या विचारांचा आदर्श याचाच परिणाम आहे असे निदर्शनास येते ग्रामपातळीवरील सरपंचपद भूषविले पासून केंद्रातील कॅबिनेट मंत्रिपदाची पण हे सर्व बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाचा परिणाम आहे हे नाकारता येत नाही.

समारोप :

अशाप्रकारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्य करतो तोच या काळात मूकनायक बहिष्कृत भारत जनता जनता प्रबुद्ध भारत च्या माध्यमातून समाजावर केलेले सामाजिक शैक्षणिक राजकीय आर्थिक संस्कार म्हणजे आज निदर्शनास येत असलेला विकास व दलित चळवळीचा इतिहास. या वर्तमानपत्राच्या प्रवासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सुरू केलेल्या भावनेतून नवीन वर्तमानपत्र सुरू होणे ही काळाची गरज आहे.

संदर्भ :-

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे खंड १८भाग १, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र - साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, २००२.

२. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ४थी आवृत्ती, १९८४.

३. भोळे भा. ल., संदर्भ दलित चळवळीचा, मधुसूदन बजाज प्रकाशन, अमरावती, १९९६.

४.पानतावणे गंगाधर, पत्रकार डॉ. आंबेडकर, अभिजित प्रकाशन, नागपूर,१९८७.

५. वृत्तपत्र – मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता पाक्षिक, प्रबुद्ध भारत.

# युगपुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

संशोधक विद्यार्थी

**अजय श्रीराम मुरमुरे**

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि.लातूर

**प्रस्तावना :**

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. शिक्षण ही पवित्र संस्था आहे शाळेत मने पवित्र होतात. शाळा म्हणजे नागरिक तयार करण्याचे पवित्र क्षेत्र आहे. ते राष्ट्रीयतेचे, मानवतेचे अज्ञानमय दूर करण्याचे उदात्त कार्य आहे. शिक्षणा विषयी, शिक्षणाची महती, थोरवी आणि शिक्षणात किती ताकद असते, हे शिक्षणाविषयीचे शैक्षणिक विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वरील गौरवाद्गारावरून कळून येते. बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यात जेवढे ही कार्यकर्तृत्व केले ते शिक्षणाच्या अधिष्ठानावरच. त्यांनी प्राथमिक व महाविद्यालयीन, विद्यापीठ स्तरावरील शिक्षणाचा लेखाजोखा घेताना आपले शिक्षणाविषयीचे शैक्षणिक विचार अधिष्ठानावर सविस्तर मांडलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या शिक्षणाविषयी शैक्षणिक विचार मांडताना असे म्हणतात की, हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते, पण ही मोठी चूक आहे. भारतातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र व निवारा यांची सोय करून पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागते. तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे, चालू समाज पद्धतीमुळे जे त्यांचे जीवन निर्दयपणे लुबाडण्यात आले. त्याचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्वाचे आहे, याची त्यांना जाणीव करून देणे, हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसारित दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्यामते हेच सांगणे आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या मते ज्या माणसाला धर्मशास्त्राने ज्ञानापासून वंचित केले, त्या माणसाचे हे शिक्षणाविषयीची स्वप्न आहे. पण, या बाबतीत असे म्हणता येईल की त्यांनी जे स्वप्न पाहिले होते. त्या स्वप्नांच्या परिपूर्तीसाठी त्यांनी केलेला साक्षेप, वेळोवेळी मांडलेला विचार हे विचारांसाठी विचार मनात येत नाहीत. या सर्व शैक्षणिक विचाराच्या मागे एक विलक्षण ध्येयवादी व निष्ठावान मन उभे आहे. या परंपरेची जाणीव पूर्वक वेध घेतलेला आहे आणि या मनाला परिवर्तनाचा अपूर्व ध्यास आहे. आजच्या काळात सामाजिक व आर्थिक विकासाचे साधन म्हणून शिक्षणाकडे प्रथम पाहिले जात आहे. व्यक्ति व समाज परिवर्तन घडविणारे ते एक साधन मानले जावू लागले. रसेल यांच्यामते शिक्षणाने व्यक्ती बदलेल आणि व्यक्ती बदलली की समाजही बदलेल, पण समाजव्यवस्थेला परिवर्तन हे काही मान्य नव्हते. स्थिती शीलता हा तिचा स्थायी भाव होता. आधुनिक काळातील नव्या विचारसरणीने या स्थितिशीलतेला हादरा दिला. आणि गतीमानता हे त्या काळाचे चिन्ह मानले गेले. त्याचाच परिणाम शिक्षणासारख्या एका महत्वाच्या घटकावर झाल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण हे सामाजिक जाणीवा निर्माण करण्याचे साधन मानले होते.

प्रचलित विचारप्रवाह असा सांगतो की केवळ ब्राह्मणही व्यक्ती “शिक्षकी” पेशास पात्र आहे. आणि ते काही शाखरेही होते. वास्तविक पाहता ब्राह्मणाचे कार्य म्हणजे विद्येचे रक्षण. परंतु विद्या संवर्धनाचे विहित कार्य ते विसरले आणि विद्या वर्धन खुंटले. त्याला एक प्रकारची मर्यादा आली. आणि म्हणून आधुनिक काळात ही केवळ जातिविशेषामुळे ज्ञानसंवर्धन होते. या कल्पनेलाच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरुंग लावला. म्हणून ते म्हणतात की, सामाजिक दृष्ट्या शिक्षक कोण असावा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ब्राह्मण वर्गाने नेहमीच इतरांच्या बुद्धिमत्तेबद्दल मनात शंका बाळगल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या हाती शिक्षणाची सर्वसूत्रे असणे धोक्याचे आहे. हा धोका व्यक्त करताना त्यांनी समाजातील दुर्बल घटकांनी या पेशाकडे वळावे असे अपेक्षित आहे. साधा, सोपा व सहज असा हा पेशा असल्याने त्यात शिरकाव करणे अवघड नाही, असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. त्याचबरोबर “शिक्षक” या संस्थेवरील नव्या जबाबदारीचे ही स्मरण त्यांनी करून दिला व त्यावर भर दिलेला आहे, असे दिसून येते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षण हे माणसाला विचार देते. त्याच्या बुद्धीची जोपासना करते, त्याच्या अस्तित्वाची जाणीव त्याला करून देते, अस्तित्वाची जाणीव ही मानवी जीवनातील महत्वाची घटना आहे. परंपरेने शिक्षण हा ब्राह्मणांचा व्यवसाय राहिले आहे तो खालच्या जातीचा होऊ शकला नाही याची कारणे स्पष्टपणे सांगता येतात मुलाला शाळेत शिक्षणासाठी पाठवले तर त्याचा दुहेरी बोजा आई-वडिलांवर पडतो आणि मुलगा शाळेत गेला तर तो जे काही काम करतो व त्याबद्दल जी काही मिळकत येते ती बंद होते, उलटत्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसा खर्च करावा लागतो. या कारणांमुळे शिक्षण हा ब्राह्मणाव्यतिरीक्त असलेल्या जातींचा व्यवसाय म्हणून स्वीकारणे शक्य नव्हते, तर हातावरचे जीवन जगणाऱ्यांना असेच पिढ्यानुपिढ्या अज्ञानाच्या अंधारात आपले जीवन जगावे लागते. याचा खेद व्यक्त करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ही अवस्था कितीही क्षम्य असली तरी ती विघातक आहे. व्यक्ति स्वातंत्र्याची आवश्यकता जर मान्य असेल तर व्यक्तीच्या ठायी आपले स्वातंत्र्य रक्षण करण्याची शक्ती उत्पन्न होणे अत्यंत जरुरीचे आहे. आणि ते शिक्षणाशिवाय उत्पन्न होऊ शकत नाही. म्हणजे कोणत्याही राष्ट्रांमध्ये व्यक्ति स्वातंत्र्य हे मूलतत्त्व मान्य केले पाहिजे. ते मान्य केल्याशिवाय राष्ट्राच्या स्वातंत्र्य रक्षणाचा विचार करणे व्यर्थ आहे. तसेच स्वातंत्र्य रक्षण अपरिहार्य असेल तर त्यासाठी शिक्षण घेणे आवश्यक असे अंग मानले जाते.

प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे असावे असे मत, ना. गोपालकृष्ण गोखले यांनी १९१० साली वरिष्ठ कायदेमंडळात मांडला होता, व त्यासाठी त्यांनी बराच खटाटोप केला होता .ही आता सर्वमान्य अशी बाब झालेली आहे, परंतु गोपाळ कृष्ण गोखले यांच्या पूर्वी १८९० मध्ये गोपाळ गणेश आगरकर यांनी प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीची व सरकारने त्याची जबाबदारी व खबरदारी घेण्याच्या सूचना ही केल्या होत्या. आणि गोपाळ गणेश आगरकर यांच्या पूर्वी ही १८८२मध्ये महात्मा फुले यांनी प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात आपला विचार व्यक्त केलेला होता. काही ठराविक वयोमर्यादेपर्यंत निदान वयाच्या १२ वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षणसक्तीचे करण्यात यावे असे मत व्यक्त करण्यात आले होते. छत्रपती शाहू महाराजांच्या उपस्थितीत नागपूर येथे १९९० साली संपन्न झालेल्या अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेत अस्पृश्य समाजाचे एक नेते सी.ना.शिवतरकर यांनी अशाच आशयाचा ठराव मांडलेला होता. प्राथमिक शिक्षण मुलांना आणि मुलींना मोफत व सक्तीचे शक्य तितक्या लवकर सुरू करावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला होता, पण फरक एवढाच आहे की ज्यांनी अगोदरच शिक्षणाचा लाभ घेतलेला आहे, अशांना सक्ती करण्याची गरज नाही असे म्हटले आहे.

प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्राच्या प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुशीसाठी हा प्रश्न सोडविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शत केला गतील. म्हणूनच शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो. आघाडीस आलेल्या जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करून लोकांची निरक्षरता हद्दपार केली असे आपणास दिसून येते. जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात त्यांच्यावर शिक्षणाची अर्थातच सक्ती करू नये. ज्यांना शिक्षणाचे महत्व कळत नाही व जे त्याबाबतीत उदासीन असतात, त्यांच्या करिताच सक्तीच्या कायद्याची आवश्यकता असते.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे त्याचबरोबर ते मोफत असावे असा विचार जेव्हा मांडला जाऊ लागला, तेव्हा त्यावर डॉ. बाबासाहेबांनी आपली तीव्र प्रतिक्रिया नोंदवली. प्राथमिक शिक्षणसक्तीचे केले तरी ते मोफत असावेत असे त्यांना वाटत नाही. ज्यांना फी देणे शक्य आहे, त्यांच्याकडून ती वसूल करण्यात काही ही गैर नाही. पण ज्या वर्गांना प्राथमिक शाळेतील फी देणे ही शक्य नाही त्यांना मात्र शिक्षण मोफत द्यावे. ज्यांना फी देण्याचे सामर्थ्य आहे, त्यांच्याकडून ती घेण्यास काही पण पाप नाही, अथवा त्यांच्यावर कोणत्या ही प्रकारचा अन्याय नाही. त्याचप्रमाणे फी वसुली केली तर थोडी का होईना, सक्तीच्या शिक्षणाचा जादा खर्च भागविण्यात मदत होईल. सुबत्ता प्राप्त लोकांकडून फी वसुली करण्याची बाबासाहेबांनी सूचना किंवा पुढे जादा खर्च भागविण्यासाठी नव्हे तर बसविण्याची त्यांनी केलेली सूचना वरवर समाज पटात भेद करणारी वाटत असली तरी त्याच्या मूळ उद्दिष्टांचा विचार लक्षात घेता त्यातील संगती निःसंशय पणे प्रतीत होते. एवढेच नाही तर वंचित वर्गाला शिक्षण प्रवर्तक करण्याची आणि लोक कल्याणासाठी अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांच्या संवाद साधण्याची दृष्टी येथे दिसून येते.

डॉ. बाबासाहेबांच्या मते शिक्षण हे पवित्र आहे आणि त्यांचे पावित्र्य जोपासण्याची व राखण्याची नितांत गरज आहे. शिक्षण हा मानवी जीवनाचा पायाभूत संस्कार आहे शाळा ही संस्कार केंद्र आहे. एकंदरीत शिक्षण क्षेत्र हे ज्ञानक्षेत्र च आहे. अशी एक त्यांची धारणा आहे महाराष्ट्रातील समाज चिंतकांनी व समाजसुधारकांनी “विद्येला” जे महत्त्व दिले त्यांचे इंगित हेच आहे.विद्या ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाला वळण देते. विद्येची वाढ होणे ही सार्वजनिक हितासाठी आवश्यक असल्याचे लोकहितवादी यांनी प्रतिपादन केले होते. नव्या ज्ञानाचे दरवाजे उघडण्यासाठी प्राचीन व्यवस्थेची चिकित्साही त्यांना आवश्यक वाटत होती. डॉ. बाबासाहेबांचा शिक्षणाकडे, ज्ञानक्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यक्ती विकासाच्या जोपासण्याचा आहे. आणि म्हणूनच त्यांना शिक्षण क्षेत्राचे पावित्र्य पटलेले आहे.

महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाचाही विचार आंबेडकरांनी अतिशय बारकाईने केलेला दिसून येतो. प्रादेशिक विद्यापीठाची त्यांची संकल्पना आज फलद्रूप झालेली आहे. पण विद्यापीठ हा कारकून करण्याचा कारखाना ठरू नये अशी त्यांनी मत व्यक्त केलेली भीती मात्र अजून ही तशीच आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसंबंधी त्यांचा जसा मूलभूत दृष्टिकोण आहे. तसाच महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकाविषयीचा आहे. अतिशय परिश्रम करून मोहोंजोदारो येथे सापडलेल्या नाण्यावरील व विटांवरील लेख वाचणारे फादर हे रॉस यासारखे ध्येयवादी प्राध्यापकत्यांना हवे आहेत. परंतु भारतात तसे शिक्षकना ही तयाची खंत ते व्यक्त करतात. मला वाटते की थोडेसे रुपये मिळवावेत व आपली सुखाने कालक्रमणा करावी या पलीकडे आमच्या प्रोफेसरांना आयुष्यात काही महत्त्वकांक्षाच नाही. या महत्वकांक्षेच्या अभावामुळे त्यांच्या हातून काहीही भरीव कार्य होत नसावे ते अधूनमधून

काही पाठ्यपुस्तकावर टिपणे लिहितात. टिपणे लिहिण्यापलिकडे काही महत्त्वाचे कार्य आहे. याची माहिती त्यांना आहे की नाही कोण जाणे ?

शिक्षण क्षेत्रातील कटु सत्यावर डॉ.आंबेडकर यांनी नेमके बोट ठेवले आहे. महाविद्यालयीन प्राध्यापकवरील अविश्वास वाटत असला तरी एका अनिष्ट प्रवृत्तीचेच चित्रण केले आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात घुसलेल्या सुक्त प्रवृत्तीचे व निष्क्रियतेचे हे द्योतक आहे. शिक्षणाकडे साचेबंदपणे पाहण्याचा या दृष्टिकोणावर प्रहार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात हल्लीच्या काळी अगदी साधारण प्रतीचे शिक्षण दिले जाते. अगदी बी.ए. परीक्षेपर्यंत एखादा तात्या पंतोजीच्या पद्धतीने शिक्षण दिले जाते. ही परिस्थिती बदलली पाहिजे असे त्यांना वाटते. शिक्षणासंबंधीच्या जुन्या व अपुऱ्या कल्पनांचाच हा परिणाम होईल असे म्हणून या पद्धतीत सुधारणा होण्याची त्यांना गरज वाटते .

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सह शिक्षणाचे पुरस्कर्ते होते.आगरकरांप्रमाणेच स्त्री-पुरुषांना एकत्र शिक्षण दिले पाहिजे, असे त्याचे मत होते. स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा, वेगवेगळी कॉलेज नकोत, तर स्त्रियांचे शिक्षण पुरुषांच्या बरोबरच एकत्र आले पाहिजे. पुराणमतवादी लोक स्त्रीला पुरुषांच्याबरोबर समान मानण्याविरुद्ध असल्यामुळे त्यांचा स्त्री शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोण विवक्षित आहे, त्यांना स्त्री-पुरुष शिक्षण एकत्र व्हावे हे मान्य नव्हते. त्यांची कारण मीमांसा करताना स्त्री-पुरुषांच्या नीतिमत्तेचे बुजगावणे ते पुढे करतात वयाच्या ७ वर्षानंतर स्त्री-पुरुषांना वेगवेगळे शिक्षण दिल्याने स्त्रियांचा विजय आणि पुरुषांची नीतीमत्ता शाबूत राहू शकेल असा त्यांचा दृढविश्वास होता. स्त्री-पुरुषांना वेगवेगळे ठेवल्याने त्यांची नीतिमत्ता शाबूत राहते. हा भ्रम आहे असे आंबेडकरांचे मत आहे. उलट स्त्रियांच्या सहवासात राहून जो पुरुष आपले मन ताब्यात ठेवू शकतो व पुरुषाच्या सहवासात जी स्त्री आपले पाऊल वाकडे पडणार नाही याची खबरदारी घेते त्यांना नीतीमान म्हटले पाहिजे. स्त्री-पुरुषातील परस्पर अनुदार नष्ट होण्यासाठी स्त्री-पुरुष सहवासाची जशी गरज आहे तशीच सहशिक्षणाचाही गरज आहे, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोण आहे.

**संदर्भ :**

१. गोपाळ गणेश आगरकर : प्रो.मो.दा.आळतेकर

२. मुकनायक :५ जून १९२०

३.महात्मा फुले : समग्र वाड्.मय : संपादक कीर-मालशे

४.औरंगाबाद येथील पीपल्स कॉलेमध्ये शिलान्यास प्रसंगीचे प्रकाशित झालेले बाबासाहेबांचा विचार) तारीख :२२ सप्टेंबर१९५१.

५.नवयुग : प्रा. हुदळीकर यांनी घेतलेल्या मुलाखतीतील आंबेडकरांचे विचार.

६. बहिष्कृत भारत :१५ जुलै १९२७

# कामगारांचे कैवारी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. विवेक चनमनवार**

समाजशास्त्रविभाग, स.वि.म. कला महाविद्यालय, किनवट, ता. किनवट जि. नांदेड

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शैक्षणिक, सामाजीक, राजकीय, आर्थिक कार्य केले. त्याच बरोबर कामगारांच्या हक्काबद्दल अत्यंत महत्वाचे कार्य केले आहे. त्यांना कामगारांबद्दल आस्था होती. जिव्हाळा होता. भारतातील कामगारांची अवस्था दयनीय आणि निराशाजनक होती. मालक, भांडवलदार यांच्या शोषणातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी कामगारांना मुलमंत्र दिला. तो म्हणजे" गुलामाला गुलामीची जाणीव झाल्याशिवाय तो बंड करून उठणार नाही." याची जाणीव कामगारांना करून दिली. शोषीत, कष्टकरी, कामगार गुलामीचे जीवन जगत होते. या सर्वांना स्वत:च्या हक्कासाठी संघर्ष करण्याची ताकद, हिंमत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचारातून, लिखानातून, वेळोवेळी दिलेल्या भाषणातुन दिली. भारताच्या राजकीय क्षितीजावर डॉ. आबेडकर नसते तर शोषीत, पीडीत, कामगारांचे भवितव्य अंधकारमय झाले असते. चातुर्वण्य सामाज व्यवस्थेने माणसां-माणसांत विषमतेची दरी निर्माण केली. आर्थिक उत्पन्नाची साधने स्वत:च्या हातात ठेवली. शोषीत, पिडीत, दलित, आदिवासी, कामगार यांना सत्ता संपत्तीपासून वंचित ठेवले. आर्थिक उत्पन्नाची साधने यांच्यावर ती सर्वाचा समान हक्क असावा हे 'राज्य समाजवाद' या संकल्पनेतून मत मांडले.

भारतामधील खाण कामगार, शेतमजूर, बिडी कामगार, गिरणी कामगार, कारखान्यातील कामगार व इतर क्षेत्रातील कामगार यांच्या हक्कासाठी, न्यायासाठी 1936 मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पक्षाचा जाहिरनामा Times of India या इंग्रजी दैनिक वर्तमान पत्रात प्रकाशित करण्यात आला. या जाहिरनाम्यात ध्येय-धोरणे अतिशय सुक्ष्म पदधतीने विचार करून ठरवली होती. मुंबई येथे 17 मार्च 1938 च्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सर्वसाधारण सभेत डॉ. आंबेडकर म्हणाले, "गरिबांचा पक्ष गरिबांनी चालविला पाहिजे सामाजिक अन्याय, अत्याचाराविरूदध, आर्थिक विषमते विरूदध कामगारांनी लढा दिला पाहिजे तेव्हाच कामगार संघटनेच्या बळावर प्रश्न सुटतील ते म्हणतात "परावलंबी असण्यापेक्षा स्वावलंबी व्हा" असा संदेश कामगारांना डॉ. आंबेडकरांनी दिला. डॉ. आंबेडकर म्हणतात श्रमीक वर्गातील प्रत्येकाने रू सोचा "सामाजिक करार", कार्लमार्क्स यांचा "कम्युनिस्ट जाहीरनामा", पोपलिओ तेरावे यांचे "इन सायक्लीकल कम ऑन दी कंडिशन ऑफलेबर " आणि जॉन स्टुअर्ट मील यांचे "लिबर्टी" याचा परिचय करून घेतला पाहिजे. असे आग्रही प्रतिपादन केले आहे. श्रमिकांना संसदीय पदधतीत आपले कल्याण साधून घ्यावयाचे असल्यास त्यांना शासनकर्ते व्हावेच लागेल असे त्यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कामगार विषयक कार्याचा दुसरा अध्याय ते भारताचे मजूर मंत्री झाल्यावर सुरू होतो. व्हाईसराच्या मंत्रीमंडळात 1942 साली मजूर मंत्री म्हणून काम करतांना त्यांनी कामगारांना त्यांचे मूलभूत हक्क बहाल केले. कामगार कल्याण हे सरकारचे कर्तव्य ठरविले. कामगार संघटनांना मान्यता दिली. किमान वेतन, प्रसुती रजा आणि कामाचे तास, रोजगार नियोजन केंद्र या संबंधी तरतुदी व कायदे करून घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पश्चीम बंगाल दौऱ्यावर असतांना कोळसा खाणीत स्त्रिया पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतांना त्यांनी पाहिल्या. त्या कामगारामध्ये गरोदर स्त्रिया सुदधा काम करत होत्या. याचा

त्यांच्या मनावर ती सखोल परिणाम झाला. मजूर मंत्री असतांना महिला आणि कामगारांसाठी कायदयात विशेष तरतुदी केल्या. प्रसूतीच्या काळात विश्रांतीची तरतुद, रोख मदत इत्यादी तरतुदी केल्या. किमान चार आठवडे प्रसूती भत्ता मिळावा तसेच कामगार गैरहजर असतांना त्यांना पगारी सुटया मिळाव्यात त्याचबरोबर कायदयाखाली नियम करण्याचा अधिकार आणि खाणकामगा ाना शॉवर बॉथ ची योजना अमलात आणली होती. “दि माईन्स मॅटर निटीबेनिफिट ऍक्ट” नुसार खाणीतील स्त्रियांना बाळंतपणाची (प्रसूतीपुर्वी व प्रसूतीनंतर) रजा देण्याची शिफारस केली. भारतातील प्रत्येक क्षेत्रातील स्त्रियांना प्रसूती रजेचा लाभ झालेला आहे.

**अध्ययनाची उददीष्टे :-**

1. कामगारांना मिळणाऱ्या सुविधांचा अभ्यास करणे.
2. मजूरांकरीता केलेल्या कायदयांचा अभ्यास करणे.
3. मजूरांच्या आर्थिक उत्पन्नातील बदलाचा अभ्यास करणे.
4. मजूरांच्या जिवनमानातील बदलाचा अभ्यास करणे.
5. कामगारांच्या वर्तमान परिस्थितीचा अभ्यास करणे.

**अध्ययनाची ग्रहीते :-**

1. कामगारांना मिळणाऱ्या सुविधांचा लाभ महत्वाचे ठरत आहे.
2. कामगार कायदे देशातील मजूरांसाठी हितकारक बनले आहेत.
3. मजूरांच्या आर्थिक उत्पन्नात बदल होतांना दिसत आहे.
4. आर्थिक उत्पन्न वाढीतून कामगारांचे जिवन पातळी उंचावली आहे.
5. कामगारांची वर्तमान परिस्थितीत बदल घडत आहे.

**डॉ. आंबेडकर यांचे कामगार संदर्भात कार्य : -**

- 15 ऑगस्ट 1936 साली स्वतंत्र मजूरपक्षाची स्थापना केली हा पक्ष कामगारांच्या न्याय, हक्क, प्रश्नासाठी स्थापना केली.
- 1938 साली मनमाड येथे कर्मचारी परिषदेचे अध्यक्ष होते. त्या परिषदेच्या भाषणात सांगितले 'ब्राम्हण शाही आणि भांडवलशाही हे भारतीय कामगारांचे दोन शत्रू आहेत.'
- 17 मार्च 1938 मुंबईच्या स्वतंत्र मजूरपक्षाच्या सर्वसाधारण सभेत डॉ. आंबेडकर यांनी सांगितले, सामाजिक अन्याय, अत्याचारा विरूदध, आर्थिक विषमतेविरुद्ध कामगारांनी लढा दिला पाहिजे तेव्हाच कामगार संघटनेच्या बळावर प्रश्न सुटतील.
- कामगारांना संप करण्याचा हक्क मिळवून दिला. या कामगारांच्या लढयामुळे मालक, भांडवलदार वर्गात प्रचंड खळबळ माजली होती.
- शेतकऱ्यांसाठी किमान वेतन दर असावेत अशी मागणी विधिमंडळात केली.
- बिडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी बिडी कामगार संघ स्थापना केला.
- 2 जुलै 1942 ला तेव्हा ईसरॉय मंत्री मंडळात कामगार मंत्री झाले. या कारकिर्दीत त्यांनी कामगारांसाठी बरेच कायदे निर्माण केले.

- 2 सप्टेंबर 1945 ला कामगार कल्याण योजना सादर केली ही योजना 'लेबरचार्टर 'म्हणून प्रसिद्ध आहे. (Charter of Labour)
- युदध साहित्य निर्माण करणाऱ्या कारखान्यात एक संयुक्त कामगार नियामक समिती स्थापन केली.
- सेवा योजन कार्यालय (Employment Exchange) ची स्थापना केली.
- कामगारांना कमीत कमी वेतन ठरविण्याची तरतुद असलेले बिल मांडले यातूनच 'किमान वेतन कायदा - 1948 ' ची निर्मिती झाली.
- कामगारांना अगोदर भर पगारी रजा मिळत नव्हती. 14 एप्रिल 1944 ला बाबासाहेबांनी भर पगारी रजेचे विधेयक मजूर केले.
- 'लवाद यंत्रणा' औदयोगिक कलह् मिटविण्यासाठी उभारणी केली.
- 31 जानेवारी 1944 रोजी खाण कामगारांसाठी 'कोळसा खाण कामगार फंडाची' स्थापना करणारे विधेयक संसदेत मांडले.
- 8 एप्रिल 1946 ला 'मिका माईन्स लेबर वेलफेअर फंडाची' स्थापना करण्यासंबंधीचे बिल संमत केले.
- इंडियन माईन्स (अमेंडमेंड) ऑर्डिनन्स 1945' नुसार स्त्री कामारांच्या मुलांसाठी पाळणाघराची व्यवस्था करण्याचे व्यवस्थापनावर बंधन घातले.
- वर्षातून कमीत कमी 240 दिवस काम करणाऱ्या कामगारांना कायम करवून घेणे.
- कामावरती कामगारांचा अपघाती मृत्यू झाला तर कुटूंबाला नुकसान भरपाई करण्याची तरतूद करण्यात आली. त्याच्या कुटूंबातील सदस्याला अनुकंपा वर नोकरीची उपलब्धता करून दिली.
- कामगारांना दिवसभरात केवळ 8 तासांचे काम असावे अशी तरतुद केली.
- बाबासाहेबांनी भारतीय घटनेची निर्मिती केली. त्यातील मार्गदर्शक तत्व कलम 39 (ड) नुसार पगारदार पुरूषाइतकाच पगार त्याच पदावर काम करणाऱ्या स्त्रियांना ही मिळावा अशी घटनात्मक तरतुद केली.
- भारतीय राज्यघटनेत कलम (42) मध्ये प्रसुती रजे (Maternity Leave) संदर्भात तरतुद मांडली आहे. मातृत्व हा स्त्रिचा नैसर्गिक अधिकार आहे. स्त्रिया (प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर) एकूण 180 दिवस (6 महिने) भर पगारी प्रसूती रजा घेण्यास पात्र असतील ही तरतूद केली.
- घटनेच्या कलम 43 नुसार गर्भवती व बाळंत स्त्रियांसाठी कामाच्या ठिकाणी योग्य व सुरक्षित व्यवस्था ठेवण्याची तरतूद केली.
- कलम 43 (अ) नुसार शासनाने कामगारांना व्यवस्थापनात सहभागी करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी तरतुद केली.
- कलम 43 नुसार शासनाने कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी सामाजिक व सांस्कृतीक संधी देण्यासाठी प्रयत्न करण्याची तरतूद केली.
- 'States and Minorities' या ग्रंथामध्ये वेठबिगार कामगारांचे प्रश्न सोडवतांना 'वेठबिगार हा गुन्हा आहे' असे मत मांडले आहे.
- वय वर्षे 14 खालील मुलांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध केले. राज्यघटनेतील कलम 21 (अ) अंतर्गत 14 वर्षाखालील मुलांना मोफत शिक्षणाचा अधिकार दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची राज्यघटना लिहत असतांना कामगाराकरीता विशेष काळजी घेऊन राज्यघटना लिहीली. कामगारांची मजूरी, नोकरीच्या अटी, कारखान्यातील व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य, कामाचे तास, कामगार मालक संबंध यासर्व घटकांचा विचार करून राज्यघटनेत कामगार कायदे समाविष्ट केले.

**अध्ययन पदधती :-**

प्रस्तुत शोधनिंध कार्यात वर्णनात्मक संशोधन पदधतीचा वापर करण्यात आला आहे. हे संशोधन प्राथमिक व द्वितीय माहिती वर आधारीत आहे. त्याचबरोबर त्यांचे भाषणे, वृत्तपत्रातील लेख, यांचा अभ्यास करण्यात आला आहे. दुय्यम स्त्रोत म्हणून इतर संशोधकाचे प्रकाशीत पुस्तके, खंड, मासिकातील लेख, भाषणे यांचा अभ्यास केला गेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामगार विषयक दृष्टीने कामगारांचे प्रश्न, न्याय, हक्क त्यांना मिळण्यास मदत झाली आहे. हे संशोधन कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते कामगारांच्या आस्थेविषयक चे योगदान आहे.

**निष्कर्ष :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक विचारांचे आणि तरतुदीचे अमुल्य मार्गदर्शन लाभले आहे. सर्वच क्षेत्रातील कामगार, विशेष स्त्री कामगार, यांचा आस्थेने अभ्यास केला आहे. कामगारांकरीता मिळणाऱ्या सुविधा, उत्पन्न, राहणीमान, आरोग्य, शिक्षण इत्यादीसंबंधी उपाय ही सुचविले. कामगारांना त्यांनी सांगितलेले स्वावलंबी बना आणि संघटनात्मक ऐकी असावी तेव्हाच तुमचे प्रश्न सुटले जातील, संप करण्याचा तुमचा हक्क आहे. हा हक्क बाबासाहेबांनी तरतुद करून मिळवून दिला म्हणून कामगारांचे जिवनमान उंचावले आहे.

**संदर्भ सुची :-**


1. प्रदीप गायकवाड, कामगार चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख, समता प्रकाशन, नागपूर- 2001
2. खैरमोडे सी. मी., डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, खंड-11, सुगावा प्रकाशन पुणे, 1990
3. संपादक, महाराष्ट्र टाईम्स-2013.
4. Constitution of India, Government of Maharashtra-1996, P. No. 17-18

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान

**प्रा. डॉ. पिडगे अनंत किशनराव**

समाजशास्त्र विभागप्रमुख, संभाजी महाविदयालय, मुरूड ता. जि. लातूर

**प्रस्तावना**

दुसऱ्या महायुध्दाचा शेवट झाल्यानंतर जर्मनीच्या मित्र राष्ट्राचा महायुध्दात परावभूत करून ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स आणि रषिया हि राष्ट्रे विजयी झालेली होती. भारतावर साम्राज्य गाजवणारे ब्रिटन महायुध्दात विजयी झालेले असले तरी हिटलरच्या नाझी लष्करांने ब्रिटनवर बॉम्ब वर्षाव करून त्याची अर्थ व्यवस्था जमीन दोस्त केली. भारतालाही स्वातंत्र्य मिळणारच होते. भारताचा राज्यकारभार सुरळीत चालविण्यासाठी राज्यघटना निर्माण करण्याची प्रक्रिया देशात सुरू झाली. राज्य घटना निर्मीतीसाठी. एक घटना समिती निर्मतीसाठी एक घटना समिती बनविणे आवश्यक होते.

**१. घटना समितीमध्ये प्रवेश –**

स्टॅफर्ड क्रिप्स यांनी भारतीयांना राज्यघटना बनविण्यासाठी एक घटना समिती व हंगामी मंत्री मंडळ निर्माण करण्याचा आदेश दिला. कॉंग्रेसने डॉ. आंबेडकरांचा दोन्ही ठिकाणी समावेश होणार नाही याची पुरेपूर दक्षता घेतली भारताच्या प्रत्येक प्रांताच्या कायदे मंडळातून घटना समितीवर सभासद निवडले जाणार होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोन्हीही निवडून देवून का अशीच कॉंग्रेस भूमिका होती. स्वतंत्र भारताच्या जडण घडणीत दलितांचे स्थान कोणत्या स्वरूपाचे असेल याबद्दल डॉ. आंबेडकरांना खूप ध्यास लागलेला होता. घटना समितीमध्ये जाण्याची डॉ. आंबेडकरांना तिव्र इच्छा होती तरी बाबासाहेबांसाठी कॉंग्रेसने नकार दिला "डॉ. आंबेडकरांचा घटना समितीत प्रवेश होउ नये म्हणून आम्ही घटना समितीची प्रवेश व्दारेच नव्हेतर खिडक्या ही बंध करून घेतलेल्या आहेत." अशा परितस्थीतीत बंगालच्या विधान सभेत डॉ. आंबेडकरांच्या शे. का. फे. या पक्षाचा जोगेद्रंनाथ मंडल हा एकमेव आमदार होता या शिवाय 25 अस्पृश्य आमदार कॉंग्रेसकडून निवडून आले होते व 4 दलित आमदार होते. आणि बरेच आमदार मुस्लीम लिगचे होते. कॉंग्रेसचा विरोध असताना ही डॉ. आंबेडकर बंगालच्या विधानसभेतून घटना समितीवर निवडून आले आणि घटना समितीमध्ये प्रवेश केला.

**२. मसुदा समितीचे अध्यक्ष –**

घटना समितीत अशा प्रश्न निर्माण झाला की, प्रत्येक्ष घटना कोणी लिहायची? मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून कोणाची निवड करावयाची ? विचार मग्न झालेले पंडीत नेहरू, सरोजीनी नायडू यांनी या बाबत महात्मा गांधीची विचार विनीमय केला. पंडीत नेहरू गांधीना म्हणाले की, " आशिया खंडातल्या काही देशाच्या राज्यघटना तयार करणाऱ्या सर आयव्हर जेनिंग्स यांना आपल्या देशाची राज्य घटना तयार करण्यासाठी बोलवावे अशी काही मंडळीची सुचना आहे. "तेव्हा महात्मा गांधीनी नेहरूंना उलट प्रश्न केला की, "आपल्याच देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उच्च दर्जाचे घटना तज्ञ आहेत हे तुमच्या कसे काय लक्षात आले नाही ? " महात्मा गांधीच्या सल्याप्रमाणे पंडीत नेहरू, डॉ. राजेंद्रप्रसाद आणि सरदार वल्लभभाई पटेल या सर्वानी विचारविनीमय करून 7 सदस्यीय मसुदा समिती स्थापना करून मसुदा समितीचे अध्यक्षपद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे सुपूर्त केले.

मसुदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. आंबेडकरांची निवड झाल्यांनतर त्यांना आणखी एका कारणामुळे फारच आनंद झालेला होता. ते एका ठिकाणी म्हणतात की, भारताचे संविधान लिहण्याचे भाग्य मलाला भले त्यामुळे मी भारतातील सर्व जाती धर्मातील लोकांना न्याय देण्याचे काम करेन "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व देशाच्या राज्य घटनेचा अभ्यास करून भारताचे संविधान 395 कलमाचे आणि त्यात 22 घटक राज्य व 12 अनुसूची सह भारतीय राज्यघटना तयार केले.

**3. भारतीय राज्यघटना –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेचा मसुदा दि. 21 फेब्रुवारी 1948 रोजी घटना समिती समोर सादर केला या मसुदयावर सभागृहात सविस्तर चर्चा, प्रश्न उत्तरे व विचार विनीमय झाला. मसुदयात 7635 दुरूस्त्या सुचविण्यात आल्या काही दुरूस्त्यांचा स्वीकार ही करण्यात आला. 26 नोव्हेबंर 1949 रोजी घटना समितीने घटनेच्या मसुदयाला मंजुरी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहलेली राज्यघटना 26 जानेवारी 1950 रोजी देशात लागू करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल खालील काही नेत्यांनी गौरोदगार काढले व आपले मत पुढील प्रमाणे प्रकट केले.

**डॉ. पट्टाभी सिताराम मैया–**

डॉ. आंबेडकरांनी अप्रतिम आणि प्रचंड असे काम केलेले आहे. कोणालाही न जुमानणारी दडपणाला बळी न पडणारी अजिंक्य अशी बुध्दीमत्ता पाम वर्षाप्रमाणे उंच, दिग्ज असोत की खुरटी झुडपे असोत त्या सर्वाचे दमण करील. असे त्यांना जे योग्य वाटेल त्याकरीता ते परिणांमाची परवा न करिता उभे रहात असत.

**शंकररावदेव –**

ज्गातील कुठल्या ही राष्ट्रातील कोणत्याही घटना पंडीताच्या तोडीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आहे.

**शामनंदन सहाय्य (बिहार ) –**

डॉ. आंबेकरांनी घटना तयार करण्याचे कार्य केले निवळ समितीच नव्हे संपूर्ण राष्ट्र त्यांचे ऋणी राहिल ज्या समर्थपणे त्यांनी मसुदा तयार केला तितक्याच समर्थपणे डॉ. आंबेकडरांनी घटना समिती मार्फत तो मान्य देखील करून घेतला. हे त्यांचे कौशल्या वर्तमान काळच नव्हे भविष्यकाळ देखील कृतज्ञपणे लक्षात ठेवेल.

**अल्लादी कृष्णस्वामी अय्यर –**

माझे मित्र डॉ. आंबेडकर यांचे घटनेतील कौशल्य आणि बुध्दीमत्ता याचा उपयोग अविश्रांत घटना तयार केली आहे त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

**केशवराव जेधे –**

या घटनेला भिमस्मृती म्हणावे लागेल डॉ. आंबेडकरांचे कृर्तुत्व व बुध्दीमत्ता अलौकीक आहे.

**संदर्भीय ग्रंथ –**

1. दलीत चळवळ : चिंता आणि चिंतन – सुभाष गायकवाड.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतीक मंडळ.
3. महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास : डॉ. अनिल शिनगारे / डॉ. विट्टल घुले
4. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर खंड क्र. 8 : चांगदेव खैरमोडे
5. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर खंड क्र. 5 : चांगदेव खैरमोडे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री मुक्तीचे समर्थक आणि हिंदू कोडबिल

प्राचार्य

**डॉ. गंगाधर ना. सरोदे**

युनिव्हर्सल संगणक टायपिंग संस्था अहमदपूर

बाबासाहेब आंबेडकरांच्या वडिलांचे नाव रामजी तर आजोबांचे नाव मालोजीराव सकपाळ होते. मालोजी इंग्लिश राजसत्तेच्या सैन्यात शिपाई म्हणून भरती झाले होते. सैन्यातील नोकरीमुळे मालोजीराव सैनिकी शाळेत शिक्षण घेऊ शकले व त्यांनी रामानंद पंथाची दीक्षा घेतली होती. त्यामुळे मालोजीराव यांच्या घरातील व्यवहारांत शुद्ध विचाराला व शुद्ध आचाराला महत्त्वाचे स्थान होते. मालोजींना तीन मुलगे व एक मुलगी अशी चार अपत्ये होती. दोन मुलांनंतरच्या मिराबाई या मुलीचा जन्म झाला होता. तर इ.स. १८४८ च्या सुमारास जन्मलेले रामजी हे मालोजींचे चौथे अपत्य होते. मालोजींचा पहिला मुलगा घरदार त्यागून संन्यासी झाला होता तर दुसरा मुलगा इंग्रजी सैन्यातच नोकरीस लागला आणि तिसरा मुलगा असलेल्या रामजींनी सैनिकी शाळेत शिक्षण घेतले व पुढे ते नॉर्मलची परीक्षाही उत्तीर्ण झाले. शिक्षण सुरू असताना रामजी इ.स. १८६६ च्या सुमारात वयाच्या १८ व्यावर्षी इंग्रजी सैन्याच्या १०६ सॅपर्स ॲन्ड माय नर्स तुकडीत शिपाई म्हणून भरती झाले. रामजी १९ वर्षाचे असताना त्यांचा विवाह १३ वर्षीय भीमाबाईंशी झाला. भीमाबाईंचे वडील मुरबाडचे राहणारे होते.

ते इंग्रजी सैन्यात सुभेदार या पदावर कार्य करीत होते. रामजी हे धार्मिक वृत्तीचे होते. त्यामुळे त्याच्यावर संत कबीराचे दोहे, ज्ञानेश्वर, नामदेव, चोखोबा, एकनाथ, तुकाराम इत्यादी संतांचे अभंग पाठ केले होते. ते रोज ज्ञानेश्वरी वाचत, सकाळी स्तोत्रे व भूपाळ्या ही म्हणत. सैन्यात शिपाई असताना सैनिकी शाळेत त्यांचे इंग्रजी शिक्षण सुरू झाले व त्यांनी इंग्रजी भाषा उत्तमरीत्या आत्मसात केली. यामुळे ते नॉर्मल स्कूलच्या (मॅट्रिकच्या) परीक्षेत उत्तीर्ण झाले. मॅट्रिक परीक्षा उतीर्ण झाल्यामुळे त्यांची शिपाई पदाची नोकरी सुटली व त्यांना सैनिकी शाळेत म्हणजेच 'नॉर्मल स्कूल' मध्ये शिक्षक पदाच्या नोकरीची पदोन्नती मिळाली. रामजींना उत्तम शिक्षक होण्यासाठीचे प्रशिक्षण घेण्यास पुण्याच्या सैनिकी शाळेत प्रवेश मिळाला. प्रशिक्षित शिक्षक होऊन त्यांची इंग्रजी राजसत्तेच्या सैनिकी शाळेत पदोन्नती होऊन ते मुख्याध्यापक बनले व या पदावर ते १४ वर्षे राहिले. त्यांना मुख्याध्यापक पदाच्या अखेरच्या टप्प्यात सुभेदार पदाचीही बढती मिळाली. रामजी व भीमाबाई या दांपत्याला सन१८९१पर्यंत चौदा अपत्ये झाली होती. त्यापैकी गंगा, रमा, मंजुळा व तुळसा या चार मुली जगल्या. मुलांपैकी बाळाराम, आनंदराव व भीमराव (भिवा) ही तीन मुले हयात होती. भीमराव हा सर्वात लहान व चौदावे अपत्य होते.

**बालपण**

रामजी ज्या पलटणीत होते ती पलटण इ.स. १८८८ मध्ये मध्यप्रदेशातील महू येथे लष्करी तळावर आली होती. येथे सुभेदारराम जींना नॉर्मल स्कूलचे मुख्याध्यापक पद मिळाले होते. या काळात १४ एप्रिल १८९१ रोजी महू (आताचे डॉ. आंबेडकर नगर) या लष्करी छावणी असलेल्या गावी रामजी व भीमाबाईंच्या पोटी बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. रामजींनी मराठी व इंग्रजी भाषेचे यथाविधी शिक्षण ही घेतले होते. भीमराव हे रामजी सकपाळ व आई भीमाबाई यांचे १४ वे व अंतिम अपत्य होते. बाळाचे नाव भिवा असे ठेवण्यात

आले, त्यांची भीम, भीमा व भीमराव ही नावे ही प्रचलित झाली. बाबासाहेब आंबेडकरांचे कुटुंब हे त्याकाळी अस्पृश्य होते आणि महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातील आंबडवे या मूळगावचे होते. अस्पृश्य असल्यामुळे त्यांच्या सोबत नेहमी सामाजिक-आर्थिक भेद भाव केला जाई. इ.स. १८९४ मध्ये सुभेदार रामजी सकपाळ इंग्रजी सैन्यातील मुख्याध्यापक पदाच्या नोकरीवरून निवृत्त झाले आणि महाराष्ट्रातल्या रत्नागिरी जिल्ह्यातील आपल्या मूळगावा जवळील दापोली या गावातील कॅम्प वस्तीत परिवारासह राहू लागले. भीमराव वयाने लहान असल्यामुळे कॅम्प दापोली येथील शाळेत त्यास प्रवेश मिळाला नाही व भीमरावास घरीच अक्षर ओळख करून द्यावी लागली .इ.स. १८९६ मध्ये रामजींनी आपल्या कुटुंबासह दापोली सोडले व ते साताऱ्याला जाऊन तेथे स्थाईक झाले.यावेळी भीमरावाचे वय ५ वर्षाचे झाले होते. रामजींनी इ.स. १८९६ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा येथील कॅम्प स्कूल या मराठी शाळेमध्ये भीमरावाचे नाव दाखल केले. यावर्षीच त्यांनी कबीर पंथाची दीक्षा घेतली. त्यांच्या या स्थानांतरानंतर थोड्या कालावधीत इ.स. १८९६ मधे मस्तकशूल या आजाराने आंबेडकरांच्या आई भीमाबाईंचे निधन झाले, त्यावेळी आंबेडकर ५ वर्षाचे होते. त्यानंतर भीमा सह व अन्य मुलांचे संगोपन त्यांच्या आत्या मीराबाईंनी कठीण परिस्थितीत केले. रामजींनी इ.स. १८९६ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा येथील कॅम्प स्कूल मध्ये भीमरावाचे नाव दाखल केले. इ.स. १८९८ साली रामजींनी जीजाबाई नावाच्या विधवेसोबत दुसरे लग्न केले. साताऱ्यातील कॅम्पस्कूल मधील मराठी शिक्षण पूर्ण केल्यानंतर साताऱ्यातीलच सातारा हायस्कूल या इंग्रजी सरकारी हायस्कूलमध्ये भीमरावाचे नाव दाखल केले. कोकणासह महाराष्ट्रातील लोक पूर्वी आपले आडनाव आपल्या गावाच्या नावावरून ठेवत असत व त्यात शेवटी 'कर' शब्द जोडण्याचा प्रघात आहे. त्यामुळेच बाबासाहेबांचे आडनाव "सकपाळ" असतांना त्यांचे वडील रामजी यांनी ७ नोव्हेंबर१९००रोजी साताऱ्यातील गव्हर्नमेंट हायस्कूल मध्ये "आंबडवेकर" असे आडनाव नोंदवले. साताऱ्याच्या या शाळेत भीमरावांना शिकवण्यासाठी कृष्णा केशव आंबेडकर नावाचे शिक्षक होते. शाळेच्या दप्तरात नोंदवलेले भीमरावांचे आंबडवेकर हे आडनाव उच्चारताना त्यांना ते आडनिडे वाटत असे म्हणून माझे आंबेडकर हे नाव तू धारण कर, त्यांनी असे भीमरावांना सुचविले. त्यावर भीमरावांनी होकार दिल्यावर तशी नोंद शाळेत झाली. तेव्हापासून त्यांचे आडनाव आंबडवेकरचे 'आंबेडकर' असे झाले. नोव्हेंबर १९०४ मध्ये भीमरावांनी इंग्रजी चौथीची परीक्षा उत्तीर्ण केली व यावर्षीच रामजी सकपाळ मुंबईला सहपरिवार राहण्यास गेले.

**सुरुवातीचे शिक्षण**

डिसेंबर १९०४ मध्ये रामजी सकपाळ सह परिवार मुंबईला आले व तेथील लोअर परळ भागातील डबक चाळ नावाच्या एका चाळीच्या खोलीत राहू लागले .मुंबईमध्ये आल्यावर भीमराव हे एल्फिन्स्टन या सरकारी शाळेत जाऊ लागले, एल्फिन्स्टन हायस्कूलमधे जाणारे ते पहिले अस्पृश्य विद्यार्थी होते. कबीरपंथीय असलेल्या रामजींनी मुलांना हिंदू संत साहित्याची ओळख करून दिली. इतर जातीतील लोकांच्या विरोधामुळे रामजींनी मुलांना सरकारी शाळेत शिकवण्यासाठी आपल्या लष्करातील पदाचा वापर केला. शाळेत प्रवेश मिळाला तरी भीमरावांना इतर विद्यार्थ्यांपासून वेगळे बसावे लागे आणि शिक्षकांचे सहाय्य मिळत नसे. त्यांना वर्गात बसण्याची परवानगी नव्हती. शाळेत असतानाच इ.स. १९०६ मध्ये१४-१५वर्षीय भीमरावांचे लग्न दापोलीच्या भिकू वलंगकर यांची ९-१०वर्षीय कन्या रामीबाई उर्फ रमाबाई यांच्याशी झाले. एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये शिकत असताना भीमरावांना वर्गातील स्पृश्य जातींच्या मुलांपासून दूर बसावे लागे. हायस्कूलमधील अनेक शिक्षक

त्यांच्याशी तिरस्काराने वागत असत. आंबेडकर हे आपल्या विद्यार्थी जीवनात दररोज १८ तास अभ्यास करत असत. इ.स. १९०७ साली भीमराव एल्फिन्स्टन हायस्कूल मध्ये मॅट्रिकची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर भीमराव आंबेडकरांच्या ज्ञाति बांधवांनी कृष्णाजी अर्जुन केळुसकर गुरुजी यांच्या अध्यक्षेखाली सभा भरवून भिवा आंबेडकरांचे कौतुक केले. एखाद्या अस्पृश्य मुलाने असे यश मिळविणे एवढे दुर्मिळ होते की, त्यांचे अभिनंदन करण्यासाठी तेव्हा एक जाहीरसभा भरवण्यात आली होती. यावेळी केळुसकर गुरुजींनी मराठी बुद्धचरित्राची एकप्रत भीमरावांना भेट म्हणून दिली. हे पुस्तक वाचल्यानंतर त्यांना पहिल्यांदाच बुद्धांच्या शिकवणुकींची माहिती मिळाली व ते बुद्धाप्रती आकर्षित झाले. आर्थिक अडचणीमुळे रामजी सकपाळ भीमरावांना महाविद्यालयीन शिक्षण देऊ शकतील, अशी परिस्थिती नव्हती. त्या मुळे केळुसकर गुरुजींनी मुंबईमध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांचेशी भीमरावांची भेट घालून दिली. भीमरावांची हुशारी पाहून महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी महाराजांनी त्यांना दरमहा रु.२५ची शिष्यवृत्ती देण्याचे मंजूर केले. त्यानंतर ३ जानेवारी, इ.स. १९०८ रोजी भीमरावांनी एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. पुढे ४ वर्षांनी इ.स. १९१२मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठाची राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र विषय घेऊन बी.ए. ची पदवी संपादन केली आणि बडोदा संस्थानात नोकरीसाठी रूजू झाले. याच वर्षी १२ जानेवारी १९१२ रोजी त्यांना पहिला मुलगा यशवंत झाला.त्याच सुमारात २ फेब्रुवारी, इ.स. १९१३ रोजी मुंबईमध्ये त्यांचे वडील रामजींचे आजाराने निधन झाले. पुढे चार महिन्यांनी बडोदा नरेशांकडून प्रति महिने साडेअकरा पाऊंड शिष्यवृत्ती घेऊन अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात उच्चशिक्षण घेण्यासाठी त्यांनीप्रयाणकेले.

**हिंदू कोडबिल**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्री मुक्तीचे पक्के समर्थक होते. त्यांच्यावर तथागत गौतमबुद्धांच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या कार्याचा प्रभाव होता. बाबासाहेबांच्या मते बुद्ध हेच स्त्री स्वातंत्र्याचे आद्य पुरस्कर्ते होत. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि अभ्यासक डॉक्टर रूपा कुलकर्णी-बोधी यांच्या मते, ‘भारतीय स्त्रीमुक्तीची खरी वैचारिक बैठक भगवान बुद्धांच्या भक्कम अशा समतावादी तत्त्वज्ञानाच्या पायावर उभी आहे, बाहेरून आयात केलेल्या एखाद्या जेंडर बेस्ड विचारावर नाही! आणि कायद्या एवढेच बाबासाहेबांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी दिलेली ही शुद्ध भारतीय बैठक! ’बाबासाहेबांच्या मते कोणत्या ही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्षकेंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. ही समग्र प्रगती केवळ पुरुषांचीच नव्हे, तर स्त्रियांची देखील होणे गरजेचे आहे, हे ज्ञात त्यांना विद्यार्थिदशेतच आले होते.

खाण कामगार स्त्रीला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरुषांइतकीच मजुरी, बहुपत्नीत्वाच्या प्रथेला पायबंद, मजूर व कष्टकरी स्त्रियांसाठी २१दिवसांची किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि २० वर्षांची सेवा झाल्यावर निवृत्ति वेतनाची तरतूद यांसारख्या महत्त्वाच्या निर्णयांचा उल्लेख करायला हवा. कामगार किंवा नोकरी करणाऱ्या स्त्रीला प्रसूती रजा मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील पहिले व्यक्ती आहेत, भारतानंतरच अनेक वर्षांनी इतर देशातील महिलांना प्रसूती रजा मंजूर झाल्या आहेत.

बाबासाहेबांनी १९४७ मध्ये कायदेमंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदूकोड बिलाचा प्रस्ताव लोकसभेत मांडला. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्न संबंधातली स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांना काडीमोड घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचे लाभ स्त्रियांना ही देण्याची तरतूद या तत्त्वांचा यात समावेश होता. बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायाचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाच्या वैयक्तिक कायद्यामध्ये जातीव्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक होते. या विधेयकाला प्रारंभी पंडित जवाहरलाल नेहरूंचा पाठिंबा होता; पण काही काँग्रेस मधल्या सनातनी मंडळींचा टोकाचा विरोध होता आणि तोंडावर आलेल्या निवडणुकांमुळे नेहरूंना प्रतिगामी शक्तीं समोर हार पत्करावी लागली. हिंदू कोड बिलाच्या विरोधात त्यावेळी सरदार वल्लभ भाई पटेल व डॉ.राजेंद्रप्रसाद हे नेतेप्रमुख होते.

संविधानात आर्थिक प्रश्नांवर समान अधिकाराची तत्त्वे समाविष्ट करून अपेक्षित परिणाम होणार नाहीच, तर त्यासाठी हिंदू संहितेमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे, असे त्यांचे मत होते डॉ.बाबासाहेबाचे होते, ज्या मतदानाच्या अधिकारासाठी युरोप मधल्या स्त्रियांना संघर्ष करावा लागला तो अधिकार भारतीय स्त्रियांना न मागताच बाबासाहेबांनी दिला. त्यांनी कुटुंबाचे योग्य नियोजन स्त्रियांशीच निगडित असल्याची स्पष्ट भूमिका घेतलेली दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठात मानव वंश शास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळासमोर ९ मे १९१६ साली 'भारतातील जाती' हा स्त्रियांच्या प्रश्न संदर्भातील निबंध सादर केला होता. बाबासाहेबांनी आपल्या चळवळीत स्त्रियांना आवर्जून सहभागी करून घेतले.१९२७ चा महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह, वेश्या आणि मूरळया यांच्या संदर्भात एक सभा मुंबईला ६ जुन १९३६ साली दामोदर हॉलमध्ये घेण्यात आली १९३०चा नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह व १९४२ च्या नागपुरातल्या महिला परिषदेत स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न ही मुलीच्या प्रगतीमधली अडचण असून मुलीवर ते लादले जाऊ नये, "लग्नानंतर पत्नी ही नवऱ्याची मैत्रीण व समान अधिकार असलेली सहचारिणी असायला हवी. ती नवऱ्याची गुलाम व्हायला नको." असे ते म्हणत. बायको कशी असावी, या बाबत पुरुषाचे मत घेतले जाते, तद्वतच स्त्रीचे ही नवऱ्याविषयीचे मत, आवडी-निवडी विचारत घेतल्या पाहिजेत. स्त्रियांनी आपले हक्क मिळवण्यासाठी स्वतःही पुढे यायला हवे, हा विचार आंबेडकरांनी मांडला. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांसाठी अनेक हितउपयोगी कार्य केली आहेत. पण अनेक उच्चभ्रू आणि बहुजन समाजातल्या स्त्रिया बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत किंवा याबाबत जाणून घ्यायला तयार नाहीत. पण काही अभ्यासक व चळवळीतल्या उच्चवर्णीय आणि दलित स्त्रियांनीच बाबासाहेबांच्या योगदानाची दखल घेतली असल्याचे दिसून येते. बाबासाहेबांनी केवळ दलित स्त्रियांचा विचार केलेला नसून समस्ति हिंदू स्त्री वर्गाचे प्रश्न ऐरणीवर आणले. हिंदूकोड बिलाच्या माध्यमातून सधन, उच्च भ्रू स्त्रियांचेच कल्याण होणार होते. हिंदूकोड बिलात सुचवलेल्या उपाययोजना पुढे कायद्याच्या रूपाने अमलात आल्या, त्याचा लाभ दलित-बहुजन स्त्रियांपेक्षा उच्च वर्णीय स्त्रियांनाच अधिक प्रमाणात झाला आहे हे एक सत्य मानावेच लागेल.

भारतात प्राचीन काळापासून पुरुषप्रधान संस्कृती रूढ होती व समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान होते. हिंदूकोडबिल हे स्त्री यांच्या सशक्तीकरणासाठी एक मोलाचा दगड होता. भारत स्वातंत्र्य झाला तेव्हा हिंदू समाजात पुरुष आणि महिलांना घटस्फोटाचा अधिकार नव्हता. पुरूषांना एकापेक्षा अधिक लग्न करण्याचे स्वतंत्र होते परंतु विधवांना दुसरे लग्न करु शकत नव्हत्या. विधवांना संपत्तीपासून सुद्धा वंचित ठेवण्यात आले होते.

हिंदूकोड बिल प्रथमतः १ऑगस्ट१९४६ रोजी संसदेत मांडले गेले परंतु त्यावर कोणती ही संमती झाली नाही. पण नंतर ११ एप्रिल १९४७ रोजी संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ते पुन्हा मांडले. या बिलाने हिंदूधर्मात त्याकाळी असलेल्या कुप्रथांना दूर केले. हिंदू धर्मातील "मिता क्षरा" नुसार वारसा हक्काने संपत्ती मुलांकडेच हस्तांतरण होत असे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदूकोड बिलात सर्वसामान्य महिलांसोबतच विधवा व तिच्या मुलींना देखील समाविष्ट केले. याचाच अर्थ हिंदूकोड बिलातून त्यांनी मुलींना मुलांबरोबरीचा वारसा हक्कात दर्जा देवू केला. हिंदू दाय भाग कायद्यानुसार महिलांना तिच्या पतीची संपत्ती विकता येत नसे. अर्थात ती पुढे पतीच्या भावांकडे अथवा मुलांकडे हक्काने जात असे. यावर हिंदूकोड बिलात महिलांना तिच्या पतीच्या मालकीची संपत्ती विकण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला. हिंदूधर्मात त्याकाळी असलेल्या आणखी एका कुप्रथेनुसार दत्तक घेतलेल्या मुलाला संपत्तीचा अधिकार नसे. तो अधिकार प्रदान करण्याचा हिंदूकोड बिलात मांडला. हिंदू कोडबिलात बहुपत्नीत्व प्रथेला मज्जाव करून एक पत्नीत्वाचा पुरस्कार केला.

त्यामूळे संसदेच्या आत व बाहेर विद्रोहाचे वातावरण तयार झाले. सनातनी अनुयायांसह आर्य समाजी सुध्दा आंबेडकरांचे विरोधी झाले. भारतीय स्वातंत्र्यानंतर जवाहरलाल नेहरूंनी कायदेमंत्री डॉ. आंबेडकरांवर हिंदू वैयक्तिक कायद्यास एक समान नागरी कायद्याच्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून काम करण्याची जबाबदारी सोपविली. डॉ. आंबेडकरांनी स्वतः एक समिती स्थापन केली. ज्यात ते समितीचे अध्यक्ष होते तर सदस्य के. के. भंडारकर, के. वाय. भांडारकर, काया मंत्रीजी .आर. राजगोपाल आणि बॉम्बे बारचे एस.व्ही. गुप्ते होते. हिंदु कोडबिल सादर केले पण विधेयक संविधान सभेसमोर ठेवण्यापूर्वी सनातनी हिंदूने त्यांनी 'हिंदूधर्म धोक्यात आहे ' अशी ओरड सुरू केली.

बाबासाहेबांनी इ.स. १९४७ पासून सतत ४ वर्षे १ महिना २६ दिवस काम करून हिंदू कोड बिल तयार केले होते. हे बिल संसदेत ५ फेब्रुवारी १९५१ रोजी संसदेत मांडले. परंतु अनेक हिंदू सदस्यांसह, ज्या काही जणांनी मंत्रिमंडळात पूर्वी मंजुरी दिली होती त्यांनीही आता या बिलाला विरोध केला. ज्यांनी मंत्री मंडळात हिंदू कोड बिलास मंजूरी दिली होती ते तीन सदस्य बी. एन. राव, महा महोपाध्याय आणि गंगानाथ झा हे होत मुलतः या मसुदा समितीचे अध्यक्ष देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर असल्यामुळे हिंदूकोड बिलासाठी गठीत केलेल्या समितीची सदस्य संख्याही ३+१अशी चार होती. आधीचे हिंदूकोड बिलास त्यांची सहमती होती परंतु डॉ.आंबेडकरांनी त्यावर कोणती ही कार्यवाही झाली नाही म्हणून नव्याने मांडलेल्या बिलाला त्या तीन सदस्यांनीदेखील विरोध केला भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, भारताचे गृहमंत्री व उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल, उद्योगमंत्री श्यामाप्रसाद मुखर्जी, हिंदू महासभेचे सदस्य मदनमोहन मालवीय आणि पट्टाभी सीतारामय्या यांनी विधेयकाला विरोध केला. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांना कायद्याने हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न हिंदूकोड बिलाच्या माध्यमातून केला होता. हे बिल सात वेगवेगळया घटकांशी निगडित कायद्याचे कलमात रूपांतर करू पाहणारे होते. हे सात घटक खालीलप्रमाणे :

1. जी व्यक्ती मृत्युपत्र न करता मृत पावली असेल अशा मृत हिंदू व्यक्तीच्या (स्त्री आणि पुरुष दोघांच्याही) मालमत्तेच्या हक्कांबाबत
2. मृताचा वारसदार ठरवण्याचा अधिकार
3. पोटगी

4. विवाह
5. घटस्फोट
6. दत्तकविधान
7. अज्ञानत्ववपालकत्व

या स्त्रियांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विषयांवर संविधानसभेत जात, धर्म किंवा लिंग भेद करून मानव प्राण्यात कायदा भेदभाव करणार नाही, न्यायाच्या तराजूत सर्वांना एकाच मापात तोलले जाईल अशी घोषणा केली. या पार्श्वभूमीवर हिंदू स्त्रियांना त्याचे न्याय हक्क देण्यास विरोध झाला. या बिलातील घटस्फोट, द्विभार्या या कलमांना सनातनी मनोवृत्तीच्या विरोधकांनी तीव्र विरोध केला. हे बील ३+१ सदस्यांनी आधी तयार केले परंतु उर्वरित तीन सदस्यांनी पुढे त्याला विरोध केला इतर तीन सदस्य किंवा संविधान सभेतील अन्य सदस्यांनी त्यांना साथ दिली नाही. मात्र हे बिल आंबेडकर मंत्रीपदी असताना मंजूर होऊ शकले नाही. त्यामुळे दुःखी कष्टी होऊन आंबेडकरांनी २७ सप्टेंबर इ.स. १९५१ रोजी कायदे मंत्रीपदाचा राजीनामा दिला आणि नेहरूंनी तो मंजूर केला. राजीनामा दिल्यानंतर त्यावर लोकसभेमध्ये निवेदन करण्याची संधी उपसभापतींनी नाकारली. तत्कालीन नवशक्ती वृत्तपत्रात हिंदूकोड बिलाचा खून झाला अशी बातमी आली होती. पुढे ज्या वारसा कायद्याला विरोध करण्यात आला होता तो बाजूला सारून प्रथम हिंदू विवाह कायदा हाती घेण्यात आला. हिंदू कोड बिलाचे चार वेगवेगळे भाग करून हे चार ही कायदे वेगवेगळया वेळी नेहरूंनी मंजूर करून घेतले. इ.स. १९५५-५६ मध्ये मंजूर झालेले चार हिंदू कायदे खालील प्रमाणे:

1. हिंदू विवाह कायदा
2. हिंदू वारसा हक्क कायदा
3. हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा
4. हिंदू दत्तक व पोटगी कायदा

हे कायदे लोकसभेत मंजूर होत असताना त्याच्यांशी बाबासाहेबांचा थेट संबंध येत नव्हता, पण तेव्हा ते राज्यसभेत होते. हे कायदे मंजूर होणे म्हणजे भारतीय न्याय व कायदा व्यवस्थेच्या इतिहासातील एक क्रांतिकारक घटना होती असे मानले जाते. या कायद्यांनी भारतीय स्त्रियांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडण्यास सुरुवात झाली. या कायद्यांनी स्त्री-पुरुषांच्या दर्जात कायद्याने समानता प्रस्थापित केली. बाबासाहेबांनी भारताचे कायदे मंत्री पदाचा राजीनामा देताना हिंदू कोड बिला विषयी असे म्हटले होते की, “समाजातल्या वर्गावर्गातली असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातली असमानता तशीच अस्पर्शित राहू देऊन, आर्थिक समस्यांशी निगडित कायदे संमत करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे आणि शेणाच्या ढिगारावर राजमहाल बांधण्या सारखे होय. ”डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधानाने व हिंदू कोडबिलाने स्त्रीयांच्या बाबतीतली कामगिरी ही अविस्मरणीय आहे. भारतीय हिंदु स्त्री धर्म, जात, पुराणे, वेद, उपनिषदे, कर्मकांड, देव अशा अनेक प्रकारच्या गुलामगिरीत अडकलेली असताना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क भारतीय संविधानात देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तिला नानविध बंधनाच्या गुलामगिरीतून मोकळे केले आहे.स्त्रीपुरुष अशी भेदरहित समानता निर्माण केली आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना दलिताचे कैवारी दलितांचे उद्धारकर्ते म्हणणे फार चुकीचे आहे.त्यांनी केलेले

एकूण कार्य किंवा स्त्रियासंदर्भातील कार्यही दलितापुरते मर्यादित नाही हे समजून घ्यायला हवे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातल्या संपूर्ण हिंदु स्त्रियांच्या सुधारणेचे व्रत हाती घेतले होते हे एक सत्य आहे.

सध्या शिक्षण प्रसार बरोबर नवनवीन साधनांच्या आधारे नवीन जीवनशैलीचा प्रचार होऊ लागला आहे.त्याच बरोबर स्त्रियांच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रवेश सुरु झाला आहे. त्यातून अनेक नामवंत स्त्रिंया नावा रुपाला आल्या आहेत. विविध क्षेत्रात कामे करण्याची संधी स्त्रियांना प्राप्त झाल्या व सर्‌व दृष्टीने सक्षम बनत चालल्या आहेत हे, सुचिन्हं समजले पाहिजे. स्त्रियांवर होणारे सामाजिक,धार्मिक अन्याय दूर करावेत. यासाठी बाबासाहेबांनी खूप प्रयत्न केले तसेच त्या संदर्भात कायदेही लागू केले आहेत.

**संदर्भ ग्रंथ सुची.**

1. अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषद, नागपूर, १९४२.
2. दायभाग आणि मिताक्ष राया संस्कृत ग्रंथात वारसा हक्का बद्दल मांडणी आहे.
3. ८ जुलै १९४२ रोजी नागपूर येथील फेडरेशनची परिषद.
4. हिंदु कोड बिल
5. भारतीय जातीचा इतिहास

**Worldwide International Inter Disciplinary Research Journal** (A Peer Reviewed Referred) **ISSN – 2454 - 7905**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक धोरण

प्रा. अजित जयराम जाधव

सहाय्यक प्राध्यापक,मराठी, आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्यालय, देवरुख, जि.रत्नागिरी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चतुरस्त्र व बहुधांगी असे होते. सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात त्यांनी आपला अभूतपूर्व असा ठसा उमटवलेला आहे. म्हणूनच त्यांना समाजसुधारक, राजकीय मुत्सदी, संसदपटू, कायदेपंडित, घटनाकार, अर्थतज्ज्ञ, शोषित-कष्टकऱ्यांचा महानायक, बोधिसत्त्व अशा अनेक उपाधीने संबोधिले आते. एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतामध्ये नवा इतिहास रचणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य सर्वच क्षेत्रात अनमोल असे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कामगारांविषयी विशेष काळजी होती. कामगार, मजुरांच्या समस्या राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर मांडण्यासाठी त्यांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. या पक्षातर्फे १९३७ मध्ये विधानसभेच्या निवडणुकीमध्ये ज्या जागा लढवल्या होत्या त्या सर्वच्या सर्व जागा पक्षाने जिंकल्या होत्या. हे डॉ. बाबासाहेबांचे फार मोठे यश होते.

कामगारांविषयीची तळमळ त्यांच्या भाषणातून दिसून येते. बाबासाहेब म्हणतात, "मजुरांची स्थिती सुधारण्यासाठी काही सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. कामगारांचे तास कमी करणे, कमीत कमी ठरावीक वेतन करण्याच्या बाबतीत कायदे करणे आणि मजुरांच्या संस्थांना मान्यता देणे इत्यादी सुधारणा झाल्या पाहीजेत, असे माझे म्हणणे आहे, ह्या सुधारणा अंमलात आणताना दिरंगाई होऊ न देण्याचा मी निर्धार केला आहे. मजुरांचे कायदे करण्यासाठी ब्रिटीशांना शंभर वर्षे लागली म्हणून आम्हीही शंभर वर्षे खर्च करावीत असा युक्तिवाद केला तर तो समर्थनीय ठरणार नाही." कामगारांविषयी तळमळ व्यक्त करतानाच डॉ. बाबासाहेबांनी त्यांना त्याचे हक्क मिळवून दिले आहेत त्यासाठी कायदेही केले आहेत.

सप्टेंबर १९३८ मध्ये विधानसभेत शासनाने 'औद्योगिक विवाद विधेयक' सादर केले होते. या विधेयकात विशिष्ट परिस्थितीत कामगारांचा संप बेकायदेशीर ठरविण्याची तरतूद होती. अशा या विधेयकास बाबासाहेबांनी विरोध केला. एवढेच नाही तर कामगारांना संघटीत करून गिरणी आणि कारखान्यातील कामगारांचा एक दिवसाचा लाक्षणिक संप घडवून आणला. हा संप कामगारांच्या जीवनातील सर्वात मोठा संप होता. या संपामुळे बाबासाहेब कामगारांचे नेते म्हणून प्रसिद्ध झाले.

स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजेच १९४२-४७ मध्ये व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर मंत्री म्हणून प्रवेश केला. त्यावेळी त्यांच्याकडे श्रम, जलसिंचन आणि ऊर्जाखात्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. मजूर मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगारांच्या विषयी जे धोरणात्मक निर्णय घेतले त्यामध्ये किमान वेतन, प्रसूती रजा, कामाचे तास आणि रोजगार नियोजन केंद्र याचा समावेश आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूरमंत्री झाल्यानंतर २३ जुलै १९४२ च्या पहिल्याच भाषणात कामगारांविषयीच्या तळमळीने म्हणतात, "काही झाले तरी मी तीन गोष्टी निश्चितपणे होऊ देणार नाही. कामगारांचे राहण्याचे प्रमाण आहे त्यापेक्षा कमी होऊ देणार नाही. आणि व्यवस्थित व सुसंस्कृतरीतीने पाहता येईल इतके ते प्रमाण वाढवण्याचा प्रयत्न करीन. दुसरी गोष्ट म्हणजे राष्ट्रीय युद्ध प्रयत्नात इतरांच्या प्रमाणापेक्षा अधिक स्वार्थत्यागाचा बोजा मी कामगारांवर पडू देणार नाही. तिसरी गोष्ट अशी की, संकटाच्या परिस्थितीच्या नावाखाली तात्पुरती काही नियंत्रणे कामगारांना सहन करावी लागली तरी कामगारांच्या स्वातंत्र्याला बाधा आणणाऱ्या अशा नियंत्रणाला मी कायद्याच्या बुकात समावेश होऊ देणार नाही. पुढे मालक व मजूर यांच्या झगड्यात आपली सहानुभूती नेहमी मजुरांकडेच राहील." बाबासाहेबांच्या या विधानाचा प्रत्यय पुढे प्रत्याक्षात दिसून येतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केंद्रीय कायदेमंडळात १३ नोव्हेंबर १९४३ रोजी कामगार संघटनेसंदर्भात दुरुस्ती विधेयक मांडले. या विधेयकामध्ये प्रामुख्याने तीन गोष्टी आढळून येतात-१) मालकाने कामगार संघटनेला मान्यता देणे बंधनकारक करणे २) कामगार संघटनांना 'युनियन' म्हणून मान्यता मिळण्यासाठी पूर्वशर्तींची निश्चिती

करणे ३) युनियन म्हणून मान्यता मिळण्यासाठीच्या पूर्वशर्तीची पुरेपूर पूर्तता करूनदेखील उद्योजकांनी मान्यता नाकारल्यास, तो शिक्षापात्र गुन्हा ठरविणे. या महत्वाच्या तरतुदींचा समावेश या विधेयकात होता.

कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिला कामगारांना भूस्तराखाली काम करण्यावर बंदी घालण्याचा आंतरराष्ट्रीय करार १९३९ मध्ये संमत करण्यात आला होता. असे असताना ही बंदी जेव्हा उठवण्यात आली तेव्हा केंद्र सरकारच्या या निर्णयाच्या निषेधार्थ कायदेमंडळाच्या एका स्त्री-सद्स्याने मांडलेल्या तहकुबी सुचनेवर उत्तर देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "स्त्री कामगारांना खाणीत काम करण्यास केलेली मनाई म्हणजे काही दृष्कृत्य नव्हे, उलट हे कृत्य अत्यंत समर्थनीय आहे. पुरुष कामगारांना मजुरीचा जो दर दिला जातो तोच दर स्त्री कामगारांना दिला जाईल. स्त्री -पुरुष दोहोंमध्ये लिंगभेद न करता 'समान कामासाठी समान वेतन' या महान तत्त्व पहिल्यांदाच भारतीय खाणकाम उद्योगक्षेत्रात स्वीकारण्यात आले आहे." कोळसा खाणीत काम करणे हे तसे पाहिले तर जोखमीचेच काम होते याची बाबासाहेबांना जाणीव होती परंतु कोळशाचा वापर अनेक दृष्टीने महत्वाचा असल्याने शिवाय त्याचा तुटवडा जाणवू नये यासाठी अगदी तात्पुरत्या स्वरूपात स्वीकारलेले हे दूरदृष्टीचे धोरण होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगारविषयक विचार अत्यंत महत्वाचे आहे. काँग्रेस सरकारने कामगारांच्या संपाच्या अधिकारावर बंदी घालणारे बिल मुंबई विधिमंडळात आणले होते. या बिलाविरुद्ध सर्व कामगार नेत्यांनी मोठे आंदोलन उभारले होते. या बिलाबाबत विधिमंडळात बाबासाहेब म्हणतात, " संपाकरिता कामगारांना शिक्षा करणे म्हणजे त्यांना गुलाम करणे असे मी मानतो. संप बेकायदा ठरविणे म्हणजे त्यांना त्यांच्या मनाविरुद्ध काम करायला लावणे! एखाद्याला मनाविरुद्ध काम करायला लावणे म्हणजे त्याला गुलाम बनविणे होय. कामगारांना संप करण्याचा हक्कच मुळी नाही असे सांगण्यात येत आहे. परंतु, त्याला माझे उत्तर असे की, जो मनुष्य असे म्हणू शकतो त्याला संप म्हणजे काय हे कळलेच नाही. संप म्हणजे नोकरीचा करार भंग करणे असा जर अर्थ धरला तर संप हे स्वातंत्र्याचा हक्कालाच दिलेले दुसरे नाव आहे असे कबूल करावे लागेल. तुम्ही जर प्रत्येक मनुष्याला स्वातंत्र्याचा हक्क आहे असे कबूल करता, तर प्रत्येक माणसाला संप करण्याचा अधिकार आहे, हे तुम्हाला कबूल केले पाहिजे. स्वातंत्र्याचा अधिकार हा जैविक अधिकार आहे असे जर आपण कबूल करता तर मग संप करण्याचा प्रत्येक कामगाराचा जैविक अधिकार आहे, हे तुम्हाला कबूल करावे लागेल."कामगारांना आपल्या मागण्यांसाठी संपाचा मुलभूत अधिकार असला तरी या अधिकाराचा अनाठायी वापर केला तर कामगारांचेच नुकसान होईल असेही आवर्जून सांगितले आहे.

ऑगस्ट १९४७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री झाले. त्यावेळी त्यांनी औद्यगिक कलह कायदा १९४७, कारखाने अधिनियम १९४८, किमान वेतन कायदा १९४८, इत्यादी कायद्यात मजुरांच्या हिताच्या दृष्टीने अनेक सुधारणा केल्या. एवढेच नाही तर तसे कायदेही केले. या कायद्याच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांना त्यांचा हक्क मिळवून दिला. मजूर मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगारांसाठी मोठे भरीव असे कार्य केले आहे.

**संदर्भ ग्रंथ –**

१. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दुसरी आवृत्ती : १९७७

२.नरेंद्र जाधव, बोल महामानावाचे ( खंड एक ते तीन ), ग्रंथाली प्रकाशन मुंबई , पहिली आवृत्ती : २०१२

३. मा. फ. गाजरे ( संपा.) , डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, अशोक प्रकाशन नागपूर .

४. भालचंद्र फडके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : १९८५

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, तृतीयावृत्ती : २००६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान.

**प्रा. शैलेश कुशेंद्र भालेराव**

**सारांश**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये परमपूज्य भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजाप्रती असणारे मत आणि त्यांना त्यांच्या बालपणापासून ते शिक्षण काळात आलेल्या वेगवेगळया अनुभवांचा विचारावर तसेच लोककल्याण, स्वतंत्र स्वाभिमान राहणीमान आणि प्रतिष्ठा ह्या गोष्टीन साठी शिक्षण कसे एक आधार आणि शस्त्र आहे. ह्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. पूर्वीच्या काळापासून ते आजपर्यंत शिक्षण हा मानवी जीवनातील अविभाज्य असा घटक आहे. आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर हे शिक्षण क्षेत्रातील एक उच्चविद्या विभूषित असे व्यक्ती होते. त्यांना सर्वच क्षेत्रातले प्रचंड ज्ञान होते. त्यांच्या नजरेत शिक्षण हे मानवा साठी त्याच्या उद्धारासाठी अत्यंत म्हत्वाचे आहे.

**प्रस्तावना**

"बाबासाहेब आंबेडकर हे महान शिक्षणतज्ज्ञ होते, एवढचे नव्हे तर 'बहिष्कृत हितकारिणी सभा', 'दलित वर्ग शिक्षण संस्था', 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' अशा विधायक संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रचार केला. शिक्षणाला मूलभूत अधिकाराचा दर्जा प्राप्त करवून दिला. शिक्षणविषयक तरतुदींना घटनात्मक संरक्षण प्राप्त करून दिले. डॉ. बाबासाहेब सर्वार्थाने महान शिक्षणतज्ज्ञ तर ठरतातच; मात्र भारतीय शिक्षणविषयक स्वातंत्र्य व अधिकारांचे खरे व खंबीर व भक्कम संरक्षणसुद्धा ठरतात. अशा या महामानवाला, युगपुरुषांना त्यांच्या योगदाना साठी त्रिवार अभिवादन!"

**शोधनिबंध उद्देश :**

१) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि योगदान यावर प्रकश टाकणे.

२) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजाप्रती आणि असणारी भावना समजून घेणे.

३) डॉ बाबासाहेब् आंबेडकर यांच्या विचारातून शिक्षणाचे महत्व समजून घेणे.

**डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार**

शिका, संघटित व्हा, संघर्ष करा,' हा उद्धाराचा राजमार्गच बाबासाहेबांनी संपूर्ण भारतीयांना दिला. म. फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक, विषमतानिर्मूलनाच्या कार्याचा वारसा डॉ. आंबेडकरांनी पुढे चालविला आणि त्यांना गुरुस्थानी मानून सामाजिक क्रांतीचे कार्य अधिक सक्षम बनविले. शोषितवर्गाचे शिक्षण झाले पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. देशातील विषमतेला नष्ट करणारा एकमेव उपाय म्हणजे शिक्षण होय, असे त्यांचे मत होते. शांताराम गरुड यांच्या मते 'शिक्षणाची ओढ, अध्यापन निष्ठा, यांचे पूर्वसंचित आणि महात्मा फुले यांच्या समाजपरिवर्तनासाठी प्रबोधन, संघटन व आंदोलन यांच्या लोकविलक्षण कार्यसिद्धीचे सांस्कृतिक पूर्वसंचित अशी अनेकविध पूर्वसंचितांची शिदोरी पचवित डॉ. बाबासाहेबांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व घडलेले आहे.'बॅरिस्टर' ही पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी संपूर्ण आयुष्यभर भारतीय समाज व्यवस्थेने शोषण केलेल्या शोषित समाजासाठी कार्य केले आणि संविधानात्मक तरतूद करून त्यांच्या अधिकारांना बळकटी दिली. ३१ जानेवारी, १९२० पासून 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. २० जुलै, १९२४ला 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली तसेच 'बहिष्कृत भारत' पाक्षिक सुरू केले. आणखी 'प्रबुद्ध भारत' हे एक नवीन पाक्षिक सुरू केले. भारतीयांच्या उद्धारासाठी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील बाबासाहेबांचे कार्य फार श्रेष्ठ असून वाचनालये, समाजकेंद्रे, अभ्यासमंडळे, वसतिगृहांच्या सोयी करून शोषितांना शिक्षणाची प्रेरणा दिली. सभा, मेळाव्यांमधून समाजजागृतीचे कार्य त्यांनी केले.

**वर्षानंतर देशात असे घडले; राज्यसभेत भाजपचे शतक, काँग्रेस रसातळालागेली.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला सतत शिकण्याची हाकाटी दिली. कारण शिक्षणामुळेच आपल्या जगण्यात आमूलाग्र बदल होऊ शकतो, हे त्यांनी जाणलं होतं. बाबासाहेबांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन किती प्रगल्भ आणि आधुनिक होता, ते सांगणारा लेख...**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणवंचित दलित समाजाच्या शिक्षणासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून दलित समाजाला जे शिक्षणाचे दान दिले ते जेवढे क्रांतिकारी आहे, तेवढेच

मागासवर्गीयांच्या शिक्षणासंदर्भात बाबासाहेबांनी जे चिंतन केले तेही तितकेच मूलगामी स्वरूपाचे आहे. ज्ञानाअभावी व्यक्ती आणि समाजाचे नुकसान जसे होते, तसेच एखादी व्यक्ती वा समूहाला शिक्षण नाकारणे म्हणजे माणूस म्हणून त्याचे अस्तित्व नाकारून त्याच्या क्षमता मारून टाकणे होय; अशी बाबासाहेबांची शिक्षणविषयक धारणा होती. मिलिंद महाविद्यालयाच्या शिलान्यास प्रकरणी बोलताना बाबासाहेब म्हणूनच म्हणतात, 'हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते. पण हे चूक आहे. कारण हिंदुस्तानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्चवर्गाची सेवा करण्यास भाग पाडणे नव्हे. खालच्या वर्गाची प्रगती मारून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण होणारा न्यूनगंड नाहीसा करणे, हे खरे शिक्षणाचे ध्येय आहे. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्चशिक्षण हेच एकमेव औषध आहे.' तात्पर्य बाबासाहेबांना उच्चशिक्षणाद्वारे समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही मानवी मूल्ये स्वीकारलेला एक स्वाभिमानी आधुनिक समाज निर्माण करायचा होता. बाबासाहेबांच्या शैक्षणिक चळवळीचा हाच खरा मूलाधार होता.बाबासाहेब मागासवर्गीयांच्या शैक्षणिक हक्काचा आग्रह धरताना म्हणतात, 'विद्यापीठाच्या प्रतिनिधीसभेत मागासवर्गीय सदस्यांना स्थान मिळाले पाहिजे. प्रतिनिधीसभा ही कायदे बनविणारी संस्था आहे व सर्व वर्गाच्या प्रतिनिधींना त्यात स्थान मिळून प्रत्येक वर्गाच्या समस्येवर तोडगा काढला गेला पाहिजे.' ते पुढे म्हणतात, 'समाजातील बहुसंख्याक घटक मागे राहिला याचा अर्थ उच्चवर्गातील लोकांनी या मागासवर्गाप्रती चांगुलपणा दाखविलेला नाही. तेव्हा शैक्षणिक विषयातील तज्ञ मंडळी जी मोठ्या प्रमाणात उच्चवर्णीय आहेत, ती मागासवर्गीयांच्या समस्या सोडवतील यावर माझा विश्वास नाही. मागासवर्गीयांना म्हणूनच उच्चवर्णीयांच्या दयेच्या भरवशावर न सोडता, त्यांना प्रतिनिधीसभेत स्थान मिळाले पाहिजे.' (मुंबई प्रांतिक विधीमंडळातील भाषणे १९२७जातिव्यवस्थेच्या संदर्भात उच्चशिक्षणाचे महत्त्व प्रतिपादन करताना बाबासाहेब म्हणतात, 'समाजातील उच्चनीचता दृढमूल होण्यासाठी जातिव्यवस्था तर जबाबदारच आहे. पण जातीच्या गुणवैशिष्ट्यामुळेही तीस चिरस्थायीत्व मिळते. उदा. सरकारी नोकऱ्या, मामलतदारी किंवा पोलिस अधिकारी वगैरे सारख्या जागी अस्पृश्य समाजास मज्जाव आहे. अस्पृश्य समाजाची यामुळे अवहेलना होते. ही स्थिती बदलावयाची तर आपण माऱ्याच्या जागा मिळविल्या पाहिजेत व शिक्षणाशिवाय हे होणार नाही हे स्पष्ट आहे.'

**बाबासाहेबांनी शिक्षणाचा पायाभूत विचार करताना ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही त्यांच्यासाठी सक्तीचा कायदा**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मदत म्हणून शिष्यवृत्ती देण्यात यावी असे सांगताना बाबासाहेबांनी म्हटले आहे- 'मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे पालक इतके गरीब असतात की, स्कॉलरशीप ही विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला केलेली मदत आहे, कुटुंबाला दिलेली देणगी नव्हे, हे विसरून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीचा ते दुरुपयोग करतात. म्हणून या पैशातून सरकारने किंवा खासगी संस्थांनी वसतिगृहे चालविणे विद्यार्थीहिताचे होईल'. केवळ बाराखड्या शिकविणे म्हणजे शिक्षण नव्हे तर मुलांची मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षणही शाळांनी दिले पाहिजे, इतका सूक्ष्म विचार बाबासाहेबांनी प्राथमिक शिक्षणाच्याबाबत केला हे विशेष! बाबासाहेबांनी स्वातंत्र्यपूर्व हिंदुस्थान सरकारकडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ३ लाख रुपयांचा निधी मिळविला होता. परिणामी बऱ्याच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळू लागली होती. पण तरीही आपलेच विद्यार्थी मोठ्या प्रमाणात नापास होतात, याविषयी नाराजी व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात, 'मी लहानशा खोलीत राहत होतो. या खोलीत माझे कुटुंब, बहिणीची दोन मुले, एक बकरी, जाते, पाटा होता. मिणमिणत्या दिव्याखाली मी अभ्यास करीत होतो. आता विद्यार्थ्यांना चांगली वसतिगृहे असताना त्यांनी अभ्यास का करू नये' असा प्रश्न उपस्थित करून बाबासाहेब म्हणतात, 'आपल्या देशात रानडे, गोखले, टिळक, सर फेरोजशहा मेहता व त्यांच्यासारखे कितीतरी आस्थेवाईक विद्यार्थी निर्माण झाले. त्यांच्यामध्ये एक ऊर्मी, शिस्त होती. जबाबदारीची जाणीव होती, पण अशी जाणीव आजच्या विद्यार्थ्यांत नाही असे सांगून 'शिक्षण हाच जीवनाच्या प्रगतीचा मार्ग आहे हे जाणून विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा आणि समाजाचे विश्वासू नेते बनावे' असे त्यांनी नमूद करून ठेवले.'

बाबासाहेबांनी १९ जून १९५० साली औरंगाबादेत मिलिंद महाविद्यालयाच्या रूपाने मराठवाड्यात उच्चशिक्षणाची जी मुहूर्तमेढ रोवली, ते बाबासाहेबांचे महनीय शैक्षणिक कार्य तर मराठवाड्याने बाबासाहेबांच्या कायम ऋणात राहिले पाहिजे इतके उच्चकोटीचे आहे. कारण निजामाच्या हैदराबाद संस्थानात शिक्षणाची प्रचंड

आबाळ होत होती. उदा. १९३१ मध्ये हैदराबाद संस्थानात साक्षरतेचे प्रमाण अवघे ५ टक्के, तर १९४१ मध्ये ९.३ टक्के होते. १९४८-५०च्या दरम्यान हैदराबाद संस्थानात १७ महाविद्यालये व ७६१५ विद्यार्थी होते. तर याच काळात मुंबई राज्यात ५० महाविद्यालयांतून ५० हजार ३५९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. संस्थानात माध्यमिक शिक्षणाचा प्रसार मंद होता. शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. प्रत्येक जिल्ह्यात एक सरकारी हायस्कूल होते. एखाद-दुसरा अपवाद वगळता खासगी शाळा नव्हत्या. औरंगाबादला इंटरपर्यंतचे शिक्षण देणारे एक शासकीय महाविद्यालय होते. १९३८ मध्ये हैदराबाद संस्थानात मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांची संख्या अवघी ७० होती. अनुसूचित जातींच्या मुलांची व मुलींच्या शिक्षणाची स्थिती बिकट होती. बाबासाहेबांनी अशा प्रतिकूल स्थितीत औरंगाबादेत मिलिंद महाविद्यालयाची उभारणी करून मराठवाड्याच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनात परिवर्तन घडविणारा एक देदीप्यमान इतिहास निर्माण केला हे विसरता येत नाही.

बाबासाहेब हे विद्वतेचे, ज्ञानाचे भोक्ते होते. त्यांनी म्हणूनच असे सांगून ठेवले की- 'शिक्षक हा शालेय असो, महाविद्यालयीन असो की विद्यापीठीय असो त्याचे कर्तृत्त्व उत्तुंग आणि विद्यार्थ्यांना अनुकरणीय वाटले पाहिजे. थोडेसे रुपये मिळवावेत व आपली सुखेनैव कालक्रमणा करावी यापलीकडे आपल्या प्रोफेसरांना काही महत्त्वाकांक्षाच नाही. ते अधून-मधून काही पाठ्यपुस्तकांवर टिपणे लिहितात. पण टिपणे लिहिण्यापलीकडे काही महत्त्वाचे कार्य आहे, याची त्यांना माहिती नाही.'

बाबासाहेब असेही म्हणतात की, 'प्राध्यापकांनी अध्यापन आणि अध्ययनात स्वतःला इतके गुंतवून घ्यावे की, आपल्या घराकडेही बघण्याची सवड त्यांना मिळू नये. ते काम त्यांनी त्यांच्या पत्नीकडे सोपवावे. संशोधन करावे. त्याचप्रमाणे प्राध्यापक हा नुसताच विद्वान असून चालत नाही, तर तो बहुश्रुत असला पाहिजे. तो उत्साही असला पाहिजे. आपला विषय अधिकाधिक माहितीपूर्ण आणि मनोरंजक करू अशी धमक त्याच्यात असली पाहिजे.'

बाबासाहेबांची अजून एक विशेषता अशी की, अलीकडील शिक्षणसम्राटांप्रमाणे त्यांनी आपल्या शैक्षणिक संस्थेस स्वतःचे नाव दिले नाही. त्यांचे वडील सुभेदार रामजी आंबेडकर वा त्यांच्या आई भीमाई यांचे नावही ते आपल्या संस्थेस देऊ शकले असते. पण त्यांनी असे केले नाही. तर संस्थेस पीपल्स एज्युकेशन सोसायटी व महाविद्यालयांना सिद्धार्थ, मिलिंद ही नावे दिली. औरंगाबादच्या १५० एकर विस्तीर्ण परिसरास नागसेनवन नाव दिले. पीपल्स, सिद्धार्थ, मिलिंद, नागसेन ही नावे लोकशाही, विचारस्वातंत्र्य, चिकित्सा व प्रामाणिक बौद्धिक वादविवादाची प्रतीके आहेत. बाबासाहेबांचे शैक्षणिक कार्य-कर्तृत्व पाहता शिक्षण क्षेत्रात आज जी अराजकसदृश स्थिती निर्माण होऊन गुणवत्तेची घसरण होत आहे आणि शैक्षणिक संस्था सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून नव्हे तर नफेखोरीच्या दृष्टिकोनातून उभारण्यात येत आहेत, ते पाहता बाबासाहेबांच्या मूल्यगर्भ शैक्षणिक विचारांचे सदोदित मनन-चिंतन होणे गरजेचे आहे."

"बाबासाहेबांना उच्चशिक्षणाद्वारे समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही मानवी मूल्ये स्वीकारलेला एक स्वाभिमानी आधुनिक समाज निर्माण करायचा होता.बाबासाहेबांच्या शैक्षणिक चळवळीचा हाच खरा मूलाधार होता. - सर्व सामाजिक दुखण्यावर उच्चशिक्षण हेच एकमेव औषध आहे, असे डॉ. आंबेडकरांनी एका सभेत म्हटले होते.**"**शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी या साठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो पिल तो माणूस गुरगुरल्या शिवाय राहणार नाही," असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. "प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करुनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिक दृष्टा सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे.

शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन १९४६ साली करुन त्यांनी मुंबइला सिद्धार्थ

कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय असे ते मानीत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीति, अत्याचार, अन्यायास त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत.** ही सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय समाज एकसंघ होणार नाही असे ते समजत. डॉ. आंबेडकर म्हणजे तळागळातील लोकांना बौद्धिक व समाजिक गुलामगिरीतून मुक्त करुन त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क ही आपल्याला कळत नाही अशा प्रकारे त्यांनी सामाजिक क्रांतीचे रणशिंग समाजात फुंकल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणीक क्षेत्रातील योगदान**

दिनांक 14 एप्रिल 1891 रोजी मध्यप्रदेशातील महु येथे जन्म झालेले भीमराव रामजी आंबेडकर हे भारतभुमीत जन्माला आले हे एक थोर भाग्यच. मध्यप्रदेशाची राजधानी भोपाळ या ठिकाणाहून ३ तास प्रवासानंतर आणि इंदोरपासून 20 किलोमीटरच्या अंतरावर ‘महु’ हे गाव आहे. येथे अनेक पर्यटक त्यांच्या जन्मस्थळाला वंदन करण्यासाठी भेट देतात. भारताला डॉ. बाबासाहेबांनी एक मोठी देणगी दिली, ती म्हणजे भारताची राज्यघटना होय. त्यामुळे या देशाला ‘लोकशाही’ भारतीय अर्थशास्त्रांसंबंधी त्यांचा अभ्यास होता. विकासाच्या नावाखाली जमीन, पाणी पर्यावरणाचा नाश याविषयीची येणारी संकटे त्यांनी यापूर्वीच सविस्तरपणे मांडली होती. भारतासारख्या कृषीप्रधान देशात विद्युत विकासाला गती मिळाली पाहिजे, जलसंधारण वाढले पाहिजे, यासाठी त्यांचा हट्ट होता आणि त्यासाठी त्यांचे प्रयत्नही होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक ‘ज्ञानयोगी’. त्यांची विद्वत्ता अद्वितीय होती. त्यांच्या जीवनमानाचा आयुष्याचा सविस्तरपणे अभ्यास केला तर अत्यंत खडतर, कठीण परिस्थितीसमवेत त्यांना सामना करावयास लागला. त्यांनी अशा कठीण प्रसंगाला सामोरे जाऊन उच्चशिक्षण तर घेतलेच पण उत्तम संशोधन केले. तो तर त्यांचा खरा व्यासंग होता. दररोज 18 तास त्यांनी अभ्यास केला शिक्षण घेतल्यामुळे प्रगतीतर होईलच पण विकासाची दारे खुली होतील, हे सूत्र त्यांना पूर्णपणे माहित होते.

सन 1913 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणासाठी न्यूयॉर्कला गेले होते त्या ठिकाणी विद्यार्थी वर्गासोबत राहताना त्यांना कुठेच दुजाभाव आढळला नाही. त्या ठिकाणी ‘समतेच्या’ वातावरणात ते खूप आनंदी होते. तेव्हांपासून त्यांना वाटू लागले ह्यासाठी शिक्षण फार महत्त्वाचे आहे. पददलीत बांधवानी शिक्षण घेतले पाहिजे. त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. “प्राचीन भारतातील व्यापार” या विषयांवर त्यांनी सन 1915 मध्ये प्रबंध लिहिला आणि त्यांना M.A ची पदवी प्राप्त झाली.

लंडनमध्ये असताना सुध्दा अतिशय खडतर, कठीण परिस्थितीत त्यांना शिक्षण घ्यावे लागले. आपला अभ्यास पूर्ण करण्यासाठी ते रात्रपहाट करीत असत. उच्च शिक्षण घेतल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक बुध्दिमान आणि सामर्थ्यशाली पुरुष झाले. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र, मानववंशशास्त्र या विषयांवर त्यांचा उत्तम पगडा बसला होता. भारत देशाच्या सामाजिक, राजनैतिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे खूप मोठे योगदान होते. म्हणूनच त्यांना आधुनिक भारताचे निर्मातेही म्हटले जाते. एकूण 64 विषयांवर त्यांचा अभ्यास होता. अमेरिकेतील जगप्रसिध्द कोलंबिया विश्वविद्यालयाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जगातील 100 विद्वानांच्या बरोबरीने गौरविले होते. डॉ. बाबासाहेब हे भारतातील पहिले अर्थशास्त्रज्ञ होते. समता आणि सामाजिक विचारासाठी त्यांनी जीवनभर लढा दिला होता. त्यांना ‘भारतरत्न’ च्या सन्मानाने गौरविले गेले. हा सर्वात मानाचा पुरस्कार समजला जातो.

भारतीय आर्थिक समस्यांची उकल करण्यासाठी त्याचप्रमाणे भारतीय अर्थशास्त्रीय विचार विकसीत करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी लक्षणीय कामगिरी केली आहे. ईस्ट इंडिया कंपनी प्रशासन आणि अर्थनीती, ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती यासारखे त्यांचे संशोधन फार महत्त्वाचे आहे. शतकानुशतके केवळ अन्याय, अवहेलना यांचेच धनी असणाऱ्या आपल्या दलित बांधवांच्या उन्नतीसाठी त्यांनी आमरण कष्ट उपसले. आपले विचार भाषणातून व आपल्या लेखणीतून मांडले. त्यांचे मराठीतील बहुतेक सर्व लेखन ‘मुकनायक’, ‘बहिष्कृत भारत’ आणि जनता या नियतकालिकांतून प्रसिध्द झाले आहे. त्यांच्या लेखनांतून मराठी वैचारिक निबंध वाङमयाचे समृद्ध असे रूप दृष्टीस पडते. ते एक महामानव होते त्यांनी पद दलितांना मानवतेचा प्रकाश दाखविला. त्यांनी स्वातंत्र्य,

समता, बंधुता ह्या तत्वांना लोकशाही समाजव्यवस्थेच्या निर्मितीसाठी आवश्यक अशी मुलभूत तत्वे म्हणून गौरविले होते.

भारत देशाच्या विकासाकरिता सर्व प्रकारच्या भेदाभेदाच्या तटबंदी ढासळून टाकण्याची आवश्यकता आहे. ही जाणीव प्रखर करून जातीयता, निर्मुलन, अस्पृश्यता निर्मुलन यासाठी कणखरपणे कार्य त्यांनी केले. शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा आत्मोद्धाराचा महामंत्र व्यक्ती व्यक्तीच्या अंत:करणाच्या गाभाऱ्यातून धुमसत ठेवला. मुंबई येथील सिडनहॅम महाविद्यालयामध्ये सन 1918 ते 1920 या काळात ते अर्थशास्त्राचे अध्यापक होते.

डॉ. आंबेडकरांचे आर्थिक तत्वज्ञान हे काही विशिष्ट घटकांसाठी नव्हते. तर संपूर्ण भारत देशाचे हित त्यांच्या डोळ्यापुढे होते. भारतीय अर्थकारणांवर त्यांचे विद्वत्तापूर्ण लेखन-संशोधन आणि जन आंदोलन हे अर्थशास्त्रीय कार्यात महत्त्वपूर्ण जबाबदारी मात्र सांगून जाते.गरीब दरिद्री शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सन 1928 पासूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांचे प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते. समता प्रस्थापित व्हावी म्हणून त्यांचे महाडचे आंदोलन झाले. चवदार तळयाचा सत्याग्रह, काळाराम मंदीर प्रवेश ही त्याचे द्योतक आहेत. सन 1928 पासून त्यांनी कोकणातील शेतकऱ्यांच्या खोतांची गुलामगिरीतून मुक्तता व्हावी. याकरिता प्रयत्न चालू केले. त्यासाठी कोकणांत रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे शेतकरी परिषद भरविली. खोती पद्धतच नष्ट व्हावी म्हणून कायद्याचे विधेयक मुंबई विधिमंडळात त्यांनी मांडले होते. विधीमंडळावर मोर्चाही आणला होता. शेतकऱ्यांच्या जातीचा विचार न करता सर्व जातीधर्माच्या शेतकऱ्यासाठी त्यांनी चळवळ उभारलेली होती. कामगारांच्या विकासाकरिता सन 15 ऑगस्ट 1936 मध्ये स्वतंत्र मजुरपक्षाची स्थापना त्यांनी केली होती.मजुरांच्या कल्याणासाठी डॉ. बाबासाहेबांनी कायदे केले होते. मजुरांच्या हिताच्या दृष्टीकोनातून कामगार कायद्यांमध्ये त्यांनी अनेक सुधारणा घडवून आणल्या होत्या. कामगारांच्या कामाचे तास कमी करण्यासाठी त्यांनी कारखाना कायद्यात सुधारणा केली होती. दामोदर नदी खोरे योजना, हिराकुंड नदी योजना, सोने नदी खोरे योजना यांचे प्रारुपही डॉ. बाबासाहेबांनीच तयार केले होते. संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोघे चांगले मित्र होते. जुन्या रुढी परंपरा, अंधकार नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगेबाबा यांनी खूप प्रयत्न केले होते.

महिलांच्या आरोग्यविषयक प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली होती. कुटूंबनियोजन स्त्रियांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी विधेयकाच्या अनुषंगाने पटवून दिले होते. डॉ.आंबेडकरांनी महिलांच्या कौटुंबिक आणि व्यक्तिगत जीवनात सर्व दृष्टीने त्यांना स्वतंत्र केले होते. स्त्रिदास्य आणि तिची अउन्नती का होते यासंबंधी त्यांनी सविस्तरपणे अभ्यास केला होता. महिलांना सुशिक्षित करणे, त्यांच्यामध्ये स्वत: जागृती निर्माण करणे आणि माणुसकीचे जीवन जगण्यास शिकवणे हे त्यांचे मुख्य कार्य होते. त्यासाठी त्यांनी प्रयत्नही केले. महिलांनी कसे राहावे, कसे वागावे आणि काय करावे व काय करू नये या कामावर डॉ. आंबेडकरांनी भर दिला. त्यांना सुशिक्षित महिला पहावयाची होती त्यांनी त्यासाठी प्रयत्नही केले. सन 1942 च्या दिनांक 18, 19 व 20 जुलै मध्ये नागपूर येथे अखिल भारतीय दलित महिला परिषदेचे अधिवेशन भरविण्यात आले होते त्यात त्यांनी मार्गदर्शनही केले होते. ते समाजचिंतक तसेच संस्कृती पुरुष होते. समाजात परिवर्तन त्यांना घडवायचे होते. हे कार्य वृत्तपत्राच्या माध्यमातूनच होईल याची त्यांना खात्री होती. म्हणून ते त्यावेळी वृत्तपत्राकडे वळले. सन 1920 मध्ये मूकनायक, सन 1927 मध्ये बहिष्कृत भारत आणि 1930 मध्ये प्रबुद्ध भारत अशाप्रकारची त्यांनी वृत्तपत्रे काढली. त्या वृत्तपत्रामधून त्यांनी नैष्ठिक, ध्येयवादी आणि निर्भिड पत्रकाराची भूमिका सकारली. अर्थशेती शिक्षण आणि वाङमय या विषयावर त्यांचे लेखन थोडे होते पण ते कायमचे मार्गदर्शक ठरले. त्यांनी इंग्रजी भाषेत विपूल ग्रंथरचना व वृत्तपत्रीय लेखन असले तरी मराठी वृत्तपत्रे स्थापून आणि मराठी भाषेचाच सामान्य माणसांना प्रबोधित करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला होता.

राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी त्यांचे म्हणणे असे होते की, जोपर्यंत भारतात जातीय व्यवस्थेमुळे असलेली सामाजिक विषमता, आर्थिक विषमता दूर होत नाही तोपर्यंत भारताची एकता आणि अखंडता अबाधित राहणार नाही. डॉ. आंबेडकरांनी सन 1921 ते 1922 असे दोन वर्ष लंडनमध्ये 'किंग हेन्री' या मार्गावर एका घरात राहत होते. या घरात त्यांनी रात्र पहाट अभ्यास केला. तेथेच प्रसंगी ते अर्धपोटीही राहिलेत, हे घर आज एक ऐतिहासिक स्मारक झाले आहे. इंदूमिल येथेही त्यांचे भव्यदिव्य स्मारक होत आहे. बाबासाहेबांनी सामान्यातल्या सामान्य माणसाला न्याय दिला. ते फक्त दलितांचे नव्हे तर जगातील सर्व शोषितांचे प्रेरणा स्थान आहेत. त्यांनी देशाला

संविधान दिले. स्पृश्याकडून अस्पृश्यावर होत असलेला अन्याय धर्मांतरावाचून दूर होणार नाही. या त्यांच्या दृढ श्रद्धेनुसार त्यांनी दिनांक 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथे मोठ्या समारंभाने अनेक अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. त्यांना वाचनाची अतिशय आवड होती. विद्यार्थीदशेत त्यांना संस्कृतचे अध्ययन करता आले नाही पण पुढे मात्र ते जिद्दीने संस्कृत शिकले होते. ग्रंथालयाशिवाय आपण राहू शकणार नाही असे त्यांना वाटे. त्यांच्याजवळ वैयक्तिक 25 हजार ग्रंथसंग्रह होता.

**धुळे येथील वि.का. राजवाडे संशोधनालयाला भेट**

दिनांक 18 जून 1938 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या धुळे भेटीत वि.का. राजवाडे संशोधनालयाला भेट दिली. तसा अभिप्रायही तेथील दस्तावेजात त्यांनी नोंदवला आहे. त्यांचा हा अमूल्य ठेवा आजही मंडळाच्या दस्ताऐवजात आपणास पहावयास मिळतो. धुळे येथील वि.का. राजवाडे मंडळ दिनांक 09 जानेवारी 1932 रोजी स्थापन झाले याठिकाणी आजपर्यंत अनेक मान्यवरांनी भेटी देऊन येथील अमूल्य ठेवा अभ्यासला आहे. ते मंडळात आले तेव्हा मंडळाचे संस्थापक आदरणीय कै. भास्कर वामन भट यांनी आणि इतर मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले होते.

डॉ. आंबेडकर आपल्या अभिप्रायात लिहितात : ज्यांनी युरोप आणि अमेरिकेतील विविध ग्रंथालयात सहा ते सात वर्ष घालविले मी इ. वि.का. राजवाडे संशोधन मंदिरातील हस्तलिखित आणि चित्रे यांचा संग्रह पाहून खरोखर आनंदी आणि थक्क झालो. युरोपातील ग्रंथालयाशी तुलना करता वस्तुत: खरोखर हे खूप छोटे स्थळ आहे. यासाठी ज्यांनी या संस्थेची स्थापना केली त्यांच्या खांद्यावर याची जबाबदारी येत नाही अशी आशा करु, नवीन सरकार अशा संस्थेकडे पुरेसे लक्ष देईल, की ही मोठे ग्रंथालय होतील यासाठी या संस्थेस मी शुभेच्छा देतो"

**निष्कर्ष :**

१) डॉ बाबसाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार हे समाजासाठी फायद्याचे ठरले

२) डॉ बाबसाहेब यांच्या मते समाजाचा उद्धार हा शिक्षणाच्या मध्य्मानेच होऊ शकतो.

३) शिक्षण हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आणि जीवन उद्धाराचे माध्यम असल्यामुळे समाजात शिक्षण हे सक्तीचे केले गेले पाहिजे

**संदर्भ ग्रंथ :**


1. माझी आत्मकथा संपादक: ज.गो. संत आवृत्ती दहावी पृष्ठ क्रमांक :-43, 44, 45, 46
2. डॉ बाबासाहेब आंबेडकर : क्रांती आणण प्रततक्रांती, अनुपम पगारे,सुगत प्रकाशन, वैशाली नगर नागप र २००८
3. डॉ बाबासाहेब आंबेडकर : जातीप्रथेचे उच्चाटन भाषांतर – शशंदे गौतमसुगावा प्रकाशन सदाशशव पेठ पुणे २००५
4. डॉ बाबासाहेब आंबेडकर : शुद्र कोण होते. अनुवाहदत खैरमोडे चां भ सुधीर प्रकाशन बोरगाव मोघे वधाग २००३
5. डॉ बाबासाहेब आंबेडकर : अस्पृश्य आणण अस्पृशयता. रघुवंशी प्रकाशन
6. शुक्रवार पेठ पुणे २००५ ५) कवे इरावती : महार आणि महाराष्ट्र पुणे. देशमुख आणण पुन्मुद्रण
7. कोसरे एच एल, ववदभागतील दशलत चळवळीचा इततहास, ज्ञान प्रदीपप्रकाशन नवी शक्रुवारी नागप र १९८४
8. रामचरीत मानसातील स्त्री तनंदा, भासंतर बोरकर उशमगला,वाघ सुगावा प्रकाशन २००६
9. उत्तम कांबळे जागततकीकरण आणण दशलत प्रशन सुगावा प्रकाशन पुणे २००२
10. खरात शांकरराव : अस्पृशयांचा मुक्ती संग्राम २००३-०४
11. डॉ शकुंतला वाघ. महाराष्ट्रतील महाराचा इततहास २००३-०४"
12. Worldwide Ambedkar Jayanti celebration from ccis.nic.in on 19th March 2015" (PDF) (इंग्रजी भाषेत).
13. गायकवाड 'राजवंश', डॉ. ज्ञानराज काशिनाथ (२०१६). महामानव डॉ.भीमराव रामजी आंबेडकर. कोल्हापूर: रिया प्रकाशन.

# सर्व समाजघटकासाठी झिजलेले बाबासाहेब

**डॉ. बाळासाहेब अंभोरे**

पाली अण्ड बुद्रिधम

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ, औरंगाबाद

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायाचे आधार स्तंभ होते.त्यांची न्यायप्रिय वृत्ती त्यांनी केलेल्या कार्यातून प्रतीबिंबीत होते.परंतु काही समाज कंठकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे महारांचे नेते अशी समाजापुढे यादृश्चीकता निर्माण केली आहे.आणि त्यावर आज डोळे असलेला आंधळा समाज काही प्रमाणात विश्वास ठेवतो.ही मात्र आपल्या भारतीय समाजाची शोकांतिका म्हणावी लागेल. खरोखर असा विश्वास ठेवणाऱ्यांनी जर डॉ.बाबासाहेब आंबेंडकरांच्या कार्याचा व लिखाणाचा आढावा घेतला आणि वाचुन समजून घेतले तर निश्चितच त्यांना असे वाटेल की डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे सर्व समाज घटकासाठी झिजलेले दीपस्तंभ होते.

परंतु आज ब्राम्हणवादी प्रसार माध्यमाने समाजातील सर्व घटकाची वाचन संस्कृती लिखाण संस्कृती संपुष्टात आणली व समाजाला पुर्वी प्रमाणे फक्त दुसऱ्याने सांगितलेले ऐकावे स्वत: त्याची चिकित्साकरण्याची त्यांच्या मनात विचार येऊ देत नाही. म्हणून आज शिकलेले पूर्वीच्या अशिक्षितांचे वर्तन करतांना आपणास दिसून येतात. हे वर्तन समाजाच्या उत्कर्षाला आणि राष्ट्राच्या एकत्मतेला घातक आह. म्हणून सर्व समाज घटकांनी 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' या उक्तीनुसार कोणत्याही ब्राम्हणवादी माध्यमाचे ऐकावे परंतु स्वत: त्याची (खरे की खोटे) याची चिकित्सा त्यांने करावी हाच प्रामाणिक उद्देश माझा आहे.

समाजाचा आपण विचार केल्यास त्यामध्ये स्त्री-पुरुष हे केंद्रस्थानी असतात. त्या शिवाय समाज हा निर्माण होऊच शकत नाही. म्हणजे समाजगाड्याचे ते दोन चाक आहेत. परंतु प्राचीन काळात तत्कालीन सामाजिक परिस्थिती मध्ये मनुस्मृती या समाज गाड्याच्या एका चाकावर अन्याय केला आणि त्याला नागरी अधिकारपासून वंचित ठेवले होते. तसेच मुलत: नैसर्गिक हक्कापासून वंचित ठेवून प्रचंड प्रमाणत शोषण केले.

मनुस्मृतीमध्ये मनू असा म्हणतो "ब्रम्हदेवान स्त्रियांची रचनाच गर्भधारणेसाठी आणि पुरुषाची रचना गर्भदानासाठी केली आहे."[1] (9-96) असे म्हणून स्त्रीयांकडे केवळ संतती निर्मितीचे साधन, उपभोग्य वस्तु या दृष्टीनेच मनु पाहत होता.तो म्हणतो 'आई, बहिण किंवा मुली सोबत सुध्दा एकांतस्थळी एका आसनावर बसू नये.कारण बलवान इंद्रियांचा हा समुह विद्वानाला आपल्याकडे खेचून घेतो.[2] (2-215) इथे मातृत्व, दुहितत्व या नात्याबद्दलही संयम न बाळगणऱ्या पुरुषाला मनु दोष देत नाही.

याच आशयाचा विचार महानुभाव पंथातही आलेला दिसतो स्त्री म्हणजे द्रव्याचा रावो, अन्य द्रव्ये सेवल्यािवरी माजविती, स्त्री दर्शन मात्रेच्या माजविती, स्त्री म्हणजे मादक द्रव्यांचा राजा आहे. इतर द्रव्ये सेवन केल्यावर नशा आणतात. स्त्री ही केवळ दर्शनाने नशा आणते. म्हणून 'चित्राची ही स्त्री न देखावी'असे महानुभाव पंथाच प्रवर्तक चक्रधर स्वामी सांगतात.

आई, बहिण या नात्याला विसरुन किंवा हे चित्र आहे, हे विसरुन ज्या पुरुषाचे चित्त भ्रमित होते त्याला कोणत्या दर्जाचे मानावे?दोष स्त्रीचा, पुरुषाचा कि चित्राचा? याचा विचार न करता एकांगीपणे स्त्रीला दोषी

ठरविले.आणि तीला 'चुल आणि मुल' एवढेच सिमीत केले. तीचे समाजाने अस्तित्व नाकारले.या समाजातील महत्वपूर्ण घटकाला न्याय देण्याचा विडा बुध्द विचाराने प्रेरित झालेले ज्योतिबा फुले यांनी उचलला.आणि त्यांचे शिष्य डॉ.बाबासाहेबांनी तर स्त्री उध्दारासाठी संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांच्या मते "स्त्री ही रत्नाची खाण आहे"[3] अर्थात जे सर्व राष्ट्र निर्मीतीसाठी महामानव पुढे आले त्यांनी एका स्त्रीच्याच पोटी जन्म घेतलेला आहे.म्हणून स्त्री ही समजाचा एक जबाबदार घटक आहे.आणि तीला मानवी हक्कापासून वंचीत ठवणे योग्य नाही.म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हिंदू कोडबील' तयार करुन 9 एप्रिल 1948 रोजी घटना समीतीसमोर सादर केले.[4] त्यात निवड समीतीने काहि प्रमाणात बदल करुन मंत्री मंडळाची संमती त्यावर मिळाली मात्र कार्य काही त्यावर केली नाही. नंतर हे विधेयक 5 फेब्रुवारी 1951 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकसभेत मांडले.[5] त्यावेळी मनुवाद्यांनी मात्र त्या विधेयकावर फार मोठे देशात वादंग निर्माण केले.मनस्मृतीच्या पुरसकर्त्याचे पित्त खवळले.त्यांनी त्या विधेयकाला विरोध करुन थांबले नाही तर डॉ.बाबासाहेबांना जीवे मारण्याच्या धमक्या देणारे पत्र पाठवित होते. संसदेतील अनेक सभासदांचा या विधेयकाला विरोध होता कणखर विरोधकां मध्ये स्वामी करपात्री होते.[6]

अशा प्रकारे तत्कालीन परिस्थितीमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात विधेयकाला विरोध होऊ लागला नेमके विधेयकामध्ये काय होते? कोणकोणते कलम होते त्याचे विवेचन पुढील प्रमाणे,

1) भारतीय राज्य घटनेतील तरतूदीनुसार या देशातील सर्व जाती जमातीच्या स्त्रीयांना समान संधी, पुरुषाबरोबर समाज हक्क आणि अधिकार राहतील.

2) मुलींनाही वारसाहक्क असावा व त्या वारस हक्काप्रमाणे प्रत्येक मुलीला बापाच्या इस्टेटीतील मुलाबरोबर समान हिस्सा मिळावा.

3) स्त्रीचा स्वत:च्या मिळकतीवर पूर्ण हक्क व अधिकार असावा.

4) नवरा बायकोचे काही कारणामुळे पटत नसल्यास व एकत्र संसार करणे जमत नसल्यास तिला नवऱ्या पासून घटस्फोट मिळावा.

5) घटस्फोट झालेल्या स्त्रीला नवऱ्या कडून पोटगी मिळावी.

6) पती-पत्नी मध्ये कोणताही शारीरिक दोष नसल्यास व पहिली पत्नी जीवंत असल्यास दुसरी पत्नी करण्यास नसऱ्यला कायद्याने बंदी असावी म्हणजे द्विभार्या प्रतिबंधक कायदा असावा.

7) एखाद्या स्त्रिला वारस नसल्यस दुसऱ्या मुलास दत्तक घेण्यास परवानगी असावी. तसेच मुलीला दुसऱ्यास दत्तक जाण्यास कायद्याने संमती असावी.

8) काणत्या जातीच्या स्त्रीला अंतरजातीय किंवा आंतर धर्मिय विवाह करण्यास कायद्याने संमती असावी. तसे करण्याचा अधिकार स्त्रीला असावा.

9) सार्वजनिक ठिकाणी व धार्मिक कार्यात स्त्रीला शुद्र मानले जाऊ नये, तिला कमी लेखु नये.

10) राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात त्यांच्या लोकसंख्ये प्रमाणे त्यांना प्रतिनिधीत्व मिळावे.[7] त्याचप्रमाणे सर्व सार्वजनिक क्षेत्रात स्त्रीयांना आरक्षण मिळावे. असे कायदे व नियम हिंदु कोड बिलात डॉ.बाबासाहेबांनी अंतर्भूत केलेले होते. म्हणजे येथील समाजातील जी स्त्री नैसर्गिक हक्कापासून वंचीत राहिली होती तिला ते हक्क मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांचा होता.परंतु मनुवाद्यांनी, धर्म मार्तंडानी व संघाच्या पुढाऱ्यांनी अशिक्षित भोळया भावबड्या स्त्रीयांना हाताशी धरुन विधेय हाणून पाडले.

यावरुन असे दिसून येते की, ज्यांच्या नैसर्गिक हक्कासाठी डॉ.बाबासाहेब संघर्ष करीत होते.स्त्रीया त्यांच्या विरोधात घोषणा देत होत्या परंतु त्यांना वास्तव कळु न देता हे कार्य त्यांचा बोलविता धनी मनुवादी शंकराचार्य करपात्री होता.शेवटी या विधेयकाच्या वादावरुन डॉ. बाबासाहेबांनी 11 ऑक्टोबर 1951 रोजी आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.[8]

पृथ्वी शेषाच्या डोक्यावर तरलेली नसून कामगाराच्या हातावर तरलेली आहे.' असे म्हटले जाते. समाजातील कार्यशील वर्ग म्हणजे कामगार वर्ग होय यांच्या कार्यातून सर्व विश्वातील भौतिक सुख सुविधा उभारल्या जातात. कामगार वर्गाला दिवसभर कष्ट करुन ही रात्री उपाशी पोटी झोपावे लागत असे अशी विदरक परिस्थिती तत्कालीन समाजामध्ये होती. अर्थात श्रमाचा मोबदला जीवनाश्यक गरजांची पुर्तता ऐवढा सुध्दा मिळत नसे.अशा परिस्थितीत त्या कामगारांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे कार्ये डॉ.बाबासाहेबांनी केले आहे.

शेत मजुरांना आज 1948 च्या किमान वेतन कायद्यांतील तरतूदींचा कायदा मिळत आहे.त्यांचे किमान वेतन कामाचे तास शासनाने निश्चित केले आहेत. हे फलित डॉ. बाबासाहेबांनी 'स्वतंत्र मजुर पक्षातर्फे' 'शेतमजुरांचा किमान वेतन निश्चित करा' या मागण्यांसाठी केलेल्या आंदोलनाचे आहे.[9]

औद्योगिक कलहाचे विधेयक 1938 च्या सप्टेंबर महिन्यात 2 तारखेला मुंबईच्या विधीमंडळात विचारासाठी मांडले गेले.[10] त्या विशिष्ट परिस्थितीत कामगारांचा संप बेकायदेशीर ठरवावा अशी तरतूद त्यावेळच्या सरकारला पास करुन घ्यावयाची होती. कामगारांच्या हक्कावर एक प्रकारची गदा आणण्यात येते.मात्र मालकांच्या टाळेबंदी बाबत वा कारखाना कायमचा बंद करण्यासंबंधी ज्यामुळे कामगार बेकार होतात. यावर कसलीही बंदी घालण्यात येत नाही.शासनाच्या या मालक धार्जिण्या धोरणवर त्यांनी कडाडून हल्ला केला होता. 'हा कायदा काळा आहे' असे समजून विधेयकाला डॉ. बाबासाहेबांनी आणि जमनादास मेथा यांनी तीव्र विरोध केला.[11] जे विधेयक कामगारांच्या संपकरण्याच्या हक्काला बाधा आणते ते मालकांना मात्र आपला अर्थसंकल्प उघड करण्यास भाग पाडत नाही. पोलिसदलाचा उपयोग कामगारां विरुध्द कारवाई करण्याची मुभा मागत आहे.म्हणून हे विधेयक कामगारां विरोधी आहे.कामगरांना गुलाम बनविणारे आहे.असे डॉ.बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते. या काळया कायद्याचा निषेध करण्यासाठी 7 नोव्हेंबर 1938 रोजी स्वतंत्र मजुर पक्ष आणि गीरणी कामगार युनियन यांनी आपल्या संयुक्त बैठकित एकदिवसाचा संप करण्याचा निर्णय घेतला.[12]

तत्पूर्वी डॉ.बाबासाहेबांनी 1934 मध्ये सार्वत्रीक संपाची कम्युनिस्टवाद्यांनी हाक दिली.त्यावेळी त्यांनी आपला 'बहिष्कृत भारत व जनता' या साप्ताहीकामधून या संपाला प्रखर विरोध केला व दलित कामगारांनी या संपात सामील न होण्याचे आव्हान केले. त्यामुळे साम्यवाद्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 'कामगार वर्गाचे शत्रु' म्हणून हेटाळणी केली होती.[13] परंतु वास्तविक पाहता कम्युनिस्टाची कामगार कल्याण विषयकची धोरणे ढोंगीपणाची वाटत होती. कम्युनिस्ट हे आपल्या राजकीय ध्येयसिध्दीसठी कामगारांना राबवित असतात असे ठाम मत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे होते. त्यांच्या मते सार्वत्रीक संप हा राजकीय हेतुंनी प्रेरीत होता. ते कामगारांच्या संपकरण्याच्या हक्क संबंधी असे म्हणतात 'हे शस्त्र नेहमीच निपक्ष-पातीपणे आणि केवळ कामगारांच्या हितासाठी वापरले गेले पाहिजे राजकीय लाभासाठी नव्हे असा त्यांचा आग्रह असे यावरुन त्यांची निपक्षपाती न्यायिक भूमिका आपणास दिसून येते.

कम्युनिस्ट हे आपल्या राजकीय ध्येय सिध्दीसाठी कामगारांना राबवित असतात असे डॉ.बाबासाहेबंचे ठाम मत होते.म्हणून कामगारांना या राजकीय सापळयातून आणि त्यांच्या दुटप्पी धोरणापासून अलिप्त करावे.व राजकारण विरहीत एक स्वतंत्र अभेद्य संघटना बांधुन त्यांच्या हितासाठी चळवह उभारणे अगत्याचे आहे असे कळकळीचे आव्हान डॉ. बाबासाहेब सर्व मजुर वर्गाला केले होते.त्याच ध्येयपूर्तीसाठी 'स्वतंत्र मजुर पक्ष' निकराने लढत आहे असे प्रत्येक ठिकाणी आपल्या भाषणातून ते नमूद करीत असत.

त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे उद्देश आणि धोरण ठरवितांना खालील बाबीवर विशेष भर दिला.

1) कामगारांच्या मजुरीची किमान मर्यादा ठरवून देणे.

2) कामाचे तास कमी करणे.

3) गिरण्या व कारखान्यांतील कामगारांच्या नोकरची शाश्वती, बढती या संबंधी थेट कायदेशिर तरतूद करणे.

4) कामाचे योग्य वेतन.

5) भर पगारी रजा, आजारी रजा, वृध्दत्वात पेन्शन, अपघाती नुकसान भरपाई.

6) कामगारासाठी स्वस्त घरे.

7) त्यांच्या ओराग्याची काळजी घेणे.

8) कामगारांच्या बालकांसाठी शिक्षणाची सोय. (आजच्या वस्तीशाळा)[14]

अशी तरतूद कामगार कायद्यात झाली पाहिजे या मागण्यांवर त्यांनी जोर दिला आज जे भरपगारी रजा, आजारी रजा, वृध्दत्वाच पेन्शन शासन देते ते डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचे फलित मानावे लागेल. त्यामुळेच भारतीय कामगार बाबासाहेबांना 'मसिहा' समजतो.तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन भांडवलदारांच्या, मस्तवाल कारखानदारांच्या दास्यश्रृंखलेतून कायदेशीर मुक्त करुन त्यांचे जीवन सुसह्य आणि सुखकर केले.

'शेतकरी सुखीतर देश सुखी' कारण देशाला अन्नधान्याने समृध्द शेतकरी करतो हे डॉ.बाबासाहेबांच्या गुरुंनी महात्मा फुलेंनी जाणले होते.गुरुचा वारसा पुढे नेतांना सुध्दा शेतकऱ्याच्या उत्कर्षासाठी कार्य केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर शेतकऱ्याचे निर्भिड आणि चौकस नेते होते. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळून येथे 14 एप्रिल 1929 रोजी शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद भुषवून शेतकऱ्यांच्या प्रश्नांची, शेतकऱ्यांचया शोषणाची सविस्तर मांडणी केली.अध्यक्षीय भाषणात डॉ.बाबासाहे म्हणतात, "खोती पध्दत तुमचे रक्त पित आहे.जमीन धारणेची ही पध्दत नाहीशी केली पाहिजे त्यामुळे तुम्हाला शांतता आणि प्रगतीचा लाभ होईल.मागण्या मान्य होईपर्यंत तुम्ही आपला लढा चालू ठेवा."[15]

10 जानेवारी 1938 रोजी मुंबई प्रांताच्या विधीमंडळावर डॉ. बाबासाहेबांनी शेतकऱ्यांचा विविध मागण्यासाठी भव्य मोर्चा नेला कुलाबा, ठाणे, रत्नागिरी, सातारा, नाशिक अशा अनेक जिल्हा यातून आणि खेड्या पाड्यातून हजारो शेतकरी या मोर्चात जिद्द घेऊन सामिल झाले. बहुजन शेतकरी वाघ आहे. पण तो झोपलेला आहे वेगवेगळया आंदोलनातून शेतऱ्यांच्या मोर्चातून त्यांनी त्याला (शेतकऱ्याला) जागविण्याचे कार्य केले.

शेतकऱ्यांसाठी मागण्या पुढील प्रमाणे.

1. कुळ कायद्याची प्रभाविपणे अंमलबजावणी करुन कुळ म्हणून जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांची गुलामगिरी नष्ट व्हावी.

2. शेतीच राष्ट्रीयकरण व्हावे.

3. सामुदायिक शेती पध्दतीचा स्विकार करावा.
4. शेतीला ग्रामोद्योगाचे बळ द्यावे.
5. शेतीसाठी विज निर्मिती करावी.
6. शेतकऱ्यांसाठी शासनाच्या वतीने विविध योजना राबविण्यात याव्यात.

   i) शेतकऱ्यांना यांत्रिक सामुग्रि भाड्याने पुरवावी.

   ii) बीज भरण्यासाठी कर्ज द्यावे व ते शतसाऱ्सामधून वसूल करावे.

   iii) कसदार खत हे सरकारने शेतकऱ्याला पुरवाव.[16]

'सामुहिक शेती हाच शेती विकासाचा एक उत्तम मार्ग आहे' अशा प्रकारच्या शेतकऱ्यांच्या विकासाच्या मागण्या तत्कालिन परिस्थितीमध्ये डॉ.बाबासाहेबांनी कल्या ते आज ही वर्तमान काळामध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाच्या वाटतात.

'आजचा विद्यार्थी उद्याचा देशाचा आधारस्तंभ आहे' या उक्ती प्रमाणे विद्यार्थी हा शीलवान, गुणवान आणि ज्ञानिवतं व्हावा या दृष्टीकोणातून डॉ.बाबासाहेबांनी 1938 ला पुण्यात विद्यार्थ्या समोर भाषण दिले. ते म्हणतात 'विद्यार्थ्यांना जागृत व्हा शीला शिवाय विद्या फुकाची आहे'[17] अर्थात ज्याच्या जवळ शील असेल आणि जो शीलाचे पालन करीत असेल त्याला विद्या ही आपोआप प्राप्त होत असते असा उपदेश त्यांनी विद्यार्थ्याला दिला. तसेच ते भाषणात पुढे म्हणतात, 'विद्यार्थ्यांनी दीर्घोद्योग व सतत कार्यशील राहावे. असे केल्याने यश हे निश्चितच येते. अर्थातच असे इंग्रजी म्हटले 'HARD WORK IS A GREAT TREASURE'

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेबांनी समाजातील स्त्री, कामगार (हमाल), शेतकरी, शेतमजूर आणि विद्यार्थ्यांना योग्य असा न्याय देण्याचे कार्य त्यांनी केले. म्हणून जे टीकाकार डॉ.बाबासाहेब फक्त महाराचे नेते म्हण्तात. या विचाराला सैध्दांतिक असा आधार नाही. म्हणून टीकाकाराचा (मनुवाद्याचा) विचार फोल ठरतो.आणि डॉ. बाबासाहेब हे समाजातील सर्व घटकांसाठी झिजलेले दीप आपणस दिसून येतात.

**संदर्भ ग्रंथ**


1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 20, पृ. 87 पृ. 403, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समीती, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई,2005 संपा. डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. बाबासाहेब अभिवादन ग्रंथ, पृ. 175, 176, प्रकाशन, आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका , औरंगाबाद 2007.
2. डॉ. ज्ञानराज काशिनाथ गायकवाड 'राजवंश', महामानवडॉ. भीमराव रामजी आंबेडकर, पृ. 257, राजवंश पब्लिकेशन कोथरूड, पुणे- 29, 2006
3. भालचंद्र फडके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,पृ. 240, श्री विद्या प्रकाशन 250 शनिवार, पुणे 30, 1985
4. संपा. आणि अनु. डॉ. नरेंद्र जाधव, प्रज्ञा महामानवाची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखन कार्य खंड 2 पृ. 256 ग्रंथाली प्रकाशन माटूंगा (प) मुंबई 16, 2013 .
5. कित्ता पृ. 257
6. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृ. 332, 333 पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 2015
7. प्रा. जी. एस. भोसले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजून घेतांना, पृ. 86 ज्योती प्रकाशन धायरी पुणे- 41, 2013.
8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 18 भाग 2, पृ. 208, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समीती, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2002.
9. प्रा. जी. एस. भोसले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजून घेतांना, पृ. 80-81 ज्योती प्रकाशन धायरी पुणे- 41, 2013.
10. संपा. आणि अनु. डॉ. नरेंद्र जाधव, बोल महामानवाचे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र लेखन कार्य खंड 3 पृ. 256 ग्रंथाली प्रकाशन माटूंगा (प) मुंबई 16, 2012 .
11. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विद्यार्थ्यांनो जागृत व्हा, पृ. 60, प्रबुद्ध भारत पुस्तकालय पंचशीलनगर, नागपूर, - 17, 2011

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाजशास्त्रज्ञ

**डॉ. बिरादार प्रतिभा रंगराव**

माऊली महाविद्यालय वडाळा ता.उ.सोलापूर जि.सोलापूर समाजशास्त्रविभाग

**प्रस्तावना –**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक थोर समाजसूधारक होते. अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, विधितज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, घटनातज्ञ, पत्रकार, कामगार नेते, क्रांतीकारक लेखक ,समाजसूधारक इ. विविध पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दिसून येतात. मानवि हक्क मिळविण्यासाठी उपेक्षित घटकासाठी झगडणारे ते झूंझार नेते होते.नवभारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार, आधूनिक भारताचे जनक, लोकशाहीचे दाते व मानवि स्वतंन्र्याचे महान कैवारी होते. भारतीय समाजव्यवस्थचे शास्त्रीयदृष्टीकोणातून अध्ययन करून त्यांनी महत्वपूर्ण सिध्दांत मांडले.सामाजिक, धार्मिक, राजकिय, शैक्षणिक, आर्थिक इ. विविध विषयावर विपूल लेखन केले आहे. भारतातील कोट्यावधी दलित अज्ञानाच्या अंधकारात शकडोवर्ष खितपत पडले होते. सामाजिक, धार्मिक गूलामगिरीच्या बेड्यात अडकून पडलेल्या सर्व बहूजन समाजाला शिक्षित करून त्यांना सामाजिक राजकिय हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी आपले संपूर्ण आयूष्य वेचले. सामाजिक समतेसाठीचा त्यांचा संघर्ष महान होता. भारतीय समाजव्यवस्थेचे शास्त्रीयदृष्टीकोणातून अध्ययन करून समाजशास्त्राच्या विकासात भर घातली. समाजातील विविध सामाजिक विषयाच्या संदर्भात वस्तूनिष्ठ पध्दतीने अध्ययन करून महत्वपूर्ण समाजशास्त्रीय सिध्दांत मांडले.जातीव्यवस्थेच्या संदर्भात सूक्ष्मपणे वैज्ञानिकदृष्टीकोणावर आधारीत अध्ययन करून सिध्दांताची मांडणी केली.त्यांचे भारतीय समाजशास्त्राच्या विकासात महत्वाचे योगदान आहे.भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनाला सूरवात होण्यापूर्वीच डॉ. बाबासाहेबांनी जातीव्यवस्थेचे मानवशास्त्रीय व समाजशास्त्रीय संशोधन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजशास्त्रातील योगदानाचा आढावा घेण्यापूर्वी त्यांच्या जिवनपरिचयाचा थोडक्यात आढावा पूढीलप्रमाणे

**जिवन परिचय –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या खेडेगावात झाला. आईचे नाव भिमाबाई तर वडिलांचे नाव रामजी संकपाल असे होते. वडिल इंग्रजी लष्करात सुभेदार होते.वयाच्या सातव्या वर्षी आईचे निधन झाले.त्यांची आत्या मिराबाई यांनी बाबासाहेबांचे संगोपन केले.दापोली येथे त्यांच्या प्राथमिक शिक्षणाला सुरवात झाली. १९०७ मध्ये मॅटि/क झाली. १९१३ ला बी.ए. झाले.१९१५ ला कोलंबिया विद्यापिठातून एम.ए. १९१६ ला भारतीय अर्थशास्त्रातील पी.एच.डी.पदवी मिळाली.१९२० मध्ये लंडनला जावून राज्यशास्त्र ,अर्थशास्त्र विषयातील बॅरिस्टर पदवीचा अभ्यास केला व १९२३ला ही पदवी संपादीत केली.१९२४ साली भारतात त्यांनी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली.१९२७ ला त्यांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सूरू केले.१९३२ ला पूणे कराराला मान्यता देवून अस्पृश्यांच्या राखीव जागेचा प्रश्न धारीस धरला.१९३७ साली स्वतंन्र्य मजूर पक्षाची स्थापना केली.१९५५साली भारतीय बौध्द महासभेची स्थापना केली आणि १४ ऑक्टोंबर १९५६ मध्ये बौध्दधर्माचा स्वीकार केला.६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांची प्राणज्योत मावळली.

**ग्रंथसंपदा –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे गाढे अभ्यासक होते.त्यांच्या महत्वपूर्ण ग्रंथामध्ये १९१६ मधील Cast in India : Their mechanism Genesis and development, 1923 -The problem of rupee its origin and its solution , 1947- Who were the shudras?,1948 –The untouchables :who are they and why they became untouchable, 1953-Annihiation of cast, 1953- Federation versus freedom, 1956- Buddha and his Dhamma, Thoughts on Pakisthan इ. अनेक ग्रंथाच्या माध्यमातून अस्पृश्यता. वर्णव्यवस्था ,जातीव्यवस्था भारतीय समाजाचे वैज्ञानीक दृष्टिकोणातून अध्ययन करून समाजाची वास्तविकता मांडली.

**संशोधनाचा उद्‌देश –**

संशोधन पेपर लिहण्याचा उद्देश पूढिल प्रमाणे

१. साहित्याचा आढावा घेणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजशास्त्रातील योगदान स्पष्ट करणे

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजीक कार्याचा आढावा घेणे.

४. अध्ययनातून मिळालेल्या तथ्याच्या आधारे निष्कर्ष मांडणे.

**गृहितकृत्य –**

संशोधन पेपर तयार करतांना पूढिल गृहितकृत्य मांडण्यात आले.

१. डॉ. बाबासाहेबांनी भारतीय समाजाचा दलितवादी व मानवतावादी दृष्टिकोणातून अभ्यास केला.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजशास्त्रज्ञा बरोबरच थोर समाजसुधारक होते.

**तथ्यसंकलन –**

संशोधन पेपर तयार करतांना दूय्यम तथ्यसंकलनाचा आधार घेण्यात आला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजशास्त्रातील योगदान आणि कार्य –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संशोधन वृत्तीचे विचारवंत व भारतीय समाजव्यवस्थेचे गाढे अभ्यासक होते. त्यांच्या अध्ययनाला शास्त्रीय दृष्टिकोणाचा अधार आहे. भारतामध्ये सर्वप्रथम मूंबई विद्यापीठात १९१९ मध्ये सर पेटि/क गिडिस यांच्या अध्यक्षतेखाली समाजशास्त्र विभागाची स्थापना झाली त्यानंतर पूढे भारतीय समाजाचे शास्त्रीयपध्दतीने अध्ययन करणारी पिढी निर्माण झाली.असे असले तरी भारतीय समाजातील जातीव्यवस्थेचे शास्त्रीयपध्दतीने अध्ययन करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले भारतीय म्हणावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्थेतील विविध घटकाचा अभ्यास करून स्वतंत्र अशा सिध्दांताची मांडणी करून भारतीय समाजशास्त्राचे दालन समृध्द केले आहे. डॉ. बाबासाहेब हे विसाव्या शतकातील एक कृतिशिल क्रांतीपर्व होते. मानवमूक्ती,शोषणमूक्त समताधिष्ठित समाजनिर्मिती, मानवतेची प्रतिष्ठा, न्याय, समता, बंधूत्व, स्वतंत्र्य, स्वाभिमान आणि आत्मसन्मानाची मूल्ये त्यांनी समाजात रूजविली.माणसाला माणूस म्हणून जगवणारी आणि परंपरेच्या मानसिक दास्यातून मूक्त करणारी विचारप्रणाली त्यांनी समाजाला दिली. त्यांचे समाजशास्त्रातील योगदान आणि समाजाच्या विकासासाठी केलेले कार्य पूढिल प्रमाणे.

**१. जाती उत्पत्तीचा सिंध्दांत व कार्य –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीची निर्मिती ,जातीचे स्वरूप या विषयी सखोल असे लेखन त्यांनी त्यांच्या Annihilation of cast या ग्रंथात केला आहे. ९ में १९१६ ला अमेरीकेतील कोलंबिया विद्यापीठात भरलेंल्या डॉ.ए.ए. गोल्डनवायझर मानवविज्ञान परीषदेमध्ये वयाच्या २५ व्या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जातीचे जडण–घडण उत्पत्ती,विकास हा संशोधन पेपर सादर केला. हा पेपर १९१७ च्या इंडियन अॅन्टीक्वेरी मध्ये प्रकाशित झाला.बर्हिविवाहावर आंतरविवाहाचे वर्चश्व हेच खरे तत्व जातीच्या निर्मितीसाठी कारणीभूत आहे असा निष्कर्ष त्यांनी मांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जातीव्यवस्था ही सामाजिक समता, बंधूत्व आणि स्वतंत्र्याला घातक आहे.त्यामूळे जाती व्यवस्था ही मानवी मूल्याच्या विरोधी आहे असे Cast in India या ग्रंथात त्यांनी मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,'जाती संस्थेने केवळ अस्पृश्यांना छळले त्यांना दू:ख आणि दारीद्र्य दिले असे नाही तर जाती संस्थेच्या निर्मितीने संपूर्ण राष्ट्/ालाच उध्दवस्त करून टाकले'. Annihilation of cast या ग्रंथात त्यांनी जातीनिर्मूलन संदर्भात आपले विचार मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,ज्या विवाह संस्थेव्दारे जाती संस्था अस्तीत्वात आल्या त्या विवाह संस्थेचा उपयोग जाती नष्ट करण्यासाठी केला पाहिजे.जाती निर्मूलनाचा खरा उपाय म्हणजे आंतरजातीय विवाह होय हे स्पष्ट केले. जात हा एक स्वयंमर्यादित समूह होय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संशोधनाअंती स्पष्ट केले आहे. १९२७ मध्ये जातीव्यवस्थेचा पूरस्कार करणा-या मनूस्मृतीचे त्यांनी दहन केले आणि आंतरजातीय विवाहाला प्रोत्सहान दिले.

**२.अस्पृश्यते संबंधीचा सिध्दांत व कार्य –**

1948 मध्ये लिहलेल्या 'The untouchables :who are they and why they became untouchable' या ग्रंथामध्ये त्यांनी अस्पृश्य मूळचे कोण होते?त्यांची निर्मिती कशी झाली? त्यांच्या उत्पत्ती विषयचा सिध्दांत मांडला. जगातील आणि भारतातील अस्पृश्यता भेदाची त्याने विस्तृत अशी चर्चा केली. समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून त्यांनी याचा अभ्यास केला.वंशभेद आणि व्यवसायीक आधारावर अस्पृश्यांची निर्मिती झाली याला अंबेडकरांनी विरोध करून 'वाताहात झालेले लोक म्हणजे अस्पृश्य'असा सिध्दांत मांडला.विविध पूराव्याच्या आधारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपला सिध्दांत स्पष्ट करून दाखविला. शूद्र पूर्वी कोण होते? भारतातील अस्पृश्यांची समस्या, अस्पृश्यतेचा उगम,अस्पृश्यांसाठी कॉग्रेसने काय केले? विविध ग्रंथांच्या माध्यमातून अस्पृश्यतेची निर्मिती व अस्पृश्यता निर्मूलनाच्या आपल्या तात्वीक लढण्याची भूमिका मांडली आहे.अस्पृश्यतेच्या संदर्भात केवळ लिखानच केले नाही तर त्यांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अन्याय,आत्याचार, असत्याचा प्रतिकार करण्यास आणि न्याय हक्कासाठी संघर्ष करण्यास शिकविले.अस्पृश्यामधील स्वाभिमान जागृत केला.वरिष्ठांची याचना करून नाही तर अन्यायाविरूध्द झगडून आपले न्याय हक्क मिळविले पाहिजे अशी शिकवन त्यांनी दिली.

अस्पृश्यांच्या सर्वांगीण चळवळीची धूरा वाहू शकेल अशी संस्था स्थापन करून त्याव्दारे कार्य करावे यासाठी डॉ. बाबासाहेबांनी मूंबई येथील दामोदर हॉल, परळ येथे २०जूलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारणी सभा' या नावाची संस्था स्थापन केली.'अस्पृश्य' या शब्दाऐवजी त्यांनी 'बहिष्कृत' असा शब्द वापरला.या बहिष्कृत हितकारणी सभेचे ब्रीदवाक्य 'शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा'असे होते.या सभेच्या वतीने ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत'हे पाक्षिक सुरू केले.धर्म,रूढी,परंपरा,अस्पृश्यता या संबंधी शास्त्रीयदृष्टिकोणातून विचार मांडले. आम्ही आपले मानव जातीस प्राप्त असलेले समान हक्क मागत आहोत,अशी भूमिका घेवून बहिष्कृतांचा लढा हा जागतीक मानवाच्या मुक्तीच्या लढ्याचा एक भाग आहे असे व्यापक स्वरूप डॉ. आंबेडकरांनी मिळवून दिले. अस्पृश्यता निर्मूलनासाठी नाशिक येथिल काळाराम मंदिर प्रवेश,महाड येथिल चवदार तळ्याचा सत्याग्रह केला.

**३.धर्माविषयीचा सिध्दांत व कार्य –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील विविध धर्माचा सखोल असा अभ्यास केला.ते म्हणतात की धर्म हा व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आवश्यक आहे.धर्मामूळे आत्मसंमाधान मिळते मात्र धर्ममध्ये श्रेष्ट – कनिष्ट असा भेदभाव नसावा. धर्मने सर्वाना समान लेखले पाहीजे.त्यांनी हिंदू धर्मातील प्रथा,परंपरा यावर टिका केल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शोषणमूक्त समाज निर्माण करायचा होता.त्यांनी ख्रिश्चन आणि मूस्लीम धर्मातील समानतेच्या शिकवणीचा पूरस्कार केला.ज्या धर्मात मणूष्याच्या मणूष्यत्वाला व त्याच्या माणूसकीलाकिंमत नाही तो धर्म काय कामाचा? अशी टिका केली.त्यांच्या मते धर्म हा नीतीवर आधारीत असून विवेक आणि विज्ञानाशी सूसंगत असतो.तो समता,स्वतंत्र्य,बंधूत्व,यावर आधारीत असतो.ज्या धर्मात समता ,प्रेम,आपूलकीची भावना नसते त्याला धर्म म्हणू नये असे त्यांन वाटे.त्यांच्या मते धर्म हा बूध्दिप्रामान्यवादी व मानवतावादी असावा. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयूष्यातील अखेरचे पर्व धर्म चिंतनात घालवले आहे. हिंदूधर्मातल्या जाती आणि अस्पृश्यतेला कंटाळून'मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही ' अशी घोषणा केली.त्यांना समता ,स्वतंत्र्य आणि न्यायाचा पूरस्कार करणारा धर्म हवा होता.हिंदू धर्माला त्यांनी विषमतेचे माहेरघर संबोधले.या विषयी बोलतांना आंबेडकर म्हणतात,'' ज्या धर्मात माणसाशी माणूसकिने वागण्याची मनाई आहे,तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे.ज्या धर्मात माणसाची माणूसकी ओळखणे अधर्म मानले जाते,तो धर्म नसून रोग आहे.ज्या धर्मात अमंगल पशूंचा स्पर्श झाला असतांना चालतो,पण माणसांचा स्पर्श चालत नाही ,तो धर्म नसून वेडगळपणा आहे.जो धर्म एका वर्गाने विद्याशिकू नये ,धनसंचय करू नये,शस्त्रधारण करू नये,असे सांगतो तो धर्म नसून माणसाच्या जिवणाचे विडंबन आहे.जो धर्म अशिक्षितांना अशिक्षित राहा ,निर्धनांना निर्धन राहा अशी शिकवन देतो तो धर्म नसून ती शिक्षा आहे.''

हिंदू धर्माचा चिकित्सक अभ्यास करतांना व बौध्दधर्माचे तत्व मांडतांना धर्मात काय नसावे व धर्मात काय असावे हे तत्व मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते,मानवी समाजासाठी धर्मने उपयूक्त अशा तीन गरजा भागविल्या पाहिजे, त्या गरजा म्हणजे १.धर्म हा आधूनिक विज्ञानाशी सूसंगत व सहमत असला पाहीजे २.धर्माने

स्वतंन्त्र्य,समता,बंधूत्व या मूलभूत तत्वाला मान्यता दिली पाहीजे ३. धर्माने दारीद्र्याची थोरवी व महती गावू नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते,या सर्व गरजा केवळ बौध्द धर्मच पूर्ण करू शकतो कारण भगवान गौतम बुध्दाने सामाजिक,आर्थिक व राजकिय स्वतंन्त्र्याचा पूरस्कार केलेला असून स्त्री–पूरूष समानतेचा पूरस्कार केलेला असल्यामूळे सामाजिक समता निर्माण होण्यासाठी एकमेव बौध्द धर्मच योग्य आहे असा निष्कर्ष मांडला.

**४.स्तरीकरण व्यवस्थेविषयाचा सिध्दांत व कार्य –**

सामाजिक स्तरीकरण ही समाजशास्त्रातील महत्वाची संकल्पना आहे.जगातील प्रत्येक समाजात स्तरीकरण आढळून येते. वर्ग किंवा वंशाच्या आधारे स्तरीकरण दिसून येते.डॉ.आंबेडकरांनी भारतीय स्तरीकरण व्यवस्थेवर प्रकाश टाकला.त्यांच्या मते भारतीय समाजात हिंदू मध्ये निर्माण झालेले वर्ग हे वर्णावर आधारीत आहे.परिवर्तण हा निसर्गाचा नियम आहे मात्र हे चारवर्ण अपरीवर्तणीय होते.चातूवर्णव्यवस्थेला वर्गीकरणाची व्यवस्था म्हणणे हे त्यांना मान्य नव्हते कारण या वर्णव्यवस्थेत जाणिवपूर्वक निर्माण केलेले दंडसजा विषयक नियम अंतर्भूत होते. या वर्णव्यवस्थेची निर्मीती ही धार्मिक आधारावर झाली आणि म्हणून त्यांनी या व्यवस्थेला चूकिचे मानले.कारण वर्ण व्यवस्थेवर आधारीत असलेले स्तरीकरण हे बंदिस्त स्तरीकरण असून ते व्यक्तिच्या समाजाच्या विकासाला घातक आहे.हे डॉ.बाबासाहेबांनी स्पष्ट केले. त्यांनी बहिष्कृत भारत व मुकनायक या वृत्तपत्रातून जातीव्यवस्था व वर्णव्यवस्थेवर माठ्या प्रमाणात टिका केली. हिंदूधर्मग्रंथांचा सखोल अभ्यास करून वर्णव्यवस्था अस्पृश्यास कशी जबाबदार ठरली याचे स्पष्टिकरण दिले.

**५.मानवतावादाचा सिध्दांत आणि कार्य –**

माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून देणे हा डॉ.आबेडकरांचे अंतिम ध्येय होते.मानवता हा त्यांच्या सर्व विचाराचा केंद्रबिंदू होता.कोणताही भेदभाव न मानता मानव ही एकच जात असून माणसाने माणसाशी माणूसकिणे वागावे ही माणवतावादी विचारसरणी डॉ.बाबासाहेबांची होती.स्वतंन्त्र्य,समता,बंधूत्व व न्याय या तत्वावर मानवतावादी विचार आधारीत होते. समजिक पूनर्निमाणासाठी हे तत्व अत्येंत महत्वाचे होते. मार्क्सचा समाजवाद त्यांना मान्य होता पण हिंसेच्या किंवा क्रांतीच्या माध्यमातून समाजवाद त्यांना मान्य नव्हते. डॉ. आंबेडकरांना असा समाज निर्माण करायचा होता ज्या समाजात व्यक्ति –व्यक्तिमध्ये जन्म ,जात,लिंग,धर्म इ. आधारे भेदभाव न होता सर्वाना प्रगती आणि विकासासाठी समान संधी मिळेल शिवाय हा समाज रूढी, अंधश्रध्दा ,कर्मकांडपासून मूक्त असेल.मानवी मूल्यांना प्रस्थपित करण्यासाठी जाती व्यवस्थेला समाप्त करणे आवश्यक मानले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाडच्या सत्याग्रहामध्ये मनूस्मृती या हिंदूच्या पवित्र मानलेल्या धर्मग्रंथाचे जाहीर दहन केले.या मनुस्मृतीने शूद्र समूदयाला व स्त्रीयांना अतिशय कनिष्ट लेखले होते. मनूस्मृतीचे दहन करून डॉ.आंबेडकरांनी सनातनी प्रवृत्तीचा निषध केला. भारतीय राज्यघटनेमध्ये अनूसूचित जाती ,जमाती आणि स्त्रीयासाठी महत्वपूर्ण तरतूदी केल्या.राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्येच सर्वच नागरीकांना सामाजिक, आर्थिक, राजकिय न्यायाचे व समानतेचे हक्क दिले.जात, धर्म, वंश ,लिंग, रहीवास असा कोणताही भेदभाव न करता समानतेचे हक्क बहाल केले. स्त्रीयांच्या संपूर्ण प्रगतीसाठी उन्नतीसाठी आणि मुक्तीसाठी भारतीय स्त्रीयांना कायदेशिर हक्क दिले. हिंदूकोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीयासाठी अत्येंत महत्वपूर्ण काम केले.

**निष्कर्ष–**

संशोधन पेपर तयार करतांना मिळालेल्या तथ्याच्या आधारे निघालेले निष्कर्ष हे पूढिल प्रमाणे.

१. भारतात समाजशास्त्र विभाग स्थापनेपूर्विच भारतातील जातीची उत्पत्ती व विकास या संदर्भात शास्त्रीयदृष्टिने अभ्यास करणारे हे पहिले भारतीय समाजशास्त्रज्ञ आहे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निर्मिती संदर्भात सिध्दांत मांडून तो विविध घटनेच्या आधारे सिध्द करून दाखविला.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलीतवादी दृष्टिकोणाचा विकास केला.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध सामाजिक विषयाच्या संदर्भात वैज्ञानिकदृष्टिकोणावर आधारीत अध्ययन करून सिध्दांत मांडले.

५. भारतातील धर्म चिकित्सेच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका ही महत्वपूर्ण राहीली.
६. मानव हा केंद्रबिंदू ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवतावादी दृष्टिकोण मांडला.या दृष्टिकोणातून त्यांनी धर्म,जाती,अस्पृश्यता,सामाजिक परीवर्तनाचा अभ्यास केला.
७. समाजशास्त्राला समृध्द करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य मोलाचे ठरले.
८. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाला माणूस म्हणून जगवणारी आणि परंपरेच्या मानसिक दास्यातून मूक्त करणारी विचारप्रणाली समाजाला दिली.
९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मनिरपेक्ष,मानवतावादी दृष्टिकोण विकशित करण्यासाठी आणि प्रगतशिल भारत निर्माण करण्यासाठी समाजात स्वतंत्र्य,समता,बंधूत्व हे मूल्य रूजावे यासाठी मानवी स्वतंत्र्याचे विचार मांडले ते विचार आजही प्रेरणादायी आहे.

**सारांश –**

भारतातील एक महान समाजसूधारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ओळखले जाते. प्रचंड बूध्दिमत्ता, समाजासाठी असीम त्याग करणारे, दलीत समाजाला हक्क मिळवून देणारे, महाडचा सत्याग्रह, मनूस्मृतीचे दहन, मंदिर सत्याग्रह, शेतक-यांचा कैवारी, गोलमेज परिषद,पूणे करार,स्वतंत्र मजूरपक्ष, बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना, दलित शिक्षण संस्थेची स्थपना, पीपल्स एज्यूकेशन सोसायटीची स्थापना, महिलांसाठीचे कार्य, स्वातंत्रलढ्यात सहभाग इ. अनेक कार्यासाठी त्यांनी आपले आयूष्य खर्च केले.शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा असा मूलमंत्र त्यांनी समाजाला दिला. ते भारतीय समाजव्यवस्थेचे गाढे अभ्यासक होते.त्यांच्या अध्ययनाला शास्त्रीयदृष्टिकोणाचा आधार होता. सामाजिक मानवतावादी दृष्टिकोणातून भारतीय समाजाचा सखोल अभ्यास करून स्वतंत्र्य,समता, बंधूत्व आणि सामाजिक न्याय यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भर दिला. भारतातील सामाजिक असमानता,अस्पृश्यता,जातीय व्यवस्था नष्ट करण्यासाठी व समाजात समानता आनण्यासाठी प्रयत्न केला. भारतातील दलितांचे कैवारी सामाजिक ,धार्मिक, राजकिय व्यवस्थेवर कायम ठसा उमटविणारे एक कृतिशिल विचारवंत,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, तळागाळातील लोकाच्या उध्दारासाठी धडपडणारा मानवतावादाचा पूरस्कर्ता त्यांचे विविध विषयावरील सखोल अध्ययन आणि मांडलेले सिध्दांत हे अत्येंत महत्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे केवळ दलितांपूरतेच मर्यादीत नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयूष्याच्या ६५ वर्षात देशाला सामाजिक, आर्थिक, राजनितीक, शैक्षणिक, धार्मिक, ऐतिहासीक, सांस्कृतिक, साहित्यीक, औद्योगीक, संवैधानिक सह वेगवेगळया क्षेत्राात अनेक काम करून आधूनिक राष्ट/ाच्या निर्माणात अमूल्य योगदान दिले.

**संदर्भग्रंथ –**

१. अभिजात समाजातील विचार – डॉ. प्रदिप आगलावे ,साईनाथ प्रकाशन ,नागपूर
२. डॉ.बाबासाहेब आंबडकरांचे चरित्र – धनंजय किर,पॉप्यूलर प्रकाशन ,मुंबई.
३. डॉ.बाबासाहेब आंबडकरांचे सामाजिक विचार – शंकरराव खरात,इंद्रायणी साहित्य प्रकाशन , पूणे
४. जातीप्रथेचे विध्दवंसन – डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,अनु.गौतम शिंदे,
५. डॉ.आंबेडकर और एक मानवतावादी विश्लेषण – डॉ.परमानन्द सिंह,डॉ.कूंभार

# समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. आकांक्षा कांबळे**
समाजशास्त्र विभाग कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर ता.उदगीर जि.लातूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान भारतीय समाजाच्या दृष्टिकोनातून बहुमुखी स्वरूपाचे असल्याचे आढळते. त्यांच्या अध्ययनामुळे संशोधनामुळे आणि समाज सुधारणात्मक कार्यामुळे ते सबंध जगाला परिचित आहेत. विधितज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, घटनातज्ज्ञ, पत्रकार, लेखक, कामगार नेता, समाजसुधारक, कुशल संघटक, राजकीय नेता इत्यादी विविध अंगे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाची आढळून येतात. पण बाबासाहेब हे एक समाजशास्त्रज्ञ होते ही गोष्ट सर्वसामान्य लोकांना आतापर्यंत माहित नव्हती. समाजसुधारक तर आंबेडकर होतेच त्यासोबतच भारतीय समाजव्यवस्थेचे गाढे अभ्यासक होते. एक संशोधक होते. कोलंबिया, ऑक्सफर्ड, बॉन इ. जगप्रसिद्ध विद्यापीठांत त्यांनी अध्ययन केले. मोठमोठे संशोधनपर प्रबंध लिहिले. त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये वस्तुनिष्ठता अणि तार्किकता आढळते त्यामुळेच बाबासाहेबांनी समाजसुधारणा करण्याबरोबरच समाजातील अमानुष जाती, धार्मिक कर्मकांड, अस्पृश्यता इ. संबंधी तार्किक व संशोधनात्मक पद्धतीने अध्ययन करून त्यातील दोषस्थळे दाखवून त्यावर उपाय सुचविले आहेत. जे संशोधन इतर समाजसुधारकांच्या कार्याच्या बाबतीत क्वचितच आढळते. डॉ.एस.व्ही. केतकर यांचा अपवाद सोडल्यास डॉ.बाबासाहेबांपूर्वी इतर कोणत्याही भारतीय विचारवंताने समाजशास्त्रीय विचार मांडले नाहीत आणि विशेष म्हणजे बाबासाहेबांच्या संशोधनाची दखल नंतरच्या भारतीय समाजशास्त्रज्ञांनी घेतली नाही. त्यामुळे बाबासाहेबांनी आपल्या समाजशास्त्रीय सिद्धांतातून भारतीय समाजशास्त्राचे दालन समृद्ध केले असतानाही आतापर्यंत हे अध्ययन दुर्लक्षितच राहिले होते.

लहानपणापासूनच बाबासाहेबांना वाचनाची आवड असल्याने अभ्यासाच्या पुस्तकाबरोबर इतर अवांतर वाचनही त्यांच्याकडून भरपूर झाले होते. एलिफिस्टन कॉलेजमध्ये बी.ए. चे शिक्षण घेण्यास आर्थिक अडचण जेव्हा सतावू लागली तेव्हा त्यांची ही अडचण केळूस्कर गुरूजींनी सयाजीराव गायकवाडांच्या निदर्शनास आणून दिली. सयाजीरावांना होतकरू, परिश्रमी, अस्पृश्य विद्यार्थ्याची सेवा करायची इच्छा होती. पण ही मदत करताना ते विद्यार्थी खराच प्रतिभासंपन्न, परिश्रमी आहे का? याची ते परीक्षा घेत असत. त्यांनी बाबासाहेबांचीही परीक्षा घेण्याचे ठरविले. सुरूवातीला तर बाबासाहेबांना परीक्षेच्या भीतीने तेथून पळून जावेसे वाटले. पण परीक्षेत पास झालो तर आपल्या आयुष्यातील काळोख मिटणवणारा सूर्यच आपल्याला मिळणार असे त्यांना वाटले. सयाजीरावांनी त्यांना समाजशास्त्राशी संबंधित अनेक प्रश्न विचारले. त्यात व्यक्तीच समाज निर्माण करतो हे कथन बरोबर आहे का? हे विधान हिंदू धर्माला लागू पडते का? जातीव्यवस्था उचित मानता येईल का? या जातिव्यवस्थेत सुधार करून समाजव्यवस्थेची पाया घालता येईल असे तुला वाटते का? असे कितीतरी प्रश्न विचारले. बाबासाहेबांचे वय तेव्हा जेमतेम 15–16 वर्ष होते. पण अवांतर वाचनाने त्यांची बुद्धी ज्ञानाच्या बाबतीत प्रगल्भ झाली होती. त्यांनी प्रत्येक प्रश्नाची उत्तरे अत्यंत खुबीने दिली. त्यांची प्रतिभासंपन्नता पाहून सयाजीराव थक्क झाले. त्यामुळे सयाजीरावांनी बी.ए. साठी व पुढे उच्चे शिक्षणसाठीही बाबासाहेबांना शिष्यवृत्ती मंजूर केली. म्हणजेच त्यांच्या उत्कर्षाचा मार्ग त्यांच्या समाजशास्त्रीय अभ्यासातून खुला झाला.

समाजिक विषयाच्या संदर्भात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून बाबासाहेबांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. विविध सामाजिक विषयाच्या संदर्भात केवळ वरवरचे लेखन केले नाही तर अनेक महत्त्वपूर्ण समाजशास्त्रीय सिद्धांत मांडले आहेत. त्यात Caste in India Its Mechanism, Genesis and Development (1916) (भारतातील जाती, यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास), Annihilation of Caste (1936) (जातीसंस्थेचे निर्मूलन' Who were the Shudras? (1946) (शुद्र पूर्वी कोण होते?), Untouchable, who were they and why they become untouchables (1948) (अस्पृश्य पूर्वी कोण होते आणि ते अस्पृश्य का बनले?), Philosophy of Hinduism, Untouchables and untouchability-Social, Political, Religions असे कितीतरी ग्रंथ बाबासाहेबांचे

पाहिले असता आंबेडकर हे समाजशास्त्रज्ञ होते असे त्यांच्या ग्रंथांच्या अध्ययनावरून सिद्ध होते. बाबासाहेबांनी दलित समाजाच्या विकासाच्या दृष्टीने दलितवादी दृष्टिकोनातून समाजशास्त्रीय अध्ययन केले तर अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी सामाजिक, मानवतावादी दृष्टिकोन समोर ठेवला.

भारतात 1919 मध्ये मुंबई विद्यापीठात स्वतंत्र समाजशास्त्र विभाग सुरू झाला परंतु 1919 पूर्वी समाजशास्त्रीय अध्ययनामुळे एक भारतीय समाजशास्त्रज्ञ म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ओळख निर्माण झाली होती हे विशेष. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात 9 मे 1916 ला भरलेल्या 'डॉ.ए.ए. गोल्डन वायझर मानव विज्ञान परिषदेत' 25 वर्षांच्या एका तरूण भारतीय समाजशास्त्रज्ञाने भाग घेतला होता. त्या तरूण भारतीय समाजशास्त्रज्ञाने या परिषदेत 'भारतातील जातीची घडण, उत्पत्ती आणि विकास' हा संशोधनपर पेपर सादर केला होता. हा पेपर 1917 च्या 'इंडियन ॲन्टीक्वेरी' मध्ये प्रसिद्ध झाला होता. हा तरूण भारतीय संशोधक म्हणजे डॉ. बी.आर. आंबेडकर. या संशोधनपर पेपरमध्ये जाती कशा निर्माण झाल्या? त्या का टिकून राहिल्या? यासंबंधीचे मानवशास्त्रीय, समाजशास्त्रीय विश्लेषण बाबासाहेबांनी केले. बाबासाहेबांनी जातीआधारावर भारतीय हिंदू समाजामार्फत केली जाणारी अमानुष वागणूक प्रथमच जगाच्या वेशीवर निदर्शनास आणून देण्याचे काम केले. जातीच्या संदर्भात अत्यंत सुक्ष्मपणे वैज्ञानिक अध्ययन करण्याचे श्रेय बाबासाहेबांकडेच जाते. भारतीय समाजातील जातीचा उदय स्पष्ट करताना बाबासाहेब म्हणतात की, सुरूवातीला भारतात वर्णव्यवस्था होती, तिचे स्वरूप वर्गासारखे होते. त्यात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ही चार वर्ण वर्गव्यवस्थेसारखी होती. त्यात व्यक्तीला आपल्या कर्तृत्वानुसार वर्ण बदलता येत होता. पुढे या वर्गातील मुक्त प्रवेश पद्धती बंद झाली. ते वर्ग स्वमर्यादित बनले. तेथूनच जात उदयास आली. जातीतल्या जातीतच विवाह करण्याचा पगडा पडला. बहिर्विवाहावर अंतर्विवाहाचे वर्चस्व हेच खरे तत्त्व जातीच्या निर्मितीस कारणीभूत होते. अंतर्गत विवाह ही हिंदू विवाहाचीच देण असून त्याची सुरूवात ब्राम्हण जातीतून झाली. ब्राम्हणांनी जातीअंतर्गत विवाह करण्यास सुरूवात केल्यामुळे अब्राम्हण पोट विभाग किंवा वर्णानी या प्रथेचे अनुकरण केले आणि हळूहळू अंतर्गत विवाहाची प्रथा पाळणाऱ्या जातीत रूपांतरीत झाले. व्यक्ती गटांतर्गत व जातीअंतर्गत विवाह करण्यासाठी स्त्री–पुरुषाची समान संख्या कायम राहण्यामुळेच गटातल्या गटात लग्न करण्याची रूढी शाबूत ठेवणे शक्य होते आणि जर स्त्री–पुरूषांच्या संख्येत तफावत निर्माण झाली तर लोक गटाबाहेर अर्थात जातीबाहेर लग्न करतीत अशी भीती जाती टिकवून ठेवू इच्छिणाऱ्या लोकांना वाटत होती. त्यामुळे स्त्री–पुरुषांच्या संख्येतील तफावत दूर करण्यासाठीच सतीप्रथा, विधवा पुनर्विवाहास बंदी, विधुरांवर ब्रम्हचर्य व्यवस्था, लग्न योग्य असलेल्या मुलीशी त्यांचे लग्न लावून देणे या सर्व रूढी जातीच्या घडणीसाठीच कशा निर्माण करण्यात आल्या आणि रूढीच्या मागे गौरवाचे तत्त्वज्ञान कसे निर्माण करण्यात आले हे बाबासाहेबांनी सिद्ध करू दाखविले.

### जातीव्यवस्था एक सामाजिक समस्या

अनेक संशोधकांनी आणि समाजसुधारकांनी जात ही एक सामाजिक समस्या आहे असे प्रतिपादन केले. पण जातीव्यवस्थेमुळे कोणकोणत्या समस्या निर्माण होतात याचे सुक्ष्म अध्ययन कुणीही केले नाही. फक्त बाबासाहेबांनीच जातीच्या विविध दुष्परिणामांची चर्चा केली आहे. बाबासाहेबांच्या मते, जातीची समस्या ही केवळ समाजमूलक नाही. ती जर सामाजिक समस्या असती तर ती समस्या आतापर्यंत नष्ट झाली असती. जातीव्यवस्थेला धार्मिक मान्यता असल्यामुळे ती शेकडो वर्षांपासून टिकून आहे. हे बाबासाहेबांनी सिद्ध केले. बाबासाहेबांच्या मते, जातीव्यवस्था ही समस्या निर्माण करणारी एक व्यवस्था आहे. आजच्या आधुनिक काळातही बाबासाहेबांचे हे विधान अगदी बरोबर लागू पडते. जातिव्यवस्थेचा सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक इत्यादी सर्व क्षेत्रावर प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यातूनच जातीवर आधारित राजकारण, जातीय प्रतिष्ठा जपण्यासाठी 'ऑनर किलिंग' अशा कितीतरी समस्या निर्माण झालेल्या आपल्याला दिसून येतात.

'Annihilation of Caste System' या ग्रंथात बाबासाहेबांनी जातिव्यवस्थेचे निर्मूलन कोणत्या पद्धतीने करता येईल यासंबंधीचे विश्लेषण केले आहे. काही विद्वानांनी जातीवाद नष्ट करण्यासाठी पोटजाती नष्ट

करावा्यात याशिवाय आंतरजातीय सहभोजन इ. उपाय सांगितले आहेत. पण पोटजाती नष्ट करण्यामुळे, सहभोजन केल्यामुळे आपुलकीची भावना जाती–जातीत निर्माण होणार नाही तर रक्तसंबंधानेच आपुलकीची भावना निर्माण होते. आंतरजातीय विवाहातून निर्माण होणाऱ्या नातेसंबंधाच्या भावनेशिवाय जातीने निर्माण केलेला विभक्तपणा, परकेपणाची भावना, दुही नष्ट होणार नाही. म्हणून बाबासाहेब जाती मोडण्याचा खरा उपाय म्हणजे 'आंतरजातीय विवाह' होय या निष्कर्षापर्यंत येतात. आंतरजातीय विवाह सहज घडून येणार नाही तर ज्या धर्मशास्त्रांनी जातिव्यवस्थेच्या कल्पना बिंबविल्या, त्या धर्मशास्त्राच्या, धर्मग्रंथाच्या विश्वास श्रद्धा नष्ट केल्या पाहिजेत तेव्हाच जातीच्या तटबंदी कोसळतील व आंतरजातीय विवाह घडतील. हे निर्भिड परंतु वस्तुनिष्ठ निष्कर्ष बाबासाहेबांनी मांडले आहेत.

'Who are the Untouchables or Theory of Broken Men' (अस्पृश्य पूर्वी कोण होते? किंवा वाताहत झालेल्या लोकांचा सिद्धांत) यात बाबासाहेब स्पष्ट करतात की, प्रारंभिक समाज हा भटका होता. शेतीचा शोध लागल्यानंतर त्याचे भटके जीवन स्थिर झाले. पण ज्या जमाती अस्थिर होत्या त्या स्थिर जमातीवर आक्रमण करू लागल्या. या परस्पर युद्धात एखाद्या टोळीचा संपूर्ण नाश होण्याऐवजी तिचा पराभव होवून तिची वाताहत होत असे. पराभूत टोळीचे लहान–लहान गट होत असत. अशा प्रकारे आदिम समाजात दोन प्रकारचे समूह अस्तित्वात होते. त्यात पहिला स्थायी समूह ज्यांना भटक्या समूहापासून संरक्षणाची व निगराणीची आवश्यकता होती व दुसरा जो पराभूत व वाताहत झालेल्या लोकांचा असून त्यांच्यापुढे आवास व निर्वाहाच्या गरजा प्राप्त करण्याचा प्रश्न निर्माण झाला. या दोन समुहांनी परस्परात करार केला. ज्यानुसार वाताहत झालेल्या लोकांनी स्थायी जमातीचे संरक्षण व टेहळणी करण्याचे काम स्वीकारले आणि त्यांच्या मोबदल्यात त्यांना अन्न आणि आश्रय देण्याचे स्थायी जमातींनी मान्य केले. वाताहत झालेले लोक स्थायी जमातीचे संरक्षण करण्यासाठी गावच्या बाहेर राहू लागले. पण गावच्या बाहेर राहणाऱ्या अशा जमातींना अस्पृश्य का म्हटले जाऊ लागले याचे पुराव्यानिशी वस्तुनिष्ठ विश्लेषण बाबासाहेबांनी केले आहे. वाताहत झालेली हे लोक बौद्ध धर्माच्या प्रभावाखाली आली व त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान जातिव्यवस्थेच्या विरोधी होते. तसेच ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व त्यांनी नाकारले होते. त्यामुळे अशा वाताहत झालेल्या लोकांविषयीची घृणा व तिरस्काराची भावना यामुळे हा समूह अस्पृश्य मानण्यात आला. तसेच गोमांस ब्राम्हणांनी वर्ज्य केले होते. पण वाताहत झालेल्या लोकांनी ते सुरूच ठेवले. म्हणून त्यांना अस्पृश्य ठरविले गेले. त्यांचा दर्जा स्थायी लोकांपेक्षा खालचा ठेवण्यात आला. त्यांच्यासोबत खानपान, विवाहसंबंध प्रस्थापित करणे निषिद्ध मानण्यात आले. अशा प्रकारे बाबासाहेबांनी अस्पृश्य हे मूळचे वाताहत झालेले लोक होते हे सिद्ध करून दाखविले. आंबेडकरांनी ऐतिहासिक घटनांच्या आधारावर आपला अस्पृश्यतेसंबंधीचा सिद्धांत मांडला असला तरी त्यांनी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन ठेवून अस्पृश्य हे मूळचे कोण आहेत याचा शोध घेतला.

भारतीय समाजातील धर्म चिकित्सेच्या परंपरेत बाबासाहेबांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. बाबासाहेबांनी विविध धर्माचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून तौलनिक पद्धतीने अभ्यास केला. 'रिडल्स इन हिंदूझम' सारख्या ग्रंथातून हिंदू धर्मातील दोष दाखविले. बाबासाहेबांनी धर्म चिकित्सा करताना हिंदू कोणास म्हणावे? जातीव्यवस्था कशी निर्माण झाली? वेद सनातन कसे? वेदाचे मूळ नेमके कोणते? कर्मकांडाचे स्तोम इ. प्रश्नांचा शोध घेतला. मनुस्मृतीचे खंडण व दहनही केले. हिंदू धर्मात सुधारणाही सुचविल्या. पण कितीही प्रयत्न करून हिंदू धर्माच्या मानसिकतेत बदल होणे शक्य नसल्यामुळे शेवटी ते बौद्ध धर्माच्या तत्त्वाशी सुसंगत झाले व त्यांनी धर्मांतर करून बौद्ध धर्मात प्रवेश केला. 'The Buddha and His Dhamma' हा मौलिक ग्रंथ त्यांनी लिहिला. ज्याचे प्रकाशन त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर झाले. हा त्यांच्या धर्मचिकित्सेचाच एक भाग होता.

बाबासाहेबांनी भारतीय समाजातील स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचे सखोल अध्ययन केले व त्यावर 'हिंदू स्त्रियांची उन्नती व अनवती' हा लेख लिहिला. बाबासाहेबांनी स्त्रियांच्या सामाजिक दर्जात सुधारणा व्हाव्यात यासाठी मार्ग सांगितला. कुटुंब नियोजनाचा त्यांचा हेतू स्त्री विकास होता. स्त्री कोणत्याही जातीची असो ती दलितच आहे असे लक्षात घेवून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळावे यासाठी त्यांनी संसद सभागृहात 'हिंदू

कोड बिल' मांडले होते. 1951 मध्ये हे बिल मंजूर झाले नाही. म्हणून त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. यावरून त्यांचा स्त्रीहक्कामागचा त्याग दिसून येतो.

बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील अर्थव्यवस्थेचे सखोल अध्ययन करून सामाजिक समता प्रस्थापित व्हावी यासाठी आर्थिक समता कशी निर्माण करता येईल यावर भर दिला. त्यांच्या अध्ययनामध्ये प्रामुख्याने त्यांनी 'प्राचीन भारतीय व्यापार' (1915), 'भारताचे राष्ट्रीय उत्पन्न : एक ऐतिहासिक व विश्लेषणात्मक अध्ययन' (1916), ब्रिटिश भारतातील राजेशाही, वित्ताचे प्रादेशिक विकेंद्रीकरण, ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती, 'द प्रॉब्लेम ऑफ रूपी' इ. शोधनिबंधांच्या माध्यमातून भारतातील आर्थिक दयनीयतेचे चित्र रेखाटले.

बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या राजकीय परिस्थितीचे देखील अध्ययन केले होते. भारतीय समाजासाठी आवश्यक अशी शासनप्रणाली म्हणून 'लोकशाही' शासन प्रणालीचा त्यांनी उल्लेख केला. लोकशाहीवर त्यांची प्रचंड निष्ठा होती. विविधतेने नटलेल्या भारतीय समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय यावर आधारलेली संसदीय शासन प्रणाली तारू शकते असे विचार त्यांनी मांडले. त्यांनी राज्य समाजवादाचा स्वीकार केला. देशाच्या, समाजाच्या विकासासाठी 'संघराज्य' शासन व्यवस्था आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. भारतीयांसाठी 'एक व्यक्ती आणि एक मूल्य' याचा स्वीकार केला.

बाबासाहेबांच्या जीवनामध्ये शिक्षणाचे सर्वाधिक महत्त्व आहे. त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे एक साधन म्हणून शिक्षणासंबंधीचे मौलिक असे विचार मांडले. सामाजिक दुखण्यावर शिक्षण हेच औषध आहे असा त्यांचा दृष्टिकोन होता. सायमन कमिशनला दिलेल्या साक्षीत त्यांनी मुला–मुलींच्या प्राथमिक शिक्षणावर भर देण्याची शिफारस केली आणि प्रत्यक्ष संविधानात 14 वर्षापर्यंतच्या मुला–मुलींना मोफत शिक्षण देण्याची तरतूद केली. भारतातील शैक्षणिक समस्येचा अभ्यास करताना शिक्षणसंस्था, शिक्षण पद्धती, शासनाचे शिक्षणाबाबतचे कर्तव्य इ. बाबींवर त्यांनी प्रकाश टाकला. शासनाने प्राथमिक शिक्षणावर सर्वाधिक खर्च करावा. शिक्षण खालच्या स्तरापर्यंत पोहचले पाहिजे या गोष्टींवर त्यांनी भर दिला. शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती शक्य नाही हे लक्षात घेवून त्यांनी स्वतः 1945 मध्ये 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली.

**बाबासाहेबांचा सामाजिक मानवतावाद :**

बाबासाहेबांना अखिल मानव जातीच्या कल्याणाविषयी चिंता होती. त्यांच्या समाजशास्त्रीय अध्ययनात सामाजिक मानवतावादाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. त्यांनी भारतीय समाजात मानवतावादाची बीजे रूजली पाहिजेत यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या सामाजिक मानवतावादात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्त्वाला अतिशय महत्त्वाचे मानले आहे. काही विचारवंतांनी, अभ्यासकांनी ही तत्त्वे बाबासाहेबांनी फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतली असे म्हटले जाते. मात्र हे विचार बौद्ध तत्त्वज्ञानात प्राचीन काळापासून अस्तित्वात होती आणि त्या बौद्ध तत्त्वज्ञानातूनच बाबासाहेबांनी ती घेतली आहेत.

1) **स्वातंत्र्य** : प्रत्येक व्यक्तीला आपले जीवन जगताना स्वातंत्र्य ही आवश्यक बाब आहे. स्वातंत्र्यामुळेच व्यक्तीवरील दबाव, कठोर बंधने, अत्याचार नाहीसे होण्यास मदत होते. मात्र भारतीय समाजामध्ये हिंदू धर्मव्यवस्थेमुळे स्वातंत्र्यावर बंधने आहेत. ती मानव जातीला काळिमा फासणारी आहेत. त्यामुळे बाबासाहेबांनी आयुष्यभर स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. आचार व विचार स्वातंत्र्य, संघटनेचे स्वातंत्र्य उपजिविका स्वातंत्र्य हे तीन प्रकारचे स्वातंत्र्य व्यक्तीला असावेत असे बाबासाहेब म्हणतात. मात्र व्यक्ती स्वातंत्र्याचा इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा न येता उपभोग घेणे आवश्यक आहे असे बाबासाहेब म्हणतात.

2) **समता** : सामाजिक समता म्हणजे भेदभावविरहित समाज होय. जन्माला येणारे सर्वच लोक जन्मतः बलशाली, श्रीमंत असत नाहीत. तेव्हा जे गरीब आहेत दुबळे आहेत अशांना देखील समानतेची वागणूक मिळावी, त्यांना देखील जीवन जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. भारतीय समाजामध्ये जात, धर्म, वंश, भाषा इ. बाबतीत मोठ्या प्रमाणात विविधता आहे. या विविधतेतून एकता कशी निर्माण करता येईल याची बाबासाहेबांना काळजी

होती. त्यासाठीच त्यांनी समताधिष्ठित राज्यघटनेची निर्मिती केली. लोकांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, न्यायदानविषयक, शैक्षणिक व सांस्कृतिक समता मिळावी असा बाबासाहेबांचा आग्रह होता.

**3) बंधुत्व** : बंधुत्व म्हणजे सर्व मानवामध्ये प्रेम आणि आपुलकीची भावना होय. बंधुत्वामुळेच वेगवेगळ्या सामाजिक समुहांमध्ये एकोपा, ऐक्य वाढीस लागते. परस्परांविषयी प्रेम, दया, सहानुभूती, त्याग इत्यादी बाबी वृद्धिंगत होतात. बंधुत्वातून राष्ट्र एकसंघ बनते, प्रगतीच्या दिशेने वाटचाल करते. बंधुत्व ही एक विशाल व्यापक संकल्पना आहे असे बाबासाहेबांचे मत होते. त्यातून जागतिक पातळीवर सबंध मानवजातीचे कल्याण साधता येईल.

**4) सामाजिक न्याय** : भारतीय समाजामध्ये सामान्यांना सामाजिक अन्यायाला बळी पडावे लागले आहे. याची जाण बाबासाहेबांना होती. तेव्हा सामाजिक न्यायाचा आग्रह त्यांनी धरला. सामाजिक न्यायात त्यांना सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय अभिप्रेत होता. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यामुळेच समाजातील सदस्यांमध्ये सहानुभूती, ऐक्य, जिव्हाळा, प्रेम, वृद्धिंगत होते. त्यातूनच हळूहळू सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यास मदत होते. दैनंदिन जीवन जगताना समाजात सर्वांना समान न्याय असावा. सामाजिक अन्यायाला बळी पडलेला व्यक्ती आपले जीवन सुखी करू शकत नाही. तेव्हा कोणावरही कोणी अन्याय करू नये असा आंबेडकरांचा मानवतावाद सांगतो.

बाबासाहेबांच्या सामाजिक मानवतावादातील चारही तत्त्वे बाबासाहेबांनी राज्यघटनेतून आपल्याला दिली आहेत. ही सामाजिक मानवतावादाची चारही तत्त्वे एकमेकांवर अवलंबून आहेत. कारण स्वातंत्र्यातून समता, समतेतून बंधुत्व व बंधुत्वातून सामाजिक न्याय निर्माण होतो. ही सामाजिक मानवतावादाची तत्त्वे भारतासारख्या संसदीय शासनप्रणाली स्वीकारलेल्या देशातच अमलात आणता येतात असे बाबासाहेबांचे मत होते. बाबासाहेबांकडे समाजशास्त्रज्ञाच्या रूपाने एक सामाजिक मानवतावादाचा पुरस्कर्ता या दृष्टीने पाहता त्यांच्या समाजशास्त्रीय अध्ययनाचा उद्देश दलिताचा विकास करणे हा तर होताच पण त्याही पुढे विश्वशांती, अखिल मानव जातीचे कल्याण हा देखील त्यांच्या संपूर्ण समाजशास्त्रीय विचारांचा मूळ गाभा होता.

## संदर्भ सूची

1)गोखले द.न. (12 जून 2006), डॉ.आंबेडकरांचे अंतरंग, मौज प्रकाशन, मुंबई
2)आंबेडकर भीमराव (प्रथमावृत्ती 1951), हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती, नाग–नालंदा प्रकाशन, विशालनगर जि.सांगली
3)कांबळे बी.सी. (6 डिसेंबर 2014), हिंदूत्व आहे तरी काय?, नाग–नालंदा प्रकाशन, विशालनगर जि.सांगली
4)श्रावस्ती दीपा (14 एप्रिल 2015), स्त्री स्वातंत्र्य आणि बुद्ध–फुले–आंबेडकर, नाग–नालंदा प्रकाशन, विशालनगर जि.सांगली
5)सोनवणे सुहास (26 जानेवारी 2013), बहुआयामी, अनुभव अक्षरधन प्रकाशन, मुंबई
6)मोरे दिनेश (22 ऑक्टो. 2005), स्त्रियांचा महान उद्धारक बुद्ध, नाग–नालंदा प्रकाशन, विशालनगर जि.सांगली
7)लुलेकर प्रल्हाद (2012), 'अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा', सायन पब्लिकेशन्स प्रा.लि. पुणे
8)लांजेवार ज्योती (फेब्रुवारी 2012), फुले–आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन, नागपूर
9)सबाने अरूणा (8 मार्च 2007), डॉ.आंबेडकर आणि स्त्री, आकांक्षा प्रकाशन, नागपूर
10)वाळके प्रमोद (2 ऑक्टो. 2014), डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर
11)सुरवाडे विजय (नोव्हेंबर 2014), समकालीन सहकाऱ्यांच्या आठवणीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकवाङ्मय गृह, मुंबई
12)साळवे मधुकर(14 एप्रिल 2010)डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची सामाजिक–राजकीय–धार्मिक चळवळ, नालंदा प्रकाशन, पुणे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती

**प्रा.वर्षा भूषण कांबळे**

समाजशास्त्र विभाग श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर ता.उदगीर जि.लातूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रउद्धार, अस्पृश्यताउद्धार यासाठी खर्ची घातले. त्यांचे विचार कार्य सामाजिक, राजकीय, आर्थिक इ. क्षेत्रात व्यापलेले आहेत. भारतीय संविधान किंवा त्यानंतर हिंदू कोड बिलाद्वारे त्यांनी भारतीय स्त्रीच्या स्वातंत्र्याची मंगलमय ज्योत पेटवली. म्हणूनच आज खंड स्त्रीजात स्वातंत्र्याची अनुभूती प्राप्त करीत आहेत. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक कार्य विशेष उल्लेखनीय आहे. भारतीय स्त्रीच्या सामाजिक उच्च दर्जाची बुद्धकालीन जी परमोच्चता मनूने अवनत केली, तिला जबरदस्त हादरे देण्याचे कार्य जोतीबा फुल्यांनी केले. ज्या समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना पशुपेक्षाही हीन वागणूक देण्यात आली. विविध प्रक्रियेतून तिचे शोषण करण्यात आले. या दास्यातून गुलामीतून मुक्ती फक्त शिक्षणच करू शकते. म्हणून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या दांपत्यानी सर्वप्रथम 1848 मध्ये मुलींसाठी पहिली शाळा काढून क्रांतिकारी पाऊल उचलले. त्यानंतर शाहू महाराजांनी स्त्री उद्धाराचे व दलितोद्धाराचे कार्य केले. 20 व्या शतकात महात्मा फुले यांचे कार्य खऱ्या अर्थाने पुढे नेण्याचे कार्य डॉ.बाबासाहेबांनीच केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे युगप्रवर्तक कार्य जर कोणते असेल तर त्यांनी माणसाला माणूस म्हणून स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली, हे होय. त्यांच्या तत्त्वज्ञानात पुरुष आणि स्त्री ह्यांना समान अधिकार आहेत आणि म्हणूनच आजच्या भारतीय स्त्रीच्या अस्मितेसाठी स्वाभिमानयुक्त अस्तित्वासाठी त्यांनी भारतीय संविधानात समानतेची तरतूद केली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जातिव्यवस्थेमध्ये स्त्री शोषणाचे मूळ आहे म्हणून जातीव्यवस्था व स्त्री शोषणाचा संबंध स्पष्ट करून दाखविला. त्यांनी 'भारतातील जाती' हा निबंध लिहिला आणि सांगितले की, जातिव्यवस्था म्हणजे दुसरे तिसरे काही नसून श्रेणीबद्ध विषमतेची रचना आहे. या श्रेणीरचना स्त्रियांवर गुलामीची बंधने लादूनच भक्कम केली गेली. हे स्पष्ट करताना ते पुढे म्हणतात की, जातीव्यवस्थेचे प्रमुख लक्षण म्हणजे जातीबाह्य विवाहास बंद होय. जातीव्यवस्था रोटीबंदी, जातवार वस्त्या, व्यवसायबंदी, जातपंचायतीही आहेत. याबरोबर जात म्हणजे स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा असते, हे स्पष्ट केले. परंतु जेव्हा जातीगटाबाहेर विवाहास बंदी घालण्यात आली तेव्हा काही समस्या निर्माण झाल्या. सर्वसाधारणतः कोणत्याही सामान्य लोकसमुहामध्ये स्त्री–पुरुषांची विभागणी समप्रमाणात असते. परंतु हे प्रमाण व्यस्त झाल्यास पत्नीचा मृत्यू पतीच्या मृत्यू अगोदर झाला तर समाजात तो वाढीव पुरुष ठरतो आणि याउलट पतीचा मृत्यू पत्नीच्या अगोदर झाला तर ती वाढीव स्त्री ठरते. समाजात स्त्री पुरुषाचे प्रमाण व्यस्त होते. तेथे वाढीव पुरुषाला दुसरा विवाह करण्याची परवानगी होती. म्हणजेच कोणतीही जात संख्यात्मक दृष्टीने आपली शक्ती टिकवून ठेवण्यासाठी त्या वाढीवर पुरुषांवर ब्रम्हचर्य न लादता त्या वाढीव पुरुषाला जातीत जखडून ठेवले जात होते. त्यातून स्त्री–पुरुष संख्येतील तफावत मिटवली जात होती परंतु वाढीव स्त्रीची विल्हेवाट कशी लावायची असा प्रश्न निर्माण होतो. हे प्रमाण सम रहावे आणि जात्यतंर्गत विवाह होत रहावेत म्हणजे जाती टिकून राहतील असे मानून त्यासाठी भारतात चार प्रमुख मार्गांचा रूढीचा पुरस्कार केला गेल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांगतात. हे चार उपाय म्हणजे 1) सती प्रथा 2) वैधव्य लादणे 3) सक्तीचे ब्रम्हचर्य 4) बाला.जरठ विवाह हे होते.

डॉ.बाबासाहेबांच्या मते प्राचीन काळात स्त्रियांचा दर्जा उच्च होता. धर्म तत्त्वज्ञान विश्वाची उत्पत्ती इ. गहन आणि जटिल विषयांवर पुरुषांच्या बरोबरीने वादविवाद करणाऱ्या स्त्रिया होत्या. उदाः जनक–सुलभा, याइवाकल्य आणि गार्गी–मैतर्या, शंकराचार्य–मैत्रयी असे वादविवाद गाजलेले आहेत. परंतु मध्ययुगात स्त्रीची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. ख्रिस्ती, जैन, इस्लाम इ. धर्मानी स्त्री समानतेला कुठलेच स्थान दिले नाही. हिंदू धर्माने स्त्रीला पापी नरकाचे द्वार म्हणून संबोधले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते मनूच स्त्रियांच्या अवनतीस जबाबदार आहे. मनुस्मृतीतील दाखल देवून त्यांनी प्रश्न उपस्थित केले व म्हटले की, मनुने स्त्रियांना काय दिले? मनुस्मृतीतील नियम 2–213 नुसार पुरुषांना

आकर्षित करून भ्रष्ट करणे हे स्त्रियांचे जीवन वैशिष्ट्य होय. 12–214 नुसार स्त्रिया जगातील मुर्ख पुरूषांनाच नव्हे तर विद्यासंपन्न पंडितांना ही वाम मार्गाला लावतात. काम, क्रोध यांचा गुलाम करतात. 9.2 नुसार कुटुंबातील पुरुषांनी आपल्या स्त्रियांना रात्रंदिवस आपल्यावर अवलंबून ठेवावे. 9.3 नुसार स्त्री स्वातंत्र्याला केव्हाही लायक नसते.

मनू घटस्फोट व स्त्रियांना मालमत्ता देण्याच्या विरोधात होता. कुटुंबातील जंगम मालमत्तेच्या हक्कासंबंधी मणुने स्त्रीला गुलामाच्या पायरीवर नेवून ठेवले. तसेच विधवेच्या संपत्तीवरील अबाधित मालकी हक्क मनु नाकारतो. डॉ.बाबासाहेबांच्या मते मनुने जे स्त्रियांना हीन लेखणारे स्वातंत्र्य नाकारणारे कायदे केले. ते ब्राम्हणी धर्माला अनुसरूनच होते. ब्राम्हणी धर्माचा उदय भारतात झाल्यानंतर ब्राम्हणांची विचारसरणी होती, तीच मनुने आपल्या कायद्यात गोवली. सामाजिक सिद्धांत म्हणून त्या सिद्धांताला धार्मिक कायद्याचे रूप देवून ते कायदे समाजामार्फत पाळले जावेत ही कामगिरी मनुने केली. कारण आर्य (ब्राम्हणी) धर्माचा आधार स्त्रिया आणि शुद्र होत. बाबासाहेबांनी विषयमतेवर आधारलेली व स्त्रीविरोधी विविध जाचक बंधने असलेल्या मनुस्मृतीचे 25 डिसेंबर 1927 रोजी जाहीर दहन केले. मनुस्मृतीचे दहन ही प्रतिकात्मक कृती होती. विषमता व अस्पृश्यता उचलून धरणारे ग्रंथ आम्ही मानीत नाही हेच यातून बाबासाहेब दाखवून देतात व ती आत्मसन्मानाची लढाई आहे हे दर्शवितात.

बाबासाहेबांच्या मते, स्त्रीमुक्तीचे आद्य प्रणेते गौतम बुद्धच आहेत. बुद्धाने प्रथम स्त्री–पुरुष समानतेचा पाया घातला. बुद्धाने स्त्रियांना परिव्रज्येची दिक्षा घेण्याचा अधिकार मान्य केला. त्यामुळे पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना ज्ञानार्जन करता येवू लागले आणि दुसरे म्हणजे स्त्रियांचे सुप्त अवस्थेतील अध्यात्मिक तेज व्यक्त होऊ शकले. तसेच समाजात स्त्रीला सन्मानाचे आणि प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करून दिले. त्यामुळेच डॉ.बाबासाहेबांनी सर्व धर्माच्या चिकित्सेनंतर समतेवर आधारलेल्या बौद्ध धर्माचीच निवड केली.

**अस्पृश्य स्त्रियांमध्ये जाणीव जागृती**

बाबासाहेबांनी प्रत्यक्ष सामाजिक कार्यातील सुरूवात केल्यानंतर वेळोवेळी अस्पृश्य दलित स्त्रियांना आत्मविस्मृती होऊ न देण्याची काळजी घ्या. म्हणून वेळोवेळी सांगितले. पुरुषांच्या खांद्याला खांदा देवून लढण्याची प्रेरणा दिली. दैनंदिन जीवनातील सामान्य वाटणाऱ्या बाबींकडे लक्ष पुरविण्यास सांगितले. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला व पुरुषांना जशी शिक्षणाची आवश्यकता आहे तसेच स्त्रियांना सुद्धा शिक्षण आवश्यक आहे. डॉ.बाबासाहेबांनी दलितांना इतर महाविद्यालयात प्रवेश मिळत नाही म्हणून इ.स.8 जुलै 1945 साली पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेद्वारे मुंबईला सिद्धार्थ कॉलेज तर औरंगाबादला मिलिंद महाविद्यालय काढून अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय केली. यात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांही शिक्षण घेत होत्या.

बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक कार्यातून अस्पृश्य स्त्रिया जागृत होवू लागल्या आणि संघर्षही करू लागल्या. डॉ.बाबासाहेबांच्या सामाजिक संघर्षाची तीव्रता वाढत होती. त्याप्रमाणे स्त्रियांचा मोठा सहभाग वाढत होता. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह असो, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह असो स्त्रियांच्या उत्स्फूर्त सहभागाचे श्रेय बाबासाहेबांकडेच जाते. राजकीय चळवळीत समग्र व्यवस्था परिवर्तनाचा आशय घेवून भारतातील अस्पृश्य महिला संघटीत झाल्या त्या डॉ.बाबासाहेबांच्याच नेतृत्वाखाली!

**राज्यघटना आणि स्त्री–पुरुष समानता**

अस्पृश्य व स्त्रियांना विषमतेची, अन्यायाची वागणूक प्रदान करणारा मनृस्मृतीचा कायदा बाबासाहेबांना बदलायचा होता. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जेव्हा त्यांना राज्यघटना तयार करण्याची संधी मिळाली तेव्हा त्यांनी स्त्रियांनी किमान स्वातंत्र्य, समता व कायदेशीर संरक्षण मिळवून देण्याचा प्रयत्न केला आणि प्रत्यक्ष राज्यघटनेत तशी तरतूद केली. कलम–14 नुसार भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान असतील. कलम–15 नुसार धर्माच्या आधारे भेदभाव करण्याला प्रतिबंध करण्यात आला आहे. यामध्ये जाती, धर्म, लिंग, जन्मस्थान या आधारे कोणत्याही व्यक्ती कोणत्याही ठिकाणी स्थायिक होण्याचे, कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, सार्वजनिक उद्यान, विहीर, नदी इ. ठिकाणी जाण्यासाठी स्वातंत्र्य देण्यात आले. कलम–16 नुसार राज्याच्या नियंत्रणाखाली कोणत्याही पदावरील सेवायोजना किंवा नियुक्ती या संबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल. तसेच राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वातील

39 व्या कलमात पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतनाची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच 42 व्या कलमात स्त्रियांसाठी प्रसुती सहाय्याची तरतूद केलेली आहे. 1928 मध्ये मुंबई विधानपरिषदेत कामगार महिलांना प्रसुती रजा देण्याच्या बिलावर आपले विचार मांडताना ते म्हणतात की, ''महिलांना प्रसुती रजा देणे राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. महिलांचा प्रसुती रजा हा हक्क आहे. जो त्यांना मिळालाच पाहिजे.'' अशा रितीने त्यांनी स्त्रियांचा देखील त्यांच्या नैसर्गिक परिस्थितीनुसार विचार केलेला आहे. तसेच स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समानतेचे वागवावे यासाठी कायद्याच्या चौकटीत आपल्या सुधारणा बनवून त्यांनी स्त्रियांसाठी मजबूत आधार निर्माण केला.

**स्त्री स्वातंत्र्य आणि हिंदू कोड बिलः**

मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून राज्यघटना तयार करीत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताचे पहिले विधीमंत्री होते. विधीमंत्री या नात्याने ते हिंदू कोड बिल (हिंदू संहिता विधेयक) तयार करीत होते. मनुप्रणीत स्त्री दुय्यमतेचे निर्बंध नष्ट करण्यासाठी डॉ.बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाचा आग्रह धरला. हिंदू कोड बिल 9 भागांत 139 कलमांत आणि 7 परिशिष्टांत सामावलेले होते. हिंदू कोड बिलातील तरतुदी पुढीलप्रमाणे होत्या. 1) आंतरजातीय विवाहास मान्यता यामुळे जातीची उतरंड मोडण्यासाठी नव्हे तर किमान ढिली करण्यासाठी उपयुक्त ठरू शकेल असा त्यांचा त्यामागील कयास होता. 2) घटस्फोटाचा अधिकार 3) स्त्री वारसातील भेदभाव नष्ट करावा 4) पोटगीची तरतूद 5) निर्वाहाबद्दल तरतूद 6) एक पत्नीत्वावर भर 7) दत्तक ग्रहणाची नोंदणी अनिवार्य करण्यात यावी. स्त्रीला दत्तक घेण्याचा अधिकार 8) हुंड्याच्या रक्कमेवर स्त्री अधिकार 9) स्त्री धनाच्या वारशाविषयी स्पष्टीकरण.

पुरुषसत्ताक ब्राम्हणी कायद्यातून मौखिक कायद्यातून पुरुषसत्ताक जातीपंचायतीच्या कायद्यातून स्त्रियांची मुक्ती झाली पाहिजे अशीच त्यांची भूमिका होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, हिंदू कोड बिल ही एक महत्त्वपूर्ण घटना होती व ती देशातील अधिवेशनात विचारात घेतली नव्हती. एवढेच नव्हे तर पार्लमेंटमध्ये यापूर्वीही येणाऱ्या कोणत्याही कायद्याची बरोबरी हिंदू कोड बिलाबरोबर करता येणार नाही इतके त्याचे महत्त्व आहे. बाबासाहेबांनी परिश्रमपूर्वक तयार केलेले हिंदू कोड बिल तत्कालीन राज्यकर्ता वर्गाने सत्तेसाठी पास करण्यापासून माघार घेतली. तेव्हा बाबासाहेबांनी विधीमंत्री पदाचा राजीनामा देऊन जणू मनुच्या धर्मगादीलाच ठोकरले; पण नंतर खंडीत स्वरूपात का होईना हिंदू कोड बिल पास करावे लागले. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय परिश्रमपूर्वक तयार केलेल्यो हिंदू कोड बिलाच्या तरतुदी 1955 पासून कायदे म्हणून अस्तित्वात आल्या. हा बाबासाहेबांच्या विचार कार्याचाच विजय म्हणावा लागेल. हिंदू स्त्रियांच्या कौटुंबिक जीवनातील दर्जा उंचावणारे हे चार कायदे 1) हिंदू विवाह कायदा–1955 2) हिंदू वारसा कायदा–1956 3) हिंदू अज्ञान व पालकत्वाचा कायदा–1956 4) हिंदू दत्तक आणि पोटगी कायदा–1956 असे होते. जे 1955 ते 1956 मध्ये पारीत झाले.

**बौद्ध धर्मात प्रवेशः**

इ.स.1935 मध्ये येवले येथे धर्मांतराची घोषणा केल्यानंतर ज्या धर्मात अस्पृश्यांना समता मिळेल अशा धर्माचा शोध घेण्यासाठी सतत 21 वर्षे विविध धर्मांचा त्यांनी अभ्यास केला व शेवटी 'प्रज्ञा, शील, करूणा व स्वातंत्र्य, समता व बंधुता मानणाऱ्या बुद्धीप्रामाण्यवादी विज्ञाननिष्ठ, मानवतावादी बौद्ध धम्माचा स्वीकार 1956 साली केला. बौद्ध धर्मात स्त्रीला अपेक्षित असणारी समानता होती. त्यामुळे स्त्रीच्या दृष्टीने बौद्ध धर्मामुळे पुर्वीचे दलितपण नष्ट झाले. पुर्वीची मरगळ गेली तर स्वावलंबी बनून स्वाभिमानाने जगणारी अशी समर्थ स्त्री बाबासाहेबांनी घडविली. या देशातील देवदासी या अमानुष प्रथेविरुद्ध आवाज उठविला तो फुले व बाबासाहेबांनीच. स्त्रिच्या समानतेवर गदा आणून त्यांना सतत मातृत्व बहाल करणाऱ्या पुरुषांना थोडी तरी समज यावी, या देशाच्या प्रगतीत अडसर ठरणारी लोकसंख्या वाढू नये, स्त्रीचे दुय्यमत्व नष्ट होवून तिला या समाजात सन्मानाने जगावे यावे, ती आनंदी आणि निरोगी रहावी यासाठी देशाला कुटुंब नियोजनाची अत्यंत आवश्यकता आहे. हे भारतात आवर्जून सांगणारे बाबासाहेब हे एकमेव राजकीय पुरुष होते. साठ–सत्तर वर्षांपूर्वी ज्या विचारांचा त्यांनी पाठपुरावा केला होता तो विचार आज भारताच्या राष्ट्रीय हिताचा विचार म्हणून टी.व्ही. पासून ते गावाच्या भिंतीवर झळकत आहे. हा बाबासाहेबांच्या विचारकार्याचाच विजय होय. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक कार्य हे दलित स्त्रीपुरतेच मर्यादित नाही तर ते या देशातील तमाम हिंदू स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य आहे. आजची स्त्री ही बाबासाहेबांच्या विचारांचा

वारसा घेऊन वाटचाल करत आहे. तिने सर्व क्षेत्र आपल्या हुशारीने व बुद्धीने काबीज केली आहेत. बाबासाहेब म्हणतात, स्त्रियांनी राजकारणात हिरीरीने भाग घेतल्यास एखाद्या राष्ट्रउद्धारक स्त्रीचा उदय होईल हे बाबासाहेबांचे स्वप्न खरे होताना दिसून येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये 33 टक्के आरक्षण होते ते आता 50 टक्के करण्यात आले आहे. स्त्रियांच्या स्वावलंबनासाठी जगात होत असलेल्या प्रयत्नांचे हे फार मोठे यश आहे. यातूनच राजकीय क्षेत्रात स्त्रियांना नवीन संधी निर्माण होत आहे. राजकीय क्षेत्रात विविध स्त्रिया आपले योगदान देत आहेत. राजकारण, समाजकारण, साहित्य यात स्त्री आगेकूच करत आहे. असामान्य वाटणाऱ्या पदापर्यंत स्त्रियांनी धडक मारली आहे. हे सर्व बाबासाहेबांच्या संविधानाचा व हिंदू कोड बिलाचा परिणाम आहे.

परंतु आज मोठ्या प्रमाणात स्त्री–भ्रूण हत्या, बलात्कार, हुंडाबळी इत्यादी स्त्रीविषयक समस्या भेडसावत आहेत. त्यासाठी आता गरज आहे सर्व समाजातील स्त्रियांना संघटित करून लढा दिला पाहिजे. स्त्री वर्गाने कोणत्याही पुरुषी अत्याचाराला बळी न पडता बाबासाहेबांनी त्यांना दिलेले स्त्रीसुरक्षा विषयक कायद्याचे शस्त्र होती घेवून समर्थपणे लढा दिला पाहिजे. स्वतःच्या नवनवीन संघटना निर्माण करून बाबासाहेबांना स्त्री स्वातंत्र्याची जी तळमळ होती तिला प्रामाणिक राहून स्त्रियांनी एकदिलाने पुढे यायला पाहिजे. तेव्हाच स्त्री अत्याचाराला लगाम बसू शकेल.

बाबासाहेबांनी दिलेले शिक्षणाचे अस्त्र, स्त्रीचे वैवाहिक आणि कौटुंबिक जीवन सुखकर आणि सुकर व्हावे म्हणून आणलेले हिंदू कोड बिल, स्त्रीला घराबाहेरील कार्यक्षेत्रात उत्तुंग यश मिळविणे शक्य व्हावे म्हणून पुढे आणलेला कुटुंब नियोजनाचा विचार आणि सर्व घरातील स्त्रियांची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी स्त्री जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे प्रश्न चर्चेत घेऊन खऱ्या अर्थाने आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीला दिशा ठरविण्यास उपयुक्त ठरेल असे दिग्दर्शन केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे स्त्रीमुक्तीचा जाहीरनामा ठरला आहे.

महात्मा फुलेंचा 'सार्वजनिक सत्यधर्म' आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा 'बुद्धधम्म' या दोहोंच्या मिश्रणातून मानव मुक्तीचे व स्त्रीमुक्तीचे तत्त्वज्ञान अस्तित्वात आल्याचे दिसते. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील दुर्बल बनविल्या गेलेल्या स्त्रियांनाच प्रथम जागृत केले. त्यांना आपल्या अधिकारासाठी लढा द्यायला शिकविले. बाबासाहेबांनी बुद्ध धम्माच्या रूपाने विनय व शीलतेचा आदर्श दिला. शारीरिक शक्तीपेक्षा मनाची शक्ती प्रबळ करायला 'शिक्षणच' महत्त्वाचे आहे व शिक्षणाबरोबर सर्व समाजाने एकसंघ होणे महत्त्वाचे आहे. बाबासाहेबांनी दिलेल्या धम्माचरणाशिवाय वैचारिक आदर्श निर्माण होत नाही. आंबेडकरी विचारधारेत जगणारी एक जरी स्त्री एका कुटुंबात निर्माण झाली तर त्या कुटुंबाचा संपूर्ण कायापालट होतो. आज देशाला फुले–आंबेडकरांच्या विचारांची गरज आहे. या विचारांशिवाय स्त्री प्रगती नाही व स्त्री प्रगतीशिवाय देशाची प्रगती नाही.

**संदर्भ**

1)खैरमोडे चांगदेव भगवान (ऑगस्ट 2000) डॉ.भीमराव आंबेडकर, खंड 10, कालखंड 1947 ते 1952, सुगावा प्रकाशन, पुणे
2)आंबेडकर भीमराव (प्रथमावृत्ती 1951) हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती, नाग–नालंदा प्रकाशन, विशालनगर जि.सांगली
3)कांबळे बी.सी. (6 डिसेंबर 2014) हिंदूत्व आहे तरी काय?, नाग–नालंदा प्रकाशन, विशालनगर जि.सांगली
4)श्रावस्ती दीपा (14 एप्रिल 2015) स्त्री स्वातंत्र्य आणि बुद्ध–फुले–आंबेडकर, नाग–नालंदा प्रकाशन, विशालनगर जि.सांगली
5)सोनवणे सुहास (26 जानेवारी 2013) बहुआयामी, अनुभव अक्षरधन प्रकाशन, मुंबई
6)मोरे दिनेश (22 ऑक्टो. 2005) स्त्रियांचा महान उद्धारक बुद्ध, नाग–नालंदा प्रकाशन, विशालनगर जि.सांगली
7)लुलेकर प्रल्हाद (2012), 'अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा', सायन पब्लिकेशन्स प्रा.लि. पुणे
8)लांजेवार ज्योती (फेब्रुवारी 2012) फुले–आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन, नागपूर
9)सबाने अरूणा (8 मार्च 2007) डॉ.आंबेडकर आणि स्त्री, आकांक्षा प्रकाशन, नागपूर
10)वाळके प्रमोद (2 ऑक्टो. 2014) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर
11)सुरवाडे विजय (नोव्हेंबर 2014) समकालीन सहकाऱ्यांच्या आठवणीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकवाङ्मय गृह, मुंबई
12)साळवे मधुकर (14एप्रिल2010) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची सामाजिक–राजकीय–धार्मिक चळवळ, नालंदा प्रकाशन, पुणे

# डॉ. आंबेडकराचा स्त्री विषयक दृष्टिकोन

प्रा. डॉ. अन्सारी एस. जी

समाजशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर

आंबेडकराचे नाव स्त्री उद्धारासाठीअग्रस्थानी घेतले जाते. आंबेडकराचा स्त्रियांच्यासबलीकरणातमहत्वाचा वाटा आहे. सबलीकरण म्हणजे महिलाचे अधिकारहक्क आणि कृती याबाबत निर्णय घेऊन त्यावर नियंत्रण ठेवून त्याचा उपयोग करुन घेऊनसमाजामध्ये प्रतिष्ठा युक्त जीवा जगणे होय. आंबेडकराची असे मत होते की, प्रत्येक व्यक्तीलास्वतःचा संपूर्ण विकास करण्याची संधी समाजाने दिली पाहिजे. त्यासाठी आंबेडकरानीस्त्री शिक्षणावर भर दिला. विकासाचा पाया शिक्षण आहे हे आंबेडकराना माहित होते.त्यासाठी त्यांनी वेळोवेळी आपल्या सभामधन शिक्षणाचे महत्व स्त्रियांना समजून सांगितले. शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा असा मूलमंत्र ही दिला.मुलींच्या उच्च शिक्षणावर त्यांनीभर दिला त्याच्यामते मुलींना दिले जाणारेउच्च शिक्षण व्यवहार उपयोग असावेजीवनालाउपयुक्त असावे. राष्ट्रपयोगी असावे. स्त्री शिक्षणाने कुटूंब समाज व देशाचाविकास होईल.

**संशोधन पद्धती-** प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम तथ्य संकलनाच्या आधारे करण्यात आले आहे .

**उद्देश** -स्त्रियांसाठी आंबेडकरांनी केलेल्या कार्याचा आढावा घेण.

मानव जीवनाच्या सर्वांगीण विकासाच्या ध्येयाने प्रेरित झालेले आंबेडकर यांचे जीवन वकार्य दुर्लक्षून पुढे जाऊ शकत नाही त्यांना स्त्री-पुरुष विषमतेची दरी सतत सलत होती. ज्या संस्कृतीने स्त्रियांना सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि आर्थिक अशा सर्व बाजूंनी गुलाम बनवले होते त्या गुलामगिरीच्या बेड्या तोडण्यासाठी स्त्रीउद्धारासाठीउन्नतीसाठी डॉ. आंबेडकरांनी निस्वार्थपणेकार्य केले. त्यांनी स्त्रियांच्या उद्धारा साठीकार्य केले पाहिजे असा संदेश समाजाला दिला. मंत्री या पदावर असतांनागिरण्या, कारखाने येथे काम करणाऱ्याकामगार स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने वेतन मिळावे, स्त्रियांना बाळंतपणासाठी रजा मिळावीपाळणाघरे असावीत स्त्रियांना मतदानाचा अधिकार असावा. या मागण्या मान्य करुन पास करून घेतल्या. आंबेडकरांनी स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने समान वेतन मिळवून दिले. म्हणून आज प्रत्येक क्षेत्रात काम करत असताना स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने वेतन मिळते. आंबेडकरांनीस्त्रियांना आर्थिक दृष्टया सक्षम करण्यासाठी अत्यंत महत्वाचेकार्य केले आहे.आंबेडकरानी स्त्रियांची दुय्यम स्थिती का आहे हे जाणून घेतले होते. त्यासाठी स्त्रियांचास्थिती परिवर्तन घडवून आणण्यासाठी हिंदू कोड बिल तयार केले. यात स्त्रिया मग त्याकोणत्याही जातीधर्माची असो ती दलित आहे हे लक्षात घेऊन त्याचा समाजातील दर्जा बदलावत्याना त्याचे अधिकार मिळावे. या दृष्टीने त्यांनी हे हिंदू कोड बिल तयार केले. हिंदू कोड बिलहे स्त्रियांना अधिकार मिळवूनदेण्याचा सक्षम करण्याचा परवाना आहे. हिंदूकोड बिलानुसार चार कायदे संमत करण्यात आले. हिंदू विवाह कायदा (1955), हिंदूवारसा हक्क कायदा 1956, अज्ञाा व पालक व कायदा 1956 व हिंदू दत्तक व पोटगीकायदा 1956. हिंदू कोड बिलानुसार हिंदू वारसा हक्क कायदा 1956 करण्यात आला हाकायदा अत्यंत क्रांतीकारक आहे. या कायदयाने घटनेतील स्त्री पुरुष समानतेचे तत्व प्रत्यक्षात आणले. आज कुटुंबाची एक घटक म्हणून हिंदू स्त्रीला कन्या पती, माता या विविधनात्यानी वारसा हक्क या कायदयाने प्राप्त झाला आता संपत्तीचा वारस फक्त मुले नसून मुलीआहेत. मुलीनाही मुला एवढा वाटा दिला आहे. मृत व्यक्तीची आई जीवंत असेल तर सून वनातवांच्या बरोबरीने एक समान वाटा तिला मिळतो. नव्या वारसा कायदयाने हिंदू स्त्रियांनापुढील हक्क दिले आहेत. 1) पूर्वीच्या हिंदू कायदात स्त्रीधन व स्त्रीची मर्यादित संपती हा प्रकार नष्ट केला आता स्त्री-पुरुष भेद नसल्यामुळे तिचे इस्टेट वरील अधिकार मर्यादितनाहीत विवाहित स्त्रीच्या व्यक्तिगत इस्टेटवर पतीचा अधिकार नाही.2) कायद्याप्रमाणे स्त्रीच्या स्वतःच्यावारसदारानांतीची इस्टेट मिळते 3)

स्त्री मृत्युपत्र वे आपल्या पश्चात आपल्या इच्छेनुसार आपल्या संपत्तीची व्यवस्था लावू शकते 4) विधवा पत्नि किंवा सून यांनी वारसा मिळाल्यानंतरजर पुनर्विवाह केला तर वारसाहक्कानेमिळालेल्या संपत्तीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ शकत नाही .5) 1956 च्या कायद्याने स्जीचे वर्तन अनैतिक आहे या कारणावरून तिचा वारसा हक्क रद्द होऊ शकत नाही . 6) आईने पुनर्विवाह केला तरी आई मुलाचे नाते संबंध नष्ट होत नाही त्यामुळे आईच्यापुनर्विवाहनेस्वतःच्यामुलाच्या इस्टेटतिल तिच्या वारसा हक्काला बाधा येत नाही 1956च्या कायद्यात हिंदू स्त्रीला माहेरच्या व सासरच्याइस्टेटीतील वारसा हक्क मिळतो .

हिंदुदतक व पोटगी कायदा :

1)दत्तक घेण्याचा व्यक्तीगत अधिकार स्त्रियांना प्रथमच देण्यात आला.

2) मुलाप्रमाणे मुलगीदत्तक घेता येते

3) विवाहित स्त्रिला स्वतःच्या नावापुढे पतीचे नाव लावण्याची कायदेशीरगरज नाही.

4) वृध्द आई-वडिलांनाही मुलांकडून व आवश्यक असेल तर मुर्लीकडूनहीपोटगी मिळू शकते.

5) विधवा मुलीला जशी वेळ प्रसंगी वडिलांकडून पोटगी मागता येते तसेचविधवा सुनेलाही सासऱ्याकडून पोटगी मागण्याचा अधिकार आहे.समाजाने स्त्रियाना जे हक्क व अधिकार नाकारले होते ते सर्व हक्क व अधिकार हिंदूकोड बिलाद्वारे आंबेडकरांनी स्त्रियानामिळवून दिले. वारसा हक्काद्वारे पित्याच्या संपत्तीत ववैधव्य आल्यास पतीच्या संपत्तीचे हक्क देण्यात आल्याने स्त्रियांच्या डोक्यावरची असुरक्षतेचीटांगती तलवार गळून पडली. पती व पिता वारल्याांतर निराधार होण्याचे दुःख संपले. आर्थिकविकासाचा पाया शिक्षण आहे. हे आंबेडकरांना माहित होते. त्यासाठी त्यानी स्त्रि शिक्षणावरभर दिला. स्त्रियां शिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्यामुळे आज स्त्रिया शिक्षण घेत आहेत.शिक्षणामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढला आहे. होणाऱ्या अन्याय, अत्याचार, शोषणाविरुध्दती आवाज उठवत आहे. तसेच शिक्षण घेतल्याने ती पुरुषाच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात कार्यकरीत आहे. वैद्यकीय, तांत्रिक, वैज्ञानिक, कला, साहित्य, व्यवसाय, वकील, प्राध्यापक,खेळ, आंतरीक्ष, राजकीय इत्यादी क्षेत्रात तीने उच्च शिखर गाठले आहे. वारसा हक्क, समानवेतन, स्वतःच्या मिळकतीवरील अधिकार मिळाल्याने ती आर्थिक दृष्टया सबळ बनली आहे.समाजात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने अधिकार प्राप्त होत आहेत. समाजातील दुय्यम दर्जातपरिवर्तन होऊन पुरुषाच्या बरोबरीने समान दर्जा मिळत आहे. या दृष्टीने आंबेडकरांचे स्त्रीसबलीकरणातील योगदान महत्वपूर्ण आहे.

संदर्भ ग्रंथ सूची-

1. आंबेडकरी चळवळीचा इतिहास, डॉ.गाढाळ, 2010 कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

2. महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास 2009, डॉ.अनिलकठारे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

3. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, धनंजय कीर 1966, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

4. शुभांगी गोटे : महिला सबलीकरण : 2004, प्रकाशक - वरद पब्लिकेशन, औरंगाबाद.

5. आधुनिक समाज में कार्यशील महिलाए : श्रीमती प्रमिला दाधिच : 2009 मार्क पब्लिशर्स, जयपूर-

-

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साहित्यविषयक सौंदर्यदृष्टी

प्रा. बालाजी गंगाराम गायकवाड
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, शरदचंद्र कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नायगाव (बा.) जि.नांदेड.४३१७०९

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भात विचार करत असताना मला त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व माझ्या डोळयासमोर आले. खरं तर बाबासाहेबांनी विविध विषयाच्या संदर्भात विपूल प्रमाणात लेखन केलेले आहे. समाजशास्त्र,मानववंशशास्त्र,इतिहास, कायदा, राज्यशास्त्र,अर्थशास्त्र अशा विविध विषयावर लेखन केलेले आहे. परंतु याठिकाणी मी बाबासाहेबांच्या आणखी एका वेगळ्या विषयाच्या संदर्भात विचार मांडणार आहे. तो म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साहित्यविषयक सौंदर्यदृष्टी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रचंड वाचनवेडे,विद्यासंपादनाची मनापासूनची आवड असणारे युगसाक्षी प्रज्ञावान असे महान व्यक्तिमत्व होते. “विधेनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगामाजी !" या उक्तीप्रमाणे डॉ. बाबासाहेबांनी विद्या संपादन केली.

यावरोवरच साहित्याचे, वाङ्मयाचे एक व्यासंगी अभ्यासक म्हणून आज जगभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनामानले जाते. विशेषत: वेद,उपनिषदे,पुराणे,महाकाव्य,बौद्ध साहित्य,बौद्ध तत्वज्ञान,लोकसाहित्य,संस्कृत साहित्य,इंग्रजी साहित्य, संत साहित्य यासारखे अनेकविध प्रकारचे साहित्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चिंतनाचे व अभ्यासाचे अतिशय आवडीचे विषय राहिलेले आहेत. किंबहुना अशा विविध प्रकारच्या साहित्याच्या संदर्भात वेळोवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली मते मांडलेली आहेत. प्रसंगी त्यावर समर्पक व तेवग्याच परखडपणे भाष्ये किंवा मतप्रतिपादन देखील केले आहे.

“A Thing of beauty is a joy forever” अशा प्रकारची एक इंग्रजी म्हण आहे. याचा अर्थ असा की,सौंदर्य ही संकल्पना व्यक्तीसापेक्ष संकल्पनाअसलेल्या आपणास दिसून येते. बाबासाहेबांच्या एकूणच जीवनाचा विचार केला असता, बाबासाहेबांचे संपूर्ण आयुष्य हे संघर्षमय असलेले आपण पाहतो. देशहित व समाज हिताची प्रचंड तळमळ असणारा प्रज्ञासूर्य म्हणजे बाबासाहेब असेच मी मानतो. ज्ञानार्जन आणि समाजहित यांनीच बाबासाहेबांचे जीवन व्यापून टाकले होते. या अखंड संघर्षमय जीवनात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना स्वत : च्या भौतिक बाबीकडे लक्ष देण्यासाठी जास्त वेळ मिळालाच नाही. किंबहुना आपल्या कुटुंबाकडे लक्ष देण्यासाठी देखील त्यांना वेळ मिळत नव्हता.डॉ बाबासाहेब आंबेडकर हे त्यांच्या आयुष्भर ज्ञानोपासना करीत असले तरी बाबासाहेबांच्या अंत:करणामध्ये कलेची, साहित्याची आस्वादकता किंवा रसिकता नव्हती असे मात्र म्हणता येत नाही.

राष्ट्रहितासाठी कार्य करणाऱ्या बाबासाहेबांना मनोरंजनासाठी फारसा वेळ मिळाला नाही हे वास्तव असले तरी,माझ्या मते,डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कला,साहित्याचे आस्वादक होते असे वाटते. कारण,बाबासाहेबांना विविध लोककला,नाटके, संगीत यांचे फार आकर्षण होते. याबाबतीत आंबेडकरी साहित्याचे अभ्यासक डॉ. गंगाधर पानतावणे लिहतात “पुण्याजवळ तळेगावी डॉ. बाबासाहेब आले असताना राजानंद गडपायले गायन पार्टीचे गायन गाण त्यांनी ऐकल.यावेळी राजानंदाच्या कवितांनी आणि गाण्याने बाबासाहेब आनंदून गेले.संबंध गाण त्यांनी मनापासून ऐकल.प्रसन्न मनाने बाबासाहेबांनी राजानंदना प्रस्तीपत्र दिल ते असे “ I was extremely pleased with the musical performances and singing by Rajanand and his party”. यावरून बाबासाहेबांना कलेची उत्तम जाण होती असे म्हणता येईल. याशिवाय वामनदादा कर्डक यांच्या कवितेचे, गाण्याचे तर बाबासाहेबांनी अनेकदा कौतुक केले आहे. कला आणि कलावंत यांच्याकडून बाबासाहेबांच्या मनांत अतीव आदर होता. या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, “संगीत आणि हास्य प्रत्येक माणसाला आवडत असते.संगीतामुळे जीवनात नवचैतन्य निर्माण होते, तसेच माणसाला पोटभर हसता आले पाहिजे.हास्य हे प्रभावी शस्त्र आहे. उपहासपूर्ण हसूनही शत्रूची रेवडी उडवीता येते. त्याला नामोहरण करता येते आणि म्हणून दुसऱ्याकडे पाहून हसणे आणि स्वत:ही पोटभर हसणे मला फार आवडते”.

वरील वेगवेगळया अवतरणावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे चांगले कलास्वादक सौंदर्यस्वादक होते याची खात्री पटल्यावाचून राहणार नाही.

**डॉ. बाबासासाहेबांची साहित्यविषयक सौंदर्यदृष्टी :**

आपण सर्वजण जाणता की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे वाडमयाचे, साहित्याचे व्यासंगी अभ्यासक होते. विशेषतः बाबासाहेबांनी मराठी साहित्याविषयी आपली वेळोवेळी मते माडलेली आहेत किंबहुना परखड भाष्यही केलेले आहे. उदा. दिनांक ०२ मे १९५४ रोजी विदर्भ साहित्य संघ, नागपूरच्या एका कार्यक्रमामंध्य डॉ. बाबसाहेब आपले साहित्यविषयक विचार मांडताना म्हणतात कि,साहित्यप्रकार कोणताही असो, त्यानं शब्धम्रताचं सिंचन केले पाहिजे तरच त्याला वाङ्मय म्हणायचं, उद्धारक साहित्य मानवयाच 'अमृतानेही पैजा जिंके' असं ज्ञानेशानी म्हटलं ते काही उगीच नाही. साहित्यिकांनी स्वतःच्या अहं सोडून सहिष्णुता व त्रतूजा धारण करावी. साधनेच्या गतीन आणि उदांत ह्र्याच्या स्पर्शान जीवन विकसित व उन्नत झालं पाहिजे तरच तो वाचस्पती , तरच तो साहित्यप्रकार असे परखड व मार्मिक अन डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्याच्या संदर्भात मांडताना दिसतात.

बाबासाहेबांच्या मते, साहित्यामध्ये प्रचंड ताकद आहे. कारण साहित्याच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय इत्यादी मूल्य जनसामान्यांच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न करता येतो. परंतु यासाठी अतिशय कसदार साहित्याची मिर्मिती झाली पाहिजे अशीही अपेक्षा बाबासाहेब व्यक्त करतात. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यकांना मोलाचा संदेश देताना म्हणतात, आपली लेखणी आपल्या प्रश्नापुरती बंदिस्त करू नका. त्यांचे दु:खं त्यांची व्यथा निट समजून घ्या आणि आपल्या साहित्याकारे त्याचं जीवन उन्नत करण्यास झटा त्यातच खरी मानवता आहे,

या वरील विधानातून बाबासाहेबांची साहित्यविषयक भूमिका लक्षात येते.याबरोबर डॉ. बाबासाहेबांनी मराठी साहित्यातील विशेषतः संत साहित्याचा अभ्यास केलेला आहे. परिवर्तन वादि चळवळीच्या पार्श्वभूमीवर संत साहित्याचे सामर्थ्य व संत साहित्याच्या मर्यादा या दोन्हीही बाबतीत डॉ. बाबासाहेबांनी संत साहित्याचे परखडपणे विश्लेषण केले आहे. विशेषतः बाबासाहेब हे आपल्या लेखनामध्ये संतांच्या वचनांचा वापर करीत. असत. बाबासाहेबांनी आपल्या मूकनायक, बहिष्क्रत भारत या सारख्या वर्तमानपत्रीय लेखनामध्येसुद्धा संतवचनाचा वापर केलेला दिसून येतो.आपणास असं म्हणता येईल की,बाबासाहेब हे संत साहित्याचे व्यासंगी आहेत. संत साहित्याचे रसिक व आस्वादक आहेत. बाबसाहेब केवळ मनोरंजनासाठी संत साहित्य अभ्यासात नव्हते तर त्यामागे ज्ञानार्जन ही भावना होती हे आपण याठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. संत साहित्याचा बाबासाहेबांनी गौरव केलेला असला तरी अनेकवेळा संत साहित्याच्या मर्यादा देखील बाबासाहेबांनी सांगितल्या आहेत. या बाबतीत डॉ. आंबेडकर म्हणतात सोळाव्या शतकात साधुसंतांनी सत्यशोधकी कुऱ्हाडीचे घाव कितीतरी घातले, परंतु अस्पृश्यता रुपी फोकावलेला वृक्ष त्यांच्या हातून तोडला गेला नाहीच पण त्यांच्याने पान सुद्धा त्यांच्याने हलले नाही". याप्रकारे संतांच्या साहित्यिक कार्यावर आपले परखड मत बाबासाहेबांनी नोंदवले आहे.

एकंदरीत वरील सर्व विवेचनावरून मला याठिकाणी एवढंच म्हणावयाचे आहेकी, इतरांच्या तुलनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सौंदर्याची संकल्पना आणि साहित्याविषयक विचारसौदर्याची संकल्पना ही वैशिष्ठ्यपूर्ण आणि अतिशय उच्च दर्जाची होती. या सौदर्यदृष्ठीतूनच बाबासाहेबांच्या साहित्यविषयक विचारसौदर्याचा विकास झाला आहे असे म्हटल्यास काही वावगे ठरणार नाही.

**संदर्भ :**


१) डॉ. गंगाधर पानतावणे – पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर,
२) डॉ. प्रल्हाद लुलेकर –दलित्तेरासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा,सायन प्रकाशन, पुणे.
३) धनंजय कीर – डॉ. बाबसाहेब आंबेडकर.
४) डॉ. गंगाधर पानतावणे – वादळाचे वंशज.
५) विविध वर्तमानपत्रीय लेखन.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार

**प्रा. डॉ. शिंदे शाम भागवत**
(राज्यशास्त्र विभागप्रमुख)
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

**प्रस्तावना**

राजकीय समाजशास्त्र ही एक समाजशास्त्राची शाखा असून तिच्यात राज्य व समाज यांच्यातील आंतरक्रिया व आंतरसंबंध यांचा समाजशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास केला जातो. ही शाखा राजकीय बाबींचा समाजाच्या संदर्भात अभ्यास करते. डॉ. आंबेडकरांनीही अनेक राजकीय बाबींचा उदा. राज्य, शासन, कायदा, शक्ती इत्यादींचा समाजाच्या संदर्भात अभ्यास केलेला आहे. त्यांच्या यासंदर्भातील विचाराची दोन वैशिष्ट्ये आहेत. (१) त्यांचे राजकीय विचार हे कोणत्या तरी एकाच ग्रंथात मांडलेले आढळत नाहीत. तर ते वेगवेगळ्या ग्रंथात, निबंधात वा लेखात व भाषणांत विखूरलेल्या स्वरूपात आहेत. (२) त्यांच्या राजकीय विचारात बदलत्या परिस्थितीनुसार बदल झालेला दिसतो. कारण एखादे विशिष्ट तत्त्व स्वीकारले की, कोणत्याही परिस्थितीत त्याचा पाठपुरावा केलाच पाहिजे हे त्यांना मान्य नव्हते. त्याने १९३८ मध्येच म्हटले होते की, कोणत्याही परिस्थितीत एखाद्या विशिष्ट तत्त्वाचा वा आदर्शाचा पाठपुरावा केलाच वा आदर्शाचेही आशय बदलले पाहिजेत. ही दोन वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्यांचे राजकीय विचार अभ्यासणे उचित ठरेल.

**लोकशाही (Democracy):**

डॉ. आंबेडकरांनी राज्यसंस्थेप्रमाणेच शासनसंस्थेविषयीही आपले विचार मांडलेले आहेत. शासनाच्या विविध प्रकारांपैकी लोकशाही या प्रकारची त्यांनी सविस्तर चर्चा केलेली आढळते. तथापि, लोकशाही शासनव्यवस्था स्वीकारण्याच्या संदर्भात त्यांच्या विचारात वेळोवेळी पुढीलप्रमाणे परिवर्तन झालेले दिसते. (१) अमेरिका व इंग्लड यासारख्या उदारमतवादी लोकशाही राष्ट्रांत शिक्षणासाठी काही वर्षे राहिल्याने आणि उदारमतवादी पाश्चात्त्य विचारवंतांच्या विचारांचे सखोल अध्ययन केल्यानेही त्यांना लोकशाहीचे आकर्षण वाटू लागले होते. तथापि, (२) पुढे त्यांनी १९३८ मध्ये तेंव्हाच्या देशकाल परिस्थितीत लोकशाही हा अनुचित शासन प्रकार ठरेल असे म्हटलेले आढळते. (३) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यघटनेच्या निर्मितीच्या प्रक्रियेत मात्र त्यांनी आपले वरील मत बदलून संसदीय लोकशाहीचे समर्थन केलेले आढळते. (४) १९४७ नंतर मात्र त्यांना संसदीय लोकशाहीपेक्षा अध्यक्षीय लोकशाहीच भारतासाठी अधिक उचित ठरेल असे वाटू लागले. लोकशाहीच्या संदर्भातील त्यांच्या विचारातील ह्या बदलांचे पुढे आपण सविस्तर विवेचन करणार आहोत. तत्पूर्वी, त्यांनी लोकशाहीची केलेली व्याख्या व लोकशाहीसाठी आवश्यक मानलेल्या गोष्टी थोडक्यात समजावून घेऊ या.

- **लोकशाहीची व्याख्या : लोकशाही हा शासनाचा असा एक प्रकार व पद्धती आहे,की, जिच्याद्वारे लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात रक्तपाताशिवाय क्रांतिकारी बदल घडवून आणले जातात.** (Democracy is a form and method of government whereby revolutionary changes in the economic and social life of the people are brought without bloodshed.)
- **लोकशाहीसाठी आवश्यक गोष्टी :** डॉ. आंबेडकर म्हणतात की, लोकशाही हे एक रोपटे असून ते प्रत्येक ठिकाणी वाढेलच असे नाही. अमेरिका व इंग्लंडमध्ये लोकशाही आहे. फ्रान्समध्येही ती थोडी आहे. पण कोरिया, इजिप्त या देशांतील लोकशाही नष्ट झाली आहे. इंग्लंडमध्येही १८३२ नंतर लोकशाहीत बदल होत आलेले आहेत. यावरून हे लक्षात येते की, लोकशाही आपले स्वरूप व उद्देश बदलत राहते. एवढेच नव्हे तर, एकाच देशातही ती एकसारखी राहू शकत नाही. आधुनिक लोकशाही ही अथेन्समधील लोकशाहीपेक्षा भिन्न आहे. अनियंत्रित राजाचे अधिकार कमी करणे हे एकच आधुनिक लोकशाहीचे ध्येय नसून लोकांचे कल्याण साधणे हे तिचे ध्येय

आहे. लोकशाहीचे हे ध्येय साध्य होण्यासाठी लोकशाहीचे जतन झाले पाहिजे व त्यासाठी पुढील गोष्टी आवश्यक ठरतात.

१) **वर्गभेद नकोत** : समाजात वर्गभेद नसावेत म्हणजेच समता असावी. विशिष्ट अधिकार असलेला एक वर्ग व शोषित-पीडित दबलेला दुसरा वर्ग असे वर्ग नसावेत. समाजात वर्गविग्रह असेल तर रक्तमय क्रांती होईल. "दुभंगलेले घर एकटे उभे राहू शकत नाही"हेअब्राहम लिंकनचे मत नमूद करून डॉ. आंबेडकर म्हणतात की, समाजात विविध वर्गात भेद असणे ही गोष्ट लोकशाहीसाठी मोठा अडथळा ठरते. म्हणून वर्गभेद नसावेत.

२) **विरोधी पक्ष हवाच** : मर्यादित सत्तेचा एक भाग म्हणून डॉ. आंबेडकर हे संतुलित द्विपक्षपद्धतीचा पुरस्कार करतात. ते म्हणतात, स्वातंत्र्य टिकण्यासाठी धैर्य लागते व हे धैर्य राजकीय पक्षाच्या रूपाने ऐक्य निर्माण करण्यातून उदयास येते. राज्यकारभार करण्यासाठी राजकीय पक्ष असावाच लागतो. मात्र शासनास हुकूमशाहीपासून दूर ठेवण्यासाठी दोन राजकीय पक्ष असावेत. लोकशाहीत दोन तुल्यबळ पक्ष असावेत. एक सत्तारूढ झाल्यावर दुसरा त्याच्यावर अंकुश ठेवेल. विरोधी पक्षामुळे सरकार कोठे चुकते हे कळते. म्हणून असा अंकुश ठेवणारा विरोधी पक्ष नसेल तर ती लोकशाही व्यवस्था नसेल. एकपक्षीय शासन हे जुलूमशाहीस आंमत्रण देणारे असते, म्हणून द्विपक्ष पद्धती हवी. थोडक्यात, लोकशाही शासनव्यवस्थेत विरोधी पक्ष हवा असे डॉ. आंबेडकर म्हणतात. इंग्लंडमध्ये विरोधी पक्षास मोठा मानसन्मान देतात, विरोधी पक्षनेत्यास वेतनही देतात. भारतात मात्र विरोधी पक्षास तुच्छ लेखतात ही स्थिती बदलली पाहिजे असे आंबेडकर म्हणतात.

३) **समानता** : लोकशाही राज्यव्यवस्थेत व कायदाव्यवस्थेत समानता हवी. सर्वांना समान वागणूक मिळावी. भारतात मंत्री स्वपक्षाच्या सदस्यांची कामे पटकन करतात. मात्र इतरांच्या कामाकडे दुर्लक्ष करतात. राज्यव्यवस्थेतील हा भेदभाव व पक्षपात नष्ट झाला पाहिजे, असे डॉ. आंबेडकर म्हणतात. कायद्यासमोर सर्वांना समान मानावे. भारतात सत्तारूढ पक्षाच्या सदस्यावर एखादा खटला चालू असेल तर तो काढून टाकण्याचा प्रयत्न शासन करते. अशा घटनामुळे मोठा गोंधळ होतो. म्हणून अशा घटना घडू नयेत असे आंबेडकर म्हणतात. अमेरिकेत पूर्वी अशा घटना घडत पण त्या लोकशाहीस पोषक नसल्याने त्या बंद केल्या गेल्या. भारतातही असेच व्हावे असा त्यांचा आग्रह आहे.

४) **नीतीमत्ता** : लोकशाहीला घटनात्मक व नैतिक मूल्यांचा आधार हवा. अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीस तिसऱ्या वेळी उभारण्यास जॉर्ज वॉशिंग्टन यांनी नकार दिला होता. ते म्हणाले, दरवेळी मीच निवडणुकीस उभारलो तर घटनेतील तत्त्वांना किंमत राहणार नाही. या उदाहरणाद्वारे डॉ. आंबेडकर हे घटनात्मक व नैतिक मूल्यांची व तत्त्वांची कदर झाली पाहिजे तरच लोकशाही टिकते, असे प्रतिपादन करतात. पुढे ते म्हणतात लोकशाहीस सामाजिक नीतीमत्तेचही गरज असते. मात्र, भारतात सामाजिक नीतीमत्ता पार लयास गेलेली आहे. येथे सामाजिक जीवनात कायद्याचा हस्तक्षेप नको असे लोकांना वाटते. ही गोष्ट लोकशाहीस घातक ठरणारी आहे.

५) **अल्पमतवाल्यांना संरक्षण** : लोकशाहीत बहुमतास महत्त्व असते. बहुमतवाला पक्षसत्तारूढ होतो. पण बहुमतवाल्या पक्षाची अल्पमतवाल्या पक्षावर हुकूमशाही प्रस्थापित हाता कामा नये. उलट आपण सुरक्षित आहोत असे अल्पमतवाल्यांना वाटले पाहिजे असे डॉ. आंबेडकर म्हणतात. ते म्हणतात, इंग्लंडमध्ये 'हाऊस ऑफ कॉमन्स' या संसदेच्या गृहात अल्पमतवाल्यांना मान असतो. त्यांना तहकुबीची सूचना मांडण्याची परवानगी स्पीकर (सभापती) देतात. भारतात मात्र अल्पमतवाल्याची कुचंबणा होते.

६) **अन्यायाचा प्रतिकार** : लोकशाही यशस्वी होण्यासाठी जनतेने अन्यायाविरूद्ध सतत जागरूक असावे असे आंबेडकर म्हणतात. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहात आज गोरे लोकही सामील होतात कारण त्यांना अन्यायाविरूद्ध चीड आहे. भारतातही असेच घडावयास हवे. अन्यथा, अन्याय झालेले लोक अन्याय दूर करण्यासाठी क्रांतीकडे वळण्याची शक्यता असते.

**सामाजिक लोकशाही (SocialDemocracy)**

**समाजाचे लोकशाहीकरण :**

डॉ. आंबेडकर हे लोकशाहीस केवळ शासनाचा एक प्रकार मानीत नाहीत. लोकशाहीची त्यांची संकल्पना याहून अधिक व्यापक आहे. ते म्हणतात, लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे, जीवन जगण्याचा मार्ग आहे. केवळ लोकशाही शासनव्यवस्था प्रस्थापित केल्याने स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारलेली समाजरचना प्रस्थापित होणार नाही. त्यासाठी समाजाचेही लोकशाहीकरण झाले पाहिजे. लोकशाही हा समाजाने स्वीकारलेला जीवनमार्ग बनला पाहिजे. मानवी हक्क व स्वातंत्र्ये अबाधित ठेवण्यासाठी त्यांना सामाजिक व नैतिक अशा विवेकी शक्तीचा पाठिंबा असला पाहिजे. तो जर नसेल तर हक्क व स्वातंत्र्याचे रक्षण ना राज्यघटना करेल ना कायदा व न्यायव्यवस्था करेल. अशा विवेकशक्तीच्या अभावी अमेरिकेतील निग्रो, जर्मनीतील ज्यू व भारतातील अस्पृश्य यांचे हक्क असून नसल्यासारखे ठरलेले आहेत. ते पुढे म्हणतात, राजकीय प्रगती , होण्यासाठी प्रथम समाज सुधारला पाहिजे. तो जर सुधारलेला नसेल तर तो शासनपेक्षा अधिक जुलुमी ठरू शकतो. कारण तो शासनाहून जास्त छळ करू शकतो. कारण अशा समाजाकडे छळाची साधने वा शक्ती अधिक असते व छळाची व्याप्तीही अधिक असते. थोडक्यात डॉ. आंबेडकरांच्या मते शासनापेक्षा समाजाची शक्ती व सत्ता ही अधिक जाचक असते. म्हणून व्यक्तिहितासाठी प्रथम समाजाचे लोकशाहीकरण झाले पाहिजे. म्हणजे समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, मानवता इ. मूल्यांवर समाजव्यवस्था आधारलेली असली पाहिजे. असे हे लोकशाहीकरण समाजाच्या रूढीपंरपरातून व दैनंदिन व्यवहारातून अभिव्यक्त झाले पाहिजे; तरच लोकशाही यशस्वी होईल.

**भारतात सामाजिक लोकशाही :**

भारताच्या संदर्भात सामाजिक लोकशाही प्रस्थापित होणे किती आवश्यक आहे हे पटवून देताना, घटनापरिषदेत घटनेचा मसूदा मंजूर झाल्यानंतरच्या आपल्या भाषणात डॉ. आंबेडकर म्हणतात, "राजकीय लोकशाहीने आपण संतुष्ट होता कामा नये राजकीय लोकशाहीचे सामाजिक व आर्थिक लोकशाहीत रूपांतर केले पाहिजे. अन्यथा राजकीय लोकशाही टिकणार नाही. कारण लोकशाही ही स्वातंत्र्य, समता व बंधुता यांची अभंग अशी एक मूर्ती आहे. जर सामाजिक समता नसेल तर स्वातंत्र्याचा अर्थ मूठभर लोकांचे राज्य असा अर्थ होईल. जर समता असेल पण स्वातंत्र्य नसेल तर ती समता व्यक्तीच्या जीवनातील स्वयंपूर्णता नष्ट करेल. समता व स्वातंत्र्य दोन्हीही नसेल तर समाजात बंधुभाव निर्माण होणार नाही." ते पुढे म्हणतात, “२६ जानेवारी १९५० रोजी आपणास राजकीय समता प्राप्त होईल पण आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात कमालीची विषमता असणारच आहे. ही विषमता आपण त्वरीत नष्ट न केल्यास विषमतेने त्रासलेले लोक राजकीय लोकशाही उलथून टाकल्याशिवाय राहणार नाहीत.' थोडक्यात, डॉ. आंबेडकरांच्या मते, लोकशाही व्यवस्था ही राजकीय जीवनाबरोबरच आर्थिक व सामाजिक जीवनातही प्रस्थापित झाली पाहिजे. यालाच ते सामाजिक लोकशाही म्हणतात.

**विभूतीपूजा संपविणे:**

भारतात लोकशाही रूजण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी विभूतीपूजा (Hero-Worship) नष्ट करावी लागेल असा इशारा दिलेला आहे. ते म्हणतात, राष्ट्राची आयुष्यभर सेवा करणाऱ्या थोर व्यक्तीविषयी अवश्य कृतज्ञता बाळगा. पण कृतज्ञतेला कांही मर्यादा असते. आपल्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कोणतेही राष्ट्र कृतज्ञ राहू शकत नाही. इतर देशांपेक्षा भारतात ही सावधगिरी बाळगणे अत्यावश्यक आहे. कारण भारतात विभूतीपूजेचा राजकारणावर मोठा परिणाम होतो. अध्यात्मात भक्ती वा विभूतीपूजा हा आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असेल पण राजकारणात तो अधोगतीचा व अंती हुकूमशाहीचा निश्चित मार्ग आहे म्हणून समजावे. विभूतीपुजेमुळे लोक परावलंबी बनतात व स्वकर्तव्याविषयी उदासीन बनतात.

अशाप्रकारे, डॉ. आंबेडकर लोकशाहीस केवळ शासनाचा एक प्रकार न मानता, ती राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवन कसे असावे याविषयीची एक व्यवस्था आहे, असे मानतात.

**डॉ. आंबेडकरांच्या लोकशाहीविषयीच्या विचारातील बदल :**

प्रारंभी नमूद केल्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या लोकशाहीविषयीच्या विचारात वेळोवेळी बदल झालेले आहेत. ते बदल पुढीलप्रमाणे :

१) **सर्वोत्तम शासनप्रकार नव्हे :** डॉ. आंबेडकर हे लोकशाहीस त्रिकालबाधित सर्वोत्तमशासनपकार मानीत नसल्याचे काही उल्लेख आढळतात.१९३८ मध्ये ते म्हणाले होते की, तेव्हाच्या देशकालपरिस्थितीत तर लोकशाही हा सर्वात अनुचित शासनप्रकार ठरेल. काही काळ तरी प्रबुद्ध हुकूमशहाच्या मजबूत हातात भारताची राजकीय सूत्रे असणे गरजेचे आहे. एकाच संघटनेशी अचिकित्सपणे स्वतःला बांधून घेतलेली तत्कालीन निर्बद्ध लोकशाही ही एक मोठी व्याधी आहे, असे आंबेडकर म्हणाले होते. (संदर्भ ४ जानेवारी १९३८, टाईम्स ऑफ इंडिया) १९४३ मध्ये दिल्ली येथे कामगार चळवळीतील कार्यकर्त्यांसमोर बोलतांना ते म्हणतात की, संसदीय लोकशाही हा सर्वोत्तम शासनप्रकार नसून त्यामध्ये जनतेला स्वातंत्र्य, संपत्ती व सुखाची खात्री बाळगता येत नाही. ही लोकशाही, "करार-स्वातंत्र्याला' पावित्र्याचे आवरण चढविते व आर्थिक विषमतेकडे मात्र डोळेझाक करते. या करार स्वातंत्र्यामुळे सबळ गट उपेक्षित गटांना लुबाडू शकतात. स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी ही लोकशाही गरिबांच्या विपन्नावस्थेत जास्तीतजास्त भर घालते. अशा लोकशाहीतील स्वातंत्र्य हे समतेला गिळून टाकते.

वरील मतांवरून हे स्पष्ट होतेकी, डॉ. आंबेडकर हे लोकशाही शासन हा सर्वोत्तम प्रकार मानत नव्हते.

२) **संसदीय लोकशाहीचा स्वीकार :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यघटना निर्माण करताना मात्र, डॉ. आंबेडकरांनी संसदीय लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. मर्यादित शासनपद्धतीचा आदर्श म्हणून संसदीय लोकशाहीचे डॉ. आंबेडकरांनी समर्थन केलेले आहे. या समर्थनार्थ त्यांनी पुढील मुद्दे मांडलेले आहेत. (१) संसदीय लोकशाही शासनपद्धती व्यक्तीच्या अंगी स्वावलंबन, सर्जनशिलता, जबाबदारीची जाणीव, सहकार्य, शिस्त इ. गुणांचा परिपोष करू शकते. (२) उच्च दर्जाचे राष्ट्रीय चारित्र्य, शील, सचोटी, धैर्य इ. सदगुणांचा विकास घडवून आणू शकते. (३) समाजात आपणास सन्मानाचे स्थान आहे अशी जाणीव व्यक्तीच्या मनात जागृत करून मुक्तीचा मार्ग या शासनव्यवस्थेत खुला होतो. (४) रक्तपाताशिवाय आर्थिक-सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणण्याचा मार्ग याच व्यवस्थेत उपलब्ध असल्याने ती मानवी जीवनाच्या प्रवाही स्वरूपाशी सुसंगत ठरते.

या सर्व मुद्यांच्या आधारे डॉ. आंबेडकरांनी संसदीय लोकशाही व्यवस्था स्वीकारून ती भारतीय राज्यघटनेत प्रस्थापित केली.

३) **अध्यक्षीय लोकशाही :** १९४७ नंतर मात्र डॉ. आंबेडकरांच्या विचारात बदल होऊन त्यांना ठामपणे असे वाटू लागले की, भारतीय परिस्थितीस संसदीय लोकशाही हितकारकठरणार नाही. काही विशिष्ट परिस्थितीतच संसदीय लोकशाही कार्यक्षम ठरू शकते. शिक्षणप्रसार, लोकजागृती व वर्गभेदाचा अभाव या गोष्टी लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आवश्यक असतात. मात्र या गोष्टी भारतात नसल्याने सर्वमान्य सिद्धांतानुसार लोकशाही येथे कार्यान्वित होऊ शकणार नाही. युरोपात धर्मनिरपेक्ष राजकारणांची परंपरा खोलवर रूजलेली आहे. पण तेथेही लोकशाही शासन पूर्णपणे सर्वमान्य सिद्धांतानुसार कार्यान्वित होताना दिसत नाही. भारतात तर राजकारण हा एक क्रियाशील धर्म आहे असे संस्कार लोकांवर केले जातात. त्यामुळे येथे लोकशाही शासनव्यवस्था कशी कार्यक्षम ठरू शकेल असा प्रश्न डॉ. आंबेडकर उपस्थित करतात. राजकारण म्हणजे धर्म आहे, अशाप्रकारच्या संस्कारपासून अस्पृश्यांना वाचविले पाहिजे, असे आंबेडकरांना वाटते. यापरिस्थितीमुळेच भारतात बहुमत म्हणजे जातीय-धर्मीय बहुमत अशीच स्थिती असणार. परिणामी, बहुसंख्य असणाऱ्या धर्माचे

लोक धार्मिक अल्पसंख्यांक असणाऱ्यांवर सत्ता गाजवू लागतील. अशा स्थितीत संसदीय ऐवजी अध्यक्षीय लोकशाही शासनव्यवस्थाच अधिक बरी असे डॉ. आंबेडकरांचे मत बनलेले दिसून येते.

**राष्ट्रीयता, राष्ट्र आणि राष्ट्रवाद :**

डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रीयता किंवा राष्ट्रक (nationality), राष्ट्र (nation) आणि राष्ट्रवाद (nationalism) या तीन परस्परसंबंधित असलेल्या संकल्पनाविषयी विचार मांडलेले आहेत. त्यांचे हे विचार Thoughts on Pakistan तसेच Pakistan or Partition of India ह्या ग्रंथात तसेच वेगवेगळया व्याख्यानात विखूरलेल्या स्वरूपात आढळतात. त्यांच्या ह्या विचारांचे सार आपणास पुढीलप्रमाणे समजावून घेता येईल.

**राष्ट्रीयता :** डॉ. आंबेडकरांच्या मते, राष्ट्रीयत्त्व ही एक प्रकारची सामाजिक भावना आहे. ही एकत्त्वाची अशी भावना आहे की, जिच्यामुळे एखाद्या मानवी समूहातील सदस्यांना आपण परस्परांचे रक्तसंबंधी आहोत असे वाटते. अशी ही राष्ट्रीयत्वाची भावना दुधारी स्वरूपाची आहे. कारण तिच्यामुळे एका समूहातील सदस्यांत ऐक्य प्रस्थापित होते तर इतर समूहातील सदस्यांविषयी परकेपणाची जाणीव पण निर्माण होते. ते पुढे म्हणतात, राष्ट्रीयत्त्वाची भावना एका समूहातील स्तरीकरणावर मात करते आणि त्या समूहास दुसऱ्या समूहापासून अलग करते. थोडक्यात, एखाद्या मानवी समूहातील सर्व सदस्यांमध्ये असलेली ऐक्य भावना (म्हणजे आपण सर्व एक आहोत ही भावना) म्हणजे राष्ट्रीयता (राष्ट्रक) होय, असा अर्थ डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत आहे.

**राष्ट्र :** राष्ट्रीयतेची (ऐक्याची) भावना असलेला मानवी समूह जेंव्हा विशिष्ट भूप्रदेशात एकत्रराहण्याची आकांक्षा बाळगतो तेंव्हा त्याचे राष्ट्र बनते. डॉ. आंबेडकरांच्या मते राष्ट्र या कल्पनेत दोन गोष्टी अंतर्भूत आहेत. त्यापैकी एक भूतकाळाशी तर दुसरी वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांच्याशी निगडीत असते. भूतकाळाशी निगडीत गोष्ट म्हणजे भूतकाळातील समृद्ध स्मृतींचा (आठवणींचा) वारसा होय. तर दुसरी गोष्ट म्हणजे वर्तमानाप्रमाणेच भविष्यातही एकत्र राहण्याची व आपला अविभक्त वारसा सांभाळण्याची इच्छा होय.

**राष्ट्रवाद :** डॉ. आंबेडकर म्हणतात, राष्ट्रवादात राष्ट्रक व राष्ट्र हे दोन्ही घटक असू शकतात. राष्ट्रीयतेचे राष्ट्रवादात रूपांतर होण्यासाठी दोन अटींची पूर्तता होणे आवश्यक असते.डॉ. आंबेडकरांच्या मते राष्ट्रवाद ही लोकांच्या अंतर्गत ऐक्याची (inner unity) अभिव्यक्ती आहे. तसेच ती सामाजिक सामिलीकरणाची (social assimilation) एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत लोक जात, वर्ण वा वंश, पंथ इत्यादी बाबी विचारात न घेता एकमेकात मिसळून जातात, सामील होतात. त्यामुळे त्यांच्यात सामाजिक बंधुभाव निर्माण होतो. जर हा बंधुभाव राष्ट्रामध्ये सर्वत्र पसरला / रूढ झाला तर राष्ट्रवाद हा एक परिपूर्ण असा सुसंवाद (harmony) होतो. आंबेडकरांची राष्ट्रवादाची कल्पना ही सामाजिक बंधुभावाची, तसेच ऐक्याची भावना व एकाच देशातील दबलेल्या लोकांची स्थिती सुधारण्याचा दृढ निश्चिय निर्माण करते.

**भारतातील राष्ट्रवाद :** स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ. आंबेडकर भारत हे एक राष्ट्र आहे हे मान्य करीत नव्हते. ते म्हणतात, "भारतास एक राष्ट्र मानणे हा मोठा भ्रम आहे. हजारो जातींमध्ये विभागलेला भारत नावाचा मानवी समूह एक राष्ट्र कसा बनू शकेल ? सामाजिक व मानसिकदृष्ट्या आम्ही एक राष्ट्र नाही, हे आमच्या जेवढ्या लवकर लक्षात येईल तेवढे बरे होईल. कारण त्यामुळे आम्हाला राष्ट्र बनण्याची उत्कंठा लागेल व ते कसे बनता येईल याचा आम्ही गंभीरपणे विचार करू लागू." ते म्हणतात, वर्णावर्णात, जातीजातीत, पंथापंथात विभागलेला भारत एक राष्ट्र नाही. कारण प्रत्येक वर्ण, जात व पंथ हे स्वतःस एक राष्ट्र मानते व आपल्या हितासच राष्ट्रहित मानते. ही विषम स्थिती व संकुचित दृष्टी आपणास राष्ट्र होऊ देत नाही. भारतातील राष्ट्रवादाच्या संदर्भात डॉ. आंबेडकर जातीभेदाबरोबरच पंथभेद, भाषाभेद, प्रांतभेद इत्यादींचीही चर्चा करतात. ते म्हणतात, हे सर्व भेद ही सामाजिक अरिष्टे असून त्यांनी लोकांना लहानलहान गटात विभागलेले आहे. असे हे विभाजन राष्ट्रनिर्मितीच्या मार्गातील मुख्य अडथळा आहे. हा अडथळा दूर केल्याशिवाय भारत एक राष्ट्र बनणे असंभव आहे.

**उपाययोजना :** राष्ट्रनिर्मितीसाठी डॉ. आंबेडकर पुढील उपाय सूचवितात. डॉ. आंबेडकर म्हणतात. जातीभेद वा जातियतेची भावना ही अन्य काही नसून ती लोकांत खोलवर रूजलेली संप्रदायवादाचीच भावना आहे. त्यामुळे जातियतेबरोबरच सांप्रदायिकताही नष्ट करणे आवश्यक आहे. प्रांतभेदाच्या संदर्भात ते म्हणतात, प्रांतवाद वा प्रदेशवाद हा देखील राष्ट्रनिर्मितीच्या मार्गातील अडथळा आहे. लोकांना आपल्या प्रदेशातील लोकांविषयी आत्मियता वाटते तर दुसऱ्या प्रदेशातील लोकांविषयी परकेपणा वाटतो. लोकांची ही प्रदेशनिष्ठा राष्ट्रनिष्ठेच्या आड येते. म्हणूनच भारतासारख्या अनेक प्रदेश असलेल्या देशाच्या कारभारासाठी त्यांनी संघराज्यपद्धतीऐवजी एकात्मपद्धती अधिक उपयुक्त ठरेल असे मत मांडलेले आढळते. प्रादेशिक स्वायत्तता त्यांना मान्य नव्हती. मात्र, राज्यघटनेत त्यांना संघराज्यपद्धती स्वीकारणे भाग पडले. तथापि, ते स्वीकारतांना त्यांनी आणिबाणीच्या काळात संघराज्यपद्धतीचे एकात्म पद्धतीत रूपांतर करण्याच्या तरतूदी केलेल्या आहेत. त्यामागे भारताची प्रादेशिक अखंडता, जी राष्ट्रभावनेसाठी आवश्यक आहे, टिकून रहावी हाच उद्देश आहे. राष्ट्रवादाच्या संदर्भात डॉ. आंबेडकर आर्थिक स्थितीचाही विचार करतात ते म्हणतात. देशात कांही घटक (दलित, आदिवासी, शेतमजूर इ.) हे आर्थिक दारिद्र्यात हजारो वर्षापासून खितपत पडलेले आहेत. त्यांच्या मनात राष्ट्रभावना निर्माण करण्यासाठी त्यांना दारिद्र्यातून बाहेर काढले पाहिजे. श्रीमंत व गरीब या दोन वर्गातील आर्थिक विषमतेची दरी त्यांना परस्परांपासून केवळ अलगच करीत नाही तर त्यांच्यात परस्पराविषयी परकेपणाची भावनाही निर्माण करते. म्हणून त्यांच्यात आपलेपणाची व बंधुभावाची भावना व पर्यायाने ऐक्याची भावना निर्माण करण्यासाठी आर्थिक विषमता नष्ट करण्याची गरज ते प्रतिपादन करतात. अशाप्रकारे, भारतास एक राष्ट्र बनविण्यासाठी आंबेडकर वरील उपाय सूचवितात.

**संदर्भ :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांचे राजकीय विचार - भ.द. देशपांडे
२) क्रांतीप्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर –मेश्राम योगेंद्र
३) डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान – नरेंद्र जाधव

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि सामाजिक बदल

बापूसाहेब जवळेकर
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),लातूर
डॉ. संभाजी पाटील
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),लातूर

क्रांती आणि प्रतिक्रांतीच्या संघर्षातून भारतीय इतिहास अवतीर्ण झालेला आहे. तथागत बुद्धांच्या क्रांतीपासून सुरू झालेले सामाजिक अभिसरणाचे पडसाद या भूमीत किमान पाच शतकांपर्यंत प्रभावीपणे जाणवत होते. परंतु पुन्हा एकदा या भूमीत ब्राह्मणी विचाराने उचल खाल्ली. आणि पुन्हा धर्मसंस्था, जातीसंस्था, समाजसंस्था या विषम व शोषण विचारांनी अधिक टोकदार झाल्या. बुद्धांच्यापुरोगामी क्रांतीला कडव्या सनातनी प्रतिक्रांतीने ग्रासून टाकले. परिणामी अस्पृश्य, बहिष्कृत समूहांना हक्कांपासून वंचित केले. त्यांना साधनसंपत्ती यापासूनही बेदखल केल्याने देशातील बहुसंख्य समाजाच्या वाट्याला अमानुषता, शोषण, मानखंडना आणि तिरस्कार आला. त्यामुळे हा शोषित समाज निसत्व आणि अस्तित्वहीन बनला. परिणामी अडीच-तीन हजार वर्षे झाली याचे भयंकर विपरीत परिणाम भारतीय बहुसंख्य समाज भोगीत आला आहे.परंतु आपला वर्तमानकाळ हा पूर्वजन्मीचं फळ आहे हे भारतीय मनात रूजविण्यात येथील धर्मसंस्था यशस्वी झाली आहे. त्यामुळे आज दारिद्र्य, दुःख हीच त्याची ओळख बनली आहे. परंपरेचं ओझं तो प्राक्तन, नशिबाचं फळ म्हणून सोसू लागला. आत्मभान, आत्मतेज या स्वत्वाची ओळख करून देणाऱ्या गुणांना तो पारखा बनला. बहुसंख्य असलेल्या समूहांपैकी काहींच्या वाट्याला दुजाभाव आला. तर काहींना अस्पृश्य म्हणून बहिष्कृत केले. परंपरेच्या चक्रव्युहात रुतलेला बहुसंख्य समाज आपलं सर्वस्व गमावून बसला. तो शुष्क, निर्विकार आणि निस्तेज बनला. निस्तेज झालेल्या मानवी समूहांमध्ये स्वत्व आणि आत्मसन्मान जागृत करणे सनातनी व्यवस्थेने फार कठीण बनविले. परंपरेच्या साखळदंडाने बहुसंख्य समाजाच्या हालचालीस प्रतिबंद केला.

तथागत बुद्धांच्या क्रांतीला प्रतिक्रांतीने अवरोध केल्यानंतरचा काळ भयाण दुःख, मानखंडना आणि विषमतेने व्यापलेला होता. त्याला छेद देत अज्ञान आणि परंपरेच्या मगरमिठीतून या पिळल्या जात असलेल्या समूहांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. हे प्रयत्न व्यापक स्तरावरचे नव्हते. ते मर्यादित स्वरूपाचे होते. महात्मा ज्योतिबा फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांचा अपवाद वगळता फार प्रखरही नव्हते. तथागत बुद्धांच्या परिवर्तन चक्राला महात्मा फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांनी जोरदार धक्के देत बंधमुक्त केले. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या चक्राला अधिक गती दिली. मानवजातीच्या समग्र कल्याणाच्या हेतुने सर्वंकष शोषणाच्या विरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी क्रांतीचे रणशिंग फुंकले.

अलीकडील काळात ‘जोशाबा’ या नावाचा देशात खूप मोठ्या प्रमाणात जागर सुरू आहे. ‘जोशाबा’चा समग्र समाजपरिवर्तन हाच ध्यास आणि श्वास होता. आणि तोच आम्ही पुढे घेऊन जात आहोत असे ऐकणाऱ्या शक्ती आज समाजव्यवस्थेला प्रचंड प्रभावित करीत आहेत. म्हणून बहुजनांनी सावध होत हा धोका वेळीच थांबविला पाहिजे. जनकल्याणासाठी आयुष्य समर्पित करणारे महापुरुष हे सर्वांचेच असतात हे जगातील वास्तव आहे. परंतु

धर्म, जात, लिंग, वर्ण या शक्ती ज्या देशात सर्वशक्तीमान आहे तो हिंदुस्तान मात्र याला अपवाद आहे. येथे महापुरुष त्या त्या जातींमध्ये विभागले जातात हे या देशाचं दुर्दैवी वास्तव आहे.

विसावे शतकचं नव्हे तर इथून पुढच्या काळावर ज्यांनी आपले व्यक्तित्व आणि कर्तृत्त्वाचा ठसा उमटविला त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल. बुद्ध, कबीर आणि महात्मा फुले यांच्या विचार, कार्याच्या प्रभावाबरोबरच प्रसिद्ध विचारवंत जॉन ड्युईचा वैचारिक प्रभाव बाबासाहेबांच्या जीवनावर पडल्याचे स्पष्ट जाणवते. धर्म आणि जाती व्यवस्थेतील अन्याय व विषमतेविरुद्ध बहिष्कृत, सर्वहारा, वंचित समाजाच्या नैसर्गिक हक्कप्राप्तीसाठी महात्मा फुले यांच्या चळवळीला प्रारंभ झाला. त्यांनी पुरोहितशाही विरुद्ध बंड उभे केले. या चळवळीत छत्रपती शाहू महाराज यांच्यासह अनेक समाजधुरीणांनी सक्रिय सहभाग घेत परंपरेला धक्के दिले हा या मातीचा इतिहास आहे. परंतु महात्मा फुले यांच्या चळवळीला अधिक सशक्त, गतिमान व क्रियाशील करून पुढे घेऊन जाण्याचे महत्कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. शिक्षण पूर्ण होण्याआधीच सामाजिक कार्यात बाबासाहेब सक्रिय झाले. त्यांचे जीवन म्हणजे समाज परिवर्तनाचे महाआंदोलन बनले. बाबासाहेबांना राजकीय सुधारणेआधी सामाजिक सुधारणा अधिक महत्त्वाची वाटत होती. आणि त्या दिशेने त्यांनी आपल्या संघर्षाची दिशा निश्चित केली.

भारतीय समाज धर्म आणि चातुर्वर्ण्यव्यवस्थेतून असंख्य जाती आणि उपजातींमध्ये विखंडित झाला. चातुर्वर्ण्यव्यवस्थेने ज्या समूहांचे अधिकार हिरावून घेतले नव्हे त्यांचे मानवी अस्तित्वच नाकारले त्यांना अस्पृश्य ठरवून बहिष्कृत केले. तो शूद्र-अतिशूद्र समूह होय. 'त्याला ना सन्मान होता ना निर्णय घेण्याचा अधिकार' होता. अशा विषम समाजव्यवस्थेत, विषन्न परिस्थितीत ज्यांच्या हजारो पिढ्या जगल्या आणि मातीत गेलेल्या अशा समाजात बाबासाहेबांचा जन्म झाला. त्या समाजाला आत्मभान आणि मानवी प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी बाबासाहेबांनी आपले आयुष्य समर्पित केले. यासाठी त्यांनी विविध संघटनांची बांधणी करत अनेक लढे उभारले, परिवर्तनाची चळवळ अधिक गतिमान केली. आपले विचार शोषित समाजाच्यामनामनांपर्यंत पोहोचण्यासाठी 'मूकनायक' पाक्षिक पत्राची सुरुवात केली. तेव्हा तत्कालीन अस्पृश्य समाजात शिक्षणाचे प्रमाण हजारी नऊ देखील नव्हते. 'विकास, प्रगतीचे प्रवेशद्वार म्हणजे शिक्षण होय'. शिक्षण, उच्च शिक्षणाशिवाय समाज जागृत होणार नाही या जाणीवेतून बाबासाहेबांनी अनंत अडचणींचा सामना करत मुंबई, औरंगाबाद येथे महाविद्यालये उभी करून सर्वसामान्यांच्या उच्च शिक्षणाची सोय केली. त्यांनी आपल्या या कृतीतून 'शिका! संघटित व्हा! आणि संघर्ष करा!' हा मूलमंत्र बहुजन समाजाला देत आपल्या आंदोलनपर्वाला सुरुवात केली. बाबासाहेब 'मूकनायक'च्या माध्यमातून एक हक्काचे विचारपीठ उपलब्ध करत दलितच नव्हे तर समाजातील सर्वच दुर्बल घटकांचे हक्क जपले जावे यासाठी हक्क, कर्तव्य आणि अधिकाराची जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न करतात. ज्यांनी बहिष्कृत मानवी समूहांचे अस्तित्व नाकारले तो धर्म, जात आणि जातिव्यवस्था हा डॉ. आंबेडकरांच्या आस्था, अभ्यास, संशोधन, चिंता आणि चिंतनाचा विषय राहिलेला आहे हे सहज लक्षात येते.

या देशात माणसाला जगण्यासाठी केवळ माणूस असणे पुरेसे नाही. त्याला जगण्यासाठी एखादा धर्म लागतो. जात लागते. त्याशिवाय तो जगूच शकत नाही. निसर्गनियमानुसार प्रत्येक सजीव-निर्जीव वस्तू आपापल्या गुणधर्म वैशिष्ट्यांनीशी सिद्ध असते. तद्वतच मानवी जीवनात धर्माला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे डॉ. आंबेडकर यांनी मान्य केले आहे. परंतु 'हिंदू धर्मात व्यक्तीला स्थान नाही' हा डॉ.आंबेडकर यांच्या मते मुख्य दोष

आहे. यासंदर्भात बाबासाहेब म्हणतात, “एका माणसाने दुसऱ्या माणसाशी कसे वागावे याची शिकवण हिंदू धर्मात नाही. एका वर्गाने विद्या शिकावी, दुसऱ्या वर्गाने शस्त्र धरावे, तिसऱ्याने व्यापार करावा व चौथ्याने फक्त सेवा करावी, अशी या धर्माने कर्तव्याची विभागणी केली आहे. ती अन्यायकारक आहे. विद्या, शस्त्रे आणि पैसा याची प्रत्येक माणसाला जरुरी असते. ही गोष्ट जो धर्म विसरतो आणि एकाला सज्ञान करण्याकरिता इतरांना अज्ञानात ठेवतो तो धर्म नसून लोकांना बौद्धिक गुलामगिरीत ठेवण्याचा कावा आहे. जो धर्म एकाच्या हाती शस्त्र देतो व दुसऱ्याला निशस्त्र करतो, जो धर्म काहीना धनसंपादनाचा मार्ग मोकळा ठेवतो व बाकीच्यांना आपल्या उपजीविकेकरता दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची अनुज्ञा देतो तो धर्म नसून स्वार्थ परायणता आहे. सारा हिंदू धर्म हा वरिष्ठ वर्गाच्या हिंदुनी वरिष्ठ वर्गाच्या संवर्धनाकरिता रचलेला आहे. शूद्रांवर या धर्माने धार्मिक व बौद्धिक गुलामगिरीच लादलेली आहे.”१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदू धर्म व्यवस्थेची चिकित्सा करत त्यातील वैगुण्यावर बोट ठेवतात. शिवाय एकाला मुक्त आणि दुसऱ्यावर निर्बंध लादणाऱ्याधर्माला बाबासाहेब नाकारतात. मानवाला धर्माची आवश्यकता आहेच परंतु माणूस धर्मासाठी नाही तर धर्म मानवासाठी असल्याचे चिरंतन सत्यही सांगतात. बाबासाहेबांच्या या कृती आणि उक्तीचा परिणाम कळत-नकळतपणे बहिष्कृत, वंचित समूहमनांवर खोलवर होत गेला. शोषणाचा शिकार झालेला समाज आपल्यावरील अन्यायाविरोधात संघटित होऊ लागला हे महाड येथील सत्याग्रहाने सिद्ध केले.

बुद्धिप्रामाण्यवादी डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्म, धर्मग्रंथ, धर्माने पोसलेल्या जातीसंस्थेच्या मुळापर्यंत जाऊन जातीअंतर्गत विवाहामुळेच जाती टिकून आहेत, असा निष्कर्ष समाजासमोर ठेवला. ‘मूकनायक’च्या पहिल्या अंकातील मनोगतात ते लिहितात, “या हिन्दी जनात वसणारी विषमता अनेक स्वरूपाची आहे.”२ त्यांच्या मते, “अनेक प्रकारच्या विषमतेपेक्षा धार्मिक विषमता अधिक प्रखर आहे.कैंव्हा कैंव्हा तर ही धार्मिक विषमता विकोपास जाऊन रक्तपात होण्यास कारणीभूत झाली आहे.”३अठरापगड जातींनी मिळून बनलेल्या हिंदू धर्मात माणसांची ओळख ही त्यांच्या जातीवरूनच होते. यावरून जातींच्या विषारी मुळया भारतीयांच्या मनात किती घट्ट रुजलेल्या आहेत याचा सतत प्रत्यय येतो. छत्रपती शाहू महाराज, धर्म ही महत्त्वाची बाब असली तरी ती व्यक्तिगत मानतात. या संदर्भात ते म्हणतात, “दया धरम का मूल है, नरक मूल अभिमान’ म्हणजेच देशाची, देशबंधूची सेवा करणे, आणि जनी जनार्दन शोधणे व पाहणे हाच खरा धर्म.”४अशी मानवतावादी धर्माची ओळख करून देत धर्मभेद व जातीभेदाच्या आधारावर एकमेकांचा मत्सर करणे, द्वेष करणे चुकीचे असून ते सामाजिक आरोग्यास घातक आहे असा इशाराही देतात. छत्रपती शाहू पुढे म्हणतात, “सनातनी धर्माने रूढ केलेले मनुवादी कायदे इंग्रज सरकारने नाहीसे करून फार उपकार केले. परंतु हल्ली असलेल्या कायद्यातही पुष्कळ दुरुस्तीत झाली पाहिजे.”५ अशी अपेक्षा व्यक्त करत माणसांची आणि माणुसकीची अप्रतिष्ठा करणाऱ्या हिंदू धर्माची परखड चिकित्सा करत शाहू महाराज बहुजनांना खऱ्या धर्माची ओळख करून देतात.

धार्मिक विषमतेच्या दुष्परिणामाने बहिष्कृत, हक्कवंचित, समाजमनावर भयंकर विपरीत परिणाम केले. देव, दैव आणि नशिबावर विसंबून राहण्याची मानसिकता शोषित समाजाची बनली गेल्याने धार्मिक उच्चनीचतेच्या भावनेने भारतीय समाजाला पर्यायाने राष्ट्राला अपंग, दुर्बल आणि रोगी बनवल्याकडेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतात. मानव आणि राष्ट्रहितासाठी बदलांची गरज प्रतिपादन करत समाज मनास विचार प्रवृत होण्याचेही आवाहन करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना करून सामाजिक जनजागृतीस गती दिली. 'अस्पृश्यता ही सामाजिक गुलामगिरी' असल्याचे बाबासाहेब अधोरेखीत करतात. वर्णव्यवस्थेने अस्पृश्य ठरवलेल्या मानवी समूहांच्या आयुष्याची फरफट केली. याचा प्रत्यक्ष अनुभव बाबासाहेबांनी घेतला. दुःख, निर्भत्सना, वेदना आणि शोषणाचे ते शिकार झाले. म्हणूनच अस्पृश्यता ही जातीभेदाइतकीच अनर्थकारी असल्याचे डॉ. आंबेडकर म्हणतात. अन्य धर्मातही अस्पृश्यता आहे, परंतु इतर धर्मात ती तात्कालिक स्वरूपाची आहे. तर हिंदूधर्मात ती चिरकालीन स्वरूपाची आहे. तिच्या मुळाशी हिंदू धर्माचा पाया आहे, हेच हिंदू समाजव्यवस्थेचं अद्वितीयत्व म्हणता येईल. हिंदूधर्मातील अस्पृश्यतेविषयी अनेकांनी विविध मते व्यक्त केली आहेत. मात्र त्यासंबंधीची निश्चित कारणमीमांसा अद्याप पुढे आलेली नाही. संदर्भात महात्मा फुले यांनी,"अस्पृश्यता ही देवनिर्मित नाही तर मानवनिर्मित आहे असे सांगितले."[६]महात्मा फुले यांनी मानवनिर्मित, जीवघेण्या अस्पृश्यतेच्या क्रूर रूढीवर प्रहार केले. तर 'अस्पृश्य' हा शब्द कोणाही माणसास लावणे फार निंद्य आहे, असे नागपूर येथील जाहीर भाषणात छत्रपती शाहू महाराज सांगून पुढे म्हणतात, "परंतु तुम्ही अस्पृश्य नाही. सवर्णांपेक्षा जास्त बुद्धिमान, पराक्रमी, सुविचारी, स्वार्थत्यागी असे या देशाचे महत्त्वपूर्ण घटक आहात."[७]अस्पृश्यांविषयीची आपली भूमिका जाहीर करून निर्दयी अस्पृश्यतेचा अंत करून सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन छत्रपती शाहू करतात. तर "अस्पृश्यता ही लोकांची लहर आहे, असे म्हटल्याशिवाय गत्यंतर नाही."[८]असे बाबासाहेब म्हणतात. परंतु ही लहरच पुढे रुढीत रूपांतरित झाली. या लहरी रूढीने ज्यांना ज्यांना अस्पृश्य ठरविले त्या समस्त मानवी समूहांचे जीवन उद्‌ध्वस्त केले. या अस्पृश्यतेचे मूळ जातिव्यवस्थेत, जातिव्यवस्थेचे मूळ वर्णव्यवस्थेत आणि वर्णव्यवस्थेचे मूळ ब्राह्मणी धर्मात आहे, असे सांगून अस्पृश्यता हे ब्राह्मणी धर्माचे अपत्य होय. अशी हिंदू धर्मातील अस्पृश्यतेची मांडणी बाबासाहेब करतात.

वर्णवर्चस्ववादी विचारसरणीमुळे दलित अस्पृश्यांमध्ये नकारात्मक, न्यूनगंडाची भावना निर्माण झाली आहे. 'स्व'ची ओळख झाल्याशिवाय तो यातून बाहेर पडणे अशक्य आहे. म्हणून बाबासाहेब हिंदू धर्मातून बाहेर पडण्याचा निर्णय १९३५ च्या येवला येथील परिषदेत जाहीर करतात की, मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही'. बाबासाहेबांच्या या घोषणेचा परिणाम हिंदू धर्माने बहिष्कृत केलेल्या मानवी मनांवर कळत-नकळतपणे झाला. बहिष्कृत समूह हिंदू धर्मास सोडचिठ्ठी देत ख्रिश्चन व मुस्लिम या परधर्मात जाऊ लागले. धर्मांतराचा हा वेग मंद असला तरी हिंदू धर्मास खिंडार पडण्यास सुरुवात झाली. शेवटी तब्बल एकवीस वर्षे हिंदू धर्म, परंपराभिमानी यांची प्रवृत्ती बदलली आणि अस्पृश्यांना न्याय हक्क देऊन आपल्यात सामावून घेतील म्हणून बाबासाहेबवाट पाहतात. परंतु हिंदू धर्मव्यवस्थेने बाबासाहेबांची निराशा केली. शेवटी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी वैज्ञानिक दृष्टिकोनावरआधारलेला 'बौद्ध धम्म' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयायांसह स्वीकारून आपल्या समाजबांधवांना अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाण्याचे अभूतपूर्व कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ सनातनी हिंदूधर्म व ब्रिटीश सत्तेलाच दोष देत नाही तर "करणी करेगा तो नर का नारायण बन जायेगा"[९]या वचनाप्रमाणे बहिष्कृत,शोषित समाजास आपल्यावरील अन्याय अत्याचाराच्या विरोधात एकजुटीने, एक साथ संघर्ष करण्याची प्रेरणा देतात. दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडलेला कोणताही देश वा समाज कधी ना कधीतरी उदयाला आल्याशिवाय राहत नाही. त्याप्रमाणे बहिष्कृतांचीही उन्नति झाल्याशिवाय राहणार नाही. त्याला गरज आहे ती प्रयत्न करण्याची. शिवाय स्वार्थासाठी पुतनामावशीचे प्रेम दाखविणाऱ्या

प्रवृत्तीपासून सावध राहण्याचा इशारा बाबासाहेब आपल्या समाज बांधवांना देताना म्हणतात, आमचा सामाजिक दर्जा सवर्णांच्या चालीरीतीचे अनुकरण करून केव्हा आहे वाढणार नाही आम्हीच आमचा नुसतेच स्वभाव टाकून देणे हेच आमचा सामाजिक दर्जा वाढविण्याचे खरे साधन होय."[१०]इतके समजावून सांगूनही तुम्ही त्याकडे कानाडोळा केला तर स्वतःच्या भावी पिढीच्या उन्नतीचा तुम्हीच कॉल केला असे समजून येणाऱ्या भावी पिढ्या तुम्हाला दोष देत राहतील म्हणून वेळीच स्वतःला ओळखा सावध व्हा भरकटलेल्या शोषित समाज बांधवांना उन्नत मार्गावर आणण्यातच आपल्या जन्माचे साफल्य असल्याची आत्मतेजाची जाणीवही बाबासाहेब करून देतात.

राजकीय सत्तेच्या प्राप्ती शिवाय दलित अस्पृश्य बहिष्कृत सर्वहारा वंचित शोषित घटकांना न्याय हक्क प्राप्त होणार नाहीत याची डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पूर्ण जाणीव होती. याच जाणिवेतून 'राज्यकर्ती जमात व्हा!' असे आव्हान करतात. बाबासाहेब केवळ दलित अस्पृश्य वर्गासाठी सुजले नाही तर शेती शेतकरी घोति कामगार मजूर प्रिया इतर मागास भटके भटके विमुक्त आदिवासी आणि सर्व प्रकारचे हक्क वंचित शोषित समूहांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी अविरत संघर्ष केल्याशिवाय भाषा जल ऊर्जा पर्यावरण थोडक्यात मानवी समाज जीवनाशी निगडित सर्व क्षेत्राला बाबासाहेबांच्या कर्तुत्वाने तेजांकित केले शोषितांच्या निस्तेज जीवनाला ऊर्जा पुरविली.

सारांश आंबेडकर यांचे आयुष्य त्यांचे कार्य त्यांचे कर्तृत्व त्यांनी मांडलेले मूलगामी विचार बांधलेल्या संघटना उभारलेल्या चळवळी समाजाला दिलेला कार्यक्रम या सर्व गोष्टींचा विचार धर्म आणि जातीच्या भिंती ओलांडून करण्याची आज नितांत आवश्यकता आहे परंतु त्यांना जातीच्या कोंडवाड्यात बंदिस्त करण्याचे षड् यंत्र काही प्रतिगामी शक्ती आहेत परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समतेच्या पायावर राष्ट्र उभारणीचे स्वप्न पाहणारे उच्चकोटीचे देशभक्त होते ते जाती धर्म पंथ राज्य आणि भाषेच्या सीमा ओलांडून गेले ते या देशाच्या मातीशी त्यातील प्रश्नांची सर्व चळवळींशी सर्व आंदोलनाशी आणि सर्व समाजाशी कृती आणि युक्तीने एकरूप झालेले भारतीय होते व बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन जीवन कार्याकडे पूर्वग्रहरहित निखळ स्वच्छ दृष्टीने पाहिले तर आणि तरच त्यांची महती त्यांचा त्याग त्यांची निस्वार्थी वृत्ती याचा पुन्हा पुन्हा प्रत्यय येतो.

**संदर्भ:**

१. हरी नरके (संपा): डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशनसमिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई.
द्वि. आ. २००८ पृ.१५४-५५

२. तत्रैव: पृ. ३४५

३. तत्रैव: पृ.३४५

४. तत्रैव: पृ.३४५

५. तत्रैव: पृ.३४५

६.पानतावणे गंगाधर: पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिजित प्रकाशन नागपूर १९८७ पृ. ९४

७.हरी नरके (संपा): उनि: पृ.३४८२

८. पानतावणे गंगाधर:उनि पृ. ९४

९.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशनसमिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई. पृ.४२४

१०.तत्रैव: पृ.४००

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**प्रा. कांबळे के. जे.**

**सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्याल, नांदेड**

**प्रस्तावना :-**

प्रज्ञासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक असामान्य प्रतिभावंत, कायदा, समाजशास्त्र, राज्यशास्त्र आणि मानववंश शास्त्र यासारख्या अनेक शास्त्रामध्ये तसेच समाजकारण राजकारण व अर्थकारण इत्यादी क्षेत्रात त्यांनी बहुमोल कामगिरी केली असली तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मुलतः अर्थतज्ञ होते त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांची मांडणी करण्याचा प्रस्तुत शोध निबंधात प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन निबंधाचे उद्देश :-**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार मांडणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी शेती विचार विशद करणे
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामुदायिक शेती व शासकीय समाजवाद संकल्पना स्पष्ट करणे.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खोती पध्दती विषयीचे विचार मांडणे.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीच्या धारणक्षेत्राची समस्या व उपाय विशद करणे.

अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने त्यांना एम.ए व पी.एच.डी पदव्या प्रदान केल्या. त्यानंतर 1921 साली लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून डॉक्टर. ऑफ सायन्स ही पदवी प्राप्त केली. व अर्थशास्त्रावर त्यांनी ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ दि. ईस्ट इंडिया कंपनी, इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स ॲण्ड सोल्यूशन, दि प्रोब्लेम ऑफ रुपी : इट्स ओरिजिन ॲण्ड सोल्यूशन इत्यादी मौलिक ग्रंथ लिहिले. ईस्ट इंडिया कंपनीने प्रशासन आणि वित्तव्यवस्था यांच्यामध्ये इ.स. 1792 ते 1858 या काळात तसे फेरबद्दल होत गेले. व त्याचा भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला त्याचे आर्थिक विदारक चित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ग्रंथात मांडले त्यामध्ये ब्रिटिश सरकार ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून भारताच्या व्यापाराचा एकाधिकार स्वतःकडे घेवून आपला स्वतःचा फायदा करुन घेत असे. परंतु त्याची प्रत्यक्ष झळ भारतीय जनतेला सोसावी लागत असे. डॉ. आंबेडकरांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारासंबंधीचा एकाधिकार नष्ट करुन ब्रिटिश व भारतीय जनतेसाठी भारताचा व्यापार खुला करण्यात यावा असे सुचविले. ब्रिटिश सरकार भारतीय जनतेची पिळवणूक करुन आपल्या एकूण महसुलात कशी वाढ होईल याचा ते प्रयत्न करीत असत. आपल्या उत्पन्नात (कर महसुलात) जमिनीवरच्या कराचा वाटा, मिठावरच्या कराचा वाटा, अफूवरील कर, सीमा शुल्कातील वाढ या सर्व प्रकारच्या कर आकारणीत वाढ करुन त्या पध्दतीचे कर विभागणी करुन शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायासंबंधिचे विवेचन डॉ. आंबेडकरांनी आपल्या ग्रंथात केले. त्याशिवाय ब्रिटिश सरकारने मोठ्या प्रमाणावर कर्जे उभारली. महसुली उत्पन्न आणि सरकारी कर्जे यांमधून उभारलेल्या पैशाचा विनियोग करताना मात्र जनतेच्या हिताकरवी फारच तोकडी रक्कम खर्ची पडत असे म्हणजेच आर्थिक विकासाठी कमी खर्च व लष्करावर मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असे यावरही आंबेडकरांनी भाष्य केले. शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिटिश सरकारच्या कामगिरीचे मुल्यमापन करताना ते असे प्रतिपादन करतात की, 'भारताने इंग्लंडसाठी केलेले प्रचंड आर्थिक योगदान हे जेवढे भक्कम करणारे आहेत तेवढेच इंग्लंडने भारतासाठी केलेले नगन्य आर्थिक योगदान विस्मयकारक आहे' असे दाखवून दिले.

**द प्रॉब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजिन ॲण्ड सोल्युशन** या ग्रंथात भारतीय रुपयाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मीमांसा सादर करुन भारतासाठी आदर्श चलन पध्दत कोणती या संबंधी विचार मांडले त्यामध्ये चलन पध्दतीत एकसूत्रीपणा आणणे, चलन पर्याप्त प्रमाणात उपलब्ध व्हावे व देवाण – घेवानीसाठी चलनाचा वापर मोठ्या प्रमाणात व्हावा. जेणेकरुन वेतन व मानधन हे चलनाच्या स्वरुपात देणे शक्य होईल. खरेदी विक्रीसाठी चलनाचा

वापर वाढेल. चलनाला असलेली मागणी व चलनाचा पुरवठा यांतील तफावत दुर होऊन समतोल साधल्या जाईल. व विनिमय दरातही स्थिरता आणता येईल. असे विचार त्यांनी मांडले.

**शेती विषयक विचार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय लेखनाचा एक भाग म्हणून त्यांच्या शेती संबंधिच्या विचाराचा परामार्श घेणे उपयुक्त ठरते. डॉ. आंबेडकर यांनी भारतातील शेतीच्या धारण क्षेत्राचे सरासरी लहान असलेले आकारमान व त्यातून निर्माण झालेले प्रश्न आणि त्यावरील उपाययोजना सुचविल्या तसेच खोती पध्दतीवर कठोर प्रहार केले आहेत त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला शासकीय समाजवादाचा अपरिहार्य भाग म्हणून त्यांनी सामुदायिक शेतीचा पुरस्कार केला.

**भारतातील लहान धारण क्षेत्रे व त्यावरील उपाय :-**

1918 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी **''भारतातील लहान धारण क्षेत्रे व त्यावरील उपाय'** या लेखामध्ये शेती प्रश्नावरील मुलभूत स्वरुपाचे भाष्य त्यांनी केले. जमीन सुधारणा विषयक कायदे व हरित क्रांती अशा प्रकारचे बदल शेती क्षेत्रात झाले पाहिजे. लहान धारण क्षेत्रे ही भारतीय शेतीला भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. तसेच ही धारण क्षेत्रे विखुरलेली असल्याने ही समस्या त्याहून अधिक बिकट होते. परिणामतः शेतीची उत्पादकता घटते. परंतु शेती हा सर्वात मोठा राष्ट्रीय व्यवसाय असल्यामुळे त्यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. म्हणून धारण क्षेत्राचा आकार वाढविणे व तुकडे जोड करणे हा एक महत्वाचा उपाय त्यांनी सुचविला.

तात्कालीन राजकारणी व अर्थतज्ञ यांच्यामध्ये वारसा हक्क हे जमिनीच्या विभाजनाचे एक मुख्य कारण आहे. मात्र त्यावर डॉ. आंबेडकर असमहत होते. डॉ. आंबेडकरांच्या मते, जमीनीवर पडणारा लोकसंख्येचा प्रचंड भार हे मुख्य कारण होय आणि डॉ. आंबेडकरांच्या मते, 'शेती हा उत्पादनाचा उपक्रम असल्यामुळे मोठी किंवा लहान धारण क्षेत्रे अशी बाब असू शकत नाही' शेतकऱ्यांच्या दृष्टीने त्यांच्याकडील असलेले धारण क्षेत्र लहान किंवा मोठे ठरणे ही बाब मशागत करण्यासाठी आवश्यक असलेले इतर उत्पादक घटक त्यांना उपलब्ध आहेत की नाहीत यावर अवलंबून असते. केवळ जमीनीचे आकारमान ही अर्थशास्त्रीय दृष्ट्या निरर्थक बाब आहे.

मोठी धारण क्षेत्रे किफायतशीर व लहान धारण क्षेत्रे अकिफायतशीर असतात. असा युक्तीवाद चुकीचा ठरण्याची शक्यता असते. असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांच्या मते किफायतशीर धारण क्षेत्र म्हणजे जमीन, भांडवल, व श्रम हे सर्व उत्पादक घटक इष्टतम प्रमाणात उपलब्ध असणे हे होय त्याचबरोबर डॉ. आंबेडकर यांच्या मते, भारतीय शेतीचा प्रश्न सोडविण्याचा एकच खात्रीपूर्वक उपाय म्हणजे औद्योगिकरण हे होय.

**सहकारी शेती :-**

डॉ. आंबेडकरांनी सहकारी शेतीचा पुरस्कार केला. सहकारी शेती म्हणजे एका विशिष्ट आकाराची सहकारी शेते अस्तित्वात आणल्यास आपणांस पाहिजे ती उदिष्ट्ये साध्य करता येतील. छोट्या शेतकऱ्यांना त्यांच्या विनाशापासून वाचविता येईल. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांचा जमीनीवरील मालकी हक्क अबाधित राहील. सहकारी शेत जसे मोठ्या आकारमानाचे असेल, तसेच ते एकसंध ही असेल.

**खोती पध्दतीचा अंत :-**

17 सप्टेंबर 1937 मध्ये आंबेडकरांनी मुंबई कायदेमंडळात खोती पध्दत रद्द करण्याचे विधेयक मांडले. खोती पध्दतीमध्ये शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोतांची नियुक्ती केलेली असते. या पध्दतीमध्ये जमीन कसणाऱ्यास (कुळास) कनिष्ठ भूधारक व खोताला वरिष्ठ भूधारक असे संबोधले जाईल. ही पध्दत उत्तर भारतातील जमीनदारी पध्दतीशी मिळती जुळती होती. खोती पध्दतीमध्ये भूधारकांकडून शेतसारा गोळा करुन त्याचा काही हिस्सा शासनाच्या तिजोरीत भरण्याचे कार्ये 'खोत' या व्यक्तीकडे असते. त्यामुळे ठराविक रक्कम तिजोरीत भरणा करुन खोत हे भूधारकांशी वाटेल तसे वर्तन करण्याचे स्वातंत्र्य खोताला असे. म्हणून ते भूधारकांवर जुलूम करीत असे. म्हणून डॉ. आंबेडकरांनी ही पध्दत लवकरात लवकर नष्ट करण्याची मागणी केली.

**सामुदायिक शेती व शासकीय समाजवाद :-**

राजकीय लोकशाही प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी तिला आर्थिक लोकशाहीची जोड असावी लागते. त्यांनी आर्थिक क्षेत्रात सरकारच्या हस्तक्षेपाचा पुरस्कार केला. सरकारनी आर्थिक व्यापाराचे नियमन केले पाहिजे. अन्यथा जमीनदार कुळांवर जबर खंड बसवतील. भांडवलदार कामगारांचे तास वाढवून वेतन कमी करण्यासाठी आपले स्वातंत्र्य कामी आणते. डॉ. आंबेडकरांनी उद्योग व शेती क्षेत्रात शासन संस्थेच्या हस्तक्षेपाचे समर्थन करुन त्यांनी शासकीय समाजवादाचा पुरस्कार केला.

**सारांश :-**

डॉ. आंबेडकरांनी शेतजमीनीच्या प्रश्नासंबंधी मांडलेले आर्थिक विचार भारताच्या आजच्या स्थितीतही लागू पडतात. जमीनीच्या तुकडीकरणामध्ये शेतीची उत्पादकता कमी होत असली तरी ती वाढविण्याकरिता पहिल्या योजने पासून अनेक प्रकारच्या योजना राबविण्यात आल्या. सरकारने शेतीत भांडवल गुंतवणूक केल्याने शेतीची उत्पादकता काही प्रमाणात वाढली आहे. ग्रामीण भागात शेतीवर आधारित उद्योगधंदे सुरु करणे हा एकमेव उपाय योग्य राहील असे सुचविले. जमीन धारणेबाबतचा व शेतीवरील अतिरिक्त लोकसंख्येचा भार कमी करुन तो प्रश्न सोडविता येईल. व त्यामुळे सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यास मदत होईल असे डॉ. आंबेडकर यांचे मत होते. थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार हे अर्थशास्त्रात महत्वाचे असून सध्याच्या काळात सुध्दा ते अत्यंत उपयुक्त व मोलाचे आहेत. विशेषता त्यांनी केलेले अर्थशास्त्रीय लेखन स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आर्थिक समस्यांशी निगडीत असले तरी त्यातुन त्यांचा दुरदृष्टीपणा व त्यांच्या विचारातील सखोलपणा देशाच्या आर्थिक समस्यांवर उपाय म्हणून आजही महत्वाचे ठरतात.

**संदर्भसूची :-**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणिं हैद्राबाद संस्था – डॉ. शेषराव नरवडे, निर्मल प्रकाशन, नांदेड
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ – महाराष्ट्र शासन मुंबई
3. लोकराज्य - एप्रिल 2018 चा अंक - महाराष्ट्र शासन मुंबई
4. समग्र डॉ. आंबेडकर चरित्र – खंड सहावा ॲड. बी.सी. कांबळे –
5. आर्थिक विचारांचा इतिहास – प्रा. अ. रा. रायखेलकर – विद्या बु

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर: एक भारतीय समाजशास्त्रज्ञ

**सहा. प्रा. डॉ. अल्का बाबाराव सोमवंशी**
प्रमुख समाजशास्त्र विभाग
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय]जळकोट जि.लातूर

**प्रास्ताविक:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान भारतीय समाजाच्या दृष्टीकोनातून बहुमुखी स्वरूपाचे असल्याचे आढळते. त्यांच्या अध्ययनामुळे, संशोधनामुळे आणि समाजसुधारणात्मक कार्यामुळे ते सबंध जगाला परिचित आहेत. त्याचबरोबर डॉ. आंबेडकरांनी ज्या शास्त्राचा अभ्यास केला त्यात अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, मानवशास्त्र व धर्मशास्त्र इ. विषयामध्ये ते पारंगत होतेच. त्यांच्या कायद्याच्या अध्ययनाला तर तोड नव्हती. यासर्व बाबीबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय समाजव्यवस्थेचे गाढे अभ्यासक होते. त्यांच्या अध्ययनाला शास्त्रीय आधार होता वैज्ञानिक बैठक होती. त्यामुळेच ते निश्चितच एक भारतीय समाजशास्त्रज्ञ ठरतात.

समाजशास्त्रज्ञ रुपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा आढावा घेताना त्यांनी भारतीय समाजाचा दोन दृष्टीकोनातून अभ्यास केला. योगदान दिले. त्यामध्ये पहिला दृष्टीकोन दलितवादी दृष्टीकोन होय. भारतीय समाजातील दलित समाजाचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यावर भर दिला. डेव्हिड हार्डीमेन या पाश्चात्य विचारकानी भारतीय समाजाचा दलितवाद दृष्टीकोनातून अभ्यास तर केलाच होता. मात्र त्यांच्यापेक्षाही अधिक सखोल अध्ययन व कार्य डॉ. आंबेडकरांनी केले आहे. त्यांच्या समाजशास्त्रीय अध्ययनाचा दुसरा दृष्टीकोन 'सामाजिक मानवतावादी दृष्टीकोन' होता. यामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यावर त्यांनी भर दिला.

**उद्देश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी 'समाजशास्त्रज्ञ' रुपाने भारतीय समाजातील ज्या ज्या घटकांचा अभ्यास केला त्याविषयीचे सविस्तर विश्लेषणकरणे हा आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशेधनासाठी व्दितीय साधनांचा वापर केलेला आहे. यात वि विध संदर्भ ग्रंथ लेख यांचा वापर केला आहे.

**१. जातीविषयक विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील जातीव्यवस्थेचा सखोल अभ्यास केला. १९१६ मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठामध्ये शिकत असताना मानवंशशास्त्र विभागात 'भारतीय समाजातील जाती' या विषयाचा शोधनिबंध सादर करुन जाती व्यवस्थेचे विस्तृत विदारक चित्र जागतिक पातळीवर मांडण्याचे काम त्यांनी केले. केतकरांच्या नंतर जातीविषयक सिध्दात डॉ. आंबेडकरांनी मांडला. पुढे 'अनहिलेशन ऑफ कास्ट' या ग्रंथामध्ये डॉ. आंबेडकरांनी जातीविषयक दृष्टीकोन स्पष्टपणे मांडला.

एकंदरीत जाती व्यवस्थेचा डॉ. आंबेडकरांनी समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला. त्यांच्या मते, हिंदूधर्मातील सामाजिक विषमतेची मूळ जातीव्यवस्थेत आहे. तेव्हा जातीप्रथेचे निर्मूलन व्हावे असे विचारही त्यांनी मांडले आणि कृतीही केली.

डॉ आंबेडकरांच्या सामाजिक अभ्यासावर महात्मा फुले. बुद्ध चरित्रकार अर्जुनराव केळुसकर, अमेरिकन विचारवंत जॉन ड्यूई, भगवान बुद्ध आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा प्रभाव दिसतो. लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स मध्ये विद्यार्थी म्हणून दाखल झाल्यानंतर डॉ अलेक्झांडर गोल्डनव्हायझर आंबेडकरांचे मार्गदर्शक झाले. डॉ गोल्डनव्हायझर हे सांस्कृतिक आणि धार्मिक विषयांचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी 'कुलदैवत' या विषयावर एक मोठे पुस्तकही लिहिलेलं आहे. आपल्या मार्गदर्शकांच्या विनंतीला मान देऊन डॉ आंबेडकरांनी जातीय

व्यवस्थेचा इतिहास हा विषय घेऊन एक रिसर्च पेपर विद्यार्थ्यांसमोर वाचून दाखवला होता. या शोधनिबंधाच्या माध्यमातून डॉ आंबेडकर हे समाजशास्त्रज्ञ म्हणून जगाला परिचित झाले.

भारतीय समाजाचा अभ्यास करण्यासाठी त्याकाळात पुराणिक दृष्टीकोनाचा वापर केला जायचा. पुराणिक दृष्टिकोनातून लिखाण करणारे समाजशास्त्रज्ञ भारतीय समाजाकडे वेद, उपनिषद, धर्मशास्त्र, पौराणिक कथा आणि रामायण महाभारतातील आशयाच्या संदर्भातून पाहायचे, डॉ आंबेडकरांनी जातीयवादी दृष्टीकोन समोर आणला यात त्यांनी भारतीय समाजशास्त्रात सामाजिकदृष्ट्या वंचित असलेल्या माणसांचे प्रश्न अस्पृश्यता, सामाजिक विषमता आणि वर्णाश्रम पद्धतीची कट्टरता प्रस्थापित शैक्षणिक वर्तुळात आणली. डॉ आंबेडकर म्हणायचे की भारतात त्याकाळी पुरोपियन विचारांची प्रेरणा घेऊन अनेक लोक राजकारणात येत होते. त्यांनी अस्पृश्यता आणि दलितांच्या प्रश्नांपासून पळ काढू नये. दलिताची सामाजिक सुधारणा ही त्यांचीही जबाबदारी आहे. आंबेडकरांच्या समाजशास्त्राचा अभ्यास प्रामुख्याने चार घटकांत केला जाऊ शकतो. अस्पृश्यता आणि सामाजिक विषमतेचा अभ्यास, आंबेडकरांचे धर्मविचार, महिला सशक्तीकरण आणि भारतीय संविधानातील उपयुक्त सामाजिक तत्वज्ञान, आंबेडकरांनी जात आणि वर्णाश्रमचा सखोल अभ्यास केलेला आहे. हा अभ्यास फक्त महाराष्ट्रापुरता नव्हता तर जागतिक स्तराचा होता. ब्रिटीशकालीन भारतात डॉ हर्बर्ट रिस्ले यांनी भारतातील ३२७८ जातींचा शोध लावला होता. ही यादी त्यांनी ब्रिटीश सरकारला सुपूर्द केली होती. यावरून एक लक्षात आलं होतं की भारतात गुंतागुंतीची विषमता होती. डॉ आंबेडकरांनी चातुर्वर्ण्य पद्धतीवर कडाडून टीका केली होती. ते म्हणायचे की कोणा एका अवताराने सांगितलं म्हणून एका माणसाने चार वर्ण निर्माण करून समाजाची निर्मिती केली यात तथ्य आढळत नाही. भारतीय जात व्यवस्थेनं भारताला प्रचंड प्रमाणात संकुचित करून ठेवलेलं आहे. भारतात सामाजिक ऐक्य अजिबात दिसत नाही. यामुळे भारतात सहकार, समता, बंधुता या नीतीतत्वांच्या ऐवजी द्वेष, क्लेश, दहशत आणि उंचनीच सारखे तत्व बळकट झाले, भारतीय जातव्यवस्थेनें माणसात आळस देखील निर्माण करून ठेवलेला आहे. तेशेवटी म्हणतात की एक दिवस असा ये ईल जेव्हा ब्राह्मणांनाच जातीय व्यवस्था नकोशी होईल किंवा समाजातील आर्थिक परिवर्तनाच्या प्रवेशानंतर शिक्षणाच्या वाढलेल्यामहत्वानंतर ते चौथ्या वर्णावर घेतील, तो दिवस फारसा दूर नसून, ते वास्तव कुणालाही नाकारता येणार नाहीय. डॉ. आंबडेकर आर्यन सिद्धांताचे कट्टर विरोधक होते.

**२. अस्पृश्यतेसंबंधी विचार :**

जातीव्यवस्थेचे कडू फळ म्हणजे भारतीय समाजातील अस्पृश्यता होय. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेचे सखोल अध्ययन केले. 'शुद्र मुळचे कोण? who were the shudras?अस्पृश्य पूर्वी कोण होते? व ते अस्पृश्य का बनले? (Untouchable, who were they and why they be comeuntouchable ?) (१९४८) या ग्रंथातून त्यांनी आपले अस्पृश्यतेसंबंधी विचार मांडले आहेत. डॉ. आंबेडकरांनी हिंदुधर्म ग्रंथाचा सखोल अभ्यास केला व वर्णव्यवस्था अस्पृश्यतेस कशी जबाबदार ठरली याचे स्पष्टीकरण दिले. अभ्यासांती त्यांनी अस्पृश्यतेवर टिका केल्या अस्पृश्यता निर्मूलनासाठी प्रयत्नही केले. या अर्थाने डॉ. आंबेडकरांचा अस्पृश्यतेच्या अध्ययनाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनदिसून येतो.

**३. धर्मासंबंधीचे विचार :**

धर्मचिकित्सेच्या परंपरेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. त्यांनी भारतातील विविध धर्माचा सखोल अभ्यास केला. त्यातच हिंदूधर्मातील जाचकरिती रिवाज, बंधनावर टिका केल्या. 'रिडल्र्स इन हिंदूझम' यासारख्या ग्रंथातून हिंदूधर्मातील दोष दाखविले. ब्राम्हण पुरोहिताने सामान्य हिंदू माणसाला कोणत्या खाईत लोटले त्यांचेभान आणून देणे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मचिकित्सेमागचा हेतू होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मचिकित्सा करताना हिंदू कोणास म्हणावे, जातीव्यवस्था कशी निर्माण झाली, वेद सनातन कसे? वेदाचे मूळ नेमके कोणते? कर्मकांडाचे स्तोम का? इत्यादी प्रश्नांचा शोध घेतला. एवढ्यावरच न

थांबता हिंदूचा जाचक ग्रंथ 'मनुस्मृतीचे' खंडन आणि दहनही केले. हिंदू धर्मात सुधारणा सुचविल्या. शेवटी धर्मांतरही केले.

विविध धर्माचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून तौलनिक पध्दतीने अभ्यास केला. शेवटी बौध्द धर्माच्या तत्त्वाशी ते सुसंगत झाले. त्यावर 'The Buddha And His Dhamma' (१९५७) या मौलिक ग्रंथाचे प्रकाशन डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या महापरिनिर्वाणानंतर झाले. हा त्यांचा धर्मचिकित्सेचाच भाग आहे.

अर्थातच, डॉ. आंबेडकरांनी धर्मसुधारणात्मक दृष्टीकोनातून हिंदू धर्माचे अध्ययन व संशोधन केले.

महात्मा गांधी म्हणायचे की डॉ बाबासाहेब आंबेडकर हे हिंदू धर्मासमोर असलेलं एक वैचारिक आव्हान आहे. आंबेडकरांचे धार्मिक विचार बुद्ध आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांशी समान आहेत. आंबेडकरांनी हिंदू धर्माचा सर्वतोपरीनं अभ्यास केलेला होता. लहानपणीचे अनुभव है त्यांच्या धार्मिक अभ्यासात मौलाचे ठरले. आंबेडकर हे कालातराने बौद्ध धर्माच्या जवळ गेले. कारण बौद्ध धर्म आत्मा आणि अवतार परंपरा ठामपणे नाकारतो. कार्ल मार्क्सचे विचार त्यांनी गांभीर्याने घेतले होते. कार्ल मार्क्सच्या अनुसार धार्मिक इतिहासाचं कथन करण्याऐवजी समकालीन परिस्थितीत विवेकवादी विचारांच्या माध्यमातून परिवर्तन कसेघडेल या दृष्टीने समाज पुढे जायला हवा. आंबेडकरांना धर्मांतर आणि संस्कृतीकरण या दोन धार्मिक प्रक्रिया मान्य नव्हत्या. समाजात धार्मिक गतिशीलता मिळावी म्हणून जे दलित लोक इतर धर्मात गेले त्याच पुढे काय झालं? धर्मांतर हा फक्त तात्पुरता दिलासा आहे. जगभरातील सगळया प्रस्थापित धर्मात अनेक समुदाय आणि पंथ आहेत. आज त्या धर्मात धर्मांतरीत लोकांचा वेगळा पंथ निर्माण झाला आहे जो धार्मिक दृष्ट्या पूर्णपणे वंचित आहे. दुसरीकडे संस्कृतीकरणात, वंचित लोक उच्चजातींचा जीवनशैलीचं अनुकरण करतात आणि कालांतराने आम्ही उच्च जातीचे आहोत हे सांगत सुटतात. आंबेडकरांनी अशा अनेक जातींची यादी दिलेली आहे जे पुढे जाऊन स्वतःला ब्राह्मण म्हणून संबोधित करू लागले, डॉ आंबेडकरांनी मनुस्मृतीचेकायदे नाकारले होते. तेविचारतात "हिंदू धर्म तत्वांचा आहेकी नियमां चा आहे?"

**४. स्त्रीसंबंधी विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील स्त्रीयांच्या सामाजिक दर्जाचे सखोल अध्ययन केले. यावर "हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती' हा लेख लिहिला. त्यांनी येथील स्त्रियांच्या सामाजिक दर्जात सुधारणा व्हाव्यात यासाठी स्त्रीशिक्षणाचा मार्ग सांगितला. कुटुंबनियोजनाचा त्यांचा हेतू स्त्री विकासाचा होता. स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळावे यासाठी त्यांनी संसद सभागृहात 'हिंदू कोड बील' मांडले. यात स्त्री कोणत्याही जातीची असो; ती दलितच आहे असे लक्षात घेऊन त्यांना नऊ प्रकारच्या अधिकाराची तरतूद केली. मात्र या बिलावरुन आंबेडकरांना अनेकांचा रोष घ्यावा लागला, धमक्या येऊ लागल्या. शेवटी हे बिल मंजूर झाले. मात्र १९५१ मध्ये बाबासाहेबानी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यावरुन त्यांचा स्त्रीहक्कामागचा त्याग दिसून येतो.

बाबासाहेबांनी स्त्रियांच्या राहणीमानावर, शिक्षणावर भाषणे देऊन लिखाण करुन त्यांचा सामाजिक दर्जा सुधारण्यावर भर दिला. स्त्री-पुरुष समानतेला प्राधान्य दिले.

डॉ. आंबेडकरांचे महिला सशक्तीकरणा संबंधीचे विचार त्यांनी लिहिलेल्या 'अ मेसेज टू बहुमेन' या निबंधात आढळतात. आंबेडकर स्त्रियांना अनेक गोष्टी सांगतात ज्यात आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रक्रियेत सक्रीय सहभाग, अंधश्रद्धेपासून दूर राहणं, तब्बेत सांभाळणे, मुलांना शिक्षण पूर्ण करू देणे त्यांना एका पायावर उभं करणे. दुर्बलतेचा धिक्कार करणे, लग्नाची घाई न करणेसारखे तत्व सामील आहे त. डॉ आंबेडकरांनी स्त्रियांना संपत्तीचा आणि मतदानाचा हक्क पूर्णपणे दिलेला आहे.

**५. शिक्षणासंबंधी विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जिवनामध्ये शिक्षणाला सर्वाधिकमहत्त्व आहे. शिक्षणाला डॉ. आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षणासंबंधी मौलिक असे विचार मांडले. सामाजिक दुखण्यावर शिक्षण हेच औषध आहे; असा त्यांचा दृष्टीकोन होता.

त्यांनी मुला-मुलींच्या प्राथमिक शिक्षणावर भर दिला. शासनाने प्राथमिक शिक्षणावर अत्याधिक खर्च करावा हे शिक्षण खालच्या स्तरापर्यंत पोहचले पाहिजे. मागास विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व वसतिगृहाची आवश्यकता दर्शविली. प्राथमिक शिक्षणाबरोबर विद्यापीठाचे शिक्षणावरही त्यांनी भर दिला. शासनाने शैक्षणिक उपक्रमासाठी दक्ष असावे. भारतातील शैक्षणिक समस्येचा अभ्यास करताना शिक्षण, शिक्षणसंस्था, शिक्षण पध्दती, शासनाचे शिक्षणाबाबतची कर्तव्ये याबाबींवर प्रकाश टाकला.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी यासाठी आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात विशद केले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो पिल तो माणूस गुरगुरल्या शिवाय राहणार नाही, असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाली की, तो किंवा ती पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावी. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होते. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाजहितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांनी ध्यानी घ्यावे. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन १९४६ साली करून त्यांनी मुंबईला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलिंट महाविद्यालय सुरू केले.

**६. आर्थिकविचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील आर्थिक जिवनाचे अध्ययन करुन येथील समाजाविषयीचे विचार मांडले. त्यांच्या अध्ययनामध्ये प्रामुख्याने त्यांनी 'प्राचीन भारतीय व्यापार' (१९१५), 'भारताचे राष्ट्रीय उत्पन्न : एक ऐतिहासिक व विश्लेषणात्मक अध्ययन' (१९१६), 'ब्रिटीश भारतातील राजेशाही, वित्ताचे प्रादेशिक विकेंद्रीकरण', 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती', 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' इ. शोध निबंधाच्या माध्यमातून भारतातील आर्थिक दयनियतेचे चित्र रेखाटले. भारतीय समाजातील अर्थव्यवस्थेचे सखोल अध्ययन त्यांनी केले होते. भारतात सामाजिक समता प्रस्थापित व्हावी यासाठी आर्थिक समता कशी निर्माण होईल यावर त्यांनी भर दिला. अर्थात, ते राज्यसमाजवादाचे पुरस्कर्ते होते.

**७. राजकीयविचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाच्या राजकीय परिस्थितीचे देखील सखोल अध्ययन केले. भारतासाठी आवश्यक अशी शासनप्रणाली म्हणून 'लोकशाही' शासनप्रणालीचा त्यांनी उल्लेख केला. लोकशाहीवर त्यांची प्रचंड निष्ठा होती. विविधतेने नटलेल्या भारतीय समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व सामाजिक न्याय यावर आधारलेली संसदिय शासनप्रणाली तारु शकते, असे विचार त्यांनी मांडले. त्यांनी राज्यसमाजवादाचाही स्वीकार केला. भारतासाठी 'एक व्यक्ती आणि एक मूल्य' चा स्वीकार त्यांनी केला. देशाच्या समाजाच्या विकासासाठी 'संघराज्य' शासन व्यवस्था आवश्यक असल्याचे त्यांनी मत व्यक्त केले.

**सारांश :**

एकंदरीत, भारतीय समाजाचा दलितवादी, दृष्टीकोनातून मानवतावादी दृष्टीकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास केला. भारतीय समाजातील जातीव्यवस्था, अस्पृश्यता, धर्म, स्त्री जीवन, शिक्षणप्रणाली, आर्थिक जिवन, राजकीय व्यवस्था इ. घटकांचे सखोल अध्ययन केले. त्याचबरोबर समाजसुधारणेचे कार्य देखील केले. या अध्ययनाला संशोधनाला विचाराला शास्त्रीय आधार होता असे आपणास सांगता येईल. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील सर्व श्रेष्ठ समाजशास्त्रज्ञापैकी एक होते. आपल्या संघर्षमय जीवनात अनेक व्यथा अनुभवत त्यांनी चार डॉक्टरेट पदव्या मिळवल्या होत्या. त्यातील दोन डॉक्टरेट पदव्या त्यांना सन्मानार्थ प्रदान करण्यात आल्या होत्या. डॉ आंबेडकरांनी सखोल अभ्यास करून अनेक महत्वाच्या विषयांवर विद्वत्ता मिळवली होती. यात अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, कायदा, प्रशासन आणि इतर महत्वाच्या विषयांचा समावेश आहे. पण आपल्या वैयक्तिक विचारात डॉ आंबेडकर स्वतःला सामाजिक आणि धार्मिक चिंतक समजत असत. एका व्याख्यानात डॉ आंबेडकर म्हणाले होते की "माझी वैचारिक मूळ शोधायची असतील तर ती राज्यशास्त्रात न शोधता धार्मिक चिंतनात शोधा". आंबेडकरांचे वडील रामजी आंबडेकर हे फार धार्मिक स्वभावाचे होते. जसं वय वाढत गेलं तसं आंबेडकरांनाही कळलं होतं की आपल्या वडिलांच्या भक्तीला त्या काळातील हिंदू समाजात काहीच स्थान नव्हतं. आंबेडकरांना संस्कृत भाषा शिकण्याची इच्छा होती पण ते ही साध्य नव्हतं. डॉ कांची इल्लय्यांच्या मते आंबेडकरांनी स्वतःच्या हिमतीने शैक्षणिक अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. या प्रक्रियेत तेचार विषय त एमए झाले. एलएलबी झाले. अर्थशास्त्रात दोनवेळा पीएचडी झाले. जर्मनीतील बॉन विद्यापीठात जाऊन त्यांनी संस्कृत साहित्याचा अभ्यासही केला होता.

डॉ आंबेडकरांनी भारतीय संविधानाला धर्मनिरपेक्ष बनविले. त्यात समाजवादी तत्व सामीलही केले. त्यांच्या विचारांबद्दल लिहिण्यासारखे भरपूर आहे. कारण त्यांच्या अभ्यासाची व्याप्तीच प्रचंड मोठी आहे. तो एक सुवर्णकाळ होता जेव्हा भारताचे न्याय आणि कायदा मंत्री जगातले सगळयात मोठे प्रकांडपंडित होते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. जाटव डी. आर.-1990, डॉ. बी. आर. अम्बेडकर का नैतिक दर्शन, जयपूर ,समतासाहित्य सदन.

2) डॉ. अनिल सिंगारे, डॉ. विठ्ठल घुले- 2009, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास लातूर, अरूणा प्रकाशन.

3) डॉ. ना.तु. कांबळे-2010,दलित चळवळीच्या दिशा : एक चिंतन-, औरंगाबाद,चिन्मय प्रकाशन.

4) शेख बि. बि. सुनंदा भद्रशेट्टे -2010 समाजशास्त्रीय विचारवंत, लातूर अरूणा प्रकाशन.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक भारतीय समाजशास्त्रज्ञ

पंदिलवाड ए. एम.
संशोधक विद्यार्थी
सामाजिकशास्त्र संकुल, एस.आर.टी.एम.यु.नांदेड.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार लोकशाहीचे पुरस्कर्ते व मानवी स्वातंत्र्याचे कैवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सर्वार्थाने मौलिक विचार ठरतात. जन्मभर कठोर ज्ञानसाधना करुन विधिशास्त्रज्ञ शोषित पिडीत लोकांच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य समर्पित करणारे, एक खंबीर पत्रकार, दलितोद्धारक, ज्ञान पिपासू, ग्रंथवेडे व्यक्तिमत्व, ज्ञानसुर्य, प्रज्ञासुर्य, सामाजिक न्याय व समतेचा पुरस्कार करुन लोकशाहीचे मूल्य शिरोधार्थ माननारे, कुशल कायदेपंडित, बुद्धीमान राजकिय नेता व उच्चशिक्षण तज्ज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ओळखले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान भारतीय समाजाच्या दृष्टीकोनातून बहुआयामी स्वरुपाचे आहे. त्यांच्या वेगवेगळया क्षेत्रातील अध्यनामुळे, चिकित्सक संशोधन वृतीमुळे आणि सुधारणात्मक कार्यामुळे ते संपूर्ण जगाला परिचित आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय समाजव्यवस्थेचे सखोल अभ्यासक होते. त्यांचे अध्ययन हे वैज्ञानिक चौकटीतून केलेले होते. म्हणूनच ते एक भारतीय समाजशास्त्रज्ञ ठरतात.
एक समाजशास्त्रज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाचा अभ्यास दलितवादी आणि मानवतावादी असा दोन दृष्टीकोनातून केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजशास्त्रज्ञ रुपाने भारतीय समाजातील ज्या-ज्या घटकांचा अभ्यास केला. त्याविषयीचा आढावा पुढील मुद्याद्वारे सांगता येईल.

शोधनिबंधाचा उद्देश:-

एक भारतीय समाजशास्त्रज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्ययनाचा आढावा घेणे.

1) जातीविषयक अध्ययन:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील जातीव्यवस्थेचा सखोल अभ्यास केला. बाबासाहेब आंबेडकर कोलंबिया विद्यापीठामध्ये शिक्षण घेत असताना 'भारतीय समाजातील जाती' या विषयाचा शोधनिबंध मानवशास्त्र विभागात सादर करुन जातीव्यवस्थेचे विस्तृत, विदारक चित्र जागतिक पातळीवर मांडण्याचे कार्य केले.

भारतातील अस्पृश्यांना होणाऱ्या त्रासाची आंबेडकरांना जाणिव होती. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना वावरण्याची परवानगी नव्हती. ते मूलभूत हक्कापासून वंचित होते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हा संदेश दिला. अस्पृश्यांना समान दर्जा मिळवून देण्यासाठी आंबेडकरांनी सत्याग्रहाच्या मार्गाने अनेक लढे दिले. महाड येथील चवदार तळे अस्पश्यांना खुले करावे म्हणून लढा दिला. तसेच पुणे येथील पार्वती मंदिरात (1927), नाशिक येथील काळाराम मंदिर (1936) प्रवेश मिळवून देण्यासाठी सत्यागृह केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रभावी नेतृत्व लाभल्यामुळेच अस्पृश्यांच्या चळवळीचा पाया मजबूत झाला अस्पश्यांवर होणाऱ्या अन्यायाचे, क्रुरतेचे, विषमतेचे प्रति असलेल्या मनुस्मृतीचे आंबेडकरांनी 1927 मध्ये जाहीरपणे दहन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्यतेच्या अध्ययनाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोन होता.

2) अस्पश्यतेसंबंधी अध्ययन :-

स्पृश्याचे हिसंबंध सुरक्षित ठेवणारे कारस्थान म्हणजे अस्पृश्यता होय. अस्पश्यते विषयी विचार मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की चातुर्वण्य व्यवस्थेतील ज्या लोकांचा स्पर्श हा विटाळ मानला जाई त्याला अस्पृश्य म्हणतात. आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या उगमविषयीचा विचार Who were the shudras आणि untouchables या ग्रंथात मांडले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. 31 मे 1936 रोजी मुंबई येथे भरलेल्या अखिल मुंबई इलाखा परिषदमेमध्ये अस्पृश्यतेच्या प्रश्नांचे विश्लेषण करुन, अस्पृश्यता दूर करण्यासाठीचे विचार मांडले.

3) धर्मासंबंधीचे अध्यन:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक दृष्टिकोनातून धर्माचा सखोल अभ्यास केला आहे. ते म्हणतात हिंदूचे बहुसंख्य ग्रंथ हे राजकिय हेतूनी लिहिलेले, फसव्या पक्षपाती व खोट्या काल्पनिक बाबीचे भांडर आहे. म्हणून सर्वच सामाजिक परंपरेचे व धर्मग्रंथाचे बुध्दीनिष्ठ परीक्षण करुन त्यामधील जे-जे सद्सद्विवेक बुद्धीला पटत नाही त्याचा त्याग करण्याची तयारी ठेवावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मात असलेल्या जाचक रितीरिवाजावर रिडल्र्स इन हिंदुझम या ग्रंथांच्या माध्यमातुन हिंदू धर्मातील दोष दाखविले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेगवेगळ्या धर्माचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून तूलनात्मक पद्धतीने अभ्यास करुन शेवटी बौद्ध धर्माचा स्विकार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1957 मध्ये धर्मचिकित्सेचाच एक भाग म्हणून The Buddha and His Dhamma हा ग्रंथ लिहिला.

थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मसुधारणात्मक दृष्टीकोनातून हिंदू धर्माचे अध्ययन केले.

4) शिक्षणातील योगदान :-

शिका संघटित व्हा संघर्ष् करा हा संदेश एक उद्धाराचा राजमार्गच बाबासाहेबांनी संपूर्ण भारतवासीयांना दिला. देशातील विषमता नष्ट करणारा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण होय असे त्यांनी सांगितले. बाबासाहेबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात प्रथम स्थान हे शिक्षणाला दिले. शिक्षणामुळे मानवी मेंदू प्रगत होतो, ज्ञानाचा विस्तार होतो.एवढेच नाही तर शिक्षणामुळे सामाजिक उद्दिष्टांची परिपूर्ती करण्यासाठी व्यक्ति सामाजिक कर्तव्याबाबत नेहमी सजग राहतो. व्यक्तिचे जीवन शिक्षणाशिवाय अपूर्ण राहते. व्यक्तिील अन्यायाविरुद्ध उठाव करण्याचे सामर्थ्य, जाणीव केवळ शिक्षणामुळेच होते असा बाबासाहेब आंबेडकरांचा विश्वास होता. त्यासाठी त्यांनी घटनेच्या 45 व्या कलमान्वये वयाची 18 वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी शासन व्यवस्थेची असल्याची तरतूद केली. स्वत: बाबासाहेबांनी अति उच्च शिक्षण घेऊन संपूर्ण जगासामोर आदर्श निर्माण केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन व्यापक होता हे लक्षात येते.

5) स्त्रीसंबंधी अध्ययन:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील स्त्रीयांच्या सामाजिक दर्जांचा सखोल अभ्यास करुन "हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती" हा लेख लिहिला.

असे म्हणतात की, प्रत्येक यशस्वी पुरुषांच्या पाठीमागे एका स्त्रीचा हात असतो. परंतू स्वतंत्र भारताच्या संपूर्ण् स्त्रियांच्या प्रगतीमागे बोधिसत्व महापुरुष डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचा हात आहे. आज स्वतंत्र भारतात कित्येक अधिकार महिलांना बाबासाहेबंमुळे मिळाले आहेत. समाजात स्त्री आणि पुरुष हे दोन्ही घटक महत्त्वाचे आहेत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. भारतीय महिलांना त्यांनी भाषणाच्या माध्यमातून राहणीमान, शिक्षण, आरोग्य इत्यादी संदर्भात वेळोवेळी मार्गदर्शन करीत. भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना जाचक रुढी आणि परंपरापासून सुटका मिळावी यासाठी अथक प्रयत्न बाबासाहेबांनी केले. बाबासाहेब हे केवळ बोलते सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते. कायद्याचे कवच मिळाल्यावर स्त्रियांना हक्क मिळतीलच असे ते म्हणत त्यामुळे स्त्रीयांना वारसा हक्क, पोटगी, घटस्फोट घेण्याचे स्वातंत्र्य, विवाह अधिनियम, पुनर्विवाह अधिकार इत्यादी बाबी मिळाल्या. संविधानात वेगवेगळे कायदे करुन खऱ्या अर्थाने बाबासाहेबांनी स्त्रियांना सशक्त केले. स्त्री कोणत्याही धर्माची असो बाबासाहेब आंबेडकर तिच्याकडे मानवी दृष्टीकोनातून पाहत असे. ज्या ठिकाणी स्त्रियांना कमी लेखले गेले त्या-त्या ठिकाणी त्यांनी स्त्रियांचे कायदे करुन प्रतिष्ठा मिळवून दिली. बाबासाहेबांनी आपल्या भाषणातून स्त्रियांना संघर्ष करण्यास प्रेरित केले.

6) आर्थिक अध्ययन:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील अर्थव्यवथेचे सखोल अध्ययन केले. भारतीय समाजात सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी आर्थिक समता कशी निर्माण करता येईल यावर बाबासाहेबांनी भर दिला. तसेच लोकांच्या आर्थिक जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणण्यासाठीच राजकिय लोकशाहिचे सामाजिक, आर्थिक लोकशाहीत रुपांतर करावे लागेल असा आग्रह बाबासाहेबांनी धरला. शैक्षणिक क्षेत्रात असलेल्या बंदीमुळे समाजविकास कुंठीत झाला आहे. त्यांचाच परिणाम म्हणून सामाजिक आणि आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. ही विषमता दुर करण्याचे धोरण आवश्यक आहे. त्याकरिता डॉ. बाबासाहेबांनी आर्थिक विकाससंदर्भात नव्या संकल्पना देशाला दिल्या त्या म्हणजे देशातील उद्योगधंदे, शेती मालाची प्रक्रिया करणारे, आणि शेतीवरील

लोकसंख्येचा भार कमी करणारे असावे, जमीनीचे राष्ट्रीयीकरण करावे, उद्योगधंदे हे सरकारी मालकीचे असावेत लोकांचे शिक्षण, त्यांचे आरोग्य यासारख्या सेवांची जबाबदारी शासनाची असावी असा समाजवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार बाबासाहेबांनी केला. डॉ. बाबसाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखेले जातात. त्यांचा मुख्य विषय अर्थशास्त्र होता. त्यांनी अर्थशास्त्र या विषयावर मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे. त्यांच्या लिखाणामध्ये कृषी-उद्योग विषयक विचार, शेती, शेतकऱ्यांचे शोषण,मूलभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण बाबत विचार स्त्रीयांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे विचार दिसून येतात.

बहुजन हिताय बहुजन सुखाय यासारख्या मंत्रातून त्यांचे आर्थिक विचार स्पष्टपणे दिसतात. डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय विचार हे नेहमीच त्यांच्या समाजशास्त्रीय दृष्टीकोनावर आधारित होते.

7) भारताचे राजकीय अध्ययन:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकिय क्षेत्राचा देखील सखोल अभ्यास केला त्यांची लोकशाही शासनप्रणालीवर खूप निष्ठा होती. विविधतेने नटलेल्या भारताला संसदीय लोकशाहीच तारु शकेल असे त्यांचे मत होते. डॉ. बाबासाहेबांनी भारतातील वेगवेगळया राजकिय प्रश्नाबाबत आणि राजकिय तत्वज्ञानाबाबतचे आपले विचार लेखातून, पूस्तकातून, भाषणातून लोकांना सांगितले त्यांचे हेच विचार म्हणजे राजकिय विचार होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची राज्यघटना लिहून त्या घटनेच्या माध्यमातून सर्व दलित, पिडित, वंचति मागासलेल्या, उच्च निच्च आणि स्त्री वर्गांना मतदानाचा हक्क देऊन सर्वांना राजकिय प्रवाहात आणण्याचे काम केले आहे.

थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितवादी आणि मानवतावादी दृष्टीकोनातून भारतीय समाजाचा समाजशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास केला. त्यांनी भारतीय समाजातील अनेक घटकांचे सखोल अध्ययन केले. भारताच्या एकूण विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्वच क्षेत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान होते. त्यांचे कार्य म्हणजे न भूतो न भविष्यते असे आहे.

संदर्भ ग्रंथ :

1. दलित चळवळीच्या दिशा: एक चिंतन डॉ. ना.तु कांबळे चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
2. समाजशास्त्रीय विचार- डॉ. बी.एम. कऱ्हाडे, पिंपळापूरे ॲण्ड कंपनी, नागपूर.
3. माझी आत्मकथा: डॉ. बाबासाहेब आंबेड, ज्ञानसंवर्धन प्रकाशन, कोल्हापूर.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समन्यायी जलधोरण

डॉ. सोनाली वाखरडे
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई

आजवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकिय अशा विविध क्षेत्रातील बहुमोल योगदानावर बऱ्याच विचारवंतांनी प्रकाश टाकला आहे. पण त्यांच्या जलनीती धोरणातील योगदानाबद्दलही जाणून घेणे आवश्यक आहे. त्यांनी मांडलेले जलविषयक विचार हे केवळ देशातील पाणी प्रश्न सोडवण्यापुरते मर्यादित नव्हते तर ते पाण्याचे न्यायपूर्वक वाटप कसे करता येईल यावरही भर देणारे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाण्याचा शास्त्रीय, तांत्रिक आणि अभियांत्रिकी अभ्यास करून सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पातळीवर पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी शाश्वत विकासासाठी जलसंपत्तीचे सुयोग्य नियोजन करणारे मौलिक विचार पुढे आणले. त्यात समाजातील सर्व घटकांना पुरेसे पाणी मिळावे, उपलब्ध पाण्याचा अपव्यय न होऊ देता त्याचा योग्य उपयोग व्हावा आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन व्हावे या दृष्टीने विचार मांडले. पाणी ही देशाची संपत्ती आहे त्याचा सुयोग्य, समतोल व समन्यायी वापर झाला पाहिजे, त्याचे जतन व संवर्धनही झाले पाहिजे या जबाबदारीच्या भावनेतून त्यांनी जलधोरण अंमलात आणले. त्यांच्या विचार आणि कृतीत कायम वास्तववादी, विज्ञानवादी आणि मानवतावादी दृष्टिकोन होता. भारतातील सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी वैधानिक पातळीवर प्रयत्न करण्याची गरज ओळखून त्यांनी आदर्श राज्यघटना निर्माण केली. त्यामुळे आधुनिक मूल्यावर आधारित समाज प्रत्येकाच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करेल अशी आशा भारतीयांच्या मनात निर्माण झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर जगभर आर्थिक संकट आले होते तेंव्हा भारताने या संकटावर मात करण्यासाठी पुनर्निर्माण योजना आणि आर्थिक विकासावर भर दिला. त्यासाठी व्यापक, बहुउद्देशीय आणि दूरदर्शी योजनांची आवश्यकता आहे हे बाबासाहेबांनी ओळखले. त्यातून त्यांनी सर्वसमावेशक आणि समतल विकास हे उदिष्ट समोर ठेवून विविध विकास धोरणे आखली. लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, रोजगार वाढविण्यासाठी आणि संसाधनांचे सामान वाटप होऊन सर्वांना समान संधी मिळावी यासाठी प्रयत्न केले. त्यावेळी शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र यांचा विकास साधण्यासाठी सिंचन, वीज, यंत्रसामुग्री, तंत्रज्ञान, रस्ते आणि वाहतूक या सर्व सुविधा निर्माण करणे आवश्यक होते. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्यामुळे सिंचन विकासावर विशेष भर देणे आवश्यक होते. नवनवीन उद्योग आणि तंत्रज्ञानासाठीही नैसर्गिक संसाधने पुरेशी उपलब्ध असणे गरजेचे होते. एकंदरीतच या सर्व बाबींचा विचार करता लक्षात आले की, पाण्यासारख्या नैसर्गिक संसाधनांची मुबलक प्रमाणात उपलब्धता होणे महत्वाचे आहे. म्हणून बाबासाहेबांनी शेती सिंचन आणि उद्योगधंद्यासाठी वाढत्या पाण्याची गरज ओळखून नवीन जलनीती धोरण आखले गेले.

१९४२ ते १९४७ च्या कालावधीत बाबसाहेबांकडे श्रम, जलसिंचन आणि ऊर्जा खात्याची जबाबदारी सोपविण्यात आली. तेंव्हा उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी नदीवर जलाशय निर्माण करणे, आंतरराज्यीय नद्यांचा विकास करणे, राष्ट्रीय नदीजोड प्रकल्प, पूरनियंत्रण, अंतर्गत

जलपर्यटन अशा अनेक कल्पना त्यांनी मांडल्या. जलसाधन सामुग्री आणि विद्युत ऊर्जा विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर धोरण आखले. यातून नंतर जल मंत्रालय आणि विद्युत मंत्रालय निर्माण झाले. या काळात बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली, श्रम मंत्रालयाच्यावतीने आंतरराज्यीय नद्यांच्या समस्या सोडविण्यासाठी नद्या खोरे प्राधिकरण आले. प्रादेशिक आणि बहुउद्देशीय नद्या खोऱ्यांचा विचार आला. बाबासाहेबांनी राज्याराज्यांत पाण्यासंबंधी वाद उद्भवू नये म्हणून पाणी हा केंद्र सरकारच्या आखत्यारीतला विषय असावा अशी भूमिका घेतली. त्यामुळे आंतरराज्यीय जलविवाद या विषयाकडे लक्ष केंद्रित झाले. १९४२ साली बाबासाहेबांनी मजूर मंत्री म्हणून श्रम, सिंचन आणि वीज या विभागाची कामे हातात घेऊन, त्यातून सिंचनासाठी मोठ्या प्रकल्पांचे नियोजन व धोरण निर्मिती प्रक्रियेला गती प्राप्त करून दिली. दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुड धरण, सोननदी प्रकल्प यात बाबासाहेबांचे उल्लेखनीय योगदान आहे. १९४४ मध्ये बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय जल आयोग, पाटबंधारे आणि नौकायान आयोग यांची स्थापना झाली. त्यांनी मानवाच्या पाण्याच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी पुराच्या पाण्याचा विनियोग करावा हा महत्वपूर्ण विचार पुढे आणला. त्यातून भूपृष्ठावरील अतिरिक्त पाण्याला वाया जाऊ न देता नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून साठवून ठेवता येते, तसेच या साठवलेल्या पाण्याचा उपयोग शेती सिंचनासाठी, नौका पर्यटनासाठी आणि वीजनिर्मितीसाठी करता येतो हे लक्षात आले. आज मानवाच्या विविध गरजांसाठी विशेषतः शेती सिंचनासाठी मोठ्या प्रमाणावर भुगर्भजलाचा उपसा केला जातो. यामुळे भूजल पातळी खालावत चालली आहे. भूमिगत पाणी उपसण्यापेक्षा भूपृष्ठावरील पाण्याचा पुरेपूर उपयोग करून घेता येईल असे मुद्दे बाबासाहेबांनी मांडले होते. यामुळे भुगर्भजलाचा अतिउपसा रोखण्यास पर्यायउपलब्ध झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाणी व्यवस्थापनात बहुमोल योगदान दिले आहे. सिंचन व ऊर्जा क्षेत्रातील निवेदन, जल विद्युत प्रकल्प, जलनीती धोरणातील केंद्र व राज्य सरकारच्या भूमिका निश्चिती, नदीजोड प्रकल्प, जल पर्यटन अशा विविधांगी विषयांची हाताळणी करून बाबासाहेब 'जल नियोजनाचे जनक' बनले. त्यांनी नदी खोरे व पाणलोट क्षेत्राच्या विकासासाठी प्रादेशिक व बहुउद्देशीय संकल्पना मांडल्या. दामोदर नदी खोरे महामंडळाच्या निर्मितीतून केंद्र व प्रांतात समन्वय साधता आला. या प्रकल्पाच्या यशाने अनेक नवे आंतरराज्यीय बहुउद्देशीय प्रकल्प उभे राहिले. बाबासाहेब संशोधक वृत्तीने काम करीत असल्याने त्यांनी पाण्याच्या केवळ तांत्रिक प्रश्नांची उकल केली नाही तर सामाजिक व आर्थिक बाजुंचीही चिकित्सक मांडणी करून पाणी समस्येवर उपाय सुचविले. यातून अल्पभूधारक शेतकऱ्यांचे शेती सिंचन विषयक प्रश्न सोडविण्यासही मदत होईल असा त्यांचा आशावाद होता. यावरून हे स्पष्ट होते की, केंद्रीय जलमार्ग, शेती सिंचन आणि सिंचन आयोगाच्या स्थापनेत बाबासाहेबांचे मोलाचे योगदान आहे.

पाणी हा मानवाचा मुलभूत अधिकार आहे. प्रत्येक सजीवाला जगण्यासाठी पाणी अनिवार्य आहे. त्यामुळे पाण्यावर कोणाचीही मालकी असू नये. नैसर्गिक संसाधनांवर सर्वांचा समान अधिकार असायला हवा. पण पूर्वीपासून समाजातील विशिष्ट लोकांनी पाणी ताब्यात घेतले होते. भारतात वरच्या जातींनी खालच्या जातीच्या लोकांचे पाणी हक्क नियंत्रित केले होते. वंचितांच्या पाणी हक्कासाठी बाबासाहेबांनी चळवळ केली. पण आजही जमीनदार, भांडवलदरांसारख्या प्रस्थापितांचे पाण्यावर वर्चस्व आहे. पाणी ही आर्थिक वस्तू बनली आहे. पाण्याला विक्रेय वस्तू बनवून त्यावर भांडवलदार नफा कमवत आहेत. पाणी पुरवठा ही सार्वजनिक क्षेत्राची सेवा असूनही पाणी हे खाजगी कंपन्या व जमीन मालकांच्या ताब्यात आले आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवी हक्काच्या

जाहीरनाम्याने २०१० साली पाणी हा मानवाचा मुलभूत अधिकार आहे असे जाहीर केले. हेच विचार बाबासाहेबांनी २० मार्च, १९२७ रोजीच्या चवदार तळे सत्याग्रहाच्यावेळी मांडले होते. बाबासाहेबांचा महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा पाणी हक्कासाठी झालेला ऐतिहासिक लढा आहे. हा पाण्याचा दूजाभाव, द्वेष आणि अत्याचाराविरोधात उठवलेला आवाज होता. यातून बाबासाहेबांनी पाण्याच्या समान हक्काची जाणीव करून दिली.

'पाणी संघर्ष' (Water Conflict) आणि 'पाणी संकट' (Water Crisis) हे दोन सारखे वाटणारे पण वेगवेगळे प्रश्न आहेत. जेव्हा पाणी उपलब्ध असूनही मानवाची पाण्यापर्यंत पोहंच नसेल तर त्या परिस्थितीला 'पाणी संघर्ष' असे म्हणतात. जातिव्यवस्थेच्या उतरंडीतील खालच्या जातींच्या लोकांना गावात पाणी असूनही ते पिण्यासाठी व वापरण्यासाठी मिळत नव्हते. पिण्याच्या पाण्याची म्हणजेच जगण्याची गरज भागविण्यासाठी अनेक हाल अपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. वंचित व उपेक्षित घटकातील महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत. भारताच्या इतिहासात याचे अनेक संदर्भ सहज आढळतात. 'पाणी संघर्ष' हे सामाजिक विषमतेचे एक भयाण वास्तव आहे. दलित, आदिवासी, भटके-विमुक्त ग्रामीण गरीब लोकांचा पाण्याचा प्रश्न 'पाणी संघर्ष' आहे आणि हा प्रश्न सामाजिक आणि आर्थिक विषमतेने निर्माण केलेला आहे. ज्यात फक्त समाजातील वंचित लोकांनाच पाणी मिळत नाही आणि प्रस्थापितांना सहज व मुबलक पाणी मिळते. जात, धर्म, वर्ग आणि लिंगभावावर आधारित भेदभाव दुष्काळी काळात आणखीनच उफाळून येतो. अवर्षण, पाणी टंचाई आणि दुष्काळ असलेल्या भागात वंचित समूहांना जास्त त्रास सहन करावा लागतो. आजही ग्रामीण भागात दलित वस्तीसाठी स्वतंत्र पाणवठे आहेत. हे पाणवठे उन्हाळ्यात आटले तर यांना गावातील सार्वजनिक पाणवठे सहज उपलब्ध होत नाहीत. तथाकथित पवित्र-अपवित्र भेदभावाच्या धारणा त्यांना पाण्याच्या मुलभूत हक्कापासून वंचित ठेवतात. यावरून लक्षात येते की, भेदभावाच्या खाणाखुणा अजूनही पूर्णपणे पुसलेल्या नाहीत. कित्येक गावात दलितेतर भागातील नळ किंवा विहिरींवर दलितांना मज्जाव केला जातो. बाबा आढाव यांच्या 'एक गाव एक पाणवठा' सारख्या चळवळीचा प्रभाव क्वचित गावांवरच पडलेला दिसतो. आर्थिक संपन्नता असणारे नैसर्गिक संसाधनांना नियंत्रित करू लागले आहेत. आज महाराष्ट्रात मोठी टँकर लॉबी उभी राहिलेली दिसते. प्रत्येक गावात बाटलीबंद पाण्याचा विक्री होत आहे. स्वच्छ आणि सुरक्षित पाणी मिळणे हा जर मानवाचा अधिकार आहे तर मग तो मिळवण्यासाठी आज प्रत्येकाला पैसे का मोजावे लागत आहेत?

जेव्हा सर्व संसाधनावर ताबा असणाऱ्या प्रस्थापितांनाही पाणी मिळत नाही आणि त्यांनाही पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवते तेंव्हा अशा परिस्थितीला समाजात 'पाणी संकट' निर्माण झाले आहे असे म्हणतात. आज 'पाणी संकट' ही एक पर्यावरणीय गंभीर समस्या म्हणून पुढे आली आहे. अलीकडील काळात पृथ्वीवरील तापमान वाढ, हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोड, दुष्काळ अशा अनेक कारणाने वाढती लोकसंख्या व वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजांसाठी उपलब्ध पाणीसाठे अपुरे पडत आहेत. म्हणून आज 'पाणी संकट' ही पर्यावरणीय समस्या संपुर्ण जगाला भेडसावत आहे. अतुल देऊळगावकर यांनी आपल्या 'विश्वाचे आर्त' या पुस्तकात सांगितले आहे की, आज जगभरात कुठला देश व तेथील जनता जल सुरक्षित आहे हे तपासण्यासाठी 'जल दारिद्रय निर्देशांक' ही संकल्पना आली आहे. उपलब्ध जलसंपदा, पाण्यापर्यंत सर्वांची पोहच, पाणी खरेदी करण्याची क्षमता, पाणी वापराची कार्यक्षमता आणि पर्यावरण या पाच निकषावर जल निर्देशांक ठरतो. २०१० च्या जल निर्देशांकानुसार भारत ५३ व्या स्थानी आहे.

आज प्रस्थापितांचे पाण्यावर हक्क असूनही आणि त्यांची पाणी विकत घेण्याची कुवत असूनही त्यांनाही पाणी मिळत नाहीये म्हणून आज सर्वांना पाणी प्रश्न गंभीर वाटत आहे. पण समाजातील विशिष्ट घटकांना कायम पाण्यापासून वंचित ठेवले गेले तेंव्हा पाणी प्रश्न गांभीर्याने घेतला गेला नाही. प्रस्थापितांची केवळ जमिनीवर मालकी नसते तर पाण्यावरही सत्ता असते. वंचितांना पाण्यासाठी प्रस्थापितांकडे हात पसरावे लागतात. बाबासाहेबांच्या जलधोरणातील योगदानावरून व त्यांच्या जीवनकार्यातून असे दिसते की, त्यांनी 'पाणी संघर्ष' आणि 'पाणी संकट' या दोन्हीही प्रश्नांना समजून घेऊन त्यावर उपाय करण्याचे काम केले आहे.

भालचंद्र मुणगेकर आपल्या 'आर्थिक सुधारणा आणि विकासाचा मानवी चेहरा' या पुस्तकात म्हणतात की, आज शेती सिंचनाचे आणि पाणी वाटपाचे सदोष धोरण हे दुष्काळाचे प्रमुख कारण आहे. निसर्गाने भारताला पुरेपूर संसाधने दिली आहेत. पाऊसही पुरेसा व नियमित आहे. पण संसाधनांच्या सुयोग्य नियोजनाच्या अभावामुळे आज पाणी प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे आणि सर्वांना मानवनिर्मित दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पर्यावरणीय समतोल राखूनच आर्थिक नियोजन करावे लागेल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाणी वाटपाचे समन्यायी धोरण स्विकारावे लागेल.

**संदर्भग्रंथ**

१. Ambedkar's contribution to water resource development - A research project by Central Water Commission, 2016 (Second Edition) Ministry of Water Reources, River Development and Ganga Rejuvenation, Central Water Commission, New Delhi.

२. Abraham, A. 2002. Notes on Ambedkar's water resources policies, Economic and Political Weekly, November 30, 2002, pg. no. 4772-4774.

३. थोरात, सु. २०१६ (तृतीय आवृत्ती मराठी) बाबासाहेब आंबेडकर नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान. पुणे, सुगावा प्रकाशन

४. डॉ. मुणगेकर भा. २०११. आर्थिक सुधारणा आणि विकासाचा मानवी चेहरा. मुंबई, लोक वाङमय गृह. देउळगावकर, अ. २०१२. विश्वाचे आर्त. मुंबई, लोकवाङ:मय गृह

५. United Nations Economic and Social Council, Resolution 1996/31 Retrieved from www.un.org/documents/ecosoc/res/1996/eres1996-31 on 28th November 2016

# भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार:— डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. संतोष पाटील**

**इतिहास विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूरजि.लातूर**

१ डिसेंबर १९३९रोजी जर्मनीच्या हिटलरने पोलंड देशावर आक्रमण केले. आणि जागतीक दुसऱ्या महायुघ्दाला सरूवात झाली.संपूर्ण जग दोन गटात विभागले गेले. शेवटी अमेरिकेने ६ व ९ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या बेटावर अणुबॉम टाकले. आणि दुसऱ्या महायुध्दाचा शेवट झाला. या दरम्यान महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली 'चलेजाव' आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले होते. त्याचा परीणाम म्हणून भारताला स्वातंत्र्य बहाल करण्यासाठी ब्रिटीश सरकारने त्रिसदस्यीय कॅबीनेट भारतात पाठवले.या मिशनने भारतीय लोकप्रतिनिधीशी चर्चा केली. त्यामध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व मुस्लीम लिग पक्षाचे प्रतिनिधी होते. या दोन्ही पक्षात एकमत नव्हते.तेव्हां कॅबिनेट मिशनने भारतातील हिंदु बहुसंख्याक असणारा प्रदेश व मुस्लीम बहुसंख्याक असणारा प्रदेश असे दोन वेगळे राष्ट्र निर्मितीचा प्रस्ताव तयार केला. त्यानुसार तत्कालीन भारतीय संस्थानीकांना दोन्हीपैकी,कोणत्याही एका राष्ट्रात सामील होण्याची परवानगी दिली.तेव्हां कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीने ब्रिटीश सरकारच्या प्रस्तावाला विरोध केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटीश सरकारच्या निर्णयावर टिका केली. या विषयीचे एक निवेदन सरकारकडे पाठवले.

**'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची संविधान सभेवर निवड:—'**

ब्रिटिश सरकारने नियुक्त केलेल्या कॅबिनेट मिशनच्या प्रस्तावानुसार भारतीय अस्पृष्य वर्गाला प्रतिनिधित्वाची हमी न देता संविधान सभेच्या निवणूका घेण्याचे ठरविले होते. तेव्हा संविधान सभेवर सदस्यांची निवड प्रातिक विधिमंडळाच्या निर्वाचित सदस्यामार्फत करण्यात आली. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या विरोधामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मुंबई विधिमंडळातून संविधान सभेवर निवडून येऊ षकले नाहीत. यावेळी कॉंग्रेस पक्षाचे बहुसंख्य सभासद हे तरुंगवास भोगलेलेच निवडले होते. परंतू यांना घटनेचे कोणतेही ज्ञान नव्हते तेव्हा बंगालमधील जोगेंद्रनाथ मंडल यांनी मुस्लीम लीग पक्षाच्या मदतीने डॉ.बाबासाहेबांनां संविधान सभेवर निवडून येण्यासाठीचे संख्याबळ उभे केले. त्यामुळे बाबासाहेब संविधान सभेवर बंगाल प्रदेषातुन निवडून आले. होते.

**'संविधान निर्मितीचे कार्य आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर'**

९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेवर निवडून आलेल्या सदस्यांची पहीली बैठक झाली. या बैठकीचे अध्यक्ष म्हणून डॉ.सचिदानंद सिन्हा यांची तात्पूरत्या स्वरूपाची निवड झालेली होती. ही बैठक दिल्ली येथील संविधांन सभागृहात आयोजीत करण्यात आली होती. यावेळी अध्यक्षांचे सभागृहाला उद्देषून भाषण झाले. १० डिसेंबर रोजी अध्यक्षांच्या निवडीसाठी नियम पारीत करण्यात आले. ११ डिसेंबर रोजी डॉ.राजेंद्र प्रसाद यांची नियमानूसार संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. १३ डिसेंबर रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ध्येय आणि उदिश्टा संबधी प्रस्ताव मांडला.यावेळी मुस्लीम लिगने संविधान सभेवर बहिष्कार टाकला होता. पंडित नेहरूंच्या प्रस्तावावर चर्चा झाली. जोपर्यंत मुस्लीम लिगचे सदस्य संविधान सभेच्या कामकाजात सहभागी होत नाहीत तो पर्यंत कोणताही ठराव संमत केला जावू नये असे डॉ.एम.आर.जयकर यांनी १६ डिसेंबर १९४६ रोजी स्थगत प्रस्ताव मांडला त्यामुळे राष्ट्रीय कॉंग्रेसचे सदस्य नाराज झाले. आणि डॉ.जयकरांच्या विरोधात नारेबाजी सुरू झाली. तेंव्हा संविधान सभेच्या अध्यक्षांने डॉ.बाबासाहेबांना आपले विचार मांडण्यासाठी पाचारण केले. डॉ.बाबासाहेब बोलण्यासाठी उभे राहीले. त्यांच्या ऐतिहासीक भाषणाने राजकीय जीवनक्रमच बदलले गेले संपूर्ण सभागृहात टाळयांचा कडकडाट सूरू झाला. डॉ.बाबासाहेबांनी आपल्या भाषणाला सूरूवात केली आणि ते म्हणाले अध्यक्ष महोदय आपण या ठरावावर बोलण्यासाठी मला आमंत्रित केल्याबद्दल मी आपला मन:पूर्वक आभारी आहे.आपल्या या निमंत्रणाने मी आश्चर्यचकित झालो आहे. हे कबूल करावे लागेल. मी या अपेक्षेत होतो. की, माझ्या आधी २०—२२ वक्ते भाषण करणार असल्यामूळे माझा क्रम लागलाच तर उद्या लागेल.आज मी कुठलीही तयारी करुन न आल्यामुळे उद्या

बोलणे मला आवडले असते. आजच्या प्रसंगी मला माझे विचार पूर्णपणे व्यक्त करण्यासाठी पूर्ण तयारीनिशी बोलणे आवडले असते. शिवाय आपण दहा मिनिटाचा अवधी निष्चित केला आहे. या मर्यादीत चौकटीत आपल्या पुढील प्रस्तुत ठरावाला मी कसा न्याय देऊ शकेल हे मला कळत नाही. तरीही या संदर्भातील माझी मते शक्य तितक्या थोडक्या षब्दात मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा प्रकारे त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करुन तत्कालीन भारत पेशाच्या परिस्थितीवर प्रकाश टाकला. भारतीयासमोरची आव्हाणे कोणती यावरही बोलले. षेवटी विचारवंत बर्कचा त्यांनी संदर्भ दिला. तेव्हा बर्कने एक ठिकाणी म्हटलेआहे की, सत्ता देणे सोपे आहे. शहाणपण देणे कठीण आहे. या सभेला प्राप्त झालेल्या सार्वभौम अधिकाराचा वापर षहाणपणाने करण्याची आपली तयारी आहे, हे आपण आपल्या आचरणाने सिध्द करुया. देशातील सर्व घटकांना आपल्या सोबत नेण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. एकतेकडे जाण्याचा याशिवाय दुसरा मार्ग नाही. याबाबत आपल्या मनात कुठलीही शंका असता कामा नये. त्यांच्या या भावनामूळे कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांच्या मनात आंबेडकराविशयी आदर निर्मान झाला आणि २० जानेवारी १९४७ रोजी नेहरुंनी मांडलेला ठराव सर्वानुमते समंत करण्यात आला.

ब्रिटीश सरकारने नियुक्त केलेल्या कॅबिनेट मिशनच्या शिफारशीनुसार सल्लागार समित्या स्थापन करण्यात आल्या ३० एप्रिल १९४७ रोजी स्थापन केलेल्या संघसंविधान समितीमध्ये डॉ. बाबासाहेबांना सदस्य म्हणून घेण्यात आले. बंगालची फाळणी झाल्याने आंबेडकराचे संविधान सभेतील सदस्यत्व संपूष्टात आले असता कॉंग्रेस पक्षाने त्यांना त्यांनी केलेल्या कार्यावरुन मुंबई प्रांतातून संविधान सभेवर निवडून आणले.

**मसुदा समितीचे अध्यक्ष – डॉ.बाबासाहेब आंबेडकर :**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी डॉ.बाबासाहेबांना मंत्रिमंडळात सहभागी होण्यासंदर्भात निमंत्रित केले. आणि बाबासाहेब स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री झाले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान सभेने भारताच्या राज्य घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी सात सदस्यांची मिळून एक मसुदा समिती नियुक्त केली. त्या समिती सदस्यामध्ये डॉ.बाबासाहेबांचाही समावेश होता. मसुदा समितीचे बैठक दुसऱ्याच दिवषी आयोजित करण्यात आली. आणि त्याच बैठकीत डॉ.बाबासाहेकांची मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

डॉ. बाबासाहेबांनी अथक पश्चिम करुन संविधानाचा मसुदा तयार केला हे काम सहा महिन्यात पूर्ण केले. संविधान सभेच्या ४४ बैठका झाल्या होत्या. तयार झालेला मसुदा २१ फेब्रुवारी १९४८ रोजी सविधान सभेच्या अध्यक्षांना सादर केला यावर ८ महिने चर्चा करण्यात आली. त्यानंतर संविधानाचा मसुदा ४ नोव्हेंबर १९४८ ला संविधान सभेत ठेवल्यावर संक्षिप्त चर्चा झाली. आणि २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने घटनेचा मसुदा मान्य केला. याच दिवशी घटना समितीच्या अध्यक्ष असलेल्या डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी घटनेवर स्वाक्षरी केली आणि नव्या भारताची राज्यघटना तयार झाली.

**राज्यघटने विशयी डॉ.बाबासाहेबांचे विचार :**

स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांची राज्यघटनेवर स्वाक्षरी होन्या एक दिवस अगोदर म्हणजे २५ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहंबांनी नव्या देशाची राज्यघटना कशी आहे यावर अभ्यासपूर्ण शेवटचे भाषण कलेले होते. ते म्हणतात राज्यघटनेत गुंफलेली तत्वे ही चालू पिढीची मते आहेत आणि माझे हे विधान कदाचित रक्तरंजित वाटले तरी हे या सभाग्रहाचे मत आहे असे मानावे. राज्यघटना कितीही चांगली वा वाईट असली तरी शेवटी ती चांगली की वाईट हे ठरविणे हे राज्यकर्ते तिचा कसा वापर करतील त्याच्यावरच अवलंबून राहील. राष्ट्राच्या भवितव्यतेचा विचार करून त्यांनी चिंता व्यक्त केली आणि ते म्हणाले माझ्या मनाला अतिषय दु:ख होते ते ह्या गोष्टीमुळे की, भारताला यापूर्वी आपले स्वातंत्र गमावन्याची वेळ एकदाच येऊन गेली असे नाही. परंतू ते भारताच्या जनतेच्या स्वत:च्याच विश्वासघातामूळे, त्याला गमवावे लागले. जेंव्हा महंमद बीन कसीमने सिंधवर स्वारी केली तेव्हा राजा दाहीरच्या सेनापतीने महंमदबीन कासीमच्या मुनीमाकडून लाच खावून आपल्या राजाच्या बाजूने लढण्याचे साफ नाकारले. महंमद घोरीला हिंदूस्थानवर स्वारी करण्यास आमंत्रण देणारा जयचंद हा पुरूश होत त्याने महंमद घोरीला सोळंकी राज्याचे आणि आपले सहाय देण्याचे वचन दिले होते. जेंव्हा शिवाजी

महाराज हिंदूच्या स्वातंत्र्यासाठी युध्द करीत होते. तेव्हा इतर मराठे सरदार व राजपूत मोगल बादशहाच्या बाजूने लढत होते. जेव्हा शिख राज्यकर्त्याविरूध्द ब्रिटीश लढत होते तेव्हा त्याचे सेनापती मूग गिळून बसले होते. शिखांचे स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठी त्यांनी मूळीच प्रयत्न केले नाहीत. १८५७ साली हिंदूस्थानच्या मोठ्या विभागाने ब्रिटीशाविरूध्द स्वातंत्र युध्द पुकारले असता शिख लोक ते युध्द शांतपणे प्रेक्षक वृत्तीने पहात होते. इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय? याच विचाराने मी चिंताग्रस्त झालो आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या या भाषणानंतर घटना समितीच्या सदस्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. घटना समितीचे सदस्य श्री कृष्णमाचारी म्हणाले. अध्यक्ष महोदय, डॉ.बाबासाहेबांचे या सभाग्रहांनी भाषण लक्ष देऊन काळजीपूर्वक ऐकणाऱ्या सदस्यापैकी मी एक आहे. या संविधानाचा मसुदा तयार करताना त्यांना किती कष्ट सहन करावे लागले असतील. तरीही त्यांनी किती उत्साहाने ही जबाबदारी पार पाडली याची मला जाणीव आहे. यावरून डॉ. बाबासाहेबांनी अतिशय मेहनतीने भारताच्या राज्यघटनेचे काम करत असताना स्वत:च्या प्रवृत्तीची कसलीही तमा न बाळगता केवळ देशहित डोक्यासमोर ठेवून अतिशय जबाबदारीने ते पूर्ण केले. म्हणून डॉ.बाबासाहंबांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून संबोधले जाते.

## संदर्भ ग्रंथ :

१. डॉ.जाधव नरेंद्रए प्राज्ञासूर्य डॉ.आंबेडकर – समग्र वैचारीक चरित्र,ग्रंथाली प्रकाशन मुंबई पहिली आवृत्ती २ फेब्रुवारी २०१४.
२. वाघमारे भारत – संविधान सभेतील भाषणे व चर्चा, प्रबुध्द भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर.
३. किर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्यूलर प्रकाशन,मुंबई, पाचवी आवृत्ती १४ एप्रिल २०१६
४. डॉ.गायकवाड ज्ञानराज काशिनाथ, महामानव डॉ.मिभमराव रामजी आंबेंडकर, रिया पब्लिकेशन कोल्हापूर. सहावी आवृत्ती ऑगस्ट २०१६
५.प्रा.काबळे झुंबरलाल, प्रा.बिवलकर राम, महाडचा मुक्तीसंग्राम, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन वप्रशिक्षण संस्था पूणे, मुनर्मुदग २०१६
६.गायकवाड संदीप, जनता खास अंक १९३३, समता प्रकाशन नागपूर,पुनरावृत्ती २०१६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी व कामगार विषयक विचार

डॉ. रवीद्र म. कांबळे
मराठी विभाग श्री एम डी शाह महिला महाविद्यालय मालाड प. मुंबई

महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहिलेली आहेत. भारतीय राज्यघटनेचे ते शिल्पकार म्हणून जसे ते ओळखले जातात तसेच ते समाज सुधारक, विचारवंत, तत्त्वज्ञानी म्हणूनही ते सर्वांना परिचित आहेत. आजही त्यांचे विचार सर्वांना प्रेरणादायक आणि दिशा दर्शक असलेले दिसून येतात. भारतीय समाजव्यवस्था ही वर्णव्यवस्थेवर उभारली आहे.अन ती समाज व्यवस्था परिवर्तन करण्याचे काम बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लेखनाच्या आणि विचाराच्या माध्यमातून केलेले आपल्याला दिसून येते. समाज व्यवस्था बदलण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही ही जाणीव त्यांना होती आणि म्हणून त्यांनी अखंड मेहनतीने शिक्षण पूर्ण केले. भारतीय समाजाला योग्य दिशा देण्यासाठी त्यांनी महान अशी क्रांती केली. वर्षानुवर्षे रुढी-परंपरा यामध्ये अडकलेल्या बहुजन वर्गाला मुक्त करण्याचे कार्य बाबासाहेब आंबेडकरांनी केले. देशातील सामाजिक व राजकीय प्रवाहात सर्वांना सामील करून त्यांना त्यांचे अधिकार मिळवून दिले. मानव मुक्तीचा लढा त्यांनी उभा करून संपूर्ण भारतीयांना त्यांचे अधिकार प्राप्त करून दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या केंद्रस्थानी माणूसच होता. प्रत्येक भारतीयाला त्याला त्याचे अधिकार मिळावे ही त्यांची भूमिका होती. त्यांच्या हक्कासाठी सतत झगडत राहिले. बाबासाहेब नेहमी म्हणत असत की मी सर्वप्रथम भारतीय आहे, आणि शेवटपर्यंत भारतीय असणार आहे. या त्यांच्या वाणीने त्यांचे भारतातील प्रत्येक माणसाप्रती असलेले प्रेम आणि देशावरती असलेली निष्ठा यातून व्यक्त होते.

भारतीय वर्णव्यवस्था मोडीत काढून शिक्षण, न्याय, व्यवसाय, स्वातंत्र्य, समता व अधिकार हे सर्वांना त्यांनी मिळवून तर दिलेचपण त्याचबरोबर समस्त भारतीयांमधील शेतकरी, कामगार, महिला कामगार, शोषित पीडित वर्ग, आदिवासी, शेतमजूर यांच्यासाठी देखील त्यांनी लढा देऊन त्यांचे अधिकार त्यांना मिळवून दिले.किंबहुना त्यांचे मूलभूत अधिकार मिळवून देण्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले जीवन व्यतीत केलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य हे अनेक विविध स्तरातील लोकांसाठी त्याचबरोबर इतर समाजासाठी देखील पूरक आहेत. हे आपण समजून घेतले पाहिजे. संपूर्ण भारतीय समाजाच्या उत्थानासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य नेहमीच हिताचे आणि प्रेरणादायी राहिलेले आहे. म्हणूनच शेतकरी वर्ग तसेच कामगार वर्ग यांच्यासाठी देखील अतिशय महत्वाचे आहे. आपल्या जीवन प्रवासात त्यांनी शेतकरी व कामगार यांच्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. आजही आपल्या देशामध्ये बहुसंख्य लोकांचे जीवन हे शेतीवरच अवलंबून आहे जलसिंचनाचे प्रकल्प मोठ्या प्रमाणात न झाल्याने अजूनही शेतकऱ्यांना पावसाच्या पाण्यावर म्हणजे निसर्गावरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शेतकऱ्याचे जीवन अतिशय खडतर बनलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्याचे जीवन जवळून पाहिले आहे. त्यांच्या समस्या, कृषी व्यवस्था आणि शेतीतून मिळणारे उत्पन्न यांचा ताळमेळ घालत असताना शेतकऱ्याची फार दमछाक होते आणि म्हणून त्यांच्या समस्या लक्षात घेऊन त्यावर उपाय योजना त्यांनी आपल्या 'स्वतंत्र मजूर पक्षाच्या' जाहीरनाम्यात सुचविलेले आहेत. शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रश्नाच्या संदर्भात शेतीच्या उत्पादनात वाढ व सुधारणा यासाठी बँका, शेतकरी उत्पादक सहकारी संघ, व्यापारीमार्केट यांच्या स्थापनेची गरज असल्याचे त्यांनी सांगितले होते. शेत जमिनीवरील वाढत्या लोकसंख्येचा भार, यामुळे जमिनीचे लहान लहान तुकडे व त्यातून शेतकऱ्यांचे उत्पनाचे प्रमाण कमी झाले आहे. जर का शेतजमिनीवरील लोकांच्या उपजीविकेचा भार कमी केला नाही तर जमिनीचे लहान लहान तुकडे असेच राहतील आणि शेतकरी तसाच दरिद्री अवस्थेत राहील. शेतकऱ्यांनी कृषी व्यवस्थेबरोबरच कृषीपूरक व्यवसाय देखील करणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. शेतीला पुरेसे पाणी न मिळाल्याने शेती म्हणावी तशी पिकत नाही त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होतो आणि आत्महत्याकडे वळतो. म्हणून शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी नद्या जोड प्रकल्प, हा उपाय सुचविलेला होता. पण पुढच्या काळात

सरकारने त्याकडे गांभीर्याने न पाहिल्याने शेतक-यांचे प्रश्न बिकट झाल्याचे दिसून येत आहे.

ब्रिटनमधील मजूर पक्षाच्या धर्तीवर कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर आणि समस्त कामगार वर्गाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कासाठी डॉ. आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली. शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांच्या प्रश्नाला प्राधान्य देणारा पक्षाचा जाहीरनामा जाहीर केला. शेतकरी/शेतमजूर कामगारांचे प्रश्न आणि अडचणीची राष्ट्रीय पातळीवर मांडणी करून त्यांना यथोचित न्याय देणे हा या पक्षाचा मुख्य उद्देश होता. जातीविरहित आणि सर्वसमावेशक जाहीरनाम्यावरून बाबासाहेबांचा सर्वसमावेशक असा दृष्टिकोन दृष्टीपटलावर येतो. पक्षाच्या जाहीरनाम्यात प्रामुख्याने शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि बेरोजगार यांचे संघटन करून त्यांना न्याय हक्क मिळवून देणे, शेतकऱ्यांना किमान मजुरी, औद्योगिक कामगारांना पुरेसे वेतन, उद्योगधंद्यांना चालना, कृषी उत्पादनक्षमवृद्धी,शेतमालाला संरक्षण,कृषकाना वित्तीय संस्था मार्फत कर्ज पुरवठा, श्रमिकाच्या हिताची जपणूक, जमीनधारणा पद्धतीत सुधारणा,कामगार संघटनांना मान्यता, सेवेत असताना अपघात किंवा मृत्यू झाल्यास नुकसान भरपाई इत्यादी महत्त्वपूर्ण घटकांचा समावेश या जाहीरनाम्यात केला होता.

बाबासाहेबांनी भारतीय शेतीतील किफायतशीर उत्पादनाच्या समस्येकडे सर्वांचे लक्ष वेधले. मुळात शेतजमिनीचे असमान वाटप, सततचा पडणारा दुष्काळ, शेतीच्या मुळाशी असणारी जात व्यवस्था, सरकारचे शेतीकडे असणारे दुर्लक्ष, सिंचनाचा अभाव, बारमाही ऊर्जेची कमतरता या कारणांमुळे शेती उत्पादनाच्या दृष्टिकोनातून किफायतशीर होत नव्हती. स्वतंत्र मजूर पक्षाच्या धोरणांमध्ये शेती, शेतकऱ्यांच्या अनुषंगाने चार महत्त्वपूर्ण बाबींवरती भर दिलेला दिसून येतो. शेती ही शास्त्रशुद्ध व आधुनिक पद्धतीने केली जावी, यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जावे. योग्य खते व निरोगी बियाणांचा वापर करून शेती केली जावी. शेतीमध्ये सिंचन सुविधा निर्माण कराव्या लागतील. शेतीला पूरक उद्योगांची जोड तर द्यावीच लागेल. त्यासोबतच शेतकऱ्यांना अस्मानी संकटाच्या काळात सरकारने मदत करावी. शेतसारा शेतावर नव्हे, उत्पादनावरही नव्हे, तर शेतकऱ्यांची आर्थिक कुवत लक्षात घेऊन लावावा, असे त्यांनी सुचविले आहे.

**सामुदायिक शेती** आणि सहकारी शेतीसंबंधी बाबासाहेबांची स्वतंत्र विचारदृष्टी होती. शेती विकासासंबंधी हा त्यांचा मूलगामी क्रांतीदर्शी प्रस्ताव होता. मुळात डॉ. आंबेडकर यांनी २७ फेब्रुवारी १९४७ रोजी मूलभूत हक्कासंबंधीच्या सल्लागार समितीला राज्य आणि अल्पसंख्याक या विषयावर ध्येयधोरणात्मक प्रबंध सादर केला होता. सामुदायिक शेतीचा प्रयोग भारतभर झाला पाहिजे, अशी त्यांची अपेक्षा होती. सामुदायिक शेतीमुळे जमीनदार, कुळ व शेतमजूर असा भेद संपुष्टात येईल, ही त्यांची धारणा होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध आंदोलनामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळाल्याचे दिसून येते. त्यांनी खोती प्रणाली रद्द करणे (1949) महार वतन (1959) आणि मुंबई सावकारी अधिनियम विधेयक (1938) या सारख्या आंदोलनाच्या माध्यमातून ही व्यवस्था संपुष्टात आणण्याचे काम त्यांनी केले आणि त्यामुळे शेतकऱ्यांना भूमिहीनांना न्याय मिळाल्याचे दिसून येते. 1929 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पद्धती विरोधी चळवळ सुरू केली आणि पुढे 17 सप्टेंबर 1937 मध्ये होती पद्धती नष्ट करण्याचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले. कोकणातील खोती पद्धती आणि तिचा जनसामान्यांवर असणारा प्रभाव त्यांना माहीत होता. शेतकरी, कामकरी, कुणबी अशा अनेक लोकांचे प्रश्न त्यांना ज्ञात होते. म्हणून त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षातर्फे खोती नष्ट करण्याचे बिल आणून पास करून घेतले. त्यामुळे गोरगरीब शेतकऱ्यावरील सावकारी पाश दूर होण्यास मदत झाली. खोती पद्धती ही अमानुष होती.तो त्या गावचा सुलतान असे तो लोकांना गुलाम बनवत असे, पैसे उकळणे, त्यांना पावती न देणे, शेतकऱ्याच्या माळावरती अधिकार सांगणे त्यांना दमदाटी करणे व पुरेशी मोलमजुरी ही न देणे यामुळे खोती पद्धतीने नष्ट होणे आवश्यक होते. म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पद्धती विरोधी लढे उभारून त्याचे विधेयक मांडले गेले आणि 15 मे 1950 पासून ते लागू ही करण्यात आले. पुढे कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम 1948 नुसार 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व लागू करण्यात आले. एकूणच शेतकऱ्यांची गुलामगिरी नष्ट करण्यामागे

बाबासाहेबांचा दूरदृष्टी पणा येथे लक्षात येतो.

दामोदर नदी प्रकल्प, हीराकुंड प्रकल्प, सोनू नदी प्रकल्प व राष्ट्रातील पहिल्या १५ मोठ्या धरणांची ब्लू प्रिंट त्यांनी तयार केली. हे सर्व महाप्रकल्प त्यांनी उभे केले. या सर्व बहुउद्देशीय प्रकल्पांची बांधणी केवळ पूरनियंत्रण या एकमेव उद्देशासाठी केली नाही, तर पूरनियंत्रण, जलसिंचन, विद्युत निर्मिती, नौकानयन आणि पाणीपुरवठा हा विराट व उदात्त दृष्टिकोन त्याच्या पाठीमागे होता. सिंचन आणि विद्युत ऊर्जा विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. आंतरराज्य नदी जोड प्रकल्पाची कल्पनाही त्या काळात बाबासाहेबांनी मांडली. शेती समृद्ध करण्यासाठी धरणांची आवश्यकता आहे आणि धरणे केवळ जल व्यवस्थापनासाठी नव्हे, तर ऊर्जा निर्मितीची केंद्रे झाली पाहिजेत, असा त्यांचा दृष्टिकोन होता.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक कार्य :**

शेतकऱ्यांच्या बरोबरच कामगारांचे जीवन ही बाबासाहेबांनी अगदी जवळून पाहिले आहे. ते स्वतः चाळीत राहिल्यामुळे कामगारांचे जीवन, त्यांचे राहणीमान, त्यांचे शोषण हे त्यांनी जवळून पाहिले आहे. त्यांचे होणार हे शोषण थांबावे यासाठी त्यांनी ‘स्वतंत्र मजूर पक्षाच्या’ जाहीरनामामध्ये देखील प्रसिद्ध केला होता. औद्योगिक कामगारांना नोकरीतील काढू नये व कारखान्यात योग्य ती बढती द्यावी यासाठी कायदा घडविण्यासाठी पक्ष प्रयत्न करेल, त्याचबरोबर कामाचे कमी तास, योग्य पगार, पगारी रजा, बोनस, पेन्शन अथवा निवृत्तीनंतर जीवनाला योग्य अशा तरतुदी या संबंधित कायदे करण्याचे प्रयत्न केले जातील असे जाहीरनाम्यात मुद्दे मांडले होते. या विचारातून बाबासाहेबांचा कामगारांच्या विषयक विचार लक्षात येतो.

डॉ. आंबेडकर ब्रिटिश मंत्रिमंडळात मंजूर मंत्री (१९४२-१९४६) होते. त्यांनी सेवायोजन कार्यालयाची (एम्प्लॉयमेंट एक्सचेंज) स्थापना केली. त्याकाळी जे अनुभवी नि अर्धाशिक्षित तज्ज्ञ निरनिराळ्या योजनातून तयार होत होते. त्यांना नोकरीसाठी भटकावे लागू नये, त्यांना नोकरी मिळविण्याचे मार्ग मोकळे असले पाहिजे, हा सेवायोजन कार्यालय स्थापण्याचा मुख्य उद्देश होता. तसेच त्यांनी कामगार कल्याणचे धोरण स्वीकारले. किमान वेतन, कायदे कामाचे तास, कामगारांसाठी उपाहारगृह, महागाई भत्ते, रास्त भावातील धान्य केंद्र, फंड योजना, कामगारांचे सेवांतर्गत प्रशिक्षण, कामगारांच्या पाल्यांची शिक्षण विषयक सोय अशा अनेक विषयावर चर्चा करून त्यांनी कामगार कल्याणाचे सातत्याने धोरण राबविले. भारतीय खाणीमध्ये भारतातील कामगारांना काम करण्यासाठी फारशी संधी दिली जात नसे. इंग्लंडमधून कामगार आयात केले जात. डॉ. आंबेडकरांनी या आयातीवर प्रतिबंध लावला. भारतातील कामगारांना खाणीमध्ये कामावर घेतले जाऊ लागले.

कामगारांच्या मध्ये स्त्री कामगार हा वर्ग देखील मोठा आहे. सामाजिक पातळीवर स्त्रियांना गुलाम म्हणूनच पाहिले जाते.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री-पुरुष व जातिभेद ही विषमता दूर करण्यासाठी आयुष्यभर विविध आंदोलने केली. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रियांना त्यांचे मूलभूत हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांबाबतही २९ मार्च १९४५ ला विधेयक आणून चर्चा केली. स्त्री कामगारांचे हित जोपासले. प्रसुतीच्या काळात विश्रांतीची तरतूद, रोख मदत इत्यादी तरतुदी केल्या. किमान चार आठवडे प्रसुती भत्ता मिळावा तसेच कामगार गैरहजर असताना त्यांना पगारी सुट्ट्या मिळाव्यात त्याचबरोबर कायद्याखाली नियम करण्याचा अधिकार आणि खाण कामगारांना शॉवर बॉथची योजनासुद्धा अंमलात आणली होती. आजारपणाचा विमा, अपघाताचे नुकसान भरपाई, बाळंतपणातील रजा इत्यादी अनेक गोष्टी त्यांनी संमत करुन घेतल्या.

बाबासाहेबांनी कामगार युनियनच्या बाबतीत धोरण ठरविताना मालकाने कामगारांच्या युनियनला मान्यता दिली पाहिजे, योग्य पूर्तता केली पाहिजे आणि जर मालक मान्यता देत नसेल तर अशा कारखानदारांवर दंडनीय गुन्हा दाखल केला जावा अशा प्रकारचे विधेयक मांडून कामगार कल्याणाचे महत्त्वाचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.कामगारांच्या कल्याणासाठी अनेक कायदे त्यांनी केले संप, टाळेबंदी, भांडण, कोर्टकचेऱ्या या कोणत्याही मार्गातून कामगार व मालक यांच्यातील वाद संपणार नाही.तेव्हा यासाठी १९४७ मध्ये औद्योगिक कलह कायदा आणला.या कायद्याचा मुख्य उद्देशच हा होता की कामगार व मालक यांच्यातील वाद शांततेने व विचारविनिमय करून सोडवता यावा.

१९४८ साली किमान वेतन कायदा हा सुद्धा मजुरांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा कायदा केला.यानुसार शासनाने ठरवून दिलेले किमान वेतन मजुरांना मिळाले पाहिजे. त्यापेक्षा कमी वेतन देऊ नये असे बंधन कारखान्यावर किंवा व्यवसाय संघटनेवर घालण्यात आले.त्याचप्रमाणे कामगारांच्या जीवनात सुरक्षितता मिळावी, काम करताना अपघात झाला किंवा अपंगत्व आले तर त्यासाठी उपाय म्हणून १९४८ मध्ये कर्मचारी राज्य विमा कायदा निर्माण केला.यासारखे अनेक कायदे व मजुरांना न्याय मिळवून देणाऱ्या अनेक शिफारशी प्रत्यक्ष कायद्यात उतरविल्या.मुंबईच्या १७ मार्च १९३८च्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सर्वधारण सभेत डॉ. आंबेडकर म्हणाले, 'गरिबांच्या पक्ष गरिबांनी चालविला पाहिजे.' हा निर्लेप आशावाद क्षितिजापलीकडचा होता यात शंका नाही. सामाजिक अन्याय, अत्याचाराविरूद्ध, आर्थिक विषमतेविरूद्ध कामगारांनी लढा दिला पाहिजे तेव्हाच कामगार संघटनेच्या बळावर प्रश्न सुटतील. तसेच 'परावलंबी असण्यापेक्षा स्वावलंबी व्हा' असा संदेश डॉ. आंबेडकरांनी दिला होता.

बिडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी बिडी कामगार संघ स्थापन केला. कामगारांना अगोदर भरपगारी रजा मिळत नव्हती. १४ एप्रील १९४४ ला बासाहेबांनी भरपगारी रजेचे विधेयक मंजूर केले. कामगारांना कमीत कमी वेतन ठरविण्याची तरतूद असलेले बिल मांडले आणि `किमान वेतन कायदा १९४८' ची निर्मिती झाली. ३१ जानेवारी १९४४ रोजी खाण कामगारांसाठी 'कोळसा खाण कामगार फंडाची' स्थापना करणारे विधेयक मांडले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाची विविध असे पैलू आहेत. गोरगरीब, कष्टकरी, शोषित, पीडित आणि वंचित घटकाच्या उद्धारासाठी आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. भारतातील कामगार आणि कामगार चळवळ, कामगार कायदे, स्त्री कामगाराबद्दलची आत्मीयता, त्यांच्या कौटुबिक संसाराविषयीची चिंता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. त्यामुळेच त्यानी हे सर्व प्रश्न आत्मीयतेने सोडविले.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. गायकवाड ज्ञानराज काशिनाथ : महामानव डॉ भीमराव रामजी आंबेडकर
२. बसारवेतरे राम : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक धोरण , (लेख)डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे , खंड १८ भाग ३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व

प्रा. डॉ. यादव सूर्यवंशी

मराठी विभाग, महात्मा गांधी महाविद्यालय,अहमदपूरजि. लातूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. वैचारिक लेखक, तत्त्वचिंतक, निबंधकार, निर्भीड व झुंजार पत्रकार, संशोधक, संपादक आणि प्रख्यात वक्ते म्हणून त्यांची ओळख आहे. तसेच, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचे भाष्यकार आणि धर्मशास्त्र, मानववंशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान व कायदा आदी विविध क्षेत्रातील डॉ. बाबासाहेबांच्यामौलिक योगदानासंबंधाने त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विविधांगी वेध घेण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेक अभ्यासकांनी केला आहे. परंतु डॉ. प्रल्हाद लुलेकरयांनी डॉ. बाबासाहेबांना, ‘अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा’अशीजी उपाधी दिली आहे, ती अत्यंत सार्थअसून; डॉ. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे अनंत पैलू असलेला एक चकाकता हिरा आहे, असे म्हणता येते. मात्र, त्यांच्याबहुपैलू व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू अजूनही अलक्षित राहिलेले दिसून येतात. मराठीसाहित्यामध्येही डॉ. बाबासाहेबआंबेडकरयांच्याव्यक्तिमत्त्वाचा विविधांगाने वेध घेणारे लेखनआजपर्यंत खूप मोठ्याप्रमाणावर झालेले आहे. परंतु तरीही मराठी अभ्यासकांनी डॉ.बाबासाहेबांच्याव्यक्तिमत्त्वाचे साहित्यिक अंग म्हणावे तसे लक्षात घेतलेले दिसून येत नाही, असे जाणवते.म्हणून प्रस्तुत शोधनिबंधातून डॉ. बाबासाहेबांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्याचा हा एक प्रयत्न आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान साहित्यिक असून, अनेक साहित्यिक व साहित्य चळवळींचे ते प्रेरणास्त्रोत आहेत. दलित, आंबेडकरी साहित्य तसेच, साठोत्तरी मराठी साहित्यातील विविधसाहित्यप्रवाहांची मूळप्रेरणा डॉ. बाबासाहेब राहिलेले आहेत. दलित कवी, गायकांनी आंबेडकरी विचारांच्या प्रसारासाठी गीतांची, काव्यांची निर्मिती केली. आंबेडकरी विचाराने प्राप्त झालेला दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक जीवनकर्तृत्वाला नजरेसमोर ठेवून तळागाळात जगणाऱ्या प्रतिभावंतांनी सिद्धहस्त होऊन लेखन करायला सुरुवात केली. विशेष या सर्व अभिव्यक्तीच्या केंद्रस्थानी डॉ. बाबासाहेबांनी दिलेले लढे आणि त्यांचे विचार हेच आहेत. डॉ. बाबासाहेबआंबेडकर हे विविध वाङमयाचे व्यासंगी अभ्यासक होते. त्यांनी वेद, उपनिषेदे, पुराणे, महाकाव्य, तत्त्वज्ञान व बौद्धसाहित्यापासून ते लोकसाहित्य, मध्ययुगीन, आधुनिक साहित्य, इंग्रजी साहित्य हे त्यांच्या आवडीचे व चिंतनाचे विषय राहिले आहेत. या साहित्याविषयी त्यांनी अत्यंत मार्मिक भाष्यही केले आहे. मराठी साहित्याचा गौरव करताना त्यांनी आपली परखड मतेही मांडली आहेत. डॉ. बाबासाहेबांनी संत साहित्याचा अभ्यास केला. तसेच परिवर्तनवादी चळवळीच्या पार्श्वभूमीवर या संप्रदायाच्या सामर्थ्य आणि मर्यादांचे विश्लेषण केले. हैदराबाद येथे ‘मराठवाडा साहित्य परिषद’ व मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कार्यक्रमात बोलताना संतसाहित्य आणि संत चळवळींविषयी मर्यादा दाखवून देणारे बिनतोड विश्लेषण केले. तसेच, ‘तुकारामगाथा’आणि ‘ज्ञानेश्वरी’मुळे मराठी भाषेचे स्थान अढळ राहणार असल्याची थोरवीही त्यांनी नि:संशय प्रतिपादन केली. यावरून त्यांची साहित्यविषयक भूमिका किती स्पष्ट होती हेच दिसून येते.

आपल्या चतुरस्र प्रतिभेने विविध प्रकारचे शैलीदर लेखान करून डॉ. बाबासाहेबांनी साहित्यामध्ये अत्यंत मौलिक भर घातली आहे. बाबासाहेबांनी नेहमीच आपल्या लेखनात आणि भाषणात संतांच्या अभंगांचा,

विचारांचा, सुभाषितांचा अत्यंत चपखलपणे वापर केला आहे. याचा प्रत्यय त्यांच्या 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' या पत्रातील अग्रलेखातून येतो. तसेच भाषणे, स्फुटलेख, मृत्युलेख व त्यांच्या मुक्त चिंतनातून येतो. त्यांनी वेगवेगळया सभा, परिषदा, चर्चासत्र व मेळाव्यांमधून दिलेली व्याख्याने आणि आपल्या समाज बांधवांना संबोधित करणाऱ्या त्यांच्या सहज स्फूर्त भाषणांतून ही त्यांचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व प्रकट झाले आहे.

डॉ. बाबासाहेबांचे लेखन आणि भाषण भाषिक सौंदर्याच्या दृष्टीने विविधांगाने कसे सजलेले आहे, हे त्यांचे अग्रलेख आणि भाषणांचे वाचन करताना त्यांच्या शीर्षकापासून ते शेवटच्या वाक्यापर्यंत पदोपदी दिसून येते. 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत'या नियतकालिकांच्या शिरोभागी बाबासाहेबांनी संत तुकारामांचे अभंग आणि ज्ञानेश्वरीतील ओव्या मुद्रित केल्या आहेत. अनेक अग्रलेखांचे शीर्षक म्हणून, 'महापुरे झाडे जाती| तेथे लव्हाळी वाचती' किंवा 'विष्णुमय जग| वैष्णवांचा धर्म| भेदाभेद भ्रम| अमंगळ||' यासारख्या संत वाचनांचा उपयोग केला आहे. ३१ जानेवारी १९२० रोजी बाबासाहेबांनी 'मूकनायक'हे पाक्षिक सुरू केले तेव्हा या पत्राच्या आरंभी- 'काय करू आता धरूनिया भीड| नि:शंक हे तोंड वाजविले|| नव्हे जगी कोणी मुकीयाचा जाणे| सार्थक लाजून नव्हे हीत||'ही तुकारामाची अभंगोक्ती आपले पत्र सुरू करण्यामागील भूमिका स्पष्ट करण्यासाठी किती सार्थपणे निवडली होती, हे लक्षात येते. तसेच आवश्यकत्या ठिकाणी संस्कृत साहित्य किंवा इंग्रजी, पाश्चात्य साहित्यातील उतारे, अवतरणे यांचा त्यांनी अत्यंत औचित्यपूर्ण वापर केलेला आहे. त्यामुळे त्यांची भाषा अधिक अर्थवाही, प्रवाही बनली असून साहित्यिक गुणांनी ओतप्रोत भरली आहे, असे म्हणता येते.

'मी मनोरंजनासाठी वाङमय वाचत नाही, तर शिकण्यासाठी वाचतो'अशी डॉ. बाबासाहेबांची भूमिका होती, आणि त्यादृष्टीनेच ते साहित्याकडे पाहत असत. मराठीतील हरिभाऊ आपटे, महात्मा फुले, आगरकर, टिळक, गडकरी, देवल, लोकहितवादी आदींचे साहित्य बाबासाहेबांनी अभ्यासले होते. तसेच, 'किंगलियर'या नाटकावरून 'शहाणी मुलगी'हे नाटक स्वत: लिहून त्याचा प्रयोग महाविद्यालयीन शिक्षण घेताना केला होता. त्याबरोबरच, प्रबोधनकार ठाकरे यांच्या 'खरा ब्राह्मण'या नाटकाची समाजशास्त्रीय समीक्षाही त्यांनी लिहिली आहे. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी एका ठिकाणी बाबासाहेबांनी २मे १९५४ रोजी 'विदर्भ साहित्य संघात'भाषण करताना मांडलेले साहित्यविषयक विचार उद्‌धृत केले आहेत, ते येथे लक्षात घेण्यासारखे आहेत. कारण त्यातून बाबासाहेबांची साहित्याविषयीची जीवनवादी भूमिका स्पष्ट होते. बाबासाहेब म्हणतात, "आपण आपल्या जीवनाकडे, कर्तव्यधर्माकडे आणि संस्कृतीकडे दुर्लक्ष करीत आहोत. थोडे अंतर्मुख होऊन विचार केलात तर आपली जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये कशी करपून जात आहेत याचं भेसूर चित्र उभं राहील. कारणं काहीही असोत पण आपण अध:पतनाच्या, अवनतीच्या मार्गावरून जात आहोत. असे आढळून येईल. तेव्हा तत्परतेने सावध होऊन जीवन व संस्कृतीविषयक मूल्ये साहित्यकारांनीजोपासली पाहिजेत, ती सतेज बनवली पाहिजेत, वृद्धिंगत केली पाहिजेत...मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचं आहे की, उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कृत करा. आपले लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका. तिचं तेज खेड्यापाड्यांतील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचं, दलितांचं दु:खितांचं फार मोठं जग आहे हे विसरू नका. त्यांचं दु:खं, त्यांची व्यथा नीट समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचं जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच खरी मानवता आहे."१ एवढेच नव्हे, तर समकालीन मराठी साहित्याविषयी मत प्रकट करताना बाबासाहेब म्हणतात, 'आतापर्यंत जे महाराष्ट्रीय साहित्य आणि सारस्वत निर्माण झाले; खरेतर ते अजून निर्माण

करायचे आहे'यावरून बाबासाहेबांचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व किती प्रगल्भ होते हेच दिसून येते. डॉ बाबासाहेबांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची अशी कितीतरी दाखले देता येतील. विशेषत: त्यांच्या पत्रकारितेतील अग्रलेखांची भाषा ही कशी वाङ्मयीन गुणांनी समृद्ध आहे, हे त्यातील काही अवतरणे पाहिल्यास आपल्या लक्षात येते. जसे- 'उडदामाजी काळे गोरे', 'जीर्णमतवाद्यांची बेचवदारी', 'नकटा नकट्याला हसतो', 'भाकरी मागितली- दगड दिला!', 'दंगा झाला! दंगा झाला! काय उपाय नाही त्याला!', 'आधी कळस मग पाया', 'भविष्यवादी भालाकार भोपटकर!', 'कुलाबा समाचरा' चा चावट पणा', 'भोजन भास्कराचा उर्मटपणा', 'स्वराज्याची सर सुराज्याला नाही', 'दैववादी बनू नका' ही त्यांच्या अग्रलेखांची व भाषणांची शीर्षके पाहता त्यांत त्यांनी म्हणी, सुभाषितांचा वापर अत्यंत चपखलपणे केलेला आहे, हे तर दिसून येतेच शिवाय त्यात गोवलेला अर्थ आणि प्रतिस्पर्ध्याचा समाचार घेण्यासाठी त्यांनी वापरलेले उपहास, उपरोध हे शब्द शस्त्र ही त्यांच्या लेखन शैलीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. मराठी भाषेवर डॉ. बाबासाहेबांचे प्रभुत्त्व होते. आणि आपले लेखन हे वरिष्ठ वर्गास आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त करण्यासाठी व अस्पृश्य वर्गास आत्मभान आणण्यासाठी आहे, याचे भान बाबासाहेबांनी कधीही सोडले नाही. तसेच आपल्या तात्त्विक, तर्कनिष्ठ व बुद्धिनिष्ठ मुद्यांचे स्पष्टीकरण करताना त्यांनी 'ज्याची तलवार खंबीर तो हंबीर', 'अस्तनितले निखारे', 'कुऱ्हाडीचा दांडा गोता सकाळ', 'शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रयत्न', 'सरड्याची धाव कुंपना पर्यंत', 'दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे', 'हरताळ फासणे', 'गजांत लक्ष्मी','नाकदाबल्या शिवाय तोंड उघडत नाही' अशा मराठीतील लोकजीवनामध्ये प्रचलित असलेल्या म्हणी, वाक्प्रचारांबरोबरच 'बीचमे मेरा चांद भाई', 'हिरा पडा है बाटमे । कोई अंधा निकल जाय' असे हिंदीतील मुहावरे, दो हे यांचा ही वापर त्यांनी आपल्या लेखनातून केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाचे सौंदर्य निश्चितच वाढलेले आहे.

'मूकनायक' मधील 'हे स्वराज्य नव्हे, तर आमच्या वर राज्य!' या अग्रलेखात बहिष्कृतांना सोसाव्या लागणाऱ्या अन्यायाची जाणीव करून देताना डॉ. बाबासाहेब लिहितात, 'स्वराज्य म्हणजे आमच्या वर राज्य होणार, इंग्रजी राज्यात ज्यांची बात सहन होत नव्हती त्यांची लाथ सोसावी लागणार. स्वकीयांच्या सामाजिक, आर्थिक व धार्मिक जुलुमाच्या आडघातलेले इंग्रजी सत्तेचे सुदर्शन लोपून स्वराज्याच्या वज्राचा आमच्यावर प्रत्यक्ष आघात होण्याची वेळ येणार' (२८/२/१९२०) या त्यांच्या लेखनावरून उपहास आणि उपरोध ही डॉ. बाबासाहेबांची किती प्रिय हत्यारे होती हे सपष्ट होते. डॉ. भालचंद्र फडके यांनी म्हटल्या प्रमाणे, ''मूकनायक' मधील डॉ. आंबेडकरांचे अग्रलेख म्हणजे शैलीच्या सौंदर्याने सजलेले वैचारिक गद्य आहे. पण मराठी साहित्याने त्यांचा निबंधकार म्हणून कधी ही उल्लेख केला नाही'' २ हे सत्य नाकारता येणार नाही.

डॉ. बाबासाहेबांच्या लेखन शैलीमध्ये आक्रमकता, आवेशपूर्ण ताव प्रचंड आत्मविश्वास आहे. जसे, 'अस्पृश्यता नष्टमूल करणे हेच माझे आद्य कर्तव्य!', 'अस्पश्यांनी आपल्या स्पृश्य बांधवांकडे समतेची भीक मागितली पण अस्पृश्यांच्या पदरात भाकरी ऐवजी दगड धोंडेच पडले' हा बाबासाहेबांचा विचार वाचकाला अंतर्मुख करतो. बाबासाहेबांच्या विचारांची बैठक ही अगदी तर्कशुद्ध व बुद्धिनिष्ठ असल्यामुळे त्यांची लेखन शैली त्याच ताकदीने झळाळताना व लखलखताना दिसून येते. दिव्याने दिवा पेटवावा तसा त्यांचा विचार वाचकांच्या मनात रुजतो, हे त्यांच्या लेखनशैलीचे एक वेगळे सामर्थ्य आहे, असे म्हणता येते. स्वमत प्रतिपादन व परमत खंडन करावे ही रीत बाबासाहेबांनी अवलंबिलेली होती. तसेच 'ठोशास प्रतिठोसा' देण्याची रीत कशी असावी हे ही त्यांच्या अग्रलेखांवरून लक्षात येते. 'भाला' कार भोपटकरांनी, 'तुम्ही देवळे किंवा पाणवठे बाट विण्याचा प्रयत्न एकदम बंद

करा तसे न केल्यास आम्ही तुमच्या पाठीसडकू' असे 'भाला' मध्ये लिहिले होते. (भाला, २८ मार्च १९२७) तेव्हा, 'आम्ही आमचा प्रयत्न केव्हाच बंद करणार नाही, आमच्या पाठी जो सडकील त्यांची टाळकी आम्ही सडकू' (ब.भा.११/४/१९२७) असे तितक्याच कडक शब्दात बाबासाहेबांनी 'बहिष्कृत भारत' मधून त्यांना प्रत्युत्तर दिले. त्यांच्या लेखनात लढाऊ पणा, युक्तिवाद इत्यादी गोष्टी ठळकपणे जाणवतात. 'स्वाभिमान शून्य ते ने जीवन कंठणे नामर्दपणाचे आहे', 'बहिष्कृत भारताच्या झंझावाताने हिंदु समाजात एक प्रकारचे तुफान आले आहे'. इत्यादी किती तरी पल्लेदार वाक्य त्यांच्या लेखनातून उधळलेली असून ती त्यांच्या लेखनाचे सौंदर्य वाढवतात.

डॉ. बाबासाहेबांच्या लेखनातील सर्वात मोठा गुणवक्तृत्त्व गुण व आशयगर्भता हा आहे. त्या दृष्टीने त्यांच्या भाषणातील काही प्रसंग पाहता येतील, जसे- २७ मे १९५३ रोजी अस्पृश्य समाजाने मोठ्या प्रमाणावर बुद्ध जयंती साजरी केली, परंतु तत्कालीन वर्तमान पत्रांनी त्यागोष्टी कडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष केले, तर काहींनी विपरीत स्वरूप दिले. त्यानंतर काही दिवसातच डॉ. बाबासाहेबांचे भाषण झाले, त्यात तो संदर्भ घेवून बाबासाहेब भाषणात म्हणतात, 'सर्व वर्तमान पत्रे माझ्या वर टीका करतात; मात्र त्याची मला पर्वा नाही. त्यांच्या टीकेमुळे माझे वजन घटेल असे समजण्याचे कारण नाही. मी दर वर्षाला पाहतो तो माझे वजन वाढतच आहे'. किंवा 'स्वतंत्र मजूर पक्षा'च्या प्रचार दौऱ्यात सोलापूर येथे भाषण करताना आपल्या बांधवांना बाबासाहेब सांगतात, 'तुमच्या मताची किंमत मिठ-मिरची सारखी समजू नका तुमच्या प्राणाइतकीच किंबहुना जास्तच तुमच्या मताची किंमत आहे, हे विसरू नका. भलत्याच उमेदवाराला मत द्याल तर खाटकाच्या हातात बकऱ्याने सुरी दिल्या सारखे होईल!' (२४ जानेवारी १९३६) येथे त्यांची भाषा वक्तृत्त्व गुणाने कशी संपन्न बनली आहे, हे दिसून येते. तसेच समर्पक उपमा, रूपकादी अलंकाराची योजना बाबासाहेब सहज पणे करतात. 'विचार हा काही एखाद्या ज्वालामुखी प्रमाणे आपोआप पेट घेत नाही', 'उदात्त तत्त्वांच्या मनोराज्यात गढून जावून व्यवहाराला विसरणाऱ्या शाळेतील पोरा प्रमाणे आम्ही मुर्ख नाही', 'हिंदु धर्मात समाविष्ट होणाऱ्या जाती उच्चनीच भावनेने प्रेरित झाल्या आहेत. हिंदु समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजलाच होय'. येथे ज्वालामुखी, शाळेतील पोर किंवा हिंदुधर्माला त्यांनी दिलेली मनोऱ्याची उपमाही त्यांच्या शैलीदार लेखनाचीच उदाहरणे आहेत.

डॉ. बाबासाहेब आपल्या भाषणात दैनंदिन व्यवहारातील अनेक दाखले देवून आपले म्हणणे पटवून देत असत. वरील २७ मे च्या भाषणातच त्यांनी आपल्या जीवनातील अनेक घटना सांगून अस्पृश्य बांधवांना सुधारणेच्या दृष्टीने 'तव्याचा जायबुरसा, मग तो सहजच होय आरसा' हे अत्यंत समर्पक असे प्रमाण दिले आहे. तसेच 'नुसते पोट भरले म्हणजे सर्व काही झाले असे समजू नका, पोट काय रांडरळीसुद्धा भरते', म्हणून आपण सन्मानाने जगले पाहिजे, असा सल्ला दिला आहे. एकंदरीत लेखन आणि भाषणाचा विचार करता डॉ. बाबासाहेबांच्या शैलीदार व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या शब्दा शब्दांतून उमटलेले दिसून येते. एवढेच नव्हे तर, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा!', 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो प्राशन करील तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही', 'गुन्हा करने वालेसे ही गुन्हा सहनेवाले जादा गुन्हेगार है।' अशा डॉ. बाबासाहेबांच्या अनेक वचनांना, विधानांना आज सुभाषितांचे स्वरूप प्राप्त झाले आहे, ते त्यांच्या शैलीदार लेखनाचेच यश म्हणता येते.

वास्तविक पाहता प्रत्येक माणसाची खास अशी एक स्वतंत्र शैली असते. लेखक-कवींच्या बाबतीत ही गोष्ट अधिक प्रकर्षाने नजरेत भरते. परंतु डॉ. बाबासाहेबांच्या शैलीदार लेखनाचीच नव्हे, तर अनेक वर्ष मराठी अभ्यासकांनी त्यांची मराठी लेखक म्हणून ही नोंद घेतलेली नव्हती. त्यासंदर्भात श्री यदुनाथ थत्ते यांनी एका

ठिकाणी व्यक्त केलेले मत, हरीनरके यांनी आपल्या संपादित ग्रंथाच्या संपादकी या मध्ये नमूद केले आहे. त्यात श्री थत्ते लिहितात, "डॉ. आंबेडकर उत्तम मराठी लेखक होते, ही गोष्ट क्वचितच ध्यानी घेतली जाते. त्यांची मराठी भाषा, तिचे सर्व संचित संस्कार घेवून शैली बद्ध होते, पण...इतकी अस्सल मराठी भाषा लिहिणाऱ्या बाबासाहेबांना मराठी लेखक म्हणून फारशी मान्यता असू नये...हे विद्याक्षेत्र कितीको ते आणि कल्पना हीन आहे त्याचेच निदर्शक म्हणावे लागेल." ३ हे श्री थत्ते यांचे विधान वास्तवावर मार्मिकपणे बोट ठेवणारे आहे, हे कुणीही नाकारणार नाही. परंतु, असे घडण्यामागे डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी म्हटल्या प्रमाणे, "...आधुनिक वाङमयाचे व्यासंगी अभ्यासक असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्वतंत्रपणे साहित्यचिंतन आपल्या लेखनातून करता आले नाही"४ त्याबरोबरच बाबासाहेबांचे इंग्रजी भाषेतून झालेले ग्रंथ लेखन व अनेक वर्ष वृत्तपत्रातील लेखन पुस्तक रूपाने प्रसिद्ध न होणे याशक्यता ही नाकारता येणार नाहीत. मात्र आज त्यांच्या संपूर्ण ग्रंथांचे मराठी अनुवाद उपलब्ध झालेले आहेत. त्यामुळेही उणीव दूर होण्यास निश्चितच मदत झाली आहे, असे म्हणता येते.

**संदर्भ व आधार ग्रंथ:**

१. डॉ. प्रल्हाद लुलेकर: अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन प्रा. लि. पुणे, द्वितीयावृत्ती- २०१२ पृष्ठ १९५

२. भालचंद्र फडके: डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८५ पृष्ठ ७०

३. हरीनर केवइतर (संपा.): संपादकीय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता, १९२९ ते १९५६, डॉ. बा. आं. चरित्र साधने, प्रकाशन समिती, आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, प्रथमावृत्ती२००५ वरून उधृत.

४. डॉ. प्रल्हाद लुलेकर : उ.नि. पृष्ठ १९०

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही शासनपद्धती संबंधी विचार

**प्रा. डॉ. गोरे बी. एम.**
संभाजी कॉलेज, मुरुड जि लातुर, समाजशास्त्र विभाग

**प्रस्तावना :-**

सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक अशा सर्वच बाबतीत भारतात प्रचंड विषमता होती डॉ. बाबासाहेब आंबेडकर समतेचे पुरस्कर्ते होते. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात सर्वच क्षेत्रात समता प्रस्थापित व्हावी यासाठी आयुष्यभर प्रयत्न केला. समता, स्वातंत्र्य, बंधुता, व न्यायावर आधारित राष्ट्र निर्माण करणे हा बाबासाहेबांच्या संघर्षाचा उद्देश होता. मूकनायक, बहिष्कृत भारत यासारख्या साप्ताहिकातून त्यांनी दलितांच्या दुःखाला वाचा फोडली. महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह, गोलमेज परिषदेमधील उपस्थिती स्वतंत्र मतदारसंघ व घटना समिती वरील त्यांचे कार्य हे सर्व भारतात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठीचे आहे. सामान्य माणसाला न्याय मिळावा गुलामी नष्ट होऊन स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा व बंधुभाव निर्माण व्हावा असे बाबासाहेबांना वाटत होते. यासाठीच बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीचा स्वीकार केला.

**उद्देश :-**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय व सामाजिक लोकशाही बाबतचा दृष्टीकोन समजून घेणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोणता शासन प्रकार आदर्श वाटत होता याचा शोध घेणे.

गृहीतकृत्ये :-

१) सामाजिक लोकशाही शिवाय राजकीय लोकशाही अर्थहीन आहे असे बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

२) इतर सर्व शासन प्रकारापेक्षा बाबासाहेबांना लोकशाही आदर्श वाटत होती.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन निबंध लिहिण्यासाठी द्वितीय स्त्रोतांचा आधार घेतला आहे. यामध्ये ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे, मासिके इत्यादींचा आधार घेऊन तथ्य संकलन करण्यात आले आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही संबंधी विचार :-**

लोकशाही ही केवळ शासन पद्धती नसून तो एक जीवनाचा मार्ग आहे व्यक्तीचे व्यक्तिगत व सामूहिक जीवन सुखी करणारा लोकशाही हा एक मार्ग आहे. जुलूम, जातीयता, अस्पृश्यता व गुलामगिरीतून सामान्य माणसाला मुक्त करणारी शासन व्यवस्था म्हणजे लोकशाही आहे. परंतु राजकीय लोकशाहीच्या यशासाठी सामाजिक लोकशाहीची प्रतिष्ठापना झाली पाहिजे. सामाजिक लोकशाही म्हणजे समता व बंधूता यावर आधारीत समाजाची निर्मिती करणे होय. सामाजिक लोकशाही म्हणजे कोणत्याही व्यक्तीला किंवा एका वर्गाला विशेष सवलत नसावी तर सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. शिवाय हजारो वर्षे वंशपरंपरेने सत्तेत असलेल्या सत्ताधारी वर्गाची एकाधिकारशाही नष्ट करून हजारो वर्षांपासून सत्तेपासून दूर असलेल्या वर्गाला सत्ता प्राप्त करून दिली पाहिजे. जन्माने कोणीही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसावा तर आपल्या कर्माने व्यक्ती श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असावा ही बुद्ध चरित्रातील शिकवण बाबासाहेबांच्या कायम स्मरणात होती. म्हणून व्यक्तीचा दर्जा हा त्या व्यक्तीच्या

जन्मजात संपत्ती इत्यादी वरून न ठरता व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या बुद्धिमत्ता आणि कौशल्य इत्यादी गुणांवर ठरविण्यात यावा. भारतीय समाजात बंधुभाव निर्माण व्हावा बहुसंख्याकांनी अल्पसंख्यांकांवर जुलूम जबरदस्ती करू नये. सामाजिक, आर्थिक राजकीय, शैक्षणिक, धार्मिक इत्यादी सर्वच ठिकाणी समता निर्माण व्हावी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, समता म्हणजे सर्व बाबतीत सारखेपणा असणे असा नसून सर्वांना समान दर्जा व समान संधी मिळवून देणे होय.

भारतात सर्वच क्षेत्रात प्रचंड विषमता असल्या कारणाने बाबासाहेबांनी सामाजिक लोकशाहीला प्राधान्य दिले. त्यांच्या मते, 'एक व्यक्ती एक मत' हे तत्व सामाजिक लोकशाहीत पुरेसे नाही. म्हणून 'एक व्यक्ती एक मत एक 'असे तत्त्व . बाबासाहेब म्हणतात की, 'समाजात जोपर्यंत सामाजिक लोकशाही प्रस्थापित होणार नाही तोपर्यंत राजकीय लोकशाही अर्थहीन आहे' कारण राजकीय क्षेत्रात व्यक्तीवर जेवढा अन्याय होतो त्यापेक्षा अधिक अन्याय सामाजिक क्षेत्रात होतो समाजाकडून व्यक्तीची होणारी पिळवणूक अधिक जाचक व खोलवर दूरगामी परिणाम करणारी असते. समाज व्यक्तीला कनिष्ठ मानतो समाजच व्यक्तीचा अपमान व अवहेलना करतो तर काही व्यक्तीला जन्माच्या आधारे समाज श्रेष्ठ व उच्च ठरवतो त्या व्यक्तीला मान, सन्मान इज्जत व प्रतिष्ठा देतो म्हणून सामाजिक लोकशाही प्रस्थापित झाली नाही तर राजकीय लोकशाही अर्थहीन आहे.

साम्यवाद, फॅसीझम, हुकूमशाही आणि एकाधिकारपद्धतीच्या शासन पद्धतीपेक्षा बाबासाहेब आंबेडकरांना लोकशाही शासन पद्धती आदर्श वाटत होती. लोकशाही शासनपद्धती हीच त्यांना का आदर्श वाटत होती त्याची कारणे ते पुढील प्रमाणे देतात.

**१) शांततापूर्ण मार्गाने बदल :-**

फॅसिझम, साम्यवाद हुकूमशाही इत्यादीसारख्या शासन पद्धतीला बाबासाहेबांचा विरोध होता. समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा चुकीचे विचार उच्च-नीचता, विषमता, स्त्रीदास्य इत्यादीमध्ये बदल झाला पाहिजे. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते लोकशाही हा असा शासन प्रकार आहे की ज्यात सनदशीर व शांततापूर्ण मार्गाने समाजात बदल होतो. भारताची सामाजिक, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक परिस्थिती पाहता लोकशाही हाच एकमेव मार्ग आहे. हे बाबासाहेब मान्य करतात आणखी महत्त्वाची बाब म्हणजे राजकीय सत्तेचे हस्तांतरण देखील शांततापूर्ण मार्गाने लोकशाहीमध्ये शक्य होते.

**२) स्वातंत्र्याचे रक्षण :-**

जगात हुकूमशाही, साम्यवादी, फॅसिस्ट अशा अनेक शासन पद्धती आहेत परंतु लोकशाही शिवाय इतर कोणत्याही शासन पद्धतीत व्यक्तीला स्वातंत्र्य प्राप्त होत नाही. हुकूमशहाचा शब्दच प्रमाण मानला जातो. तेथे जनतेच्या मताला कवडीची किंमत नसते. परंतु लोकशाही शासन पद्धतीत व्यक्तीस्वातंत्र्याचे रक्षण केले जाते. त्यामुळे बाबासाहेबांनी लोकशाही शासन पद्धती स्वीकारली.

**३) जनतेच्या हिताची जपणूक :-**

लोकशाही ही एक अशी शासन पद्धती आहे की लोकशाहीमध्ये लोकांच्या हिताची जास्तीत जास्त जपणूक केली जाते. लोकशाहीत जनता महत्त्वाची मानली जाते. म्हणून जनतेच्या सुखाची जास्तीत जास्त जपणूक केली जाते. व्यक्तीच्या सुखाबरोबरच समाजाचे हित लक्षात घेऊन लोकशाही राबवली जाते. म्हणूनच बाबासाहेबांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला.

**४) व्यक्तीप्रतिष्ठा :-**

लोकशाहीमध्ये व्यक्ती हा केंद्रबिंदू असतो म्हणून जनतेचे हित, जनतेचे कल्याण, जनतेचे सुख याला जास्तीत जास्त महत्त्व दिले जाते. इतर शासन पद्धतीमध्ये सामान्य माणसाला सत्ता प्राप्तीची संधी मिळत नाही. परंतु सामान्य व्यक्तीला सत्ता प्राप्तीची संधी उपलब्ध करून देणारा शासन प्रकार म्हणजे लोकशाही आहे. म्हणूनच जनता जनार्दन मतदार राजा असे जनतेला म्हटले जाते.

**निष्कर्ष** :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजरचनेचा अतिशय बारकाईने अभ्यास केला होता. भारतातील सामाजिक, आर्थिक धार्मिक व राजकीय परिस्थिती बारकाईने अभ्यासली होती. या देशातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, उच्चनीचता, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव गैरबराबरी इत्यादी सर्व बाबींचा सखोल अभ्यास बाबासाहेबांनी केला होता. म्हणून अभ्यासांती व या देशातील परिस्थिती लक्षात घेऊन ते म्हणतात की, सामाजिक लोकशाही शिवाय राजकीय लोकशाही ही अर्थहीन आहे. भारतात सामाजिक लोकशाही प्रस्थापित झाली नाही तर राजकीय लोकशाही यशस्वी होणार नाही आणि आपण तेच पाहतोय की या देशात सामाजिक लोकशाही प्रस्थापित न झाल्यामुळे भारतीय लोकांना अजूनही योग्य न्याय मिळत नाही आजही जनतेला मूलभूत हक्काचा लाभ मिळत नाही.

जगात फॅसीझम, साम्यवाद, हुकूमशाही अशा वेगवेगळया शासन पद्धती आहेत या शासन पद्धतीमध्ये जनतेच्या मताला, जनतेच्या हिताला, जनतेच्या कल्याणाला व सुखाला महत्त्व दिले जात नाही. परंतु लोकशाहीमध्ये जनतेच्या हिताला, कल्याणाला व सुखाला महत्त्व दिले जाते. लोकशाहीमध्ये शांततापूर्ण मार्गाने परिवर्तन घडवून आणता येते तसेच जनतेच्या हक्क अधिकाराचे रक्षण केले जाते. लोकशाहीत व्यक्ती किंवा जनता हीच केंद्रबिंदू मानली जाते. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना इतर सर्व शासन प्रकारापेक्षा लोकशाही आदर्श वाटत होती. म्हणूनच त्यांनी लोकशाहीचा स्वीकार केला.

**संदर्भसूची** :-

१) भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक - प्रा डॉ प्रकाश बोबडे

२) डॉ बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार - संपादक धनराज डाहट

३) आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास - प्रा. दिनेश मोरे

४) पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत - डॉ. प्रभा कस्तुरे - वाडकर

५) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास - डॉ एस. एन. गाठाळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्ती व कार्य

**प्रा. डॉ. येरावार किरण किशनराव**
क्रीडा संचालक, लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड.

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि स्वतंत्र्य भारताचे पहिले न्यायमंत्री होते. ते प्रमुख कार्यकर्ता आणि समाजसुधारक होते. डॉ. भिमराव आंबेडकरांनी दलीताच्या उत्थानाकरीता आणि भारतातील मागासलेल्या वर्गाच्या प्रगतीकरिता आपल्या संपूर्ण जिवनाचा त्याग केला. डॉ. आंबेडकर दिन दलीतांचा उध्दारकर्ता म्हणून त्यांचे नांव आजरामर आहे आज समाजात दिनदलीतांना जे स्थान आहे. त्याचे पूर्ण श्रेय डॉ. भिमराव आंबेडकर यांना जात देशप्रेमा पूढे ज्याने स्वत:च्या विश्रांतीचा त्याग केला. दिनदलीतांना स्वाभिमाना शिकवला. ज्यांनी शिका संघटीत व्हा व संघर्ष करा असा लाख मोलाचा मंत्र दिला. ज्यांनी आम्हाला संकटाशी सामना करणे शिकवले समाजात जातिपातीच्या भेदभावामुळे पसरलेल्या दूराचाराला संपवण्यात बाबासाहेबांची मोलाची भुमीका बजावली जातिपाती च्या भेदभावामुळे भारतीय समाजाला संपूर्णत: विस्कळीत आणि अपंग बनविले होते. त्याला पाहता आंबेडकरांनी दलीतांच्या हक्कांची लढाई लढली आणि देशातील सामाजिक स्थितीत ब—याच प्रमाणात बदल झाला.

**भिमराव आंबेडकराचे प्रारंभिक जिवन :—**

डॉ. भिमराव आंबेडकरांचा जन्म मध्यप्रदेशात झाला. बाबासाहेब १४ एप्रिल १८९१ ला मध्यप्रदेशातील इंदौर जवळ महु येथे रामजी मालोजी सकपाळ आणि भिमाबाई या दाम्पंत्यांच्या पोटी जन्माला आले. जेंव्हा आंबेडकराचा जन्म झाला तेंव्हा त्याचे वडील भारतीय सैन्यात सुभेदार पदावर कार्य करीत होते. आणि त्यांची नेमणुक इंदौर येथे होती. ३ वर्षानंतर १८८४ ला त्यांचे वडील रामजी मालोजी सपकाळ सेवा निवृत्त झाले. आणि संपूर्ण कुटूंब महाराष्ट्रातील साता—यात स्थानांतरीत झाले. भिमराव आंबेडकर आपल्या आईवडीलांचे १४ वे आणि शेवटचे अपत्य होते. ते सर्वात लहाण असल्याने त्यांच्या कुटूंबातील सगळयांचे लाडके होते.

डॉ. बाबासाहेब इ.स. १९०८—१२ या काळात मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेज मधून बी.ए. झाले. पदवीधर झाल्यानंतर वडीलांच्या इच्छेविरुध्द बडोदा संस्थानात नोकरी धरली. दरम्यान कालावधीत त्यांच्या वडिलांचे निधन झाले. तसेच अमेरिकेत उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांना बडोदा संस्थानाची शिष्यवृत्ती मिळाली व त्यााठी त्यांनी १० वर्ष बडोश संस्थानात नोकरी करण्याच्या करारपत्रावर सही केली होती.

जुलै १९१३ मध्ये आंबेडकर न्युयॉर्कला गेले तेथे त्यांनी खूप अभ्यास केला इ.स. १९१५ मध्ये त्यांनी एम. ए. ची पदवी मिळवली त्यासाठी त्यांनी 'प्राचीन भारतातील व्यापार ' या विषयावर प्रबंध लिहला मे १९१६ मध्ये त्यांनी castes in India हा प्रबंध लिहला जुन १९१६ मध्ये National Dividend of india –A Historical and analytical study हा प्रबंध कोलंबिया विद्यापीठास सादर करुण पीएच.डी. पदवी मिळवली पुढे ८ वर्षांनी हाच प्रबंध लंडनमधील एका प्रकाशन संस्थेने evolution of provincial finances in british india या नावाने प्रसिध्द केला. इ.स. १९१७ मध्ये मुंबईच्या सिडनेहॅम महाविद्यालयात राजकीय अर्थशास्त्र या विषयाचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. अल्प काळातच विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी नाव मिळवले. प्राध्यापक असताना जिवनात काटकसर करुण पैसा शिल्लक टाकला कोल्हापूरच्या शाहू महाराजकडून अर्थसाहाय मिळवले. बी.ए. होईपर्यंत्न आंबेडकर साधारण विद्यार्थी होते. अमेरिकेत गेल्यानंतर त्यांच्यातील सुप्त गुणांचा विकास झाला सतत वाचण, चिंतण प्राध्यापकांचे उत्तम मार्गदर्शन इत्यादी मूळे त्यांच्यातील सूप्त अवस्थेतमधील संशोधन हा गुण विकासीत झाला. त्यांनी अनेक संशोधनात्मक ग्रंथ लिहले समाज हिताची तळमळ प्रचंड वाचन लेखन सभा सम्मेलनातून भाषणे विव्दता वक्तृत्व उत्तम चरित्र आदि गुणामूळे त्यांचे नेतृत्व पूढे आले.

**बहिष्कृत हितकारिणी सभा :**

९ मार्च १९२४ रोजी मुंबईतील परळ भागातील दामोधर ठाकरसी सभागृहात आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाच्या सामाजिक व राजकीय अडचणी सरकार पूढे मांडण्यासाठी एक मद्यवर्ती संघटना किंवा संस्था असावी या विषयी विचारविणीमय करण्यासाठी एक बैठक बोलावली. या बैठकीतील ठरावानुसार २० जूलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारिनी सभा' ही संस्था स्थापन झाली या संस्थेची ध्येय उदिष्टये, बहिष्कृत वर्गाच्या चालू परिस्थितीची माहिती गोळा करुण व ती लोकदर्शनास आणून त्यावर लोकमत तयार करणे तसेच विद्यार्थी वस्ती गृहाव्दारे किंवा अन्य साधनाव्दारे बहिष्कृत समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, बहिष्कृत वर्गात जागृती करणे, बहिष्कृत समाजात उच्च संस्कृतीची वाढ करण्यास ठिकठिकाणी वाचणालये, शैक्षणिक वर्ग, अथवा स्वाध्याय केंद्रे उघडणे, बहिष्कृत समाजाची सांपत्तीक स्थिती सुधारण्यासाठी औद्योगिक व शेतीविषयक शाळा चालवणे शिका, लढा द्या व संघटित व्हा' हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते. या संस्थेत अस्पृश्यता शिवाय सवर्ण व हिंदुचा समावेश करण्यात आला होता. बहिष्कृत हितकारिणी ने आपल्या कार्यक्रमात ज्ञान प्रसारावर अधिक भर दिला होता. अस्पृश्याची मूले शिकली पाहिजेत व त्यासाठी अस्पृश्य समाजातील मूलांची राहण्याची, खाण्याची व शिक्षणाची सोय झाली पाहिजे असे आंबेडकर सह या सभेतील सर्व पदाधिका—यांचे मत होते. बहिष्कृत हितकारीणी सभेची स्थापना म्हणजे भारतातील पददलीतांना स्वावलंबन, स्वाभिमान नि अत्मोव्दार यांची शिकण देउण देशात महापरिवर्तन घडवून आणणा—या युगाचा प्रारंभच होय.

समाज समता संघाची स्थापना ४ सप्टेंबर १९२७ रोजी डॉ. बाबासाहेबांनी स्थापन केली ते स्वत: या संस्थेचे अध्यक्ष होते. या संस्थेचे ध्येय अत्यंत व्यापक होते. सर्व मानसे समान आहेत. मानसाच्या विकासासाठी आवश्यक असणा—या साधनावर व संधीवर प्रत्येक मानसास समान हक्क आहे. आशि या संस्थेची धारणा होती.

सामाजिक समतेच्या तत्वावर या संस्थेचा विश्वास होता सामाजीक समतेचे तत्व हे सामाजाच्या स्थेर्यासाठी आवश्यक आहे. नितीच्या भक्कम पायावर समाजाची उभारणी करावयाची असेल तर सामाजच्या प्रत्येक घटकाला धार्मिक, सामाजिक, राजकीय, व आर्थिक क्षेत्रात समतेचे तत्व लागू करणे आवश्यक आहे. अशी या संस्थेची धारणा होती. स्वत: आंबेडकरांनी म्हटले होते. 'समता सैनिक दलाच्या सर्वत्र शाखा उघडा, प्रत्येक तरुण तिचा सदस्य झाला पाहिजे. सवर्णाचा जूलुम व अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी या संघटनेची गरज आहे. महाडचा सत्याग्रह १९,२० मार्च १९२७ रोजी महाड मध्ये डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षेतेखाली कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद भरली होती सदरील स्थळ महाड हे मुंबईपासून १७० किलोमीटर अंतरावर असून मुंबई, गोवा महामार्गावर हे गाव आहे. येथील परिषदेत १४ ठराव पास झाले. त्यात अस्पृश्य समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक अन्नती बाबतचे व सरकारी नोक—या बाबतचे ठराव होते. या मुळे भारतात नविनयुग सुरु झाल्याची नि हिंदू समाजाला जाग आणनारी हि ललकारीच होती. राष्ट्राला सामाजिक पुर्नरचनेचा प्रवाह नि आंबेडकराच्या जीवनाचा प्रवाह यांना वळण देणारी ती अभूतपूर्व आशिच घटना होती. अव्यायाचा प्रतिकार करण्यासाठी आपण आता संघटना उभारु शकतो. आपण आपले ग—हाणे मांडू शकतो आपण आता एकटे व थिटे नाही असा विश्वास निर्माण झाला पुढे त्यांनी मनुस्मृतीचे दहन त्यांनतर नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, पुणे करार, स्वतंत्र्य मजुर पक्षाची स्थापना, अ.भा. शेडयुल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, रिपब्लिक पार्टी स्थापना, हिंदू सहिता विध्येयक हिंदूकोड बिल स्थापना.

डॉ. आंबेडरांची पत्रकारिता—मुकनायक या पत्राने सामाजीक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे ही जानीव निर्माण केली. 'मुकनायक' पत्रात विविध विचार वर्तमान सार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम समाचार, कुशल प्रश्न व शेला पागोटेही सादर होती. 'बहिष्कृत भारत' या मध्ये बिनतोड युक्तीवाद तर्ककठोरता, नेमकेपणा, विचारात स्पष्टता, साधार पूरावे, समाजाला जागे करण्याची तळमळ हि त्यांच्या लेखनीची खास वैशिष्टये होती, जनता हे पाक्षीक स्वत: आंबेडकरांनी सुरु केले. आंबेडकर स्वत: जनता पत्रातून लेखन करीत धर्मांतरांची भुमिका, स्वतंत्र मजुर पक्षाची भुमिका स्वातंत्र्यानंतर आंबेडकरांनी कायदा मंत्री म्हणून तसेच राज्यघटनेचा मुसदा तयार करण्याचा समितीचे अध्यक्ष म्हणून जी अपूर्व कामगीरी केली. त्याची माहिती जनता पत्रामुळेच जनते पुढे आली.

**धर्मांतराची घोषणा व बौध्द धर्माचा स्विकार :**

१० वर्षातील चळवळीमुळे व भावी राजकीय सुधारण्याच्या दृष्टीने राजकीय आणि सामाजिक परिस्थीतीचा आढावा भावी घेण्यासाठी नाशिक जिल्हयातील येवला येथे मुंबई इलाखा दलितवर्गीय परिषद भरली. अस्पृश्य नेत्यांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी ही परिषद बोलावली अस्पृश्य समाजातील सुमारे दहा हजार लोक या परिषदेस उपस्थित होते या परिषदेत अस्पृश्य वर्गाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात जी दूर्दशा झाली. त्याचा विष्कृत आढावा भाषणात आंबेडकरांनी व्यक्त केला. अस्पृश्यांना हिंदू धार्मीयाचे रक्तबांधव बसुनही किती भयंकर यास, दुखे व हालआपेष्टा सहन कराव्या लागतात हे त्यांनी मांडले. नाशिकच्या काळाराम मंदीर प्रवेश चळवळीत वेळ, श्रम, काळ व पैसा वाया गेला. असे स्पष्ट करुण उपस्थित जनसमुदायापूढे एक तासभर मंत्रमुग्ध होउण भाषण केले या मध्ये त्यांनी एक प्रश्न अपाधीत केला ' जो धर्म आपल्याला समान दर्जा देईल, समान हक्क देईल आणि योग्य त–हेणे वागविल आशा एखाद्या धर्मात जावे असे तूम्हाला वाटत नाही का हिंदू धर्माशी असलेला तोडा ज्या धर्मात समान दर्जा, समान संधी व समान वागणूक मिळते आशा धर्मात प्रवेश करा असे अहवान त्यांनी केले याच येवला येथील परिषदेत त्यांनी सांगीतले की ' मी अस्पृश्य जातीत जन्मास आलो हा काही माझा अपराध नाही. पण मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही' असे त्यांनी घोषीत केले धर्म सर्व मानवास समान वागवणारा असला पाहिजे हिंदू धर्माची बैठक असमानतेच्या पायावर उभी आहे. म्हणून हिंदू धर्म अस्पृश्यांना त्याज्य वाटतो. मी धर्मातर करुण हिंदुवर सूड उगवतो असे कोणी समजु नये. असेही डॉ. बाबासाहेबांनी म्हटले आहे अन्यायाविरुध्द सात्वीकपणे लढणारा नेता म्हणून देशाला डॉ. बाबासाहेबांची आठवण चिरकाल राहील डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे तेजस्वी ज्ञानयोगी होत.

**संदर्भ सुची :**

१. डॉ. कठारे अनिल व सातपूते हरिभाउ, मराठवाडयातील सत्यशोधक चळवळ औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन, २००९.
२. गायकवाड प्रदिप संपा. कामगार चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकराची निवडक भाषणे व लेख, नागपूर, क्षितीज पब्लीकेशन ति.आ. २००६.
३. गायकवाड जयदेव, संविधान सभेत डॉ. आंबेडकर, पूणे पद्मगंधा प्रकाशन २००.
४. पानसरे गोविंद, मंडल आयोग आणि राखीव जगांचा प्रश्न मनोहर यशवंत, समता दैनिक दल, नागपूर युगसाक्षी प्रकाशन २००५.
५. पंढरीनाथ सीताराम पाटील, महात्मा ज्योतीराव फुले, लोकसाहित्य प्रकाशन औरगाबाद
६. के सागर, महाराष्ट्रातील समाजसुधारक, साहित्यीक भारतीय विचारवंत व अन्य महानिय व्यक्ती, के सागर हाउस बुक्स आप्पा बळवंत चौक पुणे–२०१५.
७. प्राचार्य डॉ. एस.एस. गाठाळ, महाराष्ट्रातील समाजसुधारक, कैलास पब्लीकेशन औरगपूरा औरंगाबाद.
८. डॉ. साहेबराव गाठाळ, आधुनिक भारतीय विचारवंत भोसले एस.एस. संपा. राजर्षी शाहु:काल विचार व कार्य, कोल्हापूर, १९७५.
९. बागल माधवराव, बहुजन समाजाचे शिल्पकार,
१०. वैद्य कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास.
११. धनंजय किर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकहितकर्ते बाबासाहेब बोले, १९७८

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**डॉ. सुनिता लिंबराज गुजर**

अर्थशास्त्र विभाग शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे निष्णात अर्थतज्ञ, एक थोर विचारवंत होते. त्यांनी अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, विधिज्ञ, शिक्षणतज्ञ, पत्रकार, संसद सदस्य आणि या सर्वांच्या पलीकडे जाऊन समाजसुधारक आणि मानवाधिकारांचा रक्षक या नात्याने केलेले कार्य अतुलनीय आहे. तसेच त्यांनी आपल्या अफाट बुद्धिमत्तेने येथील जुनाट, विषमताग्रस्त व कालबाह्य व्यवस्थेला ठोकर मारून भारत देशाला नवीन दिशा दिली व तथागत बुद्ध व सम्राट अशोक यांच्यानंतर महान क्रांती घडवून आणली व सर्व लोकांना सर्वच क्षेत्रात समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय यावर आधारित व्यवस्था प्रदान केली. देशाच्या या थोर सुपुत्रास कोटी कोटी प्रमाण!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मूळ अभ्यास विषय अर्थशास्त्र हाच होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व अनेक पैलूंनी युक्त असले तरी त्यात एक समान धागा होता आणि तो आर्थिक हित पाहणारा होता. जी सामाजिक क्रांती ते करू पाहत होते ते सर्व आर्थिक परिवर्तनच होते. त्यांच्या आर्थिक विचारांचा केंद्रबिंदू दलित, शोषित, पीडितांचा उद्धार व कल्याण हाच होता.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार जाणून घेणे.
2) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा अभ्यास करणे.
3) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची समर्पकता अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता द्वितीयक सामुग्रीचा व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार**

डॉ.आंबेडकरांचे आर्थिक प्रारूप आर्थिक, सामाजिक, भौतिक, धार्मिक, तंत्रज्ञान आणि मानवतावादी मूल्यांचे मिश्रण आहे. त्यांनी आर्थिक तथ्यांचे विश्लेषण अनुभवावर व वैज्ञानिक मापदंडाच्या आधारावर केले. म्हणून बाबासाहेबांचे संपूर्ण आर्थिक विचार वैज्ञानिक होते. त्यामुळे देशातच नव्हे तर जागतिक पातळीवरसुद्धा त्यांचा गौरव केला जातो. बाबासाहेबांचे आर्थिक व्यवस्थेवरील विचार किती महत्त्वपूर्ण आहेत हे त्यांच्या आर्थिक बाबीवरील लिखाणाचे अवलोकन केले असता दिसून येईल

आंबेडकरांनी आपल्या आर्थिक तंत्रात व्यापार, कृषी उद्योग, जातीचे अर्थशास्त्र, आदर्श चलन पद्धती, आर्थिक पायाभरणी, औद्योगिकीकरण, मजुरी, श्रमिकांचे कल्याण इत्यादीवर आपले विचार व्यक्त केले.

**कृषी विषयक विचार**

शेती हा भारतातील सर्वांत मोठा व्यवसाय असून त्यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या जास्त तर दुसरीकडे शेतीची उत्पादकता कमी आहे. वारसा हक्क हे जमिनीच्या विभाजनाचे मुख्य कारण नसून शेतीवर असणारा लोकसंख्येचा अतिरिक्त भार हेच मूळ कारण आहे असे मत आंबेडकरांनी व्यक्त केले. उत्पन्नावर जमीन महसूल आकारणे अन्याय आहे. तसेच काही विशिष्ट रक्कमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या जमीन महसुलात माफी मिळाली पाहिजे म्हणूनच जमीन महसूल संहितेचे 107 वे कलम रद्द करून जमीन महसूल प्राप्तीकराच्या कक्षेत आणला पाहिजे असे विचार आंबेडकरांनी व्यक्त केले. विखुरलेल्या व लहान धारण क्षेत्राच्या समस्येवर उपाय म्हणून त्यांना सहकारी शेती योग्य वाटत होते.

**औद्योगिक पायाभरणी**

औद्योगिक कामगारांच्या क्षेत्रात डॉ.आंबेडकरांनी 1936 मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. त्याचप्रमाणे व्हॉइसरॉयज एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे कामगार सदास्य या नात्याने 1942 ते 1946 या काळात डॉ.आंबेडकर यांनी कामगारविषयक धोरणात आमुलाग्र सुधारणा घडवून आणल्या. त्यात सेवायोजन

कार्यालयाची स्थापना ही महत्त्वपूर्ण घटना होती आणि स्वतंत्र भारतातील औद्योगिक संबंधाची तीच पायाभरणी ठरली.

**श्रमविभाजन आणि अर्थशास्त्र**

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेसारख्या सामाजिक आजारांचे आर्थिक पैलू उलगडून दाखविणे, हे डॉ.आंबेडकरांचे आणखी एक विद्ववत्तापूर्ण कार्य होय. श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार महात्मा गांधीनीही जातिव्यवस्थेचे अस्तित्व स्वीकारले होते. मात्र आंबेडकरांनी 'जातीचा उच्छेद' या आपल्या पुस्तकात त्यावर कडाडून टीका केली होती. जातिव्यवस्थेमुळे केवळ श्रमाची विभागणी केली गेली नसून, श्रमिकांचीच विभागणी केली गेली आहे, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले. डॉ.आंबेडकरांचा जातिव्यवस्थेवरील हल्ला हा केवळ उच्चवर्णियांच्या वर्चस्ववादाला दिलेले आव्हान नव्हते तर आर्थिक विकासाशी त्यांच्या मांडणीचा जवळचा संबंध होता. जातिव्यवस्थेमुळे श्रमाची आणि भांडवलाची गतिशीलता कमी झाली असून त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर प्रतिकूल परिणाम झाला आहे असे त्यांचे प्रतिपादन होते.

**चलनविषयक विचार**

'प्रॉब्लेम ऑफ द रूपी' या पुस्तकात रूपयाच्या अवमूल्यनावर आंबेडकरांनी त्यांचे विचार मांडलेले आहेत. स्वतंत्र भारताचे चलन हे सोन्यात असावे असा अर्थतज्ज्ञ लॉर्ड केन्स यांनी केलेला दावा आंबेडकरांनी खोडून काढला होता. त्याऐवजी सुवर्ण विनिमय परिमाण (गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड) अमलात आणावे अशी शिफारस आंबेडकरांनी केली. त्यासंदर्भात सन 1925 साली स्थापन केलेल्या हिल्टन यंग आयोगापुढे त्यांनी साक्षही दिली. त्यानंतर सन 1935 साली भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना करण्यात आली. भारताच्या मूलभूत आर्थिक विचारांचा पाया देखील आंबेडकरांच्या आर्थिक विचारांवर घातला गेला.

**महिला विकास**

डॉ. आंबेडकरांनी आर्थिक विकासामध्ये महिलांच्या योगदानाला महत्त्वपूर्ण मानले आहे. म्हणूनच त्यांनी संविधानाच्या माध्यमातून महिलांना स्वतंत्र अधिकारच मिळवून दिलेले आहेत. कारण स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या जीवनमूल्यांवर आधारित नवीन समाजरचना निर्माण व्हावी अशी त्यांची अपेक्षा होती. सद्यःस्थितीतील महिलांना जे व्यावसायिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळत आहे, त्याची सशक्त आधारशीलाच डॉ.आंबेडकरांनी ठेवली आहे. यावरून असे लक्षात येते की, डॉ.आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उद्धारक होते.

'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या त्यांनी दिलेल्या मंत्रातूनच त्यांचे आर्थिक विचार सुस्पष्टपणे दिसून येतात. आंबेडकरांचे विचार सामाजिक, धार्मिक आणि नैतिक तत्त्वावर आधारलेले आहेत. शोषक आणि शोषित हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू आहे. दबलेल्यांना उभारी देणे आणि शोषितांची जोखडातून मुक्तता करणे हाच त्यांच्या विचारांचा मूलाधार आहे. सर्वांना स्वातंत्र्य, समता आणि न्याय मिळावा हाच त्यांच्या वैचारिक मांडणीचा प्रमुख हेतू आहे.

**निष्कर्ष**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील सगळ्यांचे आर्थिक हित पाहिले.
2) शोषित, पीडीत समाजासाठी उदंड कार्य करून त्यांना आर्थिक न्याय मिळवून दिला.
3) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, करूणा ह्या वैश्विक मानवी मूल्यांना महत्त्व दिले.

**संदर्भ**

1) डॉ.एस.एस. गाठाळ, आंबेडकरी चळवळीचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद
2) धनंजय कीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
3) प्रा.डॉ.जे.एफ. पाटील, आर्थिक विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जुलै 2009
4) https://mr.m.wikipedia.org
5) https://www.bookganga.com
6) https://www.mahamtb.com
7) https://loksatta.com
8) https://maharashtratimes.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार

अंगद श्रीपती भुरे
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेती व्यवसाय हा व्यक्तीच्या विकासाबरोबरच देशाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण घटक आहे. 'खरा भारत पाहायचा असेल तर, खेड्याकडे चला'. असे महात्मा गांधीजींनी म्हटले आहे. त्याप्रमाणेचमहात्मा फुले यांच्या विचाराला आणि शाहू महाराजांच्या कृतीला अर्थशास्त्रीय परिभाषेमध्ये बसवताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आर्थिक विकासात शेतीचे महत्त्व प्रतिपादन करताना म्हणतात की, 'शेती केवळ पोट भरण्याचं साधन नाही, तर राष्ट्रीय उत्पादनाचे एक मोठे व महान असे साधन आहे.' म्हणूनच शेतीकडे केवळ उपजीविकेचे एक साधन म्हणून न पाहता शेती हा आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण घटक आहे या हेतूने शेतीला विशेष महत्त्व दिले पाहिजे.

भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतिज्ञ, तत्त्वज्ञ व समाजसुधारक, घटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्वपरिचित आहेत. माणसाला मानवधर्माची शिकवण देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य, शोषित, पीडित लोकांमधील अज्ञान नष्ट करण्यासाठी अनेक चळवळी उभारल्या, या चळवळीच्या माध्यमातून कामगार, शेतकरी, शोषित, स्त्री आणि सामान्य जनसमूहवर्गाला त्यांच्या शोषणाची, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची, त्यांच्या मूलभूत अधिकारांची जाणीव करून दिली. स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामान्य जनांचे आधारस्तंभ होते.सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक अशा विविध क्षेत्रात दिलेल्या योगदानामुळे बाबासाहेबांना आधुनिक भारताचे शिल्पकार अथवा आधुनिक भारताचे निर्माते असे म्हणतात.

पाल बरणच्या व्याख्येनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सर्वोत्तम बुद्धिजीवीमध्ये मोडतात, तर आटोनिया ग्रामसी म्हणतात की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मूलतः बुद्धिजीवी व्यक्तिमत्त्वाचे एक असामान्य उदाहरण होय. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्येक पैलू पूर्णतः समाजाचे न्याय्यहक्क जोपासणारा आहे. त्यांनी आयुष्यभर उभारलेल्या आंदोलन व लढ्यांनी देशात एकता व अखंडता कायम ठेवलेली आहे. बाबासाहेब म्हणतात की, " मी प्रथम भारतीय व अंतिमत: भारतीयच आहे." देशाला प्राथमिकता देणारा उच्च दर्जाचा महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.ज्यांनी समाजातल्या विविध क्षेत्रामध्ये विकास करण्यासाठी आपल्या लेखणीतून प्रबोधन कार्य केले. असे असले तरी अजूनही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विविधांगी पैलू अभ्यासकांच्या अध्ययनातून दुर्लक्षित राहिलेला दिसून येतो, जसे शेती विकासाचा दृष्टिकोन.

मानवाच्या भ्रमंती जीवनाला खऱ्या अर्थाने स्थिरता मिळाली ती शेतीमुळेच. शेतीमुळेच माणूस एका जागी स्थिर झाला, आणि आपला उदरनिर्वाह करून लागला. त्याचबरोबरआर्थिकविकासही साध्य करू लागला. बदलत्या काळानुसार मानवाने शेतीचा शोध लावला, आणि शेती विकसित करण्याचे तंत्र त्यानेच निर्माण केले. आपल्या उदरनिर्वाहाबरोबरच शेतीद्वारे आर्थिक विकास साधण्याचा मानव प्रयत्न करू लागला. भारत हा कृषिनिष्ठ,कृषीजीवी आणि कृषीनिर्मित देश आहे. हे आपण अनेक शतकापासूनच ऐकतो आहोत. भारतातील ८०टक्के लोक हे शेतीवर अवलंबून आहेत त्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिकेंद्रित अशीच राहिलेली आहे हे लक्षात येते. शेतीच्या

माध्यमातून व्यक्तीचाच नाहीतर संपूर्ण देशाचा विकास होतो हे बाबासाहेबांनी अर्थशास्त्राच्या अभ्यासातून ओळखले होते त्यांनी आर्थिक विषयावरील शेकडो ग्रंथांचे सखोल अध्ययन केले होते. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातून १९१५ मध्ये एम.ए. व १९१७ मध्ये पीएच.डी ह्या पदव्या त्यांनी 'अर्थशास्त्र' या विषयात घेतल्या. 'इंडियन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या जगप्रसिद्ध शिक्षण संस्थेतून १९२१ मध्ये 'मास्टर ऑफ सायन्स' ही पदवी बाबासाहेबांना अर्थशास्त्रातील संशोधनाबद्दल मिळाली. ही पदवी मिळविणारे बाबासाहेब हे पहिले भारतीय व्यक्ती होते. मुंबई येथील सिडन हॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून बाबासाहेबांनी कार्य केले. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे कृषी होय. या कणारुपी कृषीला बाजूला काढले तर भारतीय अर्थव्यवस्था समृद्ध व संपन्न होणार नाही याची जाणीव डॉ. बाबासाहेबांना होती म्हणूनच त्यांनी शेतीविषयक विचार आपल्या लेखणीतून, आपल्या भाषणातून मांडलेले आहेत. इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असतानाच जमिनदारी, सावकारशाही,खोतपद्धती इत्यादी विषयीचा त्यांनी अभ्यास केला होता. भारतात परतल्यावर त्यांच्या लक्षात आले कि, सावकारशाही, जमीनदारी व खोतशाही भारतीय शेतकऱ्यांचे शोषण करीत आहे, त्यामुळे त्यांनी शेतीविषयक स्वतंत्र दृष्टिकोन आपल्या अनुभव अध्ययनातून मांडला.

डॉ. बाबासाहेबांचे शेतीविषयक विचार हे शेतकऱ्यांना आणि देशाला आर्थिक दृष्ट्या सक्षम करणारे आहेत.१९१७मध्ये लिहिलेल्या ' Small Holding in India and their Remedies and State and Minorities 'या ग्रंथातून बाबासाहेबांनी शेतकऱ्यांच्या समस्यांवरील उपाय मांडलेले आहेत. स्वतंत्र भारतातील ग्रामीण जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जे जे प्रयत्न करणार आहे त्याचा पाया सामाजिक न्याय असला पाहिजे म्हणून बाबासाहेबांनी औद्योगीकरण आणि शेती यांचे नाते अतूट असले पाहिजे असे म्हटले आहे. त्यांनी सांगितले की शेतीतील उत्पादित मालावर प्रक्रिया करणारे जे उद्योग आहेत ते शेतकरी व शेतमजूर यांच्या लाभासाठी निर्माण करणे आवश्यक आहे. विकास कार्यक्रमाच्या लाभाची न्याय तत्वावर समान वाटणी करणे गरजेचे आहे. व्यक्तीच्या स्वावलंबनावर अधिक भर त्यांचा होता, योग्य नियोजन करणे व आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. नवीन बी-बियाणे, खत वापरणे गरजेचे आहे त्याचबरोबर सामूहिक शेतीच्या प्रयोगाद्वारे शेती उत्पादन वाढवण्याची गरज आहे. शेती व शेतकरी समृद्ध ठेवणे गरजेचे आहे. शेतीचा विचार करून शेतकरी व पगारदार यांच्यामध्ये दुजाभाव ठेवू नयेत. त्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की,"करदात्या जनतेच्या दृष्टिकोनातून ही महसूल व्यवस्था आर्थिक विषमतेला खतपाणी घालणारे आहे व म्हणूनच ती असमर्थनीय आहे जसे की, शेतसारा, शेतीतून मिळणारे उत्पन्न अवर्षणामुळे कमी झाले काय किंवा उत्पादन भरपूर होऊन वाढले काय, प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या जमिनीच्या प्रमाणात शेतसारा भरावाच लागतो. त्यातून सर्व शेतकऱ्यांना शेतसाऱ्याचा एकच दर लागू होतो. मग तो अल्पभूधारक असो अथवा जहागीरदार वइनामदार असो. याउलट आयकर हा करदात्याच्या देयक्षमतेवर अवलंबून असतो.

शेतीच्या विकासाचा विचार करून बाबासाहेबांनी सांगितले की, शेतीचे आकारमान अधिक असेल तर उत्पादन वाढते असे नाही. तर असलेल्या शेतीमध्ये भांडवल आणि तांत्रिक साधनांची अधिक गरज आहे व त्याचबरोबर मनुष्यबळही अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले आहे. भारतीय कृषी व्यवसायाला मार्गदर्शक ठरणारा 'भारतातील लहान धारण क्षेत्र आणि त्यावरील उपाय' हा लेख बाबासाहेबांनी लिहिला. भारतीय शेतीविषयक बाबासाहेब म्हणतात की, लहान धारण क्षेत्र भारतातल्या शेतीला भेडसावणारी मोठी गंभीर समस्या

आहेच परंतु ही लहान धारण क्षेत्रेविखुरलेली असल्याने समस्या अधिक वाढत जाऊन परिस्थिती बिकट होते. जमीन विखुरलेली वारसा हक्क हे कारण नसून लोकसंख्येचा झालेला प्रचंड भार हे कारण आहे. यासाठी त्यांनी औद्योगीकरणावर भर देणे गरजेचे आहे असे सांगितले. सामाजिक समानतेबरोबर आर्थिक समानता आल्याशिवाय खऱ्या अर्थाने मागास, दुर्बल घटकांना समान हक्क व अधिकाराचा उपभोग घेता येणार नाही. यासाठीच डॉ.बाबासाहेबांनी शेतीविषयक विचार अतिशय दूरदृष्टीतून मांडलेले आहेत. लोकसंख्येचा भार वाढल्याने कृषी व्यवस्थेवर मोठा विपरीत परिणाम होतो, बेरोजगारीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते, कमी शेतीला लागणारे मुबलक भांडवल अपुरे पडते. त्यामुळे उद्योगधंदा हा शेतीला पूरक म्हणून उपयोगी आहे असे बाबासाहेबांनी सांगितले. शेतीविषयक धोरणांमध्ये सरकारची भूमिका अतिशय महत्त्वाची असल्याचे ही त्यांनी सांगितले आहे.

दामोदर नदीच्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात वित्तहानी आणि प्राणहानी होत असे त्यामुळे बाबासाहेबांनी आपल्या विचारातून दामोदर नदीला पूर येऊ नये यासाठी त्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी, विद्युत व वाहतुकीसाठी करता यावा म्हणून त्यांनी दामोदर नदी प्रकल्पाला मान्यता मिळविण्यासाठी शिफारस केली. ज्यामुळे पुरापासून वित्तहानी व प्राणहानी होणार नाही व पाण्याचा सदुपयोग करून शेतीचा विकास करता येईल हे त्यांनी सिद्ध केले. त्याचबरोबर बाबासाहेबांनी वतनदारी पद्धत बंद केली, वतनदारी नष्ट झाल्याशिवाय शेतकरी स्वतःचा व शेतीचा विकास करू शकणार नाही हे त्यांनी ओळखले होते. सर्वांनी स्वाभिमानाने जीवन जगावे असे त्यांचे विचार होते. त्यांनीवतनदारी पद्धतीबरोबरच खोती पद्धती नष्ट करण्याचे कार्य केले. खोत म्हणजे एक प्रकारची मक्तेदारी. खोत म्हणजे गावातला एक लहानसा सुलतान असतो, ही खोती वेगवेगळया लोकांमध्ये हिस्सेदारीने विभागली असते, तेव्हा अनेक सुलतानांचा जुलूम फक्त शेतकऱ्यांना सोसावा लागतो. खोती हक्काचे देणे व सरकारचे देणे असे दोघांचे देणे खोती पद्धतीत शेतकऱ्यास द्यावे लागायचे, त्यामुळे खोतीमध्ये शेतकऱ्यावर कराचा बोजा अधिक पडायचा या व्यतिरिक्त खोत इतर प्रकारातून ही कुळांकडून पैसे उकळीत असायचे. १७ सप्टेंबर १९३७ रोजी बाबासाहेबांनी खोती पद्धत नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक मांडले. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने खोतपद्धती विरोधात कायदे केले. जेणेकरून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे.

भारतीय शेतीच्या बाबतीत महत्त्वाच्या सूचना त्याचबरोबर सामूहिक शेती आणि शेतीचे राष्ट्रीयीकरण या बाबत बाबासाहेबांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. बाबासाहेब म्हणतात की, शेती हा राष्ट्रीयउद्योग समजला जाईल. महत्त्वाचे उद्योग राष्ट्रीय मालकीचे असतील, गावकऱ्यांना जमीन ही जाती आणि पंथ यांचा भेदभाव न करता वितरित केली जाईल, बी-बियाणे खते, शेतीची अवजारे, पशु आणि प्राणी इत्यादी ची पूर्ती करून सामूहिक शेतीला वित्तीय सहकार्य करणे हे राज्याला बंधनकारक असेल असे सांगितले. त्याचबरोबर मुंबई सरकारपुढे सादर केलेल्या मागण्यात मूलभूत आणि तातडीच्या मागण्या होत्या त्यामध्ये, जमिनीची प्रत्यक्ष मशागत करणाऱ्यालाच त्याच्या मेहनतीचे फळ मिळावे. शेतकऱ्याला न्याय मिळण्यासाठी व त्याची आर्थिक व्यवस्था व्हावी यासाठी शेतकऱ्याच्या मशागतीची खोत, इनामदार सारखे मध्यस्थ नसावेत. शेतकऱ्यावर कर अथवा पट्टी बसविण्यापूर्वी शेतकऱ्याच्या चरितार्थापुरती योग्य ती सोय सरकारने करावी. शेतकऱ्यांना त्यांचा उदरनिर्वाह होण्यासाठी किमान मजुरी देण्याची सोय कायद्याने करावी व शेतकऱ्यांच्या हिताला जपणे हे लोकहितवादी सरकारचे कर्तव्य आहे. खोती पद्धती व इमानदारी इनामदारीपद्धती या आर्थिक दृष्ट्या नुकसानकारक व सामाजिक दृष्ट्या जुलमी असल्यामुळे या पद्धती भरपाईसह किंवा भरपाईशिवाय नष्ट करण्यासाठी कायदा व्यवस्था करावी. सावकारशाहीवर बंधने घालावेत अशा शेतकऱ्यांच्याहिताच्या दृष्टिकोनातून बाबासाहेबांनी सरकारपुढे मागण्या मागितल्या होत्या.डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांचे शेती विकासाच्या दृष्टिकोनातून मांडलेले विचार आणि दूरदर्शीपणा तून मांडलेले विचार हे आजच्या काळातही महत्त्वपूर्ण असे विचार आहेत. आजशेतीच्या विकासासंदर्भात त्यांचे बहुमोल विचार म्हणजे,

१) शेतीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन बदलला पाहिजे.

२) शेती विकासासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे.

३) शेतीही शास्त्रशुद्ध व आधुनिक पद्धतीने केली पाहिजे.

४) शेतीसाठी योग्य खते व योग्य निरोगी बियाणांचा वापर केला पाहिजे.

५) शेतीमध्ये उत्पादन वाढवण्यासाठी सिंचन सुविधा निर्माण केल्या पाहिजेत.

६) शेती करण्याबरोबरच शेतीविषयक पूरक उद्योगधंद्याची जोड दिली पाहिजे.

७) शेतसारा शेतावर, उत्पादनावर न लावता शेतकऱ्याचीआर्थिक कुवत लक्षात घेऊन लावला पाहिजे.

८) शेतकऱ्यांना अस्मानी संकटाच्या काळात सरकारने मदत केली पाहिजे.

असे दूरदृष्टीपणातून मांडलेले बाबासाहेबांचे विचार शेती विकासासाठी आजही महत्त्वपूर्ण आहेत.

सारांश:

शेतकऱ्यांच्या हितासाठी, शेतकऱ्यांच्या विकासासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतीविषयक अनेक चळवळी उभ्या केल्या, ज्यामधून शेती आणि शेतकऱ्यांबद्दल विशेष जाणीव जागृती झाली. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी बाबासाहेबांनी नद्याजोड प्रकल्प, धरणे बांधणे, सिंचनाच्या सोयी उपलब्ध करणे आवश्यक असल्याचे सांगितले शेतीच्या विकासासाठी शेतीमध्ये मनुष्यबळ व चांगल्या प्रतीची बी-बियाणे, खते आणि तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला पाहिजे असे सांगितले. विविध लेख, विविध भाषणे, विविध चळवळीच्या माध्यमातून बाबासाहेबांनी शेती विकास करण्याचे विचार मांडलेले आहेत. या विचारातूनच महाराष्ट्राबरोबरच भारत देशात हरितक्रांती झाली आणि अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता आलेली आहे. शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चिंतन करणाऱ्या, शेतीविषयक विचार मांडणाऱ्या, शेती विकासासाठी चळवळी उभ्या करून एकता निर्माण करण्यासाठी स्वतःला झोकून देणाऱ्याबाबासाहेबांना देशातील शेती व शेतकरी यांचे सर्व प्रश्न संपवायचे होते म्हणूनच शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी शासनाकडे त्यांनी शेतसारा, जनावरांचा चारा आणि पाण्यावरील कर या संबंधितच्या मागण्या केल्या आणि शेतीचा विकास केला. म्हणूनच आजच्या स्थितीत बाबासाहेबांचे शेतीविषयक विचार हे शेती विकासासाठी व देशाच्या प्रगतीसाठी मोलाचे आहेत.

"शेतकऱ्यांच्या विकासाला
आधार काळया मातीचा,
अवलंबूननवतंत्रज्ञान
विकास करावा शेतीचा,
अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून
पाहिले जाते शेतीकडे,
व्यक्तीनि देशाच्या विकासासाठी
घ्यावे उद्योग निकृषीज्ञानाचे धडे."

संदर्भ सूची:

१) मा. फ. गांजरे , डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड - 3, अशोक प्रकाशन, नागपूर.

२) डॉ. बी. एम. कऱ्हाडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय आणि परिवर्तन, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.

३) डॉ. प्रल्हाद लुलेकर, आनंत पैलूंचा सामाजिक योद्धा दलितेतरांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सायन पब्लिकेशन, प्रा. लि. पुणे.

४) धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

५) प्रा. केशव मेश्राम व इतर, (संपा.), डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

# 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कामगिरी'

डॉ. शालिग्राम गोपालराव शिंदे
इतिहास विभाग प्रमुख, नागनाथ महाविद्यालय औंढा नागनाथ. जि. हिंगोली.

विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली ॥
नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ॥
वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ॥

विद्या, हा राष्ट्राचा प्राण, अखंड जीवन व माणुसकीची ती जिवंत ज्योत आहे. विद्याहाच सुधारणेचा पाया आहे, विद्येच्या रसाचा शिवाय हिंदुस्थान सारख्या राष्ट्राच्या अंगी केव्हाही मर्दपणा येणार नाही. असा विचार करून महात्मा ज्योतिराव फुले यांनी सर्वप्रथम स्त्री व शुद्राच्या शैक्षणिक कार्याला सुरुवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महात्मा ज्योतिराव फुलेला आपले गुरू मानून त्यांच्यानंतर त्यांचे उर्वरित कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करील तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही" हे बाबासाहेबांनी ओळखले होते. म्हणूनच विद्या मिळवण्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. त्यांनी 18-18 तास अभ्यास केला व विद्या प्राप्त करण्यासाठी ते इंग्लंड, अमेरिकेत गेले व तेथील विद्यापीठाच्या सर्वोच्च पदव्या त्यांनी प्राप्त केल्या. आपण मिळविलेल्या विद्याचा विनियोग त्यांनी आपल्या भारतीय समाजासाठी केला.

**शिक्षणाचे महत्त्व :-**

डॉ. आंबेडकर म्हणतात, अस्पृश्य समाजाच्या व दलित दु:खी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, उज्ज्वल भवितव्यासाठी, उन्नतीसाठी, भरभराटी साठी कोणती गोष्ट आवश्यक असेल तर ती म्हणजे 'शिक्षण' होय. त्यांनी राजकारणात सक्रिय भाग घेण्यासाठी, त्यांनी ज्ञान मिळवण्यासाठी केलेली तपश्चर्या त्यांना शिक्षण बद्दल असलेल्या तळमळीचे द्योतक म्हणजे बालपणी त्यांना सामाजिक चालीरीती प्रमाणे संस्कृत भाषा शिकता आले नाही तर त्यांनी ती भाषा अगदी उतारवयात शिकून घेतली. त्यांच्या मते "शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास करून आणणारे सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे, आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याची शस्त्र आहे". जर अस्पृश्यता नष्ट करावयाची असेल व माणूस म्हणून जगायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षणपद्धती म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास करून स्वतंत्र्यपणे विचार करण्याची शक्ती निर्माण करणारे साधन होय. धर्ममोठेपणा, दैववाद, नशिबवाद, यावरही हल्ला करतात, ते म्हणतात आईबाप मुलांना जन्म देतात, कर्म देत नाहीत हे म्हणणे योग्य नाही. आईबाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात, ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपल्या मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलीच्याही शिक्षणासाठी धडपड केली तर आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल. शिक्षणाने माणूस स्वाभिमानाने जगतो. त्याची विवेकशीलता जागृत होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही उच्चतम मुले अमलात आणायची असेल तर त्यासाठी त्यांना सर्वासाठी शिक्षण खुले असावे. शिक्षणाने खरेखोटे याचे ज्ञान प्राप्त होते. "शिक्षण हाच राष्ट्रीय उन्नतीचा मूलमंत्र आहे" ते म्हणतात सामाजिक क्रांती घडवायची असेल तर त्याची बीजे बाल वयातच रुजली पाहिजे. क्रांती आणि परिवर्तन शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही, शिक्षण हे क्रांतीचे प्रभावी साधन आहे. शिक्षणरुपी अमृत सर्वांनी प्राशन करून अमर झाले पाहिजे.

**शिक्षणासंबंधीची आंबेडकरांची भूमिका :-**

"मागासवर्गीय लोकांना शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले तरच हा समाज शिक्षण घेईल, अन्यथा तो अज्ञानाच्या अंधारातच चाचपडत राहण्याची शक्यता आहे". प्राथमिक शिक्षणाचा प्रसार राष्ट्रीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. सध्याच्या युगात ज्या देशातील बहुजन समाज निरक्षर आहे, अशा देशाच्या जीवन कलहात टिकाव लागणार नाही. प्राथमिक शिक्षणाचा सर्वत्र प्रसार सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या मर्जीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास खूप वेळ लागेल. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करणे गरजेचे आहे. आज जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करूनच लोकांची निरक्षरता हद्दपार केली.

"ज्ञान म्हणजे व्यक्तीच्या जीवनाचा पाया आहे आणि म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याने बुद्धीचा विकास करण्यासाठी, प्रसंगी हालअपेष्टा सहन करून ज्ञान मिळविले पाहिजे आणि मिळविलेल्या ज्ञानाच्या बळावरच स्वतंत्रपणे विचार करावयास शिकले पाहिजे".

शिक्षण म्हणजे ज्ञानग्रहण करणे इतकेच नव्हे तर विद्यार्थ्यांनी स्वतंत्र विचार करावा ही अपेक्षा ते ठेवतात. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी महाविद्यालये व विद्यापीठ यांची देखील संयुक्तपणे फार मोठी जबाबदारी आहे. 1927 साली मुंबई विद्यापीठाच्या संदर्भात विधिमंडळात आणलेल्या बिलावर भाष्य करताना ते म्हणतात, "विद्यापीठ ही एक संघटना आहे असे म्हणून चालणार नाही तर विद्यापीठ व महाविद्यालय हे एकाच संस्थेचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. हे दोन घटक संयुक्तरित्या काम करू लागले तर पदवीपूर्ण तथा पदव्युत्तर विद्यार्थ्यात सांस्कृतिक बदल घडविण्याचे कार्य अधिक परिणामकारक करू शकतील. याच अधिवेशनात चर्चा करताना ते म्हणतात, शिक्षण प्रसाराची गती पाहता असे दिसून येते की, शिक्षणाच्या बाबतीत सरकार फारच उदासीन दिसते. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचे सरकारचे नैतिक कर्तव्य आहे. म्हणून शिक्षण पद्धती अवलंबताना शिक्षण महागडे न बनविता समाजातील सर्व तळागाळातल्या गरिबापर्यंत पोहोचविले पाहिजे. याची सरकारने सर्वोतपरी दखल घेतली पाहिजे. हे सर्व जर साध्य करावयाचे असेल तर सरकारने दलित वर्गाला शिक्षणा साठी काही खास सवलती देऊन इतरांच्या बरोबरी पर्यंत आणावे लागेल. तरच समाजात सर्व स्तरावर शैक्षणिक समता व समानता आणण्यास मदत होईल.

25 डिसेंबर 1927 ला डॉ. बाबासाहेबांनी जाहीर रित्या मनुस्मृतीचे दहन (होळी) केली. त्याप्रसंगी आंबेडकर म्हणतात, "तुम्ही मुलींना शिक्षण द्या, ज्ञान, विद्या या गोष्टी स्त्रियांसाठी आवश्यक आहे. "खाण तशी माती" निपजने म्हणून मुलं-मुली शिकली पाहिजेत म्हणजे त्यांची संतती तशीच निपजेल.

अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी डॉ. बाबासाहेबांनी केलेले प्रयान डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. 1813 पासून 1828 पर्यंत च्या काळातील अस्पृश्यांच्या शिक्षणाचा आढावा निवेदनात घेतला. या काळात ब्रिटिश नोकरशाही व भारतीय मंत्र्यांनेही आज पुरुषांच्या शिक्षणाकडे फारसे लक्ष दिले नाही. इ.स.1923 मध्ये मुंबई इलारण्यात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा असला तरी बाबासाहेबांच्या मते हा कायदा अस्पृश्यांची शिक्षणाबाबत उघड मोठी फसवणूक होती. त्यामुळे अस्पृश्यांच्या शिक्षणाची फार मोठी दुर्दशा झाली शिक्षण ब्राह्मणांनी घ्यावे, अस्पृश्यांना शिक्षणाची गरज नाही असा विश्वास लोकल बोर्डाच्या सभासदाचा होता. म्हणूनच अस्पृश्यांच्या शिक्षणात सुधारणा करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी काही सूचना केल्या.

1. प्राथमिक खाते लोकल बोर्डाकिडे न देता ते मुंबई सरकारकडे द्यावे.

2. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले पाहिजे ते ऐच्छिक ठेवू नये, शक्तीच्या कायद्याप्रमाणे प्राथमिक शाळेत प्रवेश नोंदवणे अनिवार्य आहे.

3. मुसलमाना साठी जे शैक्षणिक नियम केले आहेत तेच नियम अस्पृश्यांच्या शिक्षणाबाबत लावावे.

4. अस्पृश्य समाजातील शिक्षण घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला सरकारी नोकरीची खात्री मिळाली तरच त्यांच्या शिक्षणास प्रोत्साहन मिळेल. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षण हे माणसाला घडवीत असते, जे

माणूस घडविते ते शिक्षण ते म्हणजे ज्ञान आणि प्रज्ञा याचा सुरेख संगम होय. केवळ ज्ञान उपयोगाचे नाही तर जे उपयोगी येते ते खरे ज्ञान. शिक्षणाचा परिणाम शिल आणि चारित्र्याची निर्मिती करणे असा असावा. त्याला शिक्षण हे मूल्याधिष्ठित म्हणजे उच्च नैतिक आचार निर्माण करणारे असावे असा वाटत होत. "ग्रंथ हे त्या शक्तीच साधन आहे". जी व्यक्ती आपल्या पत्नी आणि आपल्यापेक्षाही शिक्षणावर अधिक प्रेम करते त्या व्यक्तीला शिक्षण प्रेम मी म्हणाव. हे सांगतानाच त्यांनी शिक्षणाचा शिस्त, विकास आणि समाज नियंत्रण आशी असलेला संबंध स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते लोकशाही यशस्वी करायची असेल तर जनता व (समाज) नैतिक मूल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे संस्कारित असावा. लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षण नैतिक मूल्याधिष्ठित समाजाची लोकशाही ही सर्वाधिक यशस्वी किंवा हमखास यशस्वी करू शकेल.

**सारांश :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना शिका संघटित व्हा व संघर्ष करा असा महत्त्वाचा संदेश दिला. शिक्षणामुळे मनुष्य जागृत होतो व त्याला आपल्या हक्क व अधिकार याची जाणीव होती. त्यामुळे दलितांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे बाबासाहेबांचे मत होते. शिक्षणामुळे दलितांची स्पृश्यांच्या सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतूनही सुटका होण्यास मदत होणार होती. त्यामुळे बाबासाहेबांनी बहिष्कृत हितकारणी सभेच्या माध्यमातून वस्तीगृहे, वाचनालय, प्रौढासाठीची रात्रीच्या शाळा सुरू केल्या. दलित व बहुजनांच्या शिक्षणासाठी इ.स. 1945 मध्ये मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या सोसायटीने 20 जून 1946 मध्ये मुंबईला सिद्धार्थ कॉलेज तर 19 जून 1950 रोजी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरू केले. आज या सोसायटीच्या शाळा, महाविद्यालये, मुंबई, औरंगाबाद, नांदेड, कर्नाटक इत्यादी भागात कार्यरत आहेत. मराठवाडा विभागासाठी स्वतंत्र्य विद्यापीठ असावे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी औरंगाबादला मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यास पुढाकार घेतला व इ.स. 1958 साली औरंगाबादला विद्यापीठ स्थापन झाले. याच विद्यापीठाला 14 जानेवारी 1994 ला नामांतर करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद असे नाव देण्यात आले.

'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' यातील तत्वात डॉ. आंबेडकरांच्या सर्व शैक्षणिक विचारांचे सार तत्त्व आहे. क्रियाशील बनन, अन्याय अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करण आणि त्या ध्येयप्राप्तीसाठी संघटन बांधण म्हणजेच क्रांतीचा मार्ग खुला करण होय. बाबासाहेबांच्या दृष्टीने शिक्षण हीच शोषण मुक्तीची पायवाट होती. भारतातील दलित, स्त्रिया यांच्या दैत्यावरचा रामबाण उपाय म्हणजे शिक्षण होय.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ - संपादित महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
2. संपादक प्राचार्य टी.ए.गवळी, प्रा. सुखराम हिवराळे, डॉ.पी.ए.गवळी, प्रा. सुधीर गव्हाणे - बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ.
3. डॉ. अनिल कठारे - फुले, शाहू, आंबेडकर, पुनम प्रकाशन, कंधार.
4. डॉ. अनिल कठारे, डॉ.महादेव वाघमारे, डॉ.गौतम पाटील - महाराष्ट्रातील आंबेडकर चळवळीचा इतिहास - चिन्मय प्रकाशन औरंगाबाद
5. कीर धनंजय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
6. लोखंडे हि.गो. व लोखंडे भा.घ. - डॉ आंबेडकर सत्याग्रह, सुधीर प्रकाशन, वर्धा.
7. भोळे भा.ल. - (अनुवाद) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी, सांकेत प्रकाशन, औरंगाबाद.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार

**प्रा. राजकुमार मोरे**
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

भारतीय संविधानाचे शिल्पकार, दीन दलितांचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं कर्तुत्व म्हणजे एक आदर्श व प्रेरणादायी असे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील मागासलेल्या वर्गाच्या प्रगतीकरिता आपल्या संपूर्ण जीवनाचा त्याग करून भारतीय संविधानाची निर्मिती केली. या संविधान निर्मिती मागचा मुख्य उद्देश देशातील जातीपातीचा भेदभाव आणि अस्पृश्यतेला मुळापासून नष्ट करणे व अस्पृश्यता मुक्त समाजाची निर्मिती करून समाजामध्ये क्रांती घडविणे हा होता. व्यवस्थेने माणसाचे जगणे इतके अगतिक आणिलाचार बनविले आहे की साधा श्वास घेणे सुद्धा अवघड झालेले आहे अशावेळी मानवी अस्तित्वाची लढाई लढणाऱ्या संघर्षशील लढ्यातील सामान्य कार्यकर्त्यांनी निराश होऊन चालणार नाही अखेरच्या श्वासापर्यंत सर्वशक्तीनिशी आपण लढले पाहिजे संघर्ष केला पाहिजे. यासाठी आंबेडकरांनी 'शिका ,संघटित व्हा !आणि संघर्ष करा 'हा मूलमंत्र दिला. आपल्यातला अज्ञानपण दूर करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही म्हणून शिक्षण हे' वाघिणीचे दूध आहे' असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अभिव्यक्त केले आहे. हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते पण ही मोठी चूक आहे हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र व निवारा यांची सोय करून त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे, तर त्यांच्यातला अज्ञानपणाचा धागा दूर सारून त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे. ज्ञान हे सामाजिक शक्तीचे , समृद्धीचे व सत्तेचे उगमस्थान आहे.

प्राथमिक शिक्षण

शिक्षणाच्या विविध सरांचा विचार करताना प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न राष्ट्रीय दृष्टीने अत्यंत मूलभूत व मौलिक आहे अशी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची विचारसरणी होती बाबासाहेब असे म्हणतात' प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्राच्या प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुषीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कित्येक शतके लागतील म्हणूनच शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागतो तो आघाडीस आलेल्या जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करून लोकांची निरक्षरता हद्दपार केली असे आपणास दिसून येते .जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात त्यांच्यावर शिक्षणाची अर्थातच सक्ती करावी लागत नाही ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही व जे त्या बाबतीत उदासीन असतात त्यांच्याकरिता आज सक्तीच्या कायद्याची आवश्यकता असते.' वरील विचारातून प्राथमिक शिक्षण हे राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे हे सिद्ध होते.

शिक्षक **हे मध्यवर्ती केंद्र**

शिक्षण क्षेत्रामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका पारपाडणारी व्यक्ती म्हणजे शिक्षक होय .शिक्षक हा कुठल्या धर्माचा ,कुठल्या जातीचा नसतो तर ज्ञान संवर्धन करुन ज्ञानप्रसार करणे आणि कुठलाही दुजाभाव न करता सर्वांना निरपेक्ष भावनेने ज्ञान वाटप करणे हा मुख्य हेतू शिक्षकांचा असतो परंतु तत्कालीन परिस्थितीमध्ये उच्चवर्णीय

वर्गातील शिक्षक असल्यामुळे त्यांनी जी भूमिका वठवली ती चुकीची होती असे बाबासाहेब यांना सुचवायचे आहे ते म्हणतात ,'शाळेमध्ये नुसत्या बाराखड्या शिकवायच्या असत्या तर ती गोष्ट निराळी पण शाळेत मुलांची मने सुसंस्कृत करून त्यांना समाज हिताचे योग्य असे वळण लावायचे असते .शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचे कारखाने आहेत अर्थात या कारखान्यात फोर मन जितका शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणार आहे शाळा म्हणजे काही हिंदू उपहारगृह नव्हे की त्यात ब्राह्मण भटचारी ठेवला की भागले ब्राह्मणांच्या हातचें अन्न जरी सर्वांना चालत असले तरी ब्राह्मणाच्या हातचे शिक्षण या काळात कोणास चालणे शक्य नाही.'या पगारातून शिक्षण आणि समाजहित यांचा अन्योन्य संबंध असल्यामुळे पारंपारिक शिक्षक बाबासाहेबांना मान्य नाही कारण पण या शिक्षकाने स्वतःच्या दृष्टिकोनातून शिक्षणविषयक कल्पना आणि शिक्षणपिठेरूढ केली.

प्राध्यापकांची गुणवत्ता

प्राथमिक शिक्षणाबरोबरच महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाचा विचारही बाबासाहेबांनी केला आहे महाविद्यालयीन व विद्यापीठीय स्तरावरील शिक्षणाचा प्रभाव चिरकालीन स्वरूपाचा असतो त्यामुळे विद्यापीठ हा कारकून काढण्याचा कारखाना ठरू नये अशी त्यांची अपेक्षा आहे हे हिंदुस्थानातील प्राध्यापकांकडे पाहून त्यांनी खेद व्यक्त केला आहे ते म्हणतात ,'मला वाटते की थोडेसे रुपये मिळवावेत व आपली सुखाने कालक्रमणा करावी या पलीकडे आपल्या प्रोफेसराना आयुष्यात काही महत्त्वाकांक्षाच नाही . या महत्वकांक्षेच्या अभावामुळेच त्यांच्या हातून काहीही भरीव कार्य होत नसावे ते अधून मधून काही पाठ्यपुस्तकावर टिपणे लिहितात. टिपणे लिहिण्या पलीकडे काही महत्त्वाचे कार्य आहे याची माहिती त्यांना आहे की नाही कोण जाणे!' वरील उद्गारावरून असे लक्षात येते की प्राध्यापकांच्या स्वस्थ व सुस्त जीवनावर बाबासाहेबांनीकठोर प्रहार केला आहे. आजच्या प्राध्यापकांच्या मन: प्रवृत्तीवर विदारक प्रकाश टाकून आपली भूमिका स्पष्ट केली आहे अर्थात काही अपवादाचा त्यांनी सन्मानपूर्वक उल्लेख केला आहे हे विसरता येणार नाही. महाविद्यालयात निरनिराळ्या प्राध्यापकांकडून तेच तेच विषय पुन्हा पुन्हा शिकविले जातात त्यामुळे एक प्रकारे कामाची पुनरावृत्ती होते व निरर्थकता वाढते याऐवजी अशी पद्धती अवलंबावी जेणेकरून प्राध्यापकांच्या विषयांची विभागणी होईल आणि प्राध्यापकास आपल्या विषयाचा पूर्ण अभ्यास करण्यास वाव मिळेल आणि यातूनच त्यास त्याच्या विषयावर संशोधन कार्य करण्यास भरपूर सवड मिळेल .

सहशिक्षणाचा **पुरस्कार**

डॉ बाबासाहेब आंबेडकर सहशिक्षणाचे पुरस्कर्ते होते. आगरकराप्रमाणेच स्त्री पुरुषांना एकच व एकत्र शिक्षण दिले पाहिजे असे त्यांचे मत होते म्हणूनच स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा किंवा कॉलेजेस यास त्यांची सहमती नव्हती कारण त्यांना स्त्री-पुरुष समानतेचे आणि स्त्री-पुरुषांना एकत्र शिक्षण देणे ही कल्पना रुजवायची होती. 'स्त्रियांचे शिक्षण पुरुषांच्या बरोबर एकत्र असले पाहिजे.' ही त्यांची विचारधारा त्याकाळी पुराणमतवादी लोकांना सुचणे शक्य नव्हते .स्त्री-पुरुष शिक्षण एकत्र असावे ही कल्पनाच त्यांना भयंकर वाटत होती. स्त्री शिक्षणालाच मान्यता न देणारे एक पुराणमतवादी यांचा गट तर या विचारसरणीचा बेंबीच्या देठापासून निषेध करीत होता. काही पुराणमतवादी नव्या युगाची पावले ओळखून स्त्री शिक्षणाला विरोध करीत नव्हते मात्र त्यांना सहशिक्षण नको होते स्त्री-पुरुषांच्या नीतिमत्तेचे बुजगावणे पुढे करून त्यांना सहशिक्षण अमान्य केले होते. स्त्रियांच्या सहवासात राहून जो पुरुष आपले मन ताब्यात ठेवू शकतो व पुरुषांच्या सहवासात जी स्त्री आपले पाऊल वाकडे पडणार नाही

याची खबरदारी घेते त्यांना नीतिमान म्हटले पाहिजे असे बाबासाहेबांना वाटते स्त्री-पुरुषातील परस्पर अनुदार भावना नष्ट होण्यासाठी स्त्री-पुरुष सहवासाची अत्यंत आवश्यकता आहे तशीच सहज शिक्षणाची गरज आहे असा दृष्टिकोन ते स्वीकारतात.

अस्पृश्यांच्या **शिक्षणाचा स्वतंत्र विचार**

अस्पृश्यांच्या शिक्षणाविषयी बाबासाहेबांनी स्वतंत्रपणे विचार व्यक्त केले आहेत त्यांच्यासाठी सवलतीची आणि विशेष सोयीची तरतूद अपेक्षित आहे असे मत व्यक्त केले आहे. शैक्षणिक दृष्टीने ब्राह्मण वर्गांची प्रगती झाली परंतु अस्पृश्य तळागाळातील सामान्यातील सामान्य माणूस त्यांची प्रगती मात्र खुंटलेली होती अशा परिस्थितीमध्ये अस्पृश्य समाजातील सामान्य माणूस हा शिकला पाहिजे यासाठी शिक्षण ही अत्यंत महत्त्वाची गुरुकिल्ली आहे असे बाबासाहेब यांना वाटत होतं म्हणून अस्पृश्य व सामान्यातील सामान्य माणसांना स्वतंत्ररीत्या सवलत देऊन त्यांना शिक्षण देणे हे काळाची गरज आहे. त्यांची आर्थिक उन्नती म्हणजे प्रगती नाही तर त्यांच्यातील अज्ञान पण दूर करावयाचा असेल, त्यांच्यातला अंधार नाहीसा करून जीवन प्रकाशमय करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे परखड मत बाबासाहेबांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये व्यक्त केले आहे. उस्मान व्यक्तीला मानपत्र वर आणायचे असेल तर अशा सामान्य व्यक्ती सवलती दिल्या पाहिजेत अशी आंबेडकरांची अपेक्षा होती अस तु स्वर्गाला पूर्वीच विशेष सवलती प्राप्त झाले असता तर तो वर्गणी आघाडीकडे वाटचाल करू शकला असता असा त्यांना विश्वास वाटतो पुष्पराज या वर्गाला सरकारने सवलती द्याव्यात तरच आवर प्रगती पदाकडे वाटचाल करू शकेल असे बाबासाहेबांना खात्रीपूर्वक वाटते एवढेच नाही तर खालचा वर्ग वरचा वर्ग यांच्यातील संभाव्य संघर्ष करता येऊ शकेल असा आशावादही त्यांनी व्यक्त केला

अशा रीतीने एकोणिसाव्या शतकात भारताला परिवर्तनवादी दृष्टी देणारे, प्रबोधनाचे तत्त्वज्ञान सांगणारे जे विचारवंत होऊन गेले त्यात बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव अग्रणी घ्यावे लागते. त्यांनी मानवी जीवनाच्या विविध अंगाचा विचार केला आपल्या एका लेखात ते म्हणतात, 'शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे शस्त्र आहे. अर्थातच मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजातील सर्व स्तरातील लोकांसाठी शिक्षण हे महत्त्वाचे आहे शिक्षण ही अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांपैकी महत्त्वाची गरज आहे. शिक्षणाने माणसाला माणूस पण मिळते.त्याच्या अस्तित्वाची त्याला ओळख होते व्यक्तिमत्वाचा विकास योग्य त्या दिशेने होण्यासाठी शिक्षण हे साहेब ऊत साधन आहे शिक्षणाविषयी बाबासाहेब म्हणतात,' उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्यांचा गुलाम होतो.' याचा अर्थ मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. वर्षानुवर्षे समाजामध्ये अनिष्ट रूढी परंपरा ,सामाजिक विषमता, अन्याय, अत्याचार धर्म- जात यात समाजरचना उभारलेली पाहण्यास मिळते या पारंपारिक विचाराला छेद द्यायचा असेल तर शिक्षण हे अत्यंत मोलाचे आहे असे बाबासाहेबांनी सुचविले आहे.

निष्कर्ष

१. बाबासाहेबांनी समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना प्राथमिक शिक्षण गरजेचे आहे त्याचबरोबर उच्च शिक्षण दिले पाहिजे असा आग्रह धरला.

२. समता, बंधुता व न्याय हीमुल्ये समाजामध्ये प्रस्थापित करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही.

३. त्यांनी स्त्री-पुरुष सहशिक्षणावरभर दिला आहे.

४. आज तुमच्यासाठी सवलतीचे शिक्षण व विशेष योजना असाव्यात असा आग्रह धरला.

५. उच्च शिक्षणामुळे अस्पृश्य, दलित समाजातील ज्या उणिवा आहेत त्या भरून निघतील असे बाबासाहेबांना वाटते.

६. उच्च शिक्षण प्राप्त करणाऱ्या लोकांनी आपल्या बांधवा कडे लक्ष देऊन जिथे अन्याय, अत्याचार दिसेल त्याला विरोध केला पाहिजे.

संदर्भ **ग्रंथसूची**

1. प्र.न.जोशी - मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास
2. चा. भ. खैरमोडे - डॉ .भीमराव रामजी आंबेडकर खंड पहिला
3. धनंजयकीर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर
4. शंकरराव खरात - अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम
5. यशवंत मनोहर - निबंधकार डॉ.आंबेडकर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान

**प्रा. डॉ. भुसारे एस. आर.**
तत्त्वज्ञान विभाग, शिवाजी महाविद्यालय हिंगोली

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार म्हणून सारे जग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ओळखते. प्रतिकुलतेच्या भट्टीत तावून सुलाखून निघालेले बावनकशी सोने म्हणजे त्यांचे आयुष्य शिक्षणामुळे ते अधिक लखाखून उठले. त्यांनी आपल्या आयुष्यामध्ये विद्येला आपले पहिले दैवत मानले. ते म्हणतात, " माझे पहिले दैवत विद्या होय, विद्येशिवाय मानवाला शांतता नाही, आणि माणुसकीही नाही. विद्याही सर्वांना अवगत झाली पाहीजे. ती महासागरा सारखी आहे."[१] ही महासागरासारखी असलेली विद्या संपादन करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर खडतर प्रयत्न केले. जो पुस्तकांवर प्रेम करतो तोच खरा विद्येचा पुजारी आहे असे ते म्हणत. व मी विद्येची पूजा २४ तास करतो असे ते सांगत. ही विद्या संपादन करण्यासाठी ते १८ तास अभ्यास करत असते. त्यांना आपल्या हातात पडलेले पुस्तक वाचून बाजूला केल्याशिवाय चैन पडत नसे. त्यांनी सर्व धर्माची धर्म ग्रंथे वाचून ते धर्म समजून घेतले होते. तसेच त्या त्या धर्मातील चांगल्या वाईट गोष्टींवर प्रकाश टाकला होता. त्यातून त्यांच्या समाज चिंतनाला दिशा मिळाली होती. त्यांनी राज्यशास्त्र, अर्थशास्त्र याचा सखोल अभ्यास केला होता या सर्व अभ्यासातून त्यांच्या विचाराला दिशा मिळाली होती. समाजातील खालच्या थरातील लोकांना वर आनण्यासाठी त्यांना शिकविले पाहिजे असे त्यांना वाटत होते. "सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग होता"[२] असे त्यांना वाटत असे. शिक्षणामुळे आपल्या समाजातील लोक मागासलेले आहेत. व त्यांची प्रगती घडवून आणायची असेल त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे असे त्यांना वाटे.

आंबेडकरांच्या वडलांना शिक्षणाचे महत्त्व पटले होते. ते धार्मिक वृत्तीचे होते. म्हणून त्यांनी लहानपणीच आंबेडकरांवर चांगले संस्कार केले. त्यांना वाचनाची गोडी लावली भजने, दोहे, प्रार्थना, अभंग त्यांनी आंबेउकरांकडून पाठ करून घेतल्या. लहानपणी एका सत्कार कार्यक्रमात दादा केळूसकरांनी त्यांना बुध्दाच्या चरित्राचे पुस्तक भेट दिले. हे पुस्तक वाचल्या नंतर त्यांच्या बाल मनावर त्याचा फार परिणाम झाला व ते पुराणातल्या कथा किती भयंकर आहेत याचा विचार करायला लागले. या बुध्दाच्या चरित्राच्या आभ्यासाने त्यांना जास्त अभ्यास करण्यास भाग पाडले. शालेय अभ्यासक्रमातील पुस्तके वाचण्यात त्यांना फार रस नव्हता तर ते आवांतर पुस्तके वाचण्यास आवडत असत.

ग्रंथ वाचनाचे महत्त्व विषय करताना ते म्हणत, "ग्रंथ वाचन हे ज्ञान संपादनाचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व वाढविण्याचे मोठे साधन आहे. तसेच करमणूक व आनंद संपादन करण्याचे उत्कृष्ट साधन आहे."[३]

आंबडेकर बालवयात पुस्तकासाठी आपल्या वडिलांकडे हट्ट करत असत. त्यांच्या वडिलांची परिस्थिती हलाखिची असल्याने त्यांना आंबेडकरांचा पुस्तकाचा हट्ट पुरवणे अवघड होई. तरीही अशा परिस्थितीत ते मुलीचे दागिने गहान ठेवून पुस्तके आणून देत असत. आंबेडकरांचे हे आवांतर वाचनाचे वेड त्यांच्या वडिलांना आवडत नसे परंतु मुलाच्या हट्टा पुढे ते हे सर्व सहन करत.

आंबेडकरांनी आवांतर वाचनाचे पुस्तक मिळाल्यानंतर एखादा ह्या लहान मुलाला खाऊ मिळाल्यानंतर जो आनंद होता तसा आनंद होत असे. दहा बाय दहाच्या लहानशा खोलीत कुटुंबासहीत राहताना त्यांनी आपली वाचनाची आवड जोपासली. एखादे पुस्तक हातात पडल्यानंतर त्यातील महत्वाच्या मुद्याला ते लाल आणि निळ्या शाईने आधोरेखित करत असत. आणि पुस्तक वाचून झाल्यावर त्याचे स्मरण करत. त्यामुळे पुस्तकाच्या कुठल्या पानावर कोणता मुद्दा आहे हे त्यांच्या लक्षात राहत असे.

पुस्तके खरेदी करण्यासाठी प्रसंगी त्यांनी नियमाचे उल्लंघन करून म्हणजे रेल्वेचे तिकीट न काढता प्रवास केला व वाचलेल्या पैशातून पुस्तके खरेदी केली. जवळ पैसे असले की त्यांचे पाय आपोआप चुंबकासारखे पुस्तकाच्या दुकानाकडे ओढल्या जात. बडोदयाचे सयाजीराव गायकवाड महाराज यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिष्यवृत्तीमुळे आंबेडकर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाऊ शकले. अमेरीकेला गेल्यावर आपली पुस्तकाची आवड पुरविण्यासाठी त्यांच्या जवळ पैसे नसल्याने त्यांनी जुन्या पुस्तकाचे दुकान शोधून काढले व अर्ध्या किमतीत पुस्तके खरेदी केली. अशी जवळपास दोन हजार

पुस्तके त्यांनी जमा केली. अर्ध्या किंमतीत पुस्तके घेण्या करीता पैसे नसल्याने उपाशी राहण्याची वेळ त्यांच्यावर आली. ह्याच पुस्तकांचा अठरा-अठरा तास अभ्यास करून त्यांनी तेथे एम. ए. व पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली.

आंबेडकरांना पुस्तकापुढे भूक लागत नसे व कितीही पुस्तके वाचली तरी त्यांचे पोट भरत नसे आपल्या पुस्तक वाचनामुळे पत्नीकडे बघण्यासही त्यांना वेळ मिळत नसे. बरेचवेळा जेवन करतानाही ते पुस्तक वाचत असत. ते उच्च शिक्षणासाठी कोलंबिया विद्यापीठ लंडन येथे गेले असताना त्यांची व लाला लजपतराय यांची ओळख झाली. लाला लजपतराय आपला सर्व वेळ लंडनच्या प्रसिध्द लायब्ररीत घालवत असत. ह्या लायब्ररीत येणार पहिला विद्यार्थी व शेवटचा विद्यार्थी आंबेडकर असायचे. तेथे या दोघांची समाजशास्त्र व अर्थशास्त्रावर चर्चा चालायची शिष्यवृत्ती संपल्यामुळे आपले लंडन येथील शिक्षण आटोपून ते बोटीने मायदेशी परतत होते. त्याच वेळी त्यांनी आपल्या पुस्तकाने भरलेल्या तीन पेट्या दुसऱ्या बोटीने भारतात पाठवल्या होत्या. परंतु जर्मनीच्या पानसुरुंगाने ती बोट बुडवल्या मुळे त्यांच्या पुस्तकांच्या पेट्यांना जलसमाधी मिळाली होती. त्यामुळे ही पुस्तके आपल्याला मिळणार नाहीत असे समजल्यावर ते ओक्साबोक्सी होऊन ढसाढसा रडले होते. इतके प्रेम त्यांचे पुस्तकावर होते.

१९२७ च्या मार्च महिन्यात डॉ. आंबेडकर मलेरियाने आजारी असल्यामुळे त्यांना परळच्या दामोदर हॉलमध्ये औषधोपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथेही त्यांनी आराम करण्याऐवजी वाचन चालूच ठेवले या काळात त्यांनी ज्ञानेश्वरीचे वाचन केले. त्यांना हिंदू धर्म व संस्कृतीचा राग येत असला तरी ज्ञारेश्वरी व रामायण या ग्रंथांचे त्यांचे वाचन सूक्ष्म होते. ज्ञारेश्वरीवर आंबेडकर सुंदर प्रवचन करीत असत.

आंबेडकरांना माणसापेक्षा पुस्तकाचा सहवास अधिक प्रिय होता. त्यांना पुस्तक वाचायला मिळाले की पुत्रप्राप्तीचा आनंद होत असे. डॉ. आंबेडकर आणि वाचन, डॉ. आंबेडकर आणि पुस्तकाचे दुकान, डॉ. आंबेडकर आणि ग्रंथालय असे सर्वमान्य समीकरण झाल्यामुळे बाबासाहेब आंबेडकर नेहमी हमखासपणे ग्रंथालयात किंवा पुस्तकाच्या दुकानात सापडत असत. कारण पुस्तक वाचनामुळे माणसाच्या जीवनातील अज्ञान, अंधःकार, अंधश्रध्दा, मागासलेलेपणा नाहीसा होतो. व त्याला डोळसपणा प्राप्त होतो. यावर त्यांच्या पूर्णपणे विश्वास होता. माझे सर्व आयुष्य विद्यार्थी म्हणून जावे अशी त्यांची इच्छा होती. "सतत शिकत राहणे हा त्यांच्या जीवनाचा स्थायी भाव होता. माणसाला बहुश्रूत सुसंस्कृत बनविण्यात ग्रंथाचा मोठा उपयोग होतो अशी त्याची धारणा होती. शिक्षण घेणे अखंड प्रक्रिया आहे. व मन आणि वाचन या प्रक्रियेचे महत्त्वाचे दोन घटक आहेत. हे घटक क्रियाशील असल्यास प्रक्रिया परिणामकारक पार पडते. त्यांनी आयुष्याच्या शेवटच्या क्षणाला सुध्दा वाचन केले."[४] माणसाने विद्येची ज्ञानलालसा जोपासली पाहिजे कारण विद्या ही अथांग सागरासारखी आहे असे त्यांना वाटे. माणसाने जन्मभर जरी शिक्षण घेतले तरी गुडघाभर ज्ञानात फार तर त्याला जाता येईल असे ते म्हणत.

भारताच्या राजकीय हक्कासाठी सायमन कमिशनला मदत, मार्गदर्शन व माहिती देण्यासाठी १९२८ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची या समितीवर नियुक्ती झाली. आपला अभ्यास तर अर्थशास्त्र व कायद्याचा आहे. आणि त्यामुळे सायमन कमिशन पुढे आपल्याला चुप बसावे लागेल व चुपबसने आपल्या स्वभावात नाही. व आपण जर चुप बसलो तर अस्पृष्यता निवारणाच्या दृष्टिने आपल्याला काही करता येणार नाही. यासाठी त्यांनी मित्रांकडून ५०० रू. उसने घेतले व त्याची पुस्तके आणून अभ्यास सुरू केला. ह्या अभ्यासाठी त्यांनी स्वतःला दोन आठवडे आपल्या ऑफिसमध्ये बाहेरून कुलूप लावून कोंडून घेतले होते. इतका ध्यास त्यांनी आपल्या समाजाच्या उध्द्दारासाठी घेतला होता.

पुस्तक हे त्यांचे जीव की प्राण होते. या पुस्तकासाठी ते काहीही करायला तयार असत. समाजाला ज्ञान देण्यासाठी व पुस्तकाच्या सदउपयोग करण्यासाठी आपण पुस्तकांची चोरी केल्याची कबुलीही ते देतात. तसेच दुसऱ्याकडून वाचण्यासाठी आणलेली पुस्तके परत देणे त्यांच्या जीवावर येई. पुस्तकांसाठी त्यांनी २० तोळे सोन्याचे दागिणे गहाण ठेवले. विधान सभाग्रहातही पुस्तके त्यांच्या सोबत असत त्यांनी १९३३ ला पुस्तकांसाठी जगातील अनेक ठिकाणाच्या ग्रंथालयांचा अभ्यास करून 'राजगृह' बांधले पुस्तकांवर इतके प्रेम करणारा व पुस्तकासाठी घर बांधणारा दुसरा माणूस होणे नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथाशी अतूट असे नाते होते. त्यांना ग्रंथाशिवाय दुसरे कुणीही प्रिय नव्हते. ग्रंथ हेच त्यांचे गुरू, मित्र होते तेच त्यांची सावली होते, तेच त्यांचे आधाराची काठी होते. त्यामुळे ते म्हणतात, "पुस्तकाच्या सहवासात शांत आयुष्य वेचन्यासारखा दुसरा आनंद नाही. पुस्तके मला शिकवितात, मला नवी वाट दाखवितात म्हणून मला पुस्तके अधिक प्रिय आहेत." इतके त्यांचे पुस्तकाशी नाते जडले होते.

त्यांचे रात्रभर जागून पुस्तके वाचन चालू असे एखादा हरिभाऊ आपटे यांची कादंबरी वाचताना त्यात ते इतके मग्न झ ाले की, लाकडाच्या टेबलावर ठेवलेली मेणबत्ती हळू हळू कमी होत गेली व ती जळत जळत शेवटी टेबलाच्या लाकडाने पेट घेतला. लाकडाचा वास येऊ लागला तेव्हा कुठे बाबासाहेबांची वाचनाची समाधी भंगली. इतके ते मग्न होऊन वाचन करीत असत. वाचताना बाहेरचा आवाज कानावर पडू नये म्हणून कधी कधी ते कापसाचे बोळे कानात घालत असत.

वाचत असताना एखादे पुस्तक त्यांना हवे असेल तर ते पुस्तक मिळविण्यासाठी ते तशाच अवस्थेत म्हणजे हाफशर्ट व लुंगी घालून गाडीने जात व पुस्तक विकत आणून अभ्यासाला बसल्यावरच त्यांचे समाधान होई. १९४८ ला ते स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री असताना पुण्यात तीन दिवसांसाठी कामानिमित्त आले होते तेव्हा पुण्यातील इंटरनॅशनल बुक डेपोत शासकीय यंत्रणेला कुठलीही खबर न देता अचानक आले. पाहता पाहता ही बातमी पुण्यात पसरली व त्यांना पाहण्यासाठी दुकानाच्या बाहेर त्यांचे चाहते जमा झाले. व त्यामुळे रस्ता बंद झाला. शेवटी त्यांना समजल्यावर ते दकानाच्या बाहेर आले व लोकांना दर्शन दिले तेव्हा चाहते गेले. असे पुस्तकासाठी त्यांना कशाचेही भान राहत नसे. असाच एक प्रसंग औरंगाबाद येथे असताना महानुभाव पंथाचे दुर्मिळ ग्रंथ वाचण्याची ओढ त्यांना इतकी लागली होती की गाडीचा चालक नसताना वाचनासाठी उशीर होतोय म्हणून स्वतःचा जीव धोक्यात घालून ते मिलिंद महाविद्यालयात गेले. व तेथील महानुभावांच्या साहित्याचा अभ्यास त्यांनी केला. असे ते पुस्तकाकडे देशभान विसरून आकर्षित होत असत.

१९५१ ला मुंबईतील प्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ श्री. डी. ए. तेलंग यांचे दुःखद निधन झाल्यानंतर त्यांचे नातेवाईक फारसे पुस्तक प्रेमी नसल्यामुळे त्यांची ट्रकभर पुस्तके बाबासाहेबांनी एकादाच विकत घेतली इतकी पुस्तके एकदाच खरेदी करणारा दुसरा कुणीही माणूस जगात आपणास सापडणार नाही. इतके त्यांचे पुस्तकांवर प्रेम होते. आपल्या ग्रंथालयाविषयी ते अभिमानाने म्हणत, “My Library is just like an ocean.” आणि ह्या ग्रंथसागरातून एखादे पुस्तक शोधणे म्हणजे अवघड असे. त्यामुळे त्यांना स्वतःलाही आपल्याजवळ असलेले पुस्तक शोधून सापडत नसे. व पुस्तक तर त्यांना पाहिजे असे. अशा वेळी ते पुस्तकाच्या दुकानात जाऊन त्याच पुस्तकाची नवीन प्रत ते आणत असत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकदा आपल्या काही मित्रांसह नालंदा या पवित्र ठिकाणास भेट देण्यासाठी गेले. व तेथे गेल्यावर बौध्द पुस्तके भारतातून नामशेष व्हावीत म्हणून २५०० वर्षा पूर्वी नालंदा विश्वविद्यालयाला लावलेल्या भयंकर आगीचे निरिक्षण केल्यानंतर व त्या ठिकाणाची अवस्था पाहून त्यांना रडू आले. कारण ते दूर्मिळ ग्रंथ आज असते तर ते मला वाचायला मिळाले असते. असे त्यांनी आपल्या मित्राला बोलवून दाखविले व आज आपण या ग्रंथांना मुकलोत असे त्यांना वाटले. अशी पुस्तक वाचण्याची त्यांची असेलेली तळमळ यावरून लक्षात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पुस्तकाविना थोडेही करमत नव्हते. उठताना, बसताना, फावला वेळ मिळाला तेथेही पुस्तके त्यांच्या सोबत असत. झोपतानाही पुस्तके वर्तमानपत्रे त्यांच्या सोबत असायची. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत पुस्तके त्यांच्या सोबत होती. अगदी शेवटीही त्यांनी पुस्तकाला पाहता पाहता प्राण सोडला इतके पुस्तकावर प्रेम करणारा व्यक्ती दुसरा कोणीही जगात होणे नाही.

**संदर्भ :-**

१) संपा. डॉ. फडके भालचंद्र - ‘डॉ. आंबेडकरांचे समाज चिंतन’ मॅजेस्टिक प्रकाशन पुणे- १९८९ पृष्ट क्र. २

२) संपा. दया पवार- ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ’ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ मुंबई- १९९३ पृष्ट क्र. ४१३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : व्यक्तित्व आणि कर्तृत्व

**प्रा. डॉ. नवीन केशवराव सोळंके**
नागनाथ महाविद्यालय, औंढा (ना.)

भारत रत्न, दलित्तोधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन आणि कार्यासंबधी विचार करत असताना त्यांचा त्याग प्रामुख्याने आपल्या समोर येतो. पददलितां बददलची पोटतिडने तळमळ असलेल्या या व्यक्तीत्त्वाचे कर्तृत्वही महान आहे. समाजातील तळागाळातील भरडल्या जाणाऱ्या लोकां बद्दल त्यांच्या मनामध्ये अत्यंत तळमळ होती. समाजातील शेवटच्या घटकाचे मुलगामी परिवर्तन त्यांना अपेक्षित होते. समाजातील शेवटचा वर्ग म्हणजे स्त्री-शूद्रांदी हे अज्ञान अंधश्रध्दा यामध्ये पीचत पडलेले आहेत. वर्षानुवर्षाच्या त्यांच्या दुःखाना वाचा फोडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान व्यक्तिमत्त्व होते परिस्थितीशी आणि समाजाशी झगडता आलेले अनुभव आणि वाचनातून, अभ्यासातून मिळवलेल्या चिकित्सक वृत्तीच्या मदतीने त्यांनी सामान्य जनांना स्वत्वाची जाणिव करून दिली. विधीज्ञ, अर्थतज्ज्ञ, इतिहासाचे गाढ अभ्यासक, राज्यघटनाकार डॉ. आंबेडकरांनी समाजातील स्त्रिया, अस्पृश्य, पिडीतांसाठी त्यांच्या हिताचे कायदे केले. त्यांना शिक्षणाचा हक्क मिळवून दिला. त्यांच्या अधिकार कर्तव्यांची त्यांना जाणीव करून दिली. समाजातील असंघटीत वर्गांना संघटित करण्यासाठी त्यांनी 'शिका आणि संघटित व्हा' हा मोलाचा मंत्र दिला. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून दिला.

स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्याच्या लढाईतही जे स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी संघर्ष करीत होते ते आणि तेवढेच फक्त देशभक्त असे समीकरण जुळवून एक प्रकारची मक्तेदारी काही लोकांनी निर्माण केली होती. त्यामुळे प्रत्यक्षात काही प्रमाणातच स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणारे किंवा न भाग घेणारेही स्वतःला स्वातंत्र्य सैनिक म्हणवू लागले. पर्यायाने जे प्रत्यक्षात प्राणपणाने लढले परंतु राजकारणापासून अलिप्त असलेले लोक बाजूला फेकले गेले. आणि राजकारणात भरणा झाला तो बेगडी स्वातंत्र्य सैनिक समोर येवू लागले तेव्हा डॉ. आंबेडकरांनी उद्‌गार काढले की, "आम्हाला असे सरकार पाहिजे की जे देशाचे खरे हित निष्ठापूर्वक साधेल आणि न्याय, सामाजिक प्रश्न, आर्थिक प्रश्न कुणाच्याही रागालोभाची पर्वा न करता सोडविल." हे विचार त्यांनी पहिल्या गोलमेज परिषदेत व्यक्त केले. आणि निःपक्षपाती शासनाची अपेक्षा व्यक्त केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजचितंक असल्यामुळे त्यांचे समाजप्रती असलेले निरीक्षण निरीक्षण चिकीत्सक होते. ब्रिटिशांच्या राजवटीबद्दल बोलताना ते म्हणतात की, 'ब्रिटिशांनी देशाचे आर्थिक शोषण केले आहे आणि सुधारणेचा आव आणून फक्त देशाची पिळवणूक केली आहे' हे त्यांचे विचार अत्यंत परखड स्वरूपाचे आपल्याला दिसून येतात. जातीभेदाचे चटके त्यांनी लहानपणा पासून सोसलेले असल्यामुळे तसेच धर्ममार्तंडानी केलेल्या अपमानाचे विष त्यांनी अनेकदा सहन केले असल्यामुळे त्यांनी दिलेला अजन्म लढा हा फक्त अस्पृश्यता निवारणापुरताच नव्हता तर तो खऱ्या अर्थाने मानवमुक्तीचा, व्यक्ती स्वातंत्र्याचा, समतेचा बुधंतेचा लढा होता. ह्या सामाजिक मूल्यांसाठी त्यांनी प्राणपणाने प्रस्थापितांशी लढा दिला. जाती निर्मूलानाचा हा लढा त्यांनी लढला त्यामुळे धर्ममार्तंड, धर्मग्रंथ, कर्मकांड, पूर्वजन्म, पूनरजन्म, ईश्वर, दैववाद ह्या वर्ग व जातीव्यवस्थांना चिरंजीव करणाऱ्यांच्या मुळावरच त्यांनी घाव घातले.

भारतीय माणसामधला श्रधाळूपणा नष्ट व्हावा. तो विज्ञान निष्ठ व्हावा. त्याला आधुनिकतेचे भान यावे व सर्व अंधश्रध्दा, अनिष्ठ रूढी, परंपरांच्या विळख्यातून त्याची मुक्तता व्हावी तो निर्भय व्हावा अशा व्यापक, सर्व व्यापी दृष्टिकोना भोवती डॉ. बाबासाहेबांचा लढा केंद्रित होता. मानवता जोपासण्याची, तिच्या मूल्यांची लढून, संघर्ष करून जोपासण्याची प्रेरणा त्यांना या मीतीतूनच मिळाली होती. उदारमतवाद हा मानवाला समन्वय शिकवतो, तडजोड शिकवतो पण संघर्ष करण्यास शिकवित नाही. हे बाळकडू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अगदी लहाणपणापासून विषमतावदी समाजरचेतून मिळाले होते.

समतावादी समाजरचनेची परंपरा त्यांना तुकाराम, शाहू, फुले यांच्याकडून मिळाली होती. भारतीय परंपरेमध्ये हे सतत दिसून आले आहे की, जेव्हा जेव्हा विषमतेचा अतिरेक होते तेव्हा तेव्हा समाजाला लागलेली ही कीड नष्ट करण्यासाठी बाबसाहेबांसारख्या युग पुरुषांना आपले पूर्ण आयुष्य मोजावे लागते संघर्ष करून प्रवाहा विरुध्द पोहून समाजात समानता प्रस्थापित करावी लागते. याकार्यासाठी बळीपासून आंबेडकरा पर्यंतचे अनेक माहेरे आज पर्यंत कामी आले आहे, हा भारतीय इतिहास आहे. प्रस्थापित व्यवस्थेला या ठिकाणचा सामान्य समाज अंधारात ठेवून त्यांच्यावर राज्य करण्यात आधिक स्वारस्य असल्याचेही इतिहासच आपल्याला सांगतो. त्यापैकी एक भूमीपुत्र म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत.

आंबडेकरांच्या राजकीय चिंतनातील लोकाशाही विचार हा केवळ आदर्शांच्या स्वप्नरंजनातून उपजलेला नव्हता तर भोवतालच्या राजकीय वास्तवाच्या मुशीतून तो तावून सुलखून निघाला होता. भारतात लोकशाहीची उभारणी करगे एवढ्या पूरतेच त्यांचे राजकीय ध्येय परिमित नव्हते तर जिथे जिथे लोकशाही असेल त्या सर्वच राष्ट्रांशी करून भारताने लोकशाही मूल्यांचे संरक्षण करावे अशीही त्यांची इच्छा होती. सामान्य माणसावर आंबेडकरांचा एवढा लोभ आणि विश्वासही होता की, त्याच्या व्यक्तिगत व सामूहिक प्रतिष्ठेच्या प्रतिष्ठापनेसाठी लोकशाही जीवनमार्गाचा त्यांनी ध्यास घेतला. जुलूम जातीयता व गुलामगिरीतून सामान्य माणसाला मुक्त करणारी शासन व्यवस्था कशी असावी हाच शोध त्यांनी आमरण चालविला होता. या देशातील सामाजिक संबंधांची फरेरचना फक्त लोकशाही राजवटच करू शकेल असा त्यांन विश्वास होता. 'लोकशाही म्हणजे सहजीवन, लोकशाहीची मूळे सामाजिक संबंधातच आढळतात.' अशी त्यांची धारणा होती.

"ज्या समाजात भिन्न सामाजिक गटांच्या सांस्कृतिक दृष्टिकोनात प्रबळ तफावती असतात आणि भिन्न लोकसूहांच्या ठायी सहजीवनाची भावनाच अपूरी व अनुपस्थित असते तेथे ( लोकशाही) वातावरण निर्माण होणे अवघड असते." हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाहीवरील चिंतनाचा केंद्रबिंदू होता. द्रारिद्रय, निरक्षरता व जातीयता हे त्यांच्या मते भारतीय लोकशाहीच्या वाटचालीतील अडथळे होते. जोपर्यंत प्रयत्नपूर्वक या तिघांचे निर्मूलन होत नाही तोपर्यंत या देशात लोकशही अस्तित्वात येऊच शकत नाही. कारण तोपर्यंत या देशातील बहुमत हे त्या त्या मतदारसंघातील सर्व गटांचे प्रातिनिधिक होऊच शकत नाही. भारतात "जिथे सर्वांना समान समानाहिंबंध नाहीत. परिपूर्ण व मुक्त क्रियाप्रतिक्रिया नाहीत आणि जिथे विभिन्न सामाजिक गटांना सहभगाची समान क्षेत्रे नाहीत, तिथे लहान वा मोठा कोणताही गट अन्य गटाचे प्रतिनिधित्व करूच शकत नाही." अशा प्रकाराचे त्यांचे लोकशाही समाज रचने संबंधीचे महत्वपूर्ण चिंतन होते.

लोकशाही मूल्यांची जपणूक करताच सर्वसामान्य लोकांचे हित ही साधले गेले पाहिजेत हा त्यांचा ध्यास होता. म्हणून त्यांनी आपल्या विचारांचा केंद्र बिंदू पददलित होता.

ज्या ठामपणे त्यांनी लोकशाही संबंधी विचार व्यक्त केले होते. त्याच ठामपणे स्त्रीशूद्रांदीच्या स्वातंत्र्य बद्दलही आपले विचार व्यक्त केले. त्याच्यासाठीच त्यांनी आहोरात्र अथक मेहनत करून संविधानाची निर्मीती केली. त्यांच्या हक्कासाठी लढा उभारला. त्यामध्ये प्रामुख्याने स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य, स्त्रियांना दिले जावे असे स्थावर जंगम मालमत्ते संबंधीचे हक्क, शूद्रांच्या अस्तित्व व हक्का संबंधीचे प्रश्न, त्यांच्या शिक्षणासंबंधीचे प्रश्न अशा अनेक ज्वलंत विषयांवर चिंतन करून त्यातून मार्ग काढण्याचे उपाय त्यांनी सूचविले.

भारतीय ( हिंदू) समाजामध्ये स्त्रियांना कोणत्याही प्रकारची संपत्ती बाळगण्याचा अधिकार नव्हता. त्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न आणि अभ्यासपूर्वक चिंतन करून हिंदू कोडबिलाची निर्मीती केली पण भारतीय प्रतिगामी विचारप्रवाह स्वीकारणाऱ्यांना हिंदू-कोड बिलात केलेल्या अनेक शिफारशी मान्य नव्हत्या जसे विवाह कायदा, घटस्फोट, महिलांना मालमत्तेचा अधिकार म्हणून त्यांनी संसदेत हिंदू कोडबिल पास होऊ दिले नाही ते आज पर्यंत होय. तर दुसरीकडे डॉ. आंबेडकर म्हणतात, "मुझे भारतीय संविधान के निर्माण से भी अधिक दिलचस्पी और खुशी हिंदू कोड बिल पारित करेण मैं है।" या विधानावरून त्यांच्या ठिकाणी हिंदू कोड बिल संबंधीची आत्मियता आणि तळमळ आपल्याला दिसून येते. भारतीय

समाजाची मागासलेली स्थिती आणि त्यातही समाजातील दूर्बल घटकांची होणारी पिळवणूक त्या मातह्रदई माहामानवाला बघवत नव्हती. ते स्वत: या प्रसंगाना सामोरे गेले असल्यामुळे त्याना त्या सामाजिक पिळवणूकीची जाणीव होती. म्हणून त्यांनी भारतीय मागास समाजांना जाग करण्याचा प्राणपणाने आटापीटा केला ते म्हणतात, "गुलामाला गुलामीची जावीण करून द्या, म्हणजे तो पेटून उठेल." जीवनभर आपल्या वरील विचाराला अनुसरून कार्य करत राहणे हे त्यांचे श्रेष्ठ ध्येय होते. त्या दृष्टिने त्यांचे कार्य किंवा त्या कार्यांची व्याप्ती ही सर्वांगीण स्वरुपाची आहे. देशातील जणतेचे अज्ञान, अशिक्षितपणा, आडाणीपणा त्यांच्या विरोधात ते पेटून उठत. समाजातील दुर्बल घटकांना संरक्षण दिले पाहिजे ही त्यांची प्रामाणिक भावना. या भावनेतून त्यानी देशातील 50% लोकसंख्या म्हणजेच स्त्रिया यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून त्याना संरक्षण देता आले पाहिजे या उद्देशाने त्यांनी हिंदू कोड बिल पारित करण्याचे प्राणांतिक प्रयत्न केले. या देशातील पुरूष प्रधान व्यावस्थने मात्र ते पूर्णांशाने आजही पारित होऊ दिले नाही ही खंत बोचत राहते.

हिंदू कायद्या नूसार स्त्रियांना वडिलांकडे किंवा पतीकडे कोणत्याही प्रकारची संपत्ती बाळगण्याचा अधिकार नाही. ती एक उपभोग वस्तू आहे. ती कुंटूंबातील लहान म्हातारे तसेच घरातील सर्वांची अव्यवस्था होवू नये म्हणून सतत तत्पर राहीली पाहिजे. तिचे जगणे म्हणजे काहीच नाही ती म्हणजे एक 'क' वस्तू अशा प्रकारचा हिंदू समाजाचा स्त्री अस्तित्वा संबंधीचा विचार होता, आहे आणि पुढील काळातही असू शकतो. म्हणून तिला तिचं स्वत्व मिळवून देण्याचा कायदेशीर लढा देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले हे त्यांचे कार्य एकमेवाद्वितीय आहे. त्यांच्या या कार्यासाठी कोटी कोटी प्रणाम.

अस्पृश्याच्या बाबतीतही त्यांचे कार्य महान आहे हिंदू समाजातील वर्णव्यवस्था, जाती व्यवस्थेवर त्यांनी कडाडून हल्ले केले. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देणारे ते महान व्यक्तित्व होते. समाजाची सेवा करणे हे एक काम त्यांनी जन्मभर करावे असे व्यवस्थमध्ये अलिखीतपणे शतकानुशतके चालत आले. त्या प्रथा किती चुकीच्या आहे हे समाजाचा विरोध पत्करूनही त्यांनी लोंकसमोर मांडले. समाजातील सर्वसामान्य वर्ग शिकला आणि संघटित झाला तर आपले कसे होईल या भितीपोटी सर्वणांनी सामाजिक बदलांना सतत विरोध केलेला दिसून येतो. त्याच पध्दतीने याही बाबतीत घडले होते. पण बाबासाहेबांच्या सारखा कणखर, बाणेदार कर्ता या कार्याला पुढे नेत राहीला. म्हणून आज समाजातील सर्वच दुर्बल घटकांना स्वत्वाची जाण येते आहे. त्यांना त्यांच्या आस्तित्वाचा अर्थ आता कळू लागला आहे.

कामगारांचीही या देशात तिच स्थिती होती. गिरणी कामगार असोत किंवा कारखाना कामगार असोत त्यांना त्यांची कर्तव्य तेवढच माहित आहे. बाकी त्यांना कोणते आधिकार आहेत हे त्यांना माहित नव्हते. दिलेले काम तेवढेच करत राहणे हेच त्यांना माहित होते. येथील शोषण व्यावस्थेने निर्माण केलेल्या चक्रब्युहात तो फसत जात होतो. त्या चक्रब्यहातून त्याला बाहेर काढण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी केले. म्हणून या महान नेत्यांला त्रिवार अभिवादन.

**निष्कर्ष :**

1) डॉ. बाबसाहेबांच्या महान कार्याची जाणीव ठेवणे.
2) त्यांच्या स्त्री विषयक लढ्याचे स्मरण करणे.
3) अस्पृश्यां संबंधी लढ्याची आठवण ठेवणे.

**संदर्भ ग्रंथ**

1) डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल: चांगदेव भगवानराव खैरमोडे.
2) हिन्दू कोड बिल और डॉ. अम्बेडकर: सोहनलाल शास्त्री विद्यावाचस्पती.
3) बाबासाहेबांचे राज्यघटनेतील योगदान: वामन लिंबाळकर.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मूलन विषयक विचार

**प्रा. डॉ. नंदा पंढरीनाथ कंधारे**

कै. न्हानाभाऊ म. तु. पाटील कला महाविद्यालय मारवड ता.अमळनेर जि.जळगांव ४२५ ४०२

**प्रास्ताविक**

भारतीय समाज जाती व्यवस्थेवर उभा आहे. या जाती व्यवस्थेत सामाजिक विषमता आहे म्हणून हा समाज एकसंघ उभा राहू शकलेला नाही. यासाठी या समाजव्यवस्थेत मुलगामी बदल झाले पाहिजेत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. 'स्व' च्या पलीकडे जाऊन डॉ. आंबेडकर यांनी कोणाचा विचार केला असेल तर तो माणसातील माणुसकी नावाच्या घटकाचा. जात ही एक अत्यंत घातक संस्था आहे, शोषणाचे साधन म्हणून तिचा उपयोग केला जातो ही जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे. जातिभेद व चातुवर्ण्य यांच्या पाठीशी असलेले धर्माचे अधिष्ठान नाहीसे झाले पाहिजे. असे विचार डॉ. आंबेडकर यांनी मांडले.

डॉ. आंबेडकर क्रांतिकारक होते त्यांनी जातीव्यवस्थेला विरोध केला त्यांच्या मते जातीव्यवस्था अविवेकी, अशास्त्रीय अन्यायकारक आहे. त्यांच्या मते प्रत्येकास व्यक्तिमत्त्व विकासाची संधी मिळाली पाहिजे. समान संधीचे तत्व जातीव्यवस्थेत टाळले जाते. जातीमुळे अकार्यक्षमता वाढते, कारण पात्रता असो किंवा नसो विशिष्ट काम विशिष्ट जातीलाच करावे लागते. त्याचा परिणाम देशाच्या विकास होत नाही. जातीमुळे भारतीय समाजाची एकात्मता नष्ट झाली आहे श्रेष्ठ—कनिष्ठ, उच्च—नीच यासारखे दोष या जाती व्यवस्थेतून निर्माण झाले असून, त्यातून भारतात सामाजिक फुटीरता निर्माण झाली आहे. बहुतेक जातींच्या जातीनुसार व्यवसाय ठरविले गेल्यामुळे व्यवसायातून व्यक्ती विकासाची संधी सर्वांना सारख्या प्रमाणात उपलब्ध नाही कनिष्ठ जातींना प्रगती करता येत नाही यासाठी समाजातील जी जातीव्यवस्था आहे ती नष्ट झाली पाहिजे. डॉ. आंबेडकर यांच्या मते जातीसंस्था संपवायची असेल तर धर्माचा पाया वेद आणि शास्त्र आहेत त्यांनाच आधी नष्ट करायला पाहिजे. या धर्मग्रंथात ब्राह्मणांच्या फायद्याचे उच्चवर्णीयांना उपयोगी पडणारे नीतिमूल्ये आहेत. वेद आणि शास्त्रांनी समाजातील खालच्या लोकांना सतत वंचितच ठेवले. हिंदू धर्मशास्त्रांनी त्यांची मानसिकता जातीय केलेली आहे. बाबासाहेबांच्या मते जातिव्यवस्था संपविण्यासाठी प्रथम स्त्री पुरुषांना शास्त्राच्या मानसिकतेतून मुक्त करणे गरजेचे आहे. भारतातील हिंदू समाजावर अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा यांचे वर्चस्व आहे त्यामुळे हा समाज आधुनिक दृष्टिकोन स्वीकारण्यास तयार नाही. जुन्या मूल्यांना चिकटून राहणारा हा समाज असल्याने तो नवीन मूल्य सहजासहजी स्वीकारत नाही. त्यामुळे सामाजिक विषमता निर्माण झाली आहे. हिंदू समाजातील जातीव्यवस्था अमानवीय आहे असे बाबासाहेबांचे मत होते. आपल्या ग्रंथातून त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनाच्या आपल्या लढ्याचे तात्विक भूमिका स्पष्ट केली. अनेक सभांतून, परिषदातून मेळाव्यातून, वृत परिषदेतून जनजागरणाला गती देऊन त्यांनी जातीय विषमता दूर करण्याचे प्रयत्न केले. जातीवाद जोपर्यंत संपणार नाही तोपर्यंत आर्थिक व राजकीय परिवर्तनाची गोष्ट स्वप्नच राहील. कारण की जातीवाद, वर्णव्यवस्था श्रमविभाजनावर आधारीत नाही ती नैसर्गिक प्रदत्त आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची भावना जीवन मूल्यामध्ये गरजेचे आहे

**शोधनिबंधाचा उद्देश** —

१.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जाती विषयक विचारांचे अध्ययन करणे.

२.डॉ. आंबेडकर यांनी जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी सुचविलेल्या उपायांचे अध्ययन करणे.

**गृहितके** —

१.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विचारातून, कार्यातून अस्पृश्य जातींना स्वतंत्र जीवन जगण्याचा हक्क मिळवून दिला.

२.भारतातील जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी प्रयत्न केले

**संशोधन पद्धती** –

सदर अध्ययन करण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करून माहितीचे संकलन केले आहे. प्रकाशित पुस्तके, साप्ताहिकी, दैनिक वृत्तपत्रे, मासिके यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**शोधनिबंधाचे महत्त्व** –

प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जाती निर्मूलन विषयक विचारांचे अध्ययन करणे आहे. डॉ. आंबेडकर यांचा जातीव्यवस्थेला विरोध होता. त्यांच्या मते जातीव्यवस्था अविवेकी, अशास्त्रीय, अन्यायकारक आहे जातीमुळे भारतीय समाजाची एकात्मता नष्ट झाली आहे. समाजात सामाजिक विषमता निर्माण झाली आहे. समाजातील जातीव्यवस्था अमानवीय असून श्रेष्ठ–कनिष्ठ उच्च–निच यासारखे भेदभाव जाती व्यवस्थेतून निर्माण झाले आहेत. त्यासाठी आपल्या सभातून, परिषदातून, मेळाव्यातून आपल्या ग्रंथातून जातीव्यवस्थेचे निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न कसे केले आहेत, याचे अध्ययन केले आहे. या अध्ययनाचा उपयोग सर्वसामान्य अभ्यासक, समाजसुधारक यांना होऊ शकेल. म्हणून हा विषय महत्त्वाचा आहे

**डॉ. आंबेडकरांचे जातिनिर्मूलन विषयक विचार –**

डॉ. आंबेडकर यांच्या मते भारतातील जाती–जातीतील भेदभाव नष्ट करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे आंतरजातीय विवाह करणे हा आहे. इसवी सन १९५१ मध्ये डॉ. आंबेडकर यांनी अपमान, सन्मान आणि तिरस्कार अशा अनेक पैलूतून जाऊन त्यांनी जाती प्रथाप्रकार आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी हिंदू समाजाच्या उन्नतीसाठी काही महत्त्वाच्या सुधारणेच्या आवश्यकतेला बळ दिलेल्या आहे. सामाजिक व्यवस्था जातीच्या स्थानावर तर्कावर आधारित असली पाहिजे, हिंदू धर्माचा एक प्रामाणिक ग्रंथ असला पाहिजे, ज्याला संपूर्ण हिंदू स्वीकार करतील. परंपरागत पौरोहिताची व्यवस्था संपली पाहिजे आणि राज्य द्वारा आयोजित पुरोहिताची परीक्षा पास करणारी, पुरोहितांना योग्य समजली जावी आणि सामाजिक संरचनेमध्ये व्यक्तीची केंद्रीय स्थिती असली पाहिजे. संपूर्ण समाज परंपरागत श्रेणीबद्ध असमानतेच्या स्थानावर न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वावर संघटित झाला पाहिजे. डॉ. आंबेडकर यांच्या मते भारतीय राजकीय पक्षावर उच्चवर्णीय यांचेच वर्चस्व आहे. त्यामुळे कनिष्ठ जातीवर अन्याय होतो. विशिष्ठ जाती–जमातींना स्त्रोतापासून वंचित ठेवण्यात येते त्यामुळेच लोकशाही प्रस्थापित होणे आवश्यक आहे. असे डॉ. आंबेडकर यांना वाटत होते.

डॉ. आंबेडकर यांनी १९२७ साली अस्पृश्य जातींना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा हक्क मिळाला पाहिजे यासाठी आंदोलन केले. १९२७ मध्ये महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. १९२९ मध्ये पर्वतावरील मंदिरात प्रवेशासाठी तर १९३१ मधील नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश अशाच पद्धतीने यशस्वी केले होते. १९३५ पासून ते १९५५ पर्यंतच्या काळात अस्पृश्यता निवारणाच्या काळात डॉ. आंबेडकर यांना कटू अनुभव आले. हिंदू धर्मात दीर्घ काळ राहिल्यास माणुसकीचे अधिकार मिळणार नाही मनुष्यपण मिळण्यासाठी धर्मांतर अपरिहार्य आहे याची जाणीव झाली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी स्वत: बौद्ध धर्म स्वीकारला. त्यांच्या मते बौद्ध धर्मने तेजस्वी व संपन्न संस्कृतीचा पाया घातला असून नितीमत्तेची शिकवण देणारा बुद्धिनिष्ठ तसेच स्वातंत्र्य, समता व बंधुता नावाचा पुरस्कार करणारा, गरीबांनाविषयी सहानुभूती असणारा, उपासना कर्मकांड इत्यादींना महत्व न देता माणसाची सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करणारा, चातुर्वर्ण नष्ट करू पाहणारा, विवेक, प्रेम व समानता यावर सामाजिक जीवन उभे करू पाहणारा एकमेव बौद्ध धर्म असून त्याचा स्वीकार केल्यास जातीव्यवस्थेचे वर्चस्व कमी होऊ शकेल असे डॉ. आंबेडकर यांना वाटत होते.

मनुस्मृतीने सामाजिक विषमतेला व त्यावर जर आधारलेल्या जातीव्यवस्थेला आधार प्राप्त करून दिला आहे. मनुस्मृतीमुळे कनिष्ठ जातीचे सामाजिक न्याय, सामाजिक हक्क नष्ट झालेले आहेत. असे वाटत होते. त्यामुळे १९२६ मध्ये मनुस्मृतीचे जाहीररित्या दहन डॉ.आंबेडकर यांनी केले.

डॉ. आंबेडकर यांच्या मते उच्चवर्णीयांनी जे आर्थिक नियम, वेतना संबंधी नियम तयार केले होते. त्याचा फायदा त्यांनाच होत होता. मनूचा वेतनाचा कायदा हा काही किमान वेतन कायदा नसून तो कमाल वेतन कायदा आहे. अत्यंत कठोर केलेल्या वेतन निश्चिती कायद्यामुळे खालच्या जातींना आर्थिक सुरक्षितता मिळत नव्हती. त्यासाठी डॉ. आंबेडकरा यांच्या मते अस्पृश्यांनी जातिव्यवस्थेची बंधने तोडून आर्थिक स्थितीतही बदल घडवून आणले पाहिजेत. त्यांच्यामते स्वातंत्र्याच्या परिपूर्णतेसाठी आणि लोकांच्या नैतिक आणि भौतिक विकासासाठी सर्वांना समान संधी देणे गरजेचे आहे

भारतातील जातीव्यवस्थेची तिव्रता कमी करण्याबरोबर दलित जातीच्या हितसंबंधांची जपणूक करण्यासाठी स्वतः डॉ. आंबेडकर यांनी प्रथम मजूर पक्ष व त्यानंतर ऑल इंडिया शेड्युल कास्ट फेडरेशनची स्थापना केली व त्या पक्षाची धार्मिक तसेच सामाजिक व राजकीय समान संधी, भीती तसेच व स्वातंत्र्य आणि पिळवणूकीपासून मुक्तता अशी ध्येय धोरणे निश्चित केली.

डॉ. आंबेडकर यांच्या मते अस्पृश्यांनी जातिव्यवस्थेची बंधने तोडून खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य, समता प्राप्त करायची असेल तर त्यासाठी त्यांनी उच्च शिक्षण घेऊन स्वतःचे व संपूर्ण दलितांचे सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणले पाहिजे.

जातीप्रथा नष्ट करण्यासाठी डॉ. आंबेडकर यांचे मत होते की, अस्पृश्य जातींनी आपल्या वाईट सवयी आणि निकृष्टतेचा त्याग करून आत्मसन्मानपूर्वक जीवनाकडे वळले पाहिजे. त्यांच्यामध्ये स्वतंत्रपणे, समानतेने व स्वाभिमानाने जीवन जगण्याची इच्छा असलेली पाहिजे. त्यांच्या मते दलितांची स्थिती सुधारण्यासाठी दलित स्त्रीया सर्वात जास्त महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडू शकतात. २० मार्च १९२७ ला मदतीला आलेल्या स्त्रियांना संबोधित करताना म्हटले की, तुम्ही कधी विचारही करू नका की, तुम्ही अस्पृश्य आहात, स्वच्छ व सुंदर रहा. ज्याप्रकारे सवर्ण स्त्रिया कपडे घालतात तुम्ही पण घाला आणि हे कपडे स्वच्छ असावेत.

अस्पृश्यता, जातीव्यवस्था व धार्मिक अंधश्रद्धा यापासून भारतीय समाज मुक्त करून त्याची उभारणी बुद्धी वादावर करण्यात यावी. असे डॉ. आंबेडकर यांचे मत होते.

डॉ. आंबेडकर यांनी मते हिंदू समाजरचना ही परंपरागत आहे त्यात जाती पोटजाती विशेष अधिकार असलेल्या जाती अधिकार नसलेल्या तसेच स्पृश्य—अस्पृश्य सवर्ण कनिष्ठ पुढारलेले मागासलेले असे भेद आहेत ्या भेदांच्या भिंती तोडून समाजाची रचना मुक्त आधाराने केले पाहिजे त्यामुळे अस्पृश्य जातीची तसेच मागासवर्गीयांच्या समाजातील उंची व प्रतिष्ठा वाढेल व जातीय भेदभाव कमी होण्यास मदत होईल.

डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्य जातींना हक्काची जाणीव करून दिली. आपला उद्धार करण्यासाठी आपणच आपल्या पायावर उभे राहिले पाहिजे. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' अशी महत्त्वाची शिकवण त्यांनी अस्पृश्य जाती—जमातीतील लोकांना दिली.

डॉ. आंबेडकरांनी भारतातील जातीव्यवस्था व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. भारतीय समाजव्यवस्थेत असणाऱ्या जातीयता व अस्पृश्यते यामुळे संपूर्ण समाज, दुर्बल बनला असून, सामाजिक, आर्थिक स्वरूपाच्या गुलामगिरीत खितपत पडलेला आहे. अशा दलित समाजात जागृती घडवून आणण्यावर त्यांच्यात धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, स्वातंत्र्य व हक्क याची जाणीव निर्माण करून देण्याचे कार्य केले आहे. समाजातील जातीय व विषमतेला पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. घटना समितीचे सदस्य व मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी भारतीय घटनेत दलित तसेच अस्पृश्य व अनुसूचित जाती जमातींच्या हितरक्षणासाठी स्वतंत्रपणे तरतुदी केल्या डॉ. आंबेडकरांनी

दीन—दलित तसेच अस्पृश्य जातीत जागविलेला स्वाभिमान व स्वत्व यामुळे अस्पृश्य जातीच्या जीवनात एका नव्या पर्वाला सुरुवात होऊन त्यांच्या उत्थानाचे मार्ग खुले झाले आहेत.

अस्पृश्य जातीतील लोकांना डॉ. आंबेडकरांनी वाचा दिली, आत्मसन्मान स्वाभिमान दिला. शतकानुशतके भारतातील शूद्र जातींना वाचा नव्हती म्हणजे जीभ होती पण कनिष्ठ जाती असल्यामुळे बोलता येत नव्हते. अन्याय सहन करावा लागत असे, चीड व्यक्त सुद्धा करता येत नव्हती. डॉ. आंबेडकर यांनी या मुक्त समाजाला बोलके केले. डॉ. आंबेडकर यांनी आपल्या विचारातून, कार्यातून आत्मतेज, स्वाभिमान शिकविला. दलितांचे माणूसपण हिरावून घेतले होते त्यांना माणूसपण मिळवून देण्यासाठी प्रयत्न केलेत यामुळेच अस्पृश्य जाती दलित समाज जागा झाला आहे हक्कासाठी तो जागृत झाला आहे. मोठमोठ्या पदावर गुणवत्तेच्या आधारे कनिष्ठ जातीतील माणसे काम करीत आहे याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना द्यावे लागते वर्षानुवर्ष परावलंबित्व असहाय्य जीवन जगणाऱ्या अस्पृश्य जातींना स्वतंत्र जीवन जगण्याचा हक्क डॉ. आंबेडकरांनी मिळवून दिला अस्पृश्य जातीचा आत्मविश्वास वाढविला. घटनेच्या आधारे आपले स्वप्न पूर्ण.

डॉ. आंबेडकर यांना दास्यात, गुलामगिरीत ठेवणाऱ्या रूढी, परंपरा, धर्मशास्त्रांना नकार देऊन माणूस नाकारणाऱ्या संस्कृतीला, समाजव्यवस्थेला नाकारले. डॉ. आंबेडकर यांनी विद्रोह नकारा बरोबरच समता, बंधुत्व व न्याय तत्वावर नवा समाज निर्माण करण्याचा मूलगामी विचार दिला. त्यामुळे दलित जाती, अन्याय, दारिद्रय, गुलामगिरीच्या विळख्यातून मुक्त होण्यास प्रयत्न करू लागला. आज दलित समाज अन्याय छळ दारिद्रय गुलामगिरीतून मुक्त झालेली आहे.

डॉ. आंबेडकर यांच्या विचाराने या जातीत परिवर्तन, प्रगती झाली आहे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या आयुष्यभर वाणीने व लेखणीने जातीव्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. त्यांची भूमिका समाज शिक्षकाची, समतेकरिता लढा सुरू करणाऱ्या एका समाजसुधारकाची होती.

**निष्कर्ष** —

जातीमध्ये जन्म घेणे हा माणसाचा दोष नाही. विशिष्ट जातीत माणसाला जन्म मिळतो ते त्याला विचारून जात मिळत नाही. पण एकदा जातीत जन्म मिळाला की त्याची इच्छा असो नसो त्याला विशिष्ट पद्धतीने राहावे लागते. जातीची जी नियमने आहेत. त्यांच्यात मनुष्याला बंदिस्त व्हावे लागते यामुळे सामाजिक विषमता वाढलेली आहे या जातिभेदांमुळे या सामाजिक विषमतेमुळे राष्ट्रीय ऐक्य व बंधुभाव धोक्यात आलेला आहे. म्हणून जातिनिर्मूलन केले पाहिजे.

बऱ्याच ठिकाणी दलित जातींना सार्वजनिक कार्यात सहभागी होऊ दिली जात नाही. मंदिरात पूजा—अर्चा करण्यास दर्शन करण्यास मज्जाव केला जातो. जातीच्या नावावरून हिनवून बोलले जाते. जात हा समाजाला जडलेला भयावह रोग आहे. एक शाप आहे. त्याचे निर्मूलन होणे सुदृढ समाज व्यवस्थेकरीता अत्यावश्यक आहे. याची जाणीव समाजाच्या मनात जागृत व्हावी यासाठी डॉ. आंबेडकर यांनी प्रयत्न केले असले तरी समाजातील जातीय भेदभाव संपला का ? हा एक चिंतनाचा विषय आहे. आजही समाजातून जातिव्यवस्थेच्या नियमांचे समूळ नष्ट झालेला नाही जातीव्यवस्था व तिचे निर्बंध आहेत. रोटी—बेटी व्यवहार निर्बंध, विवाह निवडीवरील निर्बंध खूप तीव्र प्रमाणात आहेत. जातीच्या बाहेर जाऊन विवाह करता येत नाही. जर केला तर जाती बांधवांकडून अवहेलना होते, वाळीत टाकले जाते समाजाचा विरोध पत्करावा लागतो.

**सारांश** —

आजही समाजात जातीव्यवस्था अस्तित्वात आहे. हा प्रश्न अजूनही तसाच शिल्लक आहे. तो कायद्याने ही सुटलेला नाही. भारतीय समाजातील कनिष्ठ, अस्पृश्य जातीचा सर्वांगीण विकास कशा पद्धतीने घडवून आणता येईल व समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता कशी निर्माण करता येईल. यासाठी सर्व पातळीवरून प्रयत्न झाले पाहिजेत. समाजातील लोकांची मानसिकता बदलून स्पृश्य समाजाप्रमाणेच

त्यांनाही सन्मानाने जगता येईल अशीच वागणूक त्यांना मिळाली पाहिजे. तरच सामाजिक विषमतेची दरी कमी होऊन जाती निर्मूलन होईल.

**संदर्भसूची**


१. मायकल एस. एन. (संपादक) भाके विद्या (अनुवाद), 'आधुनिक भारतातील दलित दृष्टिकोन आणि मूल्ये' डायमंड पब्लिकेशन, टिळक रोड, पुणे, प्रथम आवृत्ती २००८ पृष्ठ ९६.

२. देवगावकर श. ग्रो., 'राजकीय विचारवंत' (पाश्चिमात्य आणि भारतीय), श्री साईनाथ प्रकाशन १, धरमपेठ नागपूर, प्र. आ. जुलै २००७ पृ. क्र. २५१

३. डोळे ना. य., 'भारतीय राजकीय विचारवंत', विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगपुरा औरंगाबाद, पहिली आवृत्ती जून १९९९ पृ. क्र. ९३

४. यादव वीरेंद्रसिंह, 'बिसवी सदी के महानायक : बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर', ओमेगा पब्लिकेशन्स अन्सारी रोड, दरियागंज. नई दिल्ली, प्रथम संस्करण २०११ पृ. क्र. ४३९.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार

**प्रा. डॉ. सुनिता जगन्नाथराव कुकडे**

समाजशास्त्र विभाग प्रमुख,के .के .एम. कॉलेज, मानवत.

**प्रस्तावना:**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. त्याचा योग्य उपयोग झाला पाहिजेअसे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चे आहे. योग्य शिक्षण पद्धतीतून उत्तम व जबाबदार नागरिक बनू शकतो यावर त्यांचा विश्वास होता. माणूस शिक्षण आणि बौद्धिक दृष्टा सशक्त होतो त्यांना चांगले वाईट कळते व त्यांच्यात प्रज्ञा ,शील, करुणा हे तीन गुण येतात. शिक्षणाचे महत्त्व सोप्या भाषेत सांगताना ते म्हणतात,**"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते प्याल्यानंतर माणूस गुरगुरायाला लागतो.**"त्यामुळे त्यांनी संपूर्ण अविकसित समाजाला **"शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा"** ही त्रिसूत्री सांगितली.ज्या समाजाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार ऐकले, वाचले व आत्मसात केले त्या समाजाचा विकास दिसून आला.परंतु जो समाज शिक्षणापासून वंचित राहिला त्यांच्यापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार पोहोचलेच नाहीत ते असंघटित जाती-जमाती, आदिवासी, मागासवर्गीय माणसे विकासापासून वंचित आहेत हे सत्यस्थिती नाकारून चालणार नाही. समाजाचा विकास करायचा असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक क्रांती अशक्य आहे. डॉ. बाबासाहेबांचे शैक्षणिक कार्य संक्षिप्त स्वरूपात मांडणे अवघड आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी एखाद्या विशिष्ट वर्गासाठी कार्य केले अशा पद्धतीचा प्रचार करून त्यांना बंदिस्त करण्याचा प्रयत्न बऱ्याच विद्वानांकडून झाला त्यामुळे आजही बरेच घटक त्यांच्या शैक्षणिक विचारापासून वंचित आहे. प्रत्येक समाजातील ज्ञानी लोकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण विषयक विचार आणि प्रचार प्रसार शेवटच्या घटकापर्यंत करणार नाहीत तोपर्यंत भारतात लोकशाही असून सुद्धा ते आपल्या अधिकार व हक्कापासून चाचपडत राहतील." knowledge is a power "असे लॉर्ड फ्रान्सिस बेकने एका ठिकाणी म्हटले आहे.--१

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निष्ठा ज्ञानावर होती. ते शिक्षणाकडे ज्ञानाचा स्त्रोत म्हणून पाहत होते ज्ञानाचा स्त्रोत हा प्रकाश आणि सामर्थ्याचा स्त्रोत असतो. शिक्षणातून ते सामर्थ्य मिळाले पाहिजे त्यांचा आग्रह होता.

डॉ. आंबेडकरांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक विषयावर मौलिक ग्रंथ लिहिले मात्र शिक्षणावर तसा ग्रंथ दिला नाही असे असले तरी शिक्षण हा त्यांचा निरंतर यांचा विषय होता आता त्यांनी आपल्या भाषणातून शिक्षणाचे मूलभूत विचार व्यक्त केले त्यांनी मूकनायक, जनता, बहिष्कृत भारत, समता या साप्ताहिकातून शिक्षण विषयक लिखाण केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक आदर्श विद्यार्थी, प्राध्यापक ,आदर्श प्राचार्य व आदर्श संस्थाचालक होते. सिद्धार्थ कॉलेज व मिलिंद महाविद्यालय त्यांची स्थापना त्यांनी केली. ते आजन्म विद्यार्थी राहिले त्यांनी आपल्या मुलांपेक्षाही अधिक प्रेम ग्रंथवर केले.अनेक संघर्ष सत्याग्रह राजकीय लढे हे करीत असताना सुद्धा लेखन-वाचन त्यांनी शिक्षणाची कास कधीही सोडली नाही शिक्षण हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा श्वासोश्वास होता.शिक्षण एखाद्या समाजाची मक्तेदारी असता कामा नये शिक्षण सर्वच समाजातील

सर्वच घटकांना मिळाला पाहिजे असे त्यांना मनापासून वाटत असे "शिक्षणाची वंचितता "ही सर्व प्रकारच्या वंचितांना जन्म देते असे त्यांचे मत होते.

सद्यस्थितीमध्ये भारतीय समाजाचे अवलोकन केल्यास आजही शिक्षणापासून बहुसंख्य समाज वंचित आहे. शिक्षण पद्धतीचे होत असलेले अमुलाग्रह बदल, महागडे शिक्षण पद्धती यामुळे आर्थिक दृष्ट्या सबल असलेली लोक चांगल्या पद्धतीने शिक्षण घेतात. कागदोपत्री आणि शैक्षणिक संस्या व शासकीय शाळा ग्रामीण भागापर्यंत पोचल्या असल्या तरी शिक्षण ग्रामीण व वंचित घटकांना दर्जेदार शिक्षण पोहचले नाही ही सत्यस्थिती आहे. ही परिस्थिती पाहिल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आठवण आल्याशिवाय राहत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शाळेत व शाळेत बाहेर अस्पृश्यतेची खूप चटके बसले होते. अस्पृश्यता ही एक प्रकारची अमानुष गुलामी होती. शिक्षणाशिवाय या गुलामगिरीवर मात करता येणार नाही याची जाण त्यांना असल्यामुळे शिक्षणात कधीही खंड पडू दिला नाही. त्यांच्या शिक्षण बद्दलचा अस्था आणि त्यांचे वडील रामजी यांची दूरदृष्टी होती. यामुळे त्या काळात आपल्या मुलाला इंग्रजीतून शिक्षण दिले आणि डॉ.बाबासाहेब वर टाकलेला विश्वास सार्थक ठरला. त्यांच्यात असलेली शिक्षणाची आवड त्यामुळे त्यांच्या संपर्कात आलेल्या गुरुवर्य, प्राध्यापक मंडळीने प्रोत्साहन दिले. त्यामुळे त्या काळात बाबासाहेबांनी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतले. सयाजीराव गायकवाड यांच्यासारख्या समाजसुधारकांच्या दूरदृष्टीमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उच्च शिक्षणाचे ध्येय पूर्ण झाले. कोलंबिया विद्यापीठात डॉ. सेलिग्मन व जॉन ड्युई या शिक्षणतज्ञ मुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व बहरले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग भारतीय समाज सुधारण्यासाठी केला.दलितांना समानतेची व प्रतिष्ठेची वागणूक मिळत नाही म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या समाजाला जाणीव-जागृती करण्याचे ठरविले. आपल्या बौद्धिक क्षमतेचा वापर आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी केला. मुक्या समाजाचे नायक बनले 1919 मध्ये "मुकनायक साप्ताहिक "सुरु केले त्या साप्ताहिकांची ब्रीदवाक्य हे संत तुकारामाच्या गाथेमध्ये खालील प्रमाणे आहे.

"काय करू आता धरूनिया भीड! नि:शंक हे तोंड वाजविले,
नव्हे जगी कोणी मुकियाचा जाण, सार्थक लाजोनी नव्हे हित!

संत तुकाराम-2

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित व पददलितांना ही आपली वाणी व लेखणी आयुष्यभर वांचीत घटकासाठी वापरली. "शिका संघर्ष करा व सत्ताधारी व्हा" असे आव्हान त्यांनी आपल्या समाज बांधवांना केले.न्याय व लढाईसाठी शिक्षण हे शस्त्राचे काम करते हे शस्त्र अन्याय साठी वापरायचे नाही ते आवर्जून सांगतात . "शिका, संघर्ष करा व संघटित व्हा" हा महाशब्द डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध समाजाला दिला . डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी गौतम बुद्ध ,संत कबीर आणि महात्मा फुले यांना गुरू मानले. स्वातंत्र्य ,समता ,बंधुत्व आणि सामाजिक न्याय या मुद्द्याचा पाठपुरावा आयुष्यभर केला.

महाविद्यालयीन शिक्षणासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महत्त्व जाणले मुंबई विद्यापीठात शिक्षणाचे महत्त्वाचे बदल व्हावेत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी खूप प्रयत्न केले.

परीक्षा पद्धती व शैक्षणिक दर्जा हे शिक्षणाचे वेगवेगळे भाग आहेत."कमवा आणि शिकवा "ही शिक्षण पद्धती अमलात आणली.पीपल्स एज्युकेशन सोसायटीची 1946ला स्थापना केली सिद्धार्थ कॉलेज मुंबई आणि मिलिंद

महाविद्यालय औरंगाबाद येथे खालच्या स्तरातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावं म्हणून धडपड केली त्याच बरोबर उद्धाटनप्रसंगी आंबेडकरांनी म्हणाले," शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचे कारखाने आहेत या कारखान्यात फोरमन जितका शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणारा" असे असे विचार व्यक्त केले.-३ शिक्षणाने उत्तम व जबाबदार नागरिक घडतो शिक्षणाने माणूस सशक्त होतो. प्रज्ञा, शील, करुणा हे गुण आत्मसात होतात त्यासाठी शिक्षणाची अत्यंत गरज आहे.असे त्यांचे स्पष्ट मत होते .

प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करतांना ते सांगतात,"मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत प्रवेश घेतला की त्यांचे किंवा तिचे शिक्षण लिहिता वाचण्याच्या अवस्थेपर्यंत राहू नये तर तो संपूर्णपणे शिक्षण सुशिक्षित होऊनच बाहेर पडावा व पुढील आयुष्यात ज्ञान घेतच रहावे"-4 असे ते ठणकावून सांगत .

डॉ. बाबासाहेबांच्या अनेक परिषदा, सभा, संमेलन, भाषणतून असे लक्षात येते स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे पहिले महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर" हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून, राज्यघटनेतून, स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करून स्त्री शिक्षणावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे भर दिला. मुंबई औरंगाबाद, पंढरपूर येथे शिक्षण संस्था, वसतिगृहाची स्थापना करून आपले स्त्री शिक्षण विषयक स्वप्न साध्य केले—5

मनुस्मृतीने स्त्रिया आणि शूद्रांना शिक्षण नाकारलेल्या समाजव्यवस्थेत प्रगती होण्यासाठी शिक्षण हे महत्वाचे साधन आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "माणसाचे उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हतबल होऊन अल्पायुषी होतो तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध झाल्याने तो दुसऱ्याचा गुलाम बनतो".6

समाजाला सुदृढ करण्यासाठी जरी अन्नाची गरज लागते तशी शिक्षणाची गरज आहे शिक्षण अभावी समाज बौद्धिक अपंगत्व होईल देशातील पन्नास टक्के स्त्रियांमधील दारिद्र्य, अंधश्रद्धा, कुपोषण, अशा समस्यांना सामोरे जावे लागते स्त्री शिक्षणामुळे असे संकटांना वाचविता येईल अन्यथा स्त्रिया समाजात भरडल्या जातील.

नागपूरच्या अखिल भारतीय दलित महिला परिषदेमध्येवीस ते पंचवीस हजार महिला एकत्रित आल्या होत्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आनंद झाला होता .स्त्री जागृती ची पहिली महिला पावती होती त्या वेळेला डॉ. बाबासाहेब म्हणतात, "एखाद्या समाजाला स्त्रियांच्या प्रगतीवर त्या समाजाची प्रगती चे मोजमाप करता येते"यावरून आपल्या समाजात आता महिला प्रगतीच्या मार्गावर आहे यात शंका नाही. "महिलांनी कसे वागावे, कसे राहावे ,स्वच्छता कशी पाळावी. सर्व दुर्गणापासून कसे दूर राहावे, मुलांना कशा पद्धतीने महत्वकांशी बनवावे, मुलांचे लग्न करण्याची घाई करू नका त्यांना स्वतःच्या पायावर उभे करा त्यांना स्वतःच्या पायावर उभे होण्याइतपत स्वावलंबी करा, पतीची सहचरणी बना व माझा सल्ला ध्यानात ठेवून वागला तर तुम्ही स्वतःची उन्नती करून , अस्पृश्य समाजाला प्रगतीच्या मार्गावर न्याल."---7

स्त्रियांबद्दल डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा व मूलभूत अधिकार मिळाला पाहिजे ,राज्यघटनेच्या संरक्षणमुळे ती आज सुरक्षित राहू शकते.शिक्षणामुळे ग्रामीण व शहरी भागातील स्त्रीयांना विचारांची व प्रगतीची संधी मिळत आहे. असे ते म्हणत .

**निष्कर्ष**:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक कार्यातून समाजव्यवस्था बदलल्याशिवाय राहणार नाही . शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाने माणसाला शहाणपण येतं शिक्षणामुळे समाज परिवर्तनाची गती

वाढते. सर्व स्तरातील स्त्रियांना शोषणातून मुक्ती मिळते. शोषणातून मुक्त झाल्यास स्त्रिया सशक्त व सुदृढ बनतील व समाजाचा सुदृढ विकास बनेल.स्त्री आणि पुरुष समान आहेत शिक्षणामुळे स्त्रियांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारेल. वेगवेगळया सभा, संमेलनातून स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. बहुजन वंचित घटकासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तेवत ठेवलेले ज्ञानज्योत हे सतत मार्गदर्शन करीत राहील.

### संदर्भसूची

**1)** डॉ.वाघमारे जनार्धन (2017) "राष्ट्रनायक "डॉ. बाबासाहेब आंबेडकर,लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद पृष्ठ क्र.86.

2) कित्ता पृ. क्र.94

3) Souvernier B.R.college PBN (2016)Dr Babasaheb Ambedkar contribution for Empowerment of deprived classes New man publication Parbhani p.205.

4) Souvernier B.R.college PBN (2016) Dr Babasaheb Ambedkar contribution for empowerment of depremted classes new man publication Parbhani p.206.

5) souvenir BR college PBN (2016) historiography and changing trends Jyoti Chandra publication Latur p 67.

6) प्रा.जाधव सुशीला(2005)डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री कौशल्य प्रकाशन औरंगाबाद पृ.क्रमांक 67

7) लिंबाळे शरणकुमार(2012) प्रज्ञासूर्य ,कोल्हापूर प्रकाशनकोल्हापूर पृ.क्र. 217.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार

**प्रा. डॉ. बळीराम पवार**

समाजशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा फुले महविद्यालय, किनगाव

**प्रस्तावना :-**

सामाजिक प्रबोधनाच्या क्षेत्रात कार्य करणा-या व्यक्तीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव सर्वप्रथम घेतले जाते. उपेक्षित जीवन जगणा-या दलित बांधवांना स्वतंत्र जीवन जगण्याचा हक्क देऊन त्यांना अन्यायाला विरोध करण्यासाठी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र देऊन समानतेचा हक्क मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी खर्च केले भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय निर्माण करण्यासाठी त्यांनी जाती निर्मूलन वर्णव्यवस्थेला विरोध केला व दलित समाजाच्या उत्थानासाठी संघर्ष केला.

बाबासाहेबांनी आपल्या समाजाची जी अवस्था आहे त्याविरुध्द लढून आपले मानवी हक्क कसे प्राप्त करता येतील यादृष्टीने सतत चिंतन व मनन केले. माणूस म्हणून समाजात आम्हालाही योग्य स्थान मिळाले पाहिजे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्याची सुरूवात त्यांनी चवदार तळयाचा संग्राम घडवून माणुसकीच्या हक्काची मुहूर्तमेठ रोवली तसेच काळाराम मंदिर प्रवेश घडवून आणला व संविधानाच्या माध्यमातून सर्व मानव जातीचे कल्याण केले आहे. हे दिसून येते व आधुनिक भारताच्या इतिहासात थोर पुरूष म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ओळखले जातात.

**1) अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जन्म अस्पृश्य घरात झाल्यामुळे त्यांना बालपणापासूनच त्यांना अस्पृश्य वागणूकीचे चटके बसले होते. डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण घेतल्यानंतर आपले जीवन समाजकार्याला वाहून घेण्याचे ठरवले व हजारो वर्षापासून ज्या मनुस्मृतीने माणसाला माणूसम्हणून नाकारले होते त्या मनुस्मृतीचे जाहीर दहन करुन मानवतेचा पुरस्कार केला. माणसाला माणूसम्हणूनवागणुक मिळावी यासाठी डॉ. बाबासाहेबांनी महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह केला तसेच काळाराम मंदिर प्रवेश करण्याचा सत्याग्रह करुन स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय समाताधिष्टीत समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता हा हिंदू धर्माला लागलेला कलंक आहे. त्यांच्या मते अस्पृश्यतता ही भावना हिंदूच्या मनामध्य भिनली आहे म्हणून त्यांचे मतपरिवर्तन करण्यासाठी विविध मार्गाने प्रयत्न केलेत्याचा परिणाम म्हणून अस्पृश्यता नष्ट करण्यात आंबेडकरांना काही प्रमाणात यश प्राप्त झाले.

**2) जातीव्यवस्था निमुर्लनाचे कार्य :-**

जातीव्यवस्थेच्या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात व्यक्तीला जन्मने जात मिळते त्याला कोणत्या जातीत जन्माला यायचे हे त्याच्या हातात असत नाही. पण त्याच्या जातीपेक्षा त्याच्या कार्याला महत्त्व दिले जावे असे असे डॉ. बाबासाहेब म्हणतात, जाती ही मानवाने निर्माण केली असून ती मानवाच्या विकासाला मारक आहे. म्हणून तीचे निर्मूलन केले पाहिजे त्यासाठी जातीजातीमध्ये निर्माण झालेली उतरंड मोडण्याचा प्रयत्न केला आहे. जातीव्यवस्थेमुळे जाती जातीत माणसे विभागून भांडणे, कलह वाढतो. श्रेष्ठकनिष्ठ वाद निर्माण होतो. म्हणून जाती व्यवस्थेकडे बुध्दी प्रामाण्यवादी दृष्टीकोणातून बघितले पाहिजे व त्याच्या जातीवर दर्जा किंवा काम न देता त्यांच्या आवडीनुसार त्याला समान संधी दिली पाहिजे. तसेच स्त्री व पुरूष हया दोनच जाती त्यांनी मानल्या तसेच त्यांनी जाती निर्मूलनासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले आहे. त्यानी वर्णापेक्षा त्याच्या कार्याला महत्त्व दिले पाहिजे, अशी त्यांची ठाम भूमिका मांडली आहे.

जातीची उतरंड ही देशाच्या प्रगतीला बाधा निर्माण करते म्हणून जातीविरहीत समाज निर्माण व्हावा व माणूसम्हणूनत्याला स्थान प्राप्त व्हावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्थेच्या विरोधात बंड केले. भारतीय समाजाचा विचार केल्यानंतर असे लक्षात येते की, जातीमुळे उच्चविद्याविभूषित राहून सुध्दा त्यांना

जातीयतेचे चटके सहन करावे लागले आहेत. तर समाजाचे काय म्हणून ते म्हणतात, माणसाला माणूसम्हणूनजगता आले पाहिजे त्यासाठी जाती निर्मूलनविषयक कार्य केले आहे हे आपणास विसरता येत नाही.

**3) स्त्रियांसाठी कार्य :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे समर्थक होते. कोणत्याही समाजाचा विकास करायचा असेल तर स्त्रीयांना शिक्षित केले पाहिजे. स्त्रीयांची आर्थिक विकास झाला पाहिजे. डॉ. बाबासाहेबांनी 1947 मध्ये कायदेमंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव लोकसभेत मांडला. कामगार किंवा नोकरी करणा-या स्त्रीला पुरुषा इतका पगार मिळाला पाहिजे तसेच स्त्रियांना प्रसूती रजा मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील पहिले व्यक्ती आहेत.

**4) धर्मसुधारणा विषयक कार्य :-**

हिंदूधर्म हा समानता निर्मण करण्यास असमर्थ आहे व तसेच माणसाला माणूसम्हणूनवागणूक देत नाही. दलितांचे शोषण करतो अशा व्यवस्थेला व धर्माला चिटकून राहण्यापेक्षा ही व्यवस्थेला सोडणे, जन्म कोणत्या जातीत, धर्मात घ्यायचा हे व्यक्तीच्या हातात नसते परंतू कोणत्या धर्मात मरायचे त्याच्या हातात असते म्हणून त्यानी नाशिक जिल्हयातील येवले तालुक्यात 13 आक्टोबर 1935 रोजी परिषदमध्ये घोषणा केली की, मी हिंदू म्हणुन जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी भिमगर्जना केली. मानवाच्या मुक्तीसाठी बौध्द धर्माचा स्वीकार अनेक अनुयायासोबत 1956 रोजी नागपूर येथे धर्मांतर केले. बौध्द हा भारतातील प्राचीन धर्म तर आहेच सोबतच तो भारतीय भूमित जन्माला येऊन रुजला व जगात या धर्माने शांतता, समता, न्याय प्रस्थापित करण्याचे काम केले म्हणून डॉ. बाबासाहेबांनी बौध्द धर्माचा स्वीकार करुन धर्मसुधारणा विषयक कार्य केले आहे.

**सारांश :-**

भारतातील मानव मुक्तीच्या चळवळीचे दुसरे नाव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. सामाजिक विचारांचा वरुन असे दिसून येते की, तत्कालीन समाज व्यवस्था ही जटील आणि माणसाला हजारो वर्षापासून गुलामगिरीच्या बेडीत आडवणारी होती. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हजारो वर्षापासून मूक बनलेल्या समाजाचे परिवर्तन करुन या मुक समाजाचे नायक झाले म्हणून वामन दादा कर्डक म्हणतात.

**उध्दारली कोटी कुळे**
**भिमा तुझ्या जन्मामुळे**

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो लोकांच्या जीवनात समताधिष्टित प्रकाश आणला हे विसरता येत नाही म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोटी कोटी प्रणाम.

**संदर्भग्रंथ :-**


१) 'भारतातील सामाजिक चळवळीची रूपरेषा' लेखक - प्रा. सी.टी. कांबळे , प्रा. टी.एस. पवळे प्रकाशन - क्रिएटीव्ह पब्लिकेशन नांदेड

२) डॉ. आंबेडकर शांततामय सामाजिक क्रांतीचे प्रणेते लेखक –अॅड.राम खोब्रागडे प्रकाशन – सुगावा प्रकाशन पुणे 30

३) फुले- आंबेडकरी चळवळ : विचार आणि भुमिका संपादक - डॉ. मनोहर सिरसाट, प्रा. शरद सदाफुले, प्रा. शाम कुंड, प्रा. बाबु वादे प्रकाशन – चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

4) डॉ. आंबेडकर आणि स्त्री मुक्ती लेखक – प्रा. प्रतिमा परदेशी प्रकाशन – दिग्नाग प्रकाशन पुणे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

**आदित्य देविदास ससाणे**
**संशोधक विद्यार्थी**
**महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर**

**प्रस्तावना :-**

माणसामध्ये बीजरुपाने विविध क्षमता व शक्ती दडलेल्या असतात. त्यांचा विकास करण्याच्या प्रक्रियेला शिक्षण म्हणता येते. शिक्षण हे समाज परिवर्तणाचे हत्यार आहे त्याचा योग्य उपयोग झाला पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. शिक्षणातुन ज्ञान प्राप्त होते आणि मुल्यांचे संवर्धनही होते. जो समाज अशिक्षीत असतो तो शिक्षणाअभावी सर्वस्व गमावलेला असतो. शिक्षणाला कौशल्याचीही जोड देणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षण घेणारा प्रत्येक व्यक्ती हा स्वावलंबी बनतो त्याला कर्तव्य आणि हक्काची जाणीव होते, चांगल्या, वाईट, गोष्टी कळायला लागतात. शिक्षणाने माणसाच्या बुध्दीच्या कक्षा रुंदावतात. शिक्षणप्रक्रियेत ज्ञान, मुल्ये आणि कौशल्ये हे तीन घटक असलेच पाहिजेत. जर व्यक्तीचा ख-या अर्थाने व्यक्तिमत्वाचा विकास कुठून होत असेल तर शिक्षण होय. महात्मा ज्योतीराव फुले म्हणतात 'इतके अनर्थ एका अविद्येने केले' म्हणजे अशिक्षित व्यक्ती हा भरकटलेल्या प्राण्यासारखा असतो, कारण त्याला स्वत:ची दिशा माहिती नसते, चांगल्या किंवा वाईट गोष्टीचा फरक समजत नसतो, समाजात त्याची निंदा होत असते, अशिक्षित व्यक्ती पाय असून लंगडे असतात. म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, **"शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही"**शिक्षणाने व्यक्ती बुध्दीपासून परिपक्व होतो तो स्वावलंबी होतो, स्वत:च अस्तित्व निर्माण करतो, मन,मनगट, मस्तिष्काचा विकास होतो, माणसांमध्ये दुस-याच्या प्रती आदर होतो, शिक्षणाने एक आदर्श व्यक्ति तयार होतो, शिक्षणाने उदयाच भविष्य निर्माण होत. जर आपल्याला अन्याय विरुध्द लढायच असेल तर शिक्षणाचे हत्यार आपल्या हाती असावे लागते.

आज पाहिलं तर कोरोनासारख्या महामारीत अनेक लहान लहान विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले पहावयास मिळते. आजचे लहान आणि तरुण तरुणी इंटरनेट सारख्या महाजाळयात अडकलेले दिसत आहे. कोरोनाच्या महामारी दरम्यान याचे प्रमाण अधिक दिसून येते. या महामारीच्या दोन वर्षात अभ्यास कसा असतो हे विसरताना दिसते. लहान मुलांचे प्राथमिक शिक्षण घरीच झाले. बाबासाहेबांच्या मते प्राथमिक शिक्षण हे शिक्षणाचा मुळ पाया आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला स्वत:च्या जीवनात तर महत्व दिले, परंतु उपेक्षित, वंचित, कामगार, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, पीडित, आदिवासी, घाम गाळणारे अशा सर्व लोकांनी आपल्या मुलांना शिक्षण दिलेच पाहिजे तरच ख-या अर्थाने या देशाचे भविष्य उज्वल होईल. असे ठामपणाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात.

**शिक्षणाचे उद्देश :-**

1) शिक्षण व्यक्तिला माणुस बनवते.

2) मेंदु, मनगट आणि मस्तिष्काचा विकास होतो.

3) चांगल्या गोष्टी, वाईट गोष्टी कळायला लागतात.

4) माणसात स्वाभीमान निर्माण होतो.

5) स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव निर्माण होते.

6) व्यक्तिमत्वाचा विकास घडवून येतो.

7) वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होतो.

8) शिक्षणाने गुणवंत, शीलवंत, बुध्दीवंत माणूस तयार होतो.

**शोध निबंधाचा हेतू :-**

आज कोरोना सारख्या महागाईसारख्या अशा विविध कारनांना पुढे घेऊन अप्रत्यक्ष रुपाने शिक्षणावर एक प्रकारे घाव घातले जात आहेत. 'घरी रहा सुरक्षीत रहा' असे स्लोगन तयार करुन लहान मुले घरीच रहात आहेत. त्यामुळे येणा-या काळात नक्कीच या अज्ञानाच्या पिढया गंभीर समस्यांना आव्हान देतील. त्यांना या जगाच्या स्पर्धेत टिकणे नक्कीच अवघड होईल यात शंका नाही. कारण शाळेपासून/ शिक्षणापासुन वंचीत असणारी मुले बहुप्रमाणात बहुजन समाजातील आहेत. नौकरदार, उदयोजक, धन दांडग्यांची मुले ऑनलाईन पध्दतीने खाजगी शिकवणीने पैसा देऊन शिक्षण घेत आहेत. यांच्या बरोबरीने येणा-या भविष्य काळात मात्र गोर-गरिबांची शेतकरी, शेतमजुरांची, कामगारांची, कष्टक-याची, श्रमीकांची मुले मात्र बॅकफूटच राहतील. तेंव्हा या समाजातील पालकांनी जागरुक होणे काळाची गरज आहे, महामारीच्या नावाखाली बहुजन समाजातील मुलांना आडानीठेवण्याचा प्रयत्न ही केला जातो की काय? असा वैचारिक लोकांकडून सुर पुढे येत आहे. याचा अर्थ शिक्षणाचे बाजारीकरणमोठया प्रमाणात होत आहे. हे जर थांबवायचे असेल तर पुन्हा एकदा फुले-शाहू-आंबेडकरांचा शैक्षणिक वारसा गतिमान करणे गरजेचे आहे. हेच या शोधनिबंधाचा खरा उद्देश आहे.

**उदाहरणार्थ :-**

1) शिक्षण हाच मानव प्रगतीचा पाया आहे हे जाणुन घेणे.

2) शिकलेला समाज लोकशाही बळकट करु शकतो हे जाणून घेणे.

3) शिकलेल्या समाजाचीच प्रगती झपाटयाने होते. हे लक्षात आणून देणे.

**संशोधन पध्दती :-**

सदरील शोध निबंध लिहत असताना द्वितीयक सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यात प्रामुख्याने पुस्तके, संदर्भ, ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट अशा साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधनाचे गृहितके :-**

1) माणसाच्या सर्व प्रश्नांचे मुळ त्यांच्या अज्ञानात असते.

2) शिक्षण माणसाची शोषणातुन मुक्तता करते.

3) शिक्षण हेच सर्वांगीण प्रगतीचे मुळ स्त्रोत आहे.

4) शिक्षणातुन ख-या अर्थाने मानवतावाद निर्माण होतो.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार :-**

शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीला माणूस बनवणारी प्रक्रिया आहे, शिक्षणामुळे व्यक्ती सदाचारी बनतो, नैतिक मुल्यांची जोपासना करतो त्यामुळे व्यक्तीचे मन, मस्तिष्क आणि मनगट बळकट होते. व्यक्ति हा अत्त दिप भवचा मार्गाने वाटचाल करु लागतो तो स्वावलंबी होतो. जन माणसात पद प्रतिष्ठा प्राप्त होते. त्यामुळे शिक्षण हा माणसाच्या जडणघडणीचा पाया आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे ज्ञान मिळवले होते. त्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी स्वत:साठी कधीच केला नाही या उलट त्यांनी शिक्षणातून मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठीच नव्हे तर संपुर्ण राष्ट्राच्या कल्याणासाठी केला. शैक्षणिक विचार मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थ्यांना उद्देशून असे म्हणतात, विद्यार्थ्यांनो जागृत व्हा! ज्याप्रमाणे माणसाला जगण्यासाठी अन्नाची गरज असते, त्याचप्रमाणे माणसाला माणुस म्हणुन जगण्यासाठी ज्ञानाची गरज असते. आपल्या बुध्दीचा प्रभाव पाडल्याशिवाय शिक्षणाचे ख-या अर्थाने चिज

होत नाही. कोणताही सामान्य माणूस सततच्या दिर्घ उदयोगाने, वाचनाने, ज्ञानार्जनाने, पराक्रमाने बुध्दीमान होतो. म्हणुन विद्यार्थ्यांनो धनवान होण्यापेक्षा, गुणवान, बुध्दीमान व्हा, शीलवान बना, तेंव्हाच ख-या अर्थाने राष्ट्राचा विकास होईल.

शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना ते तळमळीने सांगत असत. 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हा मुलमंत्र देऊन विद्यार्थ्यांना सदैव जागृत करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थांना वेळोवेळी ज्ञान संपादन केले पाहिजे. वाईट परिस्थितीत कधीच डगमगु नये. समाजाला माणुस म्हणुन जगण्याचा अधिकार प्राप्त करुन दयायचा असेल तर या समाजात शिक्षणाचं बीज पेरणं गरजेच आहे. कारण शिक्षण घेतल्यानंतर माणूस विचार करायला लागतो. त्याला त्याच्या हक्काची जाणीव होते. तो स्वातंत्र्यपणे आपला व आपल्या समाजाच्या न्याय हक्कासाठी लढू शकतो. जर समाजातील उच-निच ही दरी कमी करायची असेल तर शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे. **"शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही."**प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकांच्या, अंगी आणण्यासाठी शिक्षणाचीगरज त्यांनी प्रतिपादन केली आहे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहे असे ते म्हणत.

**प्राथमिक शिक्षण –**

केवळ बाराखडया शिकविणे म्हणजेच शिक्षण नव्हे तर मुलांची मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षण शाळांनी दिले पाहिजे इतका सुक्ष्म विचार बाबासाहेबांनी प्राथमिक शिक्षणावर केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा राष्ट्रीयदृष्टया अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.

इ.स. 1923 मध्ये केंद्र शासनाच्या प्राथमिक शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थाकडे हस्तांतर करण्याच्या निर्णयाला आंबेडकरांनी कडाडून विरोध केला होता. त्यांचे म्हणणे असे होते की, शिक्षण देणे केंद्राचे जबाबदारी असून आपली जबाबदारी दुस-यावर लादणे चुकीचे आहे. म्हणुनच शिक्षण स्वस्त करण्याबरोबरच शासनाने शिक्षणावर अधिक भर दयावा. प्राथमिक शिक्षणाच्या वाढीसाठी अनुसुचित मुलांसाठी तर काही रक्कम त्यातील प्रगत मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याचे सुचवले होते. केंद्र व प्रांतीक सरकारांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात पुरेसा निधी राखीव ठेवण्याचे बंधन घालावे अशी त्यांनी मागणी केली होती.

**उच्च शिक्षणाविषयक विचार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उच्च शिक्षणावर अधिक भर होता. सरकारी नोकरीत संधी मिळवण्यासाठी उच्च शिक्षण घेतले पाहिजे. मागास समाजाला त्यांच्या अधिकाराची जाणीव होण्यासाठी शिक्षण महत्वाचे साधन आहे. उच्च शिक्षणाचे स्वायत्ततेच्या नावाखाली संपुर्ण खाजगीकरण करण्याचा घाट शासनाने घातला आहे. शिक्षणाने उदयाच भविष्य निर्माण करण्याचं साधन आहे, परंतु याकडे व्यापारीकरणाच्या दृष्टीकोनातुन पाहिले जाते. या ब्रिटीश शासनाच्या व्यापारीकरणाच्या व खाजगीकरणाच्या धोरणाची आंबेडकरांनी कठोर टिका केली आहे. बाबासाहेबांच्या मते उच्चस्तरीय शिक्षण लोकांना सामाजिक आणि कौटुंबिक आदर ठेवण्यास आणि शिक्षणाचा काळ हा सामाजिक आणि वैयक्तिकरित्या सर्वांसाठी महत्वाचा काळ आहे. हे एखादया व्यक्तिला जीवनात विकसित करते. बाबासाहेबांनी एका सभेत असे म्हटले होते की, **"सर्व समाजिक दुखण्यावर उच्चशिक्षण हेच एकमेव औषध आहे."**

शैक्षणिक क्रांतीनेच या देशात लोकशाही नांदु शकेल, असे बाबासाहेबांना वाटत होते. म्हणुन त्यांनी प्रतिकुल परिस्थितीत आर्थिक अडचणींवर मात करीत 8 जुलै 1945 साली पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करुन दलित, शोषित, पिडीत, मागास घटकांसाठी आणि समाजात, देशात लोकशाही मुल्य रुजविण्यासाठी उच्च शिक्षणाची दालने उघडली. 'एक मुलगा बी.ए. झाल्यास आपल्या समाजाचा जो फायदा होईल तसा एक हजार मुले चौथी शिकलीत तरी होणार नाही.' त्यांनी मुंबई येथे सिध्दार्थ कला व विज्ञान महाविद्यालय सुरू केले. तसेच

मराठवाडयासारख्या मागास भागात नागसेन वनात मिलिंद महाविद्यालय सुरू केले. हे महाविद्यालय सुरू करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हेतु उदात्त होता.

आंबेडकरांच्या उच्च शैक्षणिक धोरणात राष्ट्रीय आणि मानवी मुल्यांच्या विकासाची माणुसकेंद्री भुमिका दिसते. महाविद्यालयात शिकविणा-या प्राध्यापकांच्या नजरेस पडणार नाहीत, अशा ठिकाणी वर्गाबाहेर थांबुन प्राध्यापक योग्य प्रकारे शिकवत आहेत की नाहीत? याची चाचपणी ते घेत असत. एखादा प्राध्यापक चुकीची माहिती देत असल्यास वर्गात शिरुन विद्यार्थ्यांना त्या विषयाची सखोल माहिती देत असत. विद्यार्थी दशेतील तरुणांनी केवळ अभ्यासावरच आपले कक्ष केंद्रीत करावे, असे बाबासाहेबांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ‘‘उच्च शिक्षण घेऊन स्वत:चे आर्थिक आणि सर्व प्रकारची प्रगती तर कराच पण त्याबरोबरच समाजाच्या आणि सामान्यांच्या उन्नतीसाठी पण काहीतरी करा.’’ आपल्या देशामध्ये समाजाला विषमतेचा जो आजार झाला आहे, तो केवळ शिक्षणामुळेच बरा होऊ शकतो. आजतागायत जगात ज्या क्रांत्या घडुन आल्यात त्या केवळ शिक्षणामुळेच झाल्या. म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण हेच परिवर्तनाचे माध्यम आहे हे जाणले.

सरकारने शैक्षणिक कार्य मोठया प्रमाणात वाढवावे तसेच सर्वाधिक मागासलेल्या वर्गांना प्रथम सवलती देऊन समान पातळीवर आणावे, अशी सुचना त्यांनी केली आहे. तसेच सरकारने शिक्षणाचे कर्तव्य केले पाहिजे कारण मागासलेल्या वर्गामध्ये शैक्षणिक परंपरा नाही. केवळ ब्राह्मण वर्गाला शिक्षणाची परंपरा आहे शिवाय मागासलेल्या वर्गांना शैक्षणिक खर्च झेपवत नाही. असे बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाविषयक धोरणांची आजच्या पिढीला दिशादर्शक ठरतील अशी काही तत्त्वे सांगतात. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली असली पाहिजेत. उच्च शिक्षण घेण्यासाठी विशेष सोयी व सवलती यांच्या योजना असाव्यात. कामगार, कष्टकरी व मजुर लोकांसाठी रात्र शाळा उपयुकत ठरतील. अभ्यासक्रमांमध्ये कौशल्य विकसन व तंत्रशिक्षण यांचा अंतर्भाव असावा. चारित्र्य संवर्धनासाठी शैक्षणिक उपक्रम अंमलात आणले पाहिजेत. यासाठी त्यांनी आयुष्यभर काम केले त्यासाठी त्यांनी घटनेमध्ये विविध तरतुदींचा अंतर्भाव केला. आज भारतामध्ये समस्त भारतीय समाजाला शिक्षणाची समसमान संधी उपलब्ध झाली आहे. समाजातील प्रत्येक घटक आपापल्या परीने प्रगती करीत आहे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नव्या शैक्षणिक धोरणांचे व विचारांचेच फलित होय. हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही.

**संदर्भग्रंथ –**


1) डॉ. आंबेडकर शांततामय सामाजिक क्रांतीचे प्रणेते लेखक –ॲड.राम खोब्रागडे प्रकाशन – सुगावा प्रकाशन पुणे 30

2) डॉ. आंबेडकर आणि स्त्री मुक्ती लेखक – प्रा. प्रतिमा परदेशी प्रकाशन – दिग्नाग प्रकाशन पुणे

3) बहुजनांचे महानायक लेखक – प्रा. गौतम निकम प्रकाशन – विमल कीर्ती प्रकाशन, चाळीसगाव

4) भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित आंबेडकरी दृष्टीकोन लेखक – भालचंद्र मुनगीकरप्रकाशन – सुगावा प्रकाशन, पुणे

5) महात्मा फुले,राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक वैचारिक प्रवास लेखक –ॲड.हरिभाऊ पगारे प्रकाशन – देशमुख पब्लिकेशन, नागपूर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

**आशा राठी (भराडिया)**
संशोधक विद्यार्थीनी

**प्रस्तावना :-**

हजारो वर्षापासून हिंदू धर्माच्या जाचक रुढी परंपरांनी बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवून त्यांच्यावर खूप मोठया प्रमाणावर अन्याय अत्याचार व एवढेच नव्हे तर पशुपेक्षाही जीवन जगणे अवघड झाले होते. अशा बहुजन समाजात डॉ. बाबासाहेबांचा जन्म झाला. बालपणापासून जातीयतेचे चटके सहन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्चविद्या विभूषित झाले तेंव्हा समाजाचे मागासलेपणा लक्षात आला हे सर्व आधोगती शिक्षणाने झाली आहे. या मागासलेल्या समाजाला या जातीच्या उतरंडीतून बाहेर काढायचे असेल तर शिक्षण हे प्रभावी हत्यार आहे. त्याशिवाय समाजाचे परिवर्तन शक्य नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब यांनी महात्मा फुलेंना गुरू मानलं आणि त्यांच्या विचारावर पाऊल ठेवून शिक्षण हे सर्व जातीच्या स्तरापर्यंत पोहचले पाहिजे यासाठी संविधानात सर्व समान शिक्षण घेण्याचा हक्क दिला म्हणून म्हणतात,

**कुणाचा जन्म कुणाला काय देवून गेला**
**डॉ. बाबासाहेबांचा जन्म सर्वांना न्याय देवून गेला.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला अतिशय महत्वाचे स्थान दिले. शिक्षणातून व्यक्तीला संस्कारमय बनवण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. त्यांचे शैक्षणिक विचार अधिक समजण्यासाठी खालील मुदयाचा विचार समजून घ्यावे लागते.

**1) प्राथमिक शिक्षणासंबंधी विचार :-**

प्राथमिक शिक्षण हे व्यक्तीच्या जीवनाचा पहिला पाया आहे. समजून प्राथमिक शिक्षण अधिक होण्यासाठी संविधानात प्राथमिक शिक्षणाचा हक्क दिला आहे. तसेच त्यावर विशिष्ट निधी खर्च व्हायला हवा हे विचार त्यांनी स्पष्ट केला आहे. शिक्षण देणे ही केंद्रसरकारची जबाबदारी स्पष्ट केले. सर्व जाती धर्मातील मुलांना शिक्षणाची दरवाजे खुले केले आहेत. त्यामुळे आज आपणाला शिक्षण सार्वत्रिक झाल्याचे दिसते. त्याचे पूर्ण श्रेय आंबेडकरांना जाते.

**2) उच्च शिक्षणाविषयी विचार :-**

मागासलेल्या व्यक्तीचा विकास करायचा असेल तर उच्च शिक्षण घेवून उच्च प्रतीच्या नौक-या मिळवल्या पाहिजेत व समाजाच्या सर्वांगीन विकास घडवून आणला आहे. त्यासाठी शिष्यवृत्तीची तरतुद त्यांनी केली आहे. तसेच उच्च शिक्षण घेतलेली व्यक्ती समाजातील लोकांनामध्ये परिवर्तन घडवून आणतील त्यामुळे त्यांनी उच्च शिक्षणाला अधिक महत्व विशद केले आहे.

**3) स्त्री शिक्षणा विषयी विचार :-**

समाजरुपी रथाचे दोन चाके म्हणजे एक स्त्री व एक पुरूष, एक पुरूष शिकला तर एकटा शिकेल, एक स्त्री शिकली तर दोन कुटूंब साक्षर होतील त्या अनुषंगाने त्यांनी स्त्री शिक्षणाला महत्त्वाचे स्थान देऊन सर्वच क्षेत्रातील नौक-यामध्ये स्त्रीयांना स्थान दिले आहे.

स्त्री शिक्षणाला अधिक बळकटी देण्यासाठी त्यांनी संविधानामध्ये स्त्री शिक्षणाला महत्त्व दिले आहे व स्त्रियांना काम करताना अडचणी येवू नये यासाठी त्यांनी पुरूषा एवढे कामाचे तास व पुरूषा एवढे वेतन त्यांनी समान वेतन ठेवले आहे. स्त्री शिक्षणामुळे आपल्याला आजच्या स्थितीत सरपंच पदापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत स्त्रिया पोहचत आहेत व स्त्रियांना दुबळे मानू नये आंबेडकर यांनी स्पष्ट करून स्त्रियांना शिक्षणात महत्वाचे स्थान प्राप्त करुन दिले आहे.

**सारांश :-**

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मागासलेल्या जातीसाठी शिक्षणाचे महत्त्वाचे साधन दिले असून वर्णापेक्षा त्यांच्या कृतृत्वाला महत्वाचे स्थान प्राप्त करुन समाज परिवर्तनामध्ये शिक्षण हे महत्त्वाचे हत्यार आहे. म्हणून त्यांनी भारतीय संविधानात त्यांनी शिक्षणाची तरतूद करुन मागासलेल्या लोकांचे आयुष्य बदलून टाकून समाजात नवचैतन्य निर्माण केले आहे.

**संदर्भग्रंथ :-**


४) फुले- आंबेडकरी चळवळ : विचार आणि भुमिका संपादक - डॉ. मनोहर सिरसाट, प्रा. शरद सदाफुले, प्रा. शाम कुंड, प्रा. बाबु वादे प्रकाशन – चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

५) डॉ. आंबेडकर शांततामय सामाजिक क्रांतीचे प्रणेते लेखक –ॲड.राम खोब्रागडे प्रकाशन – सुगावा प्रकाशन पुणे 30

३) डॉ. आंबेडकर आणि स्त्री मुक्ती लेखक – प्रा. प्रतिमा परदेशी प्रकाशन – दिग्नाग प्रकाशन पुणे

४) 'भारतातील सामाजिक चळवळीची रूपरेषा' लेखक - प्रा. सी.टी. कांबळे , प्रा. टी.एस. पवळे प्रकाशन - क्रिएटीव्ह पब्लिकेशन नांदेड

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार

**संशोधक विद्यार्थी,**

**पल्लवी प्रकाश कांबळे**

**प्रकाश शितराम कांबळे**

**प्रस्तावना :-**

हजारो वर्षापासून गुलामगिरीच्या बेडयात आडकलेल्या पंगू अचेतन मूक आणि प्रतिकार शून्य बनलेल्या समाजाचे परिवर्तन करायचे असेल तर शिक्षणाशिवाय प्रभावी हत्यार नाही. म्हणून शिक्षणाचा योग्य उपयोग झाला पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत असे शिक्षण हे समाजाच्या सर्वच स्तरापर्यंत पोहचले पाहिजे आणि शिक्षणापासून वंचित कोणी राहू नये यासाठी शिक्षणाचे महत्त्व विशद करताना म्हणतात. 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.

शिक्षणामुळे माणसाला जगण्याची उमेद मिळते त्याच्या मनामध्ये असणारा अंधकार दूर करण्याचे सामर्थ शिक्षणातून मिळते शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी हत्यार आहे. शिक्षणामुळे माणूस सुसंस्कारिक होतो. त्याला चांगले काय, वाईट काय हे समजत शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येकाने शिक्षण घेणे गरजेचे आहे व प्रत्येकांच्या घरामध्ये पुस्तकाचं कपाट असले पाहिजे या संदर्भात म्हणतात "ज्याच्या घरात नाही पुस्तकाच कपाट त्याच घर होईल भुईसपाट" म्हणजेच प्रत्येकाला शिक्षण आवश्यक आहे हे शिक्षण माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवते. ज्या पध्दतीने पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची गरज लागते त्याच पध्दतीने बुध्दीची भूक भागवण्यासाठी शिक्षणाची गरज लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर ज्ञानसाधना केली व आयुष्यभर शिकत राहिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन उफाळलेल्या महासागरासारखे होते. बालपणापासुनच जातियतेचे चटके, कष्टमयता, दु:ख दारिद्रय सहन करावे लागले पण डॉ. बाबासाहेबांनी परिस्थितीवर स्वार होवून त्यांनी ज्ञानामृत घेतले आणि विद्वतेच्या जोरावर त्यानी अभ्यासपूर्ण ग्रंथ, लेख आणि भारतीय संविधान लिहिले म्हणुनच त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणतात. त्यांनी संविधानात समता प्रस्तापित होईल असे त्यांनी सर्वात मोठी न्यायपूर्वक राज्यघटना लिहिली. आणि संविधानात शिक्षण विषयक हक्क व तरतुदी केल्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वच लोकांना संदेश दिला की, 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे शिक्षणाशिवाय दुसरा तरणोपाय नाही. कारण जो व्यक्ती शिक्षण घेतो तो आपल मस्तक दुस-याच हस्तक होत नाही. त्यामुळे त्यांनी शिक्षण हे प्रभावी हत्यार मानलं आहे. आणि मागासलेल्या समाजाला शिक्षण घेता यावे म्हणून त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन करुन त्यामार्फत शिक्षणाचा प्रचार प्रसार करण्याचे ठरवले. डॉ. बाबासाहेबांना सुसंस्कारीक शिक्षण अभिप्रेत होते. त्यांचा शिक्षणाविषयक दृष्टीकोण अधिक सजण्यासाठी खालील मुदयाद्वारे शिक्षण विषयक दृष्टीकोण समजून घेवू.

**पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील सर्वच स्तरापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे. यासाठी त्यांनी औरंगाबाद याठिकाणी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली तर मुंबई या ठिकाणी सिध्दार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. यामधून सुसंस्कारिक मुल्य. प्रज्ञा, शिल, करुणा या तत्त्वाची मूल्य पेरण्याचे काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला सतत शिकण्याची हाकाटी दिली. कारण शिक्षणामुळेच आपल्या जगण्यात आमुलाग्र बदल होऊ शकतो हे त्यांनी जाणले आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी शैक्षणिक संस्था काढून तळागळातील मुलामुलीपर्यंत शिक्षण देण्याचे काम त्यांनी केलं आहे, म्हणुनच आज आपणाला दलित समाजातील मुल शिक्षणामध्ये अग्रेसर दिसत आहेत. तसेच सर्वांना शिक्षण घेता यावे यासाठी शिष्यवृत्ती देऊ केली आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही समाजाचा विकास होऊ शकत नाही. म्हणूनत्यांनी शिक्षणाचा प्रचार प्रसार केला आहे.

**मुलां मुलीसाठी शिक्षण :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री पुरूष असा भेद करत नाहीत तर शिक्षणाच्या संदर्भात सर्व समान आहेत असे मानतात. मुला-मुलींना शिक्षण दयावे त्यांना परंपरागत कामात गुंतवू नका समाजाचा विकास करायचा असेल तर मुले-मुली शिकल्या पाहिजेत कोणत्याही एक गटाला शिक्षण देऊन सफल होणार नाही. तर मुले आणि मुली दोन्ही शिकले पाहिजे असा महत्त्वपुर्ण विचार मांडला असून संविधानात तशी तरतूद केलेली आहे.

**प्राथमिक शिक्षणाविषयक विचार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते प्राथमिक शिक्षणाचा प्रचार प्रसार झाला पाहिजे. राष्ट्रीयदृष्टया अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. प्राथमिक शिक्षण सर्वच स्तरापर्यंत पोहचले पाहिजे एवढेच नाही तर प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे असा कायदा करुन समाजातील सर्वच स्तरापर्यंत शिक्षणाचे बीज पेरले गेले पाहिजे. कारण हेच उदयाचे भावी नागरिक होणार आहेत. आदर्श चांगली पिढी निर्माण करायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे त्यांचे मत होते.

**उच्च शिक्षणाविषयक विचार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षणासंबंधीचे विचार अत्यंत महत्वाचे आहे. व्यक्तीने शिक्षण उच्च टोकाचे घेतले पाहिजे फक्त लिहण्या वाचण्याचे ज्ञान पुरेसे ठरणार नाही. दलित समाजाची उन्नती करायची असेल तर व्यक्तीने उच्च विद्याविभुषीत झाल पाहिजे खरे तर उच्च शिक्षण सामाजिक दु:खण्यावरचे औषध आहे असे ते म्हणतात.

**नैतिक शिक्षणविषयक विचार :-**

शिक्षण हे शस्त्र आहे हे शस्त्र चोरीला जावू शकत नाही. शिक्षण हे नैतिकतेचे शिक्षण दिले पाहिजे कारण यातुनच व्यक्ती शीलवान होते. चारित्र्यसंपन्न व्यक्ती शिक्षणातून घडले पाहिजे कारण वाईट गोष्टीपासून अलिप्त करायचे असेल तर विद्यार्थ्यांना शीलवान, चारित्र्य संपन्न शिक्षण दिले पाहिजे. त्याला नैतिकतेच शिक्षण देणे गरजेचे आहे. असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

**सारांश :-**

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षित लोकांना संविधानाच्या माध्यमातून शिक्षणाचा अधिकार देवून जाती व्यवस्थेला चीत केले व समताधिष्टीत समाजरचना निर्माण करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले म्हणून वामन दादा कर्डक असे म्हणतात.

**उध्दारली कोटी कोळी**
**भिमा तुझ्या जन्मामुळे**

युगानंयुगापासून शोषीत वंचित पिढीत समाजाला शिक्षणाचे पवित्र दालन खुले केले आणि आत्मसन्मानाने जगण्याचे बळ दिले आहे.

**संदर्भग्रंथ :-**


1. 'भारतातील सामाजिक चळवळीची रूपरेषा' लेखक - प्रा. सी.टी. कांबळे , प्रा. टी.एस. पवळे प्रकाशन - क्रिएटीव्ह पब्लिकेशन नांदेड
2. फुले- आंबेडकरी चळवळ : विचार आणि भुमिका संपादक - डॉ. मनोहर सिरसाट, प्रा. शरद सदाफुले, प्रा. शाम कुंड, प्रा. बाबु वादे प्रकाशन – चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद
3. डॉ. आंबेडकर आणि स्त्री मुक्ती लेखक – प्रा. प्रतिमा परदेशी प्रकाशन – दिग्नाग प्रकाशन पुणे
4. डॉ. आंबेडकर शांततामय सामाजिक क्रांतीचे प्रणेते लेखक –ॲड.राम खोब्रागडे प्रकाशन – सुगावा प्रकाशन पुणे 30

# "युगपूरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर"

**प्रा. डॉ. सतीष गंगाराम ससाणे**

समाजषास्त्र विभागप्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर ता. अहमदपूरजि. लातूर

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात भाष्य करताना एक कवी म्हणतो, "हे खरच आहे खर भिमराव रामजी आंबेडकर, बाबासाहेब आंबेडकर नाव हे गाजतय हो जगभर"

या ओळीतून आपणास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची गरुड झेप संपुर्ण जगभर पसरलेली आहे. हेच पुन्हा एकदा सिध्द होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यक्षेत्रांचा विचार केला तर आपल्या डोक्यात ज्याप्रमाणे असंख्य केस आहेत त्यापेक्षाही अधिकप्रमाणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या कार्याची व्यापकता निर्माण केली होती. उदा, ग्रंथप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्याचप्रमाणे अर्थतज्ञ, कायदेपंडित, समाजशास्त्रज्ञ, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, जलतज्ञ, स्त्रीयांचे उध्दारक, नवभारताचे भाग्य विधाते, संसदपटू, नवयुग निर्माते, भारतीयांना मुलभुत हक्क मिळवून देणारे क्रांतीसुर्य, विद्यार्थ्यांचे प्रेरणास्त्रोत, कामगार चळवळीचे नेते अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आलेख न मोजता येणारा आहे. यावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे सबंध मानवमुक्तीच्या लढयाचे एक पराक्रमी योद्धेच होते. प्रचंड बुध्दीमत्ता, बुध्दिमतेला शिलाची जोड देवून जगातल्या शंभर विदवानापैकी पहिल्या क्रमांकाचे विद्वत्तेचे महामेरू म्हणुन ओळखले जातात.

त्यामुळे असा महामानव जन्माला येणे कदापीही शक्य नाही, म्हणूनहा महामानव युगपूरूष म्हणुन ओळखला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याचा इतिहास संघर्षमय आहे. त्यांच्या जन्मापासून ते महापरिनिर्वाण पर्यंतचा इतिहास डोळयासमोर ठेवला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येक सेकंद, मिनिटं, तास, दिवस, महिने आणि वर्ष असा संपुर्ण कालखंड हा समाजासाठी नव्हे तर संपुर्ण राष्ट्राच्या हितासाठी, नवभारताच्या निर्मितीसाठी खर्च केलेला आहे. त्यांच्या कार्याची उंची किती महान होती हे स्पष्ट करताना बामदादा कर्डक म्हणतात,

**"उध्दरली कोटी कोळी**
**भिमा तुझ्या जन्मामुळे,**
**झाले गुलाम मोकळे,**
**भिमा तुझ्या जन्मामुळे."**

युगानं युगापासून शोषीत, वंचीत, पिडीत, दलित समजले जाणारे शुद्र,अतिशुद्र, अस्पृश्य अशा लोकांचे जीवन म्हणजे गुरा ढोरा हि पेक्षा हिनतेचे होते.

हजारो वर्षापासून अशाच पिढया गुलामीतच जन्माला आल्या आणि गुलामीतच मेल्या. कुठलाही इश्वरी अवतार इथे जन्माला आला नाही आणि बहुजनांचा उध्दार केला नाही, मात्र 1891 साली भिमाईच्या पोटी एक क्रांतीसुर्य जन्मास आले त्यांचे नाव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी युगायुगापासून चालत आलेल्या अमानवी छळाचा बालपीचं वाईट अनुभव घेतला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लहानपणापासुनच तीक्षण बुध्दीचे, स्वाभिमानी, बंडखोर वृत्तीचे होते. भल्याभल्यांना त्यांनी बालपणीच माणुसकीचे धडे दिले होते. सामाजिक विषमते विरुध्द आणि अन्यायाबाबत ते पेठून उठत असतं. त्यामुळे तत्कालीन समाजातील बाहमन्यवादी विचारसरणीचे, सनातनी विचारणीचे, समाजकंटक

त्यांचा विरोध करत असत, त्यांच्या प्रगतीच्या आड गतीरोधक म्हणुन येत असत, मात्र ते कधीच थांबले नाहीत. तर त्यांचे ध्येय आणि कार्य त्यांनी निश्चित केले होते. त्यामुळे त्यांना कोणीच रोकू शकले नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे क्रांतीसुर्यच होते ज्यांनी समाजातल्या अज्ञान, अंधश्रध्दा, कर्मकांड, गुलामगिरी, अमानवीछळे, अस्पृश्यता, विविध अमानवी प्रथा परंपरा अशा मनुस्मृती विचारधारेच्या आलेल्या पिकांना समुळ नष्ट केले म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्ञानाचे प्रतिक म्हणुन संबोधतात हे सुर्यप्रकाशा येवढेच सत्य आहे. कारण ज्याप्रमाणे आकाशातील सुर्य हा संपुर्ण सजीवसृष्टीचे नवनिर्मिती करतो, संरक्षण करतो अगदी त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी युगानंयुगापासून अंधाराच्या खाईत खितपत पडलेल्या, अज्ञानाच्या द-याखो-यात लाचार बनुन जीवन जगणा-या लोकांच्या जीवनात मानव मुक्तीचा नवप्रकाश टाकून त्यांच्या गुलामीच्या बेडया तोडून टाकल्या आणि माणसांना माणूस म्हणुन जीवन जगण्यासाठी त्यांनी आपले संपुर्ण आयुष्य मानव मुक्तीचे लढे लढून त्यांनी ख-या अर्थाने आपले संपुर्ण जीवन त्यांच्यासाठी समर्पित केले म्हणुन ते ख-या अर्थाने 'युगपुरूष' ठरतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविध क्षेत्रातील कार्य**

**1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कार्य :-**

फुले शाहूंचा शैक्षणिक विचारांचा पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातुन पाया मजबूत केला. याचा अर्थ महात्मा फुले यांनी शिक्षणाचे बीजारोपण केले तर राजर्षी शाहू महाराजांनी खत पाणी घालवून त्याना वाढवले तर या वाढलेल्या रोपटयाला ज्ञानरुपी बोधीवृक्षाच्या रुपात रुपांतर करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. महाराष्ट्राचा परिचय होत असताना फुले-शाहू-आंबेडकर पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखला जातो. बहुजनांच्या अवनीतीचे प्रमुख कारण अविद्या आहे असे महात्मा फुले म्हणत असत. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाला वाघिणीचे दुध असे म्हटले आहे. जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. याचा अर्थ ज्ञानाने माणुस जागृत होतो, स्वाभिमानी होतो, माणसात आत्मसन्मान निर्माण होतो, व्यक्तीमध्ये, चांगल्या आणि वाईट गोष्टी कोणत्या आहेत याची शहानिशा करण्याची वृत्ती निर्माण होते.

म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील बहुसंख्य जनतेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा ही संदेश दिला केवळ संदेश दिला नाही तर पीपल्स एज्युकेशन सोसायटीची निर्मिती केली, सिध्दार्थ कॉलेज काढले. इ.स. 1950 मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षणाबरोबर उच्च शिक्षणावर ही भर दिला. त्यांच्या मते एक ग्रॅज्युएट किंवा पोस्ट ग्रॅज्युएट तरुण जितक्या प्रमाणात आपल्या इतर भावंडांना आधार देऊ शकतो तितक्या प्रमाणात 4 थी पास झालेली 1000 मुले फारसे काही परिवर्तन करु शकणार नाहीत. यावरुन तरुणांनी उच्च शिक्षण घेतलेच पाहिजे. तरच त्यांना संकटाच्या महासागरातून बाहेर पडता येवू शकते. यावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयी दुरदृष्टी किती होती यावरुन आपल्या लक्षात येते.

आज नेमके याच विषयावर घाला घातला जात आहे. कोरोनाच्या महामारीच्या नावाखाली जवळपास तीन अज्ञानाच्या पिढया जन्माला आल्या आहेत. आणि उच्चशिक्षण घेणा-या तरुणांना नौकरिची कसलीच शाश्वती नाही. स्वालंबनाची कसलीच हमी नाही. त्यामुळे आजच्या शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. यावर उच्चशिक्षीत असणा-या शिक्षण तज्ञ लोकांनी नव्या शैक्षणिक धोरणांचा चिकित्सकपणे अभ्यास केला पाहिजे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या शिक्षणविषयक विचारांनाच गतीमान केले पाहिजे.

तरच ख-या अर्थाने येणा-या पिढयांना स्वाभिमानाने, ताटमानेने, स्वावलंबनाने, जीवन जगता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ पुरूषांच्या शिक्षणांचा विचार केला नाही त्याच बबरोबर स्त्री शिक्षणाचा देखील त्यांनी मोठया प्रमाणात महत्व दिले आहे. म्हणूनच एकेकाळी चार भिंतीच्या आत गुलामीच जीवन जगणा-या लाचार स्त्रीया केवळ शिक्षणामुळे सरपंच पदापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत जावुन पोहचल्या आहेत. हे आजच्या

'युवतीनी, तरुणींनी लक्षात ठेवले पाहिजे, युवकांनी लक्षात ठेवले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचार मांडताना, किंवा समाज प्रबोधनकार आंबेडकरी चळवळीचा नवीन पिढीतला एक गायक आपल्या गायनातुन असे म्हणतो.

**"कुणामुळं झाल तुझ्या जीवनाचं सोनं**
**लेका जावु नकोस तु विसरुन..**
**ये पोरा तु साहेब झालास मोठा**
**बाबासाहेबांच्या पुण्याईनं."**

या गिताच्या ओळीत गायक आपणास चिंतन करावयास भाग पाडतो. आपण फक्त खातो तो घास आणि घेतो तो श्वास डॉ. बाबासाहेबांच्या शिक्षण विषयक कार्य आणि विचारामुळेच. यावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार किती महान स्वरुपाचे आहेत हे पुन्हा एकदा सिध्द होते.

**2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार व कार्य :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तत्कालीन समाजातल्या अस्पृश्य घराण्यात जन्मास आले होते. त्यामुळे अस्पृश्यतेचे प्रचंड चटके, यातना, अपमानस्पद गोष्टी, त्यांनी पचवल्या होत्या,म्हणून त्यांना समाजिक बदलझालाच पाहिजे असे वाटत होते. यासाठी त्यांनीसामाजिक समता विषयक विचार समाजामध्ये रुजवला, अस्पृश्यता निर्मुलन, वर्ण व्यवस्थेचे उच्चाटन करुनच ख-या अर्थाने समाजामध्ये समता निर्माण होवु शकेल त्यांनी शुद्र पुर्वी कोण होते?जाती निर्मुलन विषयक सिध्दांत अशा ग्रंथाची निर्मिती केली. इतकेच नव्हे तर त्यांनी मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुध्द भारत यासारखे वर्तमान पत्रांची निर्मिती करुन त्यामध्ये तत्कालीन अस्पृश्य समाजाच्या व्यथा, वेदना आणि विद्रोह, प्रखडपणे मांडले. ज्याचा एकमेव मुळ उद्देश म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समतामुलक, समाज अभिप्रेत होता धर्माच्या नावाखाली चालणारी स्त्री-पुरूष विषमता, अस्पृश्यता, स्त्रीदास्यता, या गोष्टीचे जोपर्यंत उच्चाटन होणार नाही. तोपर्यंत ख-या अर्थानं समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणार नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ठाम मत होते. म्हणुन त्यांनी 25 डिसेंबर 1927 रोजी सामाजिक समता नाकारणा-या मनुस्मृतीचे जाहिरपणे दहण केले.

असा पराक्रमी शुर योध्दा, समाजसुधारक, कायदेपंडित, संविधानात्मक मार्गाने लढे लढणारा युगपुरूष पुन्हा जन्माला येणे शक्य नाही. समाजात विचारांची क्रांती झाली तरच ख-या अर्थाने अचार क्रांती निर्माण होते. म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी झोपलेल्या बहुजनांना जागे केले, जागे झालेल्या लोकांना जागृत करुन उठुन बसवले, जागृत होवून बसलेल्या लोकांना उभे केले, उभे झालेल्या लोकांना ताठ मानेने चालायला शिकवले. इतकी सामाजिक, वैचारिक क्रांती जगाच्या पाठीवर कोणत्याही महापुरूषाने केली नाही. याला इतिहास साक्षी आहे. सामाजिक क्रांतीचे बीजे पेरताना ते म्हणत असत.

**'शंभर वर्ष शेळी होवुन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होवुन जगा"**

हा त्यांचा विचार मृतप्राय लोकांनमध्ये जीवन ओतनारा ठरला अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे सामाजिक विचार आणि कार्य आजही तरुणांना प्रेरणास्त्रोत आहेत, नवचैतन्य निर्माण करणारे आहेत, दिशा दर्शक ठरणारे आहेत.

**3) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे इतर विचार व कार्य :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखील मानव जातीच्या कल्याणासाठी विविध क्षेत्रात कार्य केलेले आहे. उदा. भारतीय संविधानातून भारतीयांना मुलभुत अधिकार दिलेले आहेत. त्यामध्ये विशेषत: समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यावर आधारित लोकशाही दिलेली आहे. तसेच भारताला राज्यघटना देवून अजरामर स्वरुपाचे

ऐतिहासिक कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेट बिगारी प्रथा बंद केल्या, देवदासी प्रथा बंद केल्या, अस्पृश्यता निर्मुलन केले, धार्मिक सुधारणा चळवळी निर्माण केल्या, चवदार तळयाचा सत्याग्रह केला, काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्यागृह केला, मी हिंदू म्हणुन जन्माला आलो हिंदू म्हणुन मरणार नाही अशी प्रतिज्ञा करुन 14 आक्टोंबर 1956 रोजी बौध्द धम्माची त्यांनी दिक्षा घेतली आणि नव इतिहास घडवला.

**सारांश :-**

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्व भारतीयांवर फार मोठे ख-या अर्थाने उपकार आहेत. कारण त्यांनी ख-या अर्थाने सर्वांना एक मत एक मुल्य देवून समान न्यायाच्या तराजुत तोलले आहे. म्हणुन ते म्हणत असत Weare Firstly and Lastly Indian अशा या महान युगपुरूषाला त्यांच्या 131 व्या जयंती निमित्ताने माझा कोटी कोटी प्रणाम.

**संदर्भग्रंथ :-**


१) **फुले- आंबेडकरी चळवळ : विचार आणि भुमिका** संपादक - डॉ. मनोहर सिरसाट, प्रा. शरद सदाफुले, प्रा. शाम कुंड, प्रा. बाबु वादे प्रकाशन – चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

२) 'भारतातील सामाजिक चळवळीची रूपरेषा' लेखक - प्रा. सी.टी. कांबळे , प्रा. टी.एस. पवळे प्रकाशन - क्रिएटीव्ह पब्लिकेशन नांदेड

३) डॉ. आंबेडकर शांततामय सामाजिक क्रांतीचे प्रणेते लेखक –ॲड.राम खोब्रागडे प्रकाशन – सुगावा प्रकाशन पुणे 30

4) डॉ. आंबेडकर आणि स्त्री मुक्ती लेखक – प्रा. प्रतिमा परदेशी प्रकाशन – दिग्नाग प्रकाशन पुणे

# स्त्री ओवीगीतांतून प्रकट झालेला आंबेडकरी विचार

**कराड बाळासाहेब निवृत्ती**
**संशोधक विद्यार्थी**
**स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड**

मराठी लोक साहित्याच्या प्रांतात एक महत्त्वपूर्ण लोकभाव म्हणजेच लोकगीत होय. या लोकगीतांत प्रामुख्याने स्त्रियांची गीते, पुरुषांची गीते, बालकांची बडबड गीते या बरोबरच लोक संस्कृतीचे उपासक म्हणून पोतराज, वाघ्या-मुरळी, वासुदेव, बहुरूपी, गोंधळी, शाहिरी, भराडी अशा उपासकांच्या गीतांसह ज्या विभिन्न परंपरेतून लोकसंस्कृती आविष्कृत होते, त्या लोकगीतांचा म्हणजेच उपासना गीते, धार्मिक गीते, सण – उत्सव – समारंभाची गीते, विधीगीते यांचा ही समावेश होतो. खूपच व्यापकता आणि विस्तृतता असलेल्या लोकगीतांचे वर्गीकरण करताना एक महत्त्वपूर्ण मुद्दा आपल्या लक्षात येतो की, लोकगीत हे समूहाचे धन असून लोकसमूहाच्या मान्यते बरोबरच यात लोकभावना आणि लोकमत दडलेले असते. लोकांच्या मनोभावनेचा हा सामूहिक आविष्कार असतो. लोकसाहित्याच्या लक्षणे प्रमाणे यात नित्यनूतनता आणि परिवर्तनशीलता असते. काळानुरूप लोकांच्या मनावर ज्यांचा प्रचंड प्रभाव पडतो. त्यानुसार त्यांच्या श्रद्धा, भावना व लोकमानस तयार होते. आणि ते साहित्यात प्रकटते.

हजारो वर्षां पासून ज्या समाजाला अतिशूद्र, अस्पृश्य म्हणून गुलामीचे, सामाजिक विषमतेचे, धार्मिकबंधनाचे, अज्ञान-अत्याचाराचे काळे कुट्ट घोंगडे पांघरले गेले; असा समाज गावगाड्याचा भाग असूनही गावगाड्याच्या समते पासून कोसो दूर राहिला. त्या सबंध समाजामध्ये नवचैतन्य पेरून समाजाला जागे करण्याचे महत्त्कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्या श्रद्धास्थानातून दलितांचे स्वतंत्र असे लोकमानस बनले. व त्या श्रद्धेची पुढे लोकगीते जन्मास येऊ लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्व' अस्तित्वाच्या जाणिवेचे बीज इथल्या प्रत्येक उपेक्षित, वंचित आणि समाजाकडून सामाजिक विषमतेने भरडल्या गेलेल्या, माणूस म्हणून माणुसकीला पारखा झालेल्या माणसात पेरले आणि समाजाकडून सामाजिक विषमतेने नागवल्या गेलेल्या समाजासाठी 'नभूतो न भविष्यती' असा सामाजिक समतेचा प्रचंड लढा उभारला. समाजाचा अक्षरशः कायापालट झाला व पुढे होत आहे. परंतु याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. त्यामुळे या उपेक्षित समाजाच्या मनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी प्रचंड श्रद्धा, अस्मिता निर्माण झाली, आणि ज्या प्रमाणे दलित साहित्य आकारास आले. तद्वत दलित लोकमानसातून दलितांचे लोकसाहित्य निर्माण झाले. हजारो वर्ष आणि कित्येक पिढ्यांपासून अज्ञान अंध:काराच्या खोल गर्तेत खितपत पडलेल्या अडाणी, निरक्षर लोकांनाही मग डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले वाटू लागले. ते आपापसात एकत्र येऊन डॉ. बाबासाहेबांविषयी चर्चा करू लागले. यातून जुन्या परंपरेत बदल होऊ लागला. परिवर्तनवादी विचारधारेसह परिवर्तनवादी लोकधारा निर्माण होऊ लागली. तशी लोकसंस्कृती बदलू लागली. अस्मिता जागी झालेली अडाणी आणि निरक्षर जनता लोकगीतातून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करू लागली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापूर्वी जात्यावर गायल्या जाणाऱ्या ओव्यांची पारंपारिकता संपुष्टात आली. बाबासाहेबांच्या कार्य-कर्तृत्वाचा ठसा इथल्या दलित स्त्रियांच्या मनावर ठस लागेला. आणि डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांचे गुणगान पहाटेच्या प्रहरी तिच्या जात्याच्या साथी नंवाऱ्याच्या मंद झुळकीसह गाव-शिवार भर पसरू लागले. याचे वर्णन करताना राजानंदगड पायले लिहितात –

"श्री भीमाची ओवी गाताखुले अंतरंग
खुले अंतरंग माझे मन होई दंग
खेड्यातील बाई मजला लागलं वळण
पहाटे लाजा त्यावरी दळीतादळण
दळीता दळण बाई डुले माझे अंग"

अडाणी, निरक्षर, साधी – भोळी स्त्री तिच्या मनातील ही भाव अवस्था, हरखून गेलेले मन, लागलेले वळण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील श्रद्धा मोठ्या अचूकतेने गडपायले यांनी टिपले आहे.

कित्येक पिढ्यांची समाजातील उपेक्षित घटकांची, शूद्र, अतिशूद्रांची, वंचितांची जीवन जाणिवेसह जगण्या-वागण्याची रीत, विधी, प्रसंग, सण-उत्सवांची परंपरा बाबासाहेबांच्या प्रेरक विचारांनी परिवर्तनवादी बनली. या परिवर्तनवादी विचारांचे पडसाद साहित्यात उमटले. आशय आणि विषयाच्या दृष्टीने परंपरागत लोक साहित्या पेक्षा ही दलितांची लोकगीते दलित संस्कृतीला जिवंतत्व बहाल करतात आणि पिढ्यान पिढ्यांची मूकवाणी मुखर होते.

"भीम माझा ग वाघ
नाही भिणार कुणाला
त्याच्या ग डरकाळीने
झाला समाज जागा"

समाजाच्या सामाजिक समतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर रात्रंदिवस आयुष्यभर लढले. रंजल्या-गांजल्या, सामाजिक विषमतेने नागवल्या गेलेल्या लोकांचे अश्रू पुसण्यापेक्षा त्यांच्या डोळयात अश्रूच येणार नाहीत; यासाठी उपेक्षितांच्या वेदनेचे दुःख सोबत घेऊन भारत भर फिरले. अशा थकलेल्या जीवाला विसावा होता - 'साहेब तुम्ही स्वतःला जपा' म्हणणाऱ्या रमाई. बाबासाहेबांची अर्धांगिनी. 'बाबासाहेबांचे काळीज'. समाजाचा संसार सुरळीत होण्यासाठी बाबासाहेबांच्या संसाराचा गाडा नेटानं हाकणाऱ्या, सर्व उपेक्षित जनांच्या माता रमाई. बाबासाहेबांची 'रामू' एका माय-माऊलीच्या मुखातून ओवीत प्रकटते –

"काय सांगू बाई गोष्ट
गोष्ट राजाच्या संसाराची
हरणी ग माय माझी
'रामू' काळीज हो साहेबांची"

**किंवा**

"बाई चला पहाया जाऊ
बाबासाहेबांचा वाडा
रमाई टाकी सडा
यशवंतराव खेळे गाडा"

अस्पृश्यता, जातीयता, धर्मांधता, विषमता यामुळे दलितांना प्यायला सार्वजनिक ठिकाणच्या पाण्याची ही बंदी होती. पिण्याच्या पाण्यासाठी बाबासाहेबांना संघर्ष करावा लागला. हा चवदारतळ्याचा सत्याग्रह दलित समाज कधीच विसरणार नाही. तो कृतार्थ भाव स्त्रियांच्या ही लोकमानसात दिसतो आणि लोकगीतांतून शब्दरूप होतो –

"माझ्या राजानं ग लई
लई शिकल या बाई
त्यानंच ग आम्हाला
दिलय प्यायला पाणी"

डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा घेऊन नवीपिढी शिक्षणात उतरली. शिकू लागली. शिकून शहाणी झाल्यावर मुलांना नोकऱ्या मिळाल्या. पोटा – पाण्या बरोबरच पारंपारिक राहणीमानात ही बदल झाला; आणि समाज सुटाबुटात आला

"कसा शोभून दिसतो
दिसतो ग' टाय-कोट'
सुटाबुटात बाबाने
आणलाय ग समाज"

शिकून-सवरून शहाणा झालेला समाज सुटाबुटात आला. सामाजिक अस्मिते सोबतच सामाजिक भान घेऊन हा समाज समाजात वावरू लागला. याचा प्रस्थापित समाजाकडून बाबासाहेबांना त्रास व्हायला लागला. डॉ. बाबासाहेबांनी एके दिवशी घोषणा केली. 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही'. धर्मांतराच्या या घटनेचा आठव ओवी बद्ध करताना एक माय माऊली म्हणते–

"आला रण गाडा
रणगाड्याला कवाडं
भीमक राजा ग माझा
त्याला बौऊद्ध धम्माची आवुडं"

**किंवा**

"नागपूर मुक्कामी दीक्षा दिली भिमानी
जनता सारी लीन झाली बाबाच्या चरणी"

**किंवा**

"बोधी वृक्ष पिंपळाला
भीम रत्न झोका घेई
दीन दुबळ्यांची आई
भीम झाला ग बाई"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य-कर्तृत्वाचा आणि किर्तीचा आठव आज ही मोठ्या प्रमाणात गायला जातो. हे व्रत दलित समाज जीवन भर अंगी कारतो. एक माऊली बाबासाहेबांच्या गौरवार्थ म्हणते –

"बाई दळण सरलं
मी आणखी घेईन
जीवन भर ओव्या
मी भीमाच्या गाईन"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणा नंतर बाबासाहेबांच्या कार्याचा प्रताप, बाबासाहेबांचा सन्मान, बाबासाहेबांची स्वप्ने हृदयात कोरून, हा दलित समाज भीम जयंतीला अपार करुणा घेऊन, या महामानवाला वंदन करण्यासाठी एकत्र येतो. आपल्या उद्धार कर्त्याच्या चरणी नतमस्तक होतो. हा भीम जयंतीचा सोहळा दलित स्त्रियांच्या ओवीतून आविष्कृत होतो.

"चौदा एप्रिल एक्क्यान्नव साली भीम जन्म ला ग बाई

चला ग सयांनो आली भीम जयंती आली".

**किंवा**

"भीम जयंती सणाला भीमा वंदन करिते तुम्हाला
त्री शरण पंचशीलाने पुष्प वाहिते भीमाला"

समाजाने ठरवलेल्या अस्पृश्य समाजातील ही अडाणी, निरक्षर स्त्री बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन, आपले लोकमानस घेऊन, ओवी बद्ध होते. नव्या लोक मानसातून नव जाणिवा ओवी बद्ध करते. जात्यावरची ओवी शिवारात आणते. इतकेच नाही, तर विधी गीतांतून, लग्न, सण - समारंभ-उत्सवातून, मनमोकळ करते. आणि आपल्या उद्धार कर्त्याप्रती ओवी गीतांतून प्रचंड आदर भावाने, श्रद्धेने वंदन करते.

संदर्भ सूची:


१. संकलितओव्या
२. मराठवाड्यातील दलितांचे लोकसाहित्य – डॉ. परशुराम गीमेकर–कैलास प्रकाशन, औरंगाबाद.
३. आंबेडकरी शाहिरी एक शोध – डॉ. कृष्णा किरवले–नवीन उद्योग, पुणे.
४. लोकवाङ्मय रूप - स्वरूप– शरद व्यवहारे – साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद.
५. श्रद्धांजली गीते–राजानंद गडपायले – सेंट्रल प्रकाशन, पाववाला स्ट्रीट, मुंबई४.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**प्रा. बालासाहेब शिवाजी पवार**
वाणिज्य विभाग, माधवराव पाटील महाविद्यालय पालम.

**प्रास्ताविक:-**

अलीकडच्या काळातील एक थोर आर्थिक, राजकीय व सामाजिक विचारवंत म्हणूनडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख करण्यात येतो. घटनातज्ञ, गाढे अभ्यासक, कायदा पंडित, दलितांचे कैवारी, राजकारणी, शिक्षणतज्ञ तसेच समाजसुधारक अशा अनेक बाबींद्वारे त्यांची ओळख स्पष्ट करता येते. तसेच या कार्या व्यतिरिक्तडॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मुख्य कार्य ही एक अर्थतज्ञ म्हणून देखील आहे. 14 एप्रिल 1891 रोजीयामहा मानवाचा जन्म झाला. अतिशय कठीण अशा आर्थिक परिस्थितीतून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थतज्ञ म्हणून उल्लेख करताना त्यांच्या शिक्षणामधील बराचसा भाग हा अर्थशास्त्र या विषयात असल्याचे दिसून येते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्र विषयामध्ये नवीन सिद्धांताची मांडणी केलेली नाही. परंतु त्यांच्या काळात भारतामध्ये उद्भवलेल्या अनेक आर्थिक प्रश्नांशी निगडित बाबींचा अभ्यास करून त्यावरील प्रश्नावर उपाययोजना सुचविल्या आहेत.त्यांनी केलेल्या अभ्यासातून पुढे आलेल्या बाबी कोणत्या होत्या त्या बाबीचा उल्लेख सदरील शोधनिबंधामध्ये करण्यात आलेला आहे. त्याबाबींचा वेध घेऊन त्यांनी आपले आर्थिक विचार मांडलेआहेत.

**शोधनिबंधांची उद्दिष्टे:**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेणे.
2) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थतज्ञ म्हणून आसलेल्या भूमिकेचे अध्ययन करणे.
3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या सामाजिक कार्यामुळे त्यांच्या दुर्लक्षित झालेल्या पण महत्त्वाच्या आर्थिक विचारांची वर्तमानकाळातील प्रासंगिकतापाहणे.
4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उद्योग,कृषी,श्रम, कामगार विषयक विचारांवर प्रकाश टाकणे.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी माहितीचे संकलन करण्यासाठी प्रामुख्याने द्वितीयसाधनसामुग्रीचा वापर केलेला आहे. यामध्ये संबंधित विषयाची विविध पुस्तके, विविध संदर्भ ग्रंथ, मासिके,वृत्तपत्रांमधील माहिती तसेच इंटरनेट वरील वेबसाईटचाही उपयोग करण्यात आलेला आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार हे त्यांच्या काळातील भाषणातून, वर्तमानपत्रातून जे लिखाण केले त्यामधून तसेच स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा मांडला आणि अर्थशास्त्रावरील जे पुस्तक लिहिले आहेत त्यामध्ये त्यांचे आर्थिक विचार दिसून येतात. काही महत्वपूर्ण आर्थिक विचार पुढील प्रमाणे आहेत.

**1)अर्थशास्त्राचे स्वरूप:**

अर्थशास्त्रामध्ये आर्थिक व्यवहारांचा व संपत्तीच्या बाबींचा विचार होतो पण या बाबी बरोबर समाज कल्याणाचा विचार अर्थशास्त्रात व्हावे असे स्पष्ट मत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे होते.१संपत्तीचे समान वाटप व्हावे असे त्यांचे मत होते.जातिव्यवस्थेचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतात.त्यामुळे दारिद्र्य, आर्थिक पिळवणूक,असमानता निर्माण होते.इ.स.1936 मध्येत्यांनी मजूर पक्ष स्थापन केला त्यांच्या जाहीरनाम्यात आर्थिक धोरणाबाबत विचार मांडले आहेत.

**2)नियोजित अर्थव्यवस्था:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीनियोजित अर्थव्यवस्थेच्या संदर्भात म्हटले होते की,"भारतीय समाजव्यवस्थेत जन्माने जात ठरते, जातीने व्यवसाय निश्चित होतो. त्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होते. त्यातून संपत्तीचे केंद्रीकरण घडून येते. उत्पादनात वाढ करणे व राष्ट्रीय संपत्तीचे समान वाटप करण्यासाठी तरतूद करणे या निकषावर आधारित समाजाच्या आर्थिक

जीवनाचे नियोजन करण्याची जबाबदारी शासनाची असते."असेविचार नियोजित अर्थव्यवस्थेच्या संदर्भात बाबासाहेबांनी मांडले आहेत.२

**3)आर्थिक विषमता:-**

आरक्षित धोरणाचा त्यांनी शास्त्रशुद्ध अभ्यास केला.आर्थिक निकष व गुणवत्ता हे निकषठरविल्यास न्याय व सामाजिक समता यांचा लोपहोईल. त्यांना न्याय व सामाजिक समता प्रस्थापित व्हावी असे वाटत होते. बाबासाहेबांनी आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात उद्योग धंदे करावेत भूमिहीनांना जमीन द्याव्यात जमिनीचे राष्ट्रीयीकरण करावे असे सांगितले.

**4)राज्य समाजवाद:-**

बाबासाहेबांच्या राज्य समाजवादी तत्वज्ञानात व्यक्तीस्वातंत्र्य अपेक्षित होते. त्यांना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाविषयी तळमळ होती.आर्थिक व सामाजिक परिवर्तन व्हावे यासाठी राज्य समाजवाद स्वीकारावा असे बाबासाहेबांचे मत होते. त्यांनी मांडलेल्या राज्य समाज वादाबाबत सामाजिक आर्थिक बाबींचे शासनाकडून नियंत्रण अपेक्षित होते.३

**5)चलन विषयक विचार:-**

इ.स.1922 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी डी.एस. सी.च्या पदवीसाठी"लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स "**रुपयाचा प्रश्न** हा प्रबंध लिहिला होता.४या प्रबंधामध्ये त्याने भारताच्या रुपयाच्या उत्क्रांतीचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. त्यावेळीअर्थशास्त्रज्ञामध्ये रुपयाची जडण-घडण ही सुवर्ण परिमाणात असावी की सुवर्ण विनिमय परिमाणातयाबाबत वादहोते. सुवर्ण विनिमय परिमाण लवचिक आहे भविष्यकालीन अर्थव्यवस्थेला उपयुक्त आहे म्हणून प्रोफेसर केन्सयांनी सुवर्ण विनिमय परीमानाचा पुरस्कार केला. डॉ.बाबासाहेबांनी या विचाराला विरोध केला. त्यांच्यामते, सुवर्ण विनिमय परिमाणात स्थैर्य राहत नाही, त्यात लवचिकता आहे पण चलन निर्मितीवर त्यात मर्यादा राहणार नाही. अवश्यकतेपेक्षा जास्त चलन निर्मितीमुळे भाववाढ होईल त्यामुळे रुपयाची किंमत घसरते व विनिमयाचे साधन म्हणून रुपयाचे स्थान स्थिर होईल. हिल्टन यंग कमिशनपुढे अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हे मत मांडले.

**6) सार्वजनिकआय-व्यय आणि केंद्र-राज्य संबंध:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीकोलंबिया विद्यापीठात शिकत असताना M.A. पद्वीसाठी 'ऍडमिनिस्ट्रेशन □न्ड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी'हा 15 मे 1915 रोजीआशा शीर्षकाचा 42 पृष्ठाचां एक शोधनिबंध सादर केला. प्रस्तुतशोध निबंधात डॉ. बाबासाहेबांनी 1792 ते 1858 या कालखंडातील ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थव्यवस्था या संदर्भातील धोरणात कशाप्रकारे बदल होत गेले याविषयीचा महत्वपूर्ण ऐतिहासिक आढावा घेतला आहे. ईस्ट इंडिया कंपनीची ही अर्थनीती कशाप्रकारे भारतीय जनतेच्या हालाखीच्या परिस्थितीत कारणीभूत ठरली यासंबंधीचे विदारक सत्य मांडले आहे. 1925 मध्ये Ph.D. पदवीसाठी **The evolution of provisional finance in British India** हा प्रबंध लिहिला. ५केंद्रव राज्य सरकारच्या आर्थिक बाबींची माहिती यांचा आढावा वरील प्रबंधात घेतला.

**7) उद्योगविषयक विचार:-**

भारताचा आर्थिक विकास करण्यासाठी औद्योगीकरण महत्वाचे आहे. देशाचा समतोल विकास व्हावा यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शासनाने प्रत्यक्ष लक्ष घालून समतोल औद्योगिक विकास साध्य करावा असे त्यांना वाटत होते. उद्योगधंद्यांमुळे निर्मिती होते, वस्तूचे उत्पादन होते, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, जनतेच्या गरजा पूर्ण करण्याकरिता उद्योग व्यवसाय आवश्यक आहे असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले.

**8) शेतीविषयकआर्थिक विचार:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1818 मध्ये The journal of Indian Economics societyया अंकामध्ये small holdings in India and their remedies हा लेख लिहिला. या लेखांमध्ये असे सांगितले की शेती हा भारताचा एक सर्वात मोठा राष्ट्रीय उद्योग आहे. सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्त्व अधिक आहे. शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा जर कोणता घटक असेल तर तो घटक म्हणजे शेत जमिनीचा आकार होय. भारतीय शेतीचा आकार तुकडी करणामुळे लहान

झाला आहे. असे लहान लहान तुकडे सगळीकडे विखुरलेली आहेत, भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे. म्हणून आंबेडकरांनी असे विचार मांडले आहे की,विखुरलेल्याजमिनीचे एकत्रीकरण करून त्यांचा आकार वाढवून ती किफायतशीर करणे आवश्यक आहे. म्हणूनच शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणाआहेअसे मानलेजाते.

**9) कामगारा विषयी विचार:-**

बाबासाहेबांनी कामगारांच्या कल्याणासाठी मजूर मंत्री असताना विशेष प्रयत्न केले. असेंब्लीत संपा विरोधी काळया कायद्याच्या विरोधातडॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण खूपच गाजले. ते म्हणतात संपाचा हक्क म्हणजे कामगारांच्या स्वातंत्र्याचा हक्क होय. नागरिकांचा स्वातंत्र्य हक्क जेवढा पवित्र तेवढाच कामगारांचा हक्क पवित्र आहे. औद्योगिक कामगारांना जास्त सवलती मिळतात जे फायदे मिळताततेचफायदे मुजरानां देखील मिळाले पाहिजेत.जसेऔद्योगिककामगारांना भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा, अपघात विमा, नुकसान भरपाई इत्यादी स्वरूपाच्यासोई सवलती मिळतात त्याच शेत मुजराला मिळाल्या पाहिजेत.

**10) इतर आर्थिक विचार:**

इतर आर्थिक विचारांमध्ये कर विषयक तत्वे, राष्ट्रीयीकरण, शेती उद्योगासंबंधी विचारशेत मुजरा संबंधी विचार, आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक विचार इ. विचार आढळतात.

**सारांश:**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक कार्य भरीव स्वरूपाचे होते. खऱ्या अर्थाने ते अर्थशास्त्रज्ञ होते.त्यांचे आर्थिक विचार भविष्यातील परिस्थितीनुरूप होते हे अनेक उदाहरणाद्वारे सिद्ध करता येते. उदा. रॅंगलर नर्क्सनीज्याप्रच्छन्न बेकारीची कल्पना मांडली त्यांच्या अगोदर किती वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निष्क्रिय रोजगाराची संकल्पना मांडली होती. बाबासाहेबांनी मजुरी संबंधित जे विचार मांडले ते □डम स्मिथच्या विचारा सारखेच आहेत.

**निष्कर्ष:-**

प्रस्तुत माहितीच्या आधारे काही महत्वपूर्ण आर्थिक निष्कर्ष काढण्यात आलेले आहे ते पुढील प्रमाणे आहेत.

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चलन विषयक विचार आजच्या परिस्थितीतही अनुकरणीय आहेत.

2) शेतीक्षेत्रातील मूलभूतसंरचनेला औद्योगीकरणाची जोड देण्यावर भर दिला.

3) डॉ.बाबासाहेब आंबेडकरानींश्रमिक कामगार वर्गासाठी दिलेला लढा महत्वपूर्ण होता.

4) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार सर्वसामान्यांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

उपरोक्त बाबी वरून बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रातील योगदान स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ सुचली:-**

1) कुलकर्णी बि.डी., ढमढेरे एस.व्ही. “आर्थिक विचार व विचारवंत”,(2008) डायमंड पब्लिकेशन्स,पुणे.
2) इंगळे बी.डी.,” आर्थिक विचारांचा इतिहास” (2011),अरुणा प्रकाशन,लातूर.
3) डॉ. एम.एम.खंदारे,- जागतिक आर्थिक विचारांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
4) डॉ. प्रल्हाद लुलेकर-दलिततेत्तरांसाठीडॉ. बाबासाहेब आंबेडकर अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा,(2012)सायन प्रकाशन, प्रा.लि.पुणे.
5) प्रा.रायखेलकर.ए.आर.-आर्थिकविचारांचा इतिहास(2005) शोभा भारती प्रकाशन,लातूर.
6) म.ना.कांबळे.-डॉ.बाबासाहेबांचेंआर्थिक विचार आणि भारतीय समाज (2002).क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी.
7) डॉ.बी.आर.आंबेडकर, द प्रॉब्लेम ऑफ रुपी, 1923-24.
8) त्रैमासिकअर्थसंवाद. एप्रिल -जून 2016, खंड 40.अंक.1.
9) https:// www.mahamtb.com 3 Aug 2021

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरव दलित हक्क चळवळ

**जोंधळे राजकुमार विष्णू**
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना:**

उच्चविद्याविभूषित विद्वान, विचारवंत, प्राध्यापक, प्रशासक, पत्रकार, वकील, लेखक, समाजसुधारक, राजकारणी, कायदेपंडित, घटनातज्ज्ञ, धर्मचिकित्सक, धर्मप्रसारक असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व डॉ. आंबेडकरांचे होते. हजारो वर्षांपासून अज्ञानात, दारिद्र्यात, उच्चवर्णियांच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या दलितांना शिक्षित जागृत व संघटित करून त्यांच्या उन्नतीची चळवळ त्यांनी चालविली. तसेच जातिव्यवस्थेने निर्माण केलेल्या विषमतेचा अंत करून तिच्याजागी समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचीही चळवळ त्यांनी चालविली. त्यामुळे ते केवळ दलित चळवळीचेच नव्हे तर आमूलाग्र सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचेही 'महानायक' ठरतात. दलित चळवळ म्हणजे आंबेडकरी चळवळ असेच मानले जाते. म्हणूनच त्यांच्या चळवळीचा अभ्यास आपण स्वतंत्रपणे करणार आहोत.

छ. शाहू महाराजांच्या पुढाकाराने 'माणगावात' (ता. कागल, जि. कोल्हापूर) झालेल्या परिषदेत (२० व २१ मार्च १९२०) डॉ. आंबेडकरही सहभागी झाले होते. येथून पुढे दलित चळवळीचे नेतृत्व डॉ. आंबेडकरांनी करावे अशी अपेक्षा छत्रपतींनी व्यक्त केली आणि डॉ. आंबेडकरांच्या सार्वजनिक कार्याची व नेतृत्वाची सुरुवात झाली. पुढे त्यांनी जीवनाच्या सर्व क्षेत्रात (सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक इ.) दलितबांधवांच्या उन्नतीची देशव्यापी, सर्वस्पर्शी व प्रभावी चळवळ आयुष्यभर चालविली.

१) **सामाजिक हक्कांची चळवळ -** हिंदू असूनही दलितांना सवर्णांच्या पाणवठ्यावर पाणी भरण्याचा व हिंदू मंदिरात प्रवेशाचा हक्क नव्हता. हे सामाजिक हक्क मिळावेत डॉ. आंबेडकरांनी अहिंसक/सनदशीर मार्गाने सत्याग्रह सुरू केले. त्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात 'महाड' (जि. रायगड) येथील चवदार तळयाचे पाणी आपल्या शेकडो अनुयायांसह प्राशन केले व हे तळे दलितांसाठी खुले केले. (१९ व २१ मार्च १९२७) त्यांनी जातिव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या 'मनुस्मृती'चे जाहीरपणे दहन केले. (२५ डिसेंबर १९२७) पुढे दलितांना हिंदू मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून मुंबई, पुणे, अमरावती, नाशिक इत्यादी ठिकाणी मंदिर प्रवेशाचे सत्याग्रह केले. त्यापैकी नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह १९३० ते १९३४ असा दीर्घकाळ चालल्याने देशभर गाजला. हे सत्याग्रह केवळ 'पाणी भरणे' व 'देवदर्शनासाठी' नव्हते. तर अस्पृश्यांना सवर्णांप्रमाणेच समान सामाजिक हक्क मिळावेत यासाठी होते. मनुस्मृतीचे दहन हेधर्मविध्वंसक कृत्य नव्हते तर विषमतेचा निषेध नोंदविण्याचे कृत्य होते.

२) **राजकीय हक्कांची चळवळ -** डॉ. आंबेडकरांचे सार्वजनिक कार्य सुरू असताना भारतीय लोक ब्रिटिश सत्तेकडे राजकीय हक्क मागत होते. अशावेळी सवर्णांप्रमाणेच दलितांनाही समान राजकीय हक्क मिळावेत म्हणून डॉ. आंबेडकरांनी चळवळ सुरू केली. १९१९ चा सुधारणा कायदा (मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा) संमत होण्यापूर्वी भारतीयांच्या मागण्या समजावून घेण्यासाठी नेमलेल्या 'साऊथबरो' समितीकडे डॉ. आंबेडकरांनी दलितांना कायदेमंडळात प्रतिनिधित्व मिळावे व हे प्रतिनिधी दलितांनी मतदानाद्वारे निवडावेत अशी मागणी केली. मुंबई कायदेमंडळाचे सदस्य असताना (१९२६-१९३६) अंदाजपत्रकातील व शिक्षणव्यवस्थेतील दोष, दारुबंदीची गरज, दलितांवरील अन्याय इत्यादींवर परखड मते मांडली. दलितांना शिक्षणसंस्थेत व सरकारी नोकऱ्यांत प्रतिनिधीत्व देण्याची मागणी केली. भारतीयांना राजकीय हक्क देण्याच्या संदर्भात नेमलेल्या 'सायमन कमिशनकडे' डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याची मागणी (१९२८) केली. पुढे 'गोलमेज' परिषदांत त्यांनी अस्पृश्यांची दुःखे एवढ्या प्रभावीपणे मांडली की, 'रॅम्से मॅकडोनाल्डनी (इंग्लंडचे पंतप्रधान) जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्यांची स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य केली. पण म. गांधींनी त्याविरुद्ध आमरण उपोषण सुरू केले. प्रारंभी तडजोडीस नकार देणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्यांचे अंतिम हित लक्षात घेऊन म. गांधीजींशी 'पुणे करार' (३ सप्टेंबर १९३२) करून स्वतंत्र मतदारसंघाऐवजी अस्पृश्यांना कायदेमंडळात राखीव जागा असाव्यात हे मान्य केले. या करारानुसार अस्पृश्यांना संयुक्त मतदारसंघात १८% राखीव जागा देण्याचा निर्णय झाला. महारांसाठी गुलामगिरी ठरलेली महार वतने खालसा करण्याची मागणी करणारे एक विधेयक आंबेडकरांनी मुंबई कायदेमंडळातमांडले व महारांना आपल्या आवडीचा व्यवसाय करण्याचा व वेतन ठरविण्याचा हक्क द्यावा अशी मागणी

केली. राजकीय सत्ता प्राप्त केल्यानेच दलितांच्या उन्नतीस गती येईल हे आंबेडकरांनी ओळखले होते. म्हणूनच १९३५ च्या कायद्यानुसार होणाऱ्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका लढविण्यासाठी आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करून (१५ ऑगस्ट १९३६) आपले १४ उमेदवार (१७ पैकी) निवडून आणले या पक्षात केवळ अस्पृश्यांचा अधिक भरणा होता. त्यामुळे अस्पृश्यांशिवाय इतरही सर्व दुर्बल घटकांना सामावून घेण्याच्या उद्देशाने आंबेडकरांनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या नवीन पक्षाची स्थापना (१८ जुलै १९४२) केली. पण दुर्दैवाने या पक्षातही इतर दुर्बल घटक फारसे सामील न झाल्याने १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत या फेडरेशनला अपेक्षित यश मिळाले नाही. म्हणून २९ सप्टेंबर १९५६ रोजी फेडरेशन बरखास्त करून तिच्या जागी 'सर्व समविचारी गटांना' सामावून घेणारा 'रिपब्लिकन पक्ष' स्थापण्याचानिर्णय आंबेडकरांनी घेतला. प्रत्यक्षात मात्र त्यांच्या मृत्यूनंतर हा पक्ष स्थापन झाला.

३) **शैक्षणिक हक्कांची चळवळ -** शिक्षणाशिवाय दलितांची उन्नती होणार नाही हे ओळखून बाबासाहेबांनी दलितांसह संपूर्ण बहुजनसमाजात शिक्षणप्रसाराची चळवळ राबविली.त्यांनी स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकरणी सभेने (२०जुलै १९२४) दलित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, वाचनालये, अभ्यासकेंद्रे, औद्योगिक व शेती शाळा सुरू करण्याचे ध्येय बाळगले. त्यानुसार सोलापूर नगरपालिकेकडून अनुदान मिळवून सोलापुरात दलित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उघडले. तसेच त्यांच्यात ज्ञानप्राप्तीची व समाजसेवेची आवड निर्माण करण्यासाठी एक संस्था, एक वाचनालय व 'सरस्वती विलास' नावाचे मासिक सुरू केले. जुगार, मद्यपान व मनोरंजनाचे असभ्य मार्ग यांचा त्याग करून दलितांची मने विधायक कार्याकडे वळविण्यासाठी या सभेने एक हॉकी क्लबही सुरू केला. दलितांच्या शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी दलित शिक्षण संस्थेची स्थापना (१९२८) केली. सरकारी अनुदान मिळवून दलित विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक स्तरावरील पाच वसतिगृहे सुरू करण्याची जबाबदारी या संस्थेने उचलली. सरकारी अनुदान अपुरे पडू लागल्यानंतर आंबेडकरांनी पारसी व मुस्लीम धर्मादाय संस्थांकडून देणग्या मिळविल्या. दलितांसह सर्वांनाच उच्च शिक्षण देण्यासाठी बाबासाहेबांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना (८ जुलै १९४५) केली. या संस्थेने मुंबईत 'सिद्धार्थ कला व विज्ञान महाविद्यालय' (२० जून १९४६), औरंगाबादमध्ये 'मिलिंद कला व विज्ञान महाविद्यालय' (१९५०) व 'सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय' (१९५३), मुंबईत सिद्धार्थ लॉ कॉलेज' (१९५६) इ. ), महाविद्यालये व त्यातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे सुरू केली. ही महाविद्यालये चालविण्यासाठी बाबासाहेबांनी जातधर्म न पाहता विद्वान मंडळींना आपल्या संस्थेतघेतले.सरकारने प्राथमिक शिक्षणाची गती व त्यावरील खर्च वाढवावा, शाळेतील गळतीचे प्रमाण रोखावे, दलित विद्यार्थ्यांना शाळेत व वसतीगृहात प्रवेश मिळावा, त्यांना शहरात भाड्याने घर मिळावे यासाठीही बाबासाहेबांनी प्रयत्न केले. अर्थात, बाबासाहेबांचे हे शैक्षणिक कार्य केवळ दलितांपुरतेच मर्यादित नव्हते तर स्त्रिया, कामगार, मध्यमवर्ग, गरीब या सर्वांसाठी होते. त्यांनी गरीब व होतकरू विद्यार्थ्याला उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठविण्याचा उपक्रमही राबविला. १९४५ मध्ये २० विद्यार्थी अमेरिकेत व इंग्लंडमध्ये पाठविले.

४) **जाणीव जागृतीची चळवळ -** दलितांना आपल्या न्याय हक्कांची व आपल्यावर होणाऱ्या अन्यायअत्याचाराची जाणीव व्हावी व त्यांनी चळवळीस प्रवृत्त व्हावे तसेच उच्च जातींची सद्सद्विवेकबुद्धी जागृत होऊन दलितांच्या चळवळीस त्यांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा म्हणून बाबासाहेबांनी अनेक वृत्तपत्रे काढली व जाणीवजागृतीची चळवळ चालविली. त्यांनी मूकनायक हे पाक्षिक (१९२०), बहिष्कृत भारत हे नियतकालिक (१९२७) आणि समता व जनता ही वृत्तपत्रे (१९२८) सुरू केली. त्यामधून दलितांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यातील अग्रलेखातून सामाजिक सुधारणांची बुद्धिवादी दृष्टिकोनातून मांडणी केली. परिणामी, दलित चळवळीत दलितांबरोबरच अनेक दलितेतर व्यक्तींचा सहभाग वाढत गेला. समाजात जाणीव जागृतीसाठी पत्रकारितेबरोबरच बाबासाहेबांनी साहित्य निर्मितीही केली. त्यांनी लिहिलेल्या विविध ग्रंथामुळे (हू वेअर शूद्राज, दि अनटचेबल्स, ॲनिहिलेशन ऑफ कास्ट, बुद्ध अँड हिज धम्म इ.) वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, अस्पृश्यता इत्यादींच्या दुष्परिणामांची लोकांना जाणीव होण्यास मदत झाली.दलित चळवळीस पोषक ठरेल असे हे साहित्य आहे.

५) **राज्यघटनानिर्मिती -** ब्रिटिश राजवटीत सुरू झालेली डॉ. आंबेडकरांची दलित चळवळ स्वातंत्र्योत्तर काळातही चालूच राहिली. स्वतंत्र भारतात सवर्णांच्या बरोबरीने दलितांना समान हक्क मिळावेत म्हणून डॉ. आंबेडकरांनी महत्प्रयासाने राज्यघटना समितीत प्रवेश मिळविला व मसुदा समितीचे अध्यक्ष बनले. ही घटना दलित चळवळीच्या दृष्टीने उपयुक्त ठरली. कारण बाबासाहेबांनी स्वतंत्र भारतात समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय प्रस्थापित होईल, दलितांवरील अनिष्ट निर्बंधांचे उच्चाटन होऊ त्यांना विकासाची समान संधी मिळेल व राजकीय लोकशाहीबरोबरच सामाजिक-आर्थिक

लोकशाहीही प्रस्थापित होईल यासाठी अनेक घटनात्मक तरतूदी केल्या. त्यातून सवर्णांबरोबरच दलितांनाही मूलभूत अधिकार मिळाले.अस्पृश्यता व वेठबिगार प्रथा कायद्याने नष्ट व झाली. दलितांना शिक्षणसंस्था, शासकीय नोकऱ्या व कायदेमंडळ व स्थानिक स्वशासन इत्यादीत राखीव जागा मिळाल्या. त्यामुळे त्यांच्या उन्नतीच्या प्रक्रियेस वेग आला. एकंदरीत दलितांच्या न्याय हक्कांना घटनात्मक व कायदेशीर अधिष्ठान बाबासाहेबांनीमिळवून दिले.

६) **धर्मांतराची चळवळ -**सवर्ण हिंदूंची मानसिकता बदलून त्यांनी जातीभेद व अस्पृश्यतापालन सोडावे व दलितांना समानतेने वागवावे म्हणून बाबासाहेबांनी आटोकाट प्रयत्न केले. हिंदू धर्मात व समाजव्यवस्थेत अनेक सुधारणा सुचविल्या. पण दुर्दैवाने तसे घडत नव्हते. उलट हिंदू लोक त्यांना विरोध करीत राहिले. त्यामुळे हिंदू धर्माचा त्याग करण्याचे विचार त्यांच्या मनात घोळत राहिले. यातूनच येवला (नाशिक) येथील एका सभेत त्यांनी 'मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.' अशी घोषणा केली (१९३५). पुढे कोणता नवीन धर्म स्वीकारावयाचा याचा निर्णय घेण्यासाठी सर्व धर्मांचा चिकित्सक अभ्यास केला व शेवटी भारतभूमीतच उदयास आलेल्या व स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय, मानवता, नैतिकता यांचा पुरस्कार करणाऱ्या बौद्ध धर्माचा स्वीकार त्यांनी लाखो अनुयायांसह नागपूर येथे (१४ ऑक्टोबर १९५६) केला व बौद्धधर्माच्या प्रसाराची चळवळ चालविण्याचे घोषित केले. मात्र त्यानंतर अल्पकाळातच त्यांचे निधन झाले (६ डिसेंबर १९५६). त्यांनी जुलै १९५१ मध्ये भारतीय बौद्ध जनसभा स्थापन केली होती. १९५५ मध्ये तिचेच रूपांतर करून भारतीय बौद्ध महासभा स्थापन केली. त्यांचे धर्मांतर हे केवळ धार्मिक गोष्ट नव्हती तर समताधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या चळवळीचाच एक भाग होती. धर्मांतरामुळे दलितांना नवीन ओळख व अस्मिता मिळाली. त्यांचा आत्मविश्वास वाढला.

अशाप्रकारे, डॉ. आंबेडकरांनी दलित उद्धाराची चळवळ अत्यंत तळमळीने व झुंजारपणे चालविली. त्यासाठी दलितांना 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' असा धारदार संदेश दिला. मात्र हा संघर्ष अहिंसक व सनदशीरच असावा असेही ठासून सांगितले. त्यामुळे आजही दलित वर्ग आपल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी संघर्ष करीत असला तरी त्याने फुटीरतेची मागणी (द्रविडीस्थान, खलिस्तानप्रमाणे) कधीही केलेली नाही. हा बाबासाहेबांच्या विचाराचाच परिणाम आहे. 'आपण प्रथमही व नंतरही भारतीयच आहोत.' हे त्यांचे विधान त्यांच्या राष्ट्रप्रेमाचीच प्रचिती देते. त्यांच्या दलित बांधवांविषयीचा जिव्हाळा हा जातीय वा संकुचित स्वरूपाचा नव्हता तर मानवताप्रेरक व मानव्यपोषक होता. त्यांच्या दलित उद्धाराच्या चळवळीत शोषित, वंचित, पीडित, दुःखी व दरिद्री घटकांच्या उत्थानाची व पर्यायाने मानवी प्रतिष्ठा व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याची आकांक्षा होती. त्यामुळे ते खऱ्या अर्थाने 'मानवतेचे उद्गाते व म्हणून महामानव' ठरतात.

**संदर्भ :**


1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (विचार आणि चळवळ) - प्रा. चंद्रकांत रघुनाथ पाटील
2) डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी - कृष्णा मेणसे
3) क्रांतीप्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर –मेश्राम योगेंद्र

# शिक्षण व शील – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. डॉ. प्रशांत बाबुराव बिरादार**
संस्कृत विभागप्रमुख महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर.

**प्रस्तावना –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन खूपच हालाकीचे गेले. अतिशय कठीण, विपरित परिस्थितीत सुद्धा त्यांना त्यातून बाहेर पडायचा एकमेव मार्ग दिसला तो म्हणजे शिक्षण. शिक्षणाचे महत्व त्रिकालाबाधित आहे. कोणत्याही काळी शिक्षणाचे महत्व नाकारता येत नाही. यामूळे सर्वच महापुरूषांनी शिक्षणाचा महिमा गायिला आहे. शिक्षणाविना जीवन पशुवत् मानले जाते. पण याच शिक्षणाचा अधिकार भारतात स्त्री व शुद्रापासून हिरावून घेतले गेल्याने त्यांची खूप दुरावस्था झाली व त्यासाठी संघर्ष करावा लागला. त्यांच्या स्वतःच्या अनुभवामूळे त्यांनी शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले.

**शिक्षण –**

प्राचीन काळी गुरूकुलीय शिक्षण पद्धती होती. त्यात वर्णानुसार शिक्षण दिले जायचे. या शिक्षणात प्रथम तीनच वर्णांना शिक्षण दिले जायचे. चौथा वर्ण शूद्र व स्त्रियांना हा अधिकार नव्हता. हळुहळु तो एका वर्णाचा धंदा वा स्वधर्म झाला व परंपरागत बनला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांना शिक्षणाचा आग्रह करतात. विद्या अर्जन केले पाहिजे. विद्येविना मति गेली.....इत्यादी म्हणणाऱ्या महात्मा फुले यांना त्यांनी गुरू मानले होते. ते स्वतः 18 तास अध्ययन करत असत. याबाबत ते म्हणतात, प्रथम प्रथम कंटाळा येई. परंतु निश्चयाने तासन्तास अभ्यास करण्याची सवय जडवून घेतली. विद्यार्थ्यांचा त्रास होत होता, तेव्हा मी माझ्या खोलीची खिडक्या–दारे बंद करून व कानात बोळे घालून अभ्यासाला बसत असे. अभ्यासाची वेळ दररोज थोडी थोडी वाढवून मी बारा–बारा तास सलगपणे अभ्यास करू लागलो. पुढे पुढे तर अठरा तास बैठक मारून अभ्यास करू लागलो.........लायब्ररीमधे अभ्यास करण्यासाठी मी सर्वांच्या आधी जात असे, व सर्वांच्या शेवटी बाहेर पडत असे.[1]

शिक्षणाप्रमाणेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकारणालाही खूप महत्व दिले आहे. राजकारणात शिरल्याशिवाय आपल्यावरचा अन्याय पूर्णपणे दूर होणार नाही हे त्यांना चांगलेच अवगत होते म्हणून त्यांनी अध्यापनाचे कार्य सोडून राजकारणात प्रवेश केला. विद्यार्थ्यांनाही ते राजकारणाचे महत्व सांगतात पण अध्ययन करताना नाही. अध्ययन करताना राजकारणात लक्ष घालु नये असे त्यांचे मत आहे. ते म्हणतात, 'या बाबत एका ग्रंथकर्त्यांचे सुभाषित मला आठवते. If you want success you must be narrow minded- वरील म्हणण्यात फार मोठा अर्थ भरलेला आहे. कारण एकटा मनुष्य सर्वच गोष्टी करू म्हणेल तर तसे करणे त्याला अशक्य होईल. तेव्हा श्एक ना धड भाराभर चिंध्या यासारखे कोणतेही एक कार्य धड न करता अनेक कार्यांना हात घालणे योग्य नाही.[2]

प्राथमिक शिक्षण तर सर्वांनीच घ्यावे. त्यांच्या मते हे शिक्षण सर्वांना सक्तीचे असावे. पण त्याच बरोबर ते उच्च शिक्षणाचाही आग्रह धरतात. सर्वांनी उच्च शिक्षण सुद्धा आवर्जुन घेतले पाहिजे असे त्यांचे मत आहे. आपण घेतलेल्या शिक्षणाचा फायदा स्वतः सह इतरांनाही व्हायला पाहिजे. म्हणून शिकलेल्या लोकांनी समाजाभिमुख व्हायला हवे. ते म्हणतात की, 'शिकलेली माणसे नुसती पोटभरू असून भागणार नाही. ज्यांना स्वार्थापलीकडे काही दिसत नाही; ज्यांना थोडाही परार्थ करता येत नाही ती माणसे नुसती शिकली म्हणून काय झाले? त्यांचा दुसऱ्याला उपयोग काय? 'तव्याचा जाय बुरसा, मग तो सहजच होय आरसा' शिक्षणाचा उपयोग असा झाला पाहिजे.[3]

**संस्कार –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर लहानपणापासून चांगले संस्कार झाले होते. त्यांचे वडील त्यांना रामायण महाभारतातील कथा सांगत, पुस्तके वाचायला प्रेरित करीत असत. यामूळे त्यांनी शिक्षणासोबतच संस्काराला व शीलाला महत्व दिले आहे. त्यांच्या मते केवळ शिक्षणाने योग्यता येत नाही. 'केवळ शिक्षण घेतले म्हणजे योग्यता आपणास येते असे मला वाटत नाही. मनुष्य विद्वान झाला की, तो समाजाला उपयुक्त होतोच असे नाही. विद्वान मनुष्य लुच्चा, लबाड, उसण्या, लटपट्या आणखी वाटेल त्या दुर्गुणांचा असतो.'[4]

शीलाचे महत्त्व ते शिक्षणापेक्षाही जास्त असल्याचे सांगतात. केवळ शिक्षण भयंकर आहे. त्याला शिलाची जोड असली पाहिजे. कारण केवळ विद्या ही एखाद्या धारदार तलवार इ. प्रमाणे शस्त्र आहे. ते ज्यांच्याकडे शील नाही अशांच्या हाती गेल्यास त्याचा दुरूपयोग होतो असे त्यांचे मत होते. ते म्हणतात की, विद्या ही तरवारीसारखी आहे. परंतु तिचे महत्त्व तिला धारण करणाऱ्यावर अवलंबून राहील. कारण अडाणी मनुष्य कोणास फसवू शकत नाही. फसवावे कसे हेच त्याला उमगत नाही. परंतु शिकल्या–सवरलेल्या लोकांच्या ठिकाणी कोणास कसे फसवावे व त्या फसविण्यासाठी लागणारा युक्तिवाद असल्याने खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे ते भासवू शकतात. ........लबाडी करण्यास चातुर्य व बुद्धी लागते. परंतु चातुर्य व बुद्धी हिला सदाचाराची अर्थात शीलाची जोड मिळाली तर तो लबाडी अगर फसवाफसवी करू शकणार नाही आणि म्हणून शिकल्या–सवरलेल्या लोकांत शीलाची अत्यंत जरूरी आहे. शीलाशिवाय जर शिकले–सवरलेले लोक निपजू लागले तर त्यांच्या शिक्षणातच समाजाचा व राष्ट्राचा नाश आहे. तेव्हा शीलाची शिक्षणापेक्षा किती अधिक किंमत आहे हे तुमच्या ध्यानी आले असेलच आणि म्हणून प्रत्येक इसमात प्रथम शील असले पाहिजे.[5]

सर्वांनी शिक्षण घ्यावा असा त्यांचा आग्रह होता. पण त्यासोबतच त्यांना संस्कार हीन विद्येची खूप भीती वाटत होती. कारण ती एखाद्या हत्याराप्रमाणे असते. तिचा वापर कसा करावा हे वारणाऱ्यावर अवलंबून असते. एखादा विद्यारूपी हत्याराचा वापर अबलांचे, गोरगरीबांचे संरक्षण करण्यासाठी करील तर ज्याच्या अंगी शील नसलेला असा एखादा त्याचा वापर अबलांना व गोरगरीबांना त्रास देण्यासाठी करतो. अशांना हिंस्त्र पशुपेक्षाही क्रूर समजावे असे त्यांचे मत होते. याविषयी ते म्हणतात, 'अशातऱ्हेने गरीब जनतेस नाडण्याकडेच जर या शिक्षणाचा उपयोग होणार असेल तर धिःकार असो अशा या शिक्षणाचा. त्या दृष्टीने पाहता शिक्षणापेक्षा शील फार महत्त्वाचे आहे.'[6]

**धर्म –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु धर्माची खूप टिका केली असली तरी ते धर्माचे महत्व जाणत होते. त्यांनी सर्वांना निधर्मी व्हा असा संदेश दिला नाही. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच अंगी धर्म जोपासायला सांगितला. त्यांनी बौद्ध धर्म स्विकारला होता. त्यातील महात्मा गोतम बुद्धाने सांगितलेले शीलाचे महत्व त्यांना पटले होते. आपल्यातील शिक्षणाचा चांगला उपयोग करायचा असेल तर धर्माची आवश्यकता असल्याचे ते सांगतात. जसे– अलिकडील तरुणात धर्माबद्दल औदासिन्य दिसते. धर्म हा गांजा आहे असे ते म्हणतात. परंतु माझ्यात ज्या काही चांगल्या गोष्टी असतील व माझ्या शिक्षणाचा जो काही जनतेसाठी उपयोग झाला असेल तो सर्व माझ्यात असलेल्या धार्मिक भावनेमुळेच होय. मला धर्म हवा आहे, परंतु धर्माचे ढोंग नको.[7]

सर्वांनी धार्मिक बनले पाहिजे. आपणाला शिक्षणाची आवश्यकता तर आहेच पण केवळ शिक्षणाने माणूस आत्मकेंद्री बनतो. तो समाजाला आपल्यातील मागे पडलेल्या बांधवांना विसरतो स्वतःच्याच कुटुंबात रमतो. तसेच शील नसल्याने तो कधी कधी भंयकरही होऊ शकतो. आपल्या अंगी संस्कार, शील

असण्यासाठी धर्म आवश्यक आहे. ते म्हणतात, 'आपण धार्मिक बनावयास पाहिजे. आपण शिकलो म्हणजे सर्वकाही झाले असे नाही. शिक्षणाचे महत्त्व आहे यात शंका नाही.............परंतु त्याचे शील चांगले नसेल तर तो आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांचे अकल्याण करण्याकडेही खर्च करील, शील हे धर्माचे मोठे अंग आहे.'[8]

धर्माविषयी त्यांचे विचार खूप प्रगत होते. स्वातंत्र, समता आणि न्याय ही तत्वे धर्मात असायला हवी. समाजातील सर्वच बांधवाची काळजी धर्मात घ्यायला हवी. कोणत्याही एका वर्गाला विशेषाधिकार धर्मात असायला नको. हिंदु धर्मापेक्षा महावीर, गोतम बुद्ध यांच्या तत्वांनी त्यांना प्रभावित केले होते. धर्माविषयी ते म्हणतात, 'धर्म म्हणजे सत्य आहे हे आम्ही शिकले पाहिजे. नहि सत्यात्परो धर्मः ! हेच आपले ध्येय असायला पाहिजे. आपण केव्हाही इतरांना दुखविता कामा नये, हीच आमच्या धर्माची खरी शिकवण असली पाहिजे. सत्य शोधण्याच्या कामात माणसाला पूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे,[9]

**संदर्भ –**


1 डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भाषणे आणि विचार, खंड–२ पृ.२७

2. (पुणे येथे डी. सी. मिशनच्या हॉलमध्ये अस्पृश्य विद्यार्थी संमेलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले अध्यक्षीय भाषण. (जनता रू १ आक्टोबर, १६३८)

3. विद्यार्थ्यांनो जागृत व्हा! शैक्षणिक मार्गदर्शक / १०३

4. (धारवाड जिल्ह्यातील बहिष्कृतांची पहिली परिषद धारवाड येथे २८ डिसेंबर १६२६ येथे भरली होती. त्या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी केलेले अध्यक्षीय भाषण. (ज्ञानप्रकाश, १ जाने. १६३०)

5. विद्यार्थ्यांनो जागृत व्हा! शैक्षणिक मार्गदर्शक / 60

6. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भाषणे आणि विचार, खंड–२ पृ.४५

7. तत्रैव पृ.४५

8. विद्यार्थ्यांनो जागृत व्हा! शैक्षणिक मार्गदर्शक / १०३

9. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भाषणे आणि विचार, खंड–२ पृ.64

# ग्रामीण अर्थव्यवस्था नाकारणारे डॉ बाबासाहेब

**डॉ. विलास पाटील**

प्रोफेसर , संशोधन मार्गदर्शक आणि मराठी विभागप्रमुख, ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर -431509 जि. परभणी

**प्रास्ताविक :**

भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे विसाव्या शतकातील भारतीय सामाजिक राजकीय विचारवंत कर्ते सुधारक, भाषातज्ञ, संपादक, इतिहासतज्ञ म्हणून सर्व परिचित आहेत. यात एक प्राध्यापक, आणि जागतिक पातळीवरील आर्थिक विचारवंत आणि अर्थतज्ञ म्हणून सर्वसामान्य माणसांमध्ये ते अपरिचित आहेत.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वज्ञात आहेतच त्याचप्रामणे एक प्रकांडपंडित, नामवंत शिक्षणतज्ञ, पत्रकार, महान समाजसुधारक आणि दीन दलितांचे कैवारी म्हणून देखील डॉ. आंबेडकरांची प्रतिमा जनमानसामध्ये रुजली आहे. त्यांच्या बहुरंगी आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष पैलू सर्वसाधारण जनतेला अपरिचित आहे, तो म्हणजे एक अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांची कामगिरी.(रायखेलकर : १९९९:२११)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्रात एम.ए.(१९१५) आणि पीएच.डी. (१९२४) अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून केली. त्यांच्या एम.ए.च्या प्रवंधाचा विषय Administaetion and finence of the east India company , पी.एच.डी. चा विषय The Evolution Of Provincial Finance In British India ; तर इंग्लंड येथील डी.एस.सी ही पदवी बाबासाहेबांना The problem of the Rupee, its origin and its solution या विषयासंबंधी मिळाली. अर्थशास्त्र या विषयासंबंधी डॉ. बाबासाहेबांच्या या संशोधनांना जागतिक पातळीवरील अर्थशास्त्रज्ञ डॉ. सेलिग्मन आणि डॉ. कॅनन यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. तसेच त्यांनी बर्ट्रॉन्ड रसेल यांच्या Economics of war reconstruction या जागतिक ग्रंथाचे परखड असे टीकात्मक परीक्षण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अभ्यासाची तुलना थोर विचारवंत आणि अभ्यासक कार्ल मार्क्स यांच्याशी करता येईल असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**विषम ग्रामीण व्यवस्था :**

महाराष्ट्रात नागवंशीय दलित समाजाची हजारो वर्षापासून परवड अर्थात दुरवस्था होती. ग्रामीण अर्थव्यवस्था दलितांचे सर्वांगांनी शोषण किती भिषण पद्धतीने करायची या संदर्भात Alexander Robertson लिहितात,

१) महारकीच्या जागेबरोबरच वतनदार महारांना शतकानुशतके मिळालेले, युगायुगात बदलत जाणारे अन्य हक्क व विशेष अधिकार प्राप्त झाले आहेत. दक्षिणेतील महारांना असे काही कागदपत्र मिळाले की ज्यांच्यात त्यांची कर्तव्ये व मोबदला यांचा उल्लेख आहे. सगळयात जुनी ह्या बाबतची सनद मी इ.स. १९२९ किंवा शके १८५१ च्या श्रावण महिण्यातील शुक्ल पक्षाच्या त्रयोदशीला एका रविवारी मुंगी पैठणच्या गोदावरी नदीच्या तीरावरील एकदा पाहिली. ती वर नाशिक, जुन्नरखेड, पुणे, पंढरपूर, विदर, पैठण येथील पाटील व कुळकर्ण्यांनी प्रशस्तीच्या सह्या केल्या आहेत. कोणत्या जनावराच्या पाठीवर बसून जावे हे त्यात लिहिले होते. जेवणावळीत मरणप्रसंगी व लग्न कार्यात दिलेल्या सेवेबद्दल वेगवेगळया जातींच्या लोकांकडून महारांनी काय मागावे,

ह्याबद्दलच्या सूचनांची एक यादी नंतर मिळाली. त्यावेळी त्यांना प्रत्येक मरणात व प्रत्येक लग्नात साडेतीन रुपये मिळत असत. त्यांचे सगळे येणे १ आण्याचे होते. कधीकधी पैशाबरोबर भाकरी मिळत असे. राबत्या म्हणजे सरकारी नोकरीत असलेल्या महाराला नोकरीबद्दल देशमुख व कुळकर्ण्याच्या घरून भाकरी व त्याच्या बायकोला पाटलाच्या घरून भाकरी मिळत असे. मेलेली गुरेढोरे ओढण्याचे आणि हाडोळयापर्यंत नेण्याचे काम फक्त महाराचे , तर मेलेली डुकरे ओढण्याचे काम मांगाचे होते. लग्नात मांगांना फेटा व लुगडे मिळत असे; पण त्याबद्दल पाच दिवसापर्यंत मांगाने सर्पणाची सेवा पुरवावी असा दंडक होता. (रॉबर्टसन : १९९१:३५)

२) सरकारी नोकरी करताना महाराला जर झाडूची आवश्यकता भासली तर मांग तो तयार करून पुरवत असे . खेड्यातील इतर बलुतेदारांना आवश्यकतेनुसार महार जनावराचे कातडे पुरवीत असत , पण प्रत्येक कातड्यामागे त्यांना जमीनीवरची फळे मिळत असत व प्रत्येक कातड्यामागे मानाचा घाटा मिळत असे. वाणी महाराला दररोज तंबाखु व सुपारी पुरवीत असे व विड्याची पाने विकणारा पाने पुरवीत असे. पानात तंबाखू घालून विड्या पिनाऱ्यास विड्या पिण्यास मिळत असत. न्हावी महाराला महिण्यातून एकदा हजामत करून देत असे. तेली दररोज तेल पुरवत असे, आपला खेळ दाखवणारे प्रत्येक खेळाचा महाराला एक पैसा देत असत. कुंभाराने गव्याने भट्टीतून नुकत्याच बाहेर काढलेल्या मातीच्या भांड्यांपैकी पाच भांडी महाराला द्यावी लागत. लोहार महाराचा गवत कापण्याचा विळा व कु-हाड पाजवून देत असे ; तर चांभार त्याचे जोडे साफ करुन देत असे. भट त्याचे लग्न लावून देत असे व त्याबद्दल ब्राम्हणाला दहा पैसे मिळत असत. संक्रांतीच्या सणाच्या वेळेला मांग नव्हे तर महारच शेतामध्ये हुरडा खाण्यासाठी जागा तयार करून देत असे. दिवाळीच्या ओवाळणी प्रसंगी सरकारी खजिन्यात भरण्यासाठी महार चार रुपये गोळा करीत असे. गावपांढरीकडून वेसकरला ह्या सणावेळी दोन रुपये मिळत असत. होळीची मिळकत , पोळ्यातील बैल पूजेची मिळकत महाराची असे. (कित्ता) अर्थात धर्मांतरपूर्व दलित समाजाची ही करुण अवस्था; खेड्यातील सनातन सामाजिक जातीव्यवस्था अधोरेखित करते. तसेच तत्कालीन काबाडकष्ट आणि तुटपुंजा आर्थिक मोबदला यावर वरील उतारे प्रकाश टाकतात.

आर्थिक दुरवस्था :

मराठी भाषिक आणि निजामकालीन मराठवाडा येथील दलितांची आर्थिक बाजू निर्देशित करताना Alexander robertson सांगतात, पैठणच्या स्वामी एकनाथाच्या मंदिरात मिळालेल्या सनदेची भाषा पाहिली म्हणजे व मंदिराचे नाव पाहिल्यानंतर महाराच्या सेवेबद्दलची परिस्थिती व वेतन कसेकसे बदलत गेले हे दिसून येते. जागोजागी फिरुन आपले खेळ दाखवणारे लोक प्रत्येक खेळाच्या वेळी महाराला सहा पैसे देत. या अगोदरच्या कागदपत्रात असे सांगितले होते की, बागाइतदाराने महाराला जी फळे द्यायला पाहिजे ती म्हणजे आंबा, जांब किंवा पेरू, नारळ, केळी, गोडलिंब व टरबूज ही होत. ह्यानंतरच्या कागदपत्रांप्रमाणे महाराला दररोज १५ ऊस मिळतात आणि शेरभर गूळ मिळतो; पण सणाच्या वेळी त्याने काम केले पाहिजे. सरकारी नोकरीसाठी ज्याचे नाव नियुक्त झाले आहे. अशा महाराने खेड्यातल्या वेशीवर तोरण लावले पाहिजे. लग्नप्रसंगी वरावर शिंपडलेल्या पाण्यात, वधू-वरावर टाकलेल्या अक्षतात जे पैसे ठेवलेले असतात; ते महाराला मिळतात. लग्नसमारंभात त्याला पागोटे, लुगडे आणि पाच दिवस जेवण मिळते. तसेच, सामान्य माणसाघरचे लग्न असल्यास साडे सहा रुपये मिळतात. ह्या समारंभातील जनावराची कातडी महाराला मिळत नाही. पण त्याऐवजी त्याला कापलेली जनावरे, नेसलेली लुगडी व फुटलेली भांडी मिळतात. खेड्यातील जमातीने पूजेचा विषय म्हणून उल्लेखलेली देवी म्हणजे भादेवी हिच्या

पूजेवेळी त्याला दोन रुपये मिळतात. मरीआई व लक्ष्मीपुजेवेळी होणाऱ्या मिळकतीत मांगांना हिस्सा मिळणार; असे दुसऱ्या कागदपत्रात लिहिलेले आहे. (कित्ता : ३६)

अर्थात दलित समाजाची वरील दुरवस्था आणि आर्थिक ओढाताण यास भारतीय समाजरचना आणि येथील धर्म जबाबदार, म्हणून डॉ. बाबासाहेबांना इ.स. १९५६ मध्ये धर्मांतर करावे लागले.

दलित माणसाला इतर वर्णीयांकडून अस्पृश्यतेची वागणूक दिली जाई अर्थात गलिच्छ उद्योग हे अस्पृश्यतेचे कारण नाही हे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, एखादा ब्राम्हण किंवा क्षत्रिय अगर वैश्य जर गुलाम असेल तर तो संडास सफाईचे काम करीत असे. एखादा ब्राम्हण क्षत्रियाच्या, वैश्याच्या किंवा शूद्राच्या घरचा संडास साफ करु शकत नव्हता एवढाच त्याचा अर्थ आहे. तथापि, त्याला ब्राम्हणाच्या घरचा संडास साफ करावा लागत असे. त्याच प्रमाणे एखादा क्षत्रिय गुलाम ब्राम्हणाच्या किंवा क्षत्रियाच्या घरचा संडास साफ करीत. केवळ शुद्राच्या धरीच तो तशा प्रकारची कामे करीत नसे. यावरुन उघडपणे दिसून येते की आर्य म्हणून मान्य असलेले ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य हे सुद्धा अत्यंत गलिच्छ समजले जाणारे संडास साफ करण्याचे काम करीत होते. संडास साफ करण्याचे काम जर आर्यांना घृणास्पद वाटत नव्हते तर अस्पृश्यतेचे मूळ कारण गलिच्छ उद्योग करणे हे आहे, असे कसे म्हणता येईल ? (Ambedkar:२०१२:७७) तर, अस्पृश्यतेचे उगमस्थान आर्थिक दुरवस्थेमध्ये आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ठाम मत होते.

**अर्थशास्त्रीय विचाराचे महत्त्व :**

स्वातंत्र्य समता व बंधुत्व यावर आधारलेली समाजव्यवस्था निर्माण करणे हे बाबासाहेबांच्या जीवनाचे ध्येय व तेच त्यांचे तत्त्वज्ञान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. त्यांनी सैद्धांतिक, व्यावहारिक तसेच आर्थिक दृष्टिकोनातून भारतीय अर्थविकासाची नाडीपरीक्षा केली आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात भांडवलशाही ही श्रमिकांची, गरिबांची शत्रू आहे. संपूर्ण रोगाचे मूळ कारण आहे. (खंदारे : २०११ : ३६३ )

डॉ. बाबासाहेबांनी राज्य समाजवादाची (Concept of state socialism) संकल्पना मांडली, त्यांनी वेळोवेळी भारतीय अर्थव्यवस्था, समाज, राजकिय व्यवस्था, वेठबिगार, जातीयता, अस्पृश्यता, उद्योग विषयक, आर्थिक, शेतमजुरांविषयी, औद्योगिक श्रम (Industrial labour), कृषिविषयक, आर्थिक, श्रम संघटनेविषयक, आर्थिक धोरणविषयक, समाजसुधारणविषयक या संबंधी आपले विचार मांडले, आणि संपूर्ण जगाला आपल्या कामगारविषयक आर्थिक विचारांची देन दिली. अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार शोषणमुक्त समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत असे आपणास म्हणता येईल.

शेवटी अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारासंबंधी विश्वास कदम म्हणतात ,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रतिभावान व असामान्य प्रज्ञा लाभलेले विचारवंत होते. त्यांचे कार्य सामाजिक क्षेत्रात तसेच राजकिय क्षेत्रात ठळकपणे दिसून येत असले तरी , ते खऱ्या अर्थाने अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी तत्कालीन परिस्थितीत मांडलेले अर्थशास्त्रीय विचार काळाच्या सीमा ओलांडणारे होते. अर्थशास्त्राचे तात्त्विक व व्यावहारिक अशा दोन बाजूंनी त्यांनी केलेले विवेचन परिपूर्ण आहे. त्यानी केलेली चलणविषयक समस्येची चर्चा मुलभूत स्वरूपाची आहे. पाश्चात्य विचारवंताचे विवेचन हे कसे सदोष आहेत; हे पुराव्यासह स्पष्ट करण्याची धमक त्यांच्यात होती. भारतीय अर्थव्यवस्था येथील सामाजिक, शैक्षणिक, राजकिय परिस्थिती यांचा सुक्ष्म अभ्यास डॉ.

बाबासाहेबांनी केलेला होता. त्यामुळेच अर्थशास्त्रीय विचारांची मांडणी करताना या सर्व घटकांचा प्रभाव त्यामध्ये आढळतो. (कदम : २००७ : ३२९ )

कदम  यांनी डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचे केलेले वरील मूल्यमापन सार्थ आहे; असे म्हणता येईल .

**संदर्भ ग्रंथ :**

१. रायखेलकर ए.आर. - आर्थिक विचारांचा इतिहास, विद्या बुक्स, औरंगाबाद १९९९, पृ. २११

२. रॉबर्टसन अलेक्झांडर, सुगत प्रकाशन, नागपूर, १९९१, पृ. ३५

3. Ambedkar, B.R., The untouchables, Aanand Prakashan Aurangabad, २०१२पृ ७७

४. खंदारे, एस.एम. - जागतिक आर्थिक विचारांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०११, पृ ३६३ ,

५. कदम विश्वास, - आर्थिक विचारांचा इतिहास, नक्षत्र प्रकाशन, औरंगाबाद, २००७, पृ. ३२९

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जात निर्मूलनासंबंधी विचार आणि कार्य

**डॉ. मारोती दशरथ कसाब**
मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

**" जाती ना पुछो साधू की**
**पूछो उसका ग्यान**
**किंमत करो तलवार की**
**पडा रहने दो म्यान "**
**- संत कबीर**

प्रस्तावना :

'जाती व्यवस्था' ही या देशातील सर्वांत मोठी समस्या बनली असून, अनेक महामानवांनी जातीच्या निर्मूलनासाठी कार्य करूनही जात नावाच्या हरळीचे मूळ अजूनही भारताबाहेर निघायला तयार नाही. भारतीय समाजात आज असंख्य समस्या असल्या तरी या सर्व समस्यांच्या मुळाशी जातीव्यवस्था आहे. वाढत्या जातीय अस्मितांमुळे समाजात द्वेषाची भावना माजलेली आहे.

आधुनिक काळात जातीचेही जागतिकीकरण होऊन भारतातली जात समस्या मिटेल ही आशा आता भाबडी ठरली असून, जागतिकीकरणाच्या काळात जातिसंस्था अधिक तीव्रपणे कार्य करू लागलेली आहे. जात, धर्म आणि भांडवली व्यवस्थेची भिंत अधिकच पक्की होत आहे. ही जटील आणि गुंतागुंतीची शोषण व्यवस्था वरचेवर मजबूत होत चालली आहे, हेच वर्तमान काळात घडत असलेल्या सामूहिक जातीय अत्याचारांच्या घटनांतून दिसून येत आहे. भारतीय विचारवंत, तत्त्वज्ञ, कलावंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांसाठी सध्या 'जातिनिर्मूलन करणे' हाच एक कळीचा आणि महत्त्वाचा मुद्दा बनलेला आहे.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण भारतीय संविधान स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० पासून रीतसर त्याची अंमलबजावणी सुरू केली, तेव्हाही एकदा अशाच जातीअंतासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या, विचारवंतांच्या आणि कलावंतांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. मात्र त्यानंतर सत्तेवर आलेल्या सत्ताधाऱ्यांनी संविधानाची आणि त्यातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय आदी मानवी मूल्यांची अवहेलनाच केली. त्यामुळे पुन्हा एकदा जातीअंताची चळवळ हाती घेणे आवश्यक बनले असून त्यासाठी पूर्वसुरींनी केलेले कार्य आणि दिलेले योगदान याची आठवण करणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या जात निर्मूलन संबंधी कार्याचा आणि त्यांच्या जात निर्मूलन विषयक विचारांचा शोध प्रस्तुत निबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जात वास्तव :

डॉ. भीमराव उर्फ बाबासाहेब आंबेडकर ( १८९१ - १९५६ ) हे माता भीमाई आणि सुभेदार रामजी सपकाळ यांचे चौदावे अपत्य. कोकणातील आंबडवे हे त्यांचे मूळ गाव. त्यांचा जन्म तत्कालीन धर्म व्यवस्थेने अस्पृश्य ठरविलेल्या महार जातसमूहात झाला. नोकरीमुळे काही प्रमाणात आर्थिक स्थैर्य प्राप्त झालेले असले तरी,

जातीचे आणि अस्पृश्यतेचे दाहक चटके भीमरावांच्या बाल मनाला बसलेच. सातारा येथील इंग्रजी शाळेत दाखल होण्यास अनेक अडथळे आले. शाळेत दाखल झाल्यानंतरही त्यांना शाळेतील पिण्याच्या पाण्याच्या माठाला स्पर्श करण्यास मज्जाव करण्यात आला. सातारा ते मुंबई या प्रवासात रेल्वे स्टेशन पर्यंत जाण्यासाठी जेव्हा ते आपल्या भावंडांसह एका बैलगाडीत बसले, तेव्हा त्यांची जात कळताच गाडीवानाने त्यांना खाली उतरविले. एवढेच नव्हे तर महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या संस्थानात नोकरी करीत असताना सेवक सुद्धा त्यांना नीट वागणूक देत नसत. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विविध प्रसंगी जातीय द्वेष आणि भेदभावाचे अनुभव आले. प्रचंड ज्ञान संपादन करुनही येथील जनतेच्या मनातील जात जात नाही, हे येथील जात वास्तव त्यांनी ओळखले. त्यामुळे त्यांनी आपल्या ज्ञानाच्या आणि संघटनेच्या बळावर भारतातील जाती व्यवस्थेच्या निर्मूलनासाठी कार्य केले.

**डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जातिनिर्मूलनविषयक विचार :**

मॅट्रिक पास झाल्याबद्दल मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जाहीर सत्कार करण्यात आला होता. त्याप्रसंगी गुरुवर्य अर्जून कृष्णराव केळूसकर यांनी स्वतः लिहिलेले 'बुद्ध चरित्र' त्यांना भेट दिले होते.त्यांचे वडील रामजी सपकाळ हे कबीरपंथी होते. त्यामुळे घरातच महात्मा कबीरांच्या क्रांतिकारी दोह्यांचे पठण होत होते. भीमरावांना वाचनाची सवय लागावी म्हणून रामजी जिथे गेले तिथून पुस्तके विकत आणत होते. रामायण महाभारतासारखे ग्रंथ त्यांनी लहानपणीच वाचले होते. या सर्व वाचनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संशोधक-लेखक व्यक्तिमत्व घडत होते. मॅट्रिक पास झाल्यानंतर बडोदा नरेश महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीतून पुढील शिक्षण घेण्यासाठी ते अमेरिकेला गेले. अमेरिकेत जाऊन त्यांनी मानववंश शास्त्राचा अभ्यास केला. त्यावेळी परीक्षेचा एक भाग म्हणून त्यांनी जो निबंध सादर केला, त्याचे शीर्षक होते - ' कास्ट इन इंडिया : देअर मेकॅनिझम, जेनेसिस अँड डेव्हलपमेंट'. या शोधनिबंधातून त्यांनी भारतातील जाती संस्थेचा उगम, तिचा विकास, कार्यपद्धती आणि तिची वैशिष्ट्ये याबाबत अत्यंत सुस्पष्ट विचार मांडले होते. हा निबंध लिहिताना त्यांनी पाश्चात्य समाजशास्त्रज्ञ सेनार्ट, नेसफिल्ड आणि रिसले यांच्याबरोबरच भारतीय समाजशास्त्रज्ञ केतकर यांच्याही विचारांचा परामर्श घेऊन त्यांच्या मर्यादा दाखवून दिल्या होत्या व जातिसंस्थेच्या उत्पत्ती संबंधी स्वतःची स्वतंत्र अशी उपपत्ती मांडली होती. ' हा निबंध म्हणजे एक उत्तम समाजशास्त्रीय अभ्यासाचा दस्तावेज असल्याचा निर्वाळा अमेरिकेतील एका मान्यताप्राप्त नियतकालिकाने दिला होता.' ( डोळस, जातिव्यवस्थेचे निर्मूलन - डॉ. बी. आर. आंबेडकर, पृ.एक ) त्या नंतर तब्बल वीस वर्षांनी १९३६ साली जाती निर्मूलनासंबधी अत्यंत मूलगामी विचार मांडणारे ' ॲनहिलेशन ऑफ कास्ट' अर्थात ' जाती व्यवस्थेचे निर्मूलन' हे पुस्तक प्रकाशित झाले. लाहोर येथील जात-पात तोडक मंडळाने आयोजित केलेल्या १९३६ च्या वार्षिक परिषदेत जनतेसमोर देण्यासाठी हे भाषण बाबासाहेबांनी लिहिले होते, मात्र संयोजकांनी ऐन वेळी ही परिषदच रद्द केल्यामुळे बाबासाहेबांना ते भाषण प्रकाशित करावे लागले. या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकूणच जातिववस्थेचा उगम , जातीची उत्पत्ती, तिचा व्यवहार आणि विकास त्याचबरोबर जातीमुळे होणारे नुकसान सांगून भारतातील जाती नष्ट करण्याचे उपाय सुद्धा सांगितलेले आहेत. आजही जाती निर्मूलनासाठी हे विचार अत्यंत उपयुक्त असे आहेत.

भारतातील जात हे फक्त श्रमाचे विभाजन नाही; तर ते श्रमिकांचेही विभाजन आहे. म्हणून केवळ आर्थिक विकास करून चालणार नाही; तर व्यक्तीचा सामाजिक विकास साधला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला सारखी प्रतिष्ठा

मिळाली पाहिजे. त्याचे स्वातंत्र्य म्हणजे त्याच्यावर इतर कोणाचे वर्चस्व असता कामा न ये. हे स्वातंत्र्य त्याला व्यवसायाचेही हवे असते. मात्र भारतात जातिव्यवस्थेमुळे व्यवसायाचे स्वातंत्र्य व्यक्तीला नाही. इच्छा असो किंवा नसो; त्याला वाड वडिलांचा -पर्यायाने जातीचाच व्यवसाय करावा लागतो. बाबासाहेब या भाषणामध्ये पुढे म्हणतात

"ज्या व्यवस्थेत माणसाचे मन व बुद्धी त्याच्या कामात वापरली जात नाही, त्या व्यवस्थेत कार्यक्षमता कशी असू शकेल ? सामाजिक दंडकाच्या मागणीपुढे व्यक्तीला आपल्या नैसर्गिक क्षमता आणि प्रवृत्तीला दुय्यम स्थान द्यावे लागत असल्याने आर्थिक व्यवस्था म्हणून जात ही एक हानिकारक संस्था आहे. ( डॉ. आंबेडकर, जातिव्यवस्थेचे निर्मूलन, पृ. २८) ते पुढे म्हणतात -

"जातीची परिणती आर्थिक कार्यक्षमतेत होत नाही. जात ही वंश सुधारणा करू शकत नाही आणि तिने तसे केलेही नाही. तथापि जातीने एक गोष्ट केली आहे, ते हिंदूंना संपूर्णपणे विघटित आणि नाउमेद केले आहे. " ( डॉ. आंबेडकर, पृ.३०)

जात ही एक मानसिक विकृती असून ती नष्ट करण्यातच देशाचे भले आहे. जात नष्ट करण्यासाठी केवळ सहभोजने किंवा आंतरजातीय विवाह करून चालणार नाही; तर ज्यातून ही जात मानसिकता तयार होते, ते कथित धर्मग्रंथ नष्ट केले पाहिजेत. भेदभाव शिकविणारे ग्रंथ नष्ट केले पाहिजेत. कुठलीही गोष्ट शाश्वत नाही. सनातन नाही. प्रत्येक गोष्ट बदलत असते. व्यक्ती तसेच समाजासाठीही बदल हाच जीवनाचा नियम आहे, हे मान्य केले पाहिजे. म्हणून गंजलेली कालबाह्य जात नष्ट केली पाहिजे हे सांगताना बाबासाहेब लिहितात, " जात हा हिंदुंचा श्वास आहे याबाबत वादच नाही. परंतु हिंदूंनी भोवतालची हवासुद्धा दूषित करून टाकलेली आहे. शिख, मुस्लिम आणि ख्रिश्चन अशा सर्वांनाच जातीची लागण झाली आहे. जर तुम्ही स्वराज्याचे रक्षण करू शकत नसाल, तर ते मिळविण्यात काही अर्थ नाही. माझ्यामते हिंदू समाज जेव्हा जाती विहीन होईल, तेव्हाच तो स्वतःचे रक्षण करण्यास समर्थ होईल. आंतरिक शक्तीच्या अभावी हिंदूंसाठी स्वराज्य हे फक्त गुलामीच्या दिशेने टाकलेले एक पाऊल ठरू शकते. "

हा इशारा बाबासाहेबांनी या भाषणाच्या शेवटी दिलेला असून, तो आज तंतोतंत खरा ठरला आहे.

जात निर्मूलन कार्यात डॉ. आंबेडकरांचे योगदान :

'काय करू आतां धरूनियां भीड ।
नि:शंक हे तोंड वाजविलें ।।
नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण।

सार्थक लाजून नव्हे हीत ।। ' ( नरके ( संपा. ), डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, पृ.३४५) हे संत तुकोबांचे वचन प्रमाण मानून आणि वृत्तपत्राच्या शीर्षस्थानी ठेवून बाबासाहेबांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मुंबईहून 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. पहिल्या अंकाच्या मनोगतात ते लिहितात,

"जर या हिंदुस्तान देशातील सृष्ट पदार्थांच्या व मानव जातीच्या चित्रपटाकडे प्रेक्षक या नात्याने पाहिले तर हा देश म्हणजे केवळ विषमतेचे माहेरघर आहे; असे निःसंशय दिसेल. या हिंदी जनात वसणारी विषमता अनेक स्वरूपाची आहे. हा मांग, हा ब्राम्हण, हा शेणवी, हा मराठा, हा महार, हा चांभार , हा कायस्थ, हा पारशी, हा

कोरी, हा वैश्य इत्यादी भिन्न जातींचा हिंदुधर्माच्या पोकळीत समावेश होतो. हिंदू धर्मीयांत असलेली ही विषमता जितकी अनुपम आहे; तितकीच की निंदास्पदही आहे.

उघड भाषेत बोलावयाचे म्हणजे जाती-जातीत असलेल्या या उच्च-नीच भावना गुणावगुणांच्या पायावर झालेल्या आहेत असे नाही. उच्च जातीत जन्मलेला मग तो कितीही अवगुणी असो; तो उच्च म्हणावयाचा. तसेच नीच जातीत जन्मलेला, मग तो कितीही गुणी असो; तो नीचच राहायचा." ( नरके संपा. पृ. ३४६) अशा प्रकारे आपल्या सार्वजनिक जीवनाची आणि सामाजिक कार्याची सुरुवातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती निर्मूलनापासून केलेली दिसून येते.

या देशातील जातीयता आणि अस्पृश्यता नष्ट व्हावी यासाठी त्यांनी आपल्या प्राणांची बाजी लावली. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या मदतीने त्यांनी आपल्या जाती निर्मूलन विषयक कार्याला मोठी गती दिली. महाराजांनी स्वतः बाबासाहेबांना माणगाव दख्खन अस्पृश्य परिषदेला निमंत्रित केले आणि या परिषदेचे अध्यक्षपदही दिले. बाबासाहेबांच्या आग्रहावरूनच महाराज नागपूरच्या अस्पृश्य निवारण परिषदेला गेले. तिथे त्यांनी जात व्यवस्थेला नष्ट करण्याचा संकल्प केला. महाराजांच्या मदतीने बाबासाहेबांनी परदेशात राहिलेले उच्च शिक्षण पूर्ण केले. या देशातून जातीचे निर्मूलन झालेच पाहिजे यावर दोघांचेही एकमत होते. 'मूकनायक' वृत्तपत्राला महाराजांनी भरभरून मदत केली आणि या वृत्तपत्रातून बाबासाहेबांनी जाती निर्मूलन विषयक प्रबोधन केले. पुढे 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'समता' आणि 'प्रबुद्ध भारत' आदी वृत्तपत्रांतूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातनिर्मूलन विषयक शिकवण दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ बोलके सुधारक नव्हते; तर ते कृतिशील क्रांतिकारक होते. म्हणून त्यांनी आपल्या भाषणांतून, लेखनातून जाती निर्मूलन विषयक विचार मांडले; त्याचबरोबर त्यांनी प्रत्यक्ष कृतीतूनही जाती निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला हे महत्त्वाचे आहे. चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, नाशिकच्या काळाराम मंदिराचा प्रवेश सत्याग्रह, अमरावतीचा अंबादेवी मंदिर सत्याग्रह, महार, मांग, चांभार आदी जातींच्या एकत्रित परिषदा इत्यादी कार्यक्रमांतून त्यांनी जात निर्मूलनाचे कार्य केले. आणि शेवटी नागपूर येथे तथागत गौतम बुद्धाचा समतामूलक बुद्ध धम्म स्वतः स्वीकारून आपल्या हजारो अनुयायांना दीक्षा दिली. भारतातील तमाम बहुजनांना या कृतीतून त्यांनी जात मुक्तीच्या दिशेने एक नवा मार्ग दाखविला. ज्या वाटेवरून आता मातंग, चर्मकार, बंजारा आदी अनेक जाती-जमातींसह ओबीसी, भटके विमुक्त, आदीवासी निघालेले आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेले बौद्धमय भारताचे स्वप्न म्हणजेच जाती मुक्त भारताचे स्वप्न होय.

**संदर्भ सूची-**

१. नरके हरी (संपा.), ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक' ( मराठी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, बॅरॅक नंबर १८, मंत्रालयासमोर मुंबई-२१, द्वितीय आवृत्ती २००८.

२. आंबेडकर डॉ. बी. आर. 'जातीव्यवस्थेचे निर्मूलन' मराठी अनुवाद प्रा. प्रकाश सिरसट, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२, प्रथमावृत्ती- २०१५.

३. आंबेडकर डॉ. बाबासाहेब, ' शूद्र पूर्वी कोण होते' मराठी अनुवाद- चां. भ. खैरमोडे, प्रबुद्ध भारत प्रकाशन, पंचशील नगर, बुद्ध विहारामागे नागपूर -१७, प्रकाशन तिथी- २४ ऑक्टोबर २०१२.

# 21 वे शतक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विधि विषयक विचार

**डॉ. टेंकाळे सुवर्णा उमाकांत**

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती.

संसद, कार्य पालिका, न्याय पालिका हे राज्याचे मुख्य तीन अंगे आहेत. हया तिन्हींच्या माध्यमातून कायद्याचे राज्य चालते. संसद कायदे बनवते. कार्य पालिका या कायद्यांची अंमलबजावणी करते आणि न्याय पालिका कार्यपालिकेच्या कामाची न्याय संमत व्याख्या करते. तेंव्हा राज्याच्या या तीन प्रमुख अंगांची तुलना करता, डॉ. आंबेडकर असे मानतात की, वरील तिन ही पैकी कार्य पालिका हे राज्याचे प्रमुख अंग आहे.[1]

डॉ. आंबेडकर असे मानतात की, या देशातील लोकांमध्ये जातीवाद आणि सांप्रदायिकता ही पूर्णपणे भिनलेली आहे. दु:ख हे नाही की, समाजात जातीवाद व सांप्रदायिकता आहे, तर खरे दु:ख हे आहे की, या जातीवाद व सांप्रदायिकतेचा एका वर्गाला फायदा होतो तर, दुसऱ्या वर्गाला याचे नुकसान सहन करावे लागते. आंबेडकरांच्या मते, या सांप्रदायिकतेच्या भावनेने न्याय पालिकेला ग्रासलेले आहे. एवढेच नाही तर, न्याय पालिकेने आपल्या महत्तेचा दुरूपयोग केला आहे आणि स्वत:ला विकले आहे.

डॉ. आंबेडकरांना असे वाटे की, आपली न्यायव्यवस्था ही कार्य पालिकेपासून स्वतंत्र असली पाहिजे. म्हणजेच कार्यपालिकेचे न्यायपालिकेवर वर्चस्व नसले पाहिजे. एवढेच नाही तर, न्याय पालिका कार्यक्षमही असली पाहिजे. ही दोन्ही उद्दिष्टे कशी साध्य करता येतील हा खरा प्रश्न त्यांच्या समोर होता. आंबेडकरांनी देशभरात एकच न्याय यंत्रणा असावी असे मत आग्रहाने मांडले व त्या मताचा स्वीकार करण्यात आला आहे. [2]

भारतीय संघराज्यात न्याय संस्था द्विदल पद्धतीची नाही. सर्वोच्च न्यायालये व उच्च न्यायालये ही एकाच अविभक्त न्याय संस्थेचे भाग आहेत. न्याय प्रक्रियेतील भिन्नता टाळण्यासाठी हे करण्यात आले आहे. मात्र अमेरिकन संघराज्यात संघराज्याची न्यायसंस्था आणि राज्यांची न्यायसंस्था वेगवेगळया आणि एकमेकांपासून स्वतंत्र आहेत. एकच न्यायसंस्था एकच दिवाणी व फौजदारी कायदे आणि महत्त्वाच्या शासकीय पदासाठी एकच नागरी सेवा यातीन उपायांनी, संघराज्य असलेला हा आपला भारत देश मूलभूत गोष्टीतील समानतेमुळे आपले ऐक्य टिकवून शकेल असा विश्वास डॉ. आंबेडकरांना वाटत होता. सद्य:स्थितीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, आंबेडकरांचा हा विश्वास सार्थ ठरलेला आहे.

वकीली व्यवसायातून काही आर्थिक लाभ मिळणार नाही हे माहित असूनही त्यांनी वकीली व्यवसाय यासाठी निवडला की, तो स्वातंत्र्य देतो आणि समाजकार्य करण्यासाठी मुक्त वेळ ही. डॉ. आंबेडकरांना वकीली व्यवसाय फार आवडायचा. पण या व्यवसाया विषयी जनमानसात जो आदर पाहिजे त्यांना तो दिसून येत नव्हता. तसेच, भारतात वकीलांवर बरेच आरोप देखील केले जात होते. मध्यवर्ती सरकारातून मुक्तता झाल्यावर ते स्वत:ला वकीलीसाठीच वाहून घेणार होते. डॉ. आंबेडकरांच्यामते, आज या देशात लायक असे वकील फार थोडे आहेत आणि लायक वकील नसतील तर, न्यायव्यवस्थेची अधोगती होईल.[3] आज या व्यवसायाला अवनतकळा आलेली आहे.[4] याचे एक कारण म्हणजे, या व्यवसायात काम करणारे लोक निवृत्त होऊन तरूण वकिलांना संधी देत नाहीत.

अर्थात, व्यवसायाची प्रतिष्ठा राहावी म्हणून तरूण वकीलांना संधी दिली जाणे आवश्यक आहे.[5] आज एकविसाव्या शतकात भारताच्या न्यायव्यवस्थे पुढील मोठी अडचण म्हणजे योग्य व पात्र वकिलांची कमतरता हे होय. डॉ. आंबेडकरांच्या मते, हा व्यवसाय करतेवेळी काही अडचणी आल्या तरी नीतिमत्ता ही राखली गेलीच पाहिजे. परंतु मला असे वाटते की, आज या व्यवसायातील नैतिकता दिवसेंदिवस लोप पावत चाललेली आहे. सद्य:स्थितीत हव्यासाच्यापाठी मागे बेभान होऊन अवाजवी आर्थिक हव्यासापोटी धावत चाललेल्या मानवाने यापवित्र व्यवसायाचे रूपांतर धंद्यात केले आहे. त्यामुळे आपल्या देशातील सर्वसामान्य नागरिकांचे जीवन पराकोटीच्या आर्थिक विपन्नावस्थेत सापडले आहे. तसेच डॉ. आंबेडकरांना असे वाटत की, वकीलांनी इतर सर्व कामकाजाचे महत्त्व ओळखून राष्ट्राची सेवा करावी म्हणजेच वकीलांनी सामाजिक उत्तरदायित्वाची भावना जोपासावी असे त्यांना वाटत होते. परंतु आज या व्यवसायात सामाजिक उत्तरदायित्वाची भावना लोप पावत चाललेली दिसून येते.

न्यायालयातील भाषा कोणती राहावी या विचाराने आंबेडकरांचे मन व्यग्र होत असे. काहींच्या मते, न्यायालयातील भाषा इंग्रजी असावी तर, काहींच्या मते ही हिंदी राहावी. आंबेडकरांचा असा अनुभव होता की, कायद्यातील शब्द हे स्थानिक भाषेतून व्यक्त करता येत नाहीत. त्यामुळे स्थानिक भाषा, न्यायालयाची भाषा होणे सर्वांसाठी फायद्याचे होणार नाही. तसेच जर स्थानिक भाषा ही न्यायालयाची भाषा झाली तर, राज्यकारभारात ही अनेक अडचणी निर्माण होतील. राष्ट्रभाषा ही न्यायालयात उपयोगात आणल्या वर राष्ट्रभाषेला तिचे योग्य स्थान हे मिळेलच असे आंबेडकरांना वाटत होते. गांधींच्या मते, राष्ट्रभाषेतून विधिव्यवसायाचे शिक्षण दिले तर राज्य व्यक्तीचे नसून कायद्याचे आहे या संकल्पनेला अर्थ प्राप्त होईल. म्हणजेच आंबेडकर व गांधी या दोघांनाही असे वाटते की, राष्ट्रभाषा ही न्यायालयाची भाषा असावी. आंबेडकरांच्या काळात कोर्टात फक्त इंग्रजी भाषेतून कामकाज चालायचे. परंतु आज परिस्थिती बदललेली आहे. आज न्यायलयामध्ये प्रादेशिक भाषेतून, राष्ट्रभाषेतून, इंग्रजीभाषेतून न्यायालयीन कामकाज चालते. परंतु अंतिम न्याय निवाड्याची भाषा ही इंग्रजीच आहे. कारण, इंग्रजी भाषेतील शब्दांचे न्यायालयीन अर्थ हे इतर भाषे प्रमाणे द्वयर्थी अथवा बह्वर्थी नसतात. यातून न्यायालयाला अपेक्षित असाच न्यायाचा अर्थ निघतो.

भारतीय न्यायपालिकेच्या विकासात डॉ. आंबेडकरांचे फार मोठे योगदान आहे. विशेषत: न्यायपालिकेला स्वतंत्र करण्यासाठी त्यांनी फार मोठा संघर्ष केला होता. ते भारतीय न्यायव्यवस्थेवर संतुष्ट नव्हते. उलट त्यांनी न्यायव्यवस्थेत अनेक सुधारणा सुचविलेल्या होत्या. त्यांची महत्त्व पूर्ण सुधारणाही न्यायालया ऐवजी न्याय देणाऱ्या न्यायाधीशां संदर्भात आहे. त्यांनी मुंबई विधानसभेमध्ये ग्रामपंचायत बील यावर बोलत असताना असे म्हटले होते की, 'दिवाणी आणि फौजदारी प्रकरणात न्याय देण्यापूर्वी न्यायाधीशांनी सर्व प्रथम तीन अपेक्षांची पूर्तता केली पाहिजे. त्याला कायद्याचे ज्ञान असले पाहिजे. त्याचा दृष्टीकोन नि:पक्षपाती असला पाहिजे, तसेच तो आपल्या कामात स्वतंत्र असला पाहिजे.'[6] परंतु दुर्दैवाने आज वकीली व्यवसायात पर्यायाने न्याय मंदिरात राजकीय हस्तक्षेप व श्रीमंत लोकाचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. त्यामुळेच कायदा हा सैल पडलेला आहे असे मला वाटते. स्वतंत्र व निर्भिड न्याय प्रणाली हा लोकशाहीचा प्राण आहे. परंतु आज न्याय देवता राजसत्तेची बटीक होऊ पाहत आहे.

डॉ. आंबेकरांनी न्यायाधीशांचा निष्पक्ष दृष्टिकोन यासंदर्भात चर्चा केली आहे. जेव्हा आंबेडकरांना विचारले गेले की, भारतीय न्यायाधीश हे निष्पक्ष असण्याची शक्यता आहे का? तेव्हा आंबेडकरांनी याचे उत्तर नकारार्थी दिले. न्यायाधीश नि:पक्षपाती असला पाहिजे अशी आंबेडकरांची अपेक्षा होती. परंतु दुर्दैवाने आज तसे दिसून येत

नाही कारण, बरेचसे न्यायाधीश हे सेवानिवृत्ती नंतर सरकारी मेहरबानीने राजदूतादी पदे मिळवीत असे वागताना दिसून येतात. याचाच अर्थ न्यायमूर्ती जसजसे निवृत्तीकडे झुकू लागतात, तसतसे त्यांचा कल मोठ मोठ्या राजकारण्यांना श्रीमंतांना सोईस्कर निर्णय देण्याकडे होऊ शकतो. याचाच अर्थ आज भारतीय न्यायाधीश हे न्यायनिवाड्यात पक्षपाती पणा करतात.

डॉ. आंबेडकर स्वत: बॅरिस्टर होते. त्यांचा न्यायव्यवस्थेच्या कामकाजाशी अत्यंत निकटचा संबंध होता. डॉ. आंबेडकर, पोलिसांना आणि न्यायाधीशांना भ्रष्ट पेक्षा जास्त वर्ग पक्षपाती मानतात. ते लिहितात, 'पोलीस आणि न्यायाधीश कधी-कधी भ्रष्ट होतात. परंतु जर ते केवळ भ्रष्ट असते तर, स्थिती इतकी वाईट झाली नसती. कारण की, एक भ्रष्ट अधिकारी कोणत्याही पक्षाकडून खरेदी केला जाऊ शकतो. परंतु मोठी अडचण या गोष्टीची आहे की, पोलिस आणि न्यायाधीश नेहमी भ्रष्टपेक्षा अधिक पक्षपाती असतात. डॉ. आंबेडकर न्यायाधीशांवर देखील नियंत्रण ठेवू इच्छितात. ते न्यायपालिकेचा सन्मान करतात. परंतु असे ही मानतात की, अन्य अधिकाऱ्यांप्रमाणे न्यायाधीश देखील भ्रष्ट होऊ शकतात. त्यामुळे न्यायाधीशांना पदावरून बाजूला काढण्याची कायद्याजवळ कोणती तरी पद्धत असणे आवश्यक आहे.'[7] त्यांच्या दृष्टिकोनातून न्यायाधीश हा काही सर्वोच्च नाही.

डॉ. आंबेडकर म्हणतात, अमेरिकेत न्यायाधीशां सारखीपदे ही सिनेटच्या संमतीने भरावी लागतात. परंतु आपल्याकडील परिस्थिती विचारात घेतली तर, जबाबदारीची जीजाणीव तिकडे आढळते ती त्याप्रमाणात इकडे आढळत नाही. निवृत्तीच्या व यासंबंधी बोलताना आंबेडकरांनी हे मान्य केले आहे की, पासष्ट हे वय सर्वांच्या बाबतीत बुद्धीच्या कार्यक्षमतेचा अंत नसतो. सेवानिवृत्त न्यायाधीशांना परत नेमण्याचा अधिकार संविधानात मुख्य न्यायाधीशांना देण्यात आला आहे. जेथे न्यायिक बुद्धिमत्ता आवश्यक आहे, त्याठिकाणी निवृत्त न्यायाधीशांचा उपयोग करून घ्यावा लागेल. मात्र न्यायाधीशांची सेवा चालू असताना शासकीय जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपविण्यास आंबेडकरांनी विरोध केला आहे. लोकसेवा आयोगाच्या सदस्यांना त्यांच्या निवृत्ती नंतर कायद्याचे दुसरे अधिकार पद स्वीकारता येत नाही. याच पार्श्वभूमीवर न्यायाधीशावर ही बंधन घालण्यात यावे अशा सूचना करण्यात आल्या होत्या. त्याला आंबेडकरांनी विरोध केला आणि सांगितले की, लोकसेवा आयोग व सरकार यांचे जेवढे घनिष्ठ संबंध असतात, तसे उच्चन्यायालय व सरकार यांचे नसतात. म्हणून आयोगांच्या सदस्यांसाठीचे निर्बंध न्यायाधीशांना लावू नयेत.

अमेरिकेत सेवानिवृत्ती नंतर पूर्ण पगारच पेन्शन म्हणून मिळतो तर इंग्लंडमध्ये पगाराच्या जवळजवळ सत्तर ते ऐंशी टक्के रक्कम पेन्शन म्हणून मिळते. भारतात न्यायमूर्तींना अगदीच नगण्य पेन्शन मिळते हे लक्षात घेवून सेवा निवृत्तीनंतरच्या अधिक बंधनांना डॉ. आंबेडकरांनी विरोध केला.[8] इंग्लंडमध्ये सेवानिवृत्तीचे वय सत्तर आहे तर, आपल्या भारतात सेवानिवृत्तीचे वय खूपच कमी (त्यावेळी साठ) निश्चित केले आहे.

आंबेडकरांच्या काळात न्यायालयांमध्ये अस्पृश्यांना प्रवेश नाकारलेला होता. त्यामुळेच हायकोर्टाने न्यायालयात अस्पृश्यांना प्रवेश मिळाला पाहिजे असे परिपत्रक काढलेले होते. म्हणजे गरिबांना न्यायालयात जाण्यासाठी पहिली समस्या ही अस्पृश्यता होती. मला असे वाटते, माणसे कायद्यासाठी नसून कायदा हा माणसांसाठी आहे. त्यामुळे न्याय मिळवताना कोणत्याही व्यक्तीची आर्थिक स्थिती, त्याचा धर्म, जात, पंथ हे अडचणीचे ठरू नयेत. डॉ. आंबेडकरांच्या मते, गरिबांना न्यायालयात जाण्यासाठी दुसरी समस्या येते ती पैशांची

होय. आज ही न्यायालयांमध्ये कायदेशीर लढाई लढणे हे खूप महागडे बनले असून गरीब लोकांच्या अक्षरश: आवाक्या बाहेर गेले आहे.

डॉ. आंबेडकरांच्या मते, न्यायालये व्यवस्थित पणे कामकाज पाहत नाहीत. एकतर ते भ्रष्टाचारात मग्न असतात किंवा श्रीमंत आणि जमीनदारांच्या सोबत सहानूभूती ठेवतात. आजही परिस्थिती फारशी बदललेली नाही. आज विधि व्यवसायातील विविध पद्धतींच्या निकृष्टतेत इतकी वाढ झाली आहे की, वकील पक्षकारांकडून पैसे घेऊन त्याला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात. अतिरिक्त धन कमावण्याच्या लालसेपोटी प्रकरण लवकर संपवू देत नाहीत. एका पक्षाचा वकील दुसऱ्या पक्षाच्या वकीलाला चोरून भेटतो, त्याला पैसे देऊन अंतर्गत गुप्त गोष्टी जाणून घेतो. हा एक प्रकारचा न्याय व्यवस्थेतील भ्रष्टाचारच होय.

लोकशाहीत कायदा सर्वांसाठी समान, हितकर असला पाहिजे. कायदे हे मानव निर्मित असल्यामुळे परिस्थिती सापेक्ष परिवर्तनीयता कायद्याच्या अंगी असायला पाहिजे हे आंबेडकरांना मान्य होतेच. पण कायद्यापेक्षा घटनात्मक नीतिमत्तेला अधिक प्राधान्य देतात. लोकशाहीचा सर्वात मोठा आधार हा लोकांची सद्सद्विवेक बुद्धी असते. कायदा हा सामाजिक व मानवी असून त्याचा परिणाम सार्वत्रिक स्वरूपाचा झाला पाहिजे. कायद्याचा पुरस्कार सक्तीने किंवा शिक्षेच्या भीतीने होता कामानये. व्यक्तीच्या मनाची धारणा व सामाजिक हेतूच्या विशालतेवर कायदा अवलंबून असावा असे त्यांना वाटत होते.

**संदर्भ ग्रंथ:**


1) डॉ. धर्मवीर, डॉ. आंबेडकरके प्रशासनिक विचार, वीणा प्रकाशन, दिल्ली, प्रथम संस्करण, 2004, पृ.73. 82. 87
2) चपळगावर नरेंद्र, भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री विद्या प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, 1 जुलै 1994, पृ. 84,85
3) मुन वसंत व नरकेहरी (संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-18, भाग-3, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चारित्र साधने व प्रकाशन समिती, महाराष्ट्रशासन, मुंबई, प्रथमावृत्ती, 15 ऑक्टोबर 2002, पृ.224.

# समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. दत्ता रामचंद्र कांबळे**
सहा.प्रा. मराठी विभाग,लोकमान्य महाविद्यालय,सोनखेड ता. लोहा जि. नांदेड

डॉ. भिमरावरामजी तथा बाबासाहेब आंबेडकर हे मानवतेचे कैवारी, राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. त्यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी मध्यप्रदेशातील 'महू' या गावी झाला आहे. त्यांचे वाडवडील हे महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील अंबावडे या गावाचे रहिवासी आहेत. त्यांचा जन्म हिंदू धर्मातील 'महार' या अस्पृश्य जातीत झाला. डॉ. बाबासाहेब यांचे प्राथमिक शिक्षण दापोलीतच झाले. सातार्‍यात त्यांनी माध्यमिक शिक्षण घेतले व मुंबईतील एल्फिन्स्टन हायस्कुल मधून मॅट्रिक उतीर्ण झाले. पुढे एल्फिन्सटन महाविद्यालयातून त्यांनी बी. ए. ची पदवी 1912 मध्ये संपादन केली. बडोदा येथून महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या मदत आणि पाठिंब्यामुळे बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठातून एम. ए. आणि पीएच. डी. या पदव्या संपादन केल्या आहेत. पुढे त्यांनी एम. एस. सी. बॅरिस्टर व डी.एस.सी. या पदव्या लंडन विद्यापिठातून संपादन केल्या आहेत. डॉ. आंबेडकरांचे वाचन अफाट होते. त्यांच्या प्रचंड ग्रंथसंग्रहाकडे दृष्टीक्षेप टाकलाकी हे लक्षात येते. त्यांचे अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र तत्वज्ञान, इतिहास, मानवशशास्त्र, धर्मशास्त्र, कायदा मानसशास्त्र, साहित्य व कला आदी ज्ञानशाखातील त्यांचे प्रभुत्व सर्वोच्चस्थानी आहे. डॉ. आंबेडकरांनी विपुल लेखन केले आहे. त्याचे (1) Annihilation of Cast (2) Who were the Shudras (3) Castes in India (4)Ranade, Gandhi and Jinnah(5) States and Minorities (6) Revolution and Counter Revolution(7) Philosophy of Hindu Religion (8) Buddha and his Dhama(9) The problem of Rupee (10) The evolution of Provincipal finance in British India (11) Small Holdings in India and their remedies (12) Emancipation of th untouchables (13) On Parlimentary Democracy, (14) Labour and Parliamentary Democracy(15) Pakistan or partition of India (16) The rise and fall of Hindu women. (17) Buddism and Communism, (18) Thought on linguistic satate. इत्यादी ग्रंथप्रसिध्द आहेत. त्यांनी समाजसुधारणेवर स्वातंत्र ग्रंथ लिहिला नाही. परंतू त्यांनी समाजसुधारणे संबंधी वरील ग्रंथात लिखाण केलेले दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुढील कार्याच्या आढाव्यावरून त्यांची समाजसुधारकांची भूमिका विशद करण्यात येत आहे. अमरावती येथील अंबादेवी मंदिर सत्याग्रह (1972), महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन (1927), सायमन कमिशन पुढे साक्ष (1928), नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रह (1930), पुणे करार (1932), जातिप्रथेचे उन्मुलन (1936), 'मुक्ती कोनपथे (1936), स्वतंत्र मजुरपक्षाची स्थपना (1936), अखिल भारतीय शेड्युल्डकास्ट फेडरेशनची स्थापना (1942), हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित (1951) इत्यादी त्यांच्या कार्यावरून त्यांना समाजसुधारक म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रसिध्दा समाज सुधारक आहेत. महाराष्ट्रातच नव्हे तर संबंध भारतामध्ये समाज सुधारणा केलेली आहे. त्यामुळे समाज सुधारकाच्या यादीत त्याांचे स्थान वरच्या स्थानी आहे. डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजात विविध सुधारणा केलेल्या ओत. अस्पृश्य वर्ग विविध समस्यात जीवन जगत होता. अस्पृश्य समाज मुलभूत मानवी हक्कापासून वंचित होता. त्या समाजाला हक्क आणि अधिकार प्राप्त करून देणे. तसेच अस्पृश्यांना 'शिक्का, संघटित व्हा व संघर्ष करा''. असा मौलिक संदेश दिला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध सत्याग्रह केलेले आहेत. त्यात महाड व येथिल चवदार तळे अस्पृश्यांना खूले व्हावे म्हणून त्यांनी सत्याग्रह केलेला इतिहासामध्ये लोकप्रिय आहे. त्याच प्रमाणे नाशिक येथिल काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळवून देण्यासाठी केलेला सत्याग्रह देखिल आदर्श सत्याग्रह देखिल सर्व परिचित आहे. हा संघर्ष केल्यामुळे डॉ. आंबेडकर एक समाज सुधारक म्हणून प्रकाश झोतात आले होते. अस्पृश्यांच्या उधारासाठी सामाजिक चळवळ उभी करण्याच्या दृष्टीने त्यांनी 20जुलै 1924 रोजी मुंबई येथे बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. सामाजिक व राजकीय दृष्ट्या तळागाळात फेकल्या गेलेल्यांना भारतीय समाजातील इतरांच्या बरोबर

आणणे. ह्या सभेचे ध्येय होते. तसेच डॉ. आंबेडकरांच्या समाज सुधारणा विषयक कार्याचा भाग म्हणून डॉ. आंबेडकरांनी सायमन कमिशनकडे एक पत्र सादर केले. त्यात त्यांनी मागासवर्गी यांच्यासाठी नामनिर्देशन तत्वावर जागा आरक्षित ठेवण्या संबंधीची मागणी केली. त्यात त्यांनी भू–दल, नौदल व पोलीस खातयात मागासवर्गीयांची भर्ती करण्या संबंधीची मागणी केली होती. सभे मार्फत अस्पृश्यांच्या कल्याणासाठी शाळा, वसतिग्रहे व ग्रंथालये सुरू करण्यात आलेली आहेत. हे कार्य फक्त आणि फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच केलेले आहे. या कार्यामुळे संबंध बहूजन समाजात परिवर्तन झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या समाज सुधारणा विषयक कार्यामध्ये राजकीय कार्य उल्लेखनीय स्वरूपाचे आहेत. बहूजन समाज राजकारणापासून आज ही वंचित आहे. या वंचित समाजांना राजकीय प्रवाहात आणण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केलेले दिसून येते. 1930 मध्ये लंडन येथे भरलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेस डॉ. बाबासाहेब उपस्थित होते. या परिषदेत बहुजन समाजांना राजकीय प्रवाहात सामील करण्या संदर्भात आवाज उटविला तसेच त्यांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती. महात्मा गांधीनी स्वतंत्र मतदारसंघाच्या कल्पनेस विरोध केला आणि पुणे येथील येरवडा कारागृहात त्याविरूध्द आमरण उपोषण सुरू केले. शेवटी डॉ. आंबेडकरांनी पुणे करारादृवारे स्वतंत्र मतदारसंघाची मागणी सोडून देउन त्याऐवजी कायदे मंडळात त्यांच्या करिता काही राखील जागा असाव्यात हे मान्य केले. अस्पृश्य वर्गाची स्वतंत्र राजकीय ओळख किंवा अस्मिता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी 1936 मध्ये स्वतंत्र मजुरपक्षाची स्थापना केली. 17 फेब्रूवारी 1937 मध्ये मुंबई विमिंडळाच्या निवडणूकीत त्यंच्या अथक प्रयत्नामुळे या पक्षाचे 17 पैकी 15 उमेदवार निवडून आले होते. त्यांनी राजकीय पक्षास राष्ट्रीय स्वरूप देण्यासाठी सर्व अनुसुचित जातीना या पक्षाच्या झेंड्याा खली आणण्यासाठी त्यांनी 'ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. डॉ. आंबडकरांच्या समाज सुधारण विषयक कार्यात पिपल्य एज्यूकेशन सोसायटीचा समावेश केलेला आहे. डॉ. आंबेडकरांनी 8 जलै 1945 रोजी पिपल्स एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेच्या वतीने 1996 मध्ये मुंबई सिध्दार्थ कला व विज्ञान महाविदयालय. 1950 मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविदयालय, 1953 मध्ये मुंबईत सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविदयालय. तर 1956 मध्ये मुंबइतच सिध्दार्थ विधी महाविद्यालय सुरू केले.

सदरील शैक्षणिक संस्थाच्या कार्यामुळे बहूजन समाजात अमुलाग्र परिवर्तन घडून आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विधि समाजसुधारणा विषयक कार्य केले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना थोर समाजसुधारक म्हणतात. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विविध व्यक्तीनी गौरव केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समाज सुधारणा विषयक दृष्टीकोन अनन्य साधारण स्वरूपाचा आहे. आंबेडकरांनी वर्णवर्ग विरहीत व स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मुल्यावर आधारलेला नवा समाज निर्माण केला. त्यांनी समाजातील अज्ञान, दारिद्र्य, विषमता बौध्दीक व मानसिक दास्य शोषन व दमण आदी कार्यात मुलगामी स्वरूपाचे परिवर्तन केले तसेच समाजसुधारणेच्या कार्यात आड येणारी पुरोहितषाही व भांडवलषाही त्यांनी समाप्त केली. तसेच त्यांनी कालबाह्य रूढी, परंपरा, मुल्य, तत्वज्ञान व धर्म त्यांनी नाकारलेले आहे. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक पुर्नरचना केली. सामाजिक पर्नरचनेच्या प्रक्रियेत सामाजिक कार्याची भूमिका महत्वाची राहिली आहे. आधूनिक समाजरचनेच या निर्मितित व विकासात आंबेडकरांचे योगदान आतूलनीय आहे. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात महत्वपूर्ण सुधारणा केली आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

1. डॉ. नरेंद्र जाधव 'प्रज्ञा सूर्य डॉ. आंबेडकर समग्र वैचारिक चारित्र्य ग्रंथाली प्रकाशन, मुंबई 2014.
2. रमेश चव्हाण (संपादक) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ एक मागोवा प्रकाशक, रमेशना. चव्हाण, काथरूड, पुणे, 2012.
3. नागोरव कुंभार (संपादक) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक तत्वज्ञ ज्ञन प्रबोधन प्रकाशन लातून 2021.
4. डॉ. पी.जी. जोगदंड ' दलित चळवळ' सिध्दांत आणि व्यवहार, पतिशब्द प्रकाशन मूंबई 2006.
5. डॉ. कांबळे विजया 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : समाज धर्मतत्व मीमांसा गोदा प्रकाशन,औरंगाबाद मार्च 2012.
6. डॉ. गंगाधर पानतावणे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख प्रतिमा प्रकाशन पुणे 2009.
7. लोकराज्य, ऑक्टोंबर 2006.

# धर्माची उत्पत्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धार्मिक विचार.

दत्ता दौलाजी कांबळे
संशोधक विध्यार्थी
डॉ. बी. डी. पवार
सहा. प्राध्यापक, भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर जी. लातूर

**प्रस्तावना.**

मानवी जीवनात धर्माला विशेष महत्त्व आहे. समाजजीवनाचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय, शैक्षणिक गरज हे ज्याप्रमाणे विविध पैलू आहेत. त्याच प्रमाणे समाज जीवनाचा धार्मिक पैलू देखील आहे. मानवी समाजाचा धर्म एक अविभाज्य घटक आहे. धर्माचे पारंपारिक रूप कसे होते, धर्माची उत्पत्ती कशी झाली. याबाबत निश्चित एक मत नाही, धर्माची उत्पत्ती सर्व प्रथम आदिवासी समाजात झाली. त्याचे विकसित रूप म्हणजे सभ्य किंवा प्रगत समाजातील धर्माची आजचे स्वरूप होय, असे विकासवादी अभ्यासकांनी प्रतिपादन केले आहे. धर्मात अलौकिक शक्ती सी संबंध आणि कर्मकांड आढळून येतो, म्हणून अभ्यासकांनी या दोन घटकांचा अभ्यास करून धर्माची उत्पत्ती होती. यासंदर्भात काही सिद्धांत मांडले आहेत.

**धर्म उत्पत्तीचे सिद्धांत:-**

**1) सर्वात्मावाद किंवा जीवात्मवाद सिद्धांत.**

एडवर्ड टायलर यांनी **सर्वात्मावाद** हा धर्म उत्पत्तीचा सिद्धांत मांडला. टायलर यांच्या मध्ये आदिवासी समाजापासून तर सभ्य समाजा पर्यंत धर्माचा आधार हा आत्म्याची संकल्पना आहे. आदिवासी लोकांनी मानवी जीवनात काही घटना विषयी मांडलेल्या विचारांमधून 'आत्मावाद' निर्माण झाला पाहिजे असे मत मांडले. आत्मवादात दोन प्रकारची विश्वास आढळतात. व्यक्तीचा मृत्यू झाल्या नंतर आत्मामरत नाही. म्हणजेच आत्मा अनिवासी असतो तसेच व्यक्तीच्या आत्म्या व्यतिरिक्त शक्तिशाली देव देवतांची इतर आत्मे असतात. आदिमानवाला आत्म्याचा अनुभव निद्रेत पडलेला स्वप्नातून झाला. हीच आत्मे मानवा पेक्षा श्रेष्ठ असतात. अशी आदिवासींची श्रद्धा आहे. हे आत्मे व्यक्तीच्या नियंत्रणा बाहेर असतात त्याचीच व्यक्ती वर सत्ता चालते. हे दिव्य प्राणी म्हणजे भूत-पिशाच प्रेत आत्मा हे होत त्यांचा संचार सर्वत्र असतो म्हणून या आत्म्याला प्रसन्न करण्यासाठी जी विविध प्रकारचे कर्मकांड करतात त्यातूनच धर्माची उत्पत्ती झाली. असे मत टायलरनी प्रतिपादन केले आहे.

**2) निसर्गवाद.**

मॅक्स मुल्लर यांनी निसर्गवाद हा सिद्धांत मांडला आहे. आदिमानवाचा विचार करता असे आढळून आले की, त्यांचे जीवन निसर्गाच्या सानिध्यात व्यतीत होत होते. नैसर्गिक शक्तीची वेगवेगळी रूप त्यांना अनुभवास आली, निसर्गा विषयी भय, श्रद्धा आणि आश्चर्याची भावना निर्माण झाली मानवापेक्षा श्रेष्ठ आणि शक्तिशाली असणाऱ्या शक्तीला प्रसन्न करण्याच्या उद्देशाने आदिमानव सूर्य, तारे, अग्नी, वायू पर्जन्य इत्यादी नैसर्गिक गोष्टीची आराधना करू लागला. त्यातूनच पुढे निसर्ग पूजा पद्धती निर्माण झाली. थोडक्यात निसर्गातील घटकांच्या अलौकिक संबंधीच्या विश्वातुनच धर्माचा पाया घातला आणि त्यातूनच धर्माची उत्पत्ती झाली असे मॅक्स मुल्लरचे मत आहे.

**3) धर्म उत्पत्तीचा सामाजिक सिद्धांत.**

धर्म उत्पत्तीचा सामाजिक सिद्धांत इमाइल दुर्खीम यांनी मांडला. दुर्खीम यांनी ऑस्ट्रेलिया मधील अरुणा जमातीचा अभ्यास केला आणि धर्माची उत्पत्ती सांगितली. दुर्खीम मते धर्मही एक सामाजिक घटना आहे. असे मत मांडले. धर्म ही एक सामाजिक तथ्य समजून या आधारावर धर्माची उत्पत्ती सांगितली आहे. सामूहिक जीवनातील सर्व वस्तू आणि घटना पवित्र आणि अपवित्र अशा दोन विभागात विभाजन केले आहे. धर्माचा संबंध हा पवित्र घटनांशी असतो. पवित्र वस्तू अपवित्र वस्तु पासून वेगवेगळे ठेवले जाते. पवित्र वस्तू बद्दल समाज जीवनात प्रचलित

असलेले विश्वास संस्कार व उत्सवांचा समावेश धर्मात करतात. या विश्वास संस्कार आणि उत्सवाच्या पाठीमागे समाजाची सामूहिक शक्ती असते. त्यामुळे त्यास मान्यता मिळते. यावरून हे स्पष्ट होते की धर्माची उत्पत्ती सामूहिक शक्तीतून झाली आहे.

**4) फ्रेजरचा धर्म उत्पत्ती सिद्धांत.**

फ्रेजरच्या मध्ये सर्व प्रथम आदिमानवाने जादू टोण्याचा वापर करून निसर्गावर नियंत्रण ठेवून आपल्या उद्देशाची पूर्तता करण्याचा प्रयत्न केला. आणि या प्रयत्नात आदिमानव अयशस्वी ठरला. म्हणून याविश्वात कोणती तरी अशी शक्ती आहे. जी त्यांची प्रयत्न यशस्वी होऊ देत नाही. असे त्यांना वाटू लागले म्हणून त्यांच्या लक्षात आली की त्या शक्तीवर जादूटोणा द्वारे नियंत्रण ठेवणे शक्य नाही. त्यामुळे तो त्याशक्तीची पूजा करू लागला. त्यातूनच धर्माची उत्पत्ती झाली, असे फ्रिजर मानतो. धर्माच्या उत्पत्ती संबंधी सिद्धांत मांडून मानवशास्त्राच्या, समाजशास्त्रज्ञ आणि इतर अभ्यासक आणि विविध धर्माची उत्पत्ती कोणत्या कारणाद्वारे झाली याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु याठिकाणी एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. कोणत्या एका सिद्धांताला आधारभूत मानून धर्माची उत्पत्ती सांगता येत नाही.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मा संबंधी विचार.**

धर्म माणसाचा पायाभूत आधार आहे असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बुद्धि प्रामाण्य, नितीमत्ता, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये असणारा धर्म अपेक्षित होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धार्मिक विचारातील महत्त्वाचे तत्त्व म्हणजे धर्म ही त्यांच्या दृष्टीने केवळ अध्यात्मिक प्रेरणा नव्हती. किंवा ते पार लौकिक सुखाच्या दृष्टीने धर्माचा विचार करीत नव्हते, तर धर्माचा पाया व्यक्ती जीवनाला आवश्यक आणि सामाजिक जीवनाला पोषक आहे असे आंबेडकर मानतात. मला धर्म पाहिजे. पण धर्माच्या नावावर ढोंगी पणा नको. धर्म माणसात आशावाद निर्माण करतो. कार्य प्रवृत्त करतो. धर्म हा माणसाच्या सेवेसाठी आहे. मानव धर्माचे साधन म्हणून राहता कामा नाही. समाजाच्या धारणेसाठी धर्म असतो. ते म्हणतात जो धर्म आपल्या अनुयायात यात भेद भाव करतो. त्यांच्या वर दुबळे पणा लागतो तो खरा धर्मच नव्हे. थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बुद्धिनिष्ठ, स्वातंत्र्य, समता, बंधुता असणारा धर्म अपेक्षित होता. केवळ मूर्तिपूजा ढोंगीपणा, धर्मवेडा, परंपरावादी, गुडवाद, नियमकायदेयात गुंफणारा आणि आपल्याच अनुयायात विषमता निर्माण करणारा धर्म अपेक्षित नव्हता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मासंबंधी दृष्टिकोण सांगत असताना बुद्धि प्रामाण्यवर आधारित मूल्य सांगितली. हिंदू धर्म त्यांच्या तात्विकतेच्या कसोटीत उतरू शकत नाही. या विषयी ते म्हणतात हिंदू धर्मातील तात्विकता मानवतावादाने परिपूर्ण आहे. हिंदू धर्म तत्त्वाच्या दृष्टीने जसा आहे तसा आचरणाच्या दृष्टीने नाही. हिंदु धर्म सांगतो की माणसे ही ईश्वराची लेकरे आहेत. एवढ्यावरच न थांबताते ईश्वराची रुपये आहेत. सृष्टीच्या प्रत्येक कणात ईश्वर आहे. असे तत्व सांगतो तर प्रत्यक्ष आचरणात काही अनुयायांना पाणी पिण्यासाठी, मंदिर प्रवेश , अस्पृश्य म्हणून टाळले जाते. थोडक्यात हिंदू धर्म तात्विक स्पर्श, अस्पर्शासाठी जरी समान असला तर प्रत्यक्ष आचरणात विषमता निर्माण करणार आहे.

बुद्धिप्रामाण्य, जातीप्रथा अस्पृतेची भयंकर अपसमजुती हिंदू धर्म अंतर्बाह्य विकृत झाला आहे असे आंबेडकर मानतात. हिंदू धर्मात प्रचंड दोष असून सुद्धा आंबेडकरांनी या धर्मास सुधारण्याचा प्रयत्न केला. तरी चातुर्वर्ण, जातिभेद व अस्पृश्यता यातून मुक्ती मिळणे शक्य नसल्याने 13 ऑक्टोबर 1935 रोजी नाशिक जिल्ह्यातील येवले येथील दलित वर्गीयांच्या परिषदेत आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली आणि ते म्हणाले की हिंदू धर्मात मी जन्माला आलो ही दुर्दैवी घटना आहे पण मी हिंदू म्हणून मरणार नाही.14 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांनी आपल्या हजारो अनुयाया सोबत नागपूर येथे 'बौद्ध' धर्माची दीक्षा घेतली. बौद्धधम्म हाच सद्धम्म आहे. तोच बुद्धि निष्ठ, स्वातंत्र्य, समता या देशात निर्माण करणारा हा विज्ञानवादी धम्म आहे असे ठामपणे सांगितले. सदधम्म म्हणजे काय हे सांगताना आंबेडकर म्हणतात.

१) धम्म सदधम्म व्हायचा असेल तर प्रज्ञाचा स्वीकार केला पाहिजे.
२) धमाच देशना (उपदेश) सर्वा करिता मुक्त असेल तर तो धम्म सदधम्म होतो.
३) जो मैत्रीचा पुरस्कार करतो तो धम्म सदधम्म होतो फक्त प्रज्ञेचा नाही तर शिलाची जोड असली पाहिजे अशी शिकवण असेल तरच तो धम्म सदधम्म होतो.
४) प्रज्ञा आणि शील यांच्या समवेत करुणा ही आवश्यक आहे अशी शिकवण असेल तरच तो धम्म सदधम्म होतो.
५) धम्माने माणसातील भेद भाव नष्ट केला तरच तो सदधम्म होतो.
६) माणूस जन्माने नव्हे कर्माने श्रेष्ठ-कनिष्ठ ब नतो अशी शिकवण असेल तरच तो धम्म सदधम्म होतो.

वरील प्रमाणे सर्व सदधम्म धाम्मचे गुण बौद्ध धम्मात आहेत म्हणून बौद्ध हाच धम्म सदधम्म आहे असे आंबेडकरांचे मत होते.

**सारांश:-**

भारतीय समाजव्यवस्थेत धर्माची उत्पत्ती कशी झाली याचे निश्चित उत्तर नाही. परंतु धर्माचा अभ्यास करून अनेक विचारवंतांनी धर्माच्या उत्पत्तीचे सिद्धान्त सांगून धर्माची उत्पत्ती सांगण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक धर्मात विशिष्ट प्रकारचे धार्मिक विश्वास आढळतात. असे असले तरी बौद्ध, खिश्चन, हिंदू, मुस्लीम इत्यादी धर्मातील विश्वास सारखेच नाहीत. प्रत्येक धर्मात श्रद्धा, कर्मकांड, विषयक विश्वास, मोक्ष विषयक विश्वास, पवित्र पवित्र संबंधीचे विचार धार्मिक विधी संस्कार या गोष्टी आढळून येतात आणि प्रत्येक धर्माची अनुयायी हे पालन करीत असतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्म हे माणसासाठी आवश्यक बाब आहे. कारण धर्म माणसात आशावाद निर्माण करतो. धर्म माणसासाठी अविभाज्य घटक मानला जातो. धर्मात बुद्धि प्रामाण्यवाद, नैतिक्ता, स्वातंत्र्य, समता, या मूल्याचा अंतर्भाव असला पाहिजे असे ठाम मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले.

**संदर्भ:-**

1) सामाजशस्त्रीय विचारवंत, डॉ. प्रदीप आगलावे.
2) राजकीय विचारवंत, डॉ. गाठाळ.
3) बुद्ध आणि त्यांचा धम्म,डॉ. बी. आर. आंबेडकर
4) भारतीय समाजातील धर्म, प्रा. ज्योती डोईफोडे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि सामाजिक बदल

**डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर**

यशवंत क. महाविद्यालय, अहमदपूर

समाजातील वंचित, उपेक्षित, दलित यांच्यासाठी शैक्षणिक आणि सामाजिक विकासबदलासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारिता या लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा उपयोग करुन सामाजिक बदल घडविण्यासाठी जीवनभर अविरत कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे संपूर्ण मानव जातीला लाभलेले एक असे महापुरुष होते की, ज्यांनी माणसाला सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी पत्रकारितेच्या माध्यमातून नविन तत्त्वज्ञान समाजासमोर मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र जीवन म्हणजे मानव मुक्तीच्या ध्येयासाठी केलेली तपश्चर्या होती. पत्रकारितेच्या माध्यमातुन सामाजिक बदल घडवून आणण्याची भाषा बहिष्कृत भारत, मूकनायक या वृत्तपत्राद्वारे नेहमीच होत होती आणि यामुळेच शासनकर्त्यांना मानवांना अधिकार दिलाच पाहिजे असा एक विचार यामुळे निर्माण झाला होता. भारत 15 ऑगस्ट 1947 ला स्वतंत्र झाला आणि आपण लोकशाही स्वीकारली आणि यामुळेच सामाजिक न्यायासाठी पोषक वातावरण निर्माण झाले. हे पोषक वातावरण निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य जर कोणी केले असेल तर बहिष्कृत भारत आणि मूकनायक या वृत्तपत्रांनी असे म्हणने वावगे ठरणार नाही. डॉ. आंबेडकरांची वृत्तपत्रे दलित, शोषित, पीड़ित समाजाकरिता उद्बोधक व प्रभावी साधने ठरली. आणि यामुळेच समाजात जाणीव जागृती होऊन सामाजिक बदल होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेल्या वृत्तपत्रातून जुन्या, रूढी, परंपरावर मात करून नवीन विचार रुजविणे, आधुनिकतेची कास धरून बदल घडून यावा याकरिता त्यांचे विचार आजही समर्पक आणि दिशादर्शक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील वास्तव पत्रकारितेच्या माध्यमातून व्यक्त केलेले विचार वंचित, दलित, उपेक्षित जनमानसात सामाजिक बदल निर्माण करण्यासाठी सहाय्यक ठरले. डॉ. आंबेडकरांनी त्यावेळेची दलित समाजाची अवस्था पाहिली आणि स्वतः अनुभवली, त्यामुळे अशीच परिस्थिती कायमस्वरूपी राहिली तर या समाजाचा विकास होणार नाही. त्याकरिता वृत्तपत्रे ही सामाजिक बदलाची, परिवर्तनाची प्रभावी साधने आहेत. म्हणून डॉ. आंबेडकरांची वृत्तपत्रे दलित समाजात बदल होण्यास उपयुक्त व महत्त्वपूर्ण ठरली आहेत. या सामाजिक बदलासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महान मंत्र दिला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, या मंत्रांना प्रबळ बनविण्यासाठी त्यांनी पत्रकारितेचा उपयोग केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे यशस्वी पत्रकार आणि तत्कालिन वास्तविक मांडणी करणारे प्रभावी संपादक होते. समाज परिवर्तनासाठी वृत्तपत्रासारखे दूसरे प्रभावी माध्यम नाही, समाजाची प्रगती करण्यासाठी पत्रकारिता हाच एकमेव लोकशाहीचा स्तंभ आहे असा त्यांचा विश्वास होता. चळवळीची वाढ करण्यासाठी, चळवळीला ताकत देण्यासाठी वृत्तपत्र अत्यंत महत्त्वाचे आहे असे ते मानत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित, शोषित, पीड़ित आणि दलित समाजात जागृती करण्यासाठी अनेक शोधनिबंध आणि पाच मासिके प्रकाशित आणि संपादित करुन

समाजिक बदल घडवून आण्यासाठी त्यांचे प्रयत्न येण्याऱ्या काळात प्रेरणादायी आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून दलित चळवळ पुढे नेण्यात त्यांना वृत्तपत्रांची खूप मदत झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शोषित, वंचित, दलित पत्रकारितेचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. ते दलितांतील पहिले संपादक, संस्थापक आणि प्रकाशक बनून समाजाचा चेहराच बदलुन टाकुन भारतीय समाज व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला. डॉ. बाबासाहेबांनी दलित समाजातुन पहिल्यांदा सन 1920 साली 'मूकनायक', सन 1930 'जनता', सन 1927 साली 'बहिष्कृत भारत', सन 1928 साली 'समता' आणि स्वातंत्र्यानंतर सन 1956 साली 'प्रबुद्ध भारत' या पाच मराठी नियतकालिकांचे यशस्वीरित्या संपादन करुन सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. या नियतकालिकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक प्रश्नांवर आपले विचार मांडुन जनमानसात परिवर्तनाची बिजे रोवली.

दलितांवर, वंचितावर, अस्पृश्यांवर होणाऱ्या अत्याचारांवर प्रकाश टाकण्यासाठी 31 जानेवारी 1920 रोजी बाबासाहेबांनी 'मूकनायक' नावाचे पहिले मराठी पाक्षिक सुरू केले. 'मूकनायक' या मराठी पाक्षिकाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पांडुराम नंदराम भाटकर हे पहिले संपादक होते. या वृत्तपत्राच्या मुखपृष्ठावर संत तुकारामांचे वचन जाणीव पूर्वक छापण्यात आले होते. ते असे -

काय करु आता धरुनिया भीड |
नि:शंक हे तोंड वाजविले ||
नव्हे जगी कोणी मुकियांचा जाणे |
सार्थ का लागत नव्हे हित ||

डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या 'मूकनायक' या वृत्तपत्रामागील भूमिका म्हणजे समाजातील अव्यक्त, बंदिस्त व भयान अन्यायाची वाचा फोडणे ही होती. 'मूकनायक' या वृत्तपत्राचा अर्थ पहावयाचा झाला तर 'मूक' दलितांचा, वंचितांचा, उपेक्षितांचा तो आवाज होता. या वृत्तपत्राने दलितांमध्ये एक नवीन आशा, चैतन्य व उत्साह निर्माण करुन त्यांच्या हक्कांसाठी, समाज बदलासाठी प्रवृत्त केले आहे. काही अडचणीमुंळे 'मूकनायक' वृत्तपत्र बंद पडले परंतु पत्रकारितेची पेटवलेली मशाल 3 एप्रिल 1924 रोजी 'बहिष्कृत भारत' या नावाने दुसरे मराठी पाक्षिक काढुन तेवत ठेवण्यात आली. 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकाचे संपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत:च केले होते. या पाक्षिकाच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाच्या समस्या व तक्रारी समोर आणण्याचे तसेच टीकाकारांना सडेतोड उत्तरे देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्य व स्फूर्ति निर्माण करणारे लेखन केले. संपादकीय मध्ये बाबासाहेबांनी समाजाला वास्तवाची जाण करुन देण्यासाठी म्हटले आहे - "जर बाळ गंगाधर टिळक अस्पृश्यांमध्ये जन्माला आले असते तर त्यांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असा नारा दिला नसता, तर 'अस्पृश्यता निर्मूलन हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असे म्हटले असते". निर्भिडपणे समाजापुढे वास्तव मांडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लेखनीच्या माध्यमातून समाज बदलासाठी पोषक वातावरण निर्माण केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे सन 1929 मध्ये 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र नाविलाजास्तव बंद करावे लागले.

पत्रकारिताच समाज परिवर्तनाचे महत्वपूर्ण माध्यम बनू शकते. पत्रकारितेच्या सहाय्यानेच आपण समाजातील उपेक्षित, बंचित, दलित समाजाला न्याय मिळवून देवू शकतो. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी

29 जून 1928 रोजी 'समता' (हिंदी: समानता) हे पत्र सुरू केले होते. परंतु 'समता' हे पत्र बंद पडल्यानंतर 'जनता' या नावाने पुन्हा प्रकाशित करुन पत्रकारितेचा घेतलेला वसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालुच ठेवला. आणि यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'आम्ही शासनकर्ती जमात बनणार' असे लेखातुन समाजाला सांगुन समाज बदलाचे विचार समाजासमोर ठेवले. 'जनता' या पत्राव्दारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वंचित, दलित, उपेक्षति, शोषितांच्या समस्या मांडण्याचे खुप मोठे मौलिक कार्य केले आहे. स्वातंत्र्यानंतर म्हणजेच 1956 पर्यंत एकूण जवळपास 26 वर्षे हे साप्ताहिक चालू होते. भारताच्या स्वातंत्र्याच्या जडण-घडणित 'जनता' हे साप्ताहिक महत्वाची भूमिका निभावले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 4 फेब्रुवारी 1956 रोजी पाचव्यांदा 'जनता' या साप्ताहिकाचे नाव बदलुन 'प्रबुद्ध भारत' या नावाने पाक्षिक सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर 'प्रबुद्ध भारत' हे पाक्षिक बंद झाले. बाबासाहेबांचे नातू प्रकाश आंबेडकर यांनी 'प्रबुद्ध भारत' ची नवीन सुरुवात 10 मे 2017 रोजी करुन त्यांचे विचार समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य पत्रकारितेच्या माध्यमातून करत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या वृत्तपत्रांच्या माध्यमातून आपल्या विचारांनी दलित, वंचित, उपेक्षित, शोषित, स्पृश्य आणि अस्पृश्यांचे प्रबोधन तर केलेच मात्र त्यामुळे दलितांच्या विचारात आणि जीवनात अमुलाग्र बदल झाला आणि हा बदलच समाज बदलास कारणीभूत ठरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्राचे नाव ठेवत असताना विचारपूर्वकच ठेवले आहे. 'मूकनायक' ज्यावेळी समाज मूक बनून सर्व अन्याय सहन करीत होता त्यावेळी त्यांना वाचा फोडण्यासाठी जाणीवपूर्वक वृत्तपत्रास 'मूकनायक' हे नाव ठेवले. यानंतर बाबासाहेबांनी 'बहिष्कृत भारत' हे नाव वृत्तापत्रास ठेवले. समाजिक बदल घडवुन आण्यासाठी वास्तवाची जाण करुन द्यावी लागते यासाठी बाबासाहेबांनी हे नाव ठेवले असावे. यानंतर 'समता' हे वृत्तपत्र सुरु केले. मूके असल्याची, बहिष्कृत असल्याचे जाणीव जेंव्हा होईल तेंव्हाच देशात समता स्थापित होईल, यावर डॉ. बाबासाहेबांचा विश्वास होता. यानंतर 'जनता' हे नाव ठेवले याचे रुपांतर 'प्रबुद्ध भारत' यामध्ये करण्यात आले. म्हणजेच मुक्यांना बहिष्कृत असल्याचे जाणीव करुन दिली. आणि जेंव्हा ही जाणीव होईल तेंव्हाच समता स्थापित होवुन सामाजिक बदल होईल, जनता सर्वस्व आहे आणि त्यांच्या विकासामुळे, सामाजिक बदलामुळेच प्रबुद्ध भारत बनु शकतो याची जाणीव समाजाला करुन देण्यासाठी असे नाव ठेवले असतील असे मला वाटते. त्यावेळची वृत्तपत्रे विशिष्ट जातींचीच हुजरेगिरी करणारी, दलित, वंचित, अस्पृश्यांवर अन्यायच करणारी होती. यामुळे या गोष्टिचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विचार करुनच पत्रकारितेचे शस्त्र अस्पृश्य समाजाचा विकासासाठी बाहेर काढले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून अनेक चळवळी चालविल्या. मानगाव येथे कोल्हापूरजवळ परिषद घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांचे प्रश्न मांडले. राजर्षि शाहू महाराजांनी या परिषदेत डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाचे स्वागत करुन त्यांच्याकडून या समस्यांना गती मिळेल असे अभिवचन दिले होते. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळयाच्या सत्याग्रह केला आणि त्याची बातमी त्यांच्या बहिष्कृत भारत या वृत्तपत्रात छापुन आली. काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह करुन पत्रकारितेच्या माध्यमातुन या चळवळीला संपूर्ण भारतभर पसरविण्याचे कार्य यामुळे झाले. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती दहन करून जातीव्यवस्थेला विरोध करुन पत्रकारितेच्या माध्यमातून संपूर्ण देशात चळवळ निर्माण केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय चळवळीस येवला येथे आपण हिंदू जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. ही

घोषणा वाऱ्यासारखी वृत्तपत्राच्या माध्यमातुन भारतभर पसरली अश्या अनेक चळवळींना पत्रकारितेची जोड देत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज बदलासाठी पत्रकारितेचा उपयोग करुन घेतला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक परिवर्तनवादी विचार समोर ठेवून पत्रकारितेच्या माध्यमातून तत्कालिन समाजव्यवस्था, समाजातील निरुपयोगी, कालबाह्य तत्वे, स्वार्थी व शोषण करणारे राजकारण याचे विवेचन वृत्तपत्रातून मांडुन सामाजिक परिवर्तनासाठी पत्रकारितेचा उपयोग केला. समाजशास्त्रीय दृष्टिकोण, चोख व संदर्भानुसार विवेचन, आत्मविश्लेषणात्मकता, पोटभिरु वृत्तीवर टिका, वास्तववादी परखडपणा इत्यादी बाबासाहेबांच्या पत्रकारितेची वैशिष्टये समाज बदलासाठी पोषक ठरली. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या सबंध आयुष्यामध्ये पत्रकारितेला व्यावसायिक रूप येवू दिले नाही. पत्रकारिता ही आत्मोन्नती आणि व्यक्ति विकासावर आधारित असली पाहिजे यासाठी त्यांनी कार्य केले. उपेक्षित, वंचित, शोषित अस्पृश्यांचा विकास हे उद्दिष्ट त्यांच्या पत्रकारितेचे होतेच परंतु समाजाची उन्नती, मानवी हक्कासाठी लढा, स्त्रीयांना सामाजिक स्थान, समता, बंधूता आणि न्याय या तत्वावर आधारित डॉ. बाबासाहेबांनी पत्रकारिता केली आहे. यासाठीच आपले संपूर्ण आयुष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खर्ची केले.

**संदर्भग्रंथ सूची:**

1. डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता आणि समाज परिवर्तन - डॉ. प्रभाकर बोरगांवकर
2. मूकनायक, मुंबई, वर्ष 1 ले, 5 जून 1920 अंक 10.
3. डॉ. गंगाधर पानतावणे - पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अभिजीत प्रकाशन,नागपूर 1987
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18 भाग 3
5. मुन वसंत (संपा.) बहिष्कृत भारत आणि मुकनायक महाराष्ट्र शासन, प्रकाशन 1990.
6. यदुनाथ थत्ते - बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता, (संपा. शरणकुमार लिंबाळे-प्रज्ञा सूर्य) दिलीपराज प्रका. 2007

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धम्मचक्रप्रवर्तन

प्रा. शृंगारे विकास प्रभाकर

समाजशास्त्र विभाग, न्या. आठल्येकला, वेद. सप्रे, वाणिज्य व विधिज्ञपित्रे विज्ञान महाविद्यालय देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी( महाराष्ट्र ) ४१५८०४

जगात महामानवाला महामानवाच्या रूपातच जन्म लागतो. त्यामुळेच पुठे तो आपल्या व्यक्तिमत्वाने आणि कर्तृत्वाने महामानव सिद्ध होतो. जगाच्या अशा नियमानुसारच दि. १४ एप्रिल १८९१ ला मध्यप्रदेशात महू येथे महाराष्ट्रीय पिता रामजी आणि माता भीमाबाई यांच्या पोटी म्हणून महामानवाच्या रूपात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन, व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व भारतराष्ट्राच्या, अखिल जगाच्या आणि विश्वात्मक मानवतेच्या कल्याणकारी इतिहासात सोनेरी अक्षरांनी लिहावे जावे, अशाच महान योग्यतेचे आहे. आपल्या असामान्य, अलौकिक आणि आदरणीय गुणांमुळे आणि कर्तृत्वामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगातल्या कुठल्याही आणि कोणत्याही सुज्ञ आणि जिज्ञासू व्यक्तीच्या चिंतनाचा, मननाचा, आदराचा आणि लेखनाचा विषय होत आहेत,कर्तृत्वसंपन्न व कीर्तीसंपन्न जीवनाचे,त्यांच्या धीरोदात्त व दूरदृष्टीने यु क्त स्वभावविशेषांचे आणि त्यांच्या विविधांगी जीवितकार्याचे अनेक विचारणीय पैल वेगवेगळया विषयासाधून व दृ ष्टीकोनातून नेमकेपणाने शब्दबद्ध करणे त्यांच्या विषयी नितांत प्रेम व आदर व्यक्त करण्याबरोबर महामानव डॉ.बा बासाहेब आंबेडकर समग्रतेने समजून घेणे हा या संशोधनात्मक पेपरचा उद्देश आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर अखिल मुंबई इलाका महार परिषदेत ३१ मे १९३६ रोजी केलेल्या भाषणात म्हणतात कि,"धर्मांतर आम्हाला मानसिक बौ द्धिक,भौतिक विकासासाठी धर्मांतर करायचे आहे."देशातील अस्पृश्य समाजची धार्मिक विचारसरणी व १९३५ नंत रच्या त्यांच्या हिंदू धर्म विषयक संबंधांच्या बदलाविषयी होणारी मनोभूमिका कशी बदलत गेली आणि अस्पृश्य स माज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतर घोषणेनुसार धर्मांतर प्रत्यक्षात आणण्यासाठी सतत जागरूक आणि प्रय त्नशील राहून आपलया निष्ठेपासून कसा विचलित झाला नाही.याचे प्रत्यक्ष प्रत्यंतर दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ च्या धम्मदीक्षेच्या नागपूर येथील सोहळयात सर्व देशाला झाले आहे.हिंदू धर्माच्या गुलामगिरीत मुक्त करण्यासाठी पूर्वीच्या नागवंशीय बौद्धधर्मीय असलेल्या नाग लोकांची (मूळ वस्ती )नागपूर हि मायभूमी असलेल्या ठिकाणी २५० ० च्या बुद्धब्दांत बौद्ध सांस्कृतिक अशोक जयादशमी दिनी पाच लाख अस्पृश्य बांधवाना बुद्ध धम्माच्या दिक्षा देऊन त्यांना धर्माच्या गुलामगिरीतून मुक्त केले.प्रथम बाबासाहेबधम्मदीक्षा घेऊन प्रतीक्षा बद्ध झाले आणि त्यांना जीवन मार्गात उत्कर्ष साधण्यासाठी २२ प्रतिज्ञा दिल्या.

**बुद्ध धम्म स्वीकारामागील भूमिका**

१२ मे १९५६ रोजी दिल्ली येथील ब्रिटिश बॉडकास्टिंगच्या नभोवाणी केंद्रावरील वार्तालापात बोलताना बुद्ध धम्म स्वीकारामागील भूमिका सांगताना म्हणतात,"मी बुद्ध धम्माच्या या करीत स्वीकार करतो,कारण बुद्ध ध म्म एक साथ तीन सिद्धांत देतो.बुद्ध धम्म प्रज्ञा,करुणा व समता हि मूल्ये डे येतो.बौद्ध संस्कृतीचे पुनरुज्जीवन करणे व सर्व भारत बौद्धमय करणे हे आपले ध्येय असल्यमचे त्यांनी ५ ऑगस्ट १९५६ रोजी जाहीर केले.तथागत बुद्धांनी प्रवर्तीत केलेल्या धम्माची क्रांतिकारता पेटल्यामुळे त्यांनी बुद्ध धम्माची दीक्षा घेतली.या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रबुद्ध भारत या साप्ताहिकाच्या २९ सप्टेंबर १९५६ च्या अंकात म्हणतात,ते पुन्हा प्रवर्तित करण्याची संधी मला मि

ळाली.घडणीसाठी काही सामाजिक,आर्थिक,राजकीय आणि सांस्कृतिक चळवळी राबविल्या व त्यातून अस्पृश्य समाजाची मानसिकता तयार केली.बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीचे महत्त्व सर वुईल्यम्स हंटर यांनी १८८१ मध्ये "एक ना एक दिवस भारतात अंधाराचे पटल दूर होईल आणि भारतात बुद्ध धम्माचे पुनरुज्जीवन होईल "असे भाकीत डॉ.बाबासाहेबांच्या धर्मांतराने खरे ठरले.धर्मांतर सूद उगविण्यासाठी द्वेष व्यक्त करण्यासाठी करावयाचे नव्हते,तर "ज्या लोकांसह मी

धर्मांतर करणार आहे,ते गलीतगात्र,गरिबीने जर्जर झालेले आणि विकासापासून कोसो दूर करण्यासाठी मी धर्मांतर करीत आहे."धम्मचक्र अनुप्रवर्तन करतेवेळी डॉ.बाबासाहेबांनी "मी भारतीय संस्कृतीशी एकनिष्ठ आणि अभिन्न अशा बुद्ध धम्माचा स्वीकार केला"असे म्हटले आहे .बुद्ध धम्म हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग होता.म्हणून तो स्वीकारणे आपली परंपरा आणि इतिहास यांना बाधा येणार नाही,अशी त्यांची धारणा होती.

बुद्ध धम्माच्या स्वीकारातून बौद्ध इतिहासात संशोधनाची शोध गुपित,भारतीय संस्कृतीने पुनर्मूल्यन करण्याची त्यामुळे प्रक्रिया सुरु झाली.बुद्ध धम्म स्वीकारातून साकार झालेला समाज व त्याची सामाजिक तत्त्वे ही प्रामुख्याने लोकशाही जीवन मूल्यांना पूरक आहेत व मानवतावादी सिद्धांताला गतिमान करणारी आहेत.बुद्ध धम्म हा भारतीय परंपरेतील सुधारण्यासाठी विज्ञाननिष्ठ बुद्धीप्रामाण्यवादी तत्वावर आधारित आहे.त्यामुळे धम्म दीक्षेनंतर भारतीय परंपरेचे सातत्य कायम टिकवले गेले.त्याचबरोबरीने धम्मक्रांतीद्वारे डॉ.बाबासाहेबांनी बहुजन समाजाला बुद्ध धम्म व बौद्ध संस्कृतीचा जो ऐतिहासिक वारसा दिला,तो वृद्धिंगत करणे हे आपले कर्तव्य आहे.धम्मक्रांती उध्वस्त होऊ नये आणि तिचा प्रतिगामी शक्तीला कोणताही फायदा मिळू नये याची खबरदारी घेणे प्रत्येक आंबेडकरवादयाचे कर्तव्य आहे.बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे "प्रत्येक समाजच्या नियमनाचे शिलाचार हे मूलतत्त्व होय"त्याचप्रमाणे धम्म मुल्यतत्त्व ठरू शकतो.भारताची राज्यघटना जरी न्याय,स्वातंत्र्य,समता आणि बंधुत्व या मूल्यांवर आधारित असली तरी समाज व्यवस्था असमानता,असहिष्णुता ही धर्मशास्त्राची गुलामगिरी यावर आधारित आहे,ही भयंकर विसंगती पाहून बाबासाहेबांनी संविधानाला सुसंगत अशा समाजनिर्मितीसाठी बुद्ध धम्म स्वीकाराचा पर्याय ठेवला आहे.कारण धम्माच्या स्वीकारातून आधारित आदर्श समाज रचना निर्माण होऊ शकते.आणि ती तशी होण्यातच देशाचे हित असल्यामुळे त्यांनी भारत बौद्धमय करण्याची घोषणा केली.आज देशाचे राजकीय नेतृत्व सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यात अपयशी ठरल्याचे दिसते. राजकीयलोकशाहीचिरस्थायी करायची असेल,तर सामाजिक व आर्थिक क्षेत्रात लोकशाही येणे ही पूर्व अट आहे,त्यानुसार सर्व क्षेत्रात व्यापलेली जाती संस्था नष्ट करण्यासाठी डॉ.बाबासाहेब बुद्ध धम्म स्विकाराचा पर्याय ठेवतात.जो तथागत बुद्धाचा उद्देश होता,तोच डॉ.बाबासाहेबांनी भारतीय संविधानाचा उद्देश बनविला. परंतु लोकशाहीत बहुसंखेची महत्तव आहेच. पण त्याचबरोबर न्यायाचे, हक्काचे,अधिकारांचे संकोच मात्र लोकशाहीच्या प्राण तत्त्वाला म्हणजेच जीवन व मानवी मूल्यांना बाधा आणणारे ठरतात.खऱ्या अर्थाने जनतेच्या भावभावनांचे प्रतिबिंब जोवर या प्रणालीच्या अमलात आढळणार नाही तोवर त्या बाबतीचे महत्त्व निर्माण होणार नाही.केवळ जुन्या धर्माचा त्याग करूनच ते थांबले नाहीत,तर त्यांनी नव्या धर्माचा स्विकार केला. नवसमाजाला भरीव पायावर उभे करण्याचे सामर्थ्य असलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाच्या पायावर उभ्या करण्याचा बुद्ध धम्माची निवड केली.

संविधानात बौद्धमय झालेला भारत व्यवहारातील बौद्धमय व्हावा.असे झाले तर,भारत पृथ्वीतलावरील सर्वोच्च महासत्ता होऊ शकतो.

महासत्ता बनण्याची गुरुकिल्ली रस्ता,इमारती,उद्योग,कारखान्यामध्ये नाही,तर ती आहे समाजाच्या मानसिकतेमध्ये आहे.बाबासाहेबांनी या देशाचे संविधान लिहिण्याची जबाबदारी देण्यात आली.तेव्हा त्यांना बुद्धांच्या विचारावर आधारित भारत ,सम्राट अशोकाचा भारत आपल्याला पुन्हा निर्माण करावयाचा आहे.त्यामुळे भारत हे आदर्श राज्य असेल,यासाठी बुद्धाचाच मार्ग निवडला.बाबासाहेबांनी भारताच्या राष्ट्र प्रमुखाच्या सिंहासनावर

सम्राट अशोकाच्या राज्याचे ब्रीद वाक्य कोरले.ते "धम्मचक्र -प्रवर्तनाय !"

हे सिंहासन धम्म म्हणजे नीतीचे प्रवर्तन करणारे आहे याची जाणीव राज्यकर्त्यांना सदैव होत रहावी म्हणून अशोकाचे धम्मचक्र अशोकाची चतुर्मुखीसिंहमुद्रा भारताची अधिकृत मुद्रा म्हणून स्विकारावी.याचाच अर्थ आजचा भारत बुद्धाच्या कल्याणाचा विचार स्विकारलेला भारत आहे.परंतु भारताचे अधिकृत विधीविज्ञान असलेल्या संविधानाने संहिताबद्ध असलेले हे तत्त्वज्ञान भारताच्या

लोकशाहीचे अंग म्हणून व्यवहारात आणले गेले नाही,ही अत्यंत खेदाची बाब आहे.भारत बौद्धमय करण्याचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बाबासाहेब सांगतात,त्याप्रमाणे बुद्ध धम्माचा प्रचार हा तुमच्या पुरता मर्यादीत न ठेवता साऱ्या भारतीयांना मी नव्या क्षेत्रात आणण्याचा प्रयत्न करीनधम्माच्या प्रचार व प्रसाराचे कार्य बौद्धेतर समाजामध्ये सुरु करावे.कारण हा घटक फारसा बदललेला दिसून येत नाही.त्यांची स्थितिशिलता घालविणे हे सुद्धा महत्त्वाचे कार्य टप्प्याटप्प्याने हाती घेतले पाहिजे.कोणत्याही समाजात व चळवळीत नीती म्हणजे धम्म,राज्यघटना व कायदा यांचे बलस्थान असल्याशिवाय तो समाज आपली उन्नती साधू शकत नाही.सर्वांनी आपल्या न्याय हक्कासाठी,लोकशाही गणराज्य टिकवून आणण्यासाठी,संविधानाच्या संरक्षणासाठी,डॉ.बाबासाहेबांना अभिप्रेत असणारा प्रबुद्ध भारत घडविण्यासाठी सतत जागृत राहून सामाजिक न्यायाचा संघर्ष मजबूत केला पाहिजे.बाबासाहेबांना सांगितलेले "बेकीत क्षय एकीत जय"हे तत्त्व ध्यानात ठेवून आधुनिक काळातील मानवामानवातील नव्या सहसंबंधाची व समतामूलक सहजीवनाची पायाभरणी हा नवभारताच्या जडणघडणीचा प्रारंभबिंदू ठरेल.

संदर्भ:-

1. धम्मयान मासिक ऑक्टोबर २०२१
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन -चरित, धनंजयकीर
3. महामानव -राजवंश उर्फ डॉ. ज्ञानराज काशीनाथ गायकवाड
4. बुद्ध आणि त्याचा धम्म - डॉ. बाबासाहेब आंबेडकर